विषय निबंध
क्र. २१२४


नव्या काळाची वाटचाल

यशवंत कृष्ण खाडिलकर

REFBK-0016590

किंमत नऊ रुपये

16 ब २५
७५८२८
२१/३/७१.
२१२४



साहित्य सहकार संघ प्रकाशन

नव्या काळाची वाटचाल

मराठा ग्रंथ संग्रहालय, सातारा
क्रमांक ..... दिः .....
वर्गांक ..... नोंः दिः .....

लेखक :
श्री. यशवंत कृष्ण खाडिलकर

प्रस्तावना :
प्रा. न. र. फाटक

REFBK-0016590

मराठा ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १९५९०
समर्थ शाळा (स्थळ सेतू)

किंमत नऊ रुपये

प्रकाशक :

वासुदेव विष्णु भट
साहित्य सहकार संघ लिमिटेड
१७२, नायगाव क्रॉस रोड,
दादर, मुंबई १४

आवृत्ति १ ली : १९६८

मुद्रक :

कृ. भि. राऊळ
को. ए. सो. प्रिंटिंग वर्क्स
अलिबाग, (कुलाबा)

प्रास्ताविक

'बापासारखाच थोर योग्यतेचा लेक' ही अपेक्षा अगदीच वांझोटी नाही, असे विरलत्वाने सिद्ध करणारी अर्वाचीन महाराष्ट्रात जी तीन चार उदाहरणे दाखविता येतील त्यांत कै. कृ. प्र. – काकासाहेब खाडिलकर व त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. यशवंत कृष्ण ऊर्फ अप्पासाहेब खाडीलकर ही पितापुत्रांची जोडी अवश्य गणावी लागेल. श्री. अप्पासाहेब यांनी नवाकाळ दैनिकाचा धुरा संपादक या नात्याने १९२९ मध्ये शिरावर घेतली. त्या वर्षीच्या आरंभी कै. काकासाहेब राजद्रोहाच्या आरोपावरून तुरुंगात डांबले गेले व श्री. अप्पासाहेबांनी त्यांची जबाबदारी उचलली व तेव्हापासून आजपर्यंत अव्याहत ३९ वर्षे 'नवाकाळ' चे संपादन कार्य श्री. अप्पासाहेब करीत आहेत. १९४८ च्या ऑगष्ट अखेरपर्यंत त्यांना प्रसंगी सल्लामसलत देण्याला आणि कमीजास्त विचारपूस करण्याला आपल्या पित्याचा आधार होता. काकासाहेब दिवंगत झाल्याला वीस वर्षे लोटली. पितृवियोगानंतरच्या या काळात 'नवाकाळ' वर अनेक संकटे ओढवली ती आर्थिक स्वरूपाची होती. कित्येकदा ही संकटे नवाकाळचा वृत्तपत्र-सृष्टीतून लोप करतात कीं काय, असे भय वाटण्याइतकी उग्र दिसत होती. अशा संकटाच्या फेऱ्यातून ज्या पुण्याईने कै. काकासाहेब निभावून गेले, ती पुण्याई व तिच्यांत अप्पासाहेबांनीं आपल्या कर्तृत्वगुणांनी टाकलेली भर, यांच्या योगाने श्री. अप्पासाहेबही भेवडावणाऱ्या संकटावर मात करून 'नवाकाळ' टिकविण्याला समर्थ ठरले. आज भांडवलदारांनी चालविलेल्या वृत्तपत्रांचा सुकाळ असूनही आपल्या ध्येयनिष्ठेला लवमात्र धक्का न लागू देता केवळ एकट्या व्यक्तीने चालविलेले दैनिक महाराष्ट्रात, विशेषतः मुंबई शहरांत 'नवाकाळ' खेरीज दुसरे दाखविणे कठीण आहे.

श्री. अप्पासाहेबांच्या अंगी आपल्या तीर्थरूपांचे अनेक प्रशंसनीय गुण आहेत. ध्येयनिष्ठा या गुणांमागे करारीपणा, स्वाभिमान, विवेक, औदार्य, सौजन्य, निःस्पृहता, प्रसिद्धिविन्मुखता इत्यादि इतर गुण नसतील, तर तो दीर्घकाळ जीव धरून राहू शकत नाही. ज्या प्रखरत्वाने हे गुण कै. काकासाहेबांच्या ठिकाणी वसत होते, त्याच प्रखरत्वाने ते गुण श्री. अप्पासाहेबांमध्ये दिसून येतात. इतर गुणांप्रमाणे प्रतिपाद्य विषयाचे तात्विक रहस्य उलगडून त्या प्रतिपाद्यांचा वाचकांच्या हृदयावर प्रभाव गाजविणारी कै. काकासाहेबांची अननुकरणीय भाषाशैली श्री. अप्पासाहेबांनी आत्मसात केली आहे हे त्यांचे वैशिष्ट्य ध्यानांत ठेवण्याजोगे आहे. या शैलीमुळे त्यांचे नवाकाळांतील अग्रलेख मुद्दाम वाचणारा महाराष्ट्रात मोठा वाचकवर्ग आढळल्यास नवल वाटायला नको. अशा वाचकांपैकी ज्यांना त्यांतले पुष्कळसे निवडक अग्रलेख ग्रंथरूपाने लोकांना सादर करावेसे वाटले, त्यांनी ते 'नव्या काळाची वाटचाल' या नावाने आता एकत्र छापले आहेत. यांत ७० लेख असून त्यामध्ये संयुक्त महाराष्ट्रवादावरील लेखांची संख्या इतर विषयांच्या मानाने थोडी जास्त भरेल. १९५२ ते १९६४ या बारा वर्षांतील लेखांतून वरच्याप्रमाणे संग्राहकानी निवड केली आहे. काँग्रेस या मूळ संस्थेसंबंधांतील आपुलकी शाबूत ठेवून सदर संस्थेच्या पुढाऱ्यांच्या राज्यकारभारांतील दोषांचे आविष्करण सामान्य लोकहिताच्या

व लोकशाहीच्या उत्कट कळवळ्याने करणे ही एकप्रकारे तारेवरच्या कसरतीसारखी अवघड कामगिरी असूनही ती संयुक्त महाराष्ट्राच्या दारूण वादप्रसंगी श्री. अप्पासाहेबांनी ज्या मनोधारणेने व हातोटीने यशस्वी रीत्या बजावली तिच्याकडे लक्ष दिल्यास त्या वादविषयक लेखांच्या संख्येचे प्रमाण अधिक का? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर आपोआप मिळेल.

वेळोवेळी उपस्थित होणाऱ्या राजकीय प्रश्नांची साधकबाधक चर्चा हे वृत्तपत्राचे कर्तव्य असते व त्या कर्तव्यानुसार राजकारणावर प्रसंगोचित स्वाभिप्रायदर्शक लेख प्रत्येक वृत्तपत्र संपादकाला लिहावे लागतात. पण राजकारण हे समग्र मानवी जीवन नव्हे. यामुळे मधून मधून वाङ्मय, लोकनीति, राजनीति, कर्तृत्वशाली व्यक्तीचे सार्वजनिक स्वरूपाचे विचार, त्यांचा वाढदिवस अथवा मृत्यु या विषयांची संपादकाला दखल घ्यावी लागते. त्याप्रमाणे या संग्रहात जे लेख घेतले आहेत, त्यांची वाचनीयता प्रत्यक्ष अनुभवानेच पटणारी आहे. मंगल उत्साहाचा किंवा अपार शोकाचा, कसलाही प्रसंग असो, त्यांत निर्मळ व समरसतेने भाग घेण्याइतके श्री. अप्पासाहेब उदारचरित असल्याची खात्री आचार्य अत्रे व स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या वाढदिवसानिमित्त लिहिलेल्या लेखावरून पटेल. श्री. अप्पासाहेबांच्या वाङ्मयविषयक विचारसरणीचे आणि टीकापद्धतीचे मासले म्हणून 'पाहिजे आधारवड पु. ल. देशपांडेना', 'नवकथेचे गुरुजी गंगाधर गाडगीळ', 'संमेलनाध्यक्षांचे हलकट भाषण' या लेखांचा निर्देश करता येईल. संयुक्त महाराष्ट्राचा वाद १९६० मध्ये बहुतांशी मिटल्यावर नव्या महाराष्ट्राच्या भवितव्याविषयीचे लेख श्री. अप्पासाहेबांनी अतिशय तळमळीने लिहिलेले आहेत. 'शिवजयंतीस उदेले : महाराष्ट्र धन्य झाले' या सकट पुढचे तीन लेख वरील विधानाचा पुरावा समजावा. महाराष्ट्रीय ब्राह्मणांची स्थिती, वृत्ती व गती या संबंधाचे जे यथातथ्य विदारक चित्र श्री. अप्पासाहेबांनी 'ब्राह्मण ही पदवी नसून शिवी झाली' यामध्ये रेखाटले आहे, ते सुद्धा वरील संदर्भात स्वीकारल्यास महाराष्ट्राच्या एका सामाजिक विभागाचा चांगला बोध होईल.

श्री. अप्पासाहेब हे तात्विक ज्ञानाचे चिंतनमननशील व्यासंगी असल्यामुळे त्यांच्या लेखनात सर्वत्र तात्विक मीमांसेच्या गंभीर छटा दिसतात. त्यामुळे त्यांच्या लेखनशैलीला रम्योदात्त म्हटल्यास चूक होणार नाही. स्वतः श्री. अप्पासाहेब ख्यातिविन्मुख असल्याचे मागे सांगितलेच आहे. त्यांनी स्वतः आपल्या लेखांचे ग्रंथरूपाने पुन्हा प्रकाशने कधीच केले नसते. परंतु ज्या गुणज्ञ वाङ्मयरसिकांना श्री. अप्पासाहेबांच्या लेखांचे पुनर्मुद्रण करावेसे वाटले त्यांचे खरोखरच अभिनंदन करणे अवश्य आहे. त्यांनी पुनर्मुद्रणाचे श्रेय घेऊन वृत्तपत्रीय लेखनाचा एक आदर्श लोकांपुढे ठेवण्याचे कार्य साधले, यासाठी प्रकाशकांना धन्यवाद देतो. महाराष्ट्रात या कार्याचे यथोचित कौतुक होईल ही आशा वाटते.

नवी भटवाडी
मुंबई ४

—न. र. फाटक

प्रकाशकांचे मनोगत

चालू पिढीच्या उत्तरार्धातील मराठी वृत्तपत्रसृष्टीमध्ये नाव घेण्यासारखे जे संपादक आता हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच उरले आहेत त्यांत श्री. य. कृ. खाडिलकर ऊर्फ अप्पासाहेब खाडिलकर यांचे नाव कोणालाही समाविष्ट करावेच लागेल. वृत्तपत्र व्यवसायावरील त्यांची निष्ठा अव्यभिचारी स्वरूपाची आहे. याचा अर्थ असा नव्हे की वृत्तपत्रीय लेखनाखेरीज अन्य लेखन त्यांनी मुळीच केले नाही. पण हे लेखन तुलनेने अल्प असे आहे. प्रामुख्याने त्यांचे लेखन वृत्तपत्रनिविष्ट स्वरूपाचेच आहे.

वृत्तपत्रीय लिखाणाचा वारसा श्री. अप्पासाहेबांना वंशपरंपरेने प्राप्त झालेला आहे. कै. काकासाहेबांच्या नवा-काळापासूनच ते दैनिकात काम करू लागले. खुद्द कै. काकासाहेब खाडिलकर व प्रा. न. र. फाटक यांच्या तालमीत त्यांची लेखणी तयार झाली. सन १९४८ साली कै. काकासाहेब खाडिलकरांच्या मृत्यूनंतर नवा-काळाच्या संपादनाची धुरा स्वतंत्रपणे त्यांच्या खांद्यावर पडल्यापासून गेली २० वर्षे ती त्यांनी यशस्वीपणाने सांभाळली आहे. या काळात अक्षरशः हजारो लेख अग्रलेखांच्या रूपाने त्यांच्या हातून बाहेर पडले आहेत.

मराठी वृत्तपत्रीय सृष्टीतील संपादकांचे दुर्दैव असे की ही वृत्तपत्रे संग्रहित करण्याची प्रवृत्ति महाराष्ट्रात क्वचितच आढळत असल्यामुळे वृत्तपत्रांच्या फायली-बरोबरच हे वाङ्मयाचे अमोल असे धन अक्षरशः विस्मृतीच्या वाऱ्यावर उधळले जात असते. लो. टिळक, कै. गो. ग. आगरकर, कै. तात्यासाहेब केळकर, कै. काकासाहेब खाडिलकर, शि. म. परांजपे, अच्युतराव कोल्हटकर अशांसारखे फारच थोडे भाग्यवान पत्रकार आहेत की ज्यांचे कांही लेखन ग्रंथनिविष्ट स्वरूपांत संग्रहित करण्यांत आले आहे. मराठी साहित्यांतील एका विभागाची ही तेजस्वी परंपरा नाहीशी होत असता आपण मात्र "कालायतस्मैनमः" म्हणून अगतिकपणे पाहात आहोत.

श्री. अप्पासाहेबखा डिलकर यांच्या लेखांचा संग्रह काढण्याची कल्पना काहीशा योगायोगानेच निघाली असे म्हटले तरी चालेल. चार महिन्यापूर्वी सहजच एक दिवस श्री. ना. रा. अभ्यंकर यांची रस्त्यातच गाठ पडल्यावेळी वृत्तपत्रीय संपादकांच्या लेखनसंग्रहाविषयी गोष्टी निघाल्या. महाराष्ट्रातील जुन्या परंपरेतील संपादक हळूहळू निवृत्त होत आहेत. तेव्हा अशांच्या लेखांचे संग्रह आपण का काढू नये असा विषय निघाला. योगायोगाने "नवाकाळ" दैनिकाच्या आरंभापासूनच्या सर्व फायली श्री. अप्पा खाडिलकरांनी मुं. म. ग्रंथसंग्रहालयाला देणगीदाखल दिल्या होत्या. तेव्हा श्री. अप्पा खाडिलकरांपासूनच ही कल्पना कार्यवाहीत आणावी असा विचार आला. श्री. ना. रा. अभ्यंकरांनी संपादनाचे काम करण्याचे अंगीकारले व श्री. अप्पासाहेबांची परवानगीही मिळविली. अशा रीतीने हा संग्रह सिद्ध झाला.

वृत्तपत्रीय लेखसंग्रहाचा हा प्रयत्न जनतेला आवडला तर यापुढेही अशाच तऱ्हेचे संपादकीय लेखसंग्रहाचे आणखी खंड प्रसिद्ध करण्याची आमची मनीषा आहे.

—प्रकाशक

अनुक्रम :

	विषय	पृष्ठांक
१	पांढरपेशा वर्ग आणि काँग्रेस	१–३
२	राष्ट्रपिता म० गांधी यांचे पुण्यस्मरण	४–६
३	भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न तडीला लागणार	६–९
४	हैदराबादच्या भाषिक ठरावाची प्रतिक्रिया	९–१२
५	महाराष्ट्राचा विराटपुरुष व भारताचा महापुरुष	१२–१५
६	संयुक्त महाराष्ट्र आणि मुंबईचा करार	१५–१८
७	सर्वेषामविरोधेन 'मुंबईसह महाराष्ट्र'	१८–२१
८	राष्ट्रीय त्रिमूर्तींला पंडितजींचे आवाहन	२१–२४
९	राज्य पुनर्रचनेची निवदने	२४–२७
१०	संयुक्त महाराष्ट्र व महाराष्ट्रीय आमदार	२७–२९
११	स्वतंत्र मुंबईच्या मागणीचे वादंग	२९–३२
१२	मोठी शहरे आणि गुंडगिरीचा उपद्रव	३२–३५
१३	भाषिक प्रांतांच्या वाटाघाटींचे रिंगण	३५–३८
१४	भारताचा मानदंड पं. नेहरू	३८–४१
१५	अनेकांचे हात लागून मुंबईचा विचका	४१–४३
१६	मुंबईचा हरताळ व राज्यपुनर्रचना कमिशन	४४–४६
१७	सार्वजनिक जीवनातील निर्वैर	४७–४९
१८	महाराष्ट्र काँग्रेसमधील डमडम गोळ्या	४९–५३
१९	संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची समस्या	५३–५६
२०	संयुक्त महाराष्ट्राभोवतीची निवडणुकीची गुंफण (२)	५६–६१
२१	प्रत्यक्ष कृतीचा काटेकोर तोडगा	६१–६५
२२	दंगेधोपे, घातपात व सशस्त्र क्रांति	६५–६९
२३	मुंबई-बेळगांवचा जळता निखारा	६९–७४
२४	प्रजासत्ताकाचा पिंड व ब्रह्मांड	७४–७६
२५	करमणूक कर उठला : उठवळपणा जावो	७७–७९
२६	सेविकांची फॅशन व किंचित समर्थन	७९–८१
२७	आचार्य विनोबाजी व कोल्हापूरचा कलंक	८२–८४
२८	पाहिजे आधारवड, पु. ल. देशपांडेंना	८४–८७
२९	एकसष्ट वर्षांचे आचार्य अत्रे	८८–९०
३०	संयुक्त महाराष्ट्राचे उद्गाते आचार्य अत्रे	९०–९३
३१	नवकथेचे गुरुजी गंगाधर गाडगीळ	९३–९६
३२	संमेलनाध्यक्षांचे 'हलकट' भाषण	९६–९९
३३	नवी दिल्लीची प्यारी पानपट्टी	९९–१०२
३४	'स्वतंत्र' राजाजींची मुंबईवरील स्वारी	१०२–१०५

३५	टिळक–गांधी नेतृत्व व देशमुख–निदान	१०५–१०८
३६	राजेन्द्र–राजाजींचा सुराज्याचा शोध	१०८–११०
३७	रावणाप्रमाणे अत्रे उताणे पडले	११०–११२
३८	माडखोलकर यांचा खुलासाही भयंकर	११३–११५
३९	शिवजयंतीस उदेले : महाराष्ट्र धन्य झाले	११५–११७
४०	नव्या महाराष्ट्रात अपेक्षा उचंबळल्या	११७–११९
४१	महाराष्ट्रधर्माची अखण्ड जोपासना	१२०–१२२
४२	नव्या महाराष्ट्राची हांक एकजुटीची	१२२–१२४
४३	नव महाराष्ट्राचा उदय व जयजय	१२५–१२७
४४	हे चित्र पहा आणि ते चित्र पहा !	१२७–१२९
४५	फडके वाङ्मयावर सौ. बेडेकर कुभांड	१२९–१३२
४६	आयागो गोरे आणि डेस्डिमोना समिती	१३२–१३४
४७	वीर सावरकारांचा मृत्युंजय दिनोत्सव	१३४–१३६
४८	उषा भार्गव स्मारक जबलपुरांत हवे	१३६–१३८
४९	जातीय राजकारण व राजकीय जाती	१३८–१४०
५०	नेहरूंनी शस्त्र धरले–कृपालानींनी जिंकले	१४०–२४३
५१	भारतीय लोकशाही · एकखांबी इमारत	१४३–१४५
५२	चव्हाणांच्या अंगी शिवाजीचे गुण	१४६ १४९
५३	निवडणूक मतदान : महाराष्ट्रास मत–मन	१४९–१५२
५४	ब्राम्हण ही पदवी नसून शिवी झाली	१५३–१५६
५५	राजकीय पक्षात ताटपाटाचे प्रस्थ	१५६–१५९
५६	प्रत्येक भारतीय खिडीतील सैनिक	१५९–१६२
५७	चिनी झोटिंगाच्या पापाचा घडा भरला	१६३–१६६
५८	अविश्वास ठरावाचा भोपळा फुटला	१६६–१६९
५९	विरोधी पक्षांना मोहित्यांचा मार	१६९–१७२
६०	गांधीवादी पीठाची कॉंग्रेसमध्ये स्थापना	१७३–१७५
६१	कॉंग्रेस समाजवाद : जयपूरच्या गर्जना	१७६–१७९
६२	स्वच्छ राज्यकर्तृत्व समाजवादी रचना	१७९–१८२
६३	पं. नेहरू निधनानं भारताचे छत्र गेले	१८२–१८४
६४	समाजवादी भारत हेच नेहरू–स्मारक	१८५–१८७
६५	जगताचे नागरिक नेहरूंचा अंत्यविधी	१८७–१९०
६६	नेहरूंचे निशाण व नेत्याची निवड	१९०–१९३
६७	तटस्थतेचे धोरण – नेहरूंचे वेदवाक्य	१९३ · १९६
६८	अण्वस्त्राची तयारी हा ईश्वरी प्रसाद	१९६–१९९
६९	ताश्कंदची समाप्ति कशीबशी साधली	१९९–२०२
७०	शांतीदूत शास्त्रींचा मृत्यू व अमर कार्य	२०२–२०५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वतंत्र
अनुक्रम ७५८२८ वि: निबंध
दा. क्र. १६५८०
वर्ग: वि: २११३७१

पांढरपेशा वर्ग आणि काँग्रेस

काँग्रेसच्या दिग्विजयाची प्रतिक्रिया बुद्धिनिष्ठ मानल्या जाणाऱ्या बुद्धिनिष्ठ पांढरपेशा समाजांत कोणत्या स्वरूपांत आढळून येत आहे तें तपासून पाहाण्यासारखें आहे. हा बुद्धिनिष्ठ पांढरपेशा समाज कोणत्या एखाद्या पक्षाशीं निष्ठावंत आहे अशांतला भाग नाहीं. स्वतंत्र बुद्धि आणि शिस्त यांचें वावडें असतें आणि पक्ष म्हटला कीं तेथें शिस्त आली व तदनुषंगिक बंधनेंहि आलीं. अर्थातच बुद्धिनिष्ठ पांढरपेशा समाज काँग्रेसमध्यें, समाजवाद्यांत किंवा साम्यवादांत संमिश्रित होऊन बौद्धिक गुलामगिरी पत्करण्यास तयार नसावा यांत आश्चर्य नाहीं. पृथक् पृथक् पृथ्वीवर अवतरलेलें पावसाचें पाणी एकमेकांत मिळून मिसळून व शिस्तीचें विशिष्ट वळण पत्करून गतिमान होतें त्यावेळीं ओघ, आवेग व वेग यांनीं तो प्रवाह संपन्न होतो, दोनहि काठांची भूमि सुपीक करतो आणि नद किंवा महानद या पदवीला पोहोंचून कृतकृत्य होतो. उलटपक्षीं आपलें सर्वथैव स्वातंत्र्य कायम ठेवूं इच्छिणारें पावसाचें पाणी एखाद्या ठिकाणीं निसरडें किंवा चिखल उत्पन्न करून डरांव डरांव करणाऱ्या बेडकांची सोय करण्यांत यश पावतें. सार्वत्रिक निवडणुकीच्या निकालाची प्रतिक्रिया निरनिराळ्या पक्षांत अनेकविध स्वरूपाची दिसून आल्यास आणि एखाद्या अमुल देसाईचा विजय फडांत हरलेले प्रतिस्पर्धी या नात्यानें त्यांनीं काँग्रेसवर उट्टें उगविण्यासाठीं रावविल्यास त्यांत नवल नाहीं. पण सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रवाहाशीं ज्यांचा अर्थाअर्थीं कांहीं संघटित स्वरूपांत संबंध नाहीं असा बुद्धिनिष्ठ पांढरपेशा समाज काँग्रेसच्या एखाद्या पराभवानें हुरळून जातो किंवा काँग्रेसच्या सार्वत्रिक विजयाची नोंद उपहासाच्या भाषेंत अगर सुतकी चेहऱ्यानें

करीत असतो असें आढळून येतें. महाराष्ट्रांतील पांढरपेशा वृत्तीचीं म्हणविणारीं साप्ताहिकें आज मिटक्या मारीत ना. श्री. मोरारजीभाई देसाई यांच्या पराभवाची बातमी चघळत असल्याचें दृश्य एक प्रकारची किळस आणल्याशिवाय राहात नाहीं. सार्वत्रिक निवडणुकींच्या निकालांची प्रतिक्रिया अशा विकृत मनोवृत्तीच्या रूपानें आज व्यक्त होत आहे, तिचें कोणाहि विचारवंताला वाईट वाटल्यावांचून राहात नाहीं.

महाराष्ट्रांत आजकाल बोकाळलेल्या या विकृत मनोवृत्तीचा उगम सुमारें तीस वर्षांपूर्वी झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर जी नवी राष्ट्रीय चळवळ सुरू झाली त्या चळवळीशीं बुद्धिनिष्ठ म्हणविणारा महाराष्ट्रीय समाज एकजीव होऊं शकला नाहीं आणि तेव्हांपासून तो राष्ट्रकार्याच्या ओघापासून अलग पडल्यासारखा झाला. प्रवाह सोडून बाजूला पडणें म्हणजे विनाशाच्या मार्गाला लागणें होय. ज्याच्या ठिकाणीं नवीन प्रवाह उत्पन्न करण्याची धमक असेल त्यानेंहि प्रवाह सोडण्यापेक्षां आपल्या हिंमतीवर प्रवाहाची दिशा पालटून घ्यावी पण प्रवाह सोडूं नये. भगीरथानें नवीन गंगौघाचा आग्रह न धरतां गंगेचा ओघ दीर्घ तपश्चर्येनें स्वतःला पाहिजे तसा फिरवून घेतला. लोकमान्य टिळक १९१४ सालीं मंडालेच्या तुरुंगांतून बाहेर आल्यावर त्यांनीं प्रवाह न सोडतां काँग्रेसच्या नव्या क्रीडवर सही करून प्रवाहांत उडी घेतली आणि संपूर्ण राष्ट्रीय वळण काँग्रेसच्या कर्तृत्वाला लावलें. लो. टिळक आंतमध्यें शिरतांच मवाळ प्रवाहाच्या बाहेर पडले. प्रवाहाच्या बाहेर पडलें कीं गति कुंठते, कर्तृत्व निकामी होतें आणि कुजण्याची क्रिया सुरू होऊन दुर्गंधीच्या वातावरणांत काळाच्या मुखीं पडावें लागतें. मवाळांच्या कपाळीं ज्या प्रकारें राजकीय मरण आलें तसेंच दुर्दैव लो. टिळकांच्या निधनानंतर महाराष्ट्रीय पांढरपेशा समाजानें भलत्या नेतृत्वाच्या नादीं लागून स्वतःवर ओढवून घेतलें. जें कार्य चाललें आहे त्यांत समरस होतां येत नाहीं किंवा त्यांत वांटेकरी असण्याचा आनंद उपभोगतां येत नाहीं, नवा प्रवाह निर्माण करतां येत नाहीं व जुन्यांत सामील होववत नाहीं, अशा स्थितींत राष्ट्रीय ओघापासून अलग पडलेल्या पांढरपेशा समाजाची बुद्धि, कर्तृत्व, धडाडी यांचें चीज न होतां पुरुषार्थ कुजण्याच्या पंथास लागावा आणि त्याच्या जाणीवेंतून विकृत मनोवृत्ती प्रभावी व्हाव्यात यांत नवल नाहीं. काँग्रेसच्या विजयाचें आनंदी वातावरण सर्वत्र असतांना पांढरपेशा महाराष्ट्रीय मात्र त्यापासून अलिप्त राहून उपहासाच्या भाषेंत त्याबद्दल बोलतो किंवा मोरारजींच्या पराभवानें एखाद्या मंथरेप्रमाणें बेहोष होतो, याच्या मुळाशीं कुजणाऱ्या कर्तृत्वांतून व बुद्धिमत्तेंतून उद्भवणारी विकृत मनोवृत्तीच आहे यांत संशय नाहीं.

लोकमान्यांच्या मृत्यूनंतर बुद्धिवादी महाराष्ट्राच्या कर्तृत्वालाहि दक्षिण दिशा लागली नसती तर आज महाराष्ट्रांत फार निराळें दृश्य दिसून आलें असतें. १९३० पासून महाराष्ट्रांत बहुजनसमाज आला. त्याचें स्वागत काँग्रेसमध्यें राहून बुद्धिवादी महाराष्ट्रानें केलें असतें तर कर्तृत्व व बुद्धि यांचा सुंदर मिलाफ महाराष्ट्रांत घडून येऊन सर्वच क्षेत्रांत महाराष्ट्र भारतामध्यें आघाडीवर राहिला असता ; आणि मुंबई सरकारमध्येंच नव्हे तर भारत सरकारचींहि सूत्रें खेळविणाऱ्या मनगटांत महाराष्ट्राचीं मनगटें प्रामुख्यानें दिसलीं असतीं. आज महाराष्ट्रीय बुद्धिमंतांची लेखणी भारताचा भाग्यलेख लिहिण्याऐवजीं 'महाराष्ट्र मागें कां पडला' याची कारणमीमांसा सजविण्यांत रंगलेली दिसत आहे. स्वतः कांहीं करतां येत नाहीं आणि दुसऱ्यानें केलेलें पाहवत नाहीं व साहवत नाहीं, हें करंटेपणाचें लक्षण समजलें जातें. बुद्धिवादी महाराष्ट्राजवळ कर्तृत्व आहे, पराक्रम आहे, त्यागशीलतेला तो पारखा नाहीं आणि संघटनेचें चातुर्यहि त्याच्याजवळ आहे; पण या सर्व गुणांच्या विकासास व प्रभावास वाव देणाऱ्या संधीला या विकृत अशा मनोदशेमुळें बुद्धिवादी महाराष्ट्र व त्यांतल्या त्यांत नव्या जोमाची उत्साही पिढी आंचवल्यासारखी होत आहे. गंगा दुथडी वहात आहे. तिच्यांत निमज्जन करा आणि आपल्या हाताच्या ओंजळींत आकाशींच्या सूर्याला आणून स्वतःच्या कर्तृत्वश ली तपाबरोबर सूर्याचें तेज गंगेला अर्पण करा, अशा प्रकारचें आवाहन काँग्रेसबाहेर असलेल्या सर्व बुद्धिमंतांना सरदार पटेल हे वारंवार करीत होते; पण त्यांच्या आयुष्यांत या आवाहनाला यश आलें नाहीं. आज नव्या भारताची जी उभारणी होत आहे त्या उभारणींत आपला हातभार असल्याचा हक्क बुद्धिवादी महाराष्ट्राला सांगतां आला पाहिजे, त्या उभारणीचा आनंद कर्तबगारी गाजवून त्याला घेतां आला पाहिजे, आणि त्याचें बुद्धिचापल्य विधनवाटेपणांत खर्ची न पडतां राष्ट्राच्या अभ्युदयार्थ खर्ची पडून त्याचीं फळेंहि सेवेच्या हक्कानें त्याच्या पदरांत पडलीं पाहिजेत. तसें न होण्यांत बुद्धिनिष्ठ महाराष्ट्राच्या नव्या पिढीचा तर घात आहेच, पण भारताचेंहि नुकसान आहे. काँग्रेसचें धोरण पसंत नसेल तर संख्याबलानें लोकशाही पद्धतीनें तें बदलून घ्या, पण काँग्रेसपासून अलग राहून नतद्रष्ट करंटया वृत्तीला कवटाळून बसूं नका. अशी आजच्या काळाची सर्व प्रकारच्या कर्तृत्वाला, बुद्धीला, शक्तीला हांक आहे. ही हांक जर बुद्धिनिष्ठ म्हणविणारा पांढरपेशा समाज सार्थकीं लावील, तर सांप्रतच्या विकृत मनोवृत्तीच्या ग्रहणांतून त्याची मुक्तता होऊन टिळकयुगीन कर्तृत्वानें व तेजानें भारताच्या आघाडीवर तो तळपूं लागणार नाहीं काय ?

२७–१–१९५२

राष्ट्रपिता म. गांधी यांचें पुण्यस्मरण

राष्ट्रपिता म. गांधी ह्यांच्या पुण्यस्मरणाचा आजचा दिवस आहे. चार वर्षांपूर्वी ३० जानेवारी या दिवशीं एका मारेकऱ्याच्या हातून म. गांधींचा एका-एकीं अंत झाला. नित्यनियमाप्रमाणें संध्याकाळच्या सामुदायिक प्रार्थनेसाठीं म. गांधी निघाले असतां त्यांच्या शरिरांत मारेकऱ्याच्या गोळ्या घुसल्या व 'हे राम' अशी देवास हांक मारून महात्माजींनीं देह ठेवला. रामनामाचा जप महात्माजी श्वासोच्छ्वासाबरोबर अखंडपणें चालवीत असत. महात्माजींचें जीवन हें विचार, वाणी व कृती या तिन्ही प्रकारांनीं अखंड पुण्यकार्य होतें. तेव्हां त्यांचें स्मरण हें देखील नैमित्तिकच नव्हे तर नित्यच पुण्यकारक अर्थात् मानवास पुण्यमार्ग दाखविणारें असें आहे. महात्माजींचें जीवन नित्य आठवावें आणि व्यक्तीनें व समाजानें आपली स्थिति सुधारण्याकरितां, स्वतःचा उद्धार घडवून आणण्याकरितां त्यापासून प्रेरणा घ्यावी अशी स्थिति आहे. नराचा नारायण होऊं शकतो हें तत्त्व महात्माजींच्या जीवनापासून स्पष्ट झालेलें आहे. मनुष्याच्या मनांतील सर्व प्रकारची मलिनता व लघुता काढून टाकण्याचा प्रयत्न स्वतःच्या जीवनांत म. गांधींनीं चालविला व त्यांत त्यांनीं असाधारण यशहि संपादन केलें. त्यांच्या जीवनाचा हा विकास, मलिनता व लघुता टाकून, शुद्ध व मोठें जीवन– ठरलों उपकारापुरता या साधुवचनाशीं तंतोतंत जुळणारें जीवन– म. गांधी कसे जगूं लागले हा इतिहास भारतांतील व जगांतीलहि असंख्य लोकांनीं समक्ष पाहिलेला आहे. 'मम तेजोंऽशसंभवम्' या गीतेंतील उक्तीचें साक्षात् उदाहरण पाहाण्याचें व त्यापासून प्रेरणा घेण्याचें भाग्य ज्यांना लाभलें ते चालू व गेल्या एकदोन पिढ्यांतील भारतीय खरोखरच धन्य होत !

महात्माजींचा जीवनविकास पाहायला मिळाला म्हणून स्वतःला धन्य मानणारे अगणित लोक असले तरी या देशांत दुर्दैवानें कांहीं महाभाग असेहि आहेत कीं, महात्माजी जिवंत असतांना त्यांनीं त्यांची अहर्निश निंदा चालविलीच आणि महात्माजी गेल्यावर अजूनहि या महाभागांची निंदेची ती तहान शमलेली नाहीं. महाराष्ट्रांतच असे कांहीं लोक आहेत कीं, महात्माजी या भारतांत जन्मायलाच नको होते असें त्यांना वाटत असावें असें त्यांच्या निंदेच्या तीव्रतेवरून म्हणावें लागतें. महात्माजी भारतांत जन्माला आले नसते, निदान सार्वजनिक नेते झाले नसते तर भारताचें खरेंखुरें कल्याण व उत्कर्ष साधावयास आपले मेंदू व हात समर्थ होते, असा ह्या लोकांच्या म्हणण्याचा एकंदर रोख दिसतो. म. गांधींच्या हीन निंदेचे कारखाने या लोकांनीं नव्यानें उघडल्यासारखे आजकाल दिसत आहेत. गांधी–

निंदेच्या या कारखानदारांनीं चालविलेल्या निंदेचा परामर्ष घेण्याची तशी कांहीं जरुरी नाहीं. ती निंदा व तिच्या पाठीमागचे कोटिक्रम इतके अकटोविकट ज्ञानाचे निदर्शक असतात कीं, निंदकांच्या सजातीयांखेरीज बाकीच्या सगळ्यांनाच त्यांची किळस यावी. गांधी–निंदेच्या आपल्या पराक्रमाला भरीवपणा आणण्याकरितां लोकमान्यांचे शब्दहि हवे तसे राबविण्यास या गांधी–निंदेच्या कारखानदारांनीं कमी केलेलें नाहीं. गांधीद्वेषांतून बनलेल्या रोगट मनोवृत्तींतूनच ही सगळी निंदा जन्म घेत आहे हें उघड आहे. अत्यंत द्वेषमूलक व हीन प्रकारची अशी ही निंदा असल्यामुळें ती खरोखर उपेक्षणीयच आहे. विचारी लोकांनीं त्या निंदेपासून स्वत: दूर राहावें व अपरिपक्व मनाच्या तरुणांना तिच्यापासून वांचवावें हें केव्हांहि इष्ट ठरणारें आहे.

म. गांधींच्या नेतृत्वाखालीं भारताला स्वातंत्र्य मिळालें ही गोष्ट गांधी-निंदा चालविणाऱ्या या विशिष्ट लोकांना त्यांच्या मत्सरामुळें सहन होत नाहीं. म. गांधींनीं भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं जो मार्ग अंमलांत आणला तो खरोखरच जगाला अपरिचित असा होता. प्रतिस्पर्ध्यांशीं वैर करावें, दिसेल तेव्हां व दिसेल तसा त्याला सतत ठेचत असावें, त्याच्यावर प्रहार करण्याची एकहि संधि वायां दवडूं नये आणि मुख्य म्हणजे त्यांचा अगदीं आंतड्यांतून द्वेष करावा हा प्रतिस्पर्ध्यांशीं वागण्याचा व त्यांच्यावर विजय मिळविण्याचा प्रयत्न करण्याचा जो सनातन मार्ग त्याचा महात्माजींनीं त्याग केला व बहुसंख्य हिंदी जनतेला करायला लावला. 'अद्वेष्टा सर्वभूतानाम्' हें वर्णन महात्माजींना पूर्णपणें लागू पडत होतें. अद्वेषाचीच ती दृष्टि परकीय राज्यकर्त्यांसंबंधांतहि महात्माजींनीं आचरणांत आणली. तथापि परकीय राज्यकर्त्यांना अद्वेषानेंहि प्रतिकार कसा करावयाचा, परकीय सत्तेला समतोल किंवा तिच्यापेक्षांहि भारी ठरणारें असें सामर्थ्य भारतीय लोकांत शस्त्रास्त्रांचा वापर न करतां कसें उभारावयाचें याची शिकवण महात्माजींनीं दिली व या सामर्थ्याचें आचरणहि १९२० ते १९४२–४३ ह्या काळांत अनेकदां केलें व त्या योगानें स्वातंत्र्याकडे त्यांचें पाऊल पुढें पडत गेलें, हा इतिहास निर्विवाद आहे. कोणत्याहि नेत्याचे सर्व डावपेंच सर्वकाळीं संपूर्ण यशस्वी होत नसतात. या न्यायानें महात्माजींच्या मार्गांतहि कांहीं दोष दाखविले किंवा त्यांतील अपयशाचे प्रसंग नमूद केले गेले, त्यांची चिकित्सा केली गेली तर बिघडत नाहीं. कोणत्याहि श्रेष्ठ कार्याची व विचाराची या प्रकारें हवी तेवढी मीमांसा होऊं शकते. महात्माजींचें जीवन व त्यांचें कार्य ह्यांची मीमांसा केव्हांहि स्वागतार्हच होणारी आहे. परंतु महात्माजींनीं आपल्या जीवन-निष्ठेंतून जो मार्ग काढला व ज्याचा त्यांनीं विकास केला तोच मार्ग नि:शस्त्र, दुहीनें पोखरलेल्या, राजकीय दृष्ट्या मागासलेल्या भारताला अपेक्षेपेक्षां कितीतरी

लवकर स्वातंत्र्य मिळवून देण्यास समर्थ ठरला, हें कोणीहि नाकारूं शकत नाहीं. कितीहि अडचणी येवोत, कसल्याहि प्रकारचीं संकटें येवोत, मनुष्यानें आपल्या वैयक्तिक जीवनांत सत्याचा मार्ग सोडावयाचा नाहीं ही भारतांतील सर्वश्रेष्ठ साधुसंतांची शिकवण भारतीय समाजाच्या सामाजिक जीवनालाहि लागू करण्याचा महान् प्रयत्न हेंच महात्माजींच्या जीवनाचें थोडक्यांत सार आहे. जगापुढें स्वतःच्या जीवनानें एक नवा मार्ग महात्माजी ठेवून गेले आहेत व जगांतील अनेक विचारवंतांस तोच मार्ग मानवजातीच्या कल्याणाचा व उद्धाराचा होऊं शकेल असें वाटत आहे. महात्माजींच्या पुण्यस्मरणाच्या या दिवशीं महात्माजींच्या जीवनाचें व त्यांनीं जगापुढें ठेवलेल्या मार्गांचें पवित्र मनानें सर्वांनीं चिंतन करावें हीच प्रार्थना आहे.

३०–१–१९५२

भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न तडीला लागणार

भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न लोंबकळत न ठेवतां तडीस लावण्याचा पं. जवाहरलाल नेहरु यांचा निर्धार असून येत्या ऑ. इं. कॉं. कमिटीच्या इंदूरच्या बैठकींत हा प्रश्न महत्त्वाचा ठरेल, असें दिल्लीहून परतल्यावर वर्किंग कमिटीचे सभासद व महाराष्ट्राचे प्रांताध्यक्ष ना. हिरे यांनीं सांगितलें आहे. दिल्लीच्या वर्किंग कमिटीच्या बैठकींत भाषावार प्रांतरचनेवर जी चर्चा झाल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे, तिच्यावर त्यांच्या मुलाखतीनें अधिक प्रकाश पडला आहे. पं. नेहरु यांना भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न लवकर हातावेगळा करणें अगत्याचें वाटूं लागलेलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. आंतरराष्टीय क्षेत्रांत तिसऱ्या महायुद्धाची धास्ती दिवसानुदिवस ओसरत चालली आहे आणि भारतांतील अंतर्गत शांतता व सुव्यवस्थाहि आतां निर्धास्त झाली आहे हें कम्युनिस्टांसारख्यांवरचे निर्बंध जे दूर होत आहेत त्यावरून कळून चुकण्यासारखें आहे. आंतरराष्ट्रीय व अंतर्गत आणीबाणीची परिस्थिति निवळल्यासारखी झाली आहे आणि भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न जरी तूर्त दबल्यासारखा असला तरी राखेनें झांकलेल्या अग्नीसारखा तोपेटता आहे हें भारताच्या पंतप्रधानांच्या निदर्शनास वारंवार आलें आहे.

सार्वत्रिक निवडणुकींपूर्वी श्री. शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखालीं लोकसभेच्या महाराष्ट्रीय प्रतिनिधींनीं पं. नेहरूंची भेट घेऊन या प्रश्नाची निकड त्यांच्या निदर्शनास आणली होती. आंध्रमध्यें तर स्वामी सीताराम यांनीं विशाल आंध्रच्या प्रश्नावर प्राणान्त उपवास आरंभला होता व तो आचार्य विनोबांच्या मध्यस्थीनें सुटला. सार्वत्रिक निवडणुकीनंतर स्वामी सीताराम यांनीं विशाल आंध्रचा प्रश्न पं. नेहरूंसमोर मांडला. एकमुखी मागणी एकमतानें करा म्हणजे विशाल आंध्र घडवून आणण्यास भारत सरकार तयार आहे असें यावेळीं पं. नेहरूंनीं त्यांना सांगितलें आहे. अशी एकमुखी मागणी होण्याची शक्यता नाहीं व ती तशी झाल्याशिवाय विशाल आंध्र होत नाहीं असें पाहिल्यावर स्वामी सीताराम यांनीं सत्याग्रहाची चळवळ करण्याचें ठरविलें आहे.

मद्रासचे मुख्य प्रधान श्री. राजगोपालाचार्य यांनीं भाषावार प्रांतरचनेला पाठिंबा दिला आहे एवढेंच नव्हे तर हा प्रश्न जसा लांबणीवर टाकावा तसा तो विकट होईल असें त्यांनीं बजावलें आहे. वर्किंग कमिटीच्या बैठकीसहि त्यांनीं हें मत कळविलें आहे. कर्नाटकच्या लोकसभेच्या सभासदांनींहि नेहरूंकडे शिष्टमंडळ नेऊन संयुक्त कर्नाटकची मागणी मांडली आणि त्यांची निश्चित योजना सादर करण्यास पं. नेहरूंनीं त्यांना सांगितलें. भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न सबंध दक्षिण भारतास व्यापून राहिलेला आहे आणि दक्षिण भारत जर दुःखी ठेवायचें नसेल तर या प्रश्नाची तड लावण्याशिवाय गत्यंतर नाहीं हें पं. नेहरु यांच्या निदर्शनास स्पष्टपणें आलें आहे

विरोधी पक्ष सरकारच्या उदासीनतेचा फायदा घेऊन या प्रश्नावर रान कसें करूं पहात आहेत हें. लोकसभेच्या चालू अधिवेशनांत दिसून आलें आहे. कम्युनिस्ट सभासदांनीं या प्रश्नावर सरकारी धोरणाचे वाभाडे काढले, एवढेंच नव्हे तर भाषावार प्रांतरचनेची चळवळ करून सवंग लोकप्रियता संपादन करण्यासाठीं कम्युनिस्टांनीं एक योजनाहि आंखल्याचें जाहीर झालें आहे. भारताच्या अंतर्गत व बहिर्गत अडचणी बऱ्याचशा निवारण झाल्या आहेत, उपेक्षेनें अस्तंगत होण्याइतका भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न लेचापेचा नाहीं, आणि दक्षिण भारताचा हा प्रश्न मनावर न घेणें म्हणजे काँग्रेसविरोधकांच्या आगलाव्या प्रचाराला आपल्या हातानें मोकळें रान देण्यासारखें आहे असें आढळून आल्यावर पं. नेहरूंनीं भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न हाताळण्याचा निर्धार केला यांत नवल नाहीं.

भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न दिल्लीच्या काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकींत चर्चिला गेला पण त्याबाबत कांहीं निर्णय न घेतां चर्चा तहकूब झाली, एवढें वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालें होतें. इंदूर येथें या प्रश्नावर जास्त विचार होईल आणि

केंद्र सरकार या प्रश्नाचा विचार करण्याकरितां एक चौकशीमंडळ नेमील असें श्री. भाऊसाहेब हिरे यांनीं आपल्या मुलाखतींत सांगितलें असून हें मंडळ मुंबईचें भवितव्य व भाषावार प्रांतांच्या चतुस्सीमा यांच्याबद्दल शिफारसी करील असें त्यांनीं म्हटलें आहे. वर्किंग कमिटीच्या चर्चेस हजर राहून श्री. हिरे यांनीं ही माहिती दिली असल्यामुळें तिला विशेष महत्त्व आहे. भाषावार प्रांतरचनेचा विचार करण्यासाठीं दार कमिशनची नेमणूक झाली होती ही आठवण चौकशी-मंडळ नेमण्याच्या या वृत्तावरून होण्यासारखी आहे. दार कमिशनवर जे सभासद नेमले गेले होते ते सभासद प्रायः उत्तरेकडचे होते व त्यांना दक्षिणेकडचे प्रश्न व त्यांचें गांभीर्य यांचें आकलन होण्यासारखें नव्हतें. दार कमिशननें केलेल्या चौकशींत भाषावार प्रांतरचनेच्या मागणीस ठिकठिकाणीं अनेक फांटे फुटले आणि कमिशननें सादर केलेल्या रिपोर्टांत भाषावार प्रांतरचनेच्या मागणीला एक प्रकारचा खो देण्यांत आला. इतकेंच नव्हे तर संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीमागें पुणेरी फुटीर वृत्ति असल्याचे नाहक व अनाहूत आरोप करण्यांत आले. दार कमिशनचा हा रिपोर्ट उजेडांत आल्यावर सातआठ दिवसांतच जयपूरच्या काँग्रेस अधिवेशनांत गाडला गेला आणि नेहरु-पटेल-पट्टाभि कमिटी नेमण्यांत आली. या कमिटीच्या शिफारसी दार कमिशनला वाट पुसतच करण्यांत आल्या असल्या तरी जर लोकांची सतत व जोरावी मागणी भाषावार प्रांतरचनेची असेल तर लोकशाहीचे पुरस्कर्ते या नात्यानें ती पुरी करण्यांत येईल, अशा प्रकारचें आश्वासन देऊन एक प्रकारें भाषावार प्रांतरचनेच्या चळवळीस अभयहस्तच नव्हे तर संजीवनच देण्यांत आलें व त्या आधारावरच भाषावार प्रांतरचनेच्या चळवळी आतांपर्यंत जीव धरून राहिल्या असें म्हणण्यास हरकत नाहीं. श्री. हिरे यांनीं म्हटल्याप्रमाणें इंदूर येथें या बाबतींत निर्णय घेण्यांत येऊन मध्यवर्ती सरकारनें चौकशीमंडळ नेमणें म्हणजेच भाषावार प्रांतरचनेची मागणी सतत व जोराची आहे असें मान्य करण्यासारखें असून, असें कमिशन नेमलें जाणें हें भाषावार प्रांतरचनेच्या दृष्टीनें महत्त्वाचें पाऊल ठरेल यांत संशय नाहीं

दार कमिशनच्या वेळचेच अनुभव व गोंधळ यांची पुनरावृत्ति न होण्याच्या दृष्टीनें भाषावार प्रांतरचनेविषयीं आस्था व कळकळ असणारांचेंच चौकशीमंडळ नेमलें जाणें अत्यंत अगत्याचें आहे हें उघड आहे. भाषावार प्रांतरचना असावी कीं नाहीं हा आतां प्रश्नच नाहीं. जयपूर काँग्रेसनें नेमलेल्या कमिटीनें तो प्रश्न अनुकूल निर्णय देऊन तेव्हांच निकालांत काढला आहे. भाषावार प्रांतरचना केव्हां करावी व अशा प्रांतांच्या चतुस्सीमा कशा मुक्रर कराव्यात एवढाच त्यावेळीं अधांत्री टाकलेला प्रश्न होता. चौकशी कमिशन नेमलें गेलें कीं, भाषावार प्रांतरचना ताबडतोब झाली पाहिजे हें एक प्रकारें केंद्र सरकारनें

मान्य केल्यासारखेंच ठरतें. भाषावार प्रांतांच्या चतुस्सीमा कशा व कोणत्या ठरवाव्यात हा कांहींसा किचकट व वादग्रस्त प्रश्न आहे. पण या बाबतींत एकदां निश्चित तत्त्वांवर निर्णयपद्धति ठरली म्हणजे त्यावरहि वाद किंवा घासाघीस होण्याचें कारण उरणार नाहीं. उदाहरणार्थ, कर्नाटक किंवा महाराष्ट्रानें भाषावार प्रांतांच्या चतुस्सीमा ठरविण्याचीं तत्त्वें मुक्रर झाल्यावर त्यामुळें एखाद्या ठिकाणचा एखादा टापू गमावला तर दुसऱ्या ठिकाणचा एखादा टापू त्याच तत्त्वाप्रमाणें पदरांत पडेल व अखेरच्या गोळाबेरजेंत कोणत्याच भाषिक प्रांताचें नुकसान होणार नाहीं. भाषावार प्रांतरचना ही दक्षिणचें हैदराबाद, मध्यप्रदेशासह सर्वच प्रांत मोडींत घालून केली पाहिजे व तशी ती केली तर ती सोईस्कर व प्रशस्त होईल हें निर्विवाद आहे. त्याचप्रमाणें मुंबईसारखें महाराष्ट्रांत मोडणारें शहर महाराष्ट्रापासून अलग काढण्याचा उपव्याप मनांत धरून संयुक्त महाराष्ट्र हा आर्थिक दृष्ट्या अव्यवहार्य ठरविला जाण्याचा खटाटोप कोणी केला तर तो सहन केला जातां कामा नये हें उघड आहे. दार कमिशन काय किंवा जयपूर काँग्रेसनें नेमलेली कमिटी काय, मुंबई व महाराष्ट्राची फारकत करण्याचें कंकण त्यांनीं बांधलें होतें व मुंबईचा आग्रह धरला नसता तर संयुक्त महाराष्ट्र त्यावेळींहि अस्तित्वांत आला असता असें म्हणतात. मुंबईशिवाय महाराष्ट्र ही कल्पनाच महाराष्ट्रीय मनाला सहन होण्यासारखी किंवा संयुक्त महाराष्ट्राच्या आर्थिक स्थैर्यास मानवणारी नाहीं हें कोणीहि विसरून चालणार नाहीं. भाषावार प्रांत-रचना करण्याचें पं. नेहरूंच्या मनांत आलें आहे आणि यावेळीं पक्षभेद बाजूस ठेवून सर्व महाराष्ट्रीय जर एकजुटीनें वागतील तर मनाजोगा संयुक्त महाराष्ट्र घडेल अशीं लक्षणें आहेत. येत असलेल्या संधीचा फायदा एकजुटीनें व जागरूकतेनें घेण्यास सबंध महाराष्ट्र तत्पर राहील अशी आम्हास आशा आहे.

५–६–१९५२

हैदराबादच्या भाषिक ठरावाची प्रतिक्रिया

हैदराबादच्या काँग्रेस अधिवेशनांत भाषावार प्रांतरचनेचा जो ठराव पास झाला त्याचे ध्वनीप्रतिध्वनी दक्षिण भारतांत व विशेषतः पश्चिम भारतांत हिरीरीनें

उमटत असून, पुणें येथें श्री. काकासाहेब गाडगीळ यांनीं या ठरावावर जें कायदेशीर भाष्य केलें आहे त्याच्याकडे लोकांचें लक्ष विशेष वेधल्यास त्यांत नवल नाहीं. श्री. काकासाहेब गाडगीळ यांनींच भाषावारीचा हा ठराव विषयनियामक कमिटींत मांडला आणि खुल्या अधिवेशनांत त्यांनीं या ठरावाला अनुमोदन दिलें. त्यांनीं या दोनही प्रसंगीं हा ठराव भाषावार प्रांतरचनेला वावडा नाहीं, त्याचप्रमाणें आंध्रच्या सुस्थिरतेचें ठरावांतील पथ्य सौम्य स्वरूपाचें आहे अशा तऱ्हेचें भाषण केलेलें होतें. ठरावावर त्यांनीं हैदराबाद येथें जें भाष्य केलें तेंच त्यांनीं पुण्याच्या मुलाखतींत सविस्तरपणानें मांडलेलें आहे. श्री. गाडगिळांच्या या भाष्याप्रमाणें भाषावार प्रांतरचना व्हावयाची कीं नाहीं हा प्रश्नच या ठरावानें आतां शिल्लक ठेवलेला नाहीं. आंध्रच्या सुस्थिरतेचा व पंचवार्षिक योजनेचा जो उल्लेख या ठरावांत आहे तो विघ्नसूचक नसून कालसूचक आहे आणि दक्षिण भारत काँग्रेसच्या हातांत राहावयाचा असेल तर पुढच्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी भाषावार प्रांतरचना केल्याशिवाय काँग्रेसला गत्यंतर नाहीं असा जो श्री. काकासाहेबांचा खुलासा आहे तो ठरावाच्या अक्षरांना अक्षरशः धरून आहे. ठरावाचा कीस कितीहि काढला तरी श्री. गाडगिळांनीं केलेल्या कायदेशीर भाष्यांतून कोणालाहि कसर काढतां येणार नाहीं हें उघड आहे. ठरावांत जे शब्द आहेत ते भाषावार प्रांतरचनेला ज्यास्त प्रोत्साहक असते तर बरें झालें असतें, पण आहे त्या ठरावांतहि वेडेंवांकडें कांहीं नाहीं असें श्री. गाडगिळांनीं सांगितलें आहे. पुढें आलेल्या गोष्टींपैकीं आपल्याला अनुकूल असतील तेवढ्याच ठासून मांडावयाच्या अशी जी प्रचारकी किंवा वकिली नीति आहे तिला धरून श्री. काकासाहेबांनीं ठरावावर केलेलें भाष्य योग्यच आहे आणि तेंच भाष्य जर नेहरु–राजाजी–आझाद यांच्या मुखांतून प्रकट झालें असतें तर ठरावावर गहजबहि झाला नसता. पण श्री. राजाजी व आझाद यांनीं भाषावार प्रांतरचनेवर या ठरावाचें निमित्त करून जी आग पाखडली त्यामुळें ठरावाच्या शब्दांपेक्षां या मागची भावना झोंबणारी ठरली असून तिचे पडसाद तीव्र स्वरूपांत प्रकट होत आहेत.

हैदराबादच्या ठरावाच्या प्रतिक्रियेवर श्री. काकासाहेब गाडगीळ यांच्या भाष्यानें लोणी चोळलेलें असलें आणि आंध्र मागोमाग संयुक्त कर्नाटक झाल्याशिवाय राहात नाहीं अशी उत्तेजक घोषणा भारताचे उपमंत्री श्री. दातार यांनीं केली असली तरी कर्नाटक–महाराष्ट्रांत या ठरावामुळें व विशेषतः बडच्या पुढाऱ्यांच्या भाषणांनीं कटुता पसरली असून वृत्तपत्रांतील टीकांच्या रूपांत व भिन्नविभिन्न मुलाखतींच्या रूपांत ती प्रकट होत आहे. मुंबईचे मंत्री श्री. भाऊसाहेब हिरे यांनीं आपली तीव्र निराशा या ठरावानें झाल्याचें जाहीर केलें आहे. कर्नाटकचे पार्लमेंटचे सभासद श्री. नेसवी यांनीं संयुक्त कर्नाटकाकरितां केलेलें उपोषण सोडतांना या

ठरावावर तलवार उपसली आहे. कर्नाटक काँग्रेसनें या बाबतींत कडक उपाय योजावेत आणि संयुक्त कर्नाटक होईपर्यंत कर्नाटकांत काँग्रेसचें कामच बंद पाडावें असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. म. गांधींच्या सत्याग्रही मार्गानें भाषावार प्रांतरचनेकरितां प्राणार्पण करण्याची वेळ आतां आली आहे असें त्यांनीं सांगितलें असून काँग्रेस नेत्यांनीं ही चळवळ करण्याचें नाकारलें तर इतर नेत्यांनीं ती हाताळली पाहिजे असें त्यांनीं म्हटलें आहे. मुंबईचे उपमंत्री डॉ. नरवणे यांनींहि आंध्रच्या सुस्थिरतेची हैदराबादच्या ठरावांतील अट घातुक आहे असें मत व्यक्त केलें असून भाषावार प्रांतरचनेची चळवळ आतां काँग्रेसवाल्यांनीं हातीं घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं असा निष्कर्ष त्यांनीं काढला आहे आणि काँग्रेसवाल्यांची परिषद बोलावण्याची योजनाहि त्यांनीं जाहीर केली आहे.

हैदराबादच्या भाषिक ठरावावर अ. भा. कॉ. कमिटींत त्याचप्रमाणें अधिवेशनानंतर जी कडाडून टीका झाली व होत आहे त्यायोगें दक्षिणेचें अंतःकरण या प्रश्नावर कसें दुखावलेलें आहे हें कळून येणारें आहे. दक्षिण या प्रश्नावर पेटते आहे आणि उत्तरेला या बाबतींत कांहीं कदर नाहीं. या बाबतींत दक्षिणेच्या भावना काय आहेत तेंच मुळीं जणुं कांहीं उत्तरेला कळत नाहीं. उत्तरेचें वर्चस्व दक्षिणेवर नाहीं असें पं. नेहरूंनीं हैदराबादला सांगितलें पण ज्या पार्लमेंटच्या हातीं कोणत्याहि बाबतींत अखेरचा निर्णय घेण्याचें आहे त्या पार्लमेंटचें बहुमत उत्तरेच्या हातीं आहे हें विसरून चालणार नाहीं. दक्षिणेचे प्रश्न उत्तरेला कळत नाहींत असें हैदराबादच्या अधिवेशनांत बोललें जातांच मौ. आझाद यांना मोठा राग आला. पण वस्तुस्थिति तशी नसती तर सबंध दक्षिणेला डिवचणारा नसता ठराव हैदराबादला पुढें आला नसता हें स्पष्ट आहे. उत्तरेला दक्षिणेचे प्रश्न कळत नाहींत आणि त्या प्रश्नांवर निर्णय देण्याइतकी माहितगारी उत्तरेला नाहीं. अशा स्थितींत एक तर भाषावार प्रांतरचनेची चळवळ काँग्रेसेतरांच्या हातीं व काँग्रेसेतरांच्या मार्गानें जाऊं द्यावी किंवा दक्षिणेच्या काँग्रेसनेत्यांनीं हा प्रश्न मतैक्यानें सोडवून उत्तरेच्या गळीं उतरवावा अशी परिस्थिति तूर्त आहे यांत संशय नाहीं.

मुंबईचे उपमंत्री श्री. नरवणे यांनीं दक्षिणेंतील काँग्रेस नेत्यांची सभा भरवून या प्रश्नाबाबत मतैक्यानें एक योजना अ. भा. कमिटीच्या येत्या बैठकींत मांडण्याचें योजिलें आहे. काँग्रेसेतर नेते भाषिक प्रांतांची चळवळ करतील, धूमधाम माजवितील व दंगेधोपे करून तंग वातावरणहि त्यांना निर्माण करतां येईल. पण पार्लमेंटमधील किंवा कायदेमंडळांतील ज्या बहुमतानें या प्रश्नाच्या बाबतींत निर्णय घेतले जाणार तें बहुमत काँग्रेसच्या हातीं असून तें बहुमत अनुकूल करून

घ्यावयाचें तर काँग्रेसमधलेंच मत या कामाला अनुकूल करून घेण्याशिवाय गत्यंतर नाहीं. तसें तें अनुकूल झालें कीं प्रादेशिक विधानसभा भाषिक प्रांतांना अनुकूल शिफारस करील व पार्लमेंटमध्यें तसा कायदा राष्ट्राध्यक्षांच्या संमतीनें होऊन भाषिक प्रांतांचा प्रश्न सुटण्यास वेळ लागणार नाहीं. काँग्रेसमध्यें निरनिराळ्या जागीं निवडून येणारे लोक भाषावार प्रांतरचनेला अनुकूल असतील अशी खबरदारी घेणें हें ज्याप्रमाणें या दृष्टीनें लोकांचें कर्तव्य आहे त्याचप्रमाणें काँग्रेसमध्यें व कायदेमंडळांत निवडून आलेल्या काँग्रेसवाल्यांना या प्रश्नाबाबत समान भूमिकेवर आणून मतैक्य साधणें हें काँग्रेसकार्यकर्त्यांचें काम आहे. तसे प्रयत्न झाले तर भाषावार प्रांतरचनेच्या आड येण्यासारखें हैदराबादच्या ठरावांत कांहींहि नाहीं हें श्री. काकासाहेब गाडगीळ यांच्या कायदेशीर भाष्यावरून स्पष्ट होणारें आहे.

२४–१–१९५३

महाराष्ट्राचा विराट पुरुष व भारताचा महापुरुष

पं. जवाहरलाल नेहरु यांचा महाराष्ट्राचा सहा दिवसांचा दौरा खानदेशांतील अनुभवांचा सरता गोड घास घेऊन समाप्त झाला आहे आणि पंडितजी महाराष्ट्रांतील दौऱ्याच्या विपुल व विविध आठवणी घेऊन दिल्लीस रवाना झाले आहेत. नाशिक आणि खानदेशच्या भागांत दौऱ्याच्या शेवटच्या दोन दिवसांत त्यांचा संचार झाला. खानदेश भावनाप्रधान व श्रद्धापूर्ण असून महाराष्ट्राच्या मस्तकाच्या ठिकाणीं आहे. खानदेशांत पिकणाऱ्या कापसाची धवलता आणि तेथील लोण्याची स्निग्धता खानदेशांत भरपूर प्रमाणांत असून महात्माजींच्या विधायक कार्याला मोठा उठाव महाराष्ट्रांत खानदेशानें दिला आणि अनुयायीहि खानदेशानें अधिक प्रमाणांत दिले. खानदेश खिशानें त्याचप्रमाणें मनानेंहि सधन असून, दुष्काळग्रस्त असलेला खानदेशहि आपला गुणधर्म विसरलेला नाहीं असा अनुभव या दौऱ्यांत आला. पंडितजींचा हा महाराष्ट्रव्यापी दौरा सुमारें अठरा वर्षांनीं झाला. फैजपूर काँग्रेसनंतर निवडणुकीसाठीं मागचा दौरा खानदेशांतून

सुरू होऊन उत्तर दक्षिण असा झाला. या खेपेस कोंकणच्या काळ्या कातळांतून दौऱ्याचा आरंभ होऊन खानदेशच्या कार्पास राशीवर जणुं कांहीं त्याची समाप्ति झाली. या १२०० मैलांच्या तुफानी दौऱ्यांत पंडितजींचें महाराष्ट्रानें लक्षहस्तांनीं स्वागत केलें, पंडितजींविषयीं आपुलकी, श्रद्धा व प्रेम व्यक्त करतांना महाराष्ट्र दुष्काळाचें दुःखहि विसरला आणि जागजागीं आपल्या नेत्याच्या स्वागताचा सोहळा एखाद्या सणाप्रमाणें महाराष्ट्रानें साजरा केला.

सातारा, नगर, सोलापूर म्हणजे आपले बालेकिल्ले आहेत, असें कॉंग्रेसचे विरोधक समजत असतात. पं. नेहरु यांना काळीं निशाणें दाखवून, निदर्शनें करून किंवा मागण्यांच्या कैचींत पकडून या दौऱ्याचा फज्जा उडविण्याचा विरोधकांचा मनसुबा होता असें म्हणतात. पण लोकगंगा सहस्र मुखानीं पंडितजींना भेटावयास इतक्या आवेगानें धावली कीं विरोधाचे बालेकिल्ले कोठल्या कोठें उध्वस्त झाले आणि चूपचाप आपापल्या ढोल्यांत पंडितजींचा तुफानी दौरा संपेपर्यंत विरोधी मुखरांना आश्रय घ्यावा लागला. नाहीं म्हणायला दौऱ्याच्या प्रारंभीं साथी श्री. गोरे यांनीं व शेवटीं डॉ. जयकर यांनीं, या दौऱ्यांत पुण्याच्या दुष्काळ कमिटीबरोबर पंडितजींच्या वाटाघाटी झाल्या नसल्यामुळें हा दौरा व्यर्थ आहे, असा बदसूर काढला आहे. महापुरांत मोठमोठीं झाडें वाहून गेलीं तरी लव्हाळे सवड मिळतांच डोकें वर काढतातच. असा एखादा एकलकोंडा केविलवाणा बदसूर निघाला तरी महाराष्ट्राच्या दौऱ्यांत पंडितजींना महाराष्ट्र वश असल्याचें व महाराष्ट्राला पंडितजी वश असल्याचें दिसून आलें व पंडितजींचा महाराष्ट्र–दिग्विजय कृतार्थ ठरला यांत संशय नाहीं.

पं. नेहरूंचा महाराष्ट्र–दिग्विजय म्हणजे पंडितजींच्या व्यक्तिमत्वाचा महिमा होय, लोकांच्या उत्सवप्रियतेचा हा नमुना आहे, अशा प्रकारचा आडमुठा प्रचार करून या दौऱ्याचें यश अवगणण्याचा प्रयत्न महापुरांत तग धरून राहिलेल्यांकडून होणार नाहीं असें नाहीं. चंद्र पाहून समुद्र उचंबळतो, यांत दोष चंद्राचा नाहीं व समुद्राचाहि नाहीं. घुबडांना पाहून समुद्र उचंबळला नाहीं याबद्दल चंद्राला दूषणें देऊन उपयोग नाहीं. पं. नेहरु हे महाराष्ट्र–दिग्विजयांतील नायक होत हें सकृद्दर्शनी खरें आहे. सुमारें १२०० मैल प्रवास त्यांनीं सहा दिवसांत केला, दहा लाख लोकांनीं त्यांचीं भाषणें ऐकलीं आणि मार्गावर सुमारें दहा लाख लोकांनीं ठिकठिकाणीं त्यांना पहाण्यासाठीं गर्दी केली. वीस ते पंचवीस लाख महाराष्ट्रीयांपर्यंत पं. नेहरु सहा दिवसांच्या अवधींत पोहोंचले ही वस्तुस्थिति भारतांतच काय पण जगांतहि असाधारण आहे असें दौऱ्याची परिसमाप्ति करतांना पंडितजींनीं सांगितलें आहे आणि तें खरें आहे. पंडितजी या दौऱ्याचे नायक होते, सर्व

प्रसिद्धीझोत त्यांच्यावरच पडत होते, सर्व डोळे त्यांच्यावर खिळले होते, पुष्पहारांचा वर्षाव त्यांच्यावर होत होता आणि रुद्रांत वर्णन केल्याप्रमाणें हा अधिवक्ता बोलावयास उभा राहिल्यावर सर्व राक्षस व सर्प गिळून टाकून लोकांचें लक्ष वेधून घेत होता यांत काडीमात्रहि अतिशयोक्ति नाहीं. सर्वांचेंच लक्ष तेथंच वेधल्यामुळें वार्ताहरांनींहि वर्णनासाठीं स्वतःचें तिखटमीठ खर्ची घातलें आणि पंडितजींनीं अहमदनगर येथें कायदेमंडळाच्या एका सभासदाला उचलून टाकलें, पंडितजी अहमदनगर किल्ल्यांत कोणत्या खोलींत राहात याबाबत पंडितजींची व मुरारजींची खडाजंगी उडाली, असे कपोलकल्पित अहवाल त्यांनीं ठोकून दिले हें क्षम्यच समजलें पाहिजे. पंडितजींसाठीं लक्षावधि लोक गोळा झाल्यामुळें ते या दौऱ्याचे नायक होत हें खरेंच; पण स्वागतार्थ उभा झालेला महाराष्ट्राचा विराट पुरुष हा पंडितजींच्या दृष्टीनें महाराष्ट्र-दिग्विजयाचा नायक होय. या नायकावर पंडितजींचें लक्ष खिळलेलें होतें; स्वतःचीं दुःखें व आपत्ति विसरून स्वागतार्थ प्रकट झालेला हा विराट पुरुष किती उमदा, कणखर आणि परिस्थितीपुढें न वांकणारा पण विनम्र भाव धारण करणारा आहे याचा अनुभव पंडितजी घेत होते; आणि विराट पुरुषाच्या मागें असलेल्या शक्तिसंचयाची व त्या शक्तीचा योग्य विनियोग केला गेल्यास साधणाऱ्या प्रचंड कार्याची मोजदाद पंडितजी घेत होते. महाराष्ट्राचा विराट पुरुष व भारताचा महापुरुष समोरासमोर असतांना परस्परांच्या गुणगौरवांत स्वतःला विसरून गेले तरी लौकिक दृष्टीनें दिग्विजयाचे नायक पं. नेहरु व पंडितजींच्या विशाल दृष्टिकोनांतून पहातां नायक महाराष्ट्राचा विराट पुरुष ठरतो यांत संशय नाहीं.

महाराष्ट्रांतील नद्यांचें पाणी वाहून समुद्राला मिळतें व बंधाऱ्यांच्या अभावीं पिकासाठीं तर त्याचा उपयोग होत नाहींच पण शेतजमीन मात्र धुपून जाते, अशी दुष्काळी मनूंतील सर्वांमुखीं असलेली तक्रार आहे. मानवी कर्तृत्वाच्या बाबतींत हीच परिस्थिति दौऱ्याचा समारोप करतांना आपल्या भाषणांत पंडितजींनीं स्पष्ट केली आहे. महाराष्ट्रांत हांक मारली तर कोणी ओ देत नाहीं ही नेहमींची तक्रार आहे. आपण उभे राहूं तेथें लाखों लोक जमले पाहिजेत असली अपेक्षा या तक्रारीच्या मुळाशीं असते. महाराष्ट्र गुणांचा, त्यागाचा, सेवेचा व उदात्त शिकवणुकीचा भुकेला आहे आणि याबाबतचा साक्षात्कार जेथें होतो तेथें श्रद्धेनें आणि भक्तीनें शतकानुशतकें चिकटून राहाण्याची दृढता महाराष्ट्राच्या ठिकाणीं आहे. महाराष्ट्रांतील निरनिराळ्या ठिकाणच्या यात्रा आणि सोहाळे म्हणजें महाराष्ट्राच्या या वैशिष्ट्याचें द्योतक होत. पंडितजींच्या भाषणासाठीं जितके लोक सबंध दौऱ्यांत जमले तेवढे पंढरपूरच्या आषाढीला दरवर्षी जमत असतात; व संतांच्या शिकवणुकींत श्रद्धामय अंतःकरणानें तल्लीन होत असतात.

पं. नेहरूंच्या दौऱ्यांत काय किंवा पंढरीच्या यात्रेंत काय, महाराष्ट्राचा विराट पुरुष आपल्या भव्य स्वरूपांत प्रकट होतो; पण शहाण्या लोकांकडून अंधश्रद्धेबद्दल व भोळ्याभाबाबद्दल नाकें मुरडलीं जातात व तो अदृश्य होतो. या विराट पुरुषाच्या प्रचंड शक्ती अजमावून त्या राष्ट्राच्या कारणीं लावा, अशी पंडितजींनीं महाराष्ट्र सोडतांना मनोभावानें हांक दिली आहे. नद्यांच्या पाण्याप्रमाणें मानवाचें कर्तृत्वहि केवळ आबाळीमुळें फुकट जात आहे. त्याची संघटना करून तें विधायक कार्याला लावलें तर पंचवार्षिक योजनेसारख्या विराट योजनाहि मुदतीपूर्वीच पुऱ्या होतील. रशियासारख्या राष्ट्रांत सक्तीनें या शक्ती कार्यान्वित करण्यांत येतात. भारतांत ती गोष्ट प्रेमानें व्हावयाची आहे. महाराष्ट्राच्या विराट पुरुषाचें दर्शन पं. नेहरूंच्या दौऱ्याच्या प्रसंगानें सर्व सुजाण-अजाणांना झालें आणि भारताच्या महापुरुषानें महाराष्ट्राच्या विराट पुरुषाच्या शक्तीचा विनियोग करण्याची प्रेरणा दिली, ही पं. नेहरूंच्या दौऱ्यांतील कळसाची घटना दीर्घकालपर्यंत लोकांच्या स्मरणांत राहील.

५-५-५३

संयुक्त महाराष्ट्र आणि मुंबईचा करार

संयुक्त महाराष्ट्राच्या नेत्यांनीं विदर्भ-मराठवाड्याची संयुक्त महाराष्ट्रास अनुमति मिळविणारा नागपूरचा करार केल्यापासून मुंबईच्या प्रश्नावर वाग्युद्धें व रणें झडूं लागलेलीं असून, संयुक्त महाराष्ट्रांत मुंबई सामील होण्याविरुध्द महागुजराथनें डहाणूची आघाडी खोलल्याचें आढळून येत आहे. डहाणू येथें महागुजराथचे नेते व ठाणें जिल्ह्यांतील महागुजराथवाले यांची सभा श्री. जमनादास मेहता यांच्या अध्यक्षतेखालीं भरून नागपूर करारास विरोध करणारे त्याचप्रमाणें मुंबईचा अंतर्भाव संयुक्त महाराष्ट्रांत करण्यास विरोध दर्शविणारे ठराव डहाणूच्या या आघाडीनें मंजूर केले आहेत. डहाणूची ही मुंबईविरोधी आघाडी किती फुसकी आहे हें कोणाच्याहि चटकन ध्यानांत येणारें आहे. महागुजराथ आणि संयुक्त महाराष्ट्र या चळवळी वस्तुतः परस्परविरोधी नसून, सरहद्दीचे किरकोळ प्रश्न वगळले

तर मराठी भाषिकांचा प्रांत व गुजराथ भाषिकांचा प्रांत यांचा एकमेकाशीं कसलाच विरोध नाहीं; आणि दोन निकटवर्ति भाषिक प्रांत या दृष्टीनें त्यांच्यामध्यें कोणतेंहि वैमनस्य उत्पन्न होणें इष्टहि नाहीं आणि अपरिहार्यहि नाहीं. महागुजराथमध्यें मुंबईचा अंतर्भाव व्हावा असा कोणत्याहि प्रतिष्ठित गुजराथी नेत्याचा आग्रह नाहीं आणि त्या दृष्टीनें नागपूर करार हा प्रातिनिधिक आहे किंवा नाहीं किंवा मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असावी किंवा नाहीं या प्रश्नाशीं महागुजराथच्या चळवळीला कसलेंच सोहेरसुतक असण्याचें कारण नाहीं. पण या वादाचा नसता उपटशूळ डहाणू आघाडीनें खांद्यावर घेतला आहे. खांद्यावर अगांतुक उपटशूळ आणि श्री. जमनादास मेहतांसारख्यांचें फुटकें नेतृत्व अशी डहाणू आघाडीची तारांबळ सांप्रत दिसत असून त्या आघाडीचे तीनतेरा हां हां म्हणतां झाल्यास त्यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. मुंबईला संयुक्त महाराष्ट्र परिषदेची सभा भरून नागपूर कराराला पाठिंबा देण्यांत आला, त्याचप्रमाणें निरनिराळ्या महाराष्ट्रीय संस्थांची सभा श्री. बोले यांच्या अध्यक्षतेखालीं भरून नागपूरचा करार व मुंबईचा महाराष्ट्रांत अंतर्भाव यांस मान्यता देण्यांत आली, त्यावर उत्तर म्हणून डहाणू आघाडी उघडण्याचा लांडा कारभार करण्यांत आला असें दिसतें. पण असल्या लांड्या फुसक्या आघाड्यांनीं नागपूर कराराची आघाडी कशी भक्कम आहे हेंच दाखवून देण्यापलीकडे कांहींहि साधणार नाहीं हें उघड आहे.

नागपूर करारानें मुंबईचा उल्लेख महाराष्ट्राची राजधानी म्हणून केल्यानें मुंबईबद्दलचीं वाग्युद्धें व रणें झडूं लागलेलीं आहेत यांत आश्चर्य नाहीं. डहाणूची आघाडी फुसकी व हतबल असली तरी हीं वाग्युद्धें मात्र उपेक्षणीय आहेत असें म्हणतां येणार नाहीं. मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष श्री. एस्. के. पाटील व भारतीय संसदेचे अध्यक्ष ना. मावळंकर यांनीं मुंबई ही स्वतंत्र राहाण्याची इष्टता प्रतिपादिल्यामुळें संयुक्त महाराष्ट्राचे नेते खवळल्यासारखे झाले आणि मुंबई ही पाटील–मावळंकर यांची खासगी मालमत्ता नव्हे असे फटकळ उद्‌गार श्री. काकासाहेब गाडगीळ यांनीं काढले व मराठी भाषिकांमधल्याच नेत्यांच्या वादाला तोंड पाडलें असें म्हटलें पाहिजे. मुंबई ही मावळंकर–पाटील यांची मिरास नाहीं हें श्री. गाडगीळ यांना उत्तर देतांना श्री. पाटील यांनींहि मान्य केलें आहे. पण त्याचबरोबर मुंबई ही महाराष्ट्रीय नेत्यांचीहि मत्ता नसून, मुंबईकरांनींच मुंबईचें भवितव्य ठरवावयाचें आहे, असें बजावण्यास त्यांनीं सोडलेलें नाहीं. श्री. पाटील यांच्या उद्‌गारांत मुंबईचा प्रश्न हा सार्वमतानें सोडवावा अशा प्रकारच्या सूचनेचा अंतर्भाव असल्यासारखा दिसतो. पण आंध्र–तामीळनाड वादांत मद्रासचा प्रश्न सार्वमतानें सोडविण्याचा पायंडा पाडण्यांत आलेला नाहीं हें लक्षांत घेतां, मुंबईचा प्रश्नहि सार्वमताची कांस धरून सोडवावा ही भूमिका कोणीहि मान्य करणार

नाहीं आणि श्री. पाटील यांनाहि ती अभिप्रेत असेल असें दिसत नाहीं. सार्वमत जरी नसलें तरी मुंबईतील लोकप्रतिनिधींच्या मतानें मुंबईचा प्रश्न सोडविला गेला पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष दिसत आहे. मुंबईचें नागरी जीवन व कायदेविषयक जीवन अबाधित राहिलें म्हणजे मुंबई कोठें राहावी या प्रश्नाला महत्त्व राहात नाहीं, असे उद्‌गार मध्यंतरीं श्री. पाटील यांनीं काढले होते; आणि नागपूर करारांतील मुंबईचा उल्लेख मुंबईच्या प्रतिनिधींना एक प्रकारें डावलून घेण्यांत आला आहे अशी टीका त्यांनीं नागपूर करारावर केली होती. गाडगीळ–पाटील वादांतील जहरी भाग प्रासंगिक म्हणून वगळला तर मुंबईचा अंतर्भाव कोणत्या अटींवर महाराष्ट्रांत व्हावा हें मुंबईकरांच्या मतानें ठरलें पाहिजे, असा श्री. पाटील यांचा आग्रह दिसतो. श्री. बोले यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या मुंबईतील महाराष्ट्रीय संस्थांच्या सभेंतहि नागपूर कराराला पाठिंबा देतांना नागपूर कराराच्या धर्तीवरच मुंबईकरांचें समाधान करणारा व त्यांची भीति दूर करणारा मुंबईचा करार व्हावा, असें म्हटलें आहे. नागपूर करारानंतरच्या वाटाघाटींत, वादांत व वाग्युद्धांत अशा रीतीनें मुंबई कराराची इष्टता व अपरिहार्यता एक प्रकारें दिसून आली आहे, असें म्हटलें पाहिजे.

विदर्भ-मराठवाड्याच्या शंकाकुशंका व भीति दूर करण्यासाठीं नागपूर करार करण्यांत आला, त्याचप्रमाणें मुंबईकरांची वास्तव किंवा मानीव भीति दूर करण्यासाठीं मुंबई करार होणें अगत्याचें आहे असें म्हटल्यावर तो करार जितका लौकर होईल तितकें चांगलें, आणि मुंबईबद्दलचा वाद चिघळूं न देण्यास असा करार अत्यंत उपकारक ठरेल. नागपूरकरांच्या समाधानासाठीं पुण्याचीं राजधानीचीं छत्रचामरें नागपूरला बहाल करण्यांत आलीं, मराठवाडा-विदर्भाचा पैसा तेथेंच खर्च होईल असें आश्वासन देण्यांत आलें, मंत्रिपदांचीहि लोकसंख्येच्या प्रमाणांत वांटणी मान्य करण्यांत आली. हवें तें घ्या पण महाराष्ट्राला सोडूं नका, अशींच एक प्रकारचीं आर्जवें नागपूरला विदर्भवाल्यांची करण्यांत आलीं. नागपूर हें महाराष्ट्राचें उत्तरेकडचें नाक असेल तर मुंबई हें महाराष्ट्राचें काळीजच म्हटलें पाहिजे. या काळजांत कांहीं चलबिचल होणार नाहीं, अगर भीतीनें कळ उठणार नाहीं, अशी काळजी महाराष्ट्रीय नेत्यांनीं घेतली पाहिजे! मुंबईचें व्यापारी महत्त्व कमी होणार नाहीं, औद्योगिक प्रतिष्ठा नाहींशी होणार नाहीं आणि केवळ बहुमताच्या जोरावर संयुक्त महाराष्ट्रांत मुंबईची परवड होणार नाहीं किंवा हितसंबंध दुखावले जाणार नाहींत, अशी हमी आज मुंबईतील लोकांना मिळाली तर मुंबईचे मराठी भाषिकच नव्हे तर अन्य भाषिकहि मुंबईचा संयुक्त महाराष्ट्रांत अंतर्भाव होण्यास राजी होतील अशी शक्यता आहे. मुंबई ही गुण्यागोविंदानें महाराष्ट्रांत समाविष्ट होण्यासाठीं मुंबईकरांचें समाधान

होण्यासारखा नागपूर कराराच्या धर्तीचा मुंबई करार हा आवश्यक असून, तशा वाटाघाटींचा मुहूर्त शक्य तितक्या लवकर महाराष्ट्रीय नेते करतील आणि मुंबईचा प्रश्न बिथरण्यास वाव ठेवणार नाहींत अशी आशा आहे.

ता. ३०–१०–१९५३

सर्वेषामविरोधेन 'मुंबईसह महाराष्ट्र'

गेल्या आठवड्यांत 'नवाकाळ' मध्यें मुंबई कराराची इष्टता प्रतिपादन करणारा जो लेख प्रसिद्ध झाला त्यावर 'नवशक्ति' कारांनीं 'मुंबई कराराचा वेदान्त' अशा मथळ्याखालीं बरेंच काहूर माजविलें असून तर्कट रचलें आहे. तर्कट हें नेहमींच वस्तुस्थितीपेक्षां कल्पनाशक्तीस नसते फाटे फोडून रचलेलें असतें आणि काहुराचा भरहि विपर्यासावर विशेष असतो. तर्कट आणि काहूर यांसच चर्चेत प्राधान्य मिळालें तर मूळ मुद्याला बगल मिळण्याचा पुष्कळसा धोका असतो. या दोनहि प्रकारचा धोका टाळून नवशक्तिकारांनीं मुंबईकराराबद्दलचें प्रतिपादन करतांना जे मुद्दे मांडले आहेत ते विचारांत घेणें अप्रस्तुत ठरणार नाहीं. 'मुंबई-कराराचा वेदान्त' नवशक्तिकार म्हणतात त्याप्रमाणें केवळ 'नवाकाळ'चा नसून संयुक्त महाराष्ट्राच्या नेत्यांनीं अशा प्रकारच्या कराराची तयारी यापूर्वीं खचित करून ठेवलेली आहे हें विसरून चालणार नाहीं. नागपूर–कराराचें समर्थन करतांना अशाच प्रकारचीं बोलणीं मुंबईच्या बाबतींतहि करण्यांत येतील असें सूतोवाच श्री. काकासाहेब गाडगीळ यांनीं या बाबतींत करून ठेवलेलें आहे. मुंबईतील संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या वेळीं श्री. शंकरराव देव यांनीं मुंबईबद्दल बोलणीं केव्हां करावयाचीं हा सोईचा प्रश्न असून नेत्यांवरच याबाबत विसंबून राहिलें पाहिजे असें एका पृच्छेला उत्तर देतांना सांगितलें होतें आणि एका प्रकारें मुंबईबद्दलच्या वाटाघाटीस अनुकूलता दर्शविली होती. रा. ब. बोले यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईतील महाराष्ट्रीय संस्थांच्या प्रतिनिधींची जी सभा दादरला भरली होती तींतहि मुंबईकरांच्या शंकांचें आणि भीतीचें निराकरण करण्याच्या दृष्टीनें मुंबई करार व्हावा असें ठरावरूपानें प्रतिपादन करण्यांत आलेलें आहे. अहमदाबादच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या बैठकींत श्री. काकासाहेब गाडगीळ

यांनीं अज्ञ आणि तज्ञ यांची समजूत घालण्याबद्दलचे जे उद्गार काढलेले आहेत तेहि मुंबईबद्दलच्या वाटाघाटींची तयारी दर्शविणारेच आहेत. अर्थातच मुंबई-करारावी इष्टता संयुक्त महाराष्ट्राच्या नेत्यांनाहि पटलेली आहे, असें यावरून दिसून येणारें आहे.

अर्थातच मुंबई–कराराची इष्टता आणि आवश्यकता हा वेदान्त नसून व्यवहार आहे हें उघड असून नागपूरला जो करार झाला त्या करारानें मुंबई–कराराचा मार्ग एक प्रकारें दाखवून दिलेला आहे. नागपूरचा करार कां करावा लागला आणि कोणाशीं करण्यांत आला ? महाराष्ट्राबद्दलची भीति आणि शंका विदर्भांत असल्यामुळें संयुक्त महाराष्ट्राविषयींची एक प्रकारची उदासीनता विदर्भांत आहे आणि या उदासीनतेमुळें महाविदर्भाच्या चळवळीचें आयतें पोषण होत आहे, असें आढळून आल्यावर विदर्भाच्या भीतीचें निराकरण करणें आणि संयुक्त महाराष्ट्रांत विदर्भ बद्धमूल करणें हें संयुक्त महाराष्ट्राच्या नेत्यांना आवश्यक वाटूं लागलें. विदर्भांत या आणि कराराच्या वाटाघाटी करा अशा प्रकारचें पाचारण विदर्भांतून आलें होतें अशांतला मुळींच भाग नाहीं. उलटपक्षीं आग्र्याची ऑल इंडिया काँग्रेसची सभा उरकल्यावर श्री. भाऊसाहेब हिरे यांनीं नागपूरला मुक्काम दिला आणि नागपूरच्या बैठकीची भूमिका आपल्या हातानें तयार करून घेतली, असें दिसतें. कोणत्या धोरणानें बोलणीं होणार याची कल्पनाहि महाराष्ट्रीय नेत्यांना नव्हती असें श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं पुण्याच्या महाराष्ट्र प्रां. काँ. कमिटीच्या सभेंत जें भाषण केलें त्यावरून दिसून येतें.

विदर्भ नेत्यांच्या शंकांचें परिमार्जन कोणतीहि किंमत देऊन करण्याच्या निर्धारानें महाराष्ट्रीय नेते नागपूरला गेले होते आणि विदर्भाच्या मनांत ज्या शंकाकुशंका व धास्ती असण्याची शक्यता होती त्या सर्वांचें निराकरण करणारा करार नागपूरच्या बैठकींत महाराष्ट्रीय नेत्यांनीं घडवून आणला. हा करार कोणाशीं करावयाचा असा प्रश्न नागपूरच्या बैठकीच्या वेळीं उपस्थित झाला नाहीं व तेंच योग्य होतें. संयुक्त महाराष्ट्रास मनोमय अनुमतता ज्यांची होती पण त्या बाबतींत ज्यांचा फारसा उत्साह दिसत नव्हता अशा विदर्भ नेत्यांची बैठक नागपूरास संयुक्त महाराष्ट्राच्या नेत्यांसमवेत झाली आणि नागपूर-करार घडून आला. विदर्भाला सर्व प्रकारचीं आश्वासनें आणि सवलती दिल्यावर महाविदर्भाची चळवळ आतां अडचणींत पडल्यासारखी झाली आहे आणि इतक्या सवलतींनंतर महाविदर्भाची आवश्यकता काय, अशा प्रश्नाला उत्तर देण्याची पाळी महाविदर्भ-वाल्यांवरच आलेली आहे. बोलणीं संयुक्त महाराष्ट्राला अनुकूल असलेल्या विदर्भ नेत्यांशीं झालीं पण महाविदर्भवाल्यांची बाजू मात्र त्यामुळें लंगडी झाली असें वातावरण नागपूर-कराराच्या परिपूर्तीनें विदर्भांत निर्माण झालें आहे. या

करारानंतर नागपूर कॉर्पोरेशननें नागपूर करारास विरोध करणारा ठराव मंजूर केला आहे आणि नागविदर्भाची तळी उचलून धरली आहे. त्याचप्रमाणें महाविदर्भवाले नेतेहि अवसान दाखवीत आहेत. पण हें ओढूनताणून चंद्रबळ टिकाऊ स्वरूपाचें नसून महाविदर्भाचा पायाच त्यामुळें ढासळला आहे. जें धोरण, पद्धति आणि औदार्य अवलंबून नागपूर-करार झाला व महाविदर्भाच्या चळवळीची पिछेहाट साधली तेंच धोरण, पद्धति व औदार्य अवलंबून मुंबई-करार जर साधण्यांत आला तर स्वतंत्र मुंबईच्या चळवळीचें बळ ओसरल्याशिवाय राहाणार नाहीं हें उघड आहे.

मुंबईचा करार कोणाशीं करावयाचा व कोणत्या धोरणानें करावयाचा या प्रश्नांचें उत्तर नागपूर-करारानेंच एक प्रकारें देऊन टाकलेलें आहे. मुंबईसह महाराष्ट्र सर्वांच्या अविरोधानें मिळवावयाचा असेल तर त्याचा मार्ग यापेक्षां फारसा निराळा असूं शकत नाहीं. मुंबईसह महाराष्ट्र हा निर्धार कायम ठेवावा आणि कांहीं वर्षे वाट पाहावी लागली तरी हरकत नाहीं अशा प्रकारचें प्रतिपादन आपल्या ताज्या अग्रलेखांत 'लोकमान्य' कारांनीं केलें आहे, आणि संयुक्त कर्नाटक झाल्यानंतर उरलेल्या मुंबई राज्यांत महाराष्ट्रीयांचें निर्भेळ बहुमत प्रस्थापित होणारें असल्यानें गुजराथ मुंबई राज्यांतून आपसुख बाहेर पडेल व मुंबईसह महाराष्ट्र आयताच सिद्ध होईल असा युक्तिवाद त्यांनीं पढविला आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न मुंबई प्रदेश काँ. कमिटींत मागें निघाला असतां अगदीं असाच युक्तिवाद श्री. एस. के. पाटील यांनीं त्याप्रसंगीं केला होता. श्री. पाटसकर हे याच आस्ते कदम धोरणाचे अलीकडेपर्यंत पुरस्कर्ते होते. पण सर्वश्रेष्ठ कमिशनची घोषणा झाल्यानंतर आतां या युक्तिवादांत दमहि उरलेला नाहीं आणि मतलब तर नाहींच नाहीं. संयुक्त कर्नाटक निराळा झाल्यामुळें गुजराथ मुंबई प्रांतांतून वेगळा सरण्याची ज्यावेळीं चळवळ सुरू करील त्यावेळीं मुंबई स्वतंत्र ठेवण्याची उठावणीहि जोरांत होईल ही शक्यता विसरून चालणार नाहीं. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र जर त्वरित होण्यासारखा नसेल तर महाविदर्भाचा मार्ग मोकळा करून द्या अशा प्रकारच्या युक्तिवादांतून महाविदर्भाची चळवळ पुढें सरसावली आणि मुंबईसह महाराष्ट्राचा प्रश्न कालगतीवर सोडण्यांत पुन्हा तोच धोका उद्भवून नागपूर-करारावर पाणी पडण्याची शक्यता आहे हें लक्षांत घेणें आवश्यक आहे. सर्वश्रेष्ठ कमिशन भाषावार प्रांतरचनेचा काय तो सोक्षमोक्ष लावण्याच्या तयारीनें या वर्षाअखेर बसत आहे. दोनतीन वर्षांत राज्यांची पुनर्रचना होईल व हा प्रश्न लांबणीवर पडणार नाहीं असें निवेदन लोकसभेचे उपसभापति श्री. अनंतशयनम् आयंगार यांनीं नुकतेंच केलेलें आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न एक प्रकारें अशा रीतीनें हातघाईवर आल्यासारखा झाला असून, कोणत्याहि कारणानें किंवा

प्रकारानें दिरंगाई किंवा ढिलाई यावेळीं दाखविण्यासारखी नाहीं. उलटपक्षीं जर मुंबई स्वतंत्र राहाण्यास वाव मिळाला तर मुंबईशीं नित्यसंबंध येणारे ठाणें–कुलाबा–रत्नागिरी हे जिल्हेहि मुंबईबरोबर राहूं इच्छितील, विदर्भ–मराठवाड्याशीं झालेला नागपूर करार प्रभावी राहाणार नाहीं आणि संयुक्त महाराष्ट्राचें स्वप्न विरघळण्याचा धोका उत्पन्न होईल, ही शक्यता लक्षांत घेण्यासारखी आहे. अशा स्थितींत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या परिपूर्तीच्या दृष्टीनें नागपूर–करारासारखाच मुंबई-करार होणें हें इष्ट आणि अवश्य आहे असेंच म्हणणें भाग आहे.

ता. ६–११–१९५३

राष्ट्रीय त्रिमूर्तीला पंडितजींचें आवाहन

पं. जवाहरलाल नेहरु यांनीं गतवर्षीच्या शेवटच्या दिवशीं जळगांव येथें कामगारांना उद्देशून व नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशीं मुंबईत विद्यार्थ्यांना व शास्त्रज्ञांना उद्देशून भाषणें केलीं आहेत, व त्या भाषणांच्या द्वारें भारताच्या उभारणीसाठीं राष्ट्रीय त्रिमूर्तीलाच आवाहन केलें आहे. पं. नेहरूंनीं सुमारें सहा महिन्यांपूर्वी दुष्काळी महाराष्ट्राला भेट दिली त्यावेळीं जळगांव येथें त्यांचा मुक्काम झाला होता. उन्हाळ्याच्या ऐन कडाक्यांतून व दुष्काळी वातावरणांतून दुष्काळ–पीडितांचीं म्लान मुखें पाहात विषण्ण अंतःकरणानें त्यांनीं महाराष्ट्रांत प्रवास केला आणि महाराष्ट्राच्या धैर्याची प्रशंसा करीत व धीर देत त्यांनीं आपल्या दुष्काळी दौऱ्याची सांगता केली. जळगांवच्या या वेळच्या मुक्कामाच्या वेळीं परिस्थिति पालटलेली आहे. महाराष्ट्रांतील पिकें यंदा बऱ्हंशीं चांगलीं आहेत, हिवाळ्याचे गार वारे वहात आहेत, आणि आतां खचलेल्या अंतःकरणांना धीर देण्याचें मुख्य काम नसून नवभारताच्या उभारणीचा आदेश देऊन नवा उत्साह निर्माण करण्याचें कार्य मुख्य आहे.

पंडितजींनीं जळगांव येथें व मुंबईत भाषणें करतांना तें कार्य पार पाडलें आहे. जळगांव येथें भाषण करतांना पं. नेहरूंनीं भारतावर किंबहुना शांततावादी आशियावर जें नवें संकट आलें आहे त्याचा उल्लेख केलेला आहे. पाक-अमेरिकन

लष्करी करारानें थंडचा युद्धाच्या कक्षेंत भारत व आशियाचा शांततावादी भूप्रदेश ओढला जात आहें आणि सबंध दक्षिण आशियाचाच लष्करी तोल सुटल्यासारखा होत आहे. अमेरिकन शस्त्रास्त्रें भरपूर हातीं येऊन या उसन्या लष्करी शक्तीचा एकदां पाकिस्तानला उन्माद चढला म्हणजे पाकिस्तान काश्मीरच्या बाबतींत कोणतें धोरण पत्करील किंवा भारताच्या बाबतींत किती उपद्रवकारी होईल याचा भरंवसा कोणाला देतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें आशियाचा शांततेचा टापू एकदां शस्त्रास्त्रांच्या स्पर्धेंत ओढला गेला म्हणजे त्याचे परिणाम काय होतील हेंहि सांगतां येण्यासारखें नाहीं. पाक-अमेरिकन लष्करी करार होऊन पाकिस्तान अमेरिकेच्या पोलादी हातांतील बाहुलें बनणें हें भारतावर किंवा नवस्वातंत्र्य प्राप्त झालेल्या आग्नेय आशियावर एक महान संकट आहे. या संकटांतून पार पडण्याचा एक अदूरदर्शी कोता मार्ग म्हणजे भारतानेंहि असे लष्करी करार प्रतिस्पर्धी राष्ट्रांबरोबर करणें हा होय, आणि भारतानें चीन-रशियाशीं असे लष्करी मदतीचे गुप्त करार केल्याच्या वदंता भारताच्या हितशत्रूंनीं उठविल्याहि आहेत. पण असल्या आत्मघातकी मार्गानें भारत कधींहि जाणार नाहीं व कोणत्याहि स्वरूपांतील लष्करी मदत कोणत्याहि राष्ट्राकडून पत्करणार नाहीं असें सांगून पं. नेहरूंनीं असल्या प्रकारच्या खोटचा प्रचाराचा कपाळमोक्ष केला आहे. बाहेरची मदत घ्यावयाची नाहीं व प्रतिकूल परिस्थिति भारताभोंवतीं गर्दी करीत आहे, अशा स्थितींत भारताची उभारणी भक्कम पायावर करण्यासाठीं लोकांच्या सामर्थ्याला आवाहन करणें हा एकच मार्ग आहे. जळगांवच्या सभेंत कामगारांना व मुंबईच्या भाषणांत युवकांना व शास्त्रज्ञांना या कामीं पंडितजींनीं आवाहन करून त्रिमूर्तीलाच एक प्रकारें कौल लावला आहे यांत संशय नाहीं.

जळगांवमध्यें इंटकच्या अधिवेशनांत भाषण करतांना पं. नेहरूंनीं भारतांतील कामगार जगालाच भारताच्या उभारणीच्या दृष्टीची दीक्षा एक प्रकारें दिली आहे. कामगारांनीं आपल्या हक्कांसाठीं जागरूकतेनें झगडत असावें हें तर स्वाभाविक व योग्यच आहे. आणि त्या बाबतींत कामगारांच्या सुदैवानें राज्यसत्ता त्यांना उपकारक आहे. पण केवळ स्वहितापुरतें पाहिल्यानें कामगारांचें कर्तव्य संपत नाहीं. कामगारशक्ति ही नव्या भारताचा एक प्रचंड घटक असून त्यानें उत्पादनवाढीच्या कामांत जर आबाळ किंवा उपेक्षा केली तर अंतिम कामगार-हितालाहि तें पोषक नाहीं. त्याचप्रमाणें भारतहितालाहि तें संपूर्णपणें वावडें आहे. हक्कांच्या बरोबर जबाबदाऱ्याहि येतात किंबहुना जबाबदाऱ्यांशिवाय हक्कहि पुरे पदरांत पडत नाहींत. पंडितजींनीं उत्पादनवाढीची म्हणजेच भारताच्या स्थैर्याची व शक्तीची जोपासना करण्याची कामगारांची जी जबाबदारी आहे तिकडे कामगार-जगाचें लक्ष जळगांवच्या भाषणांत वेधलें आहे. राष्ट्रीय त्रिमूर्तीपैकीं

एका मूर्तीला त्यांनीं जळगांवांत ज्याप्रमाणें आवाहन केलें त्याचप्रमाणें मुंबईंत टाटा इन्स्टिटचूट ऑफ फंडामेंटल रिसर्चच्या इमारतीचें उद्घाटन करतांना शास्त्रज्ञांना विधायक संशोधनाचें आवाहन त्यांनीं केलें आहे. सांप्रत शास्त्रज्ञांची बुद्धि ही एक प्रकारें युद्धदेवतेच्या अंकित असून संहारक संशोधनांत गुंतलेली आहे आणि स्वाभाविकच या संहारक संशोधनाचा मक्ता विशिष्ट राष्ट्रांकडेच राहावा म्हणून संशोधनाच्या कामांत आत्यंतिक गुप्तता प्रादुर्भूत झाली आहे. सध्यांचें युग हें अॅटमयुग समजलें जातें व आणखी दहापंधरा वर्षांत हें युग कोणतीं पावलें संहाराच्या दिशेनें टाकील हें कोणालाच सांगतां येणार नाहीं. हें अॅटमयुग शास्त्रज्ञांच्या बुद्धिमत्तेनें निर्माण केलें हें खरें आहे. पण आतां या युगाचें दास्यत्वच एक प्रकारें संशोधकांच्या नशिबीं आलें असून त्यांची संशोधनक्षमता त्यायोगें खच्ची झाल्यासारखी व जगाला खावयास उठल्यासारखी झाली आहे. अॅटम-बाँबच्या संहार-युगास विधायक कलाटणी देण्याची जबाबदारी शास्त्रज्ञांची असून ही जबाबदारी उचलण्याचें आवाहन मुंबईच्या भाषणांत पंडितजींनीं भारतांतील शास्त्रज्ञांना केलें आहे. कामगारवर्गाच्या स्वरूपांतील भारताचे कर्तृत्वशाली हात त्याचप्रमाणें शास्त्रज्ञांच्या स्वरूपांतील भारताची संशोधक बुद्धिमत्ता यांना भारताच्या उभारणीस साहाय्यकारी होण्यास पं. नेहरूंनीं जळगांव-मुंबईच्या भाषणांत पाचारण केलें आहे.

भारतांतील युवकवर्ग हा भारतपुरुषाच्या पाठीचा कणा असून हा बळकट असण्यावरच भारताचें भवितव्य अवलंबून असल्यामुळें युवक मेळाव्यासमोर भाषण करतांना पं. नेहरूंनीं युवकांसमोर आपलें हृदय एक प्रकारें ओतलें असें म्हणावयास हरकत नाहीं. युवकवर्गावर सांप्रत उच्छृंखलपणाचे व आततायीपणाचे आरोप सतत होत असतात आणि युवकवर्ग बेइमान व बेभरवशाचा झाल्याचे आक्षेप घेण्यांत येत असतात. अभ्यासाव्यतिरिक्त युवकवर्गानें कांहीं करतां कामा नये, असा पं. नेहरूंचा कटाक्ष नाहीं ही आनंदाची गोष्ट आहे. विद्यार्थ्यांनीं चौकस असावें व कर्तबगारीच्या क्षेत्रांत चौरस राहावें, असा उलटपक्षीं पंडितजींचा आग्रह आहे. पण चौकसपणाला व चौरसपणाला विधायक प्रवृत्तींना पोसणारें स्वरूप असलें पाहिजे, असा त्यांचा आग्रह आहे. भारतीय युवकांच्या हाताला विधायक कामाची सवय होऊन ते शिंगांसारखे कणखर बनले पाहिजेत, आत्मविश्वासाचें सामर्थ्य त्यांच्या वाणींत संचरलें पाहिजे व विद्याभ्यासावर लक्ष केंद्रित असून सर्व क्षेत्रांत बुद्धिवैभवानें त्यांनीं अग्रेसरत्व संपादन केलें पाहिजे, अशी पं. नेहरूंची तरुणांबाबतची अपेक्षा व आशा आहे. विधायक दृष्टीचे राष्ट्रीय कामगार व विशाल दृष्टीचे बुद्धिशाली संशोधक सध्यांच्याच युवकवर्गांतून पुढें येणार असून या युवकवर्गाकडे पंडितजी व त्यांच्याबरोबर सारें राष्ट्र मोठ्या

आशा-अपेक्षेनें पाहात आहे. कामगारवर्ग, शास्त्रज्ञ व युवक ही भारताची त्रिमूर्ति असून भारताच्या या तीनहि मुखांना आपल्या जळगांव-मुंबईच्या भाषणांत राष्ट्राच्या उभारणीचा मंत्र नेहरूंनीं दिला असून, तो कोणत्याहि विकट परिस्थितींतून भारताला उज्ज्वल रीतीनें पार पाडून नेण्यास समर्थ आहे.

ता. ३-१-१९५४

राज्यपुनर्रचनेचीं निवेदनें

भारत सरकारनें नेमलेल्या राज्यपुनर्रचना कमिशननें आपल्या कामकाजास सुरुवात करणारें पहिलें पत्रक प्रसिद्ध केलें असून, राज्यपुनर्रचनेच्या बाबतींत ज्यांनीं लक्ष घातलें आहे त्यांनीं आपलीं निवेदनें कमिशनला ता. २४ एप्रिलपर्यंत सादर करावींत अशी घोषणा केली आहे. कमिशनला आपलें काम झटपट उरकावयाचें आहे आणि त्या दृष्टीनें प्रश्नावलि तयार करण्याच्या खटाटोपांत न पडतां कमिशननें राज्यपुनर्रचनेबाबत ज्यांना जें वाटत असेल तें त्यांनीं सांगोपांग माहितीसह कमिशनला कळवावें असें म्हटलें आहे. प्रश्नावलि तयार करून त्या प्रश्नावलीला अनुलक्षून लोकांकडून माहिती काढविण्यांत कांहीं फायदे तसेच तोटेहि आहेत. प्रश्नावलीची परिसीमा निवेदनाच्या बाबतींत घातली गेली असतां निवेदनें बांधेसूद व आटोपशीर होतात आणि त्यांत अगांतुक प्रश्नांचा गोंधळ माजून शिथिलपणा व अस्ताव्यस्तपणा येण्याचा धोका टळतो; पण त्याचबरोबर परिस्थित्यनुसार उपस्थित होणाऱ्या मुद्यांचा परामर्ष घेतला जात नाहीं, व निवेदनेंच नव्हे तर कमिशनचे निष्कर्षहि अपुरे ठरण्याचा संभव असतो.

दार-कमिशननें प्रश्नावलि तयार करून त्या अनुरोधानें उत्तरें मागविलीं होतीं आणि त्यांत भाषावार राज्यें असावींत कीं नाहीं याच प्रश्नाला अग्रमान होता. दार-कमिशनचें सर्व कामच त्याच मुद्याभोंवतीं प्रदक्षिणा घालीत राहिलें आणि भाषिक प्रांतच तूर्त नसावेत असा निर्णय दार-कमिशननें त्यावेळीं दिला होता. राज्यपुनर्रचना ही गृहीत गोष्ट धरूनच सर्वाधिकार कमिशन नेमण्यांत आलें आहे. तेव्हां दार-कमिशन ज्या समस्येभोंवतीं घोटाळत राहिलें ती समस्या

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलम

२५ क्रमांक ७५८२८ वि: निबंध राज्यपुनर्रचनेचीं निवेदनें

क्रमांक 2928 नों: दि: ९।१।६७

फाझलअल्ली कमिशननें टाळली असती तर तें स्वागतार्हे ठरलें असतें. प्रश्नावलि टाळून कमिशननें अव्याप्तीचा दोष जसा टाळला आहे त्याचप्रमाणें एका दृष्टीनें अतिव्याप्तीचा दोष पदरीं घेतला आहे. प्रश्नावलीच नसल्यामुळें भाषिक राज्यें च नसावींत येथपासून भारताला फेडरल राज्यपद्धति इष्ट आहे कीं केंद्र राज्यपद्धति कायदेशीर आहे येथपर्यंत सर्व प्रश्नांचा ऊहापोह करणारीं निवेदनें कमिशनला सादर होतील तर त्यांत आश्चर्य नाहीं. सध्यांच्या फेडरल राज्यपद्धतीनें राज्याराज्यांच्या धोरणांत विसंगति उत्पन्न होऊन त्यांत एकसूत्रीपणा राहात नाहीं तेव्हां भारताचे केवळ राज्यकारभाराच्या दृष्टीनें सुटसुटीत विभाग पाडून राज्यसरकारांऐवजीं कमिशनर्सनीं केंद्र सरकारच्या वतीनें राज्यकारभार चालवावा, अशा सूचना अधूनमधून पुढें येत असतात. अशाच धर्तीच्या इतर सूचनाहि उच्चाधिकार कमिशननें निवेदनांचें जें मुक्तद्वार ठेवलें आहे त्यामुळें कमिशनसमोर येण्याची शक्यता असून, प्रश्नावलीच्या अभावामुळें अनेक नवीं कुलंगडीं कमिशनसमोर येऊन गोंधळ माजविण्याचा प्रयत्न करतील व राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नाला नसते फाटे फुटतील अशी शक्यता आहे, हें विसरून चालणार नाहीं.

प्रांतरचनेच्या बाबतींतील निवेदनांना जरी कमिशननें मुक्तद्वार ठेवलें आहे, तरी कमिशनची नेमणूक करतांनाच जे मुद्दे मांडण्यांत आले आहेत त्यांचें नियंत्रण या निवेदनांवर आपोआप येतें आणि त्यांचा उल्लेख कमिशननें आपल्या पहिल्या पत्रकांत स्वाभाविकपणेंच केला आहे. प्रांतपुनर्रचना तूर्त करावी किंवा नाहीं हा प्रश्न कमिशनसमोर उपस्थित करण्याची मुभा निवेदकांना आहे आणि तसा उपक्रम झाल्याशिवाय राहाणार नाहीं हें उघड आहे. पण एक प्रकारें आतां ती चर्चा केवळ तात्त्विक ठरली असून तिला व्यावहारिक महत्त्व कांहीं राहिलेलें नाहीं. सध्यांची राज्यरचना ही अवघड, अनैसर्गिक व सर्वसाधारण लोकांचा कोंडमारा करणारी ठरलेली असून, आहे त्या स्वरूपांत ही टिकवून धरणें हें शक्य नाहीं, इष्ट नाहीं आणि भारतीय ऐक्यास व बलसंवर्धनास उपकारक नाहीं, याविषयीं आतां वादच राहिलेला नाहीं. नेहरु-रिपोर्टापासून आजतागायत भाषिक व सांस्कृतिक दृष्टीनें भारताची राज्यपुनर्रचना झाली पाहिजे ही गोष्ट काँग्रेसनें अनेकवार मान्य करून तशी नोंद करून ठेवलेली आहे, आणि सर्व पक्षोपपक्षांचें या मुद्यावर मतैक्य आहे. कोणत्याहि निमित्तानें आतां ही गोष्ट पुढें ढकलणें हें अव्यवहार्यच नव्हे तर घातुक ठरणारें आहे. भाषा आणि संस्कृति ह्यांना आगामी प्रांतरचनेमध्यें अग्रस्थान आहे आणि त्या बाबतींत कोणतेहि फाटे फुटतां कामा नयेत, ही गोष्ट सर्वांनीं मान्य केली म्हणजे कमिशनचें काम पुष्कळच सोपें होणारें आहे. हीं नवीं राज्यें आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असलीं पाहिजेत, राज्यकारभाराच्या दृष्टीनें सोइस्कर असलीं पाहिजेत, त्याचप्रमाणें भारताच्या एकतेस, बलसंवर्धनास

व भारतीय उत्कर्षाच्या योजनांना तीं वावडीं असतां कामा नयेत, याबद्दल वादच नाहीं नवीं राज्यें निर्माण करतांना भाषा–संस्कृतिप्रधान राज्यें वरील पथ्यपाणी सांभाळण्यासारखींच असलीं पाहिजेत हें स्पष्ट आहे. भाषिक प्रांतपुनर्रचनेची योजना मांडतांना हीं सर्व पथ्यें संभाळलीं जाणारीं आहेत हें निवेदकांना दाखवून द्यावें लागेल हें उघड असून, कोणत्याहि भाषा–संस्कृतिप्रधान राज्याची कैफियत या सर्व दृष्टींनीं बिनतोड रीतीनें मांडली गेल्यावर ती नाकारण्याचें कमिशनला कारण राहाणार नाहीं हें उघड आहे. अशा बिनतोड कैफियती तयार करणें हेंच यापुढील महत्त्वाचें काम असून ता. २४ एप्रिलपर्यंत अशा कैफीयती तयार करण्यालाच प्राधान्य मिळणार हें उघड आहे.

राज्यपुनर्रचनेचा प्रश्न गुण्यागोविंदानें व सलोख्याच्या वातावरणांतच सुटला पाहिजे आणि कोणत्याहि प्रकारची कटुता या प्रश्नाच्या सोडवणुकीस नडतां कामा नये हें उघड आहे. त्या बाबतींत प्रांतपुनर्रचनेच्या पुरस्कर्त्यांनीं किंवा विरोधकांनीं शक्य ती खबरदारी घेतली पाहिजे. राज्यपुनर्रचना व्हावी किंवा नाहीं आणि कोणता सीमाप्रदेश कोणत्या राज्यांत असावा याबद्दल प्रामाणिक मतभेद असूं शकतात आणि त्यांना व्यक्तता देण्याचें स्वातंत्र्य प्रत्येकास आहे. तेवढ्यावरून कटुता उत्पन्न व्हावयाचें कारण नाहीं. पण भरमसाट आरोप व आक्रमक वृत्ति यांचा आश्रय कोणत्याहि एका पक्षानें घेतला कीं, सर्वसाधारण लोकांत कटुतेचें वातावरण निर्माण होणें व भावना चाळविल्या जाणें हें क्रमप्राप्त ठरतें. भाषिक प्रांतांचे पुरस्कर्ते हे स्वार्थी आणि सत्तालोलुप आहेत, त्याचप्रमाणें भारतीय दृष्टि त्यांनीं गमावलेली आहे असे भरमसाट आरोप सुरू झाले कीं, असले मुद्दे काढणाऱ्या संघटनांच्या व व्यक्तींच्या हेतूंची झडती चवाठ्यावर करण्याची ईर्षा उत्पन्न होते ; त्याचप्रमाणें मुंबई शहर हें भौगोलिक दृष्ट्या महाराष्ट्रांत नाहीं असें भरमसाट विधान जेव्हां करण्यांत येतें तेव्हां त्याची प्रतिक्रिया सुतासारखी सरळ व्हावी अशी अपेक्षा करणें हें चूक ठरेल. मुंबई नागरिक समितीचे अध्यक्ष सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास यांनीं नुकतेंच काढलेलें पत्रक प्रक्षोभक प्रचाराचा एक नमुना समजलें गेल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. मुंबई स्वतंत्र असावी असें प्रतिपादन संयम व युक्तिवाद यांच्या आश्रयानें करणें निराळें, आणि महाराष्ट्रीय नेत्यांवर चिखलफेक करून मुंबई भौगोलिक व ऐतिहासिक दृष्ट्या महाराष्ट्रांत नाहीं त्याचप्रमाणें ४३ टक्के महाराष्ट्रीय बाकीच्या ५७ टक्के लोकांवर सत्ता गाजवूं पाहात आहेत अशीं भरमसाट विधानें करणें हें निराळें होय. भरमसाट विधानें व निरर्थक आरोप यांच्यांतूनच कटुता व प्रक्षोभ उत्पन्न होत असतो, आणि राज्यपुनर्रचना कमिशननें निवेदनें सादर करण्याची सूचना

दिल्यावर तरी असला गलिच्छ प्रचार थांबविण्यांत यावा व कमिशनचें काम सुकर करण्यांत यावें हें योग्य ठरेल.

ता. २६-२-५४

संयुक्त महाराष्ट्र व महाराष्ट्रीय आमदार

संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या मुंबई शाखेनें मुंबई कायदेमंडळाच्या महाराष्ट्रीय सभासदांना चहापान दिलें, त्याप्रसंगीं ना. हिरे, ना. कुंटे वगैरे संयुक्त महाराष्ट्राच्या नेत्यांनीं केलेलें मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचें आहे; आणि तें लक्षांत घेऊन कायदेमंडळाचे महाराष्ट्रीय सभासद संयुक्त महाराष्ट्राबाबतच्या आपल्या कर्तव्याबद्दल जागरूक राहातील अशी अपेक्षा आहे. सर्वाधिकार कमिशन मध्यवर्ति सरकारनें भाषिक प्रांतांबद्दल कायमची शहानिशा करण्याकरितां नेमलें असून, हा काळ एक प्रकारें आणीबाणीचा आहे. कर्तव्यपालनांत जराहि कुचराई झाली तर पश्चात्तापाची पाळी येईल असें चहापानप्रसंगीं ना. हिरे यांनीं सांगितलें आहे. सर्वाधिकार कमिशनची नेमणूक ही संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीची कसोटीच असून, या प्रसंगीं मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी ही बिनतोड अशा कैफीयतीच्या स्वरूपांत या कमिशनच्या समोर मांडली गेली पाहिजे

अशा कैफीयती तयार करण्यासाठीं संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें दोन कमिट्या नेमल्या आहेत. अन्य संस्थांमार्फतहि कैफीयती तयार करण्याचें काम सध्यां चालू आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राला पोषक अशा कैफीयती त्याचप्रमाणें विरोधी कैफीयती या कमिशनला सादर होतील. या कैफीयतींचा तौलनिक अभ्यास करतांना मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मांडणी निरपवाद अशी ठरली पाहिजे; आणि तें काम महाराष्ट्राचे बुद्धिमान नेते उत्कृष्ट रीतीनें पार पाडतील यांत शंका बाळगण्याचें कारण नाहीं. पण केवळ एवढ्याच गोष्टीनें भागेल अशांतला भाग नाहीं. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी ही बिनतोड आणि निरपवाद आहे एवढेंच नव्हे तर या मागणीच्या मागें सबंध महाराष्ट्र एकवटून उभा आहे अशी कमिशनची खात्री पटली पाहिजे. तशी ती पटण्यास महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा एकमेव आवाज सतत उठत राहिला पाहिजे आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र डावलणें म्हणजे भारताच्या मराठी भाषिक घटकालाच डावलणें होय, अशी कमिशनची खात्री पटली पाहिजे. संयुक्त महाराष्ट्राची मागणी मराठी भाषिकांस या कसोटीच्या काळांत सर्वत्र दुमदुमत राहिली पाहिजे. आणि लोकमत संघटित व प्रभावशाली करण्याची कामगिरी कायदेमंडळांतील महाराष्ट्राच्या प्रतिनिधींवरच येते. ही कामगिरी महाराष्ट्रीय सभासद कशी पार पाडतात इकडे महाराष्ट्राचें लक्ष यापुढें वेधलें जाईल हें उघड आहे.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी एक प्रकारें पक्षातीत अशी असून, संयुक्त महाराष्ट्र परिषदेची नवी उभारणी सर्वपक्षीय स्वरूपाची आहे आणि त्यांत सर्व पक्षांचे, मतांचे व गटांचे प्रतिनिधी आहेत. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मराठी भाषिकांचा झाला पाहिजे यांत मराठी भाषिकांत मतभेद नाहींत आणि त्यासाठीं अवलंबावयाच्या मार्गाबद्दल तूर्त तरी भेदाभेद असण्याचें कारण नाहीं. मालमसाला सर्व तयार आहे आणि कायदेमंडळांतील महाराष्ट्रीय प्रतिनिधींनीं लोकमत सुसंघटित व प्रभावी असें बनवावयाचें आहे. ही कामगिरी कायदेमंळांतील महाराष्ट्रीय प्रतिनिधी यथाशक्ति पार पाडीत आहेत असें म्हणण्यासारखी सध्यांची तरी परिस्थिति नाहीं. पक्षाची शिस्त, वैयक्तिक इच्छाआकांक्षा, त्याचप्रमाणें राज्यकारभारविषयक प्रश्न यांतच जो तो जगुं कांहीं सध्यां घुटमळत आहे आणि या मर्यादा ओलांडून संयुक्त महाराष्ट्राच्या बाबतींत पलीकडे जाण्याची इच्छा, उमेद व उत्कटता फारशी कुठें प्रत्ययास येत नाहीं. वास्तविक पाहतां मराठी भाषिकांचें निर्भेळ बहुमत कायदेमंडळांत असतांना हा प्रश्न शिस्तीच्या बंधनापलीकडे केव्हांच काढून घेतला जावयास पाहिजे होता आणि कायदेमंडळाचें मत भाषिक प्रश्नाबाबत निःसंदिग्ध रीतीनें व्यक्त व्हावयास पाहिजे होतें. पण पक्षातीत पातळीवर हा प्रश्न अद्यापीहि गेलेला नाहीं. सरहद्दीच्या प्रश्नांकडे अधिक लक्ष पुरविलें गेलें पाहिजे असें चहापानाच्या प्रसंगीं आमदारांकडून सांगण्यांत आलें आणि घरदार सोडून वर्ष दीड वर्ष यापुढें संयुक्त महाराष्ट्राचें काम करावयास आम्ही तयार आहोंत, असें श्री. घाटे यांनीं सांगितलें. प्रचाराची व लोकजागृतीची आवश्यकता सर्वच मराठी भाषिक प्रतिनिधींनीं मान्य केली ही समाधानाची गोष्ट आहे. आणि एक प्रकारें आतांपर्यंत त्यांच्याकडून याबाबत हेळसांड झाली अशी कबुली देण्यांत आली आहे. यापुढें अशी परिस्थिति राहाणार नाहीं आणि मराठी भाषिकांच्या इच्छाआकांक्षा स्वच्छ व स्पष्ट शब्दांत व्यक्त करून आपलें प्रतिनिधित्व मराठी भाषिक प्रतिनिधी सार्थ ठरवितील अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

उच्चाधिकार कमिशनपुढें मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची कैफीयत मांडून ती मान्य करून घेण्याइतकें मराठीभाषिक लोकमत सामर्थ्यवान करणें हें आजचें

अगत्याचें कर्तव्य आहे यांत संशय नाहीं. कमिशननें मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रास अनुकूल कौल देऊन लोकसभेची अंतिम मान्यता महाराष्ट्राच्या मागणीस मिळाली तर तें अर्थातच सोन्याहून पिवळें ठरेल. पण कमिशनचा कौल मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या कदाचित् विरुद्धहि जाईल, आणि कमिशनचा अनुकूल निर्णय मध्यवर्ति सरकारांत अगर लोकसभेंतहि फिरविला जाईल, अशीहि शक्यता आहे च ती डोळ्याआड करून चालणार नाहीं. त्या दृष्टीनें पाहिलें तर कमिशनच्या अहवालानंतरचाच काळ खरा आणीबाणीचा व महाराष्ट्राची कसोटी घेणारा ठरेल आणि त्याग व कष्ट यांची परमावधी त्या काळांत गांठावी लागेल. लोकशाहीमध्यें जनता ही खरी निर्णायक शक्ति आहे असें नेहमीं म्हटलें जातें. कमिशनचा निर्णय मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या विरुद्ध जाण्याचा प्रसंग आला, अगर कमिशनचा अनुकूल निर्णय मध्यवर्ति सरकारांत अगर लोकसभेंत लोकांनीं बदलला जाण्याचा प्रसंग आला तर लोकांच्या याच शक्तीकडे अखेरची धांव संयुक्त महाराष्ट्रवाद्यांना घ्यावी लागेल. कमिशनच्या नेमणुकीनें आणीबाणीच्या काळास सुरुवात झाली आहे आणि जसजसे दिवस जातील तसतशी ही आणीबाणी शिगेला पोहोंचल्याशिवाय राहाणार नाहीं. संयुक्त महाराष्ट्राची अखेरची शक्ति जनमत हीच असून या शक्तीची आराधना कसलीहि कसूर न ठेवतां करण्याचें आवाहन ना. हिरे यांच्या मुखानें एक प्रकारें कालपुरुषानेंच दिलें आहे असें म्हटलें पाहिजे.

ता ४–४–५४

स्वतंत्र मुंबईच्या मागणीचें वादंग

मुंबई प्रदेश काँग्रेसची स्वतंत्र मुंबईची मागणी करणारी कैफीयत आणि मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीच्या बैठकींतील या कैफीयतीची तळी उचलून धरणारीं भाषणें मुंबईच्या वातावरणांत एक प्रकारचें हलाहल कालविण्यास कारणीभूत ठरल्यास तें स्वाभाविक ठरेल. मुंबई काँग्रेस म्हणजे महाराष्ट्र काँग्रेस नव्हे असें मोठ्या शिरजोरीनें या सभेंत श्री. सी. सी. शहा यांनीं सांगितलें आणि त्यांनीं महाराष्ट्रीयांविरुद्ध जहरी हल्ला चढविला. मुंबई काँग्रेसचे एक सेक्रेटरी श्री. के. के. शहा यांनीं ऐतिहासिक, औद्योगिक, भाषिक, अशा कोणत्याहि दृष्टीनें

मुंबई गुजराथचीच असतांनाही गुजराथ मुंबईची मागणी न करण्याचें औदार्य दाखवीत आहे असें मोठ्या बडेजावानें सांगून स्वतंत्र मुंबईचा पुरस्कार केला. डॉ. सिध्वा यांनीं भारताच्या फाळणीस कारणीभूत झालेल्या जिना–वृत्तीनें महाराष्ट्रास पछाडलें आहे अशा प्रकारचे आरोप केले. राज्यपुनर्रचना होऊंच नये आणि तशी झालीच तर मुंबई स्वतंत्र राहावी अशी मुंबई काँग्रेसची कैफीयत, पण समर्थनाचीं भाषणें मात्र संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीवर जुन्यापुराण्या आरोपांचे कोळसे उगाळून काळेकुट्ट लेप चढविणारीं अशीं झालीं. स्वतंत्र मुंबईचा प्रत्येक समर्थक अशा कोळशांच्या गोणी जणुं कांहीं डोक्यावर घेऊन आला होता. कोणी ते कोळसे कोणी पेटवून तर कोणी ते उगाळून महाराष्ट्रास बदनाम करण्याची ही संधी जास्तींत जास्त साधून घेतली. महाराष्ट्रीयेतर सभासद संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा चेंदामेंदा करण्याच्या हिरीरीनेंच या सभेंत भाषणें करीत होते. मुंबई काँग्रेस म्हणजे महाराष्ट्र काँग्रेस नव्हे हें या असल्या भाषणांनीं दाखवून दिलें खरें; पण मुंबई काँग्रेस म्हणजे गुजराथ काँग्रेस नव्हे, त्याचप्रमाणें मुंबई म्हणजे अहमदाबाद–सुरतहि नव्हे, हें याच सभेंत डॉ. गांधी व डॉ. नरवणे यांच्या कैफीयतीला विरोध करणाऱ्या भाषणांनीं व मुंबई काँग्रेसची कैफीयत सर्वानुमतें मंजूर होऊं शकली नाहीं यायोगें दिसून आलें. डॉ. नरवणे यांनीं या कैफीयतीच्या विरुद्ध मत दिलें आणि संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या निवेदनावर सह्या करणाऱ्या डॉ. गांधी–शिवतरकरांना मताधिकार नसल्यामुळेंच त्यांचीं मतें कैफीयतीविरुद्ध नोंदलीं जाऊं शकलीं नाहींत. मुंबई काँग्रेसचे निर्णय नित्य सर्वानुमतें होण्याचा टेंभा अशा महत्त्वाच्या प्रश्नावरच फुटला, आणि मुंबईच्या भवितव्याबाबत दुफळीचें हलाहल मुंबईत कालविण्याचें पाप मात्र मुंबई काँग्रेसच्या कैफीयतींत आणि कैफीयतीचें समर्थन करणाऱ्या अद्वातद्वा भाषणांस लागलें.

श्री. के. के. शहा यांनीं आपल्या भाषणांत पुराणांत महाराष्ट्राचा उल्लेखच नसून दंडकारण्याचा उल्लेख आहे असें सांगितलें आणि दंडकारण्यांत वेळप्रसंगीं संचार करणाऱ्या रावण–कुंभकर्णांनाच शोभणारीं भाषणें मुंबई काँग्रेसच्या कैफीयतीच्या पुष्टचर्थ होऊन दंडकारण्याचा दाखला जणुं कांहीं या सभेंत सार्थ करून दाखविण्यांत आला. डॉ. गांधी–नरवणे यांनीं आपल्या भाषणांत दाखवून दिल्याप्रमाणें मुंबई काँग्रेसची स्वतंत्र मुंबईची कैफीयत सयुक्तिक, सोपपत्तिक किंवा तर्कशुद्धहि नसल्यामुळें हमरीतुमरीचें अरण्यवक्तृत्व त्यावर माजलें यांत आश्चर्य नाहीं. मुंबई प्रांत जसाच्या तसा राहावा असें या कैफीयतीचें प्रतिपादन आहे; आणि कर्नाटक निराळा झाल्यावर उरलेल्या मुंबई राज्यांत मराठी भाषिकांचें साठ टक्के बहुमत होत असल्यामुळें संयुक्त महाराष्ट्राची आवश्यकता नाहीं असें कैफीयतींत म्हटलें आहे. कर्नाटक वेगळा होण्याला या कैफीयतीची हरकत नाहींसें

दिसतें. कर्नाटक वेगळा झाल्यावर मुंबई राज्य- सह्यांसारखेंच अभंग राहातें काय ? आणि कर्नाटकविरहित मुंबई राज्यांत राहाण्यास गुजराथ तयार आहे काय ? मुंबई राज्याची विभागणी जर झालीच, म्हणजे कर्नाटक जर वेगळा काढण्यांत आला, तर गुजराथी भाषिकांचा महागुजरात निराळा झाला पाहिजे अशी गुजराथ काँग्रेससकट सर्व गुजराथी भाषिक संघटनांची मागणी आहे. महाराष्ट्रीयांचें साठ टक्के बहुमत असलेल्या कर्नाटकविरहित मुंबई राज्यांत राहाण्यास गुजराथ तयार नाहीं असा त्याचा अर्थ आहे. कर्नाटक वेगळा होण्यास मुक्तद्वार ठेवल्यानें राज्यपुनर्रचना होतांच कामा नये या मुख्य प्रतिपादनास बाध येतो. कर्नाटकविरहित मुंबई राज्यांत राहाण्यास गुजराथच तयार नसल्यामुळें कर्नाटकविरहित मुंबई राज्यांतून महाराष्ट्र अलग होऊं नये या प्रतिपादनांत जीव राहात नाहीं; आणि कोणत्याहि परिस्थितींत मुंबई महाराष्ट्राला मिळतां कामा नये एवढ्याच अट्टाहासासाठीं स्वतंत्र मुंबईची मागणी कैफीयतीमध्यें करण्यांत आली आहे, हें उघड होतें. मुंबईवर गुजराथ हक्क सांगत नाहीं, असें श्री. के. के. शहा सांगतात; आणि श्री. सी. सी. शहा महाराष्ट्रांत मुंबई जाण्याविरुद्ध धार कमिशनचा व जवाहर-वल्लभ-पट्टाभि अहवालांचा आधार देतात. गुजराथनें जीव पाखडला तरी गुजराथला मुंबई कदापीहि मिळणार नाहीं हें श्री. के. के. शहा यांना माहीत आहे; त्याचप्रमाणें धारकमिशनचा अहवाल एका आठवड्याच्या अवधींत जयपूर काँग्रेसनें गाडून टाकला व आज पं. नेहरूंचें मुंबईबद्दल आपलें 'ओपन माइंड' आहे असें स्वतःच सांगत आहेत, हें श्री. सी. सी. शहा यांनाहि माहीत आहे. मुंबई गुजराथला मिळत नाहीं म्हणूनच ती स्वतंत्र झाली पाहिजे एवढाच अट्टाहास मुंबई काँग्रेसच्या अहवालांत असून, तो सयुक्तिक, सोपपत्तिक किंवा तर्कशुद्ध नसल्यामुळें या कैफीयतीच्या पुरस्काराकरितां झालेलीं भाषणें दंडकारण्यांतील रावण-कुंभकर्णाची आठवण करून देण्यासारखीं झालीं यांत नवल नाहीं.

मुंबई काँग्रेसच्या बैठकींतील स्वतंत्र मुंबईच्या पुरस्काराच्या भाषणांपेक्षांहि बऱ्याचशा महाराष्ट्रीय सभासदांची गैरहजेरी अधिक जिव्हारीं झोंबण्यासारखी होती. मुंबईचा प्रश्न निघाला कीं, महाराष्ट्रीयेतर सभासद जास्तींत जास्त संख्येंत हजर राहातात आणि महाराष्ट्रीय सभासद गैरहजर राहाण्यांत पुरुषार्थ मानतात ! स्वतंत्र मुंबईबद्दल अनुकूल प्रतिकूल कसेंहि मत असलें तरी तें या सभेंत व्यक्त करणें हें महाराष्ट्रीय सभासदांचें कर्तव्य होतें. श्री. एम्. व्ही. पाटील यांच्याप्रमाणेंच स्वतंत्र मुंबईला विरोध करणारीं मतें बऱ्याच सभासदांचीं असल्यामुळें मुंबईच्या कैफीयतीस अनुकूल मत देण्याचा प्रसंग टाळण्यासाठीं ते सभेसच गैरहजर राहिले हें स्पष्ट आहे. कैफीयतीस उचलून धरण्याचें पाप त्यांनीं टाळलें, पण त्याचबरोबर आपलें जें मत असेल तें ठामपणें सांगण्याचें कर्तव्य न

करण्याचें दुसरें पाप त्यांनीं केलें आहे. सध्यांचा काळ एक प्रकारें आणीबाणीचा आहे. मुंबईच्या व महाराष्ट्राच्या भवितव्यावर कायमचा परिणाम घडवून आणणारे हे दिवस आहेत. यावेळीं कोणीहि कोणत्याहि मोहाला, भीतीला किंवा दडपणाला न मानतां आपलें मतप्रदर्शन केलें पाहिजे, व तसें धैर्य दाखविणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. मुंबई काँग्रेसची कैफीयत व त्यावरील पुरस्काराचीं भाषणें म्हणजे महाराष्ट्रीयांना आव्हान आहे. हें आव्हान तितक्याच दमदारपणानें पत्करलें पाहिजे व मुंबई शहराच्या भवितव्याला नाट लावणाऱ्या या कैफीयतीविरुद्ध मुंबईतील महाराष्ट्रीय काँग्रेसजनांनीं आपलें मतप्रदर्शन करण्यास चुकतां कामा नये. मुंबईतील महाराष्ट्रीय काँग्रेसजन हें आपलें कर्तव्य पीळदारपणानें व बाणेदारपणाने यापुढें पार पाडतील अशी आम्हांस खात्री आहे.

ता. १२–६–५४

मोठीं शहरें आणि गुंडगिरीचा उपद्रव

कलकत्त्याच्या पोलिस खात्यानें शहरांतील गुंडगिरीचें उच्चाटन करण्यासाठीं मोहीम सुरू केली असून त्यासाठीं एक खास पोलिस विभाग काढण्यांत आला आहे आणि गेल्या तीन आठवड्यांत सुमारें सातशें वहिमी गुंडांना तेथें अटक करण्यांत आली आहे. कलकत्त्याची गुंडगिरीबद्दल विशेष प्रसिद्धी असून कसलीहि अस्वस्थता निर्माण झाली कीं, तिचा फायदा उकळण्यास गुंड पुढें येऊन धुमाकूळ माजवितात व नागरिक जीवन अशक्य करून सोडतात असा तेथील अनुभव आहे. ट्राम-गाड्यांत एक पैशाची वाढ झाल्याबद्दल कलकत्त्यांत झालेल्या चळवळीचें दंगलींत रूपांतर होऊन शहर बेबंदशाहीनें ग्रासलें गेलें त्याबद्दलचें किंवहुना कलकत्त्यांतील यापूर्वीच्या अनेक दंगलींचें लोण नेहमीं तेथील गुंडांपर्यंत पोहोंचविण्यांत येत असतें. कलकत्त्याच्या या तोळामासा प्रकृतीबद्दल पं. नेहरूंसकट सहा मोठ्या नेत्यांनीं अनेक वेळां घृणा प्रदर्शित केली आहे. कलकत्त्याचेंच हें गुंडगिरीचें वैशिष्ट्य आहे असें नव्हे. कोणत्याहि मोठ्या शहरांत कांहीं कारणानें प्रक्षोभ उत्पन्न झाला कीं, गुंड त्याचा फायदा घेण्यास पुढें येतात हा सार्वत्रिक अनुभव आहे. इंदूरमध्ल्या

विद्यार्थ्यांच्या चळवळींत गुंड शिरले आणि त्यांनीं आरंभिलेल्या घातपातामुळें पोलिसांना गोळीबार करावा लागून १४४ कलम तेथें जारी करावें लागलें हा ताजा अनुभव आहे. संयुक्त प्रदेशांतील विद्यार्थ्यांच्या चळवळींत गुंडांनीं धुमाकूळ माजविल्यानें त्या चळवळीला दोष आला ही अलीकडचीच घटना आहे. मद्रासच्या द्राविडी चळवळींत असाच उच्छेद तेथील गुंडांनीं मांडला होता. मुंबईसारख्या शहरांत तर दारूबंदीचें यश गुंडगिरीनें ग्रासलें जात असल्याचा बभ्रा असून गुंडगिरी आवरतां येत नसेल तर गुंडगिरीच्या हातीं शहरी जीवन देण्यापेक्षां दारूबंदी आंखडती घ्यावी असें दारूबंदी पुरस्कर्त्यांनाहि वाटण्यासारखी स्थिति आहे. मुंबईंत परळ भागांत गुंडविरोधी आघाडी उघडण्यांत आली असून, गुंडविरोधी परिषदेचें उद्घाटन मुख्यमंत्री ना. मोरारजीभाई देसाई यांनीं केलें होतें, यावरून सर्व शहर व लोक गुंडशाहीला किती कटाळले आहेत हें कळून येणारें आहे. कलकत्ता--इंदूर असो किंवा मुंबई--मद्रास असो, भारतव्यापी संघटना असल्याप्रमाणें गुंडगिरी सर्व मोठ्या शहरांत आहे. किंबहुना शहरें जितकीं मोठीं तितकी गुंडगिरी अधिक असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. शहरें गुंडगिरीनें जणुं कांहीं बुजबुजलेलीं असून त्याविरुद्ध मोहीम संघटित रीत्या सुरू करण्याच्या बाबतींत कलकत्त्याच्या पोलिसांनीं पुढाकार घेतला आहे हें एक शुभ चिन्ह होय असें लोकांना वाटल्यावांचून राहाणार नाहीं.

गुंडगिरीचे अनेकविध उपद्रव शहरी जीवनांत नेहमीं प्रत्ययास येत असतात. एखाद्या चळवळींत गुंडांचा हस्तक्षेप झाला म्हणजे घातपाती अशा भीषण स्वरूपांत सबंध शहर बेबंदशाहींत लोटलें जातें व लोकांचें विशेष लक्ष गुंडगिरीकडे वेधलें जातें. पण नित्याच्या जीवनांतहि गुंडगिरी स्वस्थ असते अशांतला भाग नाहीं. मुंबईसारख्या मोठ्या शहरांत दारूचा चोरटा व्यवहार गुंडांकडून होत असतो. एकटयादुकट्या इसमाला गांठून त्याचें खिसापाकीट सुरीच्या धाकाखालीं तोच खाली करीत असतो. धाकदपटशा दाखवून व्यापारव्यवसाय करणारांकडून निरनिराळ्या निमित्तानें पैसा काढण्याची कला त्याचीच असते. नोकरीधंद्यानिमित्त, विद्याभ्यासाकरितां अगर देवदर्शनाकरितां घराबाहेर जाणाऱ्या भगिनींनाहि सतावण्यामध्यें व विटंबना करण्यामध्यें हीच गुंडगिरी पुढाकारानें असते. सर्व व्यवहार गुंड बेगुमान वृत्तीनें करीत असतो आणि आपला हात धरणारा कोणी नाहीं अशी त्याची जणुं कांहीं खात्री असते. कायदा असतो, पण त्याच्यापुरता तो पुस्तकांत राहातो. पोलिस असतो पण गुंडगिरीचा कारभार उरकल्यावर बहुधा तो पुढें येतो आणि नीतिधर्माच्या कल्पना त्याच्या हारीमोरीहि उभ्या राहात नाहींत. पोलिस हा भीत असो किंवा लोकप्रवादाप्रमाणें गुंडशाहीचा बांधलेला असो, पोलिसाचा उपद्रव गुंडांना फरसा होत नाहीं असें सांगण्यांत येत असतें.

केवळ पोलिस खातें हें गुंडगिरीचें उच्चाटन करूं शकणार नाहीं, लोकांनींच गुंडगिरीचा प्रतिकार संघटित होऊन केला पाहिजे, असें ना. मोरारजीभाई देसाई यांनीं गुंडविरोधी परिषदेंत सांगितलें होतें गुंडांची एखादी टोळी शेंकडों लोकांसमोर ट्राम-मोटारींची जाळपोळ करीत असतांना लोक तो प्रकार उघड्या डोळ्यांनीं व हात जोडून कसा पाहातात असा सवाल पं. नेहरूंनीं अनेकवार केलेला आहे. आपला नित्याचा व्यवसायधंदा सोडून गुंडांच्या भानगडींत पडा कशाला आणि त्यांचें शत्रुत्व व पोलिसखात्याचें लफडें मागें लावून घ्या कशाला, अशी सर्वसाधारण लोकांची वृत्ति असते. त्यामुळें आयाबहिणींची रस्त्यांत टवाळी चाललेली असतांना तो राग गिळतो, धाकदपटशांकडे दुर्लक्ष करतो व कोठें मारपीट होत असली तरी त्या भानगडींत पडत नाहीं. गुन्हे घडूं न देण्याची जबाबदारी ज्या पोलीस खात्यावर त्या पोलीस खात्यानेंच गुंडगिरीचें उच्चाटन करण्याचें कंकण बांधलें पाहिजे आणि तसें बांधलें असल्याची खात्री लोकांना पटली तर लोकांचेंही या कामीं पोलीस खात्याला भरपूर सहकार्य मिळाल्याशिवाय राहाणार नाहीं. कलकत्त्याला अशा प्रकारचा उपक्रम सुरू झालेला असून मुंबईमध्यें व लहानमोठ्या शहरांमध्येंहि कलकत्त्याचा कित्ता लवकरच गिरविण्यांत येईल अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

पोलिसांनीं मनावर घेऊन गुंडविरोधी मोहीम सुरू केल्यास गुंडगिरी आटोक्यांत येण्यास वेळ लागणार नाहीं आणि पोलीस खात्यानें आपलें कर्तव्य पार पाडल्यासारखें होईल यांत संशय नाहीं. पण सर्वसामान्य गुंड ज्या बड्या लोकांच्या हस्तकासारखा वागत असतो त्या बड्यांचा आधार सुटल्यावरच गुंडगिरी खरीखुरी लटकी पडेल हें उघड आहे. थोड्क्या श्रमांत कमींत कमी जबाबदारी घेऊन जास्तींत जास्त पैसा व सुखें हस्तगत करण्याची वृत्ति नेहमींच लोकांमध्यें बलवत्तर असते. आपल्या हाती ज्यांना सत्ता व धन भल्याबुऱ्या मार्गानें खेळवायचें असतें असे धूर्त लोक या सर्वसाधारण वृत्तीचा फायदा घेऊन परभारें गुंडांच्या मार्फत आपला कार्यभाग साधीत असतात आणि त्यांतून गुंडगिरीस भरपूर वाव मिळत असतो हें विसरून चालणार नाही. दुसऱ्या महायुद्धांत काळ्या बाजाराला ऊत आला व तो चालविणाऱ्या बड्या लोकांनी प्राणावर उदार होऊन पोलिसांची भीति न बाळगतां काळ्याबाजाराचा व्यवहार करूं शकणाऱ्या बेडर लोकांना हाताशीं धरलें. आंकफरकाचा धंदा करणाऱ्या बड्यांचा व्यवहार रस्तोरस्तीं पसरलेल्या अशा लोकांच्या हातूनच चालत असतो. दारू पिणारे व गाळणारे श्रीमंत लोक याच लोकांच्या हातून आपला कारभार करीत असतात. पैसा व चैन यांत आपल्या हस्तकांना थोडीफार वांटणी देऊन असले लोक गब्बर होतात व प्रतिष्ठित म्हणून समाजांत वावरत असतात. हातीं घेतलेली चळवळ फसते असें पाहातांच राजकीय पक्षहि गुंडगिरीला वाव देण्यास तयार होतात आणि निवडणुकीसारख्या

प्रकारांत तर गुंड म्हणविणारांस हाताशीं धरण्यांत कांहींच कमीपणा मानण्यांत येत नाहीं. गुंडगिरी कोणास पाहिजे असते, अशांतला भाग नाहीं, पण वेळप्रसंगीं आपल्या सोईकरितां तिचा उपयोग करून घेण्यास मात्र फारच थोडे कचरतात. गुंडगिरीबद्दल एखादी व्यक्ति अडचणींत आल्यास त्याला जामिनावर सोडण्याची, त्याच्या खटल्याखोकल्यांत त्याच्या बचावाची, तो तुरुंगांत गेल्यास त्याचा घरखर्च चालविण्याची, सर्व व्यवस्था झालेली आढळते. गुंडगिरीच्या मुळांचें पोषण समाजाचा कोणता थर करीत असतो हें त्यावरून सहज ध्यानी येतें. लहानमोठ्या शहरांतील गुंडगिरीचें उच्चाटन करण्याचें पोलिस खात्यानें कंकण बांधले पाहिजे, समाजानें संघटित होऊन प्रतिकार केला पाहिजे हें तर खरेंच, पण गुंडगिरीला पोसणारा समाजाचा जो विशिष्ट थर आहे तेथपर्यंतहि सरकारी व सामाजिक उपाययोजनेचें लोण पोहोंचलें पाहिजे म्हणजेच गुंडगिरीचें उच्चाटन होईल, हें उघड आहे.

२३–७–१९५४

भाषिक प्रांतांच्या वाटाघाटींचे रिंगण

राज्यपुनर्रचना कमिशनच्या मुंबईंतील वाटाघाटींचें दुसरें रंगण निरनिराळ्या शिष्टमडळांच्या भेटीगांठीनंतर संपल्यासारखें असून, यानंतर अंतिम स्वरूपाच्या चर्चेस व वाटाघाटींना सुरुवात होईल, असें कमिशनच्या मुंबईंतील कामकाजासंबंधींचे जे अहवाल प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून दिसत आहे कमिशनची प्राथमिक चौकशी संपल्यानंतर प्रांतपुनर्रचनेबद्दलची आपली भूमिका लेखी सादर करण्यास कमिशननें सर्वांना सांगितलें. त्याप्रमाणें सर्व भिन्नविभिन्न निवेदनें कमिशनला सादर झाल्यावर त्या निवेदनांच्या बाबतींत अधिक स्पष्टीकरण करून घेण्यासाठीं व एकमेकांना काटशह देणाऱ्या निवेदनांच्या जंजाळांतून कांहीं सर्वसामान्य मार्ग निघतो काय, हें पाहाण्यासाठीं सांप्रत कमिशनच्या वाटाघाटींचें दुसरें रंगण सुरू आहे. मध्यप्रदेश, हैद्राबाद कर्नाटक, वगैरे भागांत कमिशनच्या वाटाघाटीची दुसरी अवस्था पुरी झाली असून, मुंबईनंतर पुण्यांत गेल्यावर महाराष्ट्रांतील

निवेदनांबाबतच्या वाटाघाटीहि पुऱ्या होणार आहेत. कमिशनला केवळ न्यायान्यायाचा तराजू हातीं धरून या निवेदनांबाबत निर्णय घ्यावयाचा असता तर मध्यंतराच्या स्वरूपाच्या सध्यांच्या वाटाघाटी व त्यानंतर निर्णायक स्वरूपाच्या वाटाघाटी करण्याचेंहि प्रयोजन नव्हतें. आपल्यासमोर ठेवण्यांत आलेला प्रश्न अतिविकट असा असून तो सलोख्यानें, सामोपचारानें व समजुतीनें सोडविण्यावर कमिशनची भिस्त दिसते. आपल्यासमोर आलेल्या शिष्टमंडळांना पिंजऱ्यांतील साक्षीदारासारखें उलटसुलट तपासणीच्या कात्रींत न धरतां, शिष्टमंडळाचें साहाय्य आपल्या समोरचा प्रश्न सोडविण्याबाबत व्हावें अशी अपेक्षा कमिशनकडून व्यक्त करण्यांत येत आहे आणि त्याच खेळीमेळीच्या वृत्तीनें शिष्टमंडळांशीं वाटाघाटी कमिशन करीत आहे असें दिसतें. अर्थातच कमिशनसमोर होणाऱ्या सवाल जबाबांवरून कोणताच निष्कर्ष काढतां येण्यासारखा नसला तरी कोणाला नाराज होण्याचेंहि कारण पडत नाहीं व प्रत्येक शिष्टमंडळ प्रमुदित मनानें व हसतमुखानें कमिशनसमोरून मागें परतत आहे असें दृश्य सांप्रत दिसत आहे.

मंगळवार रोजीं मुंबईंत कमिशनसमोर संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या निवेदनावर वाटाघाट झाली आणि आदले दिवशीं व मंगळवारीं स्वतंत्र मुंबईवाल्यांच्या निवेदनांचीहि चर्चा झाली. संयुक्त महाराष्ट्र म्हणतांच भाषावार प्रांतरचनेबाबतचे सर्वच प्रश्न आ वासून पुढें उभे राहातात इतका हा व्यापक व मूलगामी प्रश्न आहे. मध्यप्रदेशांतील महाविदर्भाची मागणी, हैद्राबादचें विभाजन, मुंबईचें स्थान, त्याचप्रमाणें सरहद्दी ठरविण्याचें तंत्र अशा अनेक प्रश्नांचा समाधानकारक निरास झाल्यावर संयुक्त महाराष्ट्र गुण्यागोविंदानें निर्माण होणारा आहे. हैद्राबादच्या दौऱ्यांत हैद्राबादचें विभाजन करण्यास सर्वच उत्सुक आहेत असें दिसून आलें, पण विभाजित भाषिक विभाग स्वतंत्र प्रांत म्हणून नांदावेत कीं भाषिक राज्यांत ते समाविष्ट व्हावेत यासंबंधीं तेथें वाद आहेत. मराठी भाषिक महाराष्ट्रांत जाण्यास सर्वतोपरी अनुकूल असले तरी महाविदर्भाचे पुरस्कर्ते मराठवाड्यावर हक्क सांगत आहेत. मध्यप्रदेशांत संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्ते अगणित असले तरी महाविदर्भवाल्यांनीं तेथें कंबर कसली आहे आणि महाविदर्भास धार कमिशननें वरदहस्त दिल्यापासून महाविदर्भाची कांहींशी चलती तेथें आहे. बेळगांवसारख्या द्विभाषिक भासणाऱ्या भागांचा प्रश्न कसा सोडवावा हा बिकट प्रश्न कर्नाटकच्या बाबतींत आहे, आणि मुंबई स्वतंत्र ठेवण्यासाठीं धनिक वर्गानें जिवाचें रान मांडलें आहे. संयुक्त महाराष्ट्राची कैफीयत संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें इतकी बिनतोड तयार केली आहे कीं, केवळ युक्तिवाद व न्याय एवढ्या दृष्टीनें पाहिलें तर संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या कैफीयतींत बोट शिरकविण्यास जागा नाहीं. पण राज्यपुनर्रचना करतांना घ्यावयाच्या कसोट्या, न्याय, युक्तिवाद यांपेक्षांहि

कमिशन सर्वांचेंच समाधान कसें होईल अशा दृष्टिकोनांतून विचार करीत असलेलें दिसत आहे. महाविदर्भवाल्यांचें समाधान कसें करावें, मुंबईचा प्रश्न गुण्यागोविंदानें सुटण्यासारखा आहे किंवा नाहीं, मराठवाड्याचें त्रांगडें कसें सोडवावें, अशा विवंचनेंत कमिशन दिसत असून त्या कामीं भेटीस येणाऱ्या शिष्टमंडळांशीं कमिशनचे विचारविनिमय सुरू दिसतात. चांचपणीवजा प्रश्न कमिशन निरनिराळ्या शिष्टमंडळांना टाकीत असून त्यांचें मत अजमावून पाहात आहे आणि या चांचपणीवजा रंगणाची परिपूर्ति झाल्यावर निर्णायक वाटाघाटींसाठीं निरनिराळ्या शिष्टमंडळांच्या निवडक लोकांना कमिशनकडून पुन्हा पाचारण व्हावयाचें आहे.

कमिशननें आपल्या मुंबईच्या बैठकींत मुंबईचा प्रश्न वाटाघाटीच्या मार्गानें सोडवावा अशी सूचना संयुक्त महाराष्ट्रवाद्यांना केली असून, तशीच सूचना स्वतंत्र मुंबईवाल्यांनाहि त्यांनीं केली असेल असें धरून चालण्यास हरकत नाहीं. विदर्भ नेत्यांशीं महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनीं केलेल्या अकोला करारांत उपप्रांत विदर्भाला बहाल करण्याची जी व्यवस्था होती तशाच व्यवस्थेच्या अनुरोधानें महाविदर्भवाल्यांची समजूत घालण्याचा विचार महाराष्ट्र नेत्यांनीं करावा अशीहि सूचना कमिशननें केल्याचें प्रसिद्ध झालें आहे. भारतीय घटनेंत उपप्रांतांची सोय जर लावतां आली तर महाराष्ट्र–महाविदर्भवाल्यांचें भांडण तुटेल आणि उपप्रांताचा दर्जा मुंबईला दिला तर मंबईचाहि वाद राहाणार नाहीं, इतकेंच नव्हे तर अशांसारखेच राज्यपुनर्रचनेबाबतचे अनेक कटकटीचे प्रश्न या एका दगडांत निकालांत निघतील असा कमिशनचा रोख दिसत आहे. विदर्भाला महाराष्ट्रीय नेत्यांनीं अकोला करारान्वयें उपप्रांत देऊं केला पण भारतीय घटना तयार होत असतांना घटनेंत उपप्रांतांची सोय लावण्याच्या बाबतींत महाराष्ट्र नेत्यांनीं कांहीं हालचाल केली नाहीं, व त्यावरून त्यांचें उपप्रांताचें अकोला करारांतील आश्वासन मनापासून नव्हतें असा श्लेष लोकनायक अणे यांनीं आपल्या महाविदर्भाच्या कैफीयतींत काढलेला आहेच. उपप्रांताचा तोडगा कमिशन जो सूचित करीत आहे तो भारतीय लोकसभेला कितपत मान्य होईल हा प्रश्न आहेच, पण तो मान्य झालाच तरी अनेक कटकटी त्यांतून निर्माण होऊन रोगापेक्षां उपाय भयंकर असें म्हणण्याची पाळी येईल, असा संभव आहे. राज्यांत उपराज्यांची तरतूद म्हणजे एकाच जागेंत अनेक चुली मांडण्याची सवलत होय. एकदां स्वतंत्र चुलीची व्यवस्था मान्य केली कीं, ती कोणास द्यावी व कोणास नाकारावी असा अनवस्था प्रसंग उपस्थित होऊन, नव्या भांडणतंटयास व दावेदारीस सुरुवात होण्याचा धोका आहे. असले फांटे फोडून बसण्यापेक्षां राज्यरचना कमिशन नेमतांना सांगण्यांत आलेल्या कसोट्या व पुढें येणाऱ्या मागण्यांची संयुक्तिकता व न्याय यांचाच कमिशननें विचार करून निर्णय घेणें इष्ट ठरेल. कमिशननें सलोखा करण्याचाच

आग्रह धरणें म्हणजे युनोनें काश्मीरचा प्रश्न न्यायान्यायापेक्षां सलोख्यानें सोडविण्यास भारताला सांगण्यासारखेंच आहे. राज्यपुनर्रचना करतांना कटुता नसावी हें तर खरेंच, पण ती टाळण्याच्याच केवळ नादीं लागून न्याय्यान्याय्य व सांगण्यांत आलेल्या कसोटया यांना धाब्यावर बसविण्यापेक्षां न्याय व संयुक्तिकता यांवरच कमिशननें अधिक भिस्त ठेवली तर तें योग्य ठरेल.

२६-८-१९५४

भारताचा मानदंड पं. नेहरु

पं. नेहरु यांचा ६५ वा वाढदिवस सर्व भारतांत मोठया उत्साहानें साजरा होत असून, पं. नेहरु आणि स्वतंत्र भारत यांच्यामध्यें एक प्रकारचें अभिन्नत्व असल्यामुळें पं. नेहरूंचा वाढदिवस देश-परदेशांत जो साजरा होत आहे तो एक प्रकारें भारताचाच उत्सव आहे असें म्हटलें पाहिजे. पं. नेहरु यांनीं भारतीय स्वातंत्र्याचा लढा महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं अत्यंत तेजस्वीपणानें, कणखरपणानें व वीर वृत्तीनें दिला आणि भारत स्वतंत्र होतांच नवभारत निर्मितीची जबाबदारी त्यांनीं तितक्याच वीर वृत्तीनें स्वीकारून ती यशस्वी रीतीनें ते पार पाडीत आहेत.

लढवय्या व राष्ट्रनिर्माता या दोनहि नात्याचे गुण क्वचितच एका व्यक्तींत सामावलेले आढळतात. किंबहुना लढवय्या हा राष्ट्रनिर्मितीच्या कसोटींस पुष्कळदां उतरत नाहीं असा अनुभव देशोदेशींच्या इतिहासांत आढळून येतो. निस्तेज पडलेले स्वातंत्र्यवीर व किंकर्तव्यमूढ झालेले क्रांतिकारक दुसऱ्या महायुद्धानंतर युरोप-आशियामध्येंच दिसत आहेत असें तव्हे, तर भारतांतहि कमीअधिक प्रमाणांत तो अनुभव येत असतो. पेटता धगधगणारा निखारा हा कालांतरानें राखेचा ढेंपसा बनतो, व आकाशांत तेजानें चमकणारा तारा आपली पराकाष्ठा केल्यावर भूमितलावर शिलाखंड बनून कोठें तरी पडून राहातो हा नित्याचा अनुभव आहे. प्रलय

माजविण्याच्या श्री शंकराच्या शक्तीं व नव्या उभारणीच्या श्री विष्णूच्या शक्ती यांचा मिलाफ इतिहास–पुराणांतहि आढळत नाहीं. या दोनही शक्ती व दृष्टी यांचा समन्वय करूं शकणारी व्यक्ति ही अलौकिक मानली जाऊन अशा व्यक्तिमत्वावर सर्वसाधारण जनता वेडी व्हावी यांत नवल नाहीं. पं. नेहरूंनीं भारताच्या स्वातंत्र्य लढ्याच्या काळांत अलौकिक पराक्रम गाजवून ब्रिटिश सिंहाची आयाळ पकडली व त्याला भारताबाहेरचा रस्त दाखविला. ते कार्य जितकें लोकोत्तर त्याहीपेक्षां स्वतंत्र भारताची नव्यानें उभारणी करणें हें कार्य अत्यंत दुष्कर होतें. महात्माजींच्या तालमींत तयार झालेल्या सरदार–राजाजी–राजेंद्रांसारख्या कर्तबगार नेत्यांचा गट स्वातंत्र्योत्तर पं. नेहरूंच्या नेतृत्वाखालीं या कामीं लागला. स्वातंत्र्य-लढ्यांत पं. नेहरूंचे हात गुंतलेले असतांनाच पं. नेहरूंची विधायक बुद्धि भारताच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कर्तबगारीची जणुं कांहीं जुळणी करीत होती, असें स्वातंत्र्यलढ्याच्या काळांतील त्यांचे विचार पाहिले असतांना आढळून येतें.

भारतावरील परदेशी राजवटीचें दडपण दूर होतांच अनेक शुभाशुभ व सुष्टदुष्ट शक्तींना मुक्तद्वार मिळालें आणि जर योग्य नेतृत्व भारताला लाभलें नसतें तर या शक्तींच्या आपापसांतील धुमश्चक्रींत भारत कोणत्या स्थितीला गेला असता याची कल्पनाहि करवत नाहीं. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेले कित्येक देश आशियांत व युरोपांत यादवींत पिचत आहेत, नव्या स्वरूपांतील गुलामगिरींत सापडलेले आहेत असें आढळून येतें. भारतांतहि फाळणीनंतरचा रक्तपात व महात्माजींचा खून या घटनांनी स्वातंत्र्योत्तर काळांत कोणत्या दुष्ट शक्ती भारताला पछाडूं पाहात आहेत हें दिसून आलें. दुष्ट शक्ती जेथल्या तेथें दडपून नवराष्ट्रनिर्मितीला उपकारक शक्ति संघटित व कार्यान्वित करण्याचें महान कार्य स्वतंत्र भारतापुढें उभें होतें आणि जर त्या घडीस कालोचित नेतृत्व भारताला लाभलें नसतें तर स्वातंत्र्याबद्दलचीं चर्चीलसारख्यांचीं अभद्र भविष्यें वास्तवांत उतरल्याशिवाय राहिलीं नसतीं. स्वातंत्र्यकाळांतील पहिलें हलाहल भारतानें पचविलें व विधायक प्रज्ञेनें आज भारत नवजात राष्ट्रांमध्यें अग्रपूजा पावत आहे, त्याचें एकमेव श्रेय पं. नेहरूंना आहे. नवभारताचे निर्माते या नात्यानें पं नेहरूंकडे भारतच नव्हे तर सर्व जग पाहात असून त्यांचा ६५ वा वाढदिवस हा मंगलोत्सव म्हणून साजरा व्हावा हें स्वाभाविक होय.

स्वतंत्र भारताच्या उभारणीचें कार्य पं. नेहरूंनीं कोणाहि राष्ट्रानें तोंडांत बोट घालावें अशा धडाडीनें चालविलें आहे, आणि लोकशाहीचा निष्ठापूर्वक आश्रय करूनहि राष्ट्राच्या विधायक शक्ती आपखुषीनें राष्ट्राचा कायापालट करूं शकतात हें पं. नेहरूंच्या पुढाकाराखालीं भारतानें दाखवून दिलें आहे. व्यक्तीची

महत्त्वाकांक्षा व स्वातंत्र्य यांचा चेंदामेंदा करून नियंत्रित सत्ता प्रस्थापित केल्याशिवाय कोणत्याहि राष्ट्राचा झपाट्यानें कायापालट होऊं शकत नाहीं, अशी भावना अलीकडे जगभर पसरूं पाहात आहे. हिटलर–मुसोलिनीनें एका तपाच्या अवधींत सर्व जगाला आव्हान देण्याइतकें बळ आपल्या देशांत निर्माण केलें, स्टॅलिननें हिटलरला चुरडण्याचें रशियाचें सामर्थ्य प्रकट केलें, आणि जपाननें आशियांतील युरोपियन सत्तेचें मूळच चार महिन्यांच्या लढाईंत उखडलें. बलशाली देश बनवून त्याचा कायापालट करावयाचा तर त्यासाठीं लोकशाही कुचकामी असून, सर्वाधिकारी अनियंत्रित सत्ताच त्यासाठीं पाहिजे असें लोकशाही राष्ट्रांतहि बोललें जातें. नवभारताच्या उभारणीचें काम जें आज भारतांत सुरू आहे त्या योगें हा भ्रम दूर होण्यास मदत झाली असून, लोकशाही राष्ट्रेंहि योग्य नेतृत्वाखालीं जनतेच्या शक्ती स्वेच्छापूर्वक कार्यान्वित करूं शकतात व अभ्दुत कर्तृत्व दाखवूं शकतात हें पं. नेहरूंच्या नेतृत्वाखालीं भारतानें दाखवून दिलें आहे. राष्ट्रीय उभारणीचें काम सुरू असतां जागतिक उचापती करण्यास सहसा कोणतेंहि राष्ट्र धजत नाहीं. पण पं. नेहरूंनीं आपली विशाल दृष्टि देशापुरतीच केंद्रित न ठेवतां नवजात राष्ट्रांना प्राणवायूसारखी जो जागतिक शांतता ती टिकविण्यासाठीं नवनवोन्मेषशाली प्रज्ञेनें आंतरराष्ट्रीय शांतताक्षेत्र निर्माण केलें असून हें क्षेत्र त्यांच्या पुढारीपणाखालीं दिवसानुदिवस विकास पावत आहे. आज नवजात राष्ट्रांचा आवाज पं. नेहरूंच्या मुखानें प्रभावी झालेला असून, त्याची अवगणना बडींबडीं म्हणविणारीं राष्ट्रेंहि करूं शकत नाहींत, अशी प्रतिष्ठा भारताला पं. नेहरूंनीं प्राप्त करून दिली आहे. स्वातंत्र्यकाळांतील कार्य, स्वातंत्र्योत्तर नवभारताच्या निर्मितीचें कार्य व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत जागतिक शांततेचा अग्रदूत या पदवीला भारताला नेण्याचें कार्य पं. नेहरूंनीं जें पार पाडलें आहे तें पाहिलें असतां त्यांच्या अभ्दुत नेतृत्वाबद्दल लोकांची प्रेमादर बुद्धि वाढदिवसप्रसंगीं उचंबळून आली नसती तरच तें नवल ठरलें असतें.

पं. नेहरूंचा ६५ वा वाढदिवस साजरा करतांना नेहरु परंपरा कायम राहाण्याची निकड लोकांना पटविण्यासाठीं त्यांनीं अधिकारवस्त्रें उतरण्याचा जो पवित्रा नुकताच घेतला होता त्याची आठवण लोकांना होणें क्रमप्राप्त आहे. पंडितजींचें आरोग्य व प्रकृतिमान इतकें उत्तम आहे कीं, साठी उलटून ते सत्तरीच्या नजीक जात आहेत असें मुद्दाम मनांत आणल्याशिवाय कोणाला वाटणारहि नाहीं पं. नेहरु शतायु होवोत व भरभराटलेल्या समाजवादी भारताचीं व जागतिक शांततेचीं स्वप्नें त्यांच्या डोळ्यांदेखत वास्तवांत उतरोत, अशीच भारताची त्यांच्या वाढदिवसप्रसंगीं परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. पं. नेहरु हे अद्वितीय नेते आहेत, पण त्यांची जागा घेणारें नवें नेतृत्व उदयास आलेलें कोठें दिसत नाहीं ही

वस्तुस्थिति आहे आणि याबद्दलचा बोल सर्वांपेक्षां दहा अंगुळें वरच्या वातावरणांत राहाण्याची पंडितजींची जी अलिप्त प्रकृति आहे त्यावर ठेवण्यांत येतो. पण हा बोल पं. नेहरूंकडे जात नसून लोकांकडेच जातो. प्रत्येकाच्या कर्तबगारीस आज भारतांत दाही दिशा मोकळ्या आहेत. परंतु पंडितजींवर सर्व भार टाकून राहाण्याची वृत्ति नवें नेतृत्व निर्माण होण्याच्या आड येत आहे. पं. नेहरूंना स्वतःलाहि ही वस्तुस्थिति दुःसह अशीच आहे. पं. नेहरूंना जनतेचें जें आत्यंतिक प्रेम आहे त्याची परिणति पं. नेहरूंच्या ठिकाणचें हें शल्य दूर करण्यांत व नेहरुपरंपरा भारतांत स्थिर होण्यांत झाली पाहिजे. त्यांतच त्यांच्या वाढदिवसाचें सार्थक आहे. पंडितजींच्या वाढदिवसप्रसंगीं नेहरु-परंपरेची प्रस्थापना होऊन त्यांना सलणारें शल्य दूर होईल अशी आशा आहे.

१४–११–१९५४

अनेकांचे हात लागून मुंबईचा विचका

मुंबई कॉर्पोरेशननें दिलेल्या मानपत्राचा स्वीकार करतांना भारताचे अर्थमंत्री ना. चिंतामणराव देशमुख यांनीं आगामी पंचवार्षिक योजनेबद्दलच्या शंकाकुशंकांचा निरास केला आणि त्याचबरोबर मुंबईच्या भवितव्याच्या प्रश्नाचाहि ओझरता पण अत्यंत अर्थगर्भ उल्लेख केला. मुंबईच्या भवितव्याचा असा एकच प्रश्न आहे कीं, ज्याबद्दल जास्तींत जास्त लोकांना चिंता वाटत आहे आणि जास्तींत जास्त पातळीवर त्याची चिकित्सा होत आहे असें त्यांनीं सांगून टाकलें आहे. वास्तविक पाहतां मुंबईचें भवितव्य हा सर्वांचेंच डोकें उठवणारा घोर प्रश्न ठरण्याचें कारण नाहीं. राज्यपुनर्रचना कमिशन जीं सर्वसामान्य तत्त्वें राज्यपुनर्रचनेबाबत ठरवील आणि मद्रास–कलकत्त्यासारख्या शहरांना जो न्याय राज्यपुनर्रचनेबाबत लागू होईल तोच न्याय मुंबईस लागू होऊन मुंबईचें भवितव्य ठरलें पाहिजे. सर्वस्पर्शी तत्त्व आणि त्याची अंमलबजावणी करण्याची

जी रीत ठरेल तीच मुंबईला लागू, असें ठरल्यावर मद्रास-कलकत्त्याइतपतच मुंबईच्या भवितव्याच्या प्रश्नाचें महत्व मानलें गेलें पाहिजे व या साऱ्या शहरांचें जें होईल तेंच मुंबईचें झालें पाहिजे. पण अर्थमंत्री ना. देशमुख यांच्या अर्थगर्भ उद्‌गारांवरून सर्वसामान्य सिद्धान्तांना धरून मुंबईचा प्रश्न सोडविला जाईलच असें दिसत नाहीं. जास्तींत जास्त लोकांना या प्रश्नाची डोकेंदुखी जाणवत आहे आणि सर्वच पातळींवर त्याचा विचार सुरू आहे असें ना. देशमुख म्हणतात. किंबहुना हा प्रश्न ज्या प्रकारें सुटेल त्यावर अनेक गोष्टी अवलंबून आहेत असें ते म्हणतात. कोणत्याहि प्रश्नांत अनेकांचे हात आले आणि जेथें तेथें त्याची वाच्यता होऊं लागली कीं, साधे सरळ प्रश्नहि अत्यंत किचकट व गुंतागुंतीचे होतात व त्या प्रश्नांचा विचका उडून जातो. ना. देशमुख यांचे ओझरते उद्‌गार अशाच प्रकारचा विचका मुंबईच्या भवितव्याबाबत शक्य असल्याचें सूचित करीत आहेत अशी भीति वाटते. सर्वसामान्य मुलीबाळी वयांत येतांच त्यांचीं लग्नें होऊन त्या संसारकार्याला लागतात व त्यांना मुलेंबाळें होऊन जातात. पण राजकन्येचा विवाह मात्र अनेक हात व अनेक प्रश्न मध्यें येऊन इतका गुंतागुंतीचा होतो कीं, योग्य वयांत लग्न होऊन ती संसाराला लागतांना पंचाईत होते. मुंबापुरीची आज अशीच कांहींशी दशा असल्याचें ना. देशमुखांच्या उद्‌गारांवरून दिसत असून, अनेकांचे हात मुंबईच्या प्रश्नांत घोळून नसता विचका न होवो, असें म्हणण्याची पाळी आलेली दिसत आहे.

मुंबईचें भवितव्य कसें ठरतें यावर पुष्कळशा गोष्टी अवलंबून आहेत, किंबहुना मुंबईच्या प्रश्नावर इतर अनेक प्रश्न अवलंबून आहेत असें ना. देशमुखांनीं सांगितलें आहे. मुंबईबद्दलचा ना. देशमुखांनीं केलेला ओझरता उल्लेख इतका संदिग्ध आहे कीं, परमेश्वरी संचार अंगीं झालेल्या व्यक्तीचे उद्गार ज्याप्रमाणें अनेक अर्थ सूचित करतात आणि कोणतीहि घडणारी गोष्ट त्या आधिदैविक उद्गारांत बसूं शकते, त्याप्रमाणें ना. देशमुखांच्या विधानांतून पाहिजे तसे अर्थ काढतां येतील आणि अनेक प्रकारची गुंतागुंतहि त्यायोगें लोकांच्या मनांत उत्पन्न झाल्यास तें स्वाभाविक ठरेल. मुंबई शहर हें भारतांत अग्रगण्य असून मुंबईच्या हातीं एक प्रकारें भारताच्या उद्योगधंद्यांची शेंडी आहे, किंबहुना आगामी पंचवार्षिक योजनेचें यशापयशहि मुंबई खूप असण्यावरच अवलंबून असल्याप्रमाणें ना. देशमुख यांचें एकूण भाषण वाटतें. प्राप्तिकर, आयातकर, उद्योगधंद्यांवरचा कर, यांचें जास्तींत जास्त उत्पन्न भारत सरकारला मुंबईकडून मिळतें. येती पंचवार्षिक योजना औद्योगीकरणप्रधान असून खाजगी उद्योगधंदेवाल्यांकडून जी कामगिरी या योजनेंत अपेक्षिली आहे तिची मदार मुंबईवर बरीचशी असल्यास त्यांत नवल नाहीं. समाजवादी समाजरचनेचा आदर्श जरी भारतासमोर असला तरी त्यायोगें

कोणी बिचकून जाण्याचें कारण नाहीं, असें श्री. देशमुख आपल्या भाषणांत सांगत होते आणि मुंबईच्या उद्योगपतींना चुचकारून जणुं कांहीं त्यांचा रुसवा काढीत होते. खाजगी उद्योगधंद्यांतील हितसंबधांना जरासाहि धक्का लागतां कामा नये असा ज्याप्रमाणें उद्योगपतींचा हट्ट आहे, त्याचप्रमाणें मुंबई ही भाषिक राज्यांत जातां कामा नये यावरहि उद्योगपति तटून बसलेले आहेत. ना. देशमुखांनीं मुंबईच्या भवितव्याचा ओझरताच उल्लेख केला आणि हा प्रश्न एकहातीं मोकळा करण्यांत येणार नसून अनेकांचे हात त्यांत आहेत व अनेक दृष्टींनीं त्याचा विचार होणार आहे असें सांगून याहि बाबतींत त्यांनीं उद्योगपतींनाच चुचकारलें आहे असें वाटल्यावांचून राहात नाहीं.

मुंबईच्या प्रश्नाच्या सोडवणुकीवर इतर अनेक प्रश्न अवलंबून आहेत असें ना. देशमुखांनीं सांगितलें व त्यांत काडीमात्रहि अतिशयोक्ति नाहीं. राज्यपुनर्रचनेच्या सर्वसामान्य सिद्धान्ताप्रमाणें मुंबई ही महाराष्ट्रांतच समाविष्ट झाली पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. तसा निर्णय घेतल्यामुळें आकाश कोसळून पडणार आहे किंवा प्रलयकाळ ओढवणार आहे अशांतला भाग नाहीं. किंबहुना समाजवादी समाजरचनेच्या या घोषणेनें भिऊन जाऊन गांगरण्याचें कारण नाहीं असें ज्याप्रमाणें ना. देशमुखांनीं सांगितलें आहे तेंच राज्यपुनर्रचनेबाबत व मुंबईचा समावेश महाराष्ट्रांत होण्यासहि लागू आहे. प्रत्यक्ष अनुभव व तर्कशुद्धता यांचा निर्वाळा ज्याप्रमाणें समाजवादी समाजरचनेच्या ध्येयाबाबत ना. देशमुखांनीं दिला आहे तसाच मुंबईच्या स्वाभाविक परिणतीबाबतहि त्यांनीं देणें उचित ठरलें असतें. राज्यपुनर्रचनेच्या सर्वसामान्य तत्त्वांना अपवाद म्हणून मुंबईचा प्रश्न हाताळण्यांत येऊन अनुभव व तर्कशुद्धता यांना विपरीत असा निर्णय घेण्यांत आला तर मात्र अत्यंत घातुक परिणाम झाल्यावांचून राहाणार नाहीं. तत्त्व, न्याय, नीति यांच्यापेक्षां धनिक वर्गाची प्रसन्नता हीच भारतांत प्रधान असल्याची भावना मुंबईबाबत भलता निर्णय घेतला गेला तर मराठी भाषिकांतच नव्हे तर उभ्या भारतांत पसरून, पंचवार्षिक योजना किंवा इतर कोणतीहि योजना यांच्याबाबत सर्वसामान्य जनता उदासीन झाल्याशिवाय राहाणार नाहीं. मुंबईचा निर्णय कोणत्याहि पातळीवरून व कोणाशींहि विचारविनिमय करून घेतांना सर्वसामान्य लोकांमध्यें उदासीनता उत्पन्न होणार नाहीं अशी खबरदारी अत्यंत महत्त्वाची असून, मुंबईच्या प्रश्नाच्या सोडवणुकीवरच भारतांतील सर्व आगामी घडामोडींचें यशापयश अवलंबून आहे यांत संशय नाहीं.

१–७–१९५५

मुंबईचा हरताळ व राज्यपुनर्रचना कमिशन

मुंबईला गोवा हुतात्म्यांबद्दल दुखवटा व्यक्त करण्याकरितां व गोवा अत्त्याचारांचा निषेध करण्याकरितां ता. १६ रोजीं जो हरताळ पडला त्या हरताळांतील अतिरेकांचा निषेध पं. नेहरु यांनीं संयुक्त प्रदेश काँग्रेसच्या बैठकींत व्यक्त केला हें स्वाभाविक आहे. पण हा हरताळ म्हणजे राज्यपुनर्रचना कमिशनच्या अहवालानंतरच्या प्रकारांची ही रंगीत तालीम होती असे उद्‌गार हरताळांतील अनिष्ट प्रकारांचा निषेध करतांना त्यांनीं काढल्यामुळें भाषिक राज्यांच्या पुरस्कर्त्यांमध्यें स्वाभाविकच एक प्रकारची अस्वस्थता माजली आहे. आणि श्री. काकासाहेब गाडगीळ यांच्या नेतृत्वाखालीं एक शिष्टमंडळ पं नेहरूंना भेटून त्यांच्या या विधानाबद्दल चर्चा करणार आहे असें प्रसिद्ध झालें आहे. १९२९ सालीं मुंबईंत दंगे झाले त्यावेळीं हे दंगे म्हणजे कम्युनिस्ट उठावाची रंगीत तालीम होय असा गवगवा विलायतेंत करण्यांत आला होता, व नंतर सुप्रसिद्ध मीरत खटला कम्युनिस्ट नेत्यांवर झाला. त्याची अधिवेशन शब्दसादृश्यामुळें एखाद्याला झाल्यास त्यांत नवल नाहीं. ता. १६ च्या हरताळाला जें हुल्लडीचें स्वरूप आलें तें अनिष्ट होय यांत शंका नाहीं पण एखाद्या पक्षाच्या प्रेरणेनें पूर्वनियोजनाला धरून हे प्रकार झाले असें म्हणणें हा मात्र वस्तुस्थितीचा विपर्यास ठरतो. गोवा सत्याग्रहापूर्वी ता. १२ रोजीं मुंबईच्या गोवा विमोचन साहाय्यक समितीनें हरताळ पुकारला होता, पण या हरताळास गिरणगांवापलीकडे मुंबईंत फारसें यश आलें नव्हतें; हें लक्षांत घेतां ता. १६ चा हरताळ हा कोणा विशिष्ट पक्षाच्या चिथावणीनें किंवा आंखणीबरहुकूम झाला असें म्हणतां येणार नाहीं. ता. १५ च्या गोव्यांतील अत्त्याचारांमुळें जनतेचीं मनें अत्यंत क्षुब्ध झालीं होतीं व या प्रक्षोभाला मार्गदर्शन करण्याची ताकद कोणत्याच पक्षाच्या किंवा संघटनांच्या हातीं नव्हती. त्यामुळें गोवाविरोधी भावनांना भलते फांटे फुटून अनिष्ट प्रकारहि घडले, असें म्हणणें वस्तुस्थितीला धरून होईल. पूर्वनियोजनाशिवाय रंगीत तालीम होत नाहीं आणि तशीहि होण्यास परिस्थितीवर संपूर्ण काबू असावा लागतो. तशी वस्तुस्थितीच ता. १६ च्या हरताळाबाबत नव्हती. लोकांच्या प्रक्षोभाचा उपयोग आयत्यावेळीं एखाद्या पक्षानें करून घेतला असें फार तर म्हणतां येण्यासारखें असलें, तरी सचिवालयावर मोर्चा नेतां यावा म्हणून हरताळ पाडण्यांत आला असें म्हणणें हा विपर्यास ठरेल. भडकलेल्या ज्वालांवर एखादा आपली विडी पेटवून घेत असेल, पण विडी पेटवितां यावी या हेतूनें ज्वाला भडकविण्याची ताकद अशा व्यक्तीच्या ठिकाणीं आहे असें

त्यावरून म्हणतां येणार नाहीं. ता. १६ च्या हरताळांतील प्रकार कितीहि अनिष्ट असले तरी ते पूर्वनियोजित व आंखणीबरहुकूम घडून आले होते व ती एक रंगीत तालीम होती, असें म्हणणें म्हणजे अदब्याला पदवी देण्यासारखें तर आहेच; पण हरताळास कारणीभूत झालेल्या लोकांच्या उत्स्फूर्त भावनांचाहि तो एक प्रकारें अधिक्षेप आहे.

राज्यपुनर्रचनेचा अहवाल आतां अगदीं तोंडाशीं आला असून कमिशनच्या नेमणुकीनंतर व चौकशीच्या काळांत या प्रश्नाचें संपूर्ण मथन होऊन लोकमताला निश्चित आकार आला आहे, आणि कमिशनच्या अहवालांत कोणत्याहि शिफारसी असल्या तरी त्यायोगें कोणता ना कोणता तरी लोकसमूह दुखविला जाऊन प्रक्षुब्ध होणार हें निश्चित आहे. त्यामुळें अहवालानंतरच्या परिस्थितीबद्दल पं. नेहरूंना एक प्रकारची अस्वस्थता वाटत असावी हें स्वाभाविक आहे. ता. १५ ऑगस्ट रोजीं स्वातंत्र्यदिनानिमित्त लाल किल्ल्यावरून भाषण करतांनाहि पं. नेहरूंनीं याबाबतची चिंता व्यक्त केली होती आणि कमिशनच्या अहवालांतील शिफारसींचा शांत चित्तानें विचार करून भावनावश न होण्याची गंभीर सूचना त्यांनीं दिली होती. राज्यपुनर्रचना कमिशनच्या नेमणुकीनें लोकांच्या अपेक्षा साकार व संघटित झाल्यामुळें या अपेक्षा जर पुऱ्या झाल्या नाहींत व भलताच प्रकार जर कमिशनच्या अहवालांत आढळला तर एक प्रकारची वैफल्याची भावना पसरून आततायी कृत्यांस लोक प्रवृत्त होतील अशी विवंचना पं. नेहरूंना वाटत असेल तर ती वाजवी आहे असें म्हणतां येणार नाहीं. राज्यपुनर्रचना कमिशन हें सर्वोच्च असल्याचा गवगवा प्रारंभींच्या काळांत कितीहि झाला असला तरी कमिशनचा अहवाल म्हणजे शेवटचा शब्द खास नव्हे! कमिशनचा अहवाल सादर झाल्यावर छाननी मध्यवर्ती सरकार करणार, त्यानंतर लोकसभा कौल देणार, आणि लोकसभेच्या ठरावाप्रमाणें भारताची राज्यपुनर्रचना होणार, असे टप्पे वाटेंत आहेत. अर्थातच अहवालांतील शिफारसी ज्यांना वावडचा वाटतील त्यांना मध्यवर्ती सरकारवर व लोकसभेवर आपल्या मताचा प्रभाव पाडून त्या बदलून घेण्याची पूर्ण संधी राहील हें उघड आहे. नेहरु–वल्लभभाई-सीतारामय्या अहवालांत लोकांची मागणी हीच शेवटीं निर्णायक असून तिला मान देणें लोकशाही युगाला धरून आहे असें अभय दिलें आहे तें केव्हांहि कोणास विसरण्याचें कारण नाहीं.

कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाल्यास तो अनुकूल असेल तर तो उचलून धरण्यासाठीं आणि वावडा असेल तर तो योग्य मार्गानें बदलून घेण्यासाठीं लोकमत प्रभावी रीतीनें प्रकट होणें हें नुसतें स्वाभाविकच नव्हे तर आवश्यकहि आहे. लोकमताची कदर न करणारा धार कमिशनचा अहवाल आठवडचाच्या अवधींत

कचऱ्याच्या टोपलींत फेकून देण्यांत आला होता. फाजलअल्ली कमिशनच्या अहवालांत जर लोकांच्या वाजवी अपेक्षा विफल करणारा फाजील उपव्याप असेल तर अंगावर चढलेल्या झुरळाप्रमाणें तो अहवाल झटकून टाकण्यास लोक कमी करणार नाहींत, किंबहुना अंतिम निर्णय जनतेच्याच हातीं असल्याचें सर्वांनाच मान्य असल्यामुळें तसें होणें स्वाभाविक आहे. अर्थातच सरकार व लोकसभा यांच्या मार्फत या गोष्टी लोकमताच्या प्रभावानें घडून येण्यासारख्या असल्यामुळें कमिशनच्या अहवालानंतर आकाश कोसळून पडेल अशी शंकाही येण्याचें कारण नाहीं. कमिशनच्या अहवालानंतरची लोकांची प्रतिक्रिया अनिष्ट स्वरूपांत प्रकट होऊ नये एवढाच पं. नेहरूंच्या ता. १५ ऑगस्टच्या उद्गारांचा व त्यानंतरच्या सीतापूरच्या भाषणांतील उल्लेखाचा अर्थ असून, तेवढ्याच मर्यादित दृष्टीनें त्यांच्या उद्गारांकडे व उल्लेखाकडे लोकांनीं पाहाणें वाजवी ठरेल.

ता. १६ च्या हरताळाच्या रूपानें राज्यपुनर्रचना कमिशनच्या अहवालानंतर घडणाऱ्या प्रकारांची रंगीत तालीम मुंबईंत झाली असा जो शेरा पं नेहरूंनीं मारला आहे त्यायोगें मुंबई महाराष्ट्राबाहेर राहाणार असें प. नेहरूंकडून सूचित झालें आहे, असें मानणें वस्तुस्थितीला धरून ठरणार नाहीं. वडाची साल पिंपळाला लावण्यासारखाच तो दूरान्वय होय. मुंबईबाबत आपलें मन कोणत्याहि एका बाजूला झुकत नसून तें पूर्ण खुलें आहे असा खुलासा पं. नेहरूंनीं श्री. शंकरराव देव ह्यांना पाठविलेल्या पत्रांत मागें केलेला आहे. कमिशनचा अहवाल अद्याप तयार होत असून तो पं. नेहरूंना दाखवून किंवा त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणें तयार होईल असें मानणें हा एक मोठा भ्रम आहे. अर्थातच मुंबईच्या हरताळामागें जे पक्ष आहेत अशा समजुतीनें पं. नेहरूंनीं सीतापूरला टीका केली ते पक्ष मुंबई महाराष्ट्रांतच असावी अशा मताचे आहेत हें खरें आहे. पण राज्यपुनर्रचना कमिशनच्या अहवालानंतर होणाऱ्या प्रकाराची रंगीत तालीम ता. १६ रोजीं या पक्षांनीं केली असें म्हणून मुंबई महाराष्ट्राबाहेर राहाणार असें पं. नेहरूंनीं सूचित केलें असें सकृद्दर्शनीं वाटण्यासारखें असलें तरी जरा खोल विचार करतां त्यांत तथ्य नाहीं हें कळून येणारें आहे. राज्यपुनर्रचना कमिशनच्या अहवालानंतर मुबईंत किंवा इतरत्र कोणतेहि आततायी प्रकार होऊं नयेत एवढीच तळमळ पं. नेहरूंच्या ता. १५ च्या उद्गारांत व सीतापूरच्या उल्लेखांत व्यक्त झाली असून, श्री. काकासाहेब गाडगीळ यांच्या नेतृत्वाखालीं जें शिष्टमंडळ पं. नेहरूंची भेट घेणार आहे त्या भेटींत या उद्गारांमुळें कांहीं अपसमज उत्पन्न झाले असल्यास त्याचें निराकरण पं. नेहरूंकडून होईल अशी खात्री वाटते!

२५-८-१९५५

मुंबईचे मुख्य मंत्री ना. मोरारजीभाई देसाई यांनीं अहमदाबाद येथें भाषण करतांना यापुढें सार्वजनिक क्षेत्रांत कोणाला शत्रु मानावयाचे नाहीं अशी प्रतिज्ञा केली असून या आपल्या प्रतिज्ञेनें सार्वजनिक क्षेत्रांत उच्च आदर्श ते दाखल करीत आहेत यांत संशय नाहीं. ना. मोरारजीभाई देसाई पोटांत एक ठेवून ओठानें निराळा उच्चार करणारे नसून, जसें दिसतें तसें कसलाहि आडपडदा न ठेवतां फटकळपणानें बोलून टाकण्यास कमी न करणारे व तशा बाण्याचे सर्व भलेबुरे परिणाम कणखरपणानें पत्करणारे म्हणून सुप्रसिद्ध आहेत. काळ्याला काळेंच म्हणण्याचा हा त्यांचा स्वभावधर्म प्रतिपक्षीयांना तर दाहक ठरतोच, पण प्रसंगीं स्वपक्षीयांनाहि सळो कीं पळो करून सोडतो असें म्हणतात. या स्वभावधर्मामुळें आपण दुसऱ्याच्या ठिकाणी अनवश्यक कटुता निर्माण करतों असें आढळून आल्यामुळें त्यांनीं यापुढें सार्वजनिक क्षेत्रांत कोणालाहि शत्रु न मानण्याची प्रतिज्ञा केली आहे आणि या प्रतिज्ञेचें मूलगामित्व लक्षांत घेण्यासारखें आहे. सडेतोडपणानें आपल्या मनाला पटणारें प्रियाप्रिय बोलून दाखविणें हें व्यवहारपटुत्वाचें लक्षण समजलें जात नाहीं. मनांत कांहींहि असलें तरी तोंडदेखलें हसावें, गोड गोड बोलावें, अंजारावें गोंजारावें, अभिवचनेंहि द्यावींत आणि शब्द व कृति यांचा मेळ जमला पाहिजे असा आग्रह कधींच ठेवूं नये, अशा व्यवहारनिपुणतेचा आश्रय नव्या प्रतिज्ञेच्या पालनाबाबत करण्याचा ना. मोरारजीभाई यांचा इरादा बिलकुल नाहीं हें लक्षांत घेण्यासारखें आहे. महाभारतांत कणिकनीति सुप्रसिद्ध आहे. जितकें शत्रुत्व अधिक तितकी अधिक साखर पेरून गोडबोलेपणा करावा आणि गरज सरतांच किंवा अनुकूल काल येतांच समोरच्या शत्रूस स्मशानांतील मडक्याप्रमाणें मागच्या मागें झुंगारून फोडून टाकावें, असा कणिकनीतीचा व्यावहारिक उपदेश आहे. सार्वजनिक जीवनांत व कौटुंबिक जीवनांतहि या कणिकपाठाचें अवलंबन करणारे अनेक लोक दिसून येतात. ना. मोरारजीभाई यांनीं कणिकनीतीचें अनुयायित्व पत्करण्याची प्रतिज्ञा केलेली नसून, जीवनांत कोणाशीं शत्रुत्वच करावयाचें नाहीं अशी प्रतिज्ञा केलेली आहे व ती त्यांच्या आजतागायतच्या उच्च आचारविचारांस साजणारी अशीच आहे यांत संशय नाहीं.

सार्वजनिक जीवनांतील असो किंवा कौटुंबिक जीवनांतील असो, शत्रुत्व हें प्रायः हातीं घेतलेल्या कार्याच्या अभिनिवेशांतून उत्पन्न होत असतें. दीर्घ विचारांतीं व अनुभव-निरीक्षण- निदिध्यासानें अमूक एक मार्ग हाच श्रेयस्कर असा मनाचा

निर्धार होऊन त्या मार्गानें जाण्यांत शक्तीचा प्रत्येक कण वेंचला जाऊं लागतो व त्या मार्गाशिवाय अन्य जीवनच उरलें नाहीं अशी अवस्था येते.

अशा अवस्थेंत स्वीकृत मार्गानें जात असतांना कसलाहि विरोध झाला किंवा अडथळा आला तरी तो सोसेनासा होतो आणि तापटपणा अंगीं येऊन बोलण्यांतहि तुकडा तोडून हातांत देण्याची हिरिरी येते. ज्याच्या जीवनांत ध्येयाची व मार्गाची उत्कटता नसते त्याच्या ठिकाणीं अर्थातच अभिनिवेश नसतो आणि तज्जन्य तापटपणा व शत्रुत्वहि पत्करण्याचें त्यांना कारण नसतें. अशी भेंडघाची भाजी घरोघरीं व सार्वजनिक जीवनांत सर्वत्र आढळते, निर्वैरत्वावद्दलची प्रशस्तीहि जीवनाच्या अंतीं अशांना लाभते. जेथें ध्येयाची व निष्ठापूर्वक पत्करलेल्या मार्गाबद्दलची उत्कटता असते तेथेंच त्याबद्दलचा आग्रह किंवा अभिनिवेश उत्पन्न होतो आणि जरासाहि अडथळा किंवा व्यत्यय येतोसें नुसतें वाटलें तरी शरीर- मन- बुद्धीच्या सर्व शक्ती तशा अडथळ्याचा पाडाव करण्यास उसळून येतात. दुसऱ्या मार्गानें जाणाराची चूक तीव्र शब्दांत दाखविल्याशिवाय राहावत नाहीं व निर्भर्त्सनेचाहि आवेश अंगीं येतो. ध्येयविशिष्ट तपस्येच्या मार्गानें जाणारे ऋषिमुनी अतिकोपिष्टपणाबद्दल प्रसिद्ध होते. सार्वजनिक जीवनांतील निर्लोभ व अनासक्त ऋषिमुनीहि असेच कोपिष्ट असल्याचें दिसून येतें. स्वीकृत कार्यांत अडथळा आला कीं, त्या अडथळ्याशीं सर्व शक्तीनिशीं झगडा करण्याचा अभिनिवेश उत्पन्न होतो चूक प्रतिस्पर्ध्यांच्या पदरीं घालावीशा वाटते आणि हाच प्रसग एक प्रकारें आणीबाणीचा किंवा सत्त्वपरीक्षेचा असतो. अडथळ्याशीं झगडतांना कोप प्रभावी झाला कीं, कित्येकदां पायाखालच्या मार्गावर व डोळ्यासमोरच्या ध्येयावरहि लक्ष राहात नाहीं. 'क्रोधात् भवति संमोहः' अशी अवस्था उत्पन्न होते आणि त्यांतूनच स्मृतिभ्रंश, बुद्धिनाश व सर्वनाश अशा पायऱ्यांनीं मनुष्य घसरत जातो अशी भगवद्गीतेची छाननी आहे. अभिनिवेशाला क्रोधाचें स्वरूप येऊन त्यांतून शत्रुत्व व तज्जन्य अधिक अडथळे येण्याची शक्यता टाळण्याचा मार्ग म्हणजे जीवनांत शत्रुत्वाला थारा न देतां स्वीकृत मार्ग अडथळ्याच्या प्रसगीं अधिक दृढतेनें चालविणें हा होय. 'निर्वैरम् सर्वभूतेषु' असा हा व्यक्तिगत किंवा समष्टिगत हित साधण्याचा मार्ग असून, हाच मार्ग पत्करण्याचा निर्धार ना. मोरारजीभाई यांनीं केला आहे, असें त्यांच्या अहमदाबादच्या प्रतिज्ञेवरून दिसतें.

सार्वजनिक क्षेत्रांतील निर्वैराचें चालतेंबोलतें उज्ज्वल उदाहरण म्हणजे महात्माजींचें जीवन होय. कर्तृत्वास अडथळे आले म्हणजे किंवा त्याला फाटे फोडण्यांत आले कीं संताप होतो, पण एका दृष्टीनें असा संताप म्हणजे स्वीकृत मार्गावरच्या श्रद्धेबद्दलचा आणि कर्तबगारीच्या जोरावर अडथळे ओलांडण्याच्या स्वसामर्थ्याबद्दलचा डळमळीतपणाच समजण्यास हरकत नाहीं. खादी व विधायक

कार्य यांच्यावर महात्माजींचा अढळ विश्वास होता. पं. मोतीलाल नेहरु, देशबंधु दास यांच्यासारख्या त्यांच्या खंद्या सहकाऱ्यांनीं एक वारभरहि सूत काढण्यास नकार दिला आणि १९२५ सालीं महात्मा गांधीच्या पदरीं 'पराभव व फजिती' बांधली गेली. अडथळा आला कीं, तो उचकटून टाकण्यावर कर्तृत्व केंद्रित करणें हा एक मार्ग होय; दुसरा मार्ग स्वीकृत कार्यावरची निष्ठा व नजर अढळ ठेवून सतत कार्याच्या जोरावर अडथळे ओलांडून कर्तृत्वाचा प्रवाह पुढें चालू ठेवणें हा होय. पाण्याच्या प्रवाहास अडथळा आला तर थेंबाथेंबानें तो प्रवाह फुगत जातो, जमिनींत मुरत असतो, अडथळ्यांचा सांधीकोपराहि तो व्यापून टाकतो व अखेर अडथळा असतांनाहि त्यावरून मार्ग काढून प्रवाह पुढें वाहूं लागतो. प्रतिपक्षाला उमळून टाकण्यापेक्षां कर्तृत्वाच्या सतत प्रवाहानें विरोधाचे सांधेकोपरेहि व्यापून त्यांना आत्मसात् करणें व निर्वैर वृत्तीनें सर्वांशीं स्नेहभावानें वागणें हा महात्माजींचा बाणा होता. म. गांधींनीं खादी व विधायक कार्याचा व्याप दास-नेहरूंच्या मार्गांत आड न येतां किंवा त्याच्याशीं झुंजण्यांत कालापव्यय न करतां इतका वाढवला कीं, शेवटीं देशबंधु दास यांचे अनुयायी व पं. मोतीलाल नेहरु आपल्या कर्तबगारीसकट महात्माजींना सामील झाले; व महात्माजींच्या सत्याग्रहाच्या मार्गानें व कर्तृत्वानें भारतास स्वातंत्र्याची कृतार्थता लाभली. म. गांधींचें जीवन म्हणजे निर्वैरः सर्वभूतेषु' चा व अफाट कर्तृत्वाचा जागता साक्षात्कार होय. महात्माजींचे शिष्य या नात्यानें ना. मोरारजीभाई देसाई यांनीं सार्वजनिक जीवनांत निर्वैर ठेवण्याची जी प्रतिज्ञा केली आहे त्या योगें तशाच स्वरूपाचा दुसरा उज्ज्वल आदर्श जनतेपुढें दाखल होईल, अशी आशा आहे.

१-९-१९५५

महाराष्ट्र काँग्रेसमधील डमडम गोळ्या

महाराष्ट्र काँग्रेसच्या कार्यकारिणीची व सर्वसाधारण सभेची बैठक शनिवार रोजीं भरून या दोनहि बैठकींत वर्किंग कमिटीनें महाराष्ट्राच्या राजीनाम्याबाबत

काँग्रेस वर्किंग कमिटीनें केलेल्या ठरावाचा विचार झाला आणि काँग्रेस वर्किंग कमिटीनें आपल्या ठरावाचा महाराष्ट्रांतील परिस्थिति लक्षांत घेऊन फेरविचार करावा व महाराष्ट्राच्या भावना व्यक्त करण्यास मुभा द्यावी अशा आशयाचा ठराव मंजूर झाला आहे. महाराष्ट्र काँग्रेसच्या कार्यकारिणीनें राजीनाम्यांचा ठराव मंजूर केला आणि तो स्वीकृत करण्यासाठीं वस्तुतः ता. २८ ची महाराष्ट्र काँग्रेसची सभा होती. पण वर्किंग कमिटीनें महाराष्ट्र काँग्रेसचा ठराव अधिकाराचें अतिक्रमण करणारा असा ठरविला आणि राजीनामे देण्यांत येऊं नयेत व दिलेले परत घेण्यांत यावेत असा आदेश दिला. वर्किंग कमिटीच्या बैठकीस महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष श्री. देवगिरीकर हजर होते आणि महाराष्ट्र काँग्रेसची बाजू ऐकून घेऊन वर्किंग कमिटीनें राजीनाम्यांबाबतचा ठराव केला हें उघड आहे. अशा स्थितींत महाराष्ट्र काँग्रेस पुढचें पाऊल कोणतें टाकते इकडे स्वाभाविकच लोकांचें लक्ष लागलेलें होतें. पुण्याच्या सभेंत श्री. नानासाहेब कुंटे यांनीं सांगितल्याप्रमाणें एखादा शब्द राजीनाम्यांतील वगळला तर त्यांत अधिकारातिक्रमण कांहीं नाहीं आणि महाराष्ट्र काँग्रेसचेंहि मत तसेंच दिसतें. राजीनाम्याचा ठराव अतिक्रमण करणारा नसला तरी त्याविरुद्ध वर्किंग कमिटीनें स्पष्ट आदेश दिल्यावर पुढचें पाऊल कोणतें टाकावयाचें हा महाराष्ट्र काँग्रेसपुढचा प्रश्न होता. वर्किंग कमिटीपुढें महाराष्ट्र काँग्रेस मोडून पडून भुईसपाट होईल असा प्रचार चालला होता. पुण्याच्या ठरावांत व ना हिरे यांच्या भाषणांत सांगण्यांत आल्याप्रमाणें महाराष्ट्र काँग्रेसचा राजीनाम्यांचा ठराव बंडखोरीचाहि नव्हता आणि आज्ञाभंगाचाहि नव्हता. राजीनामे परत घेण्याचा वर्किंग कमिटीनें आग्रह धरला तर सध्यांप्रमाणें मंत्रीपदावर पुढेंहि राहूं असें ना. हिरे यांनीं सांगितलें आहे. काँग्रेस संघटनेची निष्ठा सोडावयाची नाहीं आणि मुंबई-महाराष्ट्राबद्दलच्या सरकारी निर्णयावरील भावना राजीनाम्यांच्या द्वारें व्यक्त केल्याशिवाय राहावत नाहीं अशा मनस्थितीत महाराष्ट्र काँग्रेस दिसत आहे वर्किंग कमिटीच्या ठरावाचा झंझावात सुटल्यावर कर्दळीच्या खांबाप्रमाणें महाराष्ट्र काँग्रेस संघटना अशी तशी लवूं लागल्याचें दिसून यावें यांत नवल नाहीं. महाराष्ट्र काँग्रेस पुण्याच्या ठरावाच्या रूपानें लवली असली तरी ठरावाचा पुनर्विचार करण्यास वर्किंग कमिटीला विनंति करून महाराष्ट्र काँग्रेसनें मुळासकट उन्मळून पडण्याचें व भुईसपाट होण्याचें नाकारलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

महाराष्ट्र काँग्रेसच्या बैठकींत धुळ्याचे श्री. नेने यांनीं मुंबईच्या दंग्याच्या वेळीं आंतरराष्ट्रीय बंदी असलेल्या डमडम गोळ्या वापरण्यांत आल्या आणि दीडशें माणसें ठार झालीं असें विधान करून मुंबईच्या दंग्यांतील पोलीस बंदोबस्ताबाबतचा गवगवा सभेपुढें ठेवला आणि या दोनहि बाबतींत सरकारी इन्कारहि प्रसिध्द झाला आहे. डमडम गोळ्या मुंबईच्या दंग्यांत वापरलेल्या नाहींत

वराळ ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ७५८२८ वि: निंबाळ
क्रमांक २१२८ वर्ग दि.

महाराष्ट्र काँग्रेसमधील डमडम गोळ्या

असा सरकारनें खुलासा केला आहे आणि त्याची अधिक शहानिशा दंग्याची जाहीर चौकशी सरकारनें केली म्हणजेच इस्पितळांच्या अहवालांच्या साक्षीपुराव्यानें होऊं शकणारी आहे. दंग्यांत डमडम गोळ्या वापरल्या गेल्या नसल्या तरी महाराष्ट्र काँग्रेसनें केलेला राजीनाम्यांचा ठराव हा डमडम गोळ्यांसारखाच ठरलेला असून त्याचे परिणाम होऊन चुकलेले आहेत व कितीहि सावरासावर करण्यांत आली तरी ते परिणाम नाहींसे होण्यासारखे नाहींत. महाराष्ट्रांत नगरपालिका व लोकलबोर्डे यांच्या सभासदत्वाच्या राजीनाम्यांचा धडाका सुरू झाला आणि घडत असलेल्या गोष्टींनाच महाराष्ट्र काँग्रेसच्या राजीनाम्यांच्या ठरावानें एक प्रकारें पडत्या फळाची अनुज्ञा दिली होती. राजीनाम्यांचा ठराव म्हणजे एक प्रकारें हातून सुटलेला बाण आहे आणि वर्किंग कमिटीचा कांहींहि आदेश असला तरी त्याचे परिणाम नाहींसे करणें महाराष्ट्र काँग्रेसच्याहि हातीं राहिलेलें नाहीं. नगरपालिका व लोकलबोर्डे यांचे राजीनामे दिले गेलेले आहेतच, आणि श्री. कुंटे यांनीं महाराष्ट्र काँग्रेसच्या सभेंत जो गौप्यस्फोट केला त्यानंतर महाराष्ट्र मंत्र्यांचे दिले गेलेले व मुंबई मंत्रिमंडळाचे कायदेमंडळांच्या सभासदांचे तयार असलेले राजीनामे परत कसे घेतले जाणार हा प्रश्नच आहे. मुंबईच्या दंग्यांत डमडम गोळ्या वापरल्या गेल्या नाहींत पण ७५ लोकच ठार झालेले आहेत ही सरकारनें मांडलेली वस्तुस्थिति मान्य केल्यावर सुद्धां झालेल्या गोळीबाराची जबाबदारी घटनेप्रमाणें महाराष्ट्र मंत्र्यांवर व कायदेमंडळांच्या सभासदांवर आल्याशिवाय राहात नाहीं.

दा. क्र. १९५१०

पण कायदा व सुव्यवस्था खात्यांच्या बाबतींत विशिष्ट घटना घडून येण्यापूर्वी किंवा नंतरहि मंत्रिमंडळांत संयुक्त जबाबदारीचें तत्त्व अमलांत नाहीं असें श्री. कुंटे यांनीं पुण्याच्या सभेंत सांगितलें आहे. मंत्रिमंडळाची संयुक्त जबाबदारी दंग्याच्या उपशमाबाबत निर्माल्यवत् आहे आणि कायदेमडळें कामकाज सुरू नसल्यामुळें कांहीं करूं शकत नाहींत, असें असून सुद्धां घडलेल्या व घडणाऱ्या सर्व प्रकारांची जबाबदारी सरकारचे घटक या नात्यानें मंत्री व कायदेमंडळाचे सभासद यांच्यावरची टळत मात्र नाहीं. तोंड दाबून बुक्क्यांचा मार पत्करण्याची ही परिस्थिति कोणासहि सहन होण्यासारखी नाहीं व त्यांतून सुटण्याचा मार्ग राजानाम्याशिवाय दुसरा कोणताहि नाहीं. मुंबईबाबत महाराष्ट्रावर झालेला अन्याय आणि विद्यमान बेदाद परिस्थिति यांच्या परिणामीं राजीनाम्यांचें वातावरण महाराष्ट्रांत प्रखर आहे आणि महाराष्ट्र काँग्रेसनें त्याला अनुसरूनच राजीनाम्यांचा ठराव केलेला आहे. बाण हातचा सुटून गेलेला आहे आणि ठरावरूपानें सुटलेल्या डमडम गोळीचे परिणाम होऊन चुकलेले आहेत. अशा

स्थितींत महाराष्ट्राची परिस्थिति लक्षांत घेऊन वर्किंग कमिटीनें राजीनाम्यांविरुद्ध केलेल्या ठरावाचा पुनर्विचार व्हावा ही महाराष्ट्र काँग्रेसची मागणी कालोचित ठरल्याशिवाय राहात नाहीं.

महाराष्ट्र काँग्रेसच्या पुढें संघटनेची निष्ठा व सदसद्विवेकबुद्धि यांचा एक प्रकारचा पेंच पडला आहे हें शनिवारच्या ठरावावरून दिसून येणारें आहे. मनुष्य आपल्या सदसद्विवेकबुद्धीशीं जुळती अशी संघटना पसंत करून त्यांत प्रवेश करतो, संघटनेची शिस्त स्वेच्छेनें पत्करून इष्ट कार्यांच्या सिध्यर्थ आपलें कर्तृत्व त्या संघटनेमार्फत उपयोगांत आणतो आणि लोकमताचें प्रतिनिधित्व पत्करतो. सदसद्विवेक बुद्धि व लोकमताचें प्रतिनिधित्व यांना सांधणारा दुवा या दृष्टीनें संघटनेला महत्त्व आहे आणि संघटना बळकट ठेवण्यास शिस्त ही आवश्यक असते. संघटना एका बाजूला आणि लोकमत व सदसद्विवेकबुद्धि एका बाजूला असा पेंच ज्यावेळीं उद्भवतो त्यावेळीं स्वाभाविकच संघटना ही दुय्यम मानली जाते असा थोरामोठयांचा दाखला आहे. लो. टिळकांनीं काँग्रेसची शिस्त सुरत काँग्रेसमध्यें नाकारून सदसद्विवेकबुद्धि व लोकमताचें प्रतिनिधित्व यांची कास सोडली नाहीं आणि म. गांधींनीं आपल्या तत्त्वनिष्ठेशीं जुळतें तेवढेंच काँग्रेसचें नेतृत्व करतां यावें म्हणून काँग्रेसचें सभासदत्वहि सोडलें. बार्डोली सत्याग्रहाच्या वेळीं सरदार पटेल यांनीं काँग्रेसच्या ठरावाची वाट पाहिली नाहीं, आणि १९३२ च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीचें पुनरुज्जीवन होण्यापूर्वीच संयुक्त प्रदेशांत पं. नेहरूंनीं धडाडीनें पाऊल टाकून कैद पत्करली व काँग्रेसला कायदेभंगाशिवाय दुसरा मार्गच शिल्लक राहिला नाहीं.

संघटना ही कर्तृत्वाचा संघटित विस्तार करण्यासाठीं व उद्दिष्टाच्या सिद्धीसाठीं असते. ज्यावेळीं संघटनेच्या या दोनहि गोष्टी सुटतात त्यावेळीं एखाद्या मठाचें स्वरूप संघटनेला येतें व शिस्त ही कर्तृत्वाला गारद करण्याचें साधन ठरते. संघटना ही बलिष्ठ असली पाहिजे, पण ती सदसद्विवेकबुद्धीपेक्षां व लोकमतापेक्षां बलिष्ठ असतां कामा नये व असतहि नाहीं. मुंबईबद्दलचा निर्णय व राज्यसरकारचें संयुक्त जबाबदारीचें सुटलेलें धोरण सदसद्विवेकबुद्धीचा व लोकप्रतिनिधित्वाचा गुदमरा करूं लागतांच अधिकारपदाचा त्याग करून कणखरपणा टिकवून धरण्यानेंच सदसद्विवेकबुद्धि व लोकमताचें प्रतिनिधित्व साधलें जातें त्याचप्रमाणें संघटनेंतील मालीन्य व मंदपणाहि नाहींसा होऊन ती जाज्वल्य व प्रभावी बनते. काँग्रेस संघटना ही धोक्यांत आहे असें वर्किंग कमिटीच्या ठरावांत व महाराष्ट्र काँग्रेसच्या ठरावांतहि म्हटलें आहे. काँग्रेस संघटना खरोखरीच धोक्यांत आहे. कारण सध्यांच्या परिस्थितींत तिचें लोकप्रतिनिधित्व सुटत चाललें आहे व शिस्त सदसद्विवेकबुद्धीलाच खाऊं पाहात आहे. अशा स्थितींत केवळ शिस्त डोळ्यांसमोर ठेवून एखादें पाऊल टाकणें

म्हणजे काँग्रेसचें संकट अधिक तीव्र करण्यासारखेंच असल्यामुळें, राजीनाम्याच्या ठरावाचें भिजत घोंगडें चटकन् निकालांत काढून सदसद्विवेकबुद्धि व लोकमत या मूलाधार शक्तींशीं महाराष्ट्र काँग्रेस एकनिष्ठ राहील अशी आशा आहे.

३१–१–१९५६

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची समस्या

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आज अशा अवस्थेला पोहोंचली आहे कीं, पुढच्या मार्गाविषयीं अनेक मतें निकरानें बोललीं जात आहेत, आणि या गलबल्याच्या परिणामीं संभ्रम निर्माण होत असल्याचें आढळून येत आहे. संयुक्त महाराष्ट्र परिषदेचें व्यवहारतः विसर्जन श्री. शंकरराव देव यांनीं केल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र समिती सर्वपक्षीय स्वरूपांत श्री. एस्. एम्. जोशी यांच्या पुढाकारानें स्थापन झाली आणि स्थापनेपासून आजतागायत या समितीनें संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचें निशाण सतत उंच फडकतें ठेवलें आहे, आणि लोकक्षोभाला निग्रही, संयमी व संघटित वळण लावण्याची कामगिरी समितीनें बजावली आहे. सात मार्चपासून समितीच्या नेतृत्वाखालीं मुंबई-बेळगांव-कारवार-निपाणीसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारा सत्याग्रह सुरू झाला; आणि आजपर्यंत कोणत्याहि चळवळींत महाराष्ट्राचा पराक्रम, निर्धार व लढाऊ बाणा ज्या प्रमाणांत दिसला नाहीं त्या विराट स्वरूपांत या सत्याग्रहांत तो दिसून आला आहे. या सत्याग्रहानें सारा मराठी भाषिक महाराष्ट्र हालवून सोडला आहे आणि आज मराठी भाषिक मुलुखांत कोणतीहि जीभ उत्स्फूर्त घोषणा जर कोणती करीत असेल तर ती मुंबई-बेळगांवसकट संयुक्त महाराष्ट्राचोच होय. कचेरींत जातांना कारकून हीच भाषा बोलतात आणि परत येतांना कोठें सत्याग्रह असेल तर तो पहाण्याचा प्रसंग दवडत नाहींत; स्वयंपाक करतांना किंवा फोडणींत हिंग-मोहरी टाकतांना स्त्रीवर्ग याच विषयाची चर्चा करतो आणि संध्याकाळी पाय मोकळे करण्यास जातांना येतांना सत्याग्रहाचें विराट स्वरूप न्याहाळल्याशिवाय परत येत नाहीं; शेतकरी आपली नांगरट किंवा पेरणी तशीच बाजूला ठेवून बेळगांवहून मुंबईला येतात व

ऑ. इं. कॉं. कमिटीचा मंडप हादरून सोडतात; पोरेंसोरेंहि ध्यानींमनीं सत्याग्रह असल्याप्रमाणें त्याचा सहजगत्या घोष करीत असतात. कचेरींतील साहेब, निंदाप्रचुर चौकसपणा, उच्छृंखल खेंळकर वृत्ति हे स्त्री-पुरुष-बालकांचे स्वभावधर्म मागें करण्याइतका संयुक्त महाराष्ट्राचा विचार आज लहानथोर स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं स्थायी झाला आहे.

नित्याचे विचार व व्यवहार मागें पडून विशिष्ट विचार–व्यवहार जेव्हां साऱ्या लोकांमध्यें बलवत्तर होतो त्यावेळीं अशा चळवळीला पतित-पावक स्वरूप येत असतें, आणि समाजाचा जसा कांहीं कायाकल्प होऊन तो वरच्या पातळीला गेल्याचें दिसून येतें. आज संयुक्त महाराष्ट्राच्या सत्याग्रही चळवळीनें मराठी भाषिकांना नित्याच्या चाकोरीबाहेर जसें कांहीं खेंचलें आहे ! कोणतीहि एखादी मागणी सतत व जोरानें लोकांकडून करण्यांत आली तर लोकशाही भारताच्या नेत्यांना ती मान्य करण्याशिवाय गत्यंतर नाहीं, अशा प्रकारचा ताम्रपट जवाहर-पट्टाभि-वल्लभ अहवालानें दिलेला आहे. ती कसोटी लावावयाची तर संयुक्त महाराष्ट्राची मागणी एव्हांना मान्य होऊन जावयास पाहिजे होती. सत्याग्रहाच्या चळवळीनें आपलें अवतारकार्य एक प्रकारें पार पाडलें आहे. सत्याग्रहानें आपली कामगिरी बजावली आहे आणि आतां पुढें काय, असा प्रश्न या चळवळींतील प्रत्येक कार्यकर्त्यासमोर व चिंतकासमोर उभा आहे. कोणत्याहि चळवळींत कुचंबणुकीची अवस्था येणें हें अपरिहार्य असतें. नवलाई संपून उत्साह ओसरण्यास सुरुवात होते, उपेक्षा व तेजोभंग करण्याचे पद्धतशीर पवित्रे विरोधकांकडून घेतले जातात आणि पुढचें पाऊल कोणतें या प्रश्नाला अनेक उत्तरें सुचतात किंवा कोणतेंच उत्तर सुचत नाहीं. अशी स्थिति प्रत्येक आंदोलनांत केव्हां ना केव्हां तरी समोर उभी राहाते. पुढच्या पावलाविषयीं प्रथम असलेल्या मतभेदांचें दुहींत रूपांतर होण्याचा धोका उत्पन्न होतो आणि कर्तृत्वाला अनेक फाटे फुटून विस्कळीतपणा येऊं लागतो. चळवळीच्या चढत्या कमानींत किंवा उतरत्या काळांत असे अनुभव आल्याशिवाय राहात नाहींत. दुसऱ्या महायुद्धांत डंकर्क येथें मार खाल्यावर, चढाईची शक्ति संघटित होऊन दुसरी आघाडी उघडण्याच्या प्रसंगीं, त्याचप्रमाणें जर्मनी व्यापून विजयाचा कळस गांठण्याच्या ऐन वेळीं अशी कुचंबणूक दोस्त राष्ट्रांनाहि सोसावी लागली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीबाबतचे प्रतिस्पर्ध्यांचे उपेक्षेचे व तेजोभंगाचे पवित्रे, आणि अंतिम यश गांठण्यासाठीं करावयाच्या हालचालींची अनिश्चितता यांच्या योगानें एक प्रकारची कोंडी सांप्रत संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांत दिसत आहे. आणि संयुक्त महाराष्ट्राच्या नेत्यांची व कार्यकर्त्यांची कसोटीच ही कोंडी फोडण्याच्या या प्रसंगी लागत आहे.

पुढें काय, असा स्तंभित करणारा प्रश्न संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसमोरच उभा राहात आहे असें नव्हे. महात्माजींनीं केलेल्या प्रत्येक चळवळींतहि अशी भित वेळोवेळीं उभी राहिली आणि त्या त्या वेळीं आलेले अनुभव आजहि मार्गदर्शक ठरण्यास रखे आहेत. उत्साह विशिष्ट मर्यादेपर्यंतच तग धरूं शकतो आणि जगाला दिपविणारें कर्तृत्व त्याच काळांत व्यक्त होऊन चटकन् फलद्रूप होण्याचाहि संभव असतो. असहकारितेच्या प्रारंभींच्या चळवळींत युवराजाच्या स्वागतावर बहिष्कार घालण्याच्या वेळीं उत्साह शिगेला पोहोंचला होता व त्यावेळीं काय तो सौदा फारसें ओढून न धरतां पटवून टाकावा असें महात्माजींना सांगण्यांत येत होतें. त्यावेळीं सौदा न पटविण्यांत महात्माजींनीं मोठें 'बंगलिंग' किंवा घोडचूक केली असें नंतर देशबंधु दास सांगत असत. सविनय कायदेभंगाच्या चळवळींत गांधी-अविनकरार होऊन चळवळ फलद्रूप झाल्याचा भास झाला. १९४२ च्या चळवळींतहि युद्धसहकार्याच्या अटीवर तडजोड करण्याचा पवित्रा १९४१ सालीं खुद्द वर्किंग कमिटीनें घेतला होता व महात्माजी एकटे पडण्याचा प्रसंग उद्भवला होता. लोकांच्या उत्साहाला विधायक, संघटित व स्थायी असें स्वरूप देण्याची कुवतच नसेल तर चटकन् सौदा पटवून टाकणें हें व्यवहाराच्या दृष्टीनें उचित असतें. संयुक्त महाराष्ट्राच्या बाबतींत सौदा पटविण्याचे अनेक प्रयत्न निरनिराळ्या पर्यायांच्या रूपानें झाले आणि पाटसकर पर्याय हा निकराचा व शेवटचा प्रयत्न होता या पर्यायाची वेसण पं नेहरूंना बसणार असें सांगण्यांत येत होतें. लोकसभा मुंबईसह महाराष्ट्राला बव्हंशीं अनुकूल, पं. नेहरूंचा कल मुंबई महाराष्ट्राला देऊन टाकण्याकडे झुकलेला, अर्थमंत्री श्री. देशमुखांनीं राजीनाम्याचा जबरदस्त शह बसवलेला, असा सौद्यास अनुकूल मुहूर्त पाटसकर–मसुद्यानें गांठला. पण ऐन वेळीं मुंबईच्या आँ. इ. कॉं. कमिटीच्या बैठकीच्या वेळीं श्री काकासाहेब गाडगीळ म्हणतात त्याप्रमाणें श्री. मोरारजी देसाई यांचा काटशह परिणामकारक ठरला. लोकशाही हक्कांना मुंबई नालायक असल्याचा व ती पांच वर्षें केंद्रशासित ठेवली जाणार असल्याचा निर्णय पं. नेहरूंनीं जाहीर केला आणि सौद्याचें युगच अशा रीतीनें संपुष्टांत आलें! वाटाघाटी करणारे नेते कोणाचें कितपत अग ठेचाळलें हें चाचपडत कोलमडलेल्या अवस्थेंत सांप्रत दिसत आहेत. आँ. इं कॉं. कमिटीच्या वेळीं सत्याग्रह चालू ठेवण्यांत बंगलिंग झालें व 'सौदा' वाल्यांच्या कपाळमोक्षास तें कारणीभूत झालें असें खापर सध्यां फोडण्यांत येत आहे. पण या ना त्या अटीवर मुंबई महाराष्ट्रांत जाऊं देण्याचा किंवा तसा महाराष्ट्राचा हक्क मान्य करण्याचा सौदा पटविण्यास कॉंग्रेसश्रेष्ठी तयार नसल्यानें वाटाघाटी व सौद्याचीच अवस्था विफल ठरली आहे. आतां सयुक्त महाराष्ट्राचा लढा हा दीर्घकालीन व कसोटी घेणारा ठरणार हें आतां स्पष्ट झालें आहे.

चळवळीला विधायक, संघटित व स्थायी स्वरूप देऊन सध्यांचा उत्साह हा कायमच्या निर्धाराच्या कणखर स्वरूपांत टिकवून कसा ठेवावयाचा ही समस्या सांप्रत उभी झाली आहे. पुढच्या मार्गाची उमज व समज चटकन् न पडण्या-सारखी भित समोर उभी राहिली आणि पुढचा मार्ग खुंटल्यासारखा झाला कीं, मनुष्य पूर्वीच्या वर्तुळांत रंगणें घेऊं लागतो व जुन्या चाकोरींत पुन्हा आचारविचारांची वर्दळ सुरू होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या आगामी स्वरूपाबद्दल सांप्रत जी चिकित्सा चालू आहे ती पाहिली असतां जुन्या वर्तुळांतील परिभ्रमणें सुरू झालीं आहेत असें म्हणावें लागतें. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची पुढची दिशा कोणती हें प्रत्येक नेता आपापल्या पक्षीय व परंपरागत गुणधर्मांना धरून सांगत आहे. श्री. एस्. एम्. जोशी हे पुढचा मार्ग असहकाराचा असल्याचें बोलत आहेत ; निवडणुका जिंकून संयुक्त महाराष्ट्रवाद्यांचें सरकार नव्या महाराष्ट्रांत प्रस्थापित व्हावें व खंडित महाराष्ट्राच्या सिंहासनावरून पुढचा लढा चालविण्यांत यावा असें मार्गदर्शन अत्रे–ठाकरे–वालचंद कोठारी यांच्यातर्फे करण्यांत येत आहे. सध्यांचीच सत्याग्रहाची चळवळ अखंड संप-हरताळाच्या स्वरूपांत चालली पाहिजे, असा आग्रह कम्युनिस्ट विचारप्रणालीतर्फे होतांना आढळत आहे. राज्यपुनर्रचनेबाबत असंतुष्ट असलेल्या काँग्रेसजनांचा एक भारा आवळण्यांत येऊन भारतीय, किमानपक्षी महाराष्ट्रीय असंतुष्ट काँग्रेसजनांची संघटना उभी करण्याचा पवित्रा डॉ. नरवणे वगैरे काँग्रेसजनांकडून वारंवार प्रतिपादला जात आहे. निवडणुकी तोंडाशीं आल्या आहेत, आणि लढ्याबाबतच्या प्रत्येक मार्गदर्शनावर निवडणुकींची छाया दाट आहे हें विसरून चालणार नाहीं. विविध मार्ग सांगण्यांत येऊं लागले कीं विचारपूर्वक त्यांची छाननी करणें अगत्याचें असतें. तसा उपक्रम उद्यांच्या लेखांत आम्ही करणार असून वाचक तिकडे लक्ष पुरवतील अशी आशा आहे.

६–७–१९५६

संयुक्त महाराष्ट्राभोंवतींची निवडणुकीची गुंफण (२)

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत सध्यां प्रत्यक्ष कृतीला ऊर्फ सत्याग्रहाला अग्रमान असला तरी १९५७ सालीं होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकी सांप्रत संयुक्त

महाराष्ट्रवाद्यांपुढें मुख्यतत्वेंकरून आहेत आणि त्यानंतर कोणता पवित्रा घ्यावयाचा याविषयींचा एक प्रकारचा घोर संयुक्त महाराष्ट्रवाद्यांना लागलेला आहे हें कालच्या लेखांत आपण पाहिलेलें आहे. १९३५ चा प्रांतिक स्वायत्ततेचा कायदा अंमलांत आल्यावर निवडणुकी लढवाव्या कीं नाहीं हा १९२० सालचा प्रश्न शिल्लकच राहिला नव्हता आणि पार्लमेंटरी मनोवृत्ति ही अनिवार्य आहे असें म्हणून महात्माजींना अधिकारस्वीकारास मान्यता द्यावी लागली होती पार्लमेंटरी मनोवृत्ति, म्हणजेच निवडणुकी व नंतरचें राजकारण यांच्यामार्फत संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न धसाला लावण्याची वृत्ति ही केवळ अपरिहार्यच नव्हे तर अत्यंत प्रभावी अशी आहे, आणि त्याच्या परिणामीं सत्याग्रहाची व प्रत्यक्ष कृतीची मोहीम ही दुय्यम किंवा पार्लमेंटरी पद्धतीच्या पवित्र्यास पूरक अशी गणली जाण्याचा संभव आहे हें विसरून चालणार नाहीं.

मुंबईबद्दलच्या भारतश्रेष्ठींच्या निर्णयाचा निषेध म्हणून कायदेमंडळाचे व लोकल बोर्डे– ग्रामपंचायतींचे वगैरे राजीनामे देण्यांत आले आणि त्यानंतर कायदेमंडळांतील रिकाम्या जागा बिनविरोध अगर सविरोध पुन्हा त्याच लोकांनीं भरून काढल्या. लोकमत निवडणुकींत व्यक्त होतें व या दृष्टीनें या निवडणुकी लढविणें जरूर होतें, पण त्यायोगें संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याला नवें बळ किंवा तेज काय चढलें हें सांगणें कठीण आहे. येत्या सार्वत्रिक निवडणुकींतहि संयुक्त महाराष्ट्रवादीच निवडून येऊन मराठी भाषिकांचें मत निःसंदिग्ध रीतीनें लोकशाही पद्धतीप्रमाणें जाहीर होणें अत्यंत अगत्याचें आहे यांत संशय नाहीं. निवडणुकी जिंकल्या व लोकमत जगजाहीर झालें कीं संपलें असें मात्र नाहीं. लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलेल्यांनीं पुढें काय करावयाचें हा प्रश्न मागोमाग उभा राहातो. प्रातिनिधिक संस्थांत निवडून आलें कीं तेथील कामकाज विरोधी किंवा सत्तारूढ पक्ष या नात्यानें पहावें लागतें. नुसतें बोहल्यावर उभें राहून व सप्तपदी पुरी करून भागत नाहीं तर पुढचा प्रपंच नंतर मागें लागतो. स्वातंत्र्यपूर्व काळांत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना त्यावेळची राजनिष्ठेची शपथ घ्यावी लागे व आवढे गिळत ती घेतांना लोकप्रतिनिधींना नकोसें होऊन सरकारी बांकांवर हास्यलहरी उठत. राज्ययंत्र सुधारू किंवा मोडून टाकूं अशा गर्जना करीत कायदेमंडळांत शिरलेले पार्लमेंटरी मनोवृत्तीचे वीर शेवटीं तेथील मायापाशांत गुरफटून जात. संयुक्त महाराष्ट्र समितीचे सरचिटणीस श्री. एस्. एम्. जोशी यांनी निवडणुकीनंतर असहकार करावा असें सांगितलें आहे. त्यांचें हें मत वैयक्तिक असून संयुक्त महाराष्ट्र समितीचें अधिकृत नाहीं. पण कायदेमंडळांत तें व्यवहारांत उतरविणें हें मोठें दिव्य आहे. राज्यकारभाराची जबाबदारी घेणाऱ्या पक्षाकडून एखादें

लोकहितकारी बिल कायदेमंडळांत आलें तर त्या बाबतींत कायदेमंडळांत मतें द्यावयाचीं टाळून असहकार करतां येईल काय? सध्यांच्या विरोधी पक्षनीतीप्रमाणें अशा प्रकारच्या बिलांतील अक्षरांअक्षरांची ओढाताण करून आपला लोकहितकारी बाणा सरकारी पक्षापेक्षां जाज्वल्य आहे ही गोष्ट वेशीवर टांगली जाते. अर्थात् या धोरणांत असहकाराचा प्रश्न येत नाहीं. प्रचाराचा काय तो प्रश्न येतो. सरकारचें कायदेमंडळांत आणलेलें एखादें लोकहितैषी बिल अंमलांत आणलें जात असतांना त्या बाबतींत असहकार किंवा विरोध करतां येईल काय? संयुक्त महाराष्ट्राच्या बाबतींत मतभेद व विरोध असला तरी तो सर्वच बाबींपर्यंत ताणतां येणार नाहीं व तसा तो ताणणें हें अव्यवहार्य ठरेल.

सरकारी कार्यक्रम किंवा समारंभ यांवर बहिष्कार घालण्याची बाबहि अशीच पुष्कळांना अडचणींत आणणारी आहे. मंत्रीपदावर आरूढ झालेली व्यक्ति पूर्वीचे स्नेहसंबंध व लागेबांधे सहसा स्मरत नाहीं व मंत्रिपदारूढ व्यक्तीला दुरूनच कोपरापासून नमस्कार करणें हें त्याच्या व आपल्या मानरक्षणाच्या दृष्टीनें उचित असतें हें खरें आहे; पण असहकारहि वैयक्तिक स्नेह तोडूं शकत नाहीं. असहकार याचा अर्थ सत्तेशीं असा नाहीं तसा पदर सांधून लगा साधण्याच्या किंवा नुकसानी टाळण्याच्या लोभांत गुरफटलें न जाणें एवढाच अशा स्थितींत होऊं शकतो. कायदेमंडळांत निवडून येणारे प्रतिनिधी तनखा, अधिवेशनांच्या वेळचा भत्ता, प्रवासाच्या सवलती व निरनिराळ्या कमिट्यांवरच्या नेमणुकी स्वीकारणार नाहींत काय? स्वराज्यपक्षाच्या ऐन अमदानींतहि ही गोष्ट शक्य झालेली दिसली नाहीं. असहकार हा कायदेमंडळापासून दूर राहून जितका शक्य व सुलभ आहे तितकाच कायदेमंडळांत या ना त्या उद्देशानें शिरल्यानंतर तो अवघड व अशुद्ध ठरतो, आणि पार्लमेंटरी वृत्तीनें जोर केला कीं, प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें राज्यकारभाराची जबाबदारी येऊन त्या प्रमाणांत प्रत्यक्ष कृति मागासण्याचा धोका असतो असें म्हणणें अतिशयोक्तीचें ठरणार नाहीं.

संयुक्त महाराष्ट्रवाद्यांची आघाडी स्थापन करून निवडणुकी लढवाव्यात व सत्तास्थानें काबीज करून सयुक्त महाराष्ट्राचा लढा पुढें रेटावा असें मत सांप्रत प्रतिपादण्यांत येत असून, असहकाराचा अधिकृत तपशील जसा सांगण्यांत आलेला नाहीं त्याचप्रमाणें सत्तास्थानांवरून हा लढा कसा चालविण्यांत येणार त्याचाहि तपशील पुढें आलेला नाहीं, आणि स्वाभाविकच तसा तो सांगितला जाईपर्यंत त्याची सविस्तर छाननीहि शक्य नाहीं. पण स्थूलमानानें पाहातां अशी आघाडी प्रस्थापित होणें व ती फलद्रूप होणें हें सद्यःस्थिति व पूर्वानुभव पाहातां तितकेंसें सोपें म्हणतां येणार नाहीं. मुंबई–बेळगांव–कारवार-निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र पाहिजे

ही मागणी महाराष्ट्र काँग्रेसचीहि आहे, किंबहुना मराठी भाषिकांत त्याबाबत मतभेदच नाहींत. कोणत्या मार्गानें चळवळ चालवावी याबाबत मतभेद आहे. स्वाभाविकच संयुक्त महाराष्ट्र हा निवडणुकींतील परवलीचा शब्द करावयाचा म्हटलें तरी त्याबाबत गोंधळ उडविला जाण्याची शक्यता आहे. संयुक्त महाराष्ट्र हा निवडणुकीचा एकमेव मुद्दा होणेंहि असेंच कठीण आहे. निवडणुकींच्या मुद्यांपैकीं तो एक प्रभावी व जनमनाला भिडणारा मुद्दा होऊं शकेल.

संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न लढ्याच्या मार्गानें धसाला लावण्याबाबत सांप्रत सहीशिक्क्याचे काँग्रेसवाले वगळले तर इतर सर्वांचें मतैक्य व एकजूट आहे यांत संशय नाहीं. तथापि निवडणुकीचा जाहीरनामा तयार करण्याचा प्रसंग आला तर लढाऊ संयुक्त महाराष्ट्रवाद्यांचें संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाखेरीज इतर मुद्यांवर एकमत होईलच असें सांगतां येणार नाहीं. किंबहुना तें अशक्य ठरल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. आजच निरनिराळे पक्ष निवडणुकीच्या दृष्टीनें जे दंड थोपटत आहेत त्या दंड थोपटण्यांतून परस्परविरोधी ध्वनि उमटत आहेत, पक्षीय लागेबांधे असलेल्या संयुक्त महाराष्ट्रवादी कार्यकर्त्यांमध्यें त्यांचे प्रतिध्वनी उमटत आहेत, असा भ्रम आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या सत्याग्रहांत स्वयंसेवक जातात त्यांच्यापुढें पक्षीय उल्लेख जो करण्यांत येतो त्यांतहि निवडणुकींची दृष्टि आहे असा श्लेष काढण्यांत येत आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्यें आज कम्युनिस्टांपासून जनसंघापर्यंत सर्व पक्षांचे लोक एकत्र आलेले आहेत, पण त्यांच्यांतहि आगामी निवडणुकींच्या भाननेमुळें एकमेकांविषयीं फारसा विश्वास नाहीं. भारतीय पातळीवर कम्युनिस्टांचा विटाळ प्रजासमाजवादी मानतात आणि जनसंघ– हिंदुसभावाद्यांशी हातमिळवणी करण्याची तयारी कम्युनिस्ट वगैरे डाव्या पक्षांची नाहीं, इतकेंच नव्हे तर अशा घोषणा तालासुरावर सुरू आहेत नुसत्या संयुक्त महाराष्ट्राच्या मुद्यावर निवडणुकी लढविणें जमण्यासारखें नाहीं; या मुद्याखेरीज इतर मुद्यांवर एकमत होण्याची तूर्त शक्यता दिसत नाहीं; एकमेकांविषयीं विश्वास व सुहृद्भावहि निरनिराळ्या पक्षांत नाहीं हें लक्षांत घेतां निवडणुकीपुरती एक आघाडी संयुक्त महाराष्ट्राच्या मुद्यावर निर्माण कशी होईल असा प्रश्न पडल्याशिवाय राहात नाहीं.

त्रावणकोर–कोचीनच्या सार्वत्रिक निवडणुकींत विरोधकांची एक आघाडी आपापसांतील विरोध टाळण्याकरितां निर्माण झाली होती. पण सत्ताग्रहणाच्या वेळीं मात्र राजकीय अस्पृश्यतेनें डोकें वर केलें आणि प्रजासमाजवादी पक्षाचें मंत्रिमंडळ काँग्रेसच्या आधारावर उभें झालें. पण कम्युनिस्टांचा आधार प्रजासमाजवाद्यांना चालला नाहीं. निवडणुकीपुरते सर्व पक्ष एक झाले तर काँग्रेसला

पराभूत करूं शकतात, पण निवडणुकीपुरता जमविलेला एकोपा नंतर टिकत नाहीं असें त्रावणकोर-कोचीनचा अनुभव सांगत आहे. सर्वपक्षीय किंवा संयुक्त आघाडीचें सरकार स्थापन झालें तरी मध्यवर्ति सरकारची इतकी जबरदस्त पकड प्रादेशिक राज्ययंत्रावर आहे कीं, दररोजचें कामकाज घटनेप्रमाणें करीत असतांना मध्यवर्ति सरकारला शह देणें अशक्य असतें हा अनुभव त्रावणकोर-कोचीनमध्यें प्रजासमाजवादी थाणू मंत्रिमंडळाला आला. प्रादेशिक सरकारें म्हणजे जिल्हा लोकल बोर्डांची मोठ्या प्रदेशाला लागू होण्यासारखी आवृत्ति आहे आणि भरीव सत्ता भारतीय घटनेनें प्रादेशिक सरकारांना ठेवलेली नाहीं, असें कै. दादासाहेब मावळणकर यानीं एकदां सांगितलें होतें तें या दृष्टीनें लक्षांत घेण्यासारखें आहे. प्रादेशिक स्वायत्तता जी १९३५ च्या कायद्यानें प्रांतांना होती तीच आतां भारतीय कायदेमंडळांना नाहीं. तेव्हां भरीव सत्तेच्या अभावीं घटनात्मक पेंचप्रसंग निर्माण करून प्रादेशिक राज्यकारभाराला खीळ घालणें किंवा मध्यवर्ति सरकारला वंगविणें हें शक्यतेच्या कोटींतील दिसत नाहीं. राजसत्तेशीं असहकार करणें किंवा घटनात्मक पेंचप्रसंगानें प्रादेशिक राज्यकारभार अशक्य करून मध्यवर्ति सत्तेला वंगविणें या दोनहि बाबतींतील तपशील जाहीर झाल्यावर त्या बाबतींत विस्तृत चर्चा करण्यांत येईल. तथापि त्या बाबतींत प्राथमिक व मूलभूत अडचणी अगोदरपासूनच ध्यानीं घेणें आगामी कार्यक्रमाची पक्की बांधणी होण्याच्या दृष्टीनें उपकारकच होय त्याच दृष्टीनें वरील विवेचन केलें आहे.

संयुक्त महाराष्ट्रवादी संघटनांशीं फटकून वागून निरनिराळ्या मुद्यांवर असंतुष्ट असणाऱ्या काँग्रेसजनांची महाराष्ट्रव्यापी किंबहुना शक्य तर भारतव्यापी काँग्रेसजन संघटना स्थापण्याची व तिच्या द्वारें संयुक्त महाराष्ट्राचा दाद लावून घेण्याची सं. महाराष्ट्रवादी काँग्रेसजन परिषदेची मनीषा ही कोणत्याहि दृष्टीनें विचार केला तरी अत्यंत भोळेपणाची किंवा अत्यंत धूर्तपणाची ठरल्यावांचून राहात नाहीं. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नापुरताच संयुक्त महाराष्ट्रवादी काँग्रेसजनांचा मतभेद काँग्रेसशीं आहे व इतर संयुक्त महाराष्ट्रवादी म्हणविणारे पक्ष काँग्रेसला हाणून पाडण्यासाठीं एकवटलेले असल्यामुळें त्यांच्याशीं संयुक्त महाराष्ट्रवादी काँग्रेसजनांची मिळावट शक्य नाहीं हा समजच भ्रामक म्हटला पाहिजे काँग्रेसच्या कर्तृत्वावर व नेतृत्वावर भांडवलदारांची भक्कम पकड असून त्यापुढें जागतिक कीर्तीचे पं. नेहरूहि टेकीला आलेले दिसतात. या परिस्थितींत मुंबई-कारवार-बेळगांववाबत अन्याय काँग्रेसकडून होत आहे, इतकेंच नव्हे तर इतर पक्षांतहि संयुक्त महाराष्ट्राबाबत जो गुळमुळीत नूर दिसतो त्याच्याहि मुळाशीं हीच थैलीशहांची पकड आहे. थैलीशहांच्या जबरदस्त पकडीच्या परिणामीं होत आलेल्या किंवा होऊं शकणाऱ्या अन्यायांचें प्रतीक म्हणजे मुंबईचें प्रकरण आहे.

संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न हा त्या दृष्टीनें केवळ तपशीलाचा प्रश्न नसून मूलगामी तत्त्वाचा प्रश्न आहे. किंबहुना हा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटण्यावरच भारतांत पुढें न्यायनीतीचें व लोकांचें ऊर्फ लोकशाहीचें राज्य असावयाचें कीं थैलीशाहीच लोकशाहीच्या नांवाखालीं नांदावयाची हें अवलंबून आहे. अर्थात् मूलगामी प्रश्न डावलून केवळ संयुक्त महाराष्ट्रापुरताच काँग्रेसशीं मतभेद आहे असें प्रतिपादण्याच्या मुळाशीं इतरांपासून निराळें असें अहंवैशिष्ट्य राखण्याचा तरी हेतु असला पाहिजे किंवा मूलभूत प्रश्नापर्यंत जाण्याची सोईस्कर अनिच्छा असली पाहिजे. पार्लमेंटरी मनोवृत्तीच्या किंवा पद्धतीच्या ऊर्फ आगामी निवडणुकीच्या अनुषंगानें संधिसाधु विचारांचें प्राबल्य होतं असल्यास त्यांत नवल नाहीं व कोणाचा दोषहि नाहीं. पार्लमेंटरी मनोवृत्तीनें व पद्धतीनें संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न घसाला लावण्यांत कोणत्या अडचणी व धोके आहेत यांचें ओझरतें विवेचन येथपर्यंत केलें आहे.

७-७-५६

प्रत्यक्ष कृतीचा काटेकोर तोडगा

कालच्या अंकांत केलेल्या छाननीप्रमाणें संयुक्त महाराष्ट्राबाबतचा अन्याय दूर करून घेण्याच्या बाबतींत कायदेमंडळांमध्यें अडवणूक करण्याचा किंवा असहकाराचा कार्यक्रम अंमलांत येण्याच्या व यशस्वी होण्याच्या दृष्टीनें सहज-सुलभ ठरत नाहीं. भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत कायदेमंडळांतील कार्यक्रमानें आपल्यापुरती कामगिरी बजावली आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यांतहि कायदेमंडळाच्या आघाडीवर लढा कांहींसा प्रभावी होऊं शकेल, पण कायदेमंडळांची आघाडी ही स्वातंत्र्याच्या लढ्यांतहि निर्णायक ठरूं शकली नाहीं आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यांत ती तशी ठरली तर तें एक मोठें आश्चर्य म्हणावें लागेल! स्वतंत्र देशांत लोकशाही पद्धतीनें मतदानाच्या पेटीमार्फत सर्व अन्याय दूर होण्यासारखे असल्यामुळें सत्याग्रह किंवा तत्सम प्रत्यक्ष कृतीला थारा नाहीं आणि अशांततेचे मार्ग तर राष्ट्रद्रोहाच्या सदरांत जातात असें सांगितलें जातें व तें विशिष्ट

मर्यादेपर्यंत खरेंहि आहे. पण कायदेमंडळांची रचना व उभारणीच अशी आहे कीं, तेथें एखादा लढा चालविणें म्हणजे सामनेवाल्याच्या चक्रव्यूहांत शिरून लढण्यासारखें आहे. चक्रव्यूहांत शिरतां येतें पण अभिमन्यूप्रमाणेंच तेथून सहीसलामत बाहेर पडण्याचें तंत्र पुष्कळांना माहीत नसतें. कायदेमंडळें म्हणजे विरोधकांना उध्वस्त करतां येण्यासारखें केळीचें बन नव्हे, तर नियम व कार्यपद्धतीचा कोट किल्ला आहे. श्री. काकासाहेब गाडगीळ म्हणतात त्याप्रमाणें कार्यपद्धतीच्या पारंगततेमुळें एखाद्या वेळीं एखाद्या प्रश्नावर सत्ताधारी पक्षावर मात करतां येते. पण तो विजयहि क्षणिकच ठरतो आणि बहुमतवाल्या सत्ताधारी पक्षाच्या कृपेशिवाय एखादी गोष्ट तेथें साधतां येणें कठीण असतें. राज्यकारभाराची अडवणूक या कायदेमंडळांत आपापसांतील एकोप्यानें कणखरपणानें साधतां आलीच तरी तसल्या प्रसंगांतून पार पाडण्यासारखी सर्व सोय घटनेंत करून ठेवलेली आहे. प्रलयकाल ओढवला तरी त्यावरचीहि उपाययोजना घटनांच्या अक्षरांत सांपडेल. राज्ययंत्राची यत्किंचितहि अडवणूक किंवा मोडतोड करतां येणार नाहीं अशा रीतीनें घटनेनें कायदेमंडळांची रचना केलेली असून, बहुमत संपादन करून तेथें कोणी पेंचप्रसंग निर्माण केला तर राष्ट्रपतींच्या जादा अधिकारांत एकूण कारभार राज्यपालांकडे सोपविला जाऊन तेथीलच सरकारधार्जिण्या सल्लागारांच्या मदतीनें राज्यकारभाराचा गाडा सुरू राहातो आणि लोकप्रतिनिधींना पुन्हा लोकांमध्येंच येऊन चळवळ पुढें चालू ठेवण्याशिवाय गत्यंतर राहात नाहीं. कोणत्याहि लढ्यांत कायदेमंडळाची आघाडी ही कच्ची राहूं देऊन चालत नाहीं आणि निवडणुकीच्या द्वारें लोकमताचा कौल घेऊन कायदेमंडळांतून लढा द्यावा लागतो हें खरें आहे पण कायदेमंडळाची ही आघाडी प्रत्यक्ष कृतीला पूरकच काय ती होऊं शकते आणि लोकांनीं, लोकांच्याकडून व लोकांच्या मार्फतच निर्णायक लढा देण्याशिवाय गत्यंतर नसतें.

प्रत्यक्ष कृतीच्या मार्गानेंच संयुक्त महाराष्ट्राचा लढा तडीला पोहोंचूं शकेल ही गोष्ट ध्यानीं घेतली असतां तिच्या मर्यादा व पथ्यापथ्य हे प्रश्न उभे राहातात. मर्यादा व पथ्यापथ्य यांचें तारतम्य कांटेकोर रीतीनें पाळलें गेलें नाहीं तर अवसानाला आलेला लढाहि कच खाऊन कोसळण्याची धास्ती असते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यानें सांप्रत सत्याग्रहाचें स्वरूप धारण केलेलें आहे आणि सत्याग्रहाबाबतची सरकारी नीति सारखा थारेपालट करीत आहे. सत्याग्रही स्वयंसेवकांना पकडून त्यांना मोठेपणा देण्यास सरकारी यंत्र नाराज असल्यामुळें सत्याग्रह्यांना न पकडण्याचें धोरण मध्यतरीं अंमलांत होतें, पण या धोरणानें सत्याग्रह्यांच्या संख्येला भरती येऊन घरबंध उरत नाहीं असें आढळून आल्यानें सत्याग्रह्यांना न पकडण्याच्या सरकारी धोरणांत पुन्हा बदल होत असलेला दिसत

आहे. सत्याग्रह चालू आहे आणि तो पुढेंहि चालू राहून लोकजागृतीचें व लढाकणखर बनविण्याचें कार्य पार पाडीत राहील.

सत्याग्रहानें तुरुंग भरण्यापलीकडचा अधिक प्रभावी प्रत्यक्ष कृतीचा मार्ग सांप्रत संयुक्त महाराष्ट्र समितीच्या बैठकींत शोधण्यांत येत आहे. अखंड हरताळ व सार्वत्रिक संप पुकारण्याची सूचना कम्युनिस्ट व जहाल कार्यकर्त्यांकडून करण्यांत येत असून, राज्यपुनर्रचनेचें बिल पास होण्याच्या सुमारास त्याचप्रमाणें पुनर्रचित राज्यें ऑक्टोबरमध्यें मूर्तावस्थेंत येण्याच्या वेळीं अखंड संप–हरताळासारख्या पवित्र्याचा आग्रह जोर करील असें लक्षण आहे. १९४२ च्या चलेजाव लढ्यांत अखंड संप व हरताळ यांचा अवलंब करण्यांत आला होता. पण अखंड हरताळासाठीं व्यापारी दुकानदार बेमुदत व्यापार–व्यवहार बंद ठेवण्यास तयार होत नाहींत आणि मीठमिरची रोजच्या रोज खरेदी करून संसार चालविणाऱ्या जनतेलाच असा बेमुदत हरताळ जिकिरीचा ठरतो. जानेवारीच्या दंगलींत दुकानांचा व्यवहार कांहीं काळपर्यंत बंद होता तरी सर्वसामान्य लोकांचे मोठे हाल झाले. बेमुदत संप कितीहि लढवय्या कामगार गट असला तरी तो चालवूं शकत नाहीं. १९४२ सालीं मालकवर्गाची फूस असतांनाहि अहमदाबादच्या गिरण्यांचा संप तीनचार महिन्यांपेक्षां अधिक काळ टिकूं शकला नाहीं. वृत्तिच्छेदाला मनुष्य सर्वांत अधिक भितो. चटकन् पराक्रमाचें व धाडसाचें कृत्य करून त्यांत प्राणाचा धोकाहि आवेशाच्या भरांत मनुष्य पत्करतो. पण वृत्तिच्छेदामुळें दररोजची होणारी झिजवणूक पत्करण्याचें दिव्य पार पाडणें कठीण जातें. त्या दृष्टीनें अखंड हरताळ किंवा बेमुदत सार्वत्रिक संप शेवटपर्यंत तग धरून राहाणें दुरापास्त होय. जी गोष्ट बेमुदत संप-हरताळाची तीच करबंदीसारख्या पावित्र्यांचीहि म्हणतां येईल संप–हरताळांच्या अंमलबजावणीनें मुंबईसारखें शहर निश्चेष्ट पाडतांना शांततेचें वातावरण टिकेलच असाहि भरंवसा नसतो. मुंबई महाराष्ट्रांत जाण्यास विरोधी असा प्रबल गट मुंबईंत संख्येनें थोडा असला तरी सत्तेनें शेफारलेला आहे. शांतता प्रस्थापित करण्याच्या नांवाखालीं लाठ्या-काठ्या-बंदुका अश्रुधूर-चिलखती गाड्या यांनीं सज्ज असें पंचहत्यारी पोलीस दल या गटाच्या साहाय्यार्थ नेहमींच एका पायावर उभें असतें. शांततापालन हें एकतर्फी कधींच असूं शकत नाहीं. सत्याग्रह पाहाण्यास गर्दी जमली तरी पोलिसांचा स्ट्रायकिंग फोर्स लाठ्यांनीं लोकांच्या पाठी फोडून काढतो. खुट्ट झालें कीं चाळींतून शिरून बेगुमान धरपकड होते, दगडफेक झाली तर बंदुकांच्या गोळ्या झाडून मुडदे पाडण्यांत येतात, आणि हें सारें शांतता प्रस्थापित करण्याच्या नांवाखालीं होतें. शांतता भगवान् बुद्धाची कीं राष्ट्रपिता महात्माजींची म्हणून राज्यकर्ते मानतात कोण जाणे! लाठ्या-

काठ्या-बंदुकांनीं शंभर लोक दहशत खाऊन चूपचाप राहातात आणि शांतता प्रस्थापित होते हें खरें आहे. पण शंभरांतल्या एखाद्याचें माथें भडकून सरकारी दहशतीला दहशत संघटित करूनच उत्तर देण्याच्या पंथाला तो लागण्याचा संभव असतो.

दहशतीच्या व दंगलीच्या मार्गानें लोकांनीं आपल्या मागण्या पुऱ्या करण्याचा अट्टाहास लोकशाहींत धरतां कामा नये, त्याचप्रमाणें शस्त्रास्त्रांचा वापर करून दहशतीनें शांतता प्रस्थापित करण्याचा मार्ग सरकारनेंहि अवलंबितां कामा नये. लोकशाहींत धाकदपटशाला आणि सत्याग्रहालाहि जागा नाहीं आणि बंदुकीच्या गोळ्या लोकांवर सोडण्याला वाव आहे काय, असा सवाल आचार्य विनोबांनीं सर्वोदय संमेलनांत केला होता, त्यांतील मर्म लक्षांत घेण्यासारखें आहे. शांततामय मार्गांचा विधिनिषेध सरकारला नसला तरी सत्याग्रही लढ्याच्या नेत्यांना तो असलाच पाहिजे. त्याच दृष्टीनें संयुक्त महाराष्ट्र समितीनें मुंबईंत संप हरताळ अलीकडे हाताळला नाहीं, इतकेंच नव्हे तर ठाकुरद्वारसारख्या ठिकाणीं दगडफेक चालतेसें दिसतांच गिरगांवांतील सत्याग्रहहि मध्यंतरीं तहकूब केला होता. प्रक्षोभक वातावरण यत्किंचितहि उत्पन्न होऊं न देण्याबद्दल संयुक्त महाराष्ट्र समिति अत्यंत जागरूक आहे आणि अखंड संप, बेमुदत हरताळ यांच्या मर्यादा व पथ्य लक्षांत घेऊन त्या दिशेला संयुक्त महाराष्ट्राचा लढा लागण्याच्या बाबतींत समिति अत्यंत काटेकोर राहिल्यास तें स्वाभाविक ठरेल.

मुंबई-बेळगांव-कारवार-निपाणीसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति करण्याचा प्रश्न साऱ्या मराठी भाषिकांचा आहे हें तर खरेंच; पण या बाबतींतील अन्यायाची बोंच व खोच मुख्यतः मुंबई-बेळगांवच्या जिव्हारीं भिडलेली असून, परिणाम याच ठिकाणीं भोगावे लागणार असल्यामुळें जो कांहीं लढा व्हावयाचा तो मुख्यतः मुंबई व बेळगांवांतील लोकांनाच द्यावा लागेल हें विसरून चालणार नाहीं. सर्वच मराठी भाषिक दुःखित व व्यथित आहेत. पण मुंबई-बेळगांवचें दुःख हें या टापूबाहेरच्या मराठी भाषिकांना शीतल जरी वाटलें नाहीं तरी त्यांना तें जळतें व असह्य ठरेलच असें म्हणतां येत नाहीं. मुंबई व बेळगांव-कारवार तोडला असला तरी तीन कोटी मराठी भाषिक एकत्र आले आहेत, त्यांची एकात्मता साधावयाची आहे, विकास घडवून आणावयाचा आहे. सैंतालाला आत्मा विकून नव्या राज्याचे उपभोग घेण्याचा बुद्धिनिष्ठ व्यवहारीपणा मराठी भाषिकांच्या विशिष्ट गटांत आजच दिसून येत आहे; पोटचा गोळा मोगल सम्राटांच्या जनानखान्यांत लोटून ऐषआरामाचें निर्भ्रान्त जीवन पूर्वीहि रजपूत राजेरजवाडे

जगत असत. मुंबईं दिल्लीला देऊन विदर्भ-मराठवाड्यासह मराठी भाषिकांचे छत्रपति होण्याचा हव्यास आजच दिसत आहे. अशा स्थितींत मुंबई-बेळगांवचा प्रश्न तेथल्या लोकांनींच सोडवून घेतला पाहिजे व महाराष्ट्रांतील हक्काचें स्थान हक्कानें मिळविलें पाहिजे या दिशेनें मुंबईचे व बेळगांव-कारवारचे मराठी भाषिक शांततेच्या मार्गानें दीर्घकालीन लढा कसा देऊं शकतील याची चिकित्सा करणें अपरिहार्य आहे.

८-७-५६

दंगेधोपे, घातपात व सशस्त्र क्रान्ति

मुंबई-बेळगांव-कारवार-निपाणीचा अंतर्भाव महाराष्ट्रांत करण्याच्या चळवळींत अनत्याचाराचें व्रत अत्यंत कसोशीनें पाळलें पाहिजे, याविषयीं संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत सामील असलेल्यांचें संपूर्ण मतैक्य आहे आणि तत्त्व किंवा व्यवहार यांपैकीं कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी त्याबाबत द्विधा मत होणार नाहीं मुंबईचा प्रश्न जे रस्त्यावर सोडवूं पहातील त्यांचा रस्त्यावरच फडशा पाडण्यांत येईल असें प. जवाहरलाल नेहरु यांनीं अमृतसर येथें ऑ. इं. कॉं कमिटीच्या बैठकींत सांगितलें, आणि सरकार या संज्ञेस पात्र असलेली कोणतीच संघटना दहशतीला शरण जाणार नाहीं असें त्यांनीं बजावलें. दगडधोंडे हीं माणसांचीं साधनें नसून माकडांचीं आहेत असें त्यांनीं मुंबईच्या ऑ. इं. कॉं. कमिटींत सांगितलें. त्यांचीं ही विधानें वस्तुस्थितिदर्शक असून केवळ राज्यकर्त्यांच्या मगरूरींचीं नाहींत हें लक्षांत घेतलें पाहिजे. दंग्याधोप्यांना सरकार वश होणार नाहीं असें पं. नेहरूना अमृतसर येथें आणि मुंबईस सांगावें लागलें तेंहि निष्कारण नव्हे. आंध्रमध्यें श्री रामलू यांनीं आमरण उपवास करून देह ठेवल्यानंतर तेथें लोकक्षोभ दंगलीच्या व आगगाडचा अडविण्याच्या रूपानें प्रकट झाला आणि योगायोगानें त्यानंतरच आंध्रची मागणी मध्यवर्ति सरकारनें मान्य केली. १६ जानेवारी रोजीं मुंबई केंद्रशासित ठेवण्याचा निर्णय भारत सरकारनें जाहीर केल्यावर मुंबईंत दंगल माजली आणि त्यानंतरच अमृतसर कॉंग्रेसमध्यें कोणताहि

काठ्या-बंदुकांनीं शंभर लोक दहशत खाऊन चूपचाप राहातात आणि शांतता प्रस्थापित होते हें खरें आहे. पण शंभरांतल्या एखाद्याचें माथें भडकून सरकारी दहशतीला दहशत संघटित करूनच उत्तर देण्याच्या पंथाला तो लागण्याचा संभव असतो.

दहशतीच्या व दंगलीच्या मार्गानें लोकांनीं आपल्या मागण्या पुऱ्या करण्याचा अट्टाहास लोकशाहींत धरतां कामा नये, त्याचप्रमाणें शस्त्रास्त्रांचा वापर करून दहशतीनें शांतता प्रस्थापित करण्याचा मार्ग सरकारनेंहि अवलंबितां कामा नये. लोकशाहींत धाकदपटशाला आणि सत्याग्रहालाहि जागा नाहीं आणि बंदुकीच्या गोळ्या लोकांवर सोडण्याला वाव आहे काय, असा सवाल आचार्य विनोबांनीं सर्वोदय संमेलनांत केला होता, त्यांतील मर्म लक्षांत घेण्यासारखें आहे. शांततामय मार्गांचा विधिनिषेध सरकारला नसला तरी सत्याग्रही लढ्याच्या नेत्यांना तो असलाच पाहिजे. त्याच दृष्टीनें संयुक्त महाराष्ट्र समितीनें मुंबईंत संप हरताळ अलीकडे हाताळला नाहीं, इतकेंच नव्हे तर ठाकुरद्वारसारख्या ठिकाणीं दगडफेक चालतेसें दिसतांच गिरगांवांतील सत्याग्रहहि मध्यंतरीं तहकूब केला होता. प्रक्षोभक वातावरण यत्किंचितहि उत्पन्न होऊं न देण्याबद्दल संयुक्त महाराष्ट्र समिति अत्यंत जागरूक आहे आणि अखंड संप, बेमुदत हरताळ यांच्या मर्यादा व पथ्य लक्षांत घेऊन त्या दिशेला संयुक्त महाराष्ट्राचा लढा लागण्याच्या बाबतींत समिति अत्यंत काटेकोर राहिल्यास तें स्वाभाविक ठरेल.

मुंबई-बेळगांव-कारवार-निपाणीसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति करण्याचा प्रश्न साऱ्या मराठी भाषिकांचा आहे हें तर खरेंच; पण या बाबतींतील अन्यायाची बोंच व खोच मुख्यतः मुंबई-बेळगांवच्या जिव्हारीं भिडलेली असून, परिणाम याच ठिकाणीं भोगावे लागणार असल्यामुळें जो कांहीं लढा व्हावयाचा तो मुख्यतः मुंबई व बेळगांवांतील लोकांनाच द्यावा लागेल हें विसरून चालणार नाहीं. सर्वच मराठी भाषिक दुःखित व व्यथित आहेत. पण मुंबई-बेळगांवचें दुःख हें या टापूबाहेरच्या मराठी भाषिकांना शीतल जरी वाटलें नाहीं तरी त्यांना तें जळतें व असह्य ठरेलच असें म्हणतां येत नाहीं. मुंबई व बेळगांव-कारवार तोडला असला तरी तीन कोटी मराठी भाषिक एकत्र आले आहेत, त्यांची एकात्मता साधावयाची आहे, विकास घडवून आणावयाचा आहे. सैतानाला आत्मा विकून नव्या राज्याचे उपभोग घेण्याचा बुद्धिनिष्ठ व्यवहारीपणा मराठी भाषिकांच्या विशिष्ट गटांत आजच दिसून येत आहे; पोटचा गोळा मोगल सम्राटांच्या जनानखान्यांत लोटून ऐषआरामाचें निर्धास्त जीवन पूर्वीहि रजपूत राजेरजवाडे

जगत असत. मुंबई दिल्लीला देऊन विदर्भ-मराठवाड्यासह मराठी भाषिकांचे छत्रपति होण्याचा हव्यास आजच दिसत आहे. अशा स्थितींत मुंबई-बेळगांवचा प्रश्न तेथल्या लोकांनींच सोडवून घेतला पाहिजे व महाराष्ट्रांतील हक्काचें स्थान हक्कानें मिळविलें पाहिजे या दिशेनें मुंबईचे व बेळगांव-कारवारचे मराठी भाषिक शांततेच्या मार्गानें दीर्घकालीन लढा कसा देऊं शकतील याची चिकित्सा करणें अपरिहार्य आहे.

८-७-५६

दंगेधोपे, घातपात व सशस्त्र क्रान्ति

मुंबई-बेळगांव-कारवार-निपाणीचा अंतर्भाव महाराष्ट्रांत करण्याच्या चळवळींत अनत्याचाराचें व्रत अत्यंत कसोशीनें पाळलें पाहिजे, याविषयीं संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत सामील असलेल्यांचें संपूर्ण मतैक्य आहे आणि तत्त्व किंवा व्यवहार यांपैकीं कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी त्याबाबत द्विधा मत होणार नाहीं मुंबईचा प्रश्न जे रस्त्यावर सोडवूं पहातील त्यांचा रस्त्यावरच फडशा पाडण्यांत येईल असें प. जवाहरलाल नेहरु यांनीं अमृतसर येथें ऑ. इं. कॉं कमिटीच्या बैठकींत सांगितलें, आणि सरकार या संज्ञेस पात्र असलेली कोणतीच संघटना दहशतीला शरण जाणार नाहीं असें त्यांनीं बजावलें. दगडधोंडे हीं माणसांचीं साधनें नसून माकडांचीं आहेत असें त्यांनीं मुंबईच्या ऑ. इं कॉं. कमिटींत सांगितलें. त्यांचीं ही विधानें वस्तुस्थितिदर्शक असून केवळ राज्यकर्त्यांच्या मगरूरींचीं नाहींत हें लक्षांत घेतलें पाहिजे. दंग्याधोप्यांना सरकार वश होणार नाहीं असें पं. नेहरूना अमृतसर येथें आणि मुंबईस सांगावें लागलें तेंहि निष्कारण नव्हे. आंध्रमध्यें श्री रामलू यांनीं आमरण उपवास करून देह ठेवल्यानंतर तेथें लोकक्षोभ दंगलीच्या व आगगाड्या अडविण्याच्या रूपानें प्रकट झाला आणि योगायोगानें त्यानंतरच आंध्रची मागणी मध्यवर्ति सरकारनें मान्य केली. १६ जानेवारी रोजीं मुंबई केंद्रशासित ठेवण्याचा निर्णय भारत सरकारनें जाहीर केल्यावर मुंबईत दंगल माजली आणि त्यानंतरच अमृतसर काँग्रेसमध्यें कोणताहि

निर्णय लोकशाहीत अखेरचा नसतो आणि मुंबईचाहि निर्णय याच न्यायानें अखेरचा नाहीं असें पं. नेहरूंनीं जाहीर केलें. लोकक्षोभ दंग्याच्या स्वरूपांत प्रकट होऊन दळणवळण थांबविण्याच्या किंवा संप-हरताळाच्या योगानें समाजजीवन विस्कळित झालें की, सत्ताधारी आपली भूमिका सोडून लोकांच्या मागण्या मान्य करतात, किंवा एखाद्याच्या आमरण उपवासानें सरकारी निर्णय उलथेपालथे होऊं शकतात, असा समज कोणत्याहि घटनेनें किंवा योगायोगानें बळावला तर अनवस्था परिस्थिति निर्माण झाल्याशिवाय राहाणार नाहीं आणि राज्यसंघटनाहि टिकणार नाहीं. या दृष्टीनें पं. नेहरूंची अमृतसर-मुंबईची गर्जना अप्रयोजक म्हणतां येणार नाही. रस्त्यावर जे येतात त्यांचा फडशा रस्त्यावर पाडण्याची सरकारची शक्ति अमर्याद व अनिर्बंध अशीच आहे हें अनुभवानें दिसून आलें आहे; किंबहुना तसा पडताळा कोठेंहि खुट्ट झालें कीं लोकांना पटविण्यास राज्ययंत्राधिकारी एक प्रकारें उत्सुक असतात व दंगेखोरीच्या पाठीचा कणा मणक्यागणिक मोकळा करण्यासाठीं पोलिसांच्या सर्व शक्ती सुक्याबरोबर ओलेंहि सर्रास जाळण्यास कमी करीत नाहींत.

मुंबईंत जानेवारी दंगलींत ७१ लोक गोळीबारांत ठार झाले, सुमारें ३५० जखमी झाले, शेकड्यांनीं लोकांना पोलीस-कोठडी पहावी लागली आणि अश्रुधुरानें लोकांस किती उपद्रव झाला असेल व घरोघरीं या ना त्या निमित्तानें दंगलीच्या काळांत व नंतर घुसून पोलिसांनीं किती धुमाकूळ घातला असेल हें तर सांगतांहि येणार नाहीं. दंगलीच्या स्वरूपांत लोकक्षोभ प्रकट झाला कीं लोकाराधनेच्या लोकशाही जमान्यांत त्यायोगें राज्यकर्ते अंतर्मुख होऊन लोकांच्या मागणीचा साराप्तार विचार करण्यास प्रवृत्त होतात व कोठें आपली चूक वाटली तर ती दुरुस्तहि राज्यकर्त्यांकडून होते, हें खरें आहे; पण त्याचा अर्थ दंगलीपुढें हार खाण्याइतकें सरकार दुबळें असतें असा मात्र करून चालणार नाहीं. राज्यकर्त्यांच्या सशस्त्र संघटनेपुढें दंगलीची मात्रा चालत नाहीं याचें ताजें उदाहरण पोझनानाचें आहे. दंगेखोराचा समाचार तेथें रणगाडे व तोफांनीं घेतला आणि सरकारी दडपशाहीचा वरवंटा कसा गरगरां फिरूं शकतो याचें पोझनानमध्यें उत्कृष्ट प्रदर्शन झालें. संतापाच्या भरांत दगड भिरकावले जातात, एखादें बांकडें रस्त्यावर ओढून रहदारी अडविण्यांत येते, प्रसंगोपात एखादा फटाका किंवा ॲसिड-बल्ब फुटतो; पण दगडांवर बंदुकीच्या गोळ्या, रस्त्यावरच्या बांकड्यावर रणगाडे आणि फटाका-ॲसिडबल्बवर लष्कर असा सवाई तोडगा राज्यकर्त्यांजवळ सज्ज असतो. रस्त्यावर प्रश्न सोडवूं इच्छिणारांचे मुडदे रस्त्यावर पाडून दंगलीचा फडशा पाडण्याचें सामर्थ्य सत्ताधाऱ्यांजवळ अलोट असल्यामुळें दंगल म्हणजे पतंगानें दिव्यावर झेंप घेण्यांतलाच भाग ठरतो, किंबहुना दंगलीच्या निमित्तानें लढ्याच्या

धुरीणांना कोणत्या ना कोणत्या तरी तोहमतीखालीं राज्यकर्ते सहज उचलूं शकतात ! दंगलीच्या मार्गानें संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न धसास लागण्यासारखा नाहीं हें यावरून उघड होतें. आपण म्हणूं तें लोकांना मान्य असून मूठभर चळवळ्यांची कुरकूर कानांवर न घेतां लोकांच्या गळीं आपले निर्णय उतरवितां येतील असा भ्रम ओसरून त्यांनीं अंतर्मुख होण्यास लोकक्षोभात्मक दंगल ही धक्का देण्याचें तंत्र ऊर्फ शॉकट्रॅक्टिक्स या नात्यानें प्रसंगोपात कारणीभूत होतेही. पण तो गुण दंगलीचा नसून राज्यकर्त्यांच्या लोकानुनय-प्रवृत्तीचा होय, पण दंगलीच्या बाबतींत हा नियम होऊं शकत नाहीं ; किंबहुना दंगल ही राज्यकर्त्यांच्या दडपशाहीस ऊत आणण्यासच कारणीभूत होते. केवळ व्यवहाराच्या दृष्टीनें पाहिलें तरी दंगल टाळण्यावर सर्वच नेत्यांनीं, संघटनांनीं व लढा यशस्वी व्हावा असें वाटणाऱ्या प्रत्येकानें अत्यंत कटाक्ष ठेवला पाहिजे यांत संशय उरत नाहीं.

दंगल म्हणजे राज्यकर्त्यांच्या दारूगोळ्याच्या आगींत लोकांचे निष्कारण बळी पडणें होय व त्याच्या परिणामीं लोकांमध्यें दहशतीचें वातावरण उत्पन्न होतें आणि हें वातावरण फैलावल्यास मागणीच खच्ची होण्याचा धोका निर्माण होतो. अशा दहशतीच्या वातावरणांतून प्रतिकाराची लाट उसळल्याचें व प्रतिदहशत बसविण्यासाठीं गुप्त व घातपाती संघटनाहि निर्माण होण्याचे दाखले अनेक सांपडतील. ब्रिटिश राजवटींत अशी दहशतवादी संघटना भारतांत भुईगत स्वरूपांत होती. पं. नेहरु म्हणतात त्याप्रमाणें दगडधोंडे हीं माकडाचीं साधनें होत. दगडांचें साधन अत्यंत प्रभावी करण्यासाठीं मानवानें आपली बुद्धि दर पिढीगणिक रावबिली आणि त्यातूनच धनुष्यबाण, दारुगोळा वापरणाऱ्या बंदुका तोफा व आजं अणुबाँबांची निर्मिती झालेली आहे. माकडांच्या हातांतील दगडधोंडे हे दगडधोंडेच राहिले पण माणसाच्या सहारक वृत्तीनें त्यांना अणुबाँबचें परिणत स्वरूप दिलें आहे. राज्यकर्त्यांनी शस्त्रास्त्रांनीं धोपटून काढण्यास सुरुवात केली की, सर्वसामान्य माणूस भयभीत व गर्भगळित होतो, पण हजारांत किंवा लाखांत एखादा इसम दहशतीला दहशतीनेंच उत्तर देण्याच्या ईर्षेस पेटतो व त्यांतून घातपातांची मालिका सुरू होते. पण दहशतवादी हालचाल ही गुप्तपणाशिवाय होऊं शकत नसल्यामुळें ती विशिष्ट लोकांपुरतीच मर्यादित असते; दहशत व प्रतिदहशत यांच्या टक्करींत लोकांची पांचावर धारण बसून आपण त्यापासून निराळे आहोंत हें दाखविण्याची व राज्यनिष्ठेचा शिक्का ठोकून घेण्याची शर्यतच लागते आणि राजरोस अन्यायांविरुद्ध ब्र काढण्यासहि लोक धजेनासे होतात. दहशतवादी हालचालींची लोकांना खच्ची करण्यांत व सामुदायिक आंदोलन अशक्य करण्यांत जी परिणति होते ती लक्षांत घेऊन महात्माजींनीं त्याविरुद्ध स्वातंत्र्यलढ्याच्या काळांत सतत प्रचार केला. दहशतवाद्यांच्या तुरुंगांत गांठीभेटी घेऊन त्यांना शांतनेच्या चळवळीचा मार्ग हाच

तत्त्व, नीति अगर व्यवहार या दृष्टीनें श्रेयस्कर असल्याचें पटवून त्यांचें मतपरिवर्तन त्यांनीं घडवून आणलें आणि दहशतवादी प्रवृत्तीचें निर्मूलन केलें.

सत्ताधाऱ्यांच्या शस्त्रास्त्रांच्या संघटनेस तोंड देऊन सरकारी यंत्राचा पाडाव करण्याचा ऊर्फ सशस्त्र बंडाळीचा उद्योग म्हणजे दहशतवादाची पुढची पायरी होय. शस्त्रांस्त्रांशीं शस्त्रस्त्रांनीं सामना देण्याचा प्रयोग कम्युनिस्टांनीं तेलंगणमध्यें करून पाहिला. पण अखेर त्यांना शस्त्रास्त्रे सरकारच्या स्वाधीन करावीं लागलीं आणि मतदान पेटयांमार्फत क्रांति घडवून आणण्याचा मार्ग श्रेयस्कर असें पांघरूण शस्त्रास्त्रांच्या आघाडीवरील या पिछेहाटीवर त्यांना घालावें लागलें. सांप्रत नागा लोक शस्त्रास्त्रांचा मार्ग राजरोसपणें आचरीत आहेत. पण दुसऱ्या महायुद्धांत तेथें टाकलीं गेलेलीं पराभूतांची शस्त्रास्त्रें आज त्यांच्या हातीं आहेत असें दिसतें मोरोक्को व अल्जेरियांत सशस्त्र उठाव कोणत्या मर्यादेपर्यंत जाऊं शकतो हें दिसून येत आहे; आणि सायप्रस त्याच दिव्यांतून जात आहे. चोरटया रीतीनें तयार केलेलीं शस्त्रास्त्रें सरकारच्या शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांपुढें व शस्त्रागारांपुढें अखेर बलहीन ठरतात. भरपूर शस्त्रास्त्रें परदेशांतून मिळूं शकलीं तरच सशस्त्र क्रांति नेट धरूं शकते व प्रसंगीं राज्ययंत्राला धक्काहि देऊं शकते, पण परदेशांतून मिळणारीं शस्त्रास्त्रें नेहमीं सहेतुकच असतात. सशस्त्र क्रांति यशस्वी झाली तरी कालांतरानें शस्त्रास्त्रांचा सहेतुक पुरवठा करणाऱ्या परदेशाच्या आहारीं ती केव्हां जाईल याचा नेम नसतो. दगडधोंडयांच्या दंगलीपासून शस्त्रास्त्रांच्या उठावापर्यंतचे मार्ग अशा रीतीनें तपासून पाहिले तर राज्यकर्त्यांना कांहीसें अंतर्मुख करण्यास ते फार तर अंशमात्रानें कारणीभूत होतात, पण त्याहीपेक्षा अन्याय व दडपशाहीची धार वाढविण्यासच कारणीभूत होतात; आणि दहशतीनें भारलेल्या वातावरणांत अन्याय सहन न करण्याची लोकांची साहजिक प्रवृत्ति आणि शक्ति सामुदायिक स्वरूप धारण करून कधीं प्रभावी होऊं शकत नाहीं हें लक्षांत येतें.

संयुक्त महाराष्ट्राचे नेते व कार्यकर्ते अनत्याचारी पथ्य या चळवळीसाठी कां सांगतात याचें मर्म यावरून लक्षांत येण्यासारखें आहे. कायदेमंडळापुरताच संयुक्त महाराष्ट्राचा लढा मर्यादित झाला आणि अनेक अडचणी व अडथळे ओलांडून अशी आघाडी प्रभावी ठरली तरी तो लढा कायदेमंडळांतील सभासदांपुरताच मर्यादित राहातो, व मतदानाच्या किंवा कायदेमंडळाच्या अधिवेशनाच्या वेळेपुरताच तो नैमित्तिक ठरून सामुदायिक स्वरूपांत नित्याच्या व्यवहारांत उतरूं शकत नाहीं. कायदेमंडळांतून लढा चालविण्याचें दुसरें टोंक म्हणजे अनत्याचाराचें पथ्य कांटेकोर रीतीनें न पाळतां चळवळ पुढें रेटणें हें होय.

पण अशी उठावणीहि नैमित्तिक व मर्यादितच राहून सामुदायिक व नित्य चळवळीस घातुक ठरल्यावांचून राहात नाहीं. सर्वांना सतत व संघटित रीतीनें पार पाडतां येईल असा प्रभावी कार्यक्रम संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनें लोकांना दिला पाहिजे. त्याचें स्वरूप कसें असणें शक्य, उचित व फलदायी ठरेल याचें विवेचन करणें आतां क्रमप्राप्त आहे.

१०-७-५६

मुंबई-बेळगांवचा जळता निखारा

मुंबईचा आणि बेळगांवच्या मराठी भागाचा प्रश्न तेथील लोकांनींच सोडवावयाचा असून, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ चालविण्याबाबत महाराष्ट्रांत ज्या अडचणी आणि विलोभनें आहेत तीं मुंबई बेळगांवच्या बाबतींत नाहींत. मुंबई-बेळगांव कापून काढलेल्या खंडित महाराष्ट्रावर राज्यवस्त्रें चढवावयाचीं आहेत आणि निवडणुकी जिंकून हा लंढा सत्तास्वीकारामार्फत चालवावा कीं विरोधी बाकांवर बसून चालवावा हा महाराष्ट्रापुढील कूट प्रश्न सोडवितांना संयुक्त महाराष्ट्रवाद्यांना पक्षीय नीति आड येणारी आहे. तोडलेल्या मुंबईच्या मस्तकावर कोणी राजमुगुट चढविणार नाही, प्रादेशिक कायदेमंडळांत मुंबईला स्थान नाहीं आणि लोकसभेंत जाणारे मुंबईचे प्रतिनिधी तेथें तोंड वासून बसतील किंवा फार तर भाषणें करतील. बेळगांव मराठी भाषिकांचे प्रतिनिधी कन्नड कायदेमंडळांत गेले तरी त्यांचा आवाज दोन कोटी कन्नडिगांच्या प्रतिनिधींमध्यें अरण्यरुदनासारखा ठरेल व त्यांना कोणी विचारणार नाहीं. महाराष्ट्रापुढें राज्योपभोग कीं वनवास असा प्रश्न असेल, पण मुंबई व बेळगांवपुढें वनवासाशिवाय दुसरा पर्यायच नाहीं. केंद्रशासन आणि कन्नडशासनाखालीं साऱ्या पक्षांचें घोडें सारखेंच ठरणार असल्यामुळें वनवासाच्या काळांत तेथें पक्षभेदहि मावळल्याशिवाय राहाणार नाहींत. महाराष्ट्रांत दंगाधोपा झाला तर दंडुका चालवितांना महाराष्ट्रीय राज्यकर्त्यांना मनाची व जनाचीहि खंत वाटेल. मुंबईंत दिल्लीच्या बंदुका व बेळगावांत कन्नड काठ्यालाठ्या दंगलीच्या प्रसंगीं जन्माची याद राहील असा प्रताप गाजवितील.

महाराष्ट्राला मुंबई–बेळगांव मिळवावयाचा आहे व तो गेल्याचें दुःखहि आहे, पण त्याशिवाय महाराष्ट्राचें गाडें अडून राहाणार नाहीं; म्हणजेच ना. कुंटे म्हणतात त्याप्रमाणें मुंबई–बेळगांवचा प्रश्न हा महाराष्ट्राच्या जीवनमरणाचा नाहीं. मुंबई–बेळगां चें मात्र जीवनमरणच या प्रश्नावर अवलंबून आहे. अशा स्थितींत मुंबई–बेळगांवचे लोक कसे वागतात इकडे साऱ्यांचे डोळे आज लागलेले आहेत, आणि उद्यां साऱ्या भारताचेही डोळे लागल्याशिवाय राहाणार नाहींत.

कोणत्याहि ठिकाणचा राज्यकारभार हा तेथील लोकांच्या सहकार्याशिवाय चालूं शकत नाहीं. दैनंदिन जीवनांत हें सहकार्य मुंबई–बेळगांवच्या लोकांनीं संपूर्णपणें नाकारतांच या ठिकाणचा राज्यकारभार चालविणें सत्ताधाऱ्यांना अशक्य-प्राय झाल्याशिवाय राहाणार नाहीं. कन्नडिगांना बेळगांवचा व दिल्लीला मुंबईचा असा पेटता निखारा पदरांत बांधून वावरण्यापेक्षां तो झटकून टाकण्याशिवाय गत्यंतर उरणार नाहीं कायदेमंडळांतील लढा या ना त्या स्वरूपांत चालू राहील, सत्याग्रहांत हजारों लोक सामील होतील, पण त्यांत प्रत्येक जण भाग घेऊं शकतोच असें नाहीं व त्या त्या प्रसंगापुरतीच ती हालचाल असते. चळवळ ही प्रसंगनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ असते, पण तिचें यश जनतेच्या दररोजच्या जीवनांतून प्रतीत होणाऱ्या त्या चळवळीबद्दलच्या आपुलकीनें व अन्यायाबद्दलच्या प्रतिकारात्मक भावनेनेंच साध्य होत असतें. उपजीविकेसाठीं प्रत्येकाला कामधंदा तर करावा लागतोच, व तो ऐन चळवळ सुरू असतांनाहि सुटूं शकत नाहीं. पण त्याबाहेरचा स्वेच्छेप्रमाणें जो दैनंदिन जीवनक्रम असतो तो अन्याय्य घटनेबद्दलच्या प्रतिकारात्मक भावनेनें ओतप्रोत असूं शकतो; व अशा भावनेच्या आविष्कारानें कोणताहि प्रश्न हा जळत्या निखाऱ्यापेक्षांहि जास्त दाहक व असह्य होतो. लोकशाहींत राज्यकर्त्यांनाहि सभा–समारंभाच्या रूपानें आपली जास्त लोकप्रियता व लोका-राधना सिद्ध करावयाची असते, किंबहुना तो त्यांचा प्राण असतो. हे त्यांचे प्राण हिरावून घेणें ही गोष्ट प्रत्येक असंतुष्ट नागरिकाच्या हातची व सहज रीत्या साध्य होणारी अशी आहे. मुंबईच्या केंद्रशासनाला व बेळगांवच्या कन्नडशासनाला जे जबाबदार असतील,–मग ते पं. नेहरूंसारखे त्रिखंड कीर्तीचे नेते– असेनात, कां अशा शासनाची जबाबदारी जें उचलतील–मग ते बडे सत्ताधारी कां असेनात–आणि त्यांत प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें जे सहभागी असतील–मग ते कालपर्यंतचे आपण निवडून दिलेले प्रतिनिधी कां असेनात,–त्यांचा संपर्क संपूर्णपणे टाळून केंद्रशासनाबद्दलची व कन्नड शासनाबद्दलची तिडिक लोक जरूर दाखवूं शकतात.

दगड टाकणें हा माकडांचा धर्म असेल, पण जें नको त्यापासून व त्यास जबाबदार असलेल्यांपासून शक्य तितकें दूर राहून आपला असंतोष व्यक्त करणें

हा मानवाचा धर्म आहे. लहान मूलहि स्वतःच्या आईबापांच्या बाबतींत रुसून हा मानवी स्वभावधर्म दाखवितें. पं. नेहरूंसारख्यांची मराठी विभागास भेट झाली आणि सरकारी गोतावळयाशिवाय मराठी भाषिकांचा शुकशुकाट त्यांना तेथें आढळला, सभांना मराठी भाषिक औषधालाहि दिसला नाहीं, भेटीचे रस्ते व वस्त्या जशा कांहीं ओस पडल्या, अधिकाऱ्यांकडे मोहब्बत साधण्यासाठीं किंवा मदतीसाठीं कोणी मराठी माणूस फिरकला नाहीं, आणि केंद्रशासित मुंबई व कन्नडशासित बेळगांवास प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें साहाय्यभूत झालेल्यांना लोकांमधून उठल्यासारखें वाटण्याचा प्रसंग जर ओढवला तर लोकांच्या मर्जीविरुध्द नको ती मुंबई व बेळगांव, असें सर्वांनाच झाल्या-वांचून राहाणार नाहीं. अशा प्रकारचा सामाजिक बहिष्कार आणि राजकीय रखरखाट यशस्वी करतांना त्याची झळ लोकांनाहि लागल्याशिवाय राहाणार नाही. नोकऱ्या मिळणार नाहींत, बढत्या पदरीं पडणार नाहींत, दैनंदिन सुखसोईंना अंतरावें लागेल आणि मोहबतीनें मिळणारे लाभाचे योग हातचे निसटतील व जनांत असून वनवास घडल्यासारखें होईल. पण मुंबई–बेळगांवची धग ज्यांच्या अंतर्यामीं आहे त्यांनीं इतक्या क्लेशांस व त्यागास तयार असलें पाहिजे. बंगभंगाच्या वेळीं लो.टिळकांनीं इतके क्लेश सोसण्याची कुवत व इतका निग्रह लोकांच्या ठिकाणीं नाहीं काय, असा प्रश्न कलकत्त्याच्या भाषणांत केला होता. जर तसा नसेल व मुंबईची व बेळगांवची आंच ओंठां–तोंडापुरतीच असेल तर मुंबई केंद्रशासित व बेळगांव भाग कन्नडशासित राहाणें हें आमच्या लेखीं उचितच होय. अन्यायाचा पीळ आंतड्यांना पडला पाहिजे; आणि तसा तो पडलेला असल्यावर लो. टिळकांनीं प्रत्येकाच्या आवाक्यांतील व दैनंदिन जीवनांत उतरण्यासारखा जो बहिष्काराचा योग बंगभंगावर सांगितला तो आजच्या घडीला मुंबई-बेळगांवांत आचरला गेला पाहिजे. लो. टिळकांनीं बंगभंगावर जो तोडगा सांगितला तोच मुंबई-बेळगांवच्या महाराष्ट्रापासून होणाऱ्या ताटातुटीवर काल-पुरुष सांगत आहे, व त्याची अंमलबजावणी मुंबईकरांकडून व बेळगांवकरांकडून कशी होते इकडे साऱ्या न्यायप्रिय सज्जनांचें लक्ष लागणारें आहे.

नेहरूंवर मुंबईबाबत विश्वास ठेवा असें महाराष्ट्रनेते व श्री. जयप्रकाश-जींसारखे नेते सांगत आहेत. पण आतां स्वतःवर विश्वास ठेवा असें सांगण्याची वेळ आहे. पं. नेहरूंवर महाराष्ट्रानें व मुंबई–बेळगांवनें जरूर विश्वास ठेवावा, पण विश्वास हाहि एकांगी असूं शकत नाहीं. मुंबईचा अन्याय पं. नेहरु दूर करतील असा विश्वास महाराष्ट्रानें व मुंबईनें ठेवावा, मग महाराष्ट्र व मुंबई अन्य भाषिकांशीं न्यायनीतीनें वागून त्यांच्या नुकसानीस कारण होणार नाहीं, अशा श्री. देवांच्या व महाराष्ट्र-नेत्यांच्या वचनावर पं. नेहरूंनीं विश्वास कां ठेवूं नये आणि

महाराष्ट्राला मुंबई–बेळगांव मिळवावयाचा आहे व तो गेल्याचें दुःखहि आहे, पण त्याशिवाय महाराष्ट्राचें गाडें अडून राहाणार नाहीं; म्हणजेच ना. कुंटे म्हणतात त्याप्रमाणें मुंबई–बेळगांवचा प्रश्न हा महाराष्ट्राच्या जीवनमरणाचा नाहीं. मुंबई–बेळगां चें मात्र जीवनमरणच या प्रश्नावर अवलंबून आहे. अशा स्थितींत मुंबई–बेळगांवचे लोक कसे वागतात इकडे साऱ्यांचे डोळे आज लागलेले आहेत, आणि उद्यां साऱ्या भारताचेही डोळे लागल्याशिवाय राहाणार नाहींत.

कोणत्याहि ठिकाणचा राज्यकारभार हा तेथील लोकांच्या सहकार्याशिवाय चालूं शकत नाहीं. दैनंदिन जीवनांत हें सहकार्य मुंबई–बेळगांवच्या लोकांनीं संपूर्णपणें नाकारतांच या ठिकाणचा राज्यकारभार चालविणें सत्ताधाऱ्यांना अशक्य-प्राय झाल्याशिवाय राहाणार नाहीं. कन्नडिगांना बेळगांवचा व दिल्लीला मुंबईचा असा पेटता निखारा पदरांत बांधून वावरण्यापेक्षां तो झटकून टाकण्याशिवाय गत्यंतर उरणार नाहीं कायदेमंडळांतील लढा या ना त्या स्वरूपांत चालू राहील, सत्याग्रहांत हजारों लोक सामील होतील, पण त्यांत प्रत्येक जण भाग घेऊं शकतोच असें नाहीं व त्या त्या प्रसंगापुरतीच ती हालचाल असते. चळवळ ही प्रसंगनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ असते, पण तिचें यश जनतेच्या दररोजच्या जीवनांतून प्रतीत होणाऱ्या त्या चळवळीबद्दलच्या आपुलकीनें व अन्यायाबद्दलच्या प्रतिकारात्मक भावनेनेंच साध्य होत असतें. उपजीविकेसाठीं प्रत्येकाला कामधंदा तर करावा लागतोच, व तो ऐन चळवळ सुरू असतांनाहि सुटूं शकत नाहीं. पण त्याबाहेरचा स्वेच्छेप्रमाणें जो दैनंदिन जीवनक्रम असतो तो अन्याय्य घटनेबद्दलच्या प्रतिकारात्मक भावनेनें ओतप्रोत असूं शकतो; व अशा भावनेच्या आविष्कारानें कोणताहि प्रश्न हा जळत्या निखाऱ्यापेक्षांहि जास्त दाहक व असह्य होतो. लोकशाहींत राज्यकर्त्यांनाहि सभा–समारंभाच्या रूपानें आपली जास्त लोकप्रियता व लोका-राधना सिद्ध करावयाची असते, किंबहुना तो त्यांचा प्राण असतो. हे त्यांचे प्राण हिरावून घेणें ही गोष्ट प्रत्येक असंतुष्ट नागरिकाच्या हातची व सहज रीत्या साध्य होणारी अशी आहे. मुंबईच्या केंद्रशासनाला व बेळगांवच्या कन्नडशासनाला जे जबाबदार असतील,–मग ते पं. नेहरूंसारखे त्रिखंड कीर्तीचे नेते– असेनात, कां अशा शासनाची जबाबदारी जे उचलतील–मग ते बडे सत्ताधारी कां असेनात–आणि त्यांत प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें जे सहभागी असतील–मग ते कालपर्यंतचे आपण निवडून दिलेले प्रतिनिधी कां असेनात,–त्यांचा संपर्क संपूर्णपणे टाळून केंद्रशासनाबद्दलची व कन्नड शासनाबद्दलची तिडिक लोक जरूर दाखवूं शकतात.

दगड टाकणें हा माकडांचा धर्म असेल, पण जें नको त्यापासून व त्यास जबाबदार असलेल्यांपासून शक्य तितकें दूर राहून आपला असंतोष व्यक्त करणें

हा मानवाचा धर्म आहे. लहान मूलहि स्वतःच्या आईबापांच्या बाबतींत रुसून हा मानवी स्वभावधर्म दाखवितें. पं. नेहरूंसारख्यांची मराठी विभागास भेट झाली आणि सरकारी गोतावळयाशिवाय मराठी भाषिकांचा शुकशुकाट त्यांना तेथें आढळला, सभांना मराठी भाषिक औषधालाहि दिसला नाहीं, भेटीचे रस्ते व वस्त्या जशा कांहीं ओस पडल्या, अधिकाऱ्यांकडे मोहब्बत साधण्यासाठीं किंवा मदतीसाठीं कोणी मराठी माणूस फिरकला नाहीं, आणि केंद्रशासित मुंबई व कन्नडशासित बेळगांवास प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें साहाय्यभूत झालेल्यांना लोकांमधून उठल्यासारखें वाटण्याचा प्रसंग जर ओढवला तर लोकांच्या मर्जीविरुध्द नको ती मुंबई व बेळगांव, असें सर्वांनाच झाल्यावांचून राहाणार नाहीं. अशा प्रकारचा सामाजिक बहिष्कार आणि राजकीय रखरखाट यशस्वी करतांना त्याची झळ लोकांनाहि लागल्याशिवाय राहाणार नाहीं. नोकऱ्या मिळणार नाहींत, बढत्या पदरीं पडणार नाहींत, दैनंदिन सुखसोईंना अंतरावें लागेल आणि मोहबतीनें मिळणारे लाभाचे योग हातचे निसटतील व जनांत असून वनवास घडल्यासारखें होईल. पण मुंबई-बेळगांवची धग ज्यांच्या अंतर्यामी आहे त्यांनीं इतक्या क्लेशांस व त्यागास तयार असलें पाहिजे. बंगभंगाच्या वेळीं लो.टिळकांनीं इतके क्लेश सोसण्याची कुवत व इतका निग्रह लोकांच्या ठिकाणीं नाहीं काय, असा प्रश्न कलकत्त्याच्या भाषणांत केला होता. जर तसा नसेल व मुंबईची व बेळगांवची आंच ओंठां-तोंडापुरतीच असेल तर मुंबई केंद्रशासित व बेळगांव भाग कन्नडशासित राहाणें हें आमच्या लेखीं उचितच होय. अन्यायाचा पीळ आंतड्यांना पडला पाहिजे; आणि तसा तो पडलेला असल्यावर लो. टिळकांनीं प्रत्येकाच्या आवाक्यांतील व दैनंदिन जीवनांत उतरण्यासारखा जो बहिष्काराचा योग बंगभंगावर सांगितला तो आजच्या घडीला मुंबई-बेळगांवांत आचरला गेला पाहिजे. लो. टिळकांनीं बंगभंगावर जो तोडगा सांगितला तोच मुंबई-बेळगांवच्या महाराष्ट्रापासून होणाऱ्या ताटातुटीवर कालपुरुष सांगत आहे, व त्याची अंमलबजावणी मुंबईकरांकडून व बेळगांवकरांकडून कशी होते इकडे साऱ्या न्यायप्रिय सज्जनांचें लक्ष लागणारें आहे.

नेहरूंवर मुंबईबाबत विश्वास ठेवा असें महाराष्ट्रनेते व श्री. जयप्रकाशजींसारखे नेते सांगत आहेत. पण आतां स्वतःवर विश्वास ठेवा असें सांगण्याची वेळ आहे. पं. नेहरूंवर महाराष्ट्रानें व मुंबई-बेळगांवनें जरूर विश्वास ठेवावा, पण विश्वास हाहि एकांगी असूं शकत नाहीं. मुंबईचा अन्याय पं. नेहरू दूर करतील असा विश्वास महाराष्ट्रानें व मुंबईनें ठेवावा, मग महाराष्ट्र व मुंबई अन्य भाषिकांशीं न्यायनीतीनें वागून त्यांच्या नुकसानीस कारण होणार नाहीं, अशा श्री. देवांच्या व महाराष्ट्र-नेत्यांच्या वचनावर पं. नेहरूंनीं विश्वास कां ठेवूं नये आणि

पांच वर्षें मुंबई केंद्रशासित ठेवण्याचा घोष त्यांनीं कां करावा? देवाचा भक्त जेवढा बांधलेला असतो त्याहिपेक्षा देव हा भक्ताच्या हांकेला धांवून येण्यास एका पायावर उभा असावा लागतो; नुसता नैवेद्य खाणारा व पूजा घेणारा देव असून भागत नाहीं. नेहरु काय म्हणतात, जयप्रकाशजी काय बोलतात, आचार्य विनोबांचा उपदेश काय आहे, लोहिया काय फुसकुल्या सोडतात, या सर्वांना महत्त्व आहे. पण तें सारें लक्षांत घेऊन आपल्या बुध्दीचा कौल जसा पडेल तसेंच वागले पाहिजे. परप्रत्यय-नेयता ही दौर्बल्यांतून उत्पन्न होते व दौर्बल्याला पोसते. बौध्दिक परप्रत्ययनेयता ही प्रथम मराठी भाषिकांनीं सोडली पाहिजे. केंद्रशासित मुंबई पत्करावी व बेळगांव कर्नाटकला द्यावा असें महाराष्ट्र कॉंग्रेस नेत्यांना स्वतःला वाटत असेल तर त्यांनीं जरूर तसें सांगावें. पण पं. नेहरु तसें म्हणतात असा आधार सांगूं नये. मुंबई केंद्रशासित झाली तरी चालेल असें मुंबईकरांना वाटत नाहीं व बेळगांवकरांना कन्नडशासन नको आहे, तर त्यांनीं त्याच निर्धाराला धरून वागलें पाहिजे. निर्धार असला म्हणजे मार्ग सुचूं लागतात व अंमलबजावणी करतांना चुका टाळून अखेर हमखास मार्ग सांपडतो. परप्रत्ययनेयबुध्दीला मार्गहि सुचत नाहींत व चुका वगळून रामबाण उपायापर्यंतहि ती पोहोंचत नाहीं. यमधर्माच्या बुध्दीनें सावित्री वागली असती तर सत्यवानाशिवाय कसें जगावें हा वैधव्यधर्म तिला पाळावा लागला असता आणि अढळपदाऐवजीं सावत्र आईची लाथ खाऊनहि सुखंच मे शयनं च मे कसें साधावें याचे धडे ध्रुवाला द्यावे लागले असते. मुंबईला महाराष्ट्राशीं संलग्न राहावयाचें आहे आणि महाराष्ट्रांतील अढळपद बेळगांवच्या मराठी भागाला पाहिजे आहे. अर्थातच मुंबई-बेळगांवनें आणि तसा ज्यांचा आग्रह असेल त्यांनीं कोण काय म्हणतो असली बौध्दिक गुलामगिरी न पत्करतां आत्मप्रत्ययाला धरूनच वागलें पाहिजे.

आगामी शास्त्र्यांशीं, त्यांच्या पुरस्कर्त्यांशीं व पाठीराख्यांशीं लो. टिळकांनीं प्रतिपादिलेल्या बहिष्कारयोगानें वागण्याचें बळ मुंबई व बेळगांवच्या लोकांच्या ठिकाणीं येण्यास परस्परसाहाय्यानें त्यांची कणखर आर्थिक संघटना बनली पाहिजे. आज मुंबईपुरतें पहावयास गेलें तर मराठी भाषिकांच्या योगक्षेमाची शेंडी त्यांच्या स्वतःच्या हातीं नाहीं हें दिसून येतें. मुंबई केंद्रशासित झाली तर इतकीं कारकून-कुटुंबें मुंबईबाहेर जातील, कारखाने-कचेऱ्यांतून मराठी भाषिकांना विरोध फलावला तर इतके कामगार व नोकर परागंदा होतील; व्यापारधंद्यांत मराठी भाषिकांची गळचेपी होत आहे व उद्या प्रसंग पडला तर दाणेबाजार मराठी वस्त्यांना अन्नान्न करावयास लावील, अशी पांचावर धारण मुंबईकरांची बसल्याचें दिसतें. मुंबईंत निम्मे मराठी भाषिक असतांना व त्यांतहि सुशिक्षितांचा मोठा भरणा असतांना मराठी भाषिकांची बाजू घेऊन सत्याचा व न्यायाचा प्रचार

करणारें एकहि इंग्रजी पत्र नाही व एखादेंच मराठी दैनिक उपाशी विठोबाच्या स्वरूपांत मराठी भाषिकांशीं समरस पावलेलें दिसतें, याची नुसती खंत असून काय करावयाचें ? निम्मी वस्ती जर मराठी भाषिकांची तर मुंबईच्या व्यापार-व्यवहाराचीं व क्षेमस्थैर्याचीं निम्मीं सूत्रें मराठी भाषिकांच्या हातीं असलीं पाहिजेत. तशीं जर असतीं तर मुंबईची मागणी आज जशी वाऱ्यावरच्या वावडीसारखी इतस्ततः होत आहे तशी ती दिसली नसती.

मुंबईत मराठी भाषिक आहेत, पण ते असून नसल्यासारखे आहेत. बहिष्कार योग आचरण्यास व्यक्ति किंवा समाज आर्थिक दृष्ट्या स्वायत्त असावा लागतो. दारिद्र्यांत कां होईना, पण जगणें शक्य व्हावें लागतें, त्यावेळीं बलिष्ठांशीं सामना देतां येतो. मुंबईतील मराठी समाज जर टिकून राहावयाचा असेल आणि त्याचें मत प्रभावी ठरावयाचें असेल तर बेकारी, उपासमार, उपेक्षा यांची भीति न उरण्याइतका तो आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झाला पाहिजे त्यासाठीं मुंबई-मधील मराठी भाषिकांची एकजूट झाली पाहिजे, आणि सर्व क्षेत्रांत मराठी भाषिकांच्या या एकजुटीनें आपलें स्थान पक्कें केलें पाहिज. मराठी भाषिकांनीं मराठी भाषिकांना सांवरून धरून कोसळूं द्यावयाचें नाहीं किंबहुना जेथें मराठी भाषिकांना स्थान व मान नाहीं अशा ठिकाणांकडे मराठी भाषिकांनीं ढुंकूनहि पाहातां कामा नये. परदेशनियंत्रित कारखाने-कचेऱ्यांतून हिंदी लोकांचें प्रमाण अगूक असलें पाहिजे अशी भारत सरकार अट घालूं शकतें, मग त्याच अनुरोधानें उद्योगधंद्यांत, व्यवसायांत, बाजारपेठेंत अर्ध्या मराठी भाषिकांची अर्धी भागा व सत्ता प्रस्थापित करण्याचा मराठी भाषिकांचा उद्योग अनुचित ठरणार नाहीं. तो सफल झाला नाहीं तर अशा व्यवसायांना, उद्योगधंद्यांना, व्यापाराला आश्रय देण्याचें नाकारून त्या त्या क्षेत्रांत मराठी भाषिकांची स्वतंत्र संघटना उभी झाली पाहिजे. आपल्या समाजाची शक्ति मुंबई शहरांत वाढविणें यांत दुसऱ्याचा द्वेष नाहीं, भाषिक मत्सर नाहीं, किंवा आक्रमक वृत्तीहि नाहीं. भारत सरकारच्या नीतीचेंच तें स्वायत्ती होण्याच्या बाबतींतील अनुकरण होय. पुढचा काळ मोठा कठीण आहे तो पांच वर्षांचा आहे का अधिक आहे कोणास माहीत ! कठीण काळांत स्वावलंबी व कणखर बाण्यानें जर टिकाव धरतां आला नाहीं तर मुंबईंत काय किंवा बेळगांव भागांत काय, मराठी भाषिक कदाचित् होते कीं नव्हते असे होऊन जातील. त्यांतून पार पडण्याकरितां पक्षभेद, मतभेद, पंथभेद सारें कांहीं बाजूला ठेवून मुंबईकरांनीं व बेळगांवकरांनीं विरोधकांच्या बाबतींत संपूर्ण बहिष्कारयोगाचें आचरण कसोशीनें केलें पाहिजे आणि एकजुटीनें वागून कोणत्याहि परिस्थितींत अस्तंगत व्हावें न लागतां लोकसंख्येच्या प्रमाणांत समाजजीवनाचीं व व्यवहाराचीं सूत्रें आपल्या हातीं येतील अशी खबरदारी घेतली पाहिजे. अशी राजकीय व आर्थिक

एकजूट झाल्यावर मुंबई काय किंवा बेळगांव काय, महाराष्ट्राबाहेर ठेवण्याचें सामर्थ्य कोणाच्याहि ठिकाणी आढळणार नाहीं. काय वाटेल ती किंमत देऊन नरडीशी भिडलेल्या अन्यायाचा प्रतिकार झालाच पाहिजे, अशी ऊर्मि आज मुंबई–बेळगावांतील प्रत्येकाच्या नसानसांत, रक्ताच्या थेंबाथेंबांत व उण्यापुऱ्या कर्तृत्वाच्या कणाकणांत आहे. त्या भावना, ते विचार व त्या आकांक्षा यांच्या अनुसंधानानें एकूण पांच लेखांत हें विवेचन केलें आहे. वाचकांनीं तें हंसक्षीरन्यायानें ग्रहण करावें अशी त्यांस विनंती आहे.

११–७–५६

प्रजासत्ताकाचा पिंड व ब्रह्मांड

आज भारतांत सर्वत्र आठवा प्रजासत्ताक दिन साजरा होत असून ध्वज–वंदन, सांस्कृतिक मिरवणुकी, सभा, रोषणाई वगैरे आनंद व हौसमौजेच्या कार्यक्रमांनीं आजच्या दिवशीचें वातावरण दुमदुमलेलें राहाणार आहे. भारताची राजधानी दिल्ली येथें प्रदेश राज्यांचीं सांस्कृतिक वैशिष्ट्यें दाखविणारी प्रचंड मिरवणूक, त्याचप्रमाणें राष्ट्रपुरुषांचे संदेश, ध्वजवंदन वगैरे कार्यक्रम दणाणणार असून प्रदेश राज्यांच्या राजधान्यांतहि असाच थाट उडणार आहे आणि लहान-मोठ्या शहरीं प्रजासत्ताकाच्या गौरवप्रशंसनाचे समारंभ साजरे होत आहेत. अमेरिकेंत घटनादिन हा एक प्रकारचा कृतकृत्यतेचा दिवस म्हणून पाळण्यांत येतो व त्या दिवशीं आनंद- मौज- उपभोगांत सबंध दिवस उत्स्फूर्त उत्साहानें पार पाडला जातो. वैभवाच्या व सामर्थ्याच्या शिखरावर असलेल्या अमेरिकन राष्ट्रीय उत्सवाच्या धर्तीवर पक्षातीत प्रचारातीत सार्वजनिक स्वरूपांत प्रजासत्ताक दिनाचा हिंदी सोहळा पार पडत आहे. अमेरिकेची कृतकृत्यता भारतांत प्रजासत्ताकदिनीं आढळण्याइतकें कर्तृत्व भारतानें गाजवलेलें आहे अगर यश संपादन केलें आहे असें अर्थातच कोणी म्हणणार नाहीं; पण कर्तृत्व–पराक्रमाच्या मार्गावर भारताची वाटचाल सतत सुरू असून त्यांत येणारे अडथळे यथाशक्ति ओलांडले जात आहेत, अडचणी बाजूला सारण्यांत येत आहेत, आणि अगतिकता उत्पन्न करणाऱ्या

परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न अखंड कमीजास्त वेगानें सुरू आहे आणि नवजात स्वतंत्र राष्ट्रांशीं तुलना करतांना भारताची कामगिरी प्रशंसनीय असल्याचा निर्वाळा बड्या राष्ट्रांकडून देण्यांत येत आहे, ही भारतीयांना समाधान देणारी बाब आहे यांत तर शंका नाहींच. शिवाय पारतंत्र्य मागें टाकून स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें भारत कमीअधिक वेगानें, शक्तीनें व यशस्वी रीतीनें मार्गक्रमण करीत आहे ही वस्तुस्थितीच एक प्रकारची कृतकृत्यतेची भावना उचंबळून आणण्यास समर्थ असून, आठवा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहानें सर्व उणींदुरीं बाजूला ठेवून व भेद–दुरावे विसरून भारतांत सर्वत्र साजरा होत आहे हें स्वाभाविक होय.

प्रजासत्ताकाची वाटचाल कमीअधिक वेगानें भारतांत सुरू असतांना त्याचा प्रभाव घरींदारीं प्रत्ययास आला पाहिजे आणि तसा ज्या वेळीं अनुभव येईल त्या वेळीं प्रजासत्ताक भारत निर्भय व सुप्रतिष्ठित झाला असें विश्वासपूर्वक म्हणतां येईल. परकीय आक्रमणापासून देशांतील स्वातंत्र्य व प्रजेची सत्ता ही सुरक्षित असली पाहिजे, पण त्याचबरोबर अंतर्गत धोक्यांनींहि प्रजासत्ता कळत न कळत खचून ती नाममात्र ठरण्याची व कालांतरानें निर्माल्यवत् ठरून, खरी सत्ता एखाद्या व्यक्तीच्या किंवा मूठभर लोकांच्या हातीं जाण्याची फार मोठी भीति असते. बाहेरचें आक्रमण चटकन् उमगतें व सर्व शक्तीनिशीं त्याचा प्रतिकारही राष्ट्रपुरुष करतो. पण लोकांच्या सत्तेचा तिळातिळानें कणाकणानें होणारा अपहार तसेंच स्थूल दृष्टीला चटकन् न दिसण्याइतक्या सूक्ष्म रीतीनें होणारें सत्तांतर हें तशाच जागरूक-तेशिवाय उमगत नाहीं, कळतवळत नाहीं. आणि तशा सत्तांतराचा प्रत्यय प्रसंग–विशेषीं आला तरी त्याचा प्रतिकार करावा अशी तडफड दिसत नाहीं.

धर्माप्रमाणेंच स्वातंत्र्याचीहि गति सूक्ष्म असते आणि जरा चुकीचें पाऊल पडलें तरी सुरू झालेली घसरगुंडी नंतर थांबविणें अवघड व अशक्य होऊन बसतें. परकी आक्रमणाबरोबरच अंतर्गत आक्रमणाबाबतहि जनता जागरूक, दक्ष व संवेदनक्षम असणें हा स्वातंत्र्याचा गाभा समजला जातो. घटनाबद्ध प्रजासत्तेमध्यें प्रत्येकाचें घर हें कोणत्याहि बहिर्गत व अंतर्गत आक्रमणापासून सुरक्षित अशा किल्ल्यासारखें आहे असा प्रत्यय आला पाहिजे. ब्रिटनमध्यें तसा साक्षात्कार होतो. म्हणूनच तेथील लोकशाही ही प्रतिष्ठित व अक्षय्य स्वरूपाची मानली जाते. मन मेलेलें असलें कीं अन्यायआक्रमणाची खंत वाटेनाशी होते, अन्याय किंवा आक्रमण दिसतांच त्याची तत्काळ संवेदना प्रकट होत नाहीं, अन्याय आक्रमणाच्या प्रतिकाराची धमक वाटत नाहीं. अन्याय किंवा आक्रमण दिसतांच ती स्थिति असह्य वाटून प्रतिकारासाठीं स्वत्वाचा प्रत्येक कण नि कण उसळून आला पाहिजे आणि अन्यायाचें परिमार्जन होईपर्यंत जिवाला चैन पडतां कामा नये. इतकी जागरूकता व तेजस्विता घरोघरीं संचरलेली असावी, त्या वेळीं प्रजासत्ता ही केवळ स्थूल

एकजूट झाल्यावर मुंबई काय किंवा बेळगांव काय, महाराष्ट्राबाहेर ठेवण्याचें सामर्थ्य कोणाच्याहि ठिकाणी आढळणार नाहीं. काय वाटेल ती किंमत देऊन नरडीशी भिडलेल्या अन्यायाचा प्रतिकार झालाच पाहिजे, अशी ऊर्मि आज मुंबई–बेळगावांतील प्रत्येकाच्या नसानसांत, रक्ताच्या थेंबाथेंबांत व उण्यापुऱ्या कर्तृत्वाच्या कणाकणांत आहे. त्या भावना, ते विचार व त्या आकांक्षा यांच्या अनुसंधानानें एकूण पांच लेखांत हें विवेचन केलें आहे. वाचकांनीं तें हंसक्षीरन्यायानें ग्रहण करावें अशी त्यांस विनंती आहे.

११–७–५६

प्रजासत्ताकाचा पिंड व ब्रह्मांड

आज भारतांत सर्वत्र आठवा प्रजासत्ताक दिन साजरा होत असून ध्वज–वंदन, सांस्कृतिक मिरवणुकी, सभा, रोषणाई वगैरे आनंद व हौसमौजेच्या कार्यक्रमांनीं आजच्या दिवशीचें वातावरण दुमदुमलेलें राहाणार आहे. भारताची राजधानी दिल्ली येथें प्रदेश राज्यांचीं सांस्कृतिक वैशिष्ट्यें दाखविणारी प्रचंड मिरवणूक, त्याचप्रमाणें राष्ट्रपुरुषांचे संदेश, ध्वजवंदन वगैरे कार्यक्रम दणाणणार असून प्रदेश राज्यांच्या राजधान्यांतहि असाच थाट उडणार आहे आणि लहान-मोठ्या शहरीं प्रजासत्ताकाच्या गौरवप्रशंसनाचे समारंभ साजरे होत आहेत. अमेरिकेंत घटनादिन हा एक प्रकारचा कृतकृत्यतेचा दिवस म्हणून पाळण्यांत येतो व त्या दिवशीं आनंद- मौज- उपभोगांत सबंध दिवस उत्स्फूर्त उत्साहानें पार पाडला जातो. वैभवाच्या व सामर्थ्याच्या शिखरावर असलेल्या अमेरिकन राष्ट्रीय उत्सवाच्या धर्तीवर पक्षातीत प्रचारातीत सार्वजनिक स्वरूपांत प्रजासत्ताक दिनाचा हिंदी सोहळा पार पडत आहे. अमेरिकेची कृतकृत्यता भारतांत प्रजासत्ताकदिनीं आढळण्याइतकें कर्तृत्व भारतानें गाजवलेलें आहे अगर यश संपादन केलें आहे असें अर्थातच कोणी म्हणणार नाहीं; पण कर्तृत्व–पराक्रमाच्या मार्गावर भारताची वाटचाल सतत सुरू असून त्यांत येणारे अडथळे यथाशक्ति ओलांडले जात आहेत, अडचणी बाजूला सारण्यांत येत आहेत, आणि अगतिकता उत्पन्न करणाऱ्या

परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न अखंड कमीजास्त वेगानें सुरू आहे आणि नवजात स्वतंत्र राष्ट्रांशीं तुलना करतांना भारताची कामगिरी प्रशंसनीय असल्याचा निर्वाळा बडचा राष्ट्रांकडून देण्यांत येत आहे, ही भारतीयांना समाधान देणारी बाब आहे यांत तर शंका नाहींच. शिवाय पारतंत्र्य मागें टाकून स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें भारत कमीअधिक वेगानें, शक्तीनें व यशस्वी रीतीनें मार्गक्रमण करीत आहे ही वस्तुस्थितीच एक प्रकारची कृतकृत्यतेची भावना उचंबळून आणण्यास समर्थ असून, आठवा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहानें सर्व उणींदुरीं बाजूला ठेवून व भेद-दुरावे विसरून भारतांत सर्वत्र साजरा होत आहे हें स्वाभाविक होय.

प्रजासत्ताकाची वाटचाल कमीअधिक वेगानें भारतांत सुरू असतांना त्याचा प्रभाव घरींदारीं प्रत्ययास आला पाहिजे आणि तसा ज्या वेळीं अनुभव येईल त्या वेळीं प्रजासत्ताक भारत निर्भय व सुप्रतिष्ठित झाला असें विश्वासपूर्वक म्हणतां येईल. परकीय आक्रमणापासून देशांतील स्वातंत्र्य व प्रजेची सत्ता ही सुरक्षित असली पाहिजे, पण त्याचबरोबर अंतर्गत धोक्यांनींहि प्रजासत्ता कळत न कळत खचून ती नाममात्र ठरण्याची व कालांतरानें निर्माल्यवत् ठरून, खरी सत्ता एखाद्या व्यक्तीच्या किंवा मूठभर लोकांच्या हातीं जाण्याची फार मोठी भीति असते. बाहेरचें आक्रमण चटकन् उमगतें व सर्व शक्तीनिशीं त्याचा प्रतिकारही राष्ट्रपुरुष करतो. पण लोकांच्या सत्तेचा तिळातिळानें कणाकणानें होणारा अपहार तसेंच स्थूल दृष्टीला चटकन् न दिसण्याइतक्या सूक्ष्म रीतीनें होणारें सत्तांतर हें तशाच जागरूक-तेशिवाय उमगत नाहीं, कळतवळत नाहीं. आणि तशा सत्तांतराचा प्रत्यय प्रसंग-विशेषीं आला तरी त्याचा प्रतिकार करावा अशी तडफड दिसत नाहीं.

धर्माप्रमाणेंच स्वातंत्र्याचीहि गति सूक्ष्म असते आणि जरा चुकीचें पाऊल पडलें तरी सुरू झालेली घसरगुंडी नंतर थांबविणें अवघड व अशक्य होऊन बसतें. परकी आक्रमणाबरोबरच अंतर्गत आक्रमणाबाबतहि जनता जागरूक, दक्ष व संवेदनक्षम असणें हा स्वातंत्र्याचा गाभा समजला जातो. घटनाबद्ध प्रजासत्तेमध्यें प्रत्येकाचें घर हें कोणत्याहि बहिर्गत व अंतर्गत आक्रमणापासून सुरक्षित अशा किल्ल्यासारखें आहे असा प्रत्यय आला पाहिजे. ब्रिटनमध्यें तसा साक्षात्कार होतो. म्हणूनच तेथील लोकशाही ही प्रतिष्ठित व अक्षय्य स्वरूपाची मानली जाते. मन मेलेलें असलें कीं अन्यायआक्रमणाची खंत वाटेनाशी होते, अन्याय किंवा आक्रमण दिसतांच त्याची तत्काळ संवेदना प्रकट होत नाहीं, अन्याय आक्रमणाच्या प्रतिकाराची धमक वाटत नाहीं. अन्याय किंवा आक्रमण दिसतांच ती स्थिति असह्य वाटून प्रतिकारासाठीं स्वत्वाचा प्रत्येक कण नि कण उसळून आला पाहिजे आणि अन्यायाचें परिमार्जन होईपर्यंत जिवाला चैन पडतां कामा नये. इतकी जागरूकता व तेजस्विता घरोघरीं संचरलेली असावी, त्या वेळीं प्रजासत्ता ही केवळ स्थूल

स्वरूपांत न राहातां ती राष्ट्राच्या रोमरोमांत संचरून बाहेरचा किंवा देशांतला धोका प्रजासत्तेला ग्रासूं शकत नाहीं. जें पिंडीं तेंच ब्रह्मांडीं हा न्याय देशाच्या स्वातंत्र्यालाहि लागू आहे. जर घरोघरीं प्रजासत्तेची जागरूकता जाज्वल्य स्वरूपांत नसेल तर राष्ट्रांतहि प्रजासत्ता ही मरगळल्यसारख्या स्थितींत राहावयाची! अन्याय दिसतांच आणि घटनेनें दिलेल्या स्वातंत्र्यावर आक्रमण होत आहे असें आढळतांच त्याचा गगनभेदी उच्चार झाला पाहिजे, प्रतिकाराचा संघटित विचार झाला पाहिजे आणि प्राणपणानें त्याप्रमाणें आचार झाला पाहिजे. आक्रमण किंवा अन्याय व्यक्तिगत असो, प्रादेशिक असो किंवा राष्ट्रीय असो, तो तेथल्या तेथें ठेंचला गेला पाहिजे. घरींदारीं प्रजासत्तेचा साक्षात्कार झाला पाहिजे असें सांगितलें जातें याचा मथितार्थ याप्रमाणें लागणारा असून, प्रजासत्तेबाबतची अशी निष्ठा, जागरूकता व दक्षता घराघरांपासून राजद्वारांपर्यंत प्रत्ययास येणें हीच प्रजासत्ताक दिनाची सफलता होय.

प्रजासत्तेची जपणूक हें राष्ट्रीय किंवा वैयक्तिक पातळीवरचें एक प्रकारचें असिधाराव्रत होय. राष्ट्राच्या किंवा व्यक्तीच्या मनांत जर थोडीहि भीति किंवा यत्किंचितहि लोभ असेल तर राष्ट्राचें स्वातंत्र्य जसें अहिंसक आक्रमणानें ग्रस्त होण्याचा धोका असतो त्याचप्रमाणें घटनाबद्ध हक्क-अधिकारांबाबत व्यक्ति जर निर्लोभ व निर्भय राहूं शकत नसेल तर प्रजासत्तेला अंतर्गत धोका केव्हां उत्पन्न होईल याचा नियम नसतो. घटनेची अंमलबजावणीच इतकी कांटेकोर असली पाहिजे की, लोभ किंवा भीति यांना लोकांमध्यें स्थान असूं नये हें खरेंच, पण लोक जागरूक व दक्ष असतील तरच घटनेची अशी अंमलबजावणी होऊं शकते हेंहि तितकेंच खरें आहे. लोक जागरूक व दक्ष असल्यावर आणि निर्लोभ, निर्भय असें त्यांचें शील असल्यावर संयुक्त महाराष्ट्राबाबतच्या अन्यायाचें परिमार्जन झाल्याशिवाय राहाणार नाहीं व लादलेलें द्विभाषिक बोकांडीं बसून राहाणार नाहीं; भांडवलशाहीच्या आहारीं राज्यसत्ता जाणार नाहीं आणि लाचलुचपत व काळाबाजार यांचे प्रश्न माजणार नाहींत; तसेंच पंचवार्षिक योजनेचें यश निश्चित होऊन परदेशी भांडवलांच्या रुसव्याफुगव्यावर तें लटकत राहाणार नाहीं आणि भारताची भरभराट व अभ्युदय यांच्या मार्गांतील अडथळे दूर होण्यास उशीर लागणार नाहीं! पिंडीं व ब्रह्मांडीं भारतीय प्रजासत्ताकाचा साक्षात्कार येण्याच्या दृष्टीनें जागरूक व कर्तृत्ववान बनण्याचा राष्ट्रीय व वैयक्तिक पातळीवरचा निर्धार हेंच प्रजासत्ताक दिनाचें साफल्य होय व राष्ट्राचें शील तसें बनण्यास जरूर तें मननचिंतन व निर्धार हीच प्रजासत्ताक दिनाची कृतकृत्यता होय!

२६-१-५८

करमणूक कर उठला : उठवळपणा जावो

नाटकांवरील करमणूक कर उठल्यामुळें स्वाभाविकच नाट्यप्रेमी लोकांना व रंगभूमीच्या हितचिंतकांना आनंद झाला असून श्री. मामा वरेरकर, श्री. पु. ल. देशपांडे, श्री भालचंद्र पेंढारकर वगैरेंनीं त्याबद्दल समाधान व्यक्त करणारे उद्गार काढले आहेत आणि त्याचबरोबर इशारेवजा सूचनाहि दिल्या आहेत. करमणूक करविरुद्ध ब्रिटिश राजवटींत चळवळ नव्हती, काँग्रेसविरोधी प्रचार या निमित्तानें करण्यांत आला असें श्री. मामा वरेरकर यांनीं सूचित केलें आहे. ब्रिटिश राजवट ही बोलूनचालून परकी होती व भारतांतील कला–संस्कृति वगैरेबद्दल त्या राजवटीनें कधीं आस्थाहि दाखविली नव्हती. स्वातंत्र्य कालांत भारतांतील सरकारांचें तें कर्तव्य व कर्तृत्व समजलें जातें, अशा स्थितींत नाटकांच्या प्रयोगांवरील कर उठविण्याची मागणी करण्यात काँग्रेस सरकारला विरोध करण्याची मुख्यतः भूमिका होती असें म्हणतांना नाटककार या आपल्या पेशाला न जागतां श्री. वरेरकर हे खासदारीला जागले आहेत असें म्हणावें लागतें. श्री. केशवराव दाते, श्री. चिंतामणराव कोल्हटकर, मराठी नाट्यपरिषदेचे अध्यक्ष श्री. वि. स. खांडेकर वगैरे रंगभूमीचे सेवक व संबंधित लोक आंतडें पिळवटून करमणुकीचा नाटकांवरील कर उठविण्यासाठीं आळवणी करीत होते ते काँग्रेसविरोधी प्रचारासाठीं असें कोणीहि समतोल मनुष्य म्हणूं शकणार नाहीं. करमणूकीचा कर रंगभूमीच्या ऊर्जितावस्थेच्या आड आलेला नाहीं असें श्री. वरेरकर म्हणतात, आणि त्यांच्यासारखेंच मत या करांतून ज्यांना चारापाणी लाभलें असेल त्यांचेंहि कदाचित् असेल, पण रंगभूमीच्या क्षीण प्रकृतीला हा कर पेलण्यासारखा तर नव्हताच, पण नाट्यव्यवसाय व नाट्यप्रयोगहि अशक्य करून सोडण्याइतका हा कर भस्मासुरी स्वरूपाचा विद्यमान परिस्थितींत ठरत होता. नाटकांवरील करांच्या उत्पन्नांतून रंगभूमीची सेवा करण्याचा दावा विफल झाल्याचें दिसून आल्यामुळें म्हणा किंवा रंगभूमीची विपन्नावस्था पाहून सरकार द्रवलें म्हणून म्हणा, नाटकांवरील कर सरकारनें उठविला आहे हें एक शुभ चिन्ह आहे. श्री. वरेरकर म्हणतात त्याप्रमाणें केवळ नाटकांवरील कर उठल्यामुळें रंगभूमि भरभराटल अशांतला भाग नाहीं. रंगभूमीच्या अवनतीला इतर जीं अनेक कारणें आहेत तींहि दूर झालीं पाहिजेत हेंहि निःसंशय आहे. तशा प्रयत्नांना शुभ शकूनच करमणूक कर उठवून सरकारनें केला असल्यामुळें त्याबद्दल सरकारला धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत.

श्री. पु. ल देशपांडे यांनीं रिझर्व बँकेच्या महाराष्ट्र वाङ्मय मंडळाच्या वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी भाषण करतांना त्याचप्रमाणें मुंबई मराठी साहित्य

संघाच्या मंदिरांतील नाट्यप्रयोगाच्या वेळीं रंगभूमीवरील कर उठल्याबद्दल आपला संतोष व्यक्त केला आहे आणि त्याच वेळीं त्यांनीं कर उठवल्यामुळे नाट्यप्रयोगांच्या बाबतींत उत्साहाचा अतिरेक होऊं नये अशा प्रकारचा इशाराहि दिला आहे. आज मराठी रंगभूमि एक प्रकारें बेवारशी असल्यासारखी झाली आहे आणि रंगभूमीवर कोणीहि चार पात्रें गोळा करून कसाहि धुडगूस घालावा अशांतला प्रकार चालू आहे. पात्रांची नक्कल पाठ नसली, प्रयोगाच्या तालमी धड झालेल्या नसल्या, अभिनयाच्या नांवाने शून्याकार भोपळा असला व प्रयोगाला उचित अशी सजावट नसली तरी त्याची खंत कोणाला वाटत नाहीं, नाटक रंगलें न रंगलें याची फिकीर कोणाला उरलेली नाहीं. नाईटवर काम करणाऱ्या नटांची आपला मेहनताना खिशांत पडण्याशीं गांठ असते आणि नाट्यप्रयोग करणारे कंत्राटदार नाट्यप्रयोग व नट यांचें भलेंबुरें कांहींहि झालें तरी गल्ल्यावर नजर ठेवून असतात. त्यांतच हौशी नटनटी रंगभूमीवर धुमाकूळ घालून उरलासुरला विचका करून टाकतात व चार प्रशंसक व्यासपीठावर गोळा करून त्यांच्याकडून स्तुतिस्तोत्रें वदविलीं कीं त्यांना आकाश ठेंगणें होतें. रंगभूमीवरील कर उठल्यावर हेंच पेव अधिक फुटेल कीं काय अशी विवंचना श्री. पु. ल. देशपांडे यांनीं व्यक्त केली आहे. वेळींच अधिकारी व्यक्ति व संस्था करमुक्त रंगभूमीच्या सेवेस पुढें आल्या नाहींत तर उठवळ ढग रंगभूमीवर आक्रमण करून पूर्णिमेच्या प्रकाशाऐवजीं अमावास्येचा काळोख रंगभूमीवर माजण्याचा धोका दृष्टिआड करून चालणार नाहीं.

कोणताहि धंदा, व्यवसाय, कला किंवा संस्था यांना एवमेव निष्ठेनें पूजणारे सेवक लाभल्याशिवाय ऊर्जितावस्था येत नसते. धंदा व्यवसाय किंवा कला ह्यांना एकमेव दैवत मानून अनन्यगतिक निष्ठेनें त्यांप्रीत्यर्थ सर्वस्व अर्पिणारे ज्यावेळीं पुढें येतात त्यावेळीं दैवताला प्रतिष्ठा येते व सेवक पदवीला चढतो. रंगभूमीसाठीं जगणारे व रंगभूमीवरच कर्तृत्वाची पराकाष्ठा करणारे असे नट मराठी नाट्यसृष्टींत होते तोंपर्यंत रंगभूमीची चलती होती. रंगभूमीवर अव्यभिचारी निष्ठा पाहिजेच, पण त्याचवेळीं रंगभूमीचा भक्त नाश पावत नाहीं असें सांगण्याइतपत त्राण रंगभूमीच्या ठिकाणीं पाहिजे. नाटकांवरील करमणूक-करामुळें हें त्राण रंगभूमींत राहिलें नाहीं त्याच्या परिणामीं नाट्यव्यवसायी नट देशोधडीला लागले आणि दैवत व भक्त या दोघांचीहि सारखीच दैना झाली. दर्शनेच्छु भाविकांप्रमाणेंच हौशी नटनटी रंगभूमीची जपणूक करीत असले तरी वैद्याच्या हातीं रोगी जाण्यासारखीच त्यायोगें स्थिति झाली आहे. दर्शनेच्छु पाहिजेतच पण अव्यभिचारी श्रध्देनें रंगभूमीशीं एकजीव होणारे व्यावसायिक रंगभूमीच्या ऊर्जितावस्थेला आवश्यक आहेत. तसे व्यावसायिक पुढें येण्यास

करमणूक करानें वाव ठेवला नव्हता आणि नवें रक्त तयार होऊन शरिरांत भरत नसल्यामुळें रंगभूमि खचत चालली होती. रंगभूमीवरील कर गेल्यामुळें पंचपक्वान्नें नसलीं तरी मीठभाकरीची सोय आपल्या भक्तांची करण्यास नाट्यदेवता समर्थ होईल अशी आशा उत्पन्न झाली आहे. रंगभूमीचे निस्सीम नवेजुने भक्त सेवेचा बेलभंडारा उचलून जर पुढें आले तर एकाच व्यवसायांत सतत राहिल्यामुळें नवी दृष्टि, नवी युक्ति व अनुकूल परिस्थिति यथाकाल प्राप्त होऊन रंगभूमीला ते संपन्न करूं शकतील आणि रंगभूमीचा दरबार पूर्ववत् भरदार व भरगच्च होऊन मानमान्यता पावेल करमणूक कर उठला, आतां रंगभूमीवर माजलेला उठवळपणाहि मागोमाग जाईल अशी आशा आहे.

३–३–५८

सेविकांची फॅशन व किंचित् समर्थन

मध्यवर्ति समाज कल्याण बोर्डाच्या अध्यक्ष या नात्यानें राज्य समाज कल्याण बोर्डाच्या अध्यक्षांच्या बैठकीपुढें सोमवारीं भाषण करतांना सौ. दुर्गाबाई देशमुख यांनीं समाज कल्याण कार्याकरितां स्वतंत्र मंत्री नेमण्याच्या सूचनेचें खंडन केलें आहे; आणि त्याच वेळीं खेड्यांत जाणाऱ्या शहरी समाजसेविकांच्या वेषभूषेवर व फॅशनवर टीका करणारांचा समाचार घेतला आहे. सौ. दुर्गाबाईंचा समाज कल्याण कार्याकरितां स्वतंत्र मंत्री नेमण्यास जो विरोध आहे तो विशिष्ट तत्त्वावर आधारलेला आहे. सध्यांचें युग हें सत्तेच्या विकेंद्रीकरणाचें आहे; आणि त्या दृष्टीनें एकेका स्वायत्त संघटनेकडे एकेक काम विश्वासानें सोपवून दिलें आणि निर्णयविषयक स्वातंत्र्य, पुरेसे अधिकार व साधनें अशा स्वायत्त संघटनांना दिलीं तर अधिक चांगलें व भरीव काम होण्यासारखें आहे असा त्यांचा अभिप्राय आहे. समाजकार्य राजांगणांत गेलें कीं धोरणाविषयींची एक प्रकारची अनिश्चितता निर्माण होते आणि त्यामुळें कार्य करणारांना वरून येणारे आदेश व लहरी संभाळतांना पुरेवाट होऊन कामावरचें त्यांचें लक्ष उडतें; त्याचप्रमाणें कामाला व पैशाला

मंजुरी मिळण्याबाबतचें तंत्र व पथ्य पाळतांना नाकीं नऊ येतात असा श्रीमती दुर्गाबाई देशमुख यांचा फटकारा आहे. लाल फितीचें वेष्टन व मंत्रीमहाशयांच्या लहरी यांचें प्रस्थ माजलें कीं कोणत्याहि कामांत शैथिल्य, दिखाऊपणा, कर्तबगारीची कुचंबणूक आणि धडाडीचा अभाव या गोष्टी शिरल्याशिवाय राहात नाहींत त्याऐवजीं स्वायत्त संस्था निरनिराळ्या कामांकरितां निर्माण करून त्यांना रेखीव कार्यक्षेत्र व निश्चित अधिकार देऊन योग्य माणसांच्या हातीं त्या सोपवाव्यात आणि नंतर त्यांत कोणाचा हस्तक्षेप किंवा सासुरवास नसावा असें सौ. दुर्गाबाई देशमुख यांनीं सांगितले आहे. सत्तेचें व सेवेचें हें विकेंद्रीकरण काम झपाट्यानें पार पडण्यास व लोकांत जबाबदारीची जाणीव येण्यास अगत्याचें आहे, असें निरनिराळ्या सरकारी खात्यांचा व कामाचा अनुभव पाहातां म्हणण्यास हरकत नाहीं. सरकारी धोरणहि यापेक्षां निराळें आहे अशांतला भाग नाहीं. पण स्वायत्त संघटना निर्माण केल्यानंतरहि अशा संघटनांचे अधिकार पुष्कळदां नामधारी ठरून सरकारी खात्यांचा सासुरवास त्यांना काढावा लागतो व अनधिकृत वरिष्ठ आदेशांचा मान ठेवून स्थैर्य साधावें लागतें असें छगला अहवालाचा आधार घेऊन म्हणतां येईल. स्वायत्त संघटनांची आवश्यकता, त्यांचे अधिकार व साधनें यांची निश्चिती आणि सरकारी हस्तक्षेप व तंत्रमंत्र यांपासून विमुक्तता यांबद्दल सौ. देशमुख यांनीं सडेतोड मतप्रदर्शन करून आपलें सामाजिक कर्तव्य बजावलें आहे असें म्हटलें पाहिजे.

समाजकार्य अंगिकारणाऱ्या स्त्रिया शहरांतून खेड्यांत जातांना शहरी पेहेराव व रीतिरिवाज यांची मिजास कायम ठेवतात अशी सरसकट टीका होत असते. त्याचा समाचार श्रीमती दुर्गाबाई देशमुख यांनीं घेतलेला आहे. सुशिक्षित स्त्री चिकाटीनें व निर्धारानें निरुत्साही परिस्थितींतहि ग्रामीण सेवेचें काम हौसेनें पत्करते हेंच अधिक महत्त्वाचें आहे आणि अशा स्त्रीनें अद्यावत् वेषभूषा केली किंवा जरूरीपेक्षां अधिक फॅशन केली म्हणून त्यांत इतकें नाक मुरडण्यासारखें व टीकास्त्र सोडण्याइतकें कांहीं बिघडत नाहीं अशी चपराक त्यांनीं ग्रामीण सेविकांच्या फॅशनवर तोंडसुख घेणाऱ्यांना लगावली आहे. शाळा-कॉलेजांच्या शहरी वातावरणांत आणि अनेक सुखसोयी व अद्यावत् रहाणी यांचा उपभोग घेत विद्यासंपन्न झालेली स्त्री रुक्ष व नीरस अशा कुग्रामांत ग्रामीण जनतेच्या सेवेच्या ओढीनें जाऊन राहाते हीच फार मोठी कौतुकाची बाब आहे, असें सौ. दुर्गाबाईंनीं टीकाकारांना बजावलें आहे; आणि वेषभूषा डोळ्यांवर येण्यासारखी केली किंवा अधिक फॅशन केली तर कुचेष्टा करण्यासारखें त्यांत काय आहे असा त्यांचा सवाल आहे. ग्रामीण सेविकांनीं फॅशन करावी असें सौ. दुर्गाबाईंचें प्रतिपादन नसून, थोडीशी फॅशन केली तर टीकाकारांनीं त्यावर तुटून पडूं नये इतपत फॅशनचें

समर्थन त्यांनीं केलेलें आहे. थोडीशी अधिक फॅशन असा शब्दप्रयोग करून त्यांनीं अशा समर्थनालाहि पुष्कळच बांध घातलेला आहे हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. सुशिक्षित स्त्रिया ग्रामीण सेवा करतात आणि त्यांच्यामुळें अशिक्षित व सुशिक्षित यांच्यामधील अंतर नाहींसें होत चाललेलें आहे असा सौ. दुर्गाबाईंचा दावा असून, सुशिक्षित ग्रामसेविकांची वेषभूषा व थोडीशी अधिक फॅशन या कामांत व्यत्यय आणीत नाहींत तोंपर्यंत अशी फॅशन व चालचलणूक त्या क्षम्य मानतात, किंबहुना, त्यांचें समर्थन त्या करतात हें विसरून चालणार नाहीं.

सौ. दुर्गाबाई म्हणतात त्याप्रमाणें ग्रामसेविकेनें कपडयालत्त्यांचा नोकझोक केला, जरा चेहरा, हातापायांचीं बोटें व ओठ रंगविले आणि केशभूषेची विविधता साधून ग्रामीण जनतेला थक्क केलें म्हणून त्यांत तसें कांहींच बिघडत नाहीं. जरा जास्त फॅशन हे शब्द जितके ताणावे तेवढ ताणले जातात व नटीचे रंगढंगहि त्यांत समाविष्ट होऊं शकतात. मुख्य मुद्दा अशी वेषभूषा व फॅशन ह्यांच्या योगानें ग्रामीण सेवेच्या ज्या ओढीनें स्त्री तेथें जाते त्यास व्यत्यय येतो किंवा कसें हा आहे. सुशिक्षित शहरी स्त्री खेडयांत स्वतःपुरते 'शहर' अशा फॅशननें निर्माण करूं शकेल, पण खेडयाच्या जीवनाशीं व राहणीशीं एकरूप होऊन ग्रामीण जनतेच्या सुख-दुःखांशीं ती समरस होऊं शकणार नाही. कोणत्याहि लोकांशीं समरस व्हावयाचें तर त्यांची राहणी, त्यांच्या रीतीभाती, त्यांची बोली, त्यांचा आहार, यांच्यांत मिसळून जावें लागतें. तेव्हां त्यांच्या अंतःकरणांत प्रवेश मिळून समाजाच्या चलनवलनाचें नियत्रण करणारें मर्मस्थान व्यापता येतें आणि नंतर अशा समाजाची सुधारणा, प्रगति व उध्दार करण्याइतकें सेवाधन गांठीं पडतें. एकरूपता व सायुज्यता या मोठचा शक्ती असून त्या साधण्यास तशीच मोठी तपश्चर्या अहंकार विसरून करावी लागते. ग्रामसेविका खेडयांत दांत घासण्याचा ब्रश घेऊन गेल्या तरी त्यावर व खेडयावेगळ्या साजसजावटीवर महात्माजी आक्षेप घेत. कारण असलें अवडंबर ग्रामीण जनतेशीं एकरूपता साधण्याच्या आड येतें असें ते म्हणत. ग्रामीण सेविकांच्या वेषभूषेवर किंवा शहरी फॅशनवर टीका होते ती केवळ कुत्सित असें मानून सौ. दुर्गाबाईंनीं ग्रामसेविकांना संरक्षण व उत्तेजन दिलें हें ठीकच झालें. पण त्याचबरोबर खेडयांत आपल्यापुरतें शहर ग्रामसेविकांच्या विशिष्ट राहणीनें व सौंदर्यप्रसाधनांनीं निर्माण झाल्यास तें ग्रामसेवेच्या मूळावरच घाव घालण्या-सारखें ठरेल हें विसरून चालणार नाहीं.

९-४-५८

आचार्य विनोबाजी व कोल्हापूरचा 'कलंक'

आचार्य विनोबाजी भावे हे आपल्या भूदान पदयात्रेंत सोमवार रोजीं कोल्हापूर येथें पोहोंचले आणि संध्याकाळच्या प्रवचनांत संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर त्यांनीं बोलावें असा आग्रह कांहीं श्रोत्यांनीं संयुक्त महाराष्ट्राच्या घोषणा करीत धरल्यामुळें त्यांना सभा सोडून जावें लागलें. मंगळवारच्या संध्याकाळच्या प्रवचनांतहि हाच प्रकार झाल्यानें त्यांना पंधरावीस मिनिटांच्या भाषणानंतर भाषण बंद करावें लागलें. सोमवारीं कोल्हापुरांत त्यांनीं प्रवेश केला त्या वेळीं कांहीं विद्यार्थ्यांनीं संयुक्त महाराष्ट्राच्या घोषणा करीत आचार्यांना त्यांच्या निवासस्थानापर्यंत सोबत केली होती. आ. विनोबांना सोमवारच्या सभेंतून उठून जाण्याची पाळी आली व दुसऱ्या दिवशींहि त्यांना आपलें प्रवचन अर्धवट टाकावें लागलें ही एक ओंगळ घटना होय! सोमवारच्या प्रकारानंतर संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे कोल्हापूरचे नेते श्री. माधवराव बागल आणि कोल्हापूर काँग्रेसचे अध्यक्ष श्री. श्रेष्ठी यांनीं एक संयुक्त पत्रक काढलें होतें आणि सोमवारचा प्रकार हा कोल्हापूरवरील 'कलंक' होय असें म्हणून दुसऱ्या दिवशींच्या सभेंत असें कांहीं घडतां कामा नये असें त्यांनीं आहावान केलें होतें. पुढच्या आवाहनानंतर 'कलंक' धुतला न जातां अधिकच काळाकुट्ट झाला असें मंगळवारच्या प्रकारावरून म्हणावें लागतें आ. विनोबाजी मराठी मुलुखांत जवळजवळ दोन महिने संचार करीत आहेत. बेळगांवचा भाषिक प्रश्न गळ्याला तांत लावण्याइतका निकराचा व निकडीचा आहे. तरी बेळगांव भागांतहि आ. विनोबाजींच्या सभा यथासांग पार पडल्या. म्हैसूर राज्यांतील भूदान कार्याचा अहवाल कानडीमध्यें वाचला जात असतांना निपाणीला गडबड झाली आणि आ. विनोबाजींना तेथें सभात्याग करावा लागला होता. पण तेवढ्यांत श्रोत्यांची समजूत पटली व नंतर सभेचें काम व्यवस्थित पार पडलें. कोल्हापूरला लागोपाठ दोन दिवस कांहीं लोकांच्या विक्षेपामुळें आ. विनोबाजींना भाषण करतां आलें नाहीं व सभा सोडण्याचा प्रसंग आला हा दुर्दैवी व अनुचित प्रकार आहे, किंबहुना कोल्हापुरावरील तो 'कलंक' आहे असें बागल–श्रेष्ठींनीं म्हणण्याइतका तो वाईट आहे.

महाराष्ट्राच्या विद्यमान परिस्थितींत महाराष्ट्रांत विनोबाजींना संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीची घोषणा ऐकूं आली व ऐकूं येणार हें अटळ म्हटलें पाहिजे. आ. विनोबाजी महाराष्ट्राच्या या मनःस्थितीशीं अपरिचित नाहींत, किंवा त्यांनीं या मुद्याला बगलहि दिलेली नाहीं. म्हैसूर राज्यांतील मराठी मुलूख महाराष्ट्राशीं संलग्न झाला पाहिजे या मागणीला त्यांनीं उचलून धरलें व यापूर्वीच कर्नाटकांतील

बेळगांव–कारवारचा मराठी भाग महाराष्ट्रास जोडावयास पाहिजे होता असेंहि सांगून दिरंगाईच्या लोकशाही जमान्यांत चळवळ केल्याशिवाय योग्य गोष्टीहि होत नाहींत याचा विषादहि त्यांनीं व्यक्त केला होता. मुंबई राज्यांतील मराठी प्रदेशांत पाऊल टाकतांच त्यांची संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या नेत्यांशीं भेट झाली आणि त्यांच्याशीं या प्रश्नावर ऊहापोह करून आपली भूमिका या बाबतींत निःसंदिग्ध रीतीनें मांडणारी मुलाखतहि त्यांनीं वृत्तपत्रांना दिली. भाषिक राज्य मराठी लोकांना पाहिजे तर तें दिलें पाहिजे असें त्यांनीं म्हटलें आहे. व लोकांच्या भाषेंत राज्यकारभार चालण्याच्या दृष्टीनें मराठी राज्याची मागणी आचार्यांना मान्य आहे. त्याचबरोबर विशाल राज्यांची प्रवृत्ति ही कालचक्राला धरून असल्यामुळें द्विभाषिकाच्या पुरस्कारांतहि आ. विनोबा 'विपरीततानि' पाहात नाहींत. बेळगांव–कारवारची महाराष्ट्राची मागणी व संयुक्त महाराष्ट्राची मागणी मिळविण्यासाठीं सत्याग्रहाचा अवलंब करूं नये, मतपरिवर्तनानें व लोकसभेचें मत वळवून ती साधावी हेंहि आपलें मत आ. विनोबाजींनीं निःसंदिग्ध व प्रांजळ भाषेंत सांगितलें आहे. मुंबईचा गोळीबार व त्याबाबतच्या चौकशीला देण्यांत आलेला नकार यांचा तर महाराष्ट्रापासून कित्येक कोस अंतरावर असतांनाच त्यांनीं कडाडून धिःकार केलेला आहे. आ. विनोबाजींची संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीबद्दलचीं मतें संयुक्त महाराष्ट्रवाद्यांना मान्य होण्यासारखीं नाहींत आणि द्विभाषिक ज्या अरेरावीनें आलें व लोकमत अवगणून ज्या रीतीनें राबविलें जात आहे ती पद्धत व रीत पाहातां आचार्य विनोबांचा उपदेश तात्त्विक दृष्टचा निर्दोष असला तरी तो व्यवहार्य वाटण्यासारखा नाहीं. संयुक्त महाराष्ट्रवाद्यांना आपलीं मतें व मार्ग यांचें संपूर्ण स्वातंत्र्य आहे; आणि कित्येक विनोबा आले तरी मागणींत व चळवळींत फरक पडणार नाहीं हें श्री. एस्. एम्. जोशी यांनीं सांगितलेंच आहे. पण त्याचा अर्थ संयुक्त महाराष्ट्रवाद्यांपेक्षां निराळा तत्त्वबोध व मार्गदर्शन करणारा एकहि विनोबा महाराष्ट्रांत भूदानासारख्या विषयावर मुक्तकंठानें बोलूं शकणार नाहीं असा मात्र नाहीं. आणि आतांपर्यंतचा मराठी भाषिक प्रदेशांतील तसा अनुभवहि नाहीं. कोल्हापूरला संयुक्त महाराष्ट्रावरच बोलण्याचा त्यांना आग्रह करण्यांत आला तो त्यांचीं मतें समजावून घेण्यासाठीं होता असेंहि दिसत नाहीं. असें असतांना संयुक्त महाराष्ट्रावरच बोलण्याचा 'वन्समोअर' कोल्हापूरमध्यें त्यांना देण्यांत आला. तो त्यांनीं न पाळल्यामुळें त्यांचें प्रवचन बंद पाडण्यांत आलें. वन्समोअर न घेतला तर त्याबद्दल आणि घेतला तर हुर्रेवडी उडवून गोंधळ करावयाचा हा प्रकार महाराष्ट्रांत नवा नाहीं. त्याचा प्रयोग कोल्हापुरांत आ. विनोबाजींसारख्या महात्म्यावर झाला, यासारखी खंत वाटण्यासारखी दुसरी गोष्ट नाहीं.

कोल्हापूरचा झालेला प्रकार आ. विनोबांना विशेष जाणवणार नाहीं, पण महाराष्ट्राचा जो धर्म आहे तो मात्र त्यायोगें दुखविला गेलेला आहे. अनाचार करणार नाहीं व दुसऱ्यानें केलेला सहन करणार नाहीं, अशी महाराष्ट्रधर्माची व्याख्या मालवणच्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कवि अनिल यांच्या भाषणांत आहे. आपल्यापेक्षां निराळें मत किंवा निराळा विषय कानींहि पडूं न देण्याचें श्रोत्यांचें स्वातंत्र्य एकवेळ समजण्यासारखें आहे आणि जेथें निराळें मत किंवा विषय मांडला जातो तेथून दूर राहणें हा स्वमताभिमान जाज्वल्य राखण्याचा एक मार्ग म्हणतां येईल. वास्तविक पाहतां निराळें मत व विषय कानीं व मनीं येऊ न देण्यांतहि निष्ठा तर नाहींच व सहिष्णुताहि नाहीं. दुसरें मत व विषय ऐकूनहि व त्याचा विचार करूनहि निष्ठा अढळ राहते ती अव्यभिचारिणी निष्ठा व जें व्रत ढळत नाहीं तें अनन्य व्रत होय. बुध्दिवाद हा महाराष्ट्राचा बाणा असल्यावर दुसरें मत किंवा विषय ऐकण्याची किंवा त्यावर विचारविनिमय करण्याची टाळाटाळ महाराष्ट्रानें बिलकुल करतां कामा नये. आचार्य विनोबाजींच्या पदयात्रेंत व कार्यक्रमांत अनाचारानें विघ्नरूप न होणें एवढें सौजन्य सर्वत्र दिसणें हें महाराष्ट्रधर्माचें किमान लक्षण आहे. या बाबतींत कोल्हापूरची जबाबदारी विशेष ठरते. कोल्हापूरला जें होतें त्याचे पडसाद महाराष्ट्रांत इतरत्र उमटतात असा मागील दाखला आहे. त्यामुळें कोल्हापूरला कांहीं लोकांनीं आ. विनोबाजींच्या प्रवचनांत आणलेला व्यत्यय विशेष गर्ह्य ठरतो. आशा आहे कीं, जें कोल्हापुरांत घडलें त्याची महाराष्ट्रांत कोठेंहि पुनरावृत्ति होणार नाहीं आणि आचार्य विनोबाजींची महाराष्ट्रांतील पदयात्रा निर्विघ्नपणें पार पडून ती सफलहि ठरेल.

८-५-५८

पाहिजे आधारवड, पु. ल. देशपांडेंना

मराठी साहित्याच्या सध्यांच्या जमान्यांतील अत्यंत लोकप्रिय साहित्यिक श्री. पु. ल. देशपांडे यांनीं बडोद्याच्या मराठी वाङमय परिषदेच्या २१ व्या अधिवेशनाच्या अध्यक्षदावरून केलेलें भाषण जितकें खेळकर तितकेंच खोडकर,

आणि त्यांच्याच शब्दात सांगावयाचें तर जितकें 'टिवल्याबावल्या करण्याचा' स्थायीभाव व्यक्त करणारें तितकेंच अंतरींचीं तळमळ उत्कट स्वरूपांत मांडणारें आहे. श्री. पु. ल. देशपांडे यांनीं या भाषणांत स्वतःचें वर्णन 'शेवटच्या बांकावर बसून थोड्याशा टिवल्याबावल्या करणारा उथळ माणूस' असें केलें आहे. श्री. चिंतामणराव देशमुख यांनींहि आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या हीरक महोत्सवांत भाषण करतांना स्वतःचें वर्णन 'शेवटच्या बांकावर बसणारा विद्यार्थी' असेंच केलें आहे. जवळचा मार्गानें अग्रभागीं नेऊन सोडणारें एखादें चोरदार शेवटच्या बांकालगत असावें आणि तें अपवादात्मक विद्यार्थ्यांना अचूक सांपडत असावें असें या थोरामोठ्यांच्या उद्गारावरून दिसतें. श्री. देशमुख हे अर्थशास्त्री व अर्थमंत्री म्हणून देशी विदेशीं गाजले. श्री. पु. ल. देशपांडे यांच्याहि बाबतींत 'वाचमर्थो-नुधावति' अशीच कांहींशी स्थिति साहित्यक्षेत्रांत असून, त्यांच्या विशिष्ट लेखनशैलीनें मराठी वाचक भारल्यासारखा होऊन, साहित्यक्षेत्रांतील हुकमी एक्क्यांमध्यें त्यांची गणना सांप्रत होते. त्यांचें लिखाण हमवतें पण दांत पाडीत नाहीं, त्याचप्रमाणें मनावरचा मळ व धूळ अत्यंत हळुवार रीतीने नकळत झटकून टाकण्यास कमी करीत नाहीं. प्रियाराधनाइतकीच लोकाराधन हीहि एक नाजुक कला आहे. मोरपीस गालावरून फिरवून प्रेयसीला जाग आणावी आणि तिची जागृतावस्थेबरोबरच प्रसन्नावस्था साधत असतांना मोरपिसावरचा डोळा व प्रेयसीनें उघडलेला नेत्र यांच्या सादृश्यानें प्रियकरहि प्रसन्न व्हावा, तशा प्रकारचें प्रसन्नतेचें तादात्म्य श्री. पु. ल. देशपांडे आणि त्यांचे रसिक वाचक यांच्या दरम्यान आढळतें. श्री. देशपांडे यांची ही विशिष्ट शैली त्यांच्या बडोद्याच्या भाषणांतहि ओतप्रोत असून, त्यायोगें उद्बोध व आनंद यांचा लाभ त्यांच्या भाषणाचे श्रोते व वाचक यांना झाल्याशिवाय राहूं नये यांत नवल नाहीं.

श्री. पु. ल. देशपांडे यांनीं आपल्या भाषणांत मराठी वाङ्मय किडत चाललें आहे हा आक्षेप अमान्य केला आहे, पण त्याचबरोबर सांप्रतच्या लेखकांची प्रतिभा कुंठित किंवा 'क्षुथित' असल्यामुळें प्रतिभेची झेपच तोकडी आहे असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. कीडच लागलेली असेल व तीहि मूळाला लागलेली असेल तर वाळलेल्या काटक्या व झडलेलीं सडलेलीं पानें यांच्या उकिरड्याशिवाय अखेर कांहीं हातीं लागत नाहीं. झेंप तोकडी असेल तर शक्ति वाढल्यावर पल्लेदार झेपहि कालांतरानें शक्य असते. वाङ्मयाची ही झेप कशी असेल यार्चे विवेचन श्री. देशपांडे यांच्या भाषणांत सूचक व सूत्रमय वाक्यांच्या रूपानें केलेलें आढळतें. 'जें वाचायला घेतल्यावर पहिल्या ओळीपासून शेवटच्या ओळीपर्यंत इतर गोष्टींचा विसर पाडून व धुंद करून आपल्याबरोबर निराळ्या विश्वांत ओढून नेतें तें उत्कृष्ट वाङ्मय' असें त्यांनीं सोदाहरण सांगितलें आहे. हें मान्य केल्यावर

शास्त्राच्या काटेकोर चौकटींत वाङमयीन कलाकृति बसविणाऱ्या आजकालच्या अरसिक शास्त्रजड टीकाकारांची संभावना श्री. देशपांडे यांनीं जी केली आहे ती सार्थ वाटते; आणि वाङमयीन कृतीचा आस्वाद घेण्याऐवजीं अंत्यविधी उरकण्याचा भकास आग्रह धरणारा व या हिरिरीनें नाकांत सारख्या काड्या घालणारा टीकाकार हा एक वाङमयक्षेत्रावर पडलेला रोगच होय असें म्हटलें पाहिजे. असल्या टीकाकारांच्या जोडीलाच एका काळीं अग्रभागीं असलेल्या व आजहि गाजत असलेल्या ललितलेखकांची आजकालच्या लेखकांबद्दलची टीका असह्य होऊनच कीं काय श्री. पु ल. देशपांडे यांनीं त्यांना अरसिक व शुष्क बनविलें आहे यांचें मात्र आश्चर्च वाटल्याशिवाय राहात नाहीं. 'आपण विस्मृतीच्या पडद्याआड चाललों आहों याची जाणीव झालेले लेखक निदानालस्तींत लेखण्या झिजवत असतात' असें म्हणून देशपांडे यांनीं जी असहिष्णुता दाखविलेली आहे ती अहंभावी आत्मतृप्त कविलेखकांना एकवेळ शोभून दिसेल, पण श्री. देशपांडे यांच्या ठिकाणीं मात्र असली चिडचिड व मत्कुणवृत्ति कशीशीच वाटते. 'आपलें मरण स्वतःच्या डोळ्यांनीं पाहून आनंदित व्हायला तुकारामाचे डोळे' लागत असतील; पण दुसऱ्यांनीं व विशेषतः तपोवृद्ध शैलीदार लेखकांनीं उणीवा दाखविल्या असतां त्याबद्दल अंगाचा तिळपापड न होतां अशा टीकेचें सौजन्यपूर्ण ग्रहण करण्यास कलावंताचें व रसिकाचेंच अंतःकरण असावें लागतें. असलें एखादें गालबोट या भाषणाला लागल्यानें फारसें बिघडलें आहे अशांतला मात्र भाग नाहीं. टीकाकारांची टीका कशी नसावी याचें तें प्रात्यक्षिकच समजण्यास हरकत नाहीं.

'प्रतिभा हें देवाचें लेणें' आहे आणि 'कलेचा मार्ग ज्याचा त्याला शोधून काढावा लागतो' असें सांगत असतांनाच 'आपल्या भोंवतीं जें विशाल जीवन पसरलेलें आहे त्यांतून साहित्यिक स्फूर्ति घेत असतो' असें श्री. देशपांडे यांनीं म्हटलें आहे आणि आजूबाजूचें जीवन म्हणजेच देव असेंच एक प्रकारें त्यांनीं प्रतिपादिलेलें आहे. आजूबाजूच्या जीवनाशीं तादात्म्य पावून त्या जीवनांतील दुःखानें ज्याचें आंतडें पिळवटतें व सुखानें जो महिरून जातो, तोच लोकांचीं सुखदुःखें अशा उत्कट भावेंत बोलून दाखवतो कीं सर्व कला व प्रतिभा यांचा साक्षात्कार त्याच्या वाङमयांत समाजाला आढळेल. तन्मयता नसली म्हणजे डोळे असूनहि आवतींभोंवतीं कांहीं दिसत नाहीं, अर्थातच सांगण्यासारखें कांहीं जवळ असत नाहीं, आणि उमाळा व उत्कटताहि प्रतीत होत नाहीं. स्वाभाविकच इकडची तिकडची उधारउसनवारी करून उपऱ्या अवसानानें साहित्यक्षेत्रांत मुलुखगिरी सुरू झाली कीं प्रतिभेची झेप थोटकी पडावी व कलेच्या नांवाखालीं अमंगळ उठवळपणा माजावा यांत नवल नाहीं. शब्दपांचालीला विवस्त्र केल्याबद्दल श्री. देशपांडे राजकारणी प्रचारकांवर कडाडले आहेत, पण शब्दपांचाळीला

वस्त्रप्रावरणें नेसवून तिची अब्रू साहित्यिकांनीं तरी थोडीच वचावली आहे? किंबहुना साहित्यक्षेत्रांत केवळ शब्दच असतात, आणि तेहि जसे उघडेच जन्माला येतात तसे उघडेच सदैव वावरतात आणि उघड्या अवस्थेंतच लय पावतात असें म्हणण्यास हरकत नाहीं.

शरीरशास्त्राप्रमाणें पोटाच्या वर अंतःकरण असतें. पण साहित्यक्षेत्रांत मात्र अंतःकरण पोटाखालीं दामटलेलें असतें आणि डोळे आवतींभोंवतीं पाहाण्याऐवजीं सात समुद्रापलीकडे उचलेगिरीसाठी लागलेले असतात. आधारवड पाहिजे असें म्हणतांनाहि आठवण कालिदास–भवभूतीची होत नाहीं, तर शेक्सपीअरचीच होते. पोटांतील पाणीहि न हलेल इतक्या बेतानें ज्यांचौ लेखणी व जीभ वळवळत असते त्या लेखणींतून व जिभेवरून केवळ शब्दच घरंगळावेत यांत नवल नाहीं. पूर्वीच्या लेखकांच्या प्रतिभेची झेप लांब पल्ल्याची असेल तर त्याचें कारण ते राष्ट्राच्या व लोकांच्या आशाआकांक्षांशीं व सुखदुःखांशीं तितक्या प्रमाणांत केवळ शब्दांनींच नव्हे तर वृत्तीनें व कृतीनेंहि समरस असत. आजकाल प्रतिभेची झेप थोटकी पडत असेल तर त्याचें कारण, सभोंवारच्या जीवनापासून आजचा साहित्यिक हा दूर सरकलेला आहे. अशा स्थितींत शब्दांची कसरत व कोटयांचा खच या पलीकडे साहित्यक्षेत्रांत विशेष आढळूं नये आणि अंतःकरण हलविण्याची ताकद नसल्यावर गालांवर एखाद्या सुरकुतीची हालचाल दिसल्याबरोबर धन्यता वाटण्याइतकी अल्पसंतुष्टता साहित्यिकांच्या पांचवीला पुजलेली आढळावी यांत नवल नाहीं. ही स्थिति श्री. पु. ल. देशपांडे यांच्यासारख्या लोकांच्या मनाचा ठाव घेऊं पाहाणाऱ्या साहित्यिकाला अत्यंत अस्वस्थ करण्यास कारणीभूत व्हावी यांत नवल नाहीं. ना शोभा ना सांवली देणाऱ्या निवडुंगाचे फड सध्यां साहित्यक्षेत्रांत गजबजले आहेत. त्या जागीं श्री. देशपांडे म्हणतात त्याप्रमाणें 'आधारवड' दिसूं लागला पाहिजे. मराठी जनतेंत आजकाल नवें चैतन्य, नवी शक्ति व नवीन रग निर्माण होत असलेली दिसत आहे. सध्यांचे साहित्यिक हे या नव्या महाराष्ट्रालाहि विन्मुख आहेत व ते तसेच कोरडे व उघडे राहाणार हें उघड आहे. पण नव्या महाराष्ट्राबरोबरच त्यांच्याशीं समरस असलेले नवे साहित्यिक जे पुढें येऊं पाहात आहेत त्यांतून श्री. देशपांडे यांच्या अपेक्षेप्रमाणें 'आधारवड' निर्माण होऊन श्री. देशपांडे व त्यांच्या पलीकडच्या पिढयांचेही डोळे तो निववील अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं.

२–७–५८

एकसष्ट वर्षांचे आचार्य अत्रे

आचार्य अत्रे यांना येत्या १३ तारखेस एकसष्टावें वर्ष लागत असून या शुभ प्रसंगीं महाराष्ट्र त्यांना दीर्घायुरारोग्य, क्षेमस्थैर्य व साफल्य अत्यंत आपुलकीनें इच्छीत आहे. मोठमोठ्या व्यक्तींविषयीं सर्वसामान्य लोकांत आदर, भक्ति, पूज्यभाव असतो आणि बोलण्यांत, चालण्यांत, आचरणांत हे भाव लोकांकडून यथाप्रसंग व यथाशक्ति प्रकट होत असतात; पण त्याच वेळीं अशा असामान्य व्यक्ती सामान्य जगांतील नव्हेत अशी जाणीव लोकांत स्थिर असते आणि विभूतींना अवतारी पुरुषांच्या पंक्तीला बसवून त्यांच्या बाबतींतील कर्तव्याची परिसीमा गांठल्याचें समाधान जनता घेत असते. आदराच्या पोटीं अंतर आपोआप निर्माण होतें आणि भक्ति व श्रद्धा यांच्या जोरावर दैवतांच्या पायांपर्यंत मजल गांठली तरी अंतःकरणांत प्रवेश मिळत नाहीं. सर्वसामान्य जनतेपासून दुरावलेलें असणें हें थोरामोठ्यांचें एक दुर्भाग्य होय असें म्हटलें पाहिजे. आचार्य अत्रे हे मोठे असले तरी सर्वसामान्य लोकांना ते आपल्यांतले व आपले वाटतात आणि आचार्य अत्रे यांचें हें सद्भाग्य महाराष्ट्रांत फारच थोड्यांच्या वांट्यास आतांपर्यंत आलें असेल. याच आपुलकीनें आचार्य अत्रे यांच्या जीवनांतील निरनिराळ्या क्षेत्रांतील कर्तबगारी लोकांनीं आजतागायत पाहिली आहे, उचलून धरलें आहे आणि आपुलकीचा आधार त्यांना प्रत्येक क्षेत्रांत दिला आहे. शिक्षक, कवि, नाटककार, पत्रकार, विनोदाचार्य, साहित्यसेवक, चित्रपटकार, निरनिराळ्या पक्षाचे त्या त्या वेळचे कार्यकर्ते आणि आजच्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे उद्गाते अशा विविध नात्यानें लोक त्यांना ओळखत आले आहेत आणि त्यांच्या त्या त्या क्षेत्रांतील कर्तबगारीचें अखंड कौतुकच महाराष्ट्रांत आजतागायत झालेलें आहे. ज्या ज्या क्षेत्रांत आचार्य अत्रे यांनीं पाऊल टाकलें त्या त्या क्षेत्रांत अत्युच्च पातळी त्यांनीं गांठली नाहीं असें सहसा आढळणार नाहीं. अद्भुत यश त्यांनीं बहुतेक क्षेत्रांत संपादन केलें, पण ज्याप्रमाणें अर्जुनाला कृष्ण हा आपला सखा असेंच नेहमीं वाटत राहिलें त्याप्रमाणें आचार्य अत्र्यांविषयीं महाराष्ट्राला आपुलकी व जिव्हाळाच प्राधान्येंकरून वाटत आलेला आहे. आज त्यांच्या ६१ व्या वर्षाच्या वाढदिवसप्रसंगीं त्यांच्या अनेकविध कर्तबगारीचें विश्वरूप महाराष्ट्रासमोर उभें राहाणारें असून, अशा गुणाढ्य पुरुषाशीं सलगीनें, धिटाईनें व क्वचित् अमर्यादेनेंहि वागलों असा संकोच महाराष्ट्रास वाटल्यास त्यांत नवल नाहीं. पण विश्वरूप-दर्शनानंतरहि कृष्ण हा अर्जुनाचा सखाच राहिला त्याप्रमाणें अत्रे हे आपुलकीच्या एकाच मापानें महाराष्ट्राकडून मापले जागार आणि त्या आपुलकीनें मराठी भाषिकांकडून त्यांचें शुभचिंतन होत आहे.

आचार्य अत्रे यांच्याविषयीं इतकी असामान्य अपुलकी महाराष्ट्रांत व मराठी लोकांत कां आढळते ? आचार्य अत्रे यांनीं जीं जीं क्षेत्रें गाजविलीं व थोर पदवी संपादन केली, त्या त्या क्षेत्रांत तितक्याच किंबहुना अधिक गाजलेल्या व्यक्ती लोकांसमोर नाहींत अशांतला भाग नाहीं, किंवा आचार्य अत्रे यांचें कर्तृत्व त्यांनीं आक्रमिलेल्या प्रत्येक क्षेत्रांत जितकें अचाट तितकेंच निर्दोष होय असेंहि म्हणतां येणार नाहीं. ज्या क्षेत्रांत त्यांनीं नांव कमावलें त्या बऱ्याच क्षेत्रांपासून ते आज दुरावलेलेहि दिसतात. आचार्य अत्रे हे कवि खरे, पण आतां ते कडवीं रचतांना आढळणार नाहींत; श्यामची आई या चित्रपटानें त्यांनीं राष्ट्रपति सुवर्णपदक मिळविलें आणि अत्युच्च बिंदु गांठल्यावर संकल्पित चित्रपटांच्या नांवापुरते जणुं कांहीं त्या व्यवसायांत आज ते आहेत. नाटककार अत्रेहि आतां भूतकाळांत जमा झालेली बाब ठरत आहे; जणुं कांहीं अत्युच्च पदापर्यंत चढल्यावर एक प्रकारचें शैथिल्य त्यांच्या ठिकाणीं कर्तबगारीच्या निरनिराळ्या क्षेत्रांविषयीं संचरलेलें आहे. नाटककार, चित्रपटकार, पत्रकार अशांसारख्या त्यांच्या उद्योगांची जन्मकथा पाहिली तर स्वतःपेक्षां दुसऱ्यांच्या तळमळीनें आचार्य अत्रे यांनीं हे उद्योग पत्करले असें दिसून येतें. कांहीं वृत्तपत्र व्यवसायिकांवर वृत्तिच्छेदाचें गंडांतर आलेलें पाहून त्या संकटाच्या व अन्यायाच्या परिमार्जनार्थ ते पत्रसृष्टींत शिरून पत्रकार झाले, डबघाईला आलेल्या नाटक मंडळीची विवंचनेंतून सुटका करण्यासाठीं ते नाटककार झाले, चित्रपटव्यवसायांतहि व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेनें ते प्रविष्ट झाले नाहींत, तर कोणाची तरी कुचंबणा टाळण्याकरितां ते चित्रपटकार झाले. लेखणी, वाणी, विनोद, यांचा वापर अशाच निर्लोभवृत्तीनें ते ज्या ज्या राजकीय संघटनेंत होते त्यांसाठीं त्यांनीं कसूर न करतां केला. त्या दृष्टीनें ते निरनिराळ्या क्षेत्रांत शिरले म्हणण्याऐवजीं 'दाखल झाले' असेंच म्हणणें वास्तवतादर्शक ठरतें.

कोणत्याहि क्षेत्रांत एकदां पाऊल टाकलें कीं त्या क्षेत्राशीं तादात्म्य पावून हनुमानाच्या उत्कट कर्तबगारीनें उत्कट तें साध्य केल्याशिवाय न राहाणें हा आचार्य अत्रे यांचा स्वभावधर्म आहे उत्स्फूर्त उद्योग व उत्कृष्टाची प्राप्ति हा आचार्य अत्रे यांचा बाणा असल्यामुळें कोणत्याहि क्षेत्रांत प्रवेश करतांना त्यांनीं कधीं योजना आंखल्या नाहींत, हिशेब मांडले नाहींत, ताळे व ठोकताळे यांची क्षिति बाळगली नाहीं; त्याचप्रमाणें त्या क्षेत्रांत पुरुषार्थ संपादन केल्यावर म्हणजेच त्या क्षेत्राची अत्युत्कृष्ट सेवा पार पाडल्यावर त्या पुण्याईचें भांडवल करून स्वतःची मिरास किंवा मक्तेबाजी तेथें निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा त्यांनीं कधीं धरली नाहीं. कर्तृत्वाला दाही दिशा मोकळ्या असतात आणि स्वाभाविकच पादाक्रान्त मुलुखांत पाय रोवून राहाण्याची जरूरीच उरत नाहीं. दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याशिवाय दुसरा लोभ जेथें नाहीं आणि अचाट कर्तबगारीनें

उत्कृष्टापर्यंत पोहोंचण्याशिवाय दुसरा हव्यास जिथें नाहीं तेथें अहंकार असूं शकत नाहीं, ताठा राहात नाहीं, स्वार्थाचा पगडा बसत नाहीं आणि कारस्थान किंवा कपट यांना शिरकाव मिळत नाहीं. पक्ष्यानें गगनांत भरारी घ्यावी आणि जमिनीवर उतरावें त्याप्रमाणें सामान्यांतून असामान्यांत आचार्य अत्रे उड्डाण करतात आणि तितक्याच सहजतेनें सामान्यांत ते प्रविष्ट होऊन लोकांशीं एकरूप बनतात. अशा स्थितींत असामान्य कर्तबगारीचें आणि अलौकिकत्वाचें एखादेंहि लक्षण न मिरवणारे आचार्य अत्रे हे महाराष्ट्रांतील आबालवृद्धांना आपले व आपल्यापैकींच वाटून आत्यंतिक आपुलकीचा लाभ त्यांना महाराष्ट्राकडून होत राहावा हें स्वाभाविक आहे.

आचार्य अत्रे यांचा पिंड भावविवश असून, ज्यावेळीं जें चांगलें दिसेल त्याचें कसल्याहि मानसिक कसुरीशिवाय व कृपणतेशिवाय मुक्तकंठानें प्रशंसन करण्यास ते चुकत नाहींत. अशा चांगुलपणाच्या परिपोषणासाठी स्वतःच्या सर्व शक्ति रावविण्यासहि ते कमी करीत नाहींत; त्याचप्रमाणें कोठेंहि कांहीं गैर दिसलें. अन्याय होतोसा वाटला कीं गैर दिसेल तें धोपटून काढण्यास, अडीअडचणींत सांपडलेल्यांसाठीं धडाडीनें अज्ञेय प्रांतांतहि पाऊल टाकण्यास ते कमी करीत नाहींत, बऱ्यावाईटाच्या कल्पना व्यक्तिपरत्वें निराळ्या असतील, चांगल्याचा पाठपुरावा व वाईटाशीं टक्कर देण्याची पद्धति व्यक्तिगणीक निराळी असूं शकेल. पण आ. अत्रें यांची अन्यायाची चीड व सत्पक्षाचा कैवार यांबद्दल मतभेद होणार नाहीं. गैर गोष्ट, अन्याय, जुलूम, दडपशाही कोठेंहि दिसली कीं ते वाघाप्रमाणें त्यावर झडप घालणार, सिंहाप्रमाणें नखें व दाढांनीं अन्यायाची आंतडीं उपसून काढणार, आणि हत्तीप्रमाणें अजस्त्र पायांखालीं जुलूमशाहीचा चेंदामेंदा करणार, याविषयीं बालंबाल खात्री पटलेली नाहीं असा मनुष्य महाराष्ट्रांत क्वचितच आढळेल.

११-८-५८

संयुक्त महाराष्ट्राचे उद्गाते आचार्य अत्रे

एकसष्टाव्या वर्षांत ता. १३ रोजीं प्रवेश करीत असलेले आचार्य अत्रे यांची सर्व गुणसमृद्धि व समाधिधन आज संयुक्त महाराष्ट्राच्या कारणीं लागलेलें आहे. संयुक्त महाराष्ट्राशिवाय त्यांच्या मनांत दुसऱ्या वस्तूला जागा नाहीं,

दुसऱ्या कशाचा ध्यास त्यांच्या बुद्धीनें घेतलेला नाहीं, आणि संयुक्त महाराष्ट्रा• शिवाय अन्य स्वप्नें ते पहात नाहींत, इतके संयुक्त महाराष्ट्राशीं ते तन्मय व तल्लीन झाले आहेत. विविध क्षेत्रांत गाजलेलें अचाट कर्तृत्व, त्यांच्या लेखणीची व वक्तृत्वाची कमाई आणि चांगल्या गोष्टींचा कैवार घेऊन त्यांच्याशीं समरस पावण्याचा त्यांचा स्वभावधर्म, यांचें संपूर्ण दर्शन संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत होत आहे. संयुक्त महाराष्ट्राशीं आज ते इतके तादात्म्य पावलेलें आहेत कीं संयुक्त महाराष्ट्राच्या कसोटीवर ते प्रत्येक गोष्ट पारखून घेत असतात. संयुक्त महाराष्ट्राचे जे पुरस्कर्ते व अभिमानी त्यांच्याशीं रक्तापेक्षाहि अधिक घट्ट असें नातें त्यांचें जुळलेलें आहे, आणि संयुक्त महाराष्ट्राला जें जें वावडें आहे असें त्यांना वाटतें त्याची किळस व शिसारी त्यांच्या लेखणीच्या प्रत्येक फटकाऱ्यानें व वाणीच्या प्रत्येक उच्चारांत आज तळमळते आहे. पृथ्वीमोलाची रत्नमाला सीतेनें हनुमंताला दिली आणि त्यांतील रत्नांत व मोत्यांत राम नाहीं असें दातांनीं चावून आढळतांच त्यानें ती फेकून दिली, उलट पक्षीं रामाच्या पदस्पर्शानें पावन झालेले रजःकण अपूर्वाईनें त्यानें हृदयापाशीं धारण केले. संयुक्त महाराष्ट्राच्या निष्ठेनें, कैवारानें, व झुंजारवृत्तीनें ओतप्रोत असलेले रजःकणहि आज आचार्य अत्रे हे डोक्यावर घेऊन नाचत असतात, उलटपक्षीं संयुक्त महाराष्ट्रापासून जराहि विचलित झालेली व्यक्ति किंवा कृति दिसतांच त्याचा आचार्य अत्र्यांच्या पायाखालीं चेंदामेंदा होऊन तो लोळागोळा दशदिशांना उधळला गेल्याशिवाय राहात नाहीं. संयुक्त महाराष्ट्राची एकच लक्ष्मणरेषा ते जाणतात, त्या रेषेच्या अलीकडे असलेले सर्व लोक आ. अत्रे यांचे आप्तस्वकीय आहेत आणि या लक्ष्मणरेषेचें उल्लंघन ज्यांच्याकडून झालें त्यांच्याइतकें शत्रुत्व आचार्य अत्रे यांनीं दुसऱ्या कोणाचें केलें नसेल आचार्य अत्रे यांच्याकडून आज एक ओवी तरी गाइली जाते किंवा शिवी तरी हासडली जाते, आणि त्यांतच संयुक्त महाराष्ट्राशीं असलेली त्यांची तन्मयता सहज दिसून आल्यावांचून राहात नाहीं.

आचार्य अत्रे यांची वाणी आणि लेखणी आजच्या विशिष्ट रंगढंगानें व्यापलेली दिसते त्याबद्दल अनुकूल प्रतिकूल प्रवाह सारख्याच जोरदारपणानें पसरलेले आढळतात, आणि आचार्य अत्रे यांच्या जीवनधर्माचें आकलन झाल्याचीच ती खूणगांठ समजण्यास हरकत नाहीं. रासपुटीन, नराधम, हरामखोर अशी व यासारखी खैरात त्यांच्याकडून जी होते त्यांत वैयक्तिक खुनस अ हे किंवा ज्याच्यावर आ अत्रे फुलें उधळीत असतांना व डोक्यावर नाचवितांना दिसतात ते परमेश्वराचे अवतार त्यांच्याकडून मानले जातात अशांतला भाग नाहीं. श्री. शंकराव देव हे संयुक्त महाराष्ट्राचें नेतृत्व करीत असतांना आ. अत्रे त्यांचा निरपवाद पाठपुरावा

करीत नव्हते काय ? इम्रे नाज प्रकरणीं संयुक्त महाराष्ट्राची आघाडी भंगण्याची भीति वाटतांच ज्या प्रजासमाजवादी पक्षांत ते एकेकाळीं होते त्या प्र. स. पक्षांतील सहकाऱ्यांवर कसलीहि गय न करतां त्यांनीं तलवार चालविली नाहीं काय ? श्री. मोरारजी देसाई व आ. अत्रे यांचा एकत्र फोटो त्यांच्याच पत्रांतून पूर्वी लोकांनीं पहिलेला नाहीं काय ? आ. अत्रे यांचा राग किंवा लोभ हा कार्यपरत्वें असून त्यांत व्यक्तींना महत्त्व नाहीं हें या थोडचाशा छाननीनंतरहि सहज लक्षांत येण्यासारखें आहे. चांगल्याबद्दलचा अभिमान व कैवार संचरला कीं त्याविरुद्ध असलेल्या वाईट गोष्टीबद्दल शिसारी आपोआप निर्माण होते आणि वाईट वाटणारी गोष्ट पहात असतांना पेटल्यासारखें होऊन जळजळीत शब्दांत भावना प्रकट झाल्याशिवाय राहात नाहींत. चांगल्या गोष्टीचा आत्यंतिक अभिनिवेश आणि वाईटाबद्दलची तिडीक ही कवीच्या ठिकाणींच उत्कट स्वरूप धारण करूं शकते ! जगाविषयींच्या कनवाळूपणानें मेणाहून मऊ झालेल्या आणि रंगांत विक्षेप पडण्यासारख्या गोष्टी दिसतांच कासावीस होऊन वज्राची कठोरता धारण करणाऱ्या वाल्मीकीनें क्रौंच पक्ष्याचें जोडपें व्याधाच्या बाणानें विद्ध होणार असें पाहिल्यावर उसळीसरशी अत्यंत कठोर अशी शापवाणीच उच्चारली नाहीं काय ? व्याध पाहिला कीं शाप उसळीसरशी उच्चारला जावा आणि रामचरित्र गातांना भान हरपावें हा कवीचा धर्म आहे. श्री. मोरारजीभाईंच्या प्रेरणेनें चाललेल्या बंदुकांनीं निरपराधी महाराष्ट्रीयांचे मुडदे पाडल्यावर जिवाचा तळतळाट व तडफडाट तिडकीसरशी व्यक्त करण्यास आ. अत्रे यांच्यासारखे खणखणीत कविहृदयच पाहिजे. द्विभाषिकाची जबरदस्ती आणि संयुक्त महाराष्ट्र नाकारण्याचा अन्याय पाहातांच तसल्या अन्यायाची आंतडीं उपसण्यास व दडपशाहीचा धिःकारपूर्वक चेंदामेंदा करण्यास वाणी व लेखणी धावली नाहीं. तर वाणीचें व लेखणीचें विश्वकार्यच संपुष्टांत आल्याशिवाय राहात नाहीं. ही कामगिरी पार पाडण्यास तशीच जबरदस्त ताकद व व्यक्तिनिरपेक्ष तन्मयता असावी लागते, आणि उत्कृष्टाच्या उत्कट अभिमानानें कवीच्या पदतीला चढलेल्यांनाच ती किमया साधूं शकते. आ. अत्रे यांच्या शिव्या किंवा ओव्या या व्यक्तिपरत्वें नसून कार्यपरत्वें आहेत हें रहस्य लक्षांत घेतलें असतां त्यांच्या उत्कट प्रकृतिधर्माची व कविमनाची साक्ष पटल्याशिवाय राहात नाहीं.

आ. अत्रे यांच्या ६१ व्या वाढदिवसप्रसंगीं त्यांच्या आजवरच्या धडाडीचें, अचाट कर्तृत्वाचें व तन्मय प्रकृतिधर्माचें स्मरण व प्रशंसन महाराष्ट्राकडून होऊन, आजपर्यंत महाराष्ट्रानें त्यांच्याबद्दल जी माणुसकी दाखविली ती द्विगुणित झाल्यावांचून राहाणार नाहीं. कै. तात्यासाहेब केळकर यांचा ६१ वा वाढदिवस समारंभ साजरा झाला त्यावेळीं एकसष्टी म्हणजे टाईपरायटर-

वरची घंटी होय असें त्यांनीं म्हटलें होतें. टाईपरायटरवरची घंटी लिहिल्या जात असलेल्या एका ओळीची अखेरी जशी सुचविते त्याचप्रमाणें नव्या पंक्तीची प्रस्तावना ती करून देत असते. माणसाचें जीवन म्हणजे अनेक ओळींचा एक प्रबंध होय. किंबहुना साठीनंतरच्या ओळींमध्यें उन्माद-प्रमाद ओसरलेले असतात आणि अधिकाधिक विशुद्धता, तेजोमयता व आकर्षण त्यांत संचरलेले असतें. आ. अत्रे यांच्या एकसष्टीच्या उत्सवप्रसंगीं महाराष्ट्राच्या याच भावना आहेत हें उघड आहे. संयुक्त महाराष्ट्राची एकच आस त्यांनीं मनीं धरली आहे आणि बाकीचे सर्व भाव, उन्मेष, इच्छा, एक प्रकारच्या तृप्तावस्थेंत निभाऱलेल्या आहेत. सर्वस्व पणाला लावून त्यांनीं संयुक्त महाराष्ट्राच्या महत्कार्याला वाहून घेतलें आहे. हें महत्कार्य असंख्यांच्या आचारविचारांच्या उसळीनें सिद्धीस जावयाचें आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या बाबतींत स्वतःच्या कर्तृत्वानें, एकनिष्ठेनें आणि निर्लोभ व्यक्तिनिरपेक्ष तपश्चर्येनें महाराष्ट्रीयांना आचार्य अत्रे हे प्रेरणा देत राहातील आणि संयुक्त महाराष्ट्राची एकच एक आस सफल व साकार झाल्याचें आ. अत्रे यांना अल्पकाळांत आढळून येईल अशी आम्हांस खात्री वाटते. पुन्हां एकदां आचार्य अत्रे यांच्या षष्ट्यब्दपूर्ति समारंभाच्या प्रसंगीं आम्ही त्यांना आयुरारोग्य, क्षेमस्थैर्य व कृतकृत्यता महाराष्ट्रीय जनतेसमवेत चिंततों !

१२-८-५८

नवकथेचे गुरुजी गंगाधर गाडगीळ

नवकथा संप्रदायाचे कुलपति समजले जाणारे प्रा. गंगाधर गाडगीळ यांनीं शनिवारीं रोजीं संघमंदिरांत भाषण करून नवकथेला लाल कंदील दाखविण्याची कामगिरी पार पाडली आणि नवटीका कशी असावी याचेंच तें जसें कांहीं प्रात्यक्षिक होतें असें म्हटलें पाहिजे. मालवणच्या साहित्यसंमेलनाच्या अधिवेशनांत नवकथेवर परिसंवाद झाला होता आणि त्या प्रसंगीं प्रा. वा. ल. कुळकर्णी यांनीं नवकथेचा जो परामर्श घेतला तो प्रा. गंगाधर गाडगिळांना झोंबलेला आहे. नवकथेवरची टीका कशी नसावी याचाच त्यांना तो नमुना वाटतो. नवकथेवरील टीका कशी नसावी हें नुसतें प्रतिहल्ल्याच्या स्वरूपांत सांगून भागत नाहीं. ती कशी विधायक व मार्गदर्शक

असावी हें उदाहरणानें दाखवून द्यावें लागतें. प्रा. वा. ल. कुळकर्णी यांना न साधलेली ही कामगिरी नवकथेला लाल कंदील दाखवून प्रा. गाडगीळ यांनीं शनिवारीं पार पाडली आहे. पृथ्वीप्रदक्षिणा करून आलेल्या गाडगिळांच्या हातीं रेल्वे पोर्टरचा लाल कंदीलच लटकलेला असावा हें कित्येकांना त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें तर 'चमत्कारिक' वाटेल. पण दर्यापार जाऊन आला तरी करंटयाच्या हातीं शंखच उरतात, या न्यायानें श्री. गंगाधर गाडगिळांसारख्या परभृतांच्या नशिबीं विमानतळावरील मार्गदर्शक दीपमालेऐवजीं लाल कांचेचा कंदीलच राहिलेला दिसत आहे. हा कंदील दाखवितांना त्यांनीं टीकेची नव पातळीच जशी कांहीं दर्शविली आहे. स्त्रियांची धपापतीं उरें दिसायला चांगलीं दिसतात असें प्रेक्षकांत खसखस पिकविण्याच्या लोभानें त्यांनीं सांगितलें आणि पदराशीं चाळा कांहीं वेळां शोभून दिसला तरी तो एकसारखा करीत राहिल्यानें त्यांत चवचालपणा कसा निर्माण होतो हेंही त्यांनी सरळपणें वर्णिलें. विषयाच्या गांभीर्याला धरून उपमा–उत्प्रेक्षा वापरावयाच्या असतात. पण हा जुना मामला झाला. नवसाहित्यांत त्याचप्रमाणें नवटीकेंतहि अस्पृश्य असें कांहीं राहिलेले नाहीं, हेंच स्त्रियांचे पदर चर्चेत ओढून व त्यांचीं धपापतीं उरें निर्देशून त्यांनीं एक प्रकारें सिद्ध केलें आहे. स्त्रियांच्या चवचाल उल्लेखानें श्रोत्यांची दांतखिळी उचकटून त्यांना हंसतमुख करण्याचा संकेत आजकाल रूढ झाला आहे. नवटीकेच्या सूत्रावलींत या संकेताला अग्रमान प्रा. गाडगीळ यांनीं दिलेला दिसतो.

विशिष्ट तत्त्व किंवा हेतु मनांत धरून तदनुसार ललित लेखन करणाऱ्या जुन्या जमान्यांतील मेलेल्या साहित्यसेवकांची राख गचाळ म्हणून प्रा. गाडगीळ यांनीं सावडली आहे, इतकेंच नव्हे तर 'कलेसाठीं कला' मानणारे प्रा. फडके, त्याचप्रमाणें प्रथितयश श्री. खांडेकर यांच्यासारख्यांची साहित्यसेवाहि त्यांनीं तितक्याच तुच्छतेनें गचाळ व भिकार ठरवून तुडवून काढली हें स्वाभाविकच होय. जुन्यांचे देव्हारें लाथाडल्याशिवाय नव्यांचें प्रस्थ माजत नसतें. नवकथाकारांची तितक्याच हिरिरीनें प्रा. गाडगिळांनीं प्रशस्ति केली, पण ती मुख्यतः आपला नवकथासंप्रदाय कसा फोफावत व बळावत चालला आहे हें दाखविण्यासाठींच होती असें म्हटलें पाहिजे. नवकथेचे नाक, कान, डोळे जेथल्या तेथें आहेत हें त्यांनीं अभिमानानें सांगितलें पण नंतर लाल कंदिलाचा झोत नवकथाकारांच्या एकेका उणीवांवर टाकला. कोठें नाक कान आहेत तर डोळे तिरळे आहेत, किंवा चिचोक्यासारखे अगर नसल्यासारखे आहेत, नाक म्हशीनें पाय दिल्याप्रमाणें, केस खालपर्यंत ओढूनहि कानांची लांबी झांकली नाही, मान रुतल्यासारखी आहे, रंग-रंगोटी व सजावट अद्यावत् असली तरी मूळची कुरूपता लपलेली नाही; पण असलें एखादें व्यंग असलें तरी बाकी सर्व जेथल्यातेथें व ठाकठीक आहे असें एकेका

नवकथाकाराच्या व्यंगाचा नांवनिशीवार उल्लेख करून प्रा. गाडगीळ हे सांगत होते. स्वतःच्याहि कांहीं नवकथा तोल व बांधेसूदपणाच्या दृष्टीनें बिघडल्याचेंहि प्रा. गाडगिळांनीं सांगून टाकलें आहे. हातांत छडी धरून एखाद्या तात्या पंतोजी-प्रमाणें एकेका नवथाकाराला प्रा. गाडगीळ झोडपून काढीत होते; आणि त्याच वेळीं आपला नवकथेचा वर्ग फार चांगला व जुनाट वर्गापेक्षां सरस व सकस आहे असें सांगून तात्या पंतोजीप्रमाणे आत्मगौरवच साधत होते. प्रा. गाडगिळांनीं केलेली नवकथाकारांची प्राथमिक प्रशस्ति व नंतरचें मुंडन लक्षांत घेतां साबण पाणी लावून पांच पाट काढण्यांतलाच हा नवटीकेचा प्रकार होय असें वाटल्यास त्यांत नवल नाहीं. प्रा. गाडगीळ यांनीं निर्देशिलेल्या एकेका उणीवा लक्षांत घेतल्या तर या उणीवांसह असलेली कथा ही नवकथा कशी म्हणावयाची असा प्रश्न पडल्याशिवाय राहात नाहीं. कालगत व कालहत वाटणाऱ्या नामवंताना लाथाडून भागत नाहीं, तर बरोबरीच्यांचीहि कणीक तिंबावी लागते, तेव्हां नवकथेचें कुलपतिपद प्राप्त होत असतें. प्रा. गाडगिळांनीं नवटीकेचें हें तंत्र शनिवारीं जें जें प्रस्थापित केलें तें पाहिल्यावर प्रा. कुळकर्ण्यांची मालवणची खारी टीका परवडली असें नवकथाकारांना वाटल्यास तें स्वाभाविक ठरेल.

नव वाङमय व जीर्ण वाङ्मय यांच्यामधील फरक सांगतांना प्रा. गाडगीळ यांनीं जुन्या साहित्याचें संकुचित वर्तुळ नवसाहित्यानें व्यापक व मोठें केलें आणि मनोविश्लेषणाची हद्द गांठली अशा प्रकारचें विवेचन केलें आहे. तसें जर असेल तर नव्या विस्तीर्ण वर्तुळांत जुनें वर्तुळ अंतर्भूत असलेंच पाहिजे. पण प्रा. गाडगिळांनीं नवकथेचे दोष दाखवितांना केलेलें विवरण पाहातां जुन्या परंपरांचा, संकेतांचा, मूल्यांचा ओझरता वाराहि नवसाहित्याला शिवून गेला तरी नवकथेसारखें साहित्य विटाळतें असा त्यांचा समज स्पष्ट दिसतो. नवसाहित्यानें जुनें वर्तुळ मोठें केलें आहे असें नव्हे तर स्वतःचें वर्तुळ स्थापन केलें आहे व या वर्तुळांत कामविकाराचे व कामचेष्टांचे पापुद्रे सोलण्याचे कारखाने मोठ्या धडाक्यानें सुरू आहेत. कोणी काय निवडावें व चिवडावें हा ज्याच्या त्याच्या आवडीचा व कुवतीचा प्रश्न आहे. नवसाहित्यकारांना जेवढें उमजतें, पचतें व जमतें तेवढ्या भांडवलावर पापुद्र्यांचे कारखाने त्यांनीं जोरांत चालवून त्यांत दिवंगत यश मिळविल्यास त्याबद्दल कोणालाच वैषम्य वाटण्याचें कारण नाहीं. मनुष्याच्या ठिकाणीं कामविकार व प्रवाहपतित्व हे स्वभावजन्य गुणधर्म आहेत यांत संशय नाहीं. पण विकारांबरोबरच विचार व संयम हें मानवी वैशिष्ट्य आहे आणि प्रवाहांत वहात असतांनाही त्यांतून बाहेर पडण्याचा व त्यासाठीं झगडण्याचा पीळ व पराक्रम त्याच्या ठिकाणीं आहे. विकारांबरोबरच हे शाश्वत भाव वाङमयांत उतरविण्याची ज्यांची हिंमत, कुवत व रग नाहीं त्यांनीं

कामविकारापुरतें मर्यादित वर्तुळ स्वतःपुरतें निर्माण करून तेथें फुंकत बसण्यास हरकत नाहीं, आणि आत्मप्रतिष्ठेकरितां जुन्यावर लाथा झाडण्यासहि हरकत नाही. पण छोट्या कामुक वर्तुळांत असे प्राणी संख्येनें वाढूं लागले कीं तें वर्तुळा-बाहेरच्या लोकांप्रमाणेंच वर्तुळांतल्या लोकांवरही लाथा झाडूं लागतात असें दिसतें. प्रा. गाडगीळांच्या शनिवारच्या भाषणानें हीच गोष्ट जणुं कांहीं दाखवून दिली आहे.

२–१२–५८

संमेलनाध्यक्षांचें 'हलकट' भाषण

मिरज येथे भरलेल्या मराठी साहित्य समेलनाच्या अध्यक्षपदावरून प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनीं आपल्या भाषणांत 'मराठी भाषा मरणाच्या पंथाला लागली आहे' ही इतिहासाचार्य राजवाडे यांची आरोळी खरी ठरणार अशा प्रकारचे स्मशानांतील कारटचांना शोभणारें भाकित वर्तविलें आहे त्यासाठीं त्यांनीं जी कारणमीमांसा केलेली आहे ती उथळ, अतिशयोक्त व उरफाटी असल्यामुळें प्रा क्षीरसागर यांचें भाषण हलकेंसलकें म्हणजेच 'हलकट' असें एखाद्यास वाटल्यास त्यांत नवल नाहीं. प्रा. क्षीरसागर यांच्या भाषणाची सुरुवात विनम्र भावाची व अध्यक्षपदाचा मान मिळाल्याबद्दलच्या कृतज्ञतेनें भारावल्यासारखी आहे. वास्तविक पहाता प्रा. क्षीरसागर यांना मिरजेचें अध्यक्षपद अयाचित वृत्तीनें लाभलेलें नाहीं, तर त्यांनीं तें प्रयत्नपूर्वक व 'ओरबाडून' प्राप्त करून घेतलेलें आहे. जें ओरबाडून घेतलें तें आपल्याला दिलें अशा प्रकारचा आव आणणें हा एक प्रकारें दांभिकपणाच म्हटला पाहिजे. संमेलनाचा अध्य । हा मार्गदर्शनासाठीं निवडला जातो अशा समजुतीची गुर्मीही त्यांच्या भाषणांत आरंभींच उसळली आहे. व्यवहारतः अध्यक्षपदावरून पहिलें भाषण ठोकलें गेल्यावर सभासंचालन हेंच अध्यक्षाचें मुख्य काम असतें. आणि अध्यक्षीय भाषणांतील विचारांचा आणि ठरावांचा साहित्यसंमेलनासारख्या मेळाव्यांत क्वचित् संबंध असतो. त्या दृष्टीनें सभासंमेलनांचा अध्यक्ष हा प्रारंभीं स्वगत भाषण म्हणतो, आणि भाषणाच्या

छापील प्रती वाटण्यांत आलेल्या असल्या तर श्रोत्यांची संख्या अध्यक्षीय भाषणाच्या वेळीं इतक्या झपाट्यानें ओसरत राहात कीं तें खरोखरीच 'स्वगत' भाषणच ठरतें. साहित्यसंमेलनाचें अध्यक्षपद हें सभासंचालनासाठीं असतें त्याचप्रमाणें संमेलनाध्यक्षांना साहित्य परिषदेच्या घटनेप्रमाणें जे अधिकार प्राप्त झाले आहेत त्या दृष्टीनें तें कर्तबगारी दाखविण्याचें पद ठरतें. पण अध्यक्ष हा मार्गदर्शक अशी माजोरी समजूत करून घेऊन प्रा. क्षीरसागर यांनीं अध्यक्षीय भाषण केलें आहे, आणि या समजुतीस शोभणारे गुणदोष या भाषणांत स्वाभाविकच आढळल्याशिवाय राहात नाहींत.

संयुक्त महाराष्ट्राचा उच्चार हा मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांतील एक शिष्टाचार झाला आहे, आणि हा शिष्टाचार संभाळण्यास पुरेसें या विषयाचें विवेचन प्रा. क्षीरसागरांच्या भाषणांत आहे. पण संयुक्त महाराष्ट्र आणि सीमा लढा यांचा पुरस्कार त्यांनीं एक प्रकारें कंठाळी पद्धतीनें केला आहे. सीमा प्रदेशालगत भरलेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांत यापेक्षां जिव्हाळा व कळवळा कोणी अपेक्षिला असल्यास त्याची निराशा तर होईलच, पण त्याचबरोबर साहित्यिकांची राजकारणी लोकांपेक्षां सुसंगत, स्पष्ट व शुद्ध दृष्टि असल्याचा जो तोरा त्यांनीं मिरवला आहे तो हलक्या वृत्तीचा व हानिकारक आहे असें म्हटलें पाहिजे. राजकारणी लोकच हा प्रश्न तडीस लावणार असें त्यांनीं म्हटलें आहे आणि हा लढा चालविणारांनीं असिधाराव्रत पाळलें आहे असेंहि सर्टिफिकीट त्यांनीं दिलें आहे. भाषिक राज्यरचनेची मागणी ही आक्रमक व हुकमत गाजविण्याकरितां नाहीं ही भाषिक राज्याच्या चळवळीची केवळ भूमिकाच नव्हे तर तें अधिष्ठान आहे पण हा विचार आतां साहित्यिकांनीं नव्यानें सांगावयाचा आहे अशाच थाटांत प्रा क्षीरसागरांनीं साहित्यिकांना आवाहन केलें आहे आणि एक प्रकारें भाषिक राज्याची चळवळ चालविणारांवर ठपकाच ठेवला आहें. भाषिक राज्याची मागणी ही आक्रमक किंवा हुकमत गाजविण्याकरितां नाहीं, ही गोष्ट जर असिधाराव्रताप्रमाणें कटाक्षानें आजतागायत मांडली गेली असेल तर प्रा. क्षीरसागरांनीं अध्यक्षीय भाषणात साहित्यिकांना केलेलें आवाहन हें आगंतुक ठरतें. जर भाषिक राज्याचा चळवळ चालविणाऱ्या नेत्यांनीं शुद्ध, सुसंगत व स्पष्टपणें ही भूमिका मांडली नसेल आणि त्यामुळें राजकीय पापशंका निर्माण होऊन महाराष्ट्रनिर्मितीस विलंब झालेला असेल तर हा विलंब कोणत्या कारणानें होत आहे हें लक्षांत आल्यावरहि प्रा. क्षीरसागर प्रभृति विद्वान साहित्यिक आतांपर्यंत कोणत्या क्षारसागरांत झोपा काढीत होते असा प्रश्न सामान्य माणसाला पडल्याशिवाय राहात नाहीं.

मराठी भाषेचा महाबाहु मराठी राज्यनिर्मितीच्या अभावीं सबल होत नाहीं एवढेंच नव्हे तर 'मराठी भाषा मरणाच्या पंथाला लागली' असल्याची इतिहासा-

चार्य राजवाडे यांची इशारेवजा आरोळी संमेलनाध्यक्षांनीं प्रतिध्वनित केली आहे. यासाठीं त्यांनीं जीं कारणें पुढें केलीं आहेत तीं इतकी सैल आहेत कीं कांगावखोर किंचाळीचें स्वरूप त्यांच्या प्रतिध्वनीस आलें आहे. इंग्रजी जमान्यांत विद्वान मराठींत लिहीत नाहींत व मराठी उपेक्षित आहे अशा चिडींतून ही इशारेवजा आरोळी इतिहासाचार्य राजवाडे यांनीं फोडली होती. त्यानंतर बहुतेक साहित्य संमेलनाध्यक्षांकडून मराठी भाषा मरणाच्या पंथाला लागली आहे काय, याचाच ऊहापोह होत होता. कै. कृ. प्र. खाडिलकरांनीं नागपूर साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करतांना 'मराठी भाषा मरणपंथाला लागल्याची भाषा' कायमची म्हणून गाडून टाकली. त्या अभद्रवाणीचें भूत सुमारें दोन तपांनीं प्रा. क्षीरसागर यांनीं पुन्हा उठविलें आहे. आक्रमणशील हिंदी भाषा आणि नवसाहित्य यांनीं मराठी भाषा मृत्युपंथाला लागली आहे अशी विलापिका त्यांनीं रचली आहे. पण त्यांनीं जीं दोन कारणें आपल्या अभद्र उच्चाराच्या पुष्टयर्थ दिलीं आहेत तीं दोन्हीहि पटण्या–पचण्यासारखी नसून तीं हलकींफुलकीं वाटल्याशिवाय राहात नाहींत. इंग्रजीची गुलामगिरी ब्रिटिश राजवटींत जी होती ती आतां राहिलेली नाहीं, आणि तिची जागा हिंदीनें घेऊन प्रादेशिक भाषांना तिचा सासुरवास होऊ नये म्हणून श्री. राजाजींसारखे खंदे योद्धे अत्यंत जागरूक आहेत हिंदी भाषा ही मध्यवर्ती राज्यकारभाराची व त्यापुरतीच राहिली पाहिजे अशी कटाक्षपूर्वक चळवळ इतक्या जोरांत सुरू आहे, आणि तिचा परिणाम हिंदीची आक्रमक नांगी सरकारदरबारीं ठेचली जाण्यांत इतका दिसत आहे कीं, हिंदीच्या आक्रमणामुळें मराठी भाषा मरेल अशी भलतीच शंका उपस्थित करणें ही सुद्धां एक प्रकारें अभद्र उक्तीच म्हटली पाहिजे.

नवसाहित्यामुळें मराठीचें मरण ओढवलें आहे असें प्रा. क्षीरसागर सांगतात, त्यावेळीं तर त्यांच्या या कांगाव्यानें 'सूनबाईच्या नादानें मुलगा बिघडला' म्हणून आक्रोश करणाऱ्या सासूची आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं नवसाहित्याची भाषा, मांडणी, विचार व तंत्र चांगली कीं वाईट हा प्रश्न बाजूला ठेवला आणि तें सर्व वाईट मानलें तरी त्यामुळें मराठी भाषेला मरणकळा कशी येते हें समजणें कठीण आहे. नवसाहित्याचा आजचा झपाटा मराठी भाषेच्या मुळावर येत आहे असें आज प्रा. क्षीरसागर म्हणत आहेत. पण हाच आक्षेप साहित्यांत कोणताहि नवा प्रकार सुरू झाला कीं त्या त्या वेळच्या दुड्ढाचार्यांनीं घेतलेला आहे. श्री. कोल्हटकरांचा विनोद, खाडिलकरांचीं नाटकें, प्रा. फडके यांच्या कादंबऱ्या, आचार्य अत्रे यांचीं झेंडूचीं फुलें यांच्यावरहि निंदेचा शेणसडा टाकण्यांत आला नव्हता काय ? जरा वाकडा भांग काढला, वेणीच्या चक्राऐवजीं सैल अंबाडा किंवा बॉबकट केला, डोक्यावरचा पदर खांद्यावर ढळला व अलीकडे पाठीवर रुळला कीं, शील

रसातळाला जाऊन आकाश कोसळलें असा गहजब वयातीतांकडून पूर्वापार करण्यांत येत असतो. भाषापद्धति, मनोविश्लेषण व विषयाची निवड यांत फरक पडतांच व नवेंपणाचें आकर्षण लोकांना वाटतें असें आढळतांच प्रा. क्षीरसागरांच्या भाषणांतहि तशाच प्रकारचा मराठी भाषेचे शीलसर्वस्व जाऊन ती बुडत चालल्याचा सूर आहे. तशी हिंमत व धडक असेल तर प्रा. क्षीरसागरांनीं व त्यांच्याच सारख्या नवसाहित्याच्या निंदकांनीं अधिक चित्ताकर्षक, चटकदार आणि मराठीला नवें ओजतेज प्राप्त करून देणारें साहित्य निर्माण करावें; मग आपोआपच नवसाहित्य मागें पडून तें उपेक्षिलें जाईल आणि लोकांकडून मिळणाऱ्या आश्रयाच्या अभावीं त्याचा जोर संपून जाईल. तशी धमक नसल्यामुळेंच कीं काय, नवसाहित्याच्या नांवानें एखाद्या करंटचाप्रमाणें हलकीसलकी वाटण्यासारखी बोटमोड प्रा. क्षीरसागर यांनीं केली आहे. जुन्या साहित्यिकांना बाजारांतून नवसाहित्यामुळें उठावें लागत असल्यामुळेंच कीं काय, मराठी भाषा नवसाहित्यामुळें मरणपंथाला लागल्याचें रडगाणें त्यांनीं गाइलेलें आहे. युक्तिवाद, सुसंगति, स्पष्टता, सिध्दान्ताची बिनतोड मांडणी यांच्या बाबतींतल्या भोंगळपणामुळें प्रा. क्षीरसागरांचें मिरजेचें अध्यक्षीय भाषण क्षुद्र, पक्षपाती, अहंभावाचें व हलकेंसलकें म्हणजेच 'हलकट' असें मराठी भाषिकांना वाटल्यास त्यांना दोष देतां येणार नाहीं.

१८-५-५९

नवी दिल्लीची प्यारी पानपट्टी

अहाहा! हल्लीं भारताची राजधानी नवी दिल्ली येथील नागरिक रोज ५० हजार रुपयांचीं पानें खात आहेत. हिंदु, मुस्लिम, युरोपियन असे सर्व धर्मांचे हजारों लोक रोज पानपट्टीच्या दुकानासमोर उभे राहातात व पानपट्टी चघळतात ही बातमी वाचून भारतीय एकतेची खात्री कुणाला बरें वाटणार नाहीं? भारतांत अठरापगड जाती व भाषा असल्या तरी या पानपट्टीमुळें त्या एकत्र राहातील याची खात्री बाळगायला हरकत नाहीं. कारण, पानपट्टीची भाषा एकच असते. ती म्हणजे प्रेमाची. पान पिकलेलें असलें किंवा हिरवें असलें तरी पानपट्टीचा अखेर

दिलजमाईचा लाल रंगच बनतो जर पानपट्टीची पूजा झाली असती तर भारत दुभंगला तरी असता का ? भारताची फाळणी कां झाली याचीं अनेक उथळ कारणें राजकारणी लोक सांगत असतात. पण महात्मा गांधी व बॅरिस्टर जीना यांनीं हातांत हात घालत दुकानांत जाऊन पानपट्टीची चव चाखली नाहीं हेंच फाळणीचें खरेंखुरें कारण होय. आज ही स्वस्त आणि मस्त पानपट्टी नव्या दिल्लींतील आजकालचे नवाब उर्फ केंद्रीय मंत्रीहि मोठ्या खुषींत खातात ही तर फारच आनंदाची वार्ता होय. कारण पानपट्टीचें सुप्त सामर्थ्य फारच अगाध आहे. आमच्या केंद्रीय मंत्र्यांनीं चीनी सत्ताधाऱ्यांना दिल्लीची पानपट्टी दिली कीं, त्यांचें मुळींच भय नको. भारताजवळ सुसज्ज सैन्य नसलें तरी केंद्रीय मंत्र्यांची पानपट्टीची पलटण तय्यार असली म्हणजे भारताला धोका नाहीं. हो ! पण भारतीय पातळीवरचा विचार करण्यास गोळवलकर गुरुजी व त्यांची काठीधारी सेना दक्ष असतांना ही फिकीर कशाला ? आपण बोलूनचालून पानपट्टीला रंगेल मानणारे रांगडे व संकुचित महाराष्ट्रीय आहोंत. हरदासाची कथा मूळपदावर यावी त्याप्रमाणें संयुक्त महाराष्ट्राचा आणि बेळगांव कारवारचाच संकुचित विचार आपल्या मनांत घोळतो. या क्षुल्लक गोष्टीसाठींच आपण इतके महिने रामायण केलें. पण तरीहि 'रामाची सीता कोण ?' या प्रश्नाप्रमाणेंच 'महाराष्ट्राची मुंबई कोण व बेळगांव-कारवार कोण ?' हा प्रश्न शिल्लकच आहे. हें असें कां झालें बरें ? दिल्लीची प्यारी पानपट्टीच यालाहि कारण नसेल ना ?

आम्हा महाराष्ट्रीयांचे नेते दिल्लीला जाऊन आले कीं, कडवटपणा सोडून एकदम कोवळे कां होतात याचें इंगित या पानपट्टींतच असणार. दिल्लीच्या ईश्वरांनीं पानपट्टी दिली कीं, त्यांच्याशीं आपल्या नेत्यांची दिलजमाई होते. पं नेहरूंनीं न. चव्हाण यांना पानपट्टी देतांच मराठी व गूजराथी जनतेच्या बंधुत्वाचा त्यांना साक्षात्कार झाला व संयुक्त महाराष्ट्राचा उचललेला विडा त्यांनीं मोठ्या प्रेमानें पं. नेहरूंनाच देऊन टाकला. महाराष्ट्राचे थोर पुरुष शंकरराव देव यांच्यावर तर या पानपट्टीचा फारच परिणाम झाला. आधीं ब्रह्मचारी मनुष्य मूळचाच हळवा असतो व तशांत नेहरूसारख्यांनीं पानट्टी दिल्यावर लज्जारक्षणार्थ लुंगी सोडून (म्हणजे लुंगी वगळून) काय वाटेल तें नेहरूंना द्यायला शंकरराव तयार झाले यांत नवल तें काय ? खरोखरी या पानपट्टीनेंच महाराष्ट्राला आजवर दगा दिला. दिल्लीच्या पानपट्टीला दाद न देणारी जात या पृथ्वीतलावर कम्युनिस्टांखेरीज कोणतीहि नाहीं हा अपक्ष जनता आघाडीचा सूर खरा वाटूं लागला होता. पण क्रुशेवनें व माओनें डोळा मारून या कम्युनिस्टांना पानपट्टी दिल्यामुळें फारच घोटाळा झाला आहे. डोळा मारून पानपट्टी दिली की, तिचा परिणाम फारच भयंकर होतो. मग माणूस आईबापांनाहि मानीनासा होतो.

...ा ग्रंथ संग्रहालय, डाणे. स्थळ...
अनुक्रम ...४५८२८... दिः ...नि.नं.ध...
क्रमांक ...२-१-२४... दिः ...२/२/५८...

यावर उपाय कोणता ? शह दिला कीं काटशह द्यावा या न्यायानें आतां महाराष्ट्रानेंहि पानपट्टीची कांस धरावी. पानपट्टी खाणाऱ्याला रंगेल समजून दूर न सारतां त्याचा प्रा. न. र. फाटक यांच्या अध्यक्षतेखालीं कोणतीहि सबब न सांगतां साहित्य संघानें सत्कार करावा. दिल्लीश्वरांनीं खुषींत येऊन संयुक्त महाराष्ट्र दिला तरच आमचें स्वप्न साकार होईल अशीं आजचीं लक्षणें आहेत ना ? मग महाराष्ट्रीयांनीं मिष्टान्न भोजनोत्तर प्रकृतीसाठींच केवळ पान न खातां पानपट्टी हीच महाराष्ट्राची प्रकृति बनविली पाहिजे. यामुळें महाराष्ट्राचा कायापालट होईल असा आम्हांला विश्वास वाटतो. हा बदल होतांच साहित्य व राजकारणांत जरूर असलेला निराळाच रंग भरेल. आजचें साहित्य आणि राजकारण दोन्ही बदलल्याखेरीज संयुक्त महाराष्ट्र होणें जडच नाहीं का ? साहित्य व राजकारण ह्यांचा संबंध नाहीं असें कुणाचें म्हणणें असेल तर तें साफ चुकीचें आहे. राजकारण करूनच साहित्य संमेलनाचें अध्यक्षपद मिळत असतें ही सिद्ध गोष्ट लक्षांत घ्यावी. पानपट्टीमुळें प्रथम आजच्या साहित्यांतील भकासपणा व नैराश्य दूर होईल. दररोज 'तीच नारी, तोच पलंग' असें कंटाळवाण्या जीवनाचें रडगाणें गायचें विंदा करंदीकर बंद करतील व उत्साहानें भसाड्या आवाजांत कविजन गाऊं लागतील कीं, 'तीच नारी, तोच पलंग, पण रोजचा नवा विडा !' पु. भा भावेंना जास्त चुना लावून पान दिलें कीं, पुराण्या जगांतील हा रिप व्हॅन विंकल जागा होईल व उमाळ्याचें सं. म. साठीं प्रभावी लिखाण लिहूं लागेल, साहित्य सतेज होईल व साहित्यिकांचे कंपू मोडून अखिल साहित्यिकांचा पानपट्टी संप्रदाय स्थापन होईल. राजकारणांत तर मजाच उडेल. सध्यां दिल्लीवर चढाई करण्यापूर्वी आपलेंच घर मजबूत करण्याचा प्रश्न आहे तोहि पानपट्टीमुळें तत्काळ दूर होईल. दत्ता देशमुख आचार्य अत्रे यांचें तोंड विडा देऊनच रंगवितील आणि अशा प्रकारें सर्व अहिनकुलांची झटपट युति होईल. पानपट्टीचें सामर्थ्यच असें अचाट आहे कीं, ती देतांच पटकन परकायाप्रवेश होतो व भांडणतंटा खलास होतो. स्त्रीनें पुरुषाला पानपट्टी दिली म्हणजे तर लगेच परकायाप्रवेश होतो असें कारवारला जाऊन आलेले जाणते साहित्यिक सांगतातच. मामा वरेरकरहि विडी तोंडांत धरून थापा मारण्याचें बंद करतील व विडा चघळत संयुक्त महाराष्ट्रासाठीं नाटक लिहितील. राज्यपाल झाल्यावरहि भजी खाण्याचें काका गाडगीळ सोडतील व त्यांना भजी मारण्याचें जनता सोडील. महाराष्ट्र असा एकदिल झाला म्हणजे केवळ संयुक्त महाराष्ट्राचा विडा उचलून दिल्लीवर चाल करतां येईल. या बाबतींत पानपट्टीच्या पुण्याईमुळेंच ह. रा महाजनी यांचा सल्ला घेण्यासहि सं. म. वादी तयार होतील. आपल्या चंचीचा उपयोग करून चंचुप्रवेश कसा करावा व हां हां म्हणतां संपादक कसें व्हावें य

९६५००

शास्त्रांतील त्यांचें कसब लोकमान्य आहे. अपमान चघळत न बसतां पान कसें चघळत बसावें हें याच गुरूंनीं शिकवावें. कारण 'मानापमान' नाटकांतला 'मान कोण व अपमान कोण याचें मला कोडें आहे' असें सांगणारा महाराष्ट्रांतला हाच पहिला बहाद्दर आहे. एकजुटीनें मान व अपमान विसरून व महाराष्ट्राची पानपट्टी घेऊन दिल्लीला गेल्यावर लढ्याशिवाय संयुक्त महाराष्ट्र मिळेल अशी खात्री वाटते.

संयुक्त महाराष्ट्र कसा मिळवावा यापेक्षां संयुक्त महाराष्ट्र झाल्यावर काय, याचीच चिंता करीत बसण्याचें साथी हॅरिस पानपट्टीमुळें सोडतील ही कल्पनाहि मोठी रम्य आहे. पण सशाच्या शिंगांसारखीच ती अशक्य ठरली तर? एका हातांत तिबेटविरोधी व एका हातांत नंबुद्रीपादचा विडा असल्यामुळें संयुक्त महाराष्ट्राचा विडा उचलायला तिसरा हात नाहीं अशी वैशिष्ट्यपूर्ण हातचलाखी कॉ. डांगे यांनीं केली तर? संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न जनतेचा असला तरी पुढाऱ्यांच्या मर्जीचाहि आहे ना? मग प्रभावी जनतेनें या पुढाऱ्यांना अखेरची एवढी तरी अट घालावी की, संयुक्त महाराष्ट्राच्या खटपटी आपापल्या महाराष्ट्रांतल्या गांवांत बसूनच करा. मॉस्को-दिल्लीला गेलांतच तर तिथल्या पानपट्ट्या चघळत येऊं नका. डांगला परस्पर टांग मारूं नका व भेसूर प्रचारानें नागपूर-विदर्भाला लग्नापूर्वीच घटस्फोटाची बुद्धि देऊं नका. संयुक्त महाराष्ट्र होईल तेव्हां होईल, पण तोंवर संयुक्त महाराष्ट्राचे लचके तोडणारीं कुत्रीं तरी आवरा! पानपट्टी तरी जपून घ्या!

२५-५-५९

'स्वतंत्र' राजाजींची मुंबईवरील स्वारी

नव्यानेंच जन्माला आलेल्या स्वतंत्र पक्षाचे आद्य शंकराचार्य श्री. चक्रवर्ती राजगोपाळाचारी यांनीं रविवार व सोमवार रोजीं मुंबईत दोन व्याख्यानें दिली आणि स्वारी करून त्यांनीं मुंबई जिंकली असें दृश्य गेले दोन दिवस होतें. चातकाप्रमाणें मुंबईकर त्यांची जशी कांहीं वाट पहात होते आणि उत्तर व दक्षिण

मुंबईत झालेल्या दोनहि सभांना लोकांनीं तोबा गर्दी उडवून दिली. त्यांच्या सभांसाठीं योजलेले दोन्ही हॉल तोकडे पडले आणि डोक्यावर ढग लटकत असतांहि हॉलबाहेरचें पटांगण व रस्तेहि लोकांच्या गर्दीनें व्यापून टाकले होते. राजाजींचीं तर्कशुद्ध, युक्तिवादानें व्यापलेलीं व कोटीबाज व्याख्यानें थंड्या आवाजांत व थंड्या वातावरणांत चाललेली ऐकतांना श्रोते मंत्रमुग्ध झाले होते; आणि त्यांच्या भाषणांतील प्रत्येक खाचखोच व कोपरखळीं आणि करवतीप्रमाणें कापत जाणारा उपहास यांचें दिलखुलास स्वागत मुंबईकरांकडून होत होतें. त्यांच्या वाक्पटुत्वानें मुंबई जशी कांहीं त्यांनीं वश करून घेतल्यासारखें दिसत होतें. मुंबई ही नेहरु-वेडी आहे आणि जहाल मतप्रणालीचें पहिलें स्वागत मुंबईंत होतें असा लौकिक आहे. नेहरु येतांच मुंबई आपलें भान विसरून त्यांच्याकडे धावत जाते, आणि कॉ. डांगे यांच्यासारख्या कडव्या ज्वलज्जहाल नेत्यांच्या भाषणांनाहि उत्साहानें हजेरी देते. मुंबई म्हणजे एक प्रकारें स्फोटक द्रव्यांचें लाक्षागृह आहे आणि जराशीहि ठिणगी पडतांच सहस्र जिव्हांनीं तिची प्रतिक्रिया उमटल्याशिवाय राहात नाहीं. डाव्यांची मायमाउली समजल्या जाणाऱ्या अशा मुंबईंत म्हणजे व्याघ्रमुखांतच श्री. राजाजींनीं प्रवेश केला आणि आपल्या बौद्धिक चलाखीनें व जिव्हाचापल्यानें त्यांनीं मुंबईला हसत खेळत ठेवून जणुं कांहीं मुंबईचे दात जबड्यांत घालून मोजले. नुसत्या जबड्यांतच हात घातला असें नव्हे तर हृदयालाहि हात घातला असें म्हटलें पाहिजे.

म. गांधींच्या असहकारितेच्या पहिल्या चळवळींत नाफेरवादी या नात्यानें श्री. राजाजींनीं स्वराज्यपक्षाचे प्रणेते देशबंधु दास व पं. मोतिलाल नेहरु यांच्याशी झुंज घेतली होती व तर्कशुद्ध युक्तिवादाच्या बळावर त्यांनीं गांधीवादी पक्ष सावरून धरला होता. खुद्द महात्माजी श्री. राजाजींना आपल्या सदसद्विवेकबुद्धीचे राखणदार समजत असत आणि त्यांच्या पसंतीला उतरलेली कोणतीहि गोष्ट तर्क व बुद्धिप्रामाण्य या बाबतींत हिणकस ठरण्याची भीति नाहीं असें ते मानीत. मुस्लिम लीगशीं समेट साधण्याच्या मुद्यावर आणि चलेजाव चळवळीबाबत त्यांचा काँग्रेस-श्रेष्ठींशीं मतभेद झाला त्यावेळीं त्यांनीं अज्ञातवास पत्करला, पण स्वत्वाची तेख त्यांनीं सोडली नाहीं. स्वातंत्र्यकाळांत भारताचे गव्हर्नर जनरल, मद्रासचे मुख्य मंत्री, भारताचे गृहमंत्री या जबाबदाऱ्या त्यांनीं पार पाडल्या. पण अलीकडे एक प्रकारचा अज्ञातवास त्यांना स्वीकारावा लागला होता, आणि काँग्रेसच्या धोरणाशीं मतभेद व्यक्त करणाऱ्या डुरकण्या प्रसंगोपात हवेंत घुमत होत्या. सहकारी शेतीची घोषणा काँग्रेसनें करून शेतकऱ्यांच्या जमीनमालकीला धक्का लावतांच आतांपर्यंत दबा धरून बसलेले श्री. राजाजी खवळलेल्या वाघाप्रमाणें झेप घेऊन बाहेर पडले आहेत; आणि नव्यानें जन्माला घातलेल्या स्वतंत्र पक्षाचे

अध्वर्यु या नात्यानें ऐन तारुण्यांतील तडफेनें दिग्विजय साधण्यासाठीं संचाराला बाहेर पडले आहेत. त्यांनीं या मोहिमेंत मुंबई गांठून दोन दिवसांच्या भाषणांनीं मुंबई जशी कांहीं जिंकली असें म्हटलें पाहिजे.

श्री. राजाजींनीं आपल्या मुंबईच्या दोनहि दिवसांच्या भाषणांत कॉंग्रेसच्या नेहरु-प्रणीत समाजवादावर कडाडून हल्ला चढविला आहे; आणि लोकांमधील सुप्त व विस्कळित अशा विकार-विचारांना वाचा फोडली आहे. श्री. राजाजींना पं. नेहरूंचा समाजवाद म्हणजे कम्युनिझमचें धाकटें व नकटे भावंड वाटतें. साम्यवादांतील सक्ति नसल्यामुळें कम्युनिस्ट जगांत जी अचाट प्रगति व सफलता दिसते तीहि भारतांत घडत नाहीं आणि सरकारी नियंत्रणें व हस्तक्षेप यांच्या कमालीच्या सासुरवासामुळें व्यक्तिविकासवादाच्या परिणामीं जी भरभराट अमेरिका-इंग्लंड-जपानसारख्या देशांत आढळते त्यांचाहि मागमूस भारतांत नाहीं. खाजगी उद्योगशीलतेला व पराक्रमाला अंकुर फुटण्यापूर्वीच त्यावर सरकारी नियंत्रणाचें व हस्तक्षेपाचें ऑसड ओतण्यांत येतें आणि सामुदायिक एकतंत्री उत्पादनक्षमताहि त्या जागीं येत नाहीं. अशा स्थितींत श्री. राजाजी म्हणतात त्याप्रमाणें पं. नेहरूंचा समाजवाद धाकटा व नकटाच नव्हे तर भारतीय अभ्युदयाच्या दृष्टीनें करंटा ठरला आहे. आज कॉंग्रेसचें राज्य आहे असें म्हणण्यापेक्षां सरकारी नोकरशाहीचा सासुरवास आहे. ही नोकरशाही लांचलुचपतीला चटावलेली, कर्तृत्वशून्यतेनें पछाडलेली आणि हुकूमशाहीनें अनावर झालेली असून व्यक्तिगत प्रतिष्ठित जीवन म्हणजे भारतांत सुळावरची पोळी ठरूं पहात आहे. स्वतंत्र बुद्धिमत्ता, कर्तृत्व व उन्मेष या सर्वांवर आज भारतांत नोकरशाहीचे नांगर फिरत आहेत, आणि प्रत्येकाचें स्वत्वहरण करून त्याला नोकरचाकर बनविणारा अजस्र कारखाना आज भारतांत चालू आहे, अशा प्रकारची आरोपपत्रिका पं. नेहरूंच्या समाजवादावर श्री. राजाजी सादर करीत होते. आपल्या मनच्याच गोष्टी राजाजी-मुखानें जाहीररीत्या बोलल्या जात असल्याचा साक्षात्कार त्यायोगें लोकांना होत होता. आणि त्यामुळें मुंबई राजाजींशीं केवळ संहमतच नव्हे तर तन्मय झाल्यासारखी व्याख्यानप्रसंगीं आढळत होती.

श्री. राजाजी आज जीं मतें उमाळयानें, उत्कट तीव्रतेनें आणि अभिनिवेशानें मांडत आहेत त्यांना सहकारी शेतीच्या घोषणेनंतर नवी धार चढली असली तरी तीं नवीं नाहींत, किंबहुना कॉंग्रेसमधील कित्येक दिवसांचा वैचारिक संघर्षच त्यांच्या स्वतंत्र पक्षाच्या रूपानें प्रकट झाला आहे. स्वातंत्र्यलढा सुरू असतांनाहि पं. नेहरूंची समाजवादी मतप्रणाली व सरदार पटेलप्रभृतींची गांधीवादी ऊर्फ सनातनी मतप्रणाली यांचे खटके सतत उडत असत. स्वातंत्र्यकाळांतहि तो संघर्ष

चालूच होता. सरदार पटेल यांच्या मृत्यूनंतर कणखर नेतृत्वाच्या अभावी सरदारपक्ष निष्प्रभ होऊन एक प्रकारें गाडला गेला होता. सहकारी शेतीच्या घोषणेमुळें शेतकऱ्याचा मालकी हक्क उखडला जातांच वेठीचा मजूर बनलेला शेतकरी उलटून दंश केल्याशिवाय राहाणार नाहीं, अशा अपेक्षेनें अनुकूल काळाची वाट पहात बसलेले गांधीयुगांतील बृहस्पति श्री. राजगोपाळाचार्य स्वतंत्र पक्षाच्या नांवानें एक प्रकारें सरदारपक्षाचेंच पुनरुज्जीवन करीत आहेत. स्वतंत्र पक्षाची घोषणा विरोधी पक्ष म्हणून श्री. राजाजींनीं प्रथम केली होती पण महिन्याभरांतच स्वतंत्र पक्ष राज्यारूढ होण्याची भाषा आत्मविश्वासपूर्वक ते बोलूं लागले आहेत. काँग्रेसला पर्यायी पक्ष अशी प्रतिष्ठा मिळवून भारतांत चक्रवर्ती होण्याची उमेद राजाजींनीं वयाचीं ८० वर्षें उलटून गेल्यावर धरली असून त्यांनीं पं. नेहरूंना दिलेल्या छातीठोक आव्हानाचा भरीवपणाच मुंबईत झालेल्या त्यांच्या स्वागतानें एक प्रकारें व्यक्त होत आहे.

८-७-५९

टिळक-गांधी नेतृत्व व देशमुख-निदान

लोकमान्य टिळकांच्या ३९व्या पुण्यतिथीच्या प्रसंगीं पुण्यांत श्री. चिंतामणराव देशमुख यांनीं टिळक स्मारक मंदिरांत भाषण केलें असून लो. टिळकांचें नेतृत्व आणखी कांहीं वर्षे लाभलें असतें तर सध्यां भारतांत जो सावळागोंधळ व कर्तृत्वहीनता माजली आहे ती दिसली नसती व लोकांच्या स्वातंत्र्याबद्दलच्या आकांक्षांची पूर्ति झाली असती असें विवेचन त्यांनीं केलें आहे. श्री. चिंतामणराव देशमुख यांच्या विवेचनाला विशेष महत्त्व देणें जरूर आहे. टिळकयुग किंवा गांधीयुग म्हणून जें संबोधलें जातें या दोनहि युगांमध्यें त्यांची भूमिका एक प्रकारें प्रेक्षकांची म्हणजेच पंचाची होती आणि खेळणारांपेक्षां पंचाचा अभिप्राय मान्य करूनच कोणता खेळाडू बाद झाला व त्याचें क्रीडानैपुण्य कसें होतें हें ठरविलें जातें. लो. टिळक विलायतेस असतांना त्यांची व श्री. चिंतामणराव यांची धूळभेट झाली होती आणि सरकारी नोकरींतहि राष्ट्रहिताची दृष्टि ठेवून लोकांबद्दलचें

कर्तव्य पार पाडतां येतें असा हितोपदेश लोकमान्यांनीं त्यांना केला होता अशी बोलवा आहे. श्री. चिंतामणरावांनीं लोकमान्यांच्या या उपदेशाचें सार्थक केलें यांत संशय नाहीं. देशाला स्वातंत्र्य प्राप्त झालें पण लोकांच्या अपेक्षा पूर्ण झालेल्या नाहीत याची तगमग व तळमळ श्री. देशमुखांना अत्यंत वाटत आहे. याचें खापर कोणावर फुटतें हा प्रश्न स्वाभाविकच उभा होतो, आणि आपापल्या परीनें त्याचें उत्तर देण्याचा अधिकार प्रत्येकास आहे यांत सशय नाहीं. श्री. देशमुखांच्या मतें लोकमान्यांचें नेतृत्व त्यांच्या मृत्यूनें संपुष्टांत आल्यानंतर महात्माजींच्या नेतृत्वाखालीं जो राजकीय पथ निर्माण झाला त्या पंथांत अनेक दुर्गुण महात्माजींच्या हयातींतच माजले आणि त्यांनीं अशा दुर्गुणांना आळा न घातल्यामुळें सध्यांची परिस्थिति निर्माण झाली आहे. त्यांच्या मतें लोकमान्य टिळकांचें नेतृत्व जर आणखी कांहीं वर्षे राष्ट्राला महात्माजींच्या नेतृत्वाच्या बरोबरीनें लाभलें असतें तर सध्यांची स्वातंत्र्यकालीन अवघड अवस्था आढळली नसती. नेतृत्वाचें द्विदल भारताला लाभलें नाहीं आणि महात्माजींच्या एकेरी व एकांतिक नेतृत्वाखालील ढोंग, असूया, मत्सर, कर्तृत्वहीनता यांचें प्रस्थ भारतांत माजून त्याचे दुष्परिणाम राष्ट्राला आज भोंवत आहेत असें श्री. देशमुखांचें निदान आहे. टिळकयुगाशीं किंवा गांधीयुगाशीं कोणत्याहि प्रकारें समरस न होतां प्रेक्षकाच्या निःपक्षपाती व निःस्पृह दृष्टीतून त्यांनीं हें विवेचन बऱ्याच अंतरावरून केलेलें आहे. अंतरावरून सारेंच दिसतें अशांतला भाग नाहीं आणि त्यांचें विवेचन हें निःस्पृह असलें तरी निर्दोष असलेंच पाहिजे असेंहि म्हणतां येणार नाहीं.

महात्मा गांधींच्या हयातींतच त्यांचा पंथ निर्माण झाला आणि तो निर्दोष राखण्याची खबरदारी महात्मा गांधींनीं न घेतल्यामुळें त्यांच्या हयातींतच निर्माण झालेल्या कुचकामी नेतृत्वानें देशाचा सत्यानाश होत असून स्वातंत्र्याची वाटचाल समाधानकारक होत नाहीं, असें श्री. देशमुखांनीं सांगितलें आहे. तो दोषारोप परमेश्वराचे अवतार समजले जाणाऱ्यांवरहि आल्याशिवाय राहात नाहींत. भगवान् श्रीकृष्णाची अवतारसमाप्ति यादवीनें झाली आणि यादवीस कारणीभूत होणारे दोष श्रीकृष्णाच्या हयातींतच भरभक्कम झाले होते. भगवान् बुध्द किंवा येशू ख्रिस्त यांच्या मठांत त्यांच्या पश्चात् जे अनाचार व अत्याचार माजले ते सुप्रसिध्द असून, हे दोष विचारांत न घेतां या महान् विभूतींनीं धर्मतत्त्वें पुढें ढकलण्याचा एकांगीपणा पत्करला असें म्हणतां येईल. खुद्द लो. टिळकांचा स्वराज्याचा पंथच होता त्यांत जे कच्चे दुवे होते त्यांनीं लोकमान्यांच्या पश्चात् गांधीद्वेषाचा फैलाव केला आणि कालप्रवाहापासून अलग पडून गांधीनिदेचा चिखल कालवून कर्तृत्वहीन नतद्रष्ट वृत्ति पोसली, असें म्हणतां येईल. महात्मा गांधींच्या पंथांत ढोंगधत्तुरा व मतिमंद अनुकरणशीलता होती व तिचा उपहास महात्माजींच्या

निर्विवाद अनुयायांकडून महात्माजींच्या हयातींत व नंतरहि होत आलेला आहे. पंथ म्हटला कीं, त्यांत मानवी दोष हे येतातच, आणि कितीहि सावधगिरी व निःस्पृहता असली तरी ध्येयनिष्ठ नेतृत्वाखालीं असा कांहींसा अंधार पसरल्याशिवाय राहात नाहीं, हा काळाचा आजवरचा घडा आहे. महात्माजींनीं आर्थिक व सामाजिक क्रांतीचीं साधनें नष्ट होऊं दिलीं असें श्री. देशमुख म्हणतात. पण गांधीजींनीं स्वातंत्र्य लढ्याबरोबरच सामाजिक व आर्थिक विधायक कार्याची मुहूर्तमेढ रोवली, ही वस्तुस्थिति कोणाला पुसून टाकतां येणार नाहीं. म. गांधींचें विधायक कार्य सुधारणावादी होतें व क्रांतिकारी नव्हतें असा आक्षेप महात्माजींच्या विधायक कार्याबद्दल पूर्वी होता व आजहि असूं शकेल. पण त्यांच्या नेतृत्वाचें विधायक स्वरूप नाकारतां येणार नाहीं. लो. टिळकांच्या नेतृत्वावरहि कोत्या, संकुचित व प्रतिगामी अस्मितेला फुंकर घालून ती पेटविल्याचा व लोकसंग्रहाच्या नांवाखालीं तेल्यातांबोळयांचें नेतृत्व केल्याचा आरोप आजचे तथाकथित बुद्धिमंत करीत असतात. पण भारतीय स्वराज्याचे पहिले कर्ते अग्रणी ही त्यांची प्रतिष्ठा कोणास ढळवतां आलेली नाहीं. म. गांधींच्या स्वातंत्र्य लढ्याच्या अष्टपैलू नेतृत्वाबद्दलहि असेंच म्हणावें लागेल. महात्माजींच्या युगांत भारताला एकांग नेतृत्व होतें हेंहि खरें नाहीं त्यांच्या नेतृत्वाला लो. टिळकांच्या नेतृत्वाची जोड लाभली नसेल, पण पं. नेहरूंचें समाजवादी नेतृत्व जें आज अग्रगण्य आहे तें गांधीयुगांतच प्रस्थापित झालें. गांधी युगांत नेतृत्वाचें द्विदल होतें असें त्यावरून म्हणावें लागतें.

महात्मा गांधींच्या पंथांत भ्रष्टाचार माजला आहे व म. गांधींची डोळेझाक त्यास कारणीभूत आहे असें श्री. देशमुख सांगतात. अनुयायांची निवड त्यांना करतां आली नाहीं किंवा जाणूनबुजून चुकीची केली असा त्यांचा मूलग्राही आक्षेप आहे. उद्दिष्ट डोळयांसमोर ठेवून त्या दिशेनें काम करूं लागलें कीं, त्या कार्याच्या प्रवाहांत अनेक ओघ येऊन मिळत असतात. प्रत्येक ओघ हा स्वच्छ व निर्मळ असतोच असें नाहीं. किंबहुना जीं साधनें देशकाल-परिस्थितीप्रमाणें उपलब्ध असतात त्यांचाच जास्तींत जास्त चांगला उपयोग करून स्वीकृत कार्य पुढें चालवावें लागतें. ज्यांना तें जमत नाहीं ते रानावनांत जाऊन संन्यासी बनतात! उपलब्ध साधनांशीं व मानवी सामुग्रीशीं भांडत न बसतां त्यांतील पोषक भागाचा उपयोग स्वीकृत कार्यासाठीं करण्याची लोकसंग्रही वृत्ति ज्या ध्येयनिष्ठ पुढाऱ्यांजवळ असते ते समूहाचें नेतृत्व करून लोककर्ते व ग्रंथनिर्माते या पदवीला चढत असतात. अंगण वांकडें व मानव दोषपूर्ण आहे म्हणून कर्ते पुरुष हात आंखडून बसत नाहींत, किंवा पुरुषोत्तमाच्या अवस्थेला पोहोंचलेले अनुयायी लाभेपर्यंत ध्येयाचा व तत्त्वाचा पुरस्कार व आचारहि थोपवून

धरीत नाहींत. कार्यांचा प्रचंड ओघ निर्माण झाला कीं, त्यांतून पतितपावन शक्ति निर्माण होत असते आणि मानव अधिक उन्नत अवस्था गांठल्याशिवाय राहात नाहीं. नेत्यांमागून पंथ भ्रष्टाचारी बनतात हा दोष आजचा नसून सनातन काळापासून चालत आलेला आहे. त्यायोगें नेतृत्वास दोष किंवा बट्टा लागत नाहीं, उलटपक्षीं कोणत्याहि पंथाचा अधःपात समाजाला न भोंवेल इतकें लोकमत संघटित व समर्थ असलें पाहिजे, एवढाच धडा त्यावरून घ्यावयाचा असतो.

४-८-५९

राजेंद्र-राजाजींचा सुराज्याचा शोध

हैद्राबाद येथें आंध्र प्रदेश सर्वोदय अधिवेशनाचें उद्घाटन करतांना राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं रविवारीं केलेलें भाषण आणि त्याच प्रसंगीं मद्रासच्या प्रचंड जाहीर सभेंत स्वतंत्र पक्षाचे प्रणेते श्री. राजगोपालाचार्य यांनीं केलेलें आवाहन जरी निरनिराळ्या भूमिकांवरून केलेलें असलें आणि प्रतिपादनाचा रोख विभिन्न असला तरी दोनहि नेत्यांच्या आशयांत बरीच सुसंगति असल्याचें आढळून आल्याशिवाय राहात नाहीं. डॉ. राजेंद्रप्रसाद हे आज भारतीच्या अध्यक्षपदीं आहेत आणि त्याच्याहि अगोदर भारतीय घटना साकार होण्यापूर्वी श्री. राजाजी हे गव्हर्नर जनरल ह्या नात्यानें स्वतंत्र भारतीय राजवटीचे प्रमुख होते. श्री. राजाजी हे महात्माजींच्या सदसद्विवेकबुद्धीचे राखणदार समजले जात असत. आणि काँग्रेसमधील गांधीवाद्यांचे प्रमुखत्व डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडे होतें. श्री. राजाजी हे महात्माजींच्या मेंदूच्या ठिकाणीं मानले तर डॉ. राजेंद्र प्रसाद हे महात्माजींच्या आचारविचारावर निष्ठा ठेवणारे त्यांचे पट्टशिष्य म्हणावे लागतील. काँग्रेसमधील गांधीवाद्यांचें नेतृत्व श्री. राजाजींकडे कधीं जाऊं शकलें नाहीं. बुद्धिवादी तर्ककठोर व्यक्ति सामान्यतः समूहाचें नेतृत्व क्वचितच करूं शकते. स्वतंत्र भारतांत श्री. राजाजींकडेच राष्ट्रपतीचें पद कायम रहावें अशा प्रकारची उठावणी घटना-पूर्तीनंतर झाली होती. उत्तरेचा पंतप्रधान असेल तर राष्ट्रपतीचा मान दक्षिणेकडे असावा अशी भावना त्यावेळीं प्रथम होती. दक्षिण उत्तर भारताचा तोल

संभाळण्याच्या या भावनेचा मान ठेवण्यांत आला असता तर श्री. राजाजी कदाचित् आजहि राष्ट्रपतिपदावर दिसले असते. पण दान बरोबर पडलें नाही. त्यानंतरच्या काळांत श्री. राजाजी यांनीं मद्रासचे मुख्य मंत्री व भारताचे गृहमंत्री यांसारख्या जबाबदाऱ्या पार पाडल्या हें खरें पण एक प्रकारच्या अज्ञातवासांतच राजाजी त्यानंतर आहेत. राष्ट्रपतिभवनाच्या सोनेरी पिंजऱ्यांत आपण आहोंत अशा प्रकारची भावना राजेंद्रप्रसाद व्यक्त करीत असतात आणि सर्वश्रेष्ठ आसनाच्या अनुषंगानें डॉ. राजेंद्रप्रसादहि एक प्रकारच्या अज्ञातवासांत आहेत असेंच म्हटलें पाहिजे. गांधी तत्त्वापासून भारत दूर चालला आहे अशी खंत या दोनहि नेत्यांत असून श्री. राजेंद्रांच्या हैद्राबादच्या भाषणांत व राजाजींच्या मद्रासच्या आवाहनांत विवेचन पद्धतीचें नसलें तरी आशयाचें साधर्म्य असावें यांत नवल नाहीं.

डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं हैद्राबाद येथें भाषण करतांना गेल्या बारा वर्षांच्या काळांत भारत राजकीय स्वातंत्र्य उपभोगीत असलें तरी सत्तेचें अधिकाधिक केंद्रीकरण होत आहे आणि जनतेचें कर्तृत्व व स्वावलंबन मावळत आहे असें गाऱ्हाणें आपल्या पद्धतीनें मखमली भाषेंत मांडलें आहे. सर्व बाबतींत लोक सरकारवर अवलंबून राहातात, सरकारी ओंजळीनें पाणी पितात आणि सरकारच्या भृकुटीभंगाबरोबर जनतेचा जीव वरखालीं येत असतो अशी वस्तुस्थिति त्यांनीं भाषणांत पर्यायानें मांडली आहे आणि त्याबद्दल खेद व्यक्त केला आहे. सरकारी कर्तृत्वाच्या कुबड्यांशिवाय लोकांचें पाऊलहि पुढें पडत नाहीं हें तर खरेंच; पण स्वतंत्र कर्तृत्व, कडवा बाणा व व्यक्तिगत धडाडी यांना सध्यांच्या राज्यकर्तृत्वांत वाव राहिलेला नाहीं. सरकारी पंचवार्षिक योजनांमध्यें उद्योगधंद्यांची शेंडी सरकारच्या हातीं आहे व नव्या उद्योगधंद्यास वाव नसल्यामुळें एक प्रकारची मक्तेदारी निर्माण झाली आहे. लोकांचीं उपजीविकेचीं साधनें भराभर सरकारी मालकीचीं होत आहेत. निरनिराळीं नियंत्रणें बसविण्यांत सरकारचा हेतु कांहींहि असला तरी त्यायोगें सांठेबाजांचें उखळ पांढरें होतें व गोरगरिबांना टांचा घासतांना पुरेवाट होते. सत्तेचा हव्यास, कर्तृत्वाचा अभाव व नीतिमत्तेची घसरगुंडी सतत सुरू आहे व त्याच्या परिणामीं, राष्ट्रपति म्हणतात त्याप्रमाणें सर्वसामान्य जनता स्वावलंबनास त्याचप्रमाणे स्वतंत्र कर्तृत्वास पारखी होत आहे हें खरें आहे. पण सर्वग्राही सरकारी धोरणानें लोकांमध्यें स्वतंत्र बाणा व उमेद-उत्साहच उरलेला नाहीं हें विसरून चालणार नाहीं. सर्वोदयी कार्यकर्त्यांनीं जनतेंत मिसळून लोकांचें स्वत्व व स्वावलंबी कर्तृत्व जागृत करावें असें ज्यावेळीं डॉ. राजेंद्रप्रसाद सांगतात त्यावेळीं पर्यायानें सरकारी धोरणावर व केंद्रीकरणावर ते ठपकाच ठेवीत असतात हें उघड आहे.

डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे सरकारी शेतीबाबत नेहरु मंत्रिमडळाशीं मतभेद आहेत हें जगजाहीर आहे. राष्ट्रपतिपदाचें माहात्म्य व पक्षातीतता लक्षांत घेऊन पं. नेहरु या मतभेदांबाबत स्वतः अत्यंत हळुवारपणानें लोकमत व राष्ट्रपतींचीं मतें संभाळून घेतांना आढळतात. श्री. राजाजींनीं काँग्रेसवर हल्ला चढवितांच इतक्या नाजुक रीतीने त्यांच्या टीकेचा परामर्श घेण्याचें पं. नेहरूंना कारण नसतें हें उघड आहे. पं. नेहरु व राजाजी यांच्यामध्यें एकमेकांचें कोणतेंहि उसनें न ठेवतां एक प्रकारच्या कडवेपणानें वाग्युद्ध झडत आहे हें स्वाभाविक आहे. राजाजींचा स्वतत्र पक्ष हा भांडवलदारांचा व एकोणिसाव्या शतकांत शोभणारा आहे अशी पं. नेहरुंनीं संभावना करतांच श्री. राजाजींनीं काँग्रेस ही स्वातंत्र्ययुगांत श्रीमंत झाली आहे असा उलट अहेर करून मुंदडांकडून काँग्रेसला मिळालेल्या मलिद्यावर नेमकें बोट ठेवलें आहे. स्वराज्य मिळालें पण काँग्रेसनें सुराज्य गमावलें असा सरळ आरोप श्री. राजाजींनीं केला आहे. लोकांचें कर्तृत्व व स्वावलंबनाचें शील खच्ची झालें आहे असा डॉ. राजेंद्रांचा आक्रोश व काँग्रेसनें सुराज्य गमावलें असा श्री. राजाजींचा आरोप या दोन्हींचाहि आशय एकच असून, यापेक्षां अधिक मर्मभेदी टीका काँग्रेसवर दुसरी असूं शकणार नाही.

१८-८-५९

रावणाप्रमाणें अत्रे उताणे पडले

मध्यवर्ती संयुक्त महाराष्ट्र समितीची दोन दिवसांची बैठक भरून मुंबई कॉर्पोरेशनपुढील केरळ ठरावाबाबत समिती गटाच्या घटक पक्षांना मतस्वातंत्र्य देण्याची प्र. स. पक्षाची मागणी आचार्य अत्रे यांचें एकट्याचें मत विरोधी पडून मंजूर झाली आणि गेल्या सुमारें तीन आठवड्यांत आ. अत्रे यांनीं आपल्या सांजसकाळच्या पत्रांतून जो नरकासुरी प्रचार केला होता तो चारी मुंडे चीत होऊन आ. अत्र्यांच्या प्रचारतंत्राला फार मोठा पराभव घ्यावा लागला. या पराभवानें आ. अत्र्यांचा भडका व्हावा आणि आपला पराभव चौफेर निंदेने भरून काढण्याचा प्रयत्न त्यांनीं करावा हें स्वाभाविक होय या चौफेर निंदेत या खेपेस 'नवाकाळ'हि

त्यांनीं समाविष्ट केला आहे. व्यक्तिद्वेषाच्या गटारगंगेंत व्यवसायशत्रु असलेला 'नवाकाळ' उतरला असें त्यांनीं वर्णन केलें आहे. 'मी एकटा सर्वांना पुरे आहें,' 'वैयक्तिक शत्रूंच्या छाताडावर पाय देऊन मराठा उभा आहे,' अशा प्रकारचीं शीर्षकें काल सकाळच्या चित्रविचित्र मालमसाल्यासह त्यांनीं दिलेलीं आहेत. नवाकाळ कोणाला व्यवसायशत्रु मानीत नाहीं आणि व्यक्तिद्वेष करीत नाहीं. कै. कृ. प्र. खाडिलकरांना आपण पितृतुल्य मानतों असें आ. अत्रे यांनीं समितीच्या गुरुवारच्या सभेंत सांगितलें होतें. त्या नात्यानें आ. अत्रे हे नवाकाळचे केवळ व्यवयासबंधूच नव्हेच तर धर्मबधु ठरतात. अर्थात् त्यांचा द्वेष करणें किंवा त्यांना व्यवसायशत्रु मानणें हें 'नवाकाळ'च्या बाबतींत शक्य नाहीं. 'नवाकाळ'च्या संपादकांचें शाब्दिक किंवा सचित्र वर्णन आ. अत्रे यांनीं कसेंहि केलें तरी वयानें मोठे असलेले व्यवसायबंधु व धर्मबंधु या नात्यानें आ. अत्रे यांना तो अधिकार आहे. आ. अत्रे यांची साठी उलटून गेलेली आहे. साठी उलटल्यामुळें नाठाळपणाचे असले हक्क त्यांना प्राप्त झालेले आहेत. मी एकटा सगळयांना पुरे आहे असें आ. अत्र्यांच्या काल सकाळच्या पत्रांतील एक भथळा सांगतो आणि आ. अत्रे यांच्यापुढें उभा राहूं शकणारा पत्रकार अजून जन्मायचा आहे असेंहि त्यांच्या कालच्या पत्रांत म्हटलेलें आहे. आ. अत्रे यांना 'सावधान' पत्राची आठवण कदाचित् नसेल, किंवा पत्रव्यवसायी प्रबोधनकार ठाकरे यांच्यापुढें त्यांनीं कांहीं काळापूर्वी साष्टांग नमस्कार घातला होता याचेंहि स्मरण कदाचित् नसेल. पण टाईम्सचें जैन प्रकरण तर अगदींच ताजें आहे. बढाईसाठीं विसरणें सोईस्कर जात असलें तरी असल्या गोष्टी विसरण्याचें सर्वसामान्य लोकांना कांहींच कारण नसतें. आ. अत्रे यांचें शिवराळ पत्रव्यवसायिक वैशिष्ट्यहि अद्वितीय नाहीं, त्याचप्रमाणें त्यांचा द्वेष किंवा शत्रुत्व कोणी करावें इतकें त्यांचें पत्रकार या नात्याचें यशहि अद्वितीय आहे अशांतला भाग नाहीं. पत्रव्यवसायांत चढउतार हे सतत सुरू असतात. त्यांत कधीं आकाशाला हात लागल्यासारखे होतात, तर कधीं पाताळाचा तळ गांठल्यासारखा होतो. आ. अत्रे यांना दुसऱ्या प्रकारचा अनुभव नाहीं अशांतला भाग नाहीं. अशा स्थितींत आ. अत्रे यांचीं पत्रें काय किंवा 'नवाकाळ' काय, सारे एकाच बोटींतील सहप्रवासी आहेत. मत्सर, द्वेष किंवा शत्रुत्व यांना पत्रव्यवसायांत थारा असतां कामा नये अशी 'नवाकाळ'ची श्रद्धा आहे, व त्यास अनुसरूनच नवाकाळचें आचरण आ. अत्र्यांसह सर्व व्यवसायबंधूंच्या बाबतींत आजतागायत आहे व पुढेंहि राहाणार आहे.

आ. अत्रे यांच्यावर झालेल्या टीकेमुळें त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली आहे व तें एका अर्थीं स्वाभाविक आहे. आ. अत्रे यांना दारु चढत नाहीं असें त्यांचे सहवासी सांगतात. दारु कित्येकांना पचनीं पाडतां येते. पण एवढेंतेवढेंसें

यश अंगावर येतें आणि अपयश तर असह्य असें ठरतें. आ. अत्रे यांना तूर्त अपयश असह्य झालें आहे आणि या अपयशास जे कारणीभूत झाले असें त्यांना वाटतें त्यांच्यावर चिखलफेक करून 'सर्वं निंदया पूरयेत्' असा त्यांचा अट्टाहास सुरू झाला आहे. मुंबई प्र. स. पक्षाच्या सिटी कौन्सिलनें केरळ ठरावावर मतस्वातंत्र्य मागितलें. श्री. नानासाहेब गोरे यांनीं तीन आठवड्यांत मतस्वातंत्र्य मिळवून देतों असें आश्वासन दिलें. या बाबतींत आ. अत्रे यांनीं जोरदार टीका केली यांत कांहीं वावगें झालें असें कोणी म्हणणार नाहीं. पण तशी टीका करतांना त्यांनीं अद्वातद्वा आरोप करून गरळ ओकण्यास सुरुवात केली. मतस्वातंत्र्याची मागणी म्हणजे समितीद्रोह व संयुक्त महाराष्ट्राचें शील सोडून काँग्रेसशीं व्यभिचार, असले हलकट आरोप श्री. गोरे यांच्यावर व मुंबईच्या प्र. स. पक्षीयांवर त्यांनीं केले. आपल्या प्रचारपद्धतीचा हात ज्याच्या डोक्यावर ठेवीन त्याचें भस्म करून टाकीन अशा भस्मासुरी थाटानें आ. अत्रे यांनीं प्र. स. पक्षाविरुद्ध हात उचलला पण तो नेमका त्यांच्या मस्तकावर बसला. प्र. स. पक्षीयांना सं. म. समितीनें केरळबाबत मुंबईत प्रचारस्वातंत्र्य दिलें, त्याचप्रमाणें प्र. स. नगरपित्यांचे राजीनामे मागें घेण्यास सांगून मतस्वातंत्र्याच्या मागणींत कसलाही समितीद्रोह किंवा व्यभिचार नाहीं असेंच समितीनें जगजाहीर केलें आहे. समितींत आ. अत्रे एकटे पडले. कॉ. श्रीनिवास सरदेसाई हे तर आ. अत्रे यांचे शत्रु किंवा द्वेष्टे नाहींत ना ? पण त्यांनींहि समितींत आ. अत्रे यांच्या लिखाणाची पद्धति आम्हांला नापसंत आहे असें सांगून टाकलें आहे. कॉ. डांगे यांनींहि अत्रे यांच्या शिवराळ प्रचाराबद्दलची नापसंती वेळोवेळीं प्रकट केली आहे. समितींतील सर्व घटक पक्षांनींहि प्र. स. पक्षीयांची मतस्वातंत्र्याची मागणी मान्य करून आ. अत्रे यांचे आक्षेप लटके पाडले आणि प्र. स. पक्षीय राजीनामे पत्करण्याचें नाकारून एक प्रकारें आ. अत्रे यांनीं प्र. स. पक्षीयांवर केलेला समितीद्रोहाचा चिखल त्यांच्यावरच परत टोलविला आहे. ता. ८ जूनच्या ठरावांतील एक अक्षरहि बदललें तर आपण राजीनामा देऊं असें आ. अत्रे म्हणाले होते. त्या ठरावांतील एक सबंध कलम समितीच्या बैठकींत संपुष्टांत आलें आहे. प्र. स. पक्षीयांचें राजीनाम्यांचें 'नाटक' संपलें. आतां आ. अत्रे यांच्या राजीनाम्याचें नाटुकलें केव्हां सुरू होतें तें पहावें. तूर्त तरी आचार्य अत्रे हे रावणाप्रमाणें समितींत उताणे पडलेले दिसत आहेत आणि त्यांनीं कितीहि व कोणावरहि लाथा झाडल्या तरी त्यांचेच पाय झिणझिण्या येऊन अधू होण्यापलीकडे त्यांतून कांहीं निष्पन्न होण्यासारखें नाहीं.

२४-८-५९

माडखोलकर यांचा खुलासाहि भयंकर

नागपूरच्या 'तरुण भारत' दैनिकाचे संपादक श्री. माडखोलकर यांनीं आपल्या एका संपादकीयांत नवें महाराष्ट्र राज्य मराठी राज्य होणार कीं मराठा राज्य होणार, असा मुद्दा उपस्थित केला होता. दक्षिण महाराष्ट्राच्या दौऱ्यांत ना. चव्हाणांनीं माडखोलकर–सवालास एक प्रकारच्या तिडिकेनेंच उत्तर दिलें. नवें राज्य मराठी जमातीचें न होतां मराठी भाषिकांचें होणार आणि तें गणराज्य न होतां गुणराज्यच व्हावें म्हणून जरूर तर मुख्य प्रधानकीहि सोडून जातीयतेचें उच्चाटन करण्यासाठीं मी झगडेन अशा प्रकारचा जबाब ना. चव्हाणांनीं दिला आहे. मराठा राज्य कीं मराठी राज्य ही खरूज आपण खाजवून काढलेली नसून, नागपूरच्या लोकांच्या बोलण्यांतील टीकेची एक पुटकुळी आपण काय ती फोडली आहे, असें श्री. माडखोलकर ना. चव्हाणांच्या जबाबास प्रतिजबाब देतांना जणुं कांहीं हातींपायीं पडून सांगत आहेत. नव्या मराठी राज्यांत मराठा समाज बहुसख्य असल्यामुळें महाराष्ट्रांत मराठा राज्य होणें स्वाभाविकच नव्हे तर स्वागतार्ह आहे असें म्हणून, ना. चव्हाणांसारख्या गुण-पूजकांच्या नेतृत्वाखालील मराठा राज्याची भीति वाटण्याचें कारण नाहीं असा निर्वाळा श्री. माडखोलकरांनीं दिला आहे.

श्री. माडखोलकर यांनीं नवें मराठा राज्य कीं मराठी राज्य असा सवाल उपस्थित केल्यानंतर त्यावर जी मल्लीनाथी व मखलाशी केली आहे ती त्यांच्या हजरजबाबी बुद्धिचापल्यास शोभणारीच आहे; पण एक प्रकारें पुळीवर काळपुळी उठविणारीहि आहे असें म्हणण्यावांचून गत्यंतर नाहीं. डॉ. आंबेडकरांच्या एका काळच्या उद्‌गारांचा उल्लेख श्री. माडखोलकरांनीं केला आहे; आणि नव्या मराठी राज्यांत दोन तृतियांश मराठे व एक तृतियांश हरिजन असल्यामुळें सत्तेच्या वांटणीचें भांडण यापुढें मराठा व महार यांच्यामध्यें आहे, असें 'शुभ बोल नाऱ्या'– प्रमाणें आपलें नमन दुरुस्त करतांना तें अधिक भयंकर करून ठेवलें आहे. नव्या महाराष्ट्रांत मराठा राज्य श्री. माडखोलकर म्हणतात त्याप्रमाणें स्वाभाविक व स्वागतार्ह असेल तर नवें मराठी राज्य कीं मराठा राज्य हा प्रश्नच उपस्थित करायचें कारण नव्हतें. आणि सवाल टाकण्याऐवजीं नव्या मराठा राज्याचें स्वागत व समर्थन श्री. माडखोलकर यांनीं प्रथमदर्शनीं करावयास पाहिजे होतें. नवें राज्य मराठी भाषिकांचें म्हणजेच कर्तबगार व गुणवंतांचें होणार अशी ग्वाही देऊन त्यासाठीं राजसंन्यास घेण्याचीहि प्रतिज्ञा ना. चव्हाणांनीं करतांच त्यांच्या घोषणेचें स्वागत

करण्याच्या निमित्तानें श्री. माडखोलकर यांनीं मराठा राज्य स्वाभाविक व स्वागतार्ह आहे असें सांगितलें आहे; आणि एक प्रकारें ना. चव्हाणांच्या जाति-निरपेक्ष राज्य प्रस्थापित करण्याच्या प्रतिज्ञेचा उपहास करून इंगळीप्रमाणें त्यांच्या नियोजित कर्तृत्वाला डंख केला आहे. जर महाराष्ट्रांत मराठा राज्य गणसंख्या लक्षांत घेतां स्वाभाविक व स्वागतार्ह असेल तर तें अटळ होय व ना. चव्हाणांची प्रतिज्ञा फोल ठरणारी आहे. त्याशिवाय डॉ. आंबेडकरांच्या उद्गारांचा आधार घेऊन श्री. माडखोलकरांनीं म्हटल्याप्रमाणें उद्यां सत्तेच्या वांटणीचें भांडण मराठा व हरिजनांत सुरू झालें तर श्री. माडखोलकर स्वाभाविक व स्वागतार्ह मराठा राज्याचे पक्षपाती व पुरस्कर्ते बनून पुढें सरसावणार काय? श्री. माडखोलकर ब्राह्मणांचें जणूं प्रतिनिधित्व करून उगवत्या मराठा राज्याला अर्घ्य देत आहेत. पण त्यांनींच म्हटल्याप्रमाणें उद्यां दोन तृतियांश मराठा व एकतृतियांश हरिजन यांच्यामध्ये सत्तेच्या वांटणीचा प्रश्न म्हणजेच वाद माजला तर ब्राह्मणवर्गाचा सरडा कालमानाप्रमाणें रंग पालटत कुंपणावर बसून 'रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति' असा जप करणार काय, याचा खुलासा त्यांच्या उत्तरांत दिसत नाहीं.

वस्तुतः महाराष्ट्राची आजवरची जडणघडण पाहतां श्री. माडखोलकर यांनीं राज्य कोणाचें हा जो प्रश्न उपस्थित केला आहे तो एक प्रकारें उपटसुंभ आहे, आणि मराठा राज्य स्वाभाविक व स्वागतार्ह आहे अशी मखलाशी केली आहे तीहि उथळ व एकतृतियांश हरिजनांची आगंतुक छेड काढणारी आहे असें म्हटलें पाहिजे. महाराष्ट्रांत अगदीं अलीकडेपर्यंत कर्तबगारांचीं व लढवय्यांची पूजा झालेली आहे. श्री. शिवाजी महाराज क्षत्रिय या नात्यानें तख्तनशीन होऊं शकतात कीं नाहीं हा प्रश्न मराठी जनतेला कधीं पडला नाहीं. शाहू महाराजानीं पेशवाईचे अधिकारी ठरवितांना श्रीवर्धनच्या माणसाची जात कधीं पाहिली नाहीं; त्याचप्रमाणें रानावनांतील लढवय्ये जवान निवडून त्यांना समशेर व सरदारकीचा शिरपेंच देतांना पहिल्या बाजीरावानें शिंदे मराठा, होळकर धनगर, शिदनाक नाईक महार, गायकवाड-भोसले अमूक-तमूक जातीचे, असा विचार मनाशीं आणला नाहीं. तेल्यातांबोळ्यांचें पुढारीपण लो. टिळक यांनीं केलें आणि तितक्याच आत्मीयतेनें खेड्यापाड्यांत शिक्षणाची गंगोत्री नेणारे कर्मवीर भाऊराव पाटील व हरिजनांचे उद्धारकर्ते डॉ. आंबेडकर यांनाहि महाराष्ट्रानें शिरोधार्य मानलें. ज्यांना अन्यायाचें उच्चाटन करावयाचें आहे, दिल्लीवर चालून जावयाचें आहे आणि कर्तृत्वाची अटक गांठावयाची आहे, त्यांना जातगोताचें प्रस्थ माजवून चालत नाहीं; गुण व शौर्य यांचेंच चीज करावें लागतें. सांठलेल्या तळ्याचें पाणी उपसणारांना जातवारीनें पाण्याची वांटणी करणें शोभतें व अपरिहार्य असतें. पण लाथ मारावी तेथें पाणी काढण्याची धमक

असल्या नतद्रष्टपणाचा पत्कर कधीं करूं शकत नाहीं व धजतहि नाहीं. महाराष्ट्राची ही ऐतिहासिक परंपरा पाहतां गणसंख्येऐवजीं गुणांचीच पूजा नव्या महाराष्ट्रांत होणें हें स्वाभाविक, स्वागतार्ह व शुभदायक ठरल्यावांचून राहात नाहीं मराठा राज्य गुणपरत्वें झालें तरी त्याचा हेवादावा व दुस्वास कोणालाहि नव्या मराठी राज्यांत वाटणार नाहीं, किंवा त्याच न्यायानें हरिजन सत्तारूढ झाले तरी त्याचें वैषम्य वाटण्याचें किंवा त्याबाबत शल्यनीति वापरण्याचेंहि कारण नाहीं. सत्तेकरितां जातीजातींत संख्येवरून भांडणें लागलीं तर त्यांत आनंद वाटण्यासारखें कांहीं नाहीं, उलट उगवत्या महाराष्ट्राचें तें नष्टचर्य ठरल्यावांचून राहाणार नाहीं. त्या दृष्टीनें गुणग्राहकता हीच मराठी राज्याची नीति व धारणा ठरेल अशा प्रकारची जी घोषणा ना. चव्हाण यांनीं केली आहे, ती महाराष्ट्राच्या प्रकृतीचें प्रतिनिधित्व करीत आहे हें निःसंशय होय !

१५-१-५९

शिवजयंतीस उदेलें : महाराष्ट्र धन्य झालें

आज शिवजयंतीच्या मुहूर्तावर नव्या महाराष्ट्र राज्याचा उदय झाल्याची अनौपचारिक घोषणा शिवनेरी किल्ल्यावर महाराष्ट्र मुख्य मंत्री ना. चव्हाण करणार आहेत. महाराष्ट्र व गुजराथ राज्यनिर्मितीच्या पार्लमेंटच्या कायद्यावर सोमवारच्या दिवशीं राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांची स्वाक्षरी झाली आहे आणि ता. १ मे पासून नवमहाराष्ट्र राज्य प्रत्यक्षांत येत आहे राष्ट्रीय विभूतीच्या जन्मदिवशीं महाराष्ट्राचें राज्य घोषित होत आहे; आणि महाराष्ट्रास धन्य धन्य वाटावें व कोणींहि हेवा करावा असें महाराष्ट्राचें हें भाग्य आहे. लोकमान्य टिळकांनीं अठराव्या शतकाच्या शेवटच्या दशकांत श्रीशिवजयंतीला सार्वजनिक स्वरूप दिलें आणि जवळजवळ गेलीं सत्तर वर्षे महाराष्ट्रभर व जेथें जेथें मराठी भाषिक समाज आहे तेथें तेथें शिवजयंती सार्वजनिक रीत्या साजरी होत आली आहे. सुंठ फुलायला साठ वर्षे लागतात. महाराष्ट्रानें दीर्घ काळ जें अत्यंत कडक असें शिवव्रत आचरलें तें ७० वर्षांनीं

सफल झालें आहे. राष्ट्रदैवताच्या जन्मदिवशींच सर्व इच्छा-आकांक्षा उजळून निघून सिद्ध व्हाव्यात असा योग अपूर्व व दुर्मिळ होय. महाराष्ट्र जन्मतःच भाग्यवान ठरला आहे आणि त्याचबरोबर या जन्मतिथीनेंच महाराष्ट्राला दैवत, कर्तृत्व व जबाबदारी स्वयमेव निश्चित झाली आहे.

नव्या महाराष्ट्राची कर्तबगारी कोणती, जबाबदारी कोणती व सर्वोच्च पुरुषार्थ कोणता? शिवजयंतीची महाराष्ट्र राज्याची पावनतिथीच या व अशा प्रश्नांचीं उत्तरें बोलून चुकलेली आहे. शिवाजी महाराज म्हणजे चालताबोलता पुरुषार्थ! त्यांनीं शून्यांतून स्वराज्य जन्माला घातलें. परकीय राजवट उलथून पाडण्यासाठीं शिवाजी महाराज कर्दनकाळासारखे झुंजले आणि त्याच वेळी मातेच्या वात्सल्यानें व दक्षतेनें त्यांनीं स्वराज्याचें सुराज्य करण्याची विधायक तपश्चर्या आचरली. नवराज्यनिर्मितीसाठीं शस्त्र व सुराज्याचा साक्षात्कार प्रत्येकास हमखास घडविणारें राज्यकारभाराचें आदर्श शास्त्र यशस्वी रीतीनें हाताळणारा श्रीशिवाजीसारखा पुरुष म्हणजे साक्षात् परमेश्वरी शक्तीचाच अवतार होय. स्वराज्यस्थापनेच्या आड त्यांनीं कळिकालालाहि येऊं दिलें नाहीं. उपलब्ध साधनांतील प्रत्येक उणीव ही सतत उद्योगानें त्यांनीं अनुकूल शक्ति बनविली. मातेच्या कनवाळूपणानें त्यांनीं आपल्या लोकांचें लालनपालन केलें. प्रत्येक गुणाचें त्यांनीं कौतुक करून पारितोषिक व प्रोत्साहन दिलें; पण गळ्यांतील ताईतहि जरासा वाकडा वागला तर त्याची काडीमात्रहि गय न करतां दुर्गुण त्यांनीं जेथल्या तेथें ठेचून काढले. महाराष्ट्राचें नवें राज्य म्हणजे मोगलाईचीच आवृत्ति न वाटतां मराठी भाषिकांस नवें राज्य हें मायमाउली-सारखें वाटलें पाहिजे अशी त्यांची प्रतिज्ञा होती. प्रेमळ परंतु कांटेकोर, पराक्रमी, सहिष्णु व संयमी, करारी पण परोपकारी अशी शिवाजीमहाराजांसारखी विभूति आदर्श म्हणून महाराष्ट्राक्षमोर असून, देशकालस्थित्यनुरूप श्रीशिवाजी महाराजांचाच वारसा महाराष्ट्र राज्यानें पुढें चालवावयाचा आहे.

चीनचे पंतप्रधान श्री. चौ एन् लाय हे भारत–चीन सीमेबाबत दिल्लीवर पांच दिवस डोकें घासून अपेशाचीं टेंगळें कपाळावर घेऊन परतले आहेत आणि दुसऱ्याच दिवशीं नव्या महाराष्ट्र राज्याच्या जन्माची घोषणा होत आहे हा योग अत्यंत सूचक होय. नव्या महाराष्ट्र राज्याला सर्वांगीण उत्कर्ष व अभ्युदय साधून सफलकाम तर व्हावयाचें आहेच आणि त्याचबरोबर आक्रमक चीनशीं जी झुंज देण्याचें भारताच्या नशिबीं लिहिलेलें दिसतें त्या झुंजेंत आघाडीवर राहून भारतास वज्राप्रमाणें अभेद्य व दुर्गम बनविण्याची जबाबदारीहि जन्मतःच महाराष्ट्रावर येत आहे. चीनशीं भारताचा लढा केवळ सरहद्दीपुरताच व थोड्या

काळाचा नसून तो भारताचें भवितव्य ठरविणारा व कदाचित् अर्धेअधिक शतक घेणारा असा आहे. भारताचा चीनबरोबरचा तंटा चाळीस वर्षेंहि चालेल असें पं. नेहरूंनीं नुकतेंच म्हटलें आहे आणि हा लढा लौकर संपणारा किंवा सुटणारा नाही हें चौंच्या दिल्ली भेटींत दिसून आलें आहे. शिवाजी महाराजांनीं जाणत्या जीवनाचीं सुमारें ४० वर्षें स्वराज्य व सुराज्याच्या प्रस्थापनेंत आणि त्याचबरोबर परकी जुलमी सत्ता खिळखिळी करण्यांत वेचलीं. नव्या महाराष्ट्राची कुंडलीहि शिवाजी महाराजांच्या कुंडलीशी जणुं कांहीं मिळती जुळती आहे. नव्या महाराष्ट्राला स्वराज्य–सुराज्याची जोपासना एकजुटीच्या पुरुषार्थानें भरभक्कम पायावर करावयाची आहेच आणि त्याचबरोबर भारतासहि संपन्न, संरक्षणक्षम व समर्थ बनविणाऱ्या कामगिरींतील महत्त्वाचा भाग उचलावयाचा आहे. यापैकीं कोणत्याच बाबतींत दिल्लीच्या दरबारांत महाराष्ट्र चवथ्या–पांचव्या रांगेंत उभा राहाणार नाहींच, पण अग्रभागीं राहून जरूर तें कर्तृत्व गाजवील, असें परंपरा सांगत आहे. नव्या महाराष्ट्र राज्यावर महान् जबाबदारी जन्मतःच येत आहे. ती पार पाडण्याच्या दृष्टीनेंच महाराष्ट्र राज्याच्या पांच दिवसांच्या महोत्सवांत प्रत्येकजण मननचिंतन करीत राहील हें उघड असून 'वेडेंवांकुडें गाईन परि तुझाच म्हणवीन' अशा निष्ठेनें आजपासून सुरू झालेली पांच फुलांची लेखमाला आमचे वाचक गोड करून घेतील अशी आशा आहे.

२७–४–६०

नव्या महाराष्ट्रांत अपेक्षा उचंबळल्या

नव्या महाराष्ट्राची घोषणा काल रोजीं शिवनेरीवर झाली आणि सारा मराठी भाषिक प्रदेश उत्साहानें, आनंदानें आणि त्याचबरोबर आशाअपेक्षांनीं हलत डोलत उचंबळून आल्यासारखा झाला आहे. नव महाराष्ट्र राज्याच्या उत्साहानें वैशाखांत कार्तिक मासींची दिवाळी आणली आहे. १५ ऑगस्ट १९४७ सालीं स्वातंत्र्यदिनानिमित्त जसा उत्स्फूर्त सोहळा भारताबरोबरच महाराष्ट्रांत साजरा झाला होता तसाच आज महाराष्ट्र राज्योत्सव साजरा होत आहे, आणि

दिवाळीदसऱ्याच्या परंपरागत सणासुदीलाहि महाराष्ट्र राज्योत्सवानें कोठल्या कोठें मागें टाकलें आहे. आजतागायतची इच्छा व तपस्या सफल झाल्याचा हा उत्साह व उत्सव जसा आहे त्याचबरोबर भावी काळच्या अपेक्षा व आशाहि त्यायोगें व्यक्त होत आहेत हें विसरून चालणार नाहीं. महाराष्ट्र राज्यान मराठी भाषिकांच्या मनांतील शल्य नाहींसें झालें आहे. महाराष्ट्र शापांतून मुक्त झाला आहे आणि जो उणेपणा महाराष्ट्राच्या माथीं मारला गेला होता तें किटाळ टळलें आहे. याबद्दल आनंद तर उचंबळून येणारच पण त्याचबरोबर आजपर्यंत जें झालें नाहीं, करतां आलें नाहीं तें सर्व आतां नव्या राज्यांत हस्तगत होईल अशा अपेक्षा या उत्सवामागें आहेत. १९४७ मध्यें १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्यदिनीं अशाच आशाअपेक्षा भारतीयांनीं मनांत बाळगून सुखस्वप्नें पाहात स्वातंत्र्योत्सव साजरा केला. घुक्याप्रमाणें सुखस्वप्नें नंतर विरळलीं आणि हताश वृत्ति भारतीयांत संचरली. अपेक्षा केली आणि ती सफळ झाली नाहीं तर भीषण अशी आग अंतःकरणांत पेट घेते. महाराष्ट्राचा आजचा उत्सव पाहून जे हरखले आहेत त्या महाराष्ट्र निर्मात्यांनीं व नियंत्यांनीं सुखस्वप्नें विरळण्याऐवजीं प्रत्यक्षांत जास्तींत जास्त उतरतील अशी दक्षता घेतली पाहिजे, असा इशाराच सभ्यांचा उत्सव एक प्रकारें देत आहे.

महाराष्ट्र राज्याचीं चित्रें रेखाटतांना आणि सुखस्वप्नें पहातांना होमरूल चळवळींत लोकमान्य टिळकांनीं अहमदाबादला केलेलें भाषण व महात्माजींनीं फैजपूरच्या पहिल्या ग्रामीण काँग्रेसमध्यें खादी ग्रामोद्योग प्रदर्शनांत केलेलें भाषण मराठी मनाला आठवल्यास तें स्वाभाविक ठरतें. पान कां कुजलें, घोडा कां अडला, भाकरी कां करपली, ह्या सर्वांचें उत्तर ज्याप्रमाणें 'न फिरविल्यामुळें' हें होय, त्याचप्रमाणें स्वातंत्र्य हें आतांच्या सर्व व्यथांवरचा तोडगा आहे असें लोकमान्यांनीं सांगितलें होतें. भारतीय स्वराज्याचे चार कोपरे कोणते हें महात्माजींनीं फैजपूरच्या भाषणांत सांगितलें होतें. लोकमान्य व महात्माजींचे उद्गार स्वतंत्र भारताप्रमाणेंच महाराष्ट्र राज्याला लागू पडल्याशिवाय राहात नाहींत. महाराष्ट्राचें कर्तृत्व कुजल्यासारखें आहे, भाकरी करपल्यासारखी आहे, महत्त्वाकांक्षा अडल्यासारख्या आहेत. नव्या महाराष्ट्रांत सर्व अडथळे, अडचणी दूर होतील आणि सुखासमाधानानें तसेंच मानानें व ताठ मानेनें नांदतां येईल अशा उमेदीनें आज मराठी माणूस फुरफुरलेला आहे. खेड्यापाड्यांत शेतकरी स्त्रिया सुस्थितिदर्शक कपडेलत्ते व किडूकमिडूक घालून ठुमकत डोक्यावर घडा घेऊन पाणवठ्यावर जात असलेल्या दिसल्या पाहिजेत, अशा भावेंत महात्माजींनीं स्वराज्याच्या चार कोपऱ्यांपैकीं आर्थिक कोपऱ्याचें वर्णन केलें होतें. पोटभर अन्न, अंगभर कपडा व कोणत्याहि बाबतींत लाचारी न जाणवण्याइतकी सुस्थिति

खेड्यापाड्यांत व झोपड्याझोपड्यांत नांदली पाहिजे हें आर्थिक उद्दिष्ट महात्माजींनीं रेखाटलें होतें. अन्नवस्त्राची ददात असतां कामा नये आणि त्याच-बरोबर बौद्धिक लाचारी कोणत्याहि क्षणीं न वाटण्याइतकी शैक्षणिक पातळी असली पाहिजे. आपण आपल्या घरचेच नव्हे तर गांवचे व पर्यायानें राज्याचे व भारताचेहि राजे आहोंत असा साक्षात्कार व अनुभव प्रत्येकास आला पाहिजे. आर्थिक, शैक्षणिक व राजकीय असे स्वराज्याच्या चौकोनी उभारणीचे तीन कोन ऊर्फ कोपरे महात्माजींनीं फैजपूरला सांगितले होते. या गोष्टी जेथें नाहींत तें सर्वांगीण स्वराज्य नव्हे आणि मराठी माणसाचें महाराष्ट्र राज्यहि म्हणतां येणार नाहीं. मराठी भाषिक अल्पसंतुष्ट असला तरी यापेक्षां खालच्या अपेक्षा असूं शकत नाहींत, आणि त्या सफल झाल्याशिवाय त्याला कृतकृत्यताहि वाटणार नाहीं.

खेड्यापाड्यांतील झोपड्यांत राहाणाऱ्या व शेतावर रावणाऱ्या माणसास डोळ्यांसमोर ठेवून महात्माजींनीं स्वराज्याचे तीन पाय किंवा कोपरे जे सांगितले तीच नव्या महाराष्ट्रानींहि आधारभूत उद्दिष्टें होत आणि सूत्ररूपानें साऱ्या महाराष्ट्राच्या भरभराटीस गवसणी घालण्याइतकीं हीं उद्दिष्टें व्यापक आहेत. शेतकरी सुखी होण्यास त्याचा कच्चा माल वाजवी दर देऊन वापरणारे व पक्का माल माफक दरांत त्याच्या दारीं पोहोंचविणारे कारखाने सर्वत्र विखुरलेले असले पाहिजेत, व्यापार व्यवहाराच्या सोयी व साधनें उपलब्ध पाहिजेत, त्याच्या उत्पादनक्षमतेस उपकारक अशी विजेसारखी शक्ति त्याच्या घरांत व शेतांत मिळाली पाहिजे, आणि हुकमी पाणी व साधनें त्याला सहजगत्या मिळालीं पाहिजेत, त्याला आवश्यक तें शिक्षण मिळालें पाहिजे, तशी तरतूद करणारी व त्याचें आरोग्य संभाळणारी स्थानिक स्वराज्य संघटना बळकट पाहिजे आणि या सर्व गोष्टी जरूर तर आग्रहानें घडवून आणण्याइतकी महाराष्ट्र राज्याचा नागरिक या नात्याची कळ त्याच्या हातीं पाहिजे. शेतकऱ्याचा आदर्श संसार व्यवहार म्हणजेच सर्वांगीण उत्कर्षाचें ठायीं ठायीं प्रतीत होणारें प्रतीक होय. महाराष्ट्र राज्याची उभारणी या तीन गोचर उद्दिष्टांना धरून झाली पाहिजे. या सर्वांचा कळस म्हणजे सुखी महाराष्ट्र राज्याची सांस्कृतिक प्रतिष्ठा होय. या सांस्कृतिक प्रतिष्ठेचेंच महाराष्ट्रधर्म असें वर्णन महाराष्ट्रसंतांनीं केलेलें आहे. हा महाराष्ट्र-धर्माचें व महाराष्ट्राची चौकोनी उभारणी कशी शक्य होईल याचें यथातथ्य विवेचन पुढील अंकीं करूं.

महाराष्ट्रधर्माची अखंड जोपासना

शिवजन्म आणि नवमहाराष्ट्रजन्माचा सोहळा शिवनेरीवर साजरा करतांना शिवछत्रपति स्मारकसमितीचे अध्यक्ष ना. बाळासाहेब देसाई आणि उत्सवाचे उद्घाटक ना. यशवंतराव चव्हाण यांनीं नव्या राज्याच्या महाराष्ट्रधर्माची जाणीव आपापल्या परीनें करून दिली आहे. महाराष्ट्रधर्म हा एका दृष्टीनें वर्णनातीत, अव्यक्त पण महतो महीयान् असा आहे. अभ्युदय हा डोळ्यांनीं साक्षात् स्वरूपांत दिसूं शकतो. समृद्ध शेती, भरभराटलेली कारखानदारी, व्यापार–उदिमाची ऊर्जितावस्था, दारिद्र्य व दधात यांपासून मुक्तता अशा सुखी रहाणीच्या दृष्टिगोचर बाबी आहेत. सामान्यतः त्यावरूनच व्यक्तीची, समाजाची किंवा राष्ट्राची ऊर्जितावस्था मापली जाते व त्यासाठींच कर्तृत्व खर्ची पडतें. संस्कृति अंतर्मुख असते. अंतःकरणांत ती रुजते, आचारविचार व उक्तींत ती यथातथ्य दर्शित होते आणि दैनंदिन जीवन सांस्कृतिक मंगलतेनें ओतप्रोत झालें कीं तो नित्यधर्म बनतो. महाराष्ट्रधर्म हें या दृष्टीनें महाराष्ट्रीय संस्कृतीचें परिणत स्वरूप होय.

या धर्माचा आविष्कार व प्रभाव पटविणारे प्रसंग महाराष्ट्राच्या अद्यावत् इतिहासांत आगळे नाहींत. सर्वांभूतीं समानता शिकविणारी मराठी साधुसंतांची शिकवणूक व वर्तणूक हा महाराष्ट्रधर्म; महाराष्ट्राचें दैवत असलेली आणि सर्वांचा हस्तस्पर्श चरणीं करून घेणारी विठ्ठलमूर्ति म्हणजे साकार महाराष्ट्रधर्म. लावण्यानें व यौवनानें लवलवणारी कल्याणच्या सुभेदाराची सून बहिणीप्रमाणें मानून तिला मानसन्मानानें पतिगृहीं पाठविणारा शिवछत्रपतीचा आधार हा स्त्रीविषयक महाराष्ट्रधर्म; सुरत लुटतांनाहि तेथील सर्वसामान्य जनतेला यत्किंचित् तोशीस लागूं न देणारी शिवछत्रपतीची दक्षता व जागरूकता हा महाराष्ट्रधर्म; मुसलमान होण्याचें नाकारून हाल हाल पत्करत ताठ मानेनें मृत्युमुखांत प्रवेश करणाऱ्या श्री संभाजीचा बाणा हा महाराष्ट्रधर्म; छत्रसालची चिठ्ठी येतांच रिकिबांत पाय घालून बुंदेल्यांच्या साहाय्यार्थ धाव घेणाऱ्या पहिल्या बाजीरावाची धडाडी हा महाराष्ट्रधर्म; पराभव पत्करूनहि भारतावर आक्रमण करणारी खैबर खिंड कायमची बंद करणारा पानिपतला प्रकट झालेला संघटित पराक्रम म्हणजे महाराष्ट्रधर्म; सहा वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा हाहि स्वकार्यास पुष्टि देणारा परमेश्वरी प्रसाद मानणारी आणि मंडालेच्या कैदखान्यांत गीतारहस्य उकलणारी लो. टिळकांची बौद्धिक बैठक म्हणजे महाराष्ट्रधर्म; पुण्यांत भरलेल्या काँग्रेसच्या दाराशीं शेतकऱ्याचा पुतळा उभा करून त्याची दाद मागणारी महात्मा

ज्योतिबा फुले यांची गोरगरिबांबद्दलची तळमळ म्हणजे महाराष्ट्रधर्म; खेड्या-पाड्यापर्यंत ज्ञानगंगा पोहोंचविण्यासाठीं जिवाचें रान करणारे, शिक्षणक्षेत्रांतील भगीरथ कै. भाऊराव पाटील यांची अखेरच्या क्षणापर्यंतची जिद्द हा महाराष्ट्रधर्म, आणि आपल्या मतदार संघाचें प्रतिनिधित्व करण्यासाठीं केंद्रीय अर्थमंत्रीपदाचा श्री. चिंतामणराव देशमुख यांनीं केलेला त्याग म्हणजे महाराष्ट्रधर्म! करंटेपणा, नतद्रष्टपणा, आप्पलपोटेपणा व द्वेष–द्रोह यांना डावलून जेथें जेथें माणुसकी उसळून प्रकट होते तेथें तेथें महाराष्ट्रधर्म मूर्तिमंत प्रकट झालेला असतो. हा 'महाराष्ट्रधर्म वाढवावा' अशी संतविभूतींची शिकवणूक नव्या राज्यांत जितकी अंमलांत व अनुभवास येईल तितका नवा महाराष्ट्र आचारविचाराचा मानदंड भारतांत प्रस्थापित करण्यास समर्थ ठरेल.

जेव्हां जेव्हां धर्माला ग्लानि येते त्यावेळीं अभ्युत्थानासाठीं परमेश्वर अवतार घेतो असें भगवान कृष्णानें सांगितलें आहे. धर्माला ग्लानि येते याचा अर्थ धर्म लोपतो असा नव्हे, तर त्याचें तेज व प्रभाव नाहींसा होतो आणि पाखंडाचें प्रस्थ माजतें. ही ग्लानि दूर करून धर्माचरण प्रभावी व फलदायी करण्याचें काम आतांच्या युगांत एखाद्या व्यक्तीचें राहिलेलें नसून सामूहिक शक्तीचें ठरलें आहे. महाराष्ट्र-धर्माला ग्लानि आली आणि त्या धर्माचें पुनरुत्थान साधण्यासाठींच नव्या महाराष्ट्र राज्याची शक्ति मराठी भूमींत अवतरत आहे. महाराष्ट्रधर्माला ग्लानि आली म्हणज काय झालें? दोन महाराष्ट्रीय माणसें एकत्र आलीं कीं अल्पावधींतच एकमेकांशीं तंटा करून उणींदुणीं काढूं लागतात आणि दुसऱ्याला तोंडघशीं पाडण्यांत पुरुषार्थ मानून त्यासाठीं आयुष्याची कर्तृत्वशक्ति खर्ची घालतात. दुसऱ्याचा उत्कर्ष पाहिल्यावर अहमहमिकेनें आपला उत्कर्ष साधावा हें समजण्यासारखें आहे. पण दुसऱ्याचा उत्कर्ष न साहवून स्वतःशीं जळत राहाणें आणि बोटमोड करण्यांत परमार्थ मांडणें हा करंटेपणा होय. कालप्रवाहाशीं समरस होऊन त्याची शक्ति वाढविण्यासाठीं व शक्य तर शुद्धीहि साधण्यासाठीं कार्यरत राहाणें हा सहजधर्म होय. पण प्रवाहाबाहेर पडून चिखलांत बेडकाप्रमाणें डरांव डरांव करीत उगीच फुशारक्या मारणें ही मनाची प्रगल्भता नव्हे किंवा वृत्तीचा बाणेदारपणा नव्हे. खच्ची झालेल्या कर्तृत्वांतून, कुजलेल्या मनोवृत्तींतून आणि हताश अवस्थेंतून उद्भवलेली ही विकृति होय. धर्माची ग्लानि ऊर्फ पाखंड यापेक्षां निराळें नाहीं. गेलीं कित्येक वर्षें महाराष्ट्र जणुं कांहीं अशा विकृतीनें पछाडलेला आहे आणि जेथें तेथें मागें पडत आहे. महाराष्ट्रधर्माची ही ग्लानि दूर करण्याकरितांच जणुं नव्या राज्याची शक्ति अवतरत आहे आणि यापुढें विकृत अवस्थेंतील महाराष्ट्राचा उद्धार व कायापालट होऊन महाराष्ट्रधर्माचें पालन महाराष्ट्र राज्यांत होईल अशी आशा आहे.

ज्या महाराष्ट्रधर्माला अलीकडचीं चाळीस वर्षे महाराष्ट्र आंचवल्यासारखा झाला होता, त्या महाराष्ट्रधर्माचें आचरण सुकरतेनें होण्यास नव्या महाराष्ट्र राज्यासारखी अनुकूल संधि दुसरी नाहीं. महाराष्ट्र आतां कोणाच्या ताटाखालचें मांजर नाहीं. महाराष्ट्राचें नशीब आतां महाराष्ट्राच्या मुठींत व मनगटांत आहे. जें व्हावेंसें वाटतें तें साधण्याइतकी शक्ति महाराष्ट्रानें कमवावयाची आहे. संधि अनुकूल आहे, काल अनुकूल आहे आणि एकूण वातावरण अनुकूल आहे. नतद्रष्टपणाला, करंट्या मनोवृत्तीला आणि खुरटलेल्या, कुजलेल्या अवस्थेंतील विकृतीला नव्या महाराष्ट्र राज्यांत थारा व स्थान असण्याचें कारण नाहीं. नव्या महाराष्ट्र राज्याचा अवतार म्हणजे महाराष्ट्रधर्माच्या आचरणाची व वाढीची एक प्रकारची ग्वाहीच होय. या महाराष्ट्रधर्माची अखंड जोपासना महाराष्ट्रांत होऊन शक्ति–युक्ति–सौजन्यशीलानें युक्त महाराष्ट्र भारतांत आदर्श राज्य ठरेल अशी आशा आहे.

२९·४–६०

नव्या महाराष्ट्राची हांक एकजुटीची

शिवजयंतीच्या शुभ मुहूर्तावर शिवनेरीच्या किल्ल्यावर नव्या महाराष्ट्र राज्याची तुतारी प्राणबळानें फुंकली गेली आणि ना. चव्हाण यांनीं नव्या राज्याची अनौपचारिक घोषणा केली. नवमहाराष्ट्राच्या जन्मकाळचें आकाशांतील ग्रहमान पाहून नव्या राज्याची कुंडली मांडण्यांत येईल व भविष्य वर्तविण्यांत येईल. आकाशांतील ग्रहांप्रमाणेंच महाराष्ट्रांत वावरणारे तीन कोटी चालतेबोलते ग्रह कोणत्या मनोदशेंत आहेत याचा ठोकताळा घेतला तर महाराष्ट्र राज्य भारतांत अग्रपूजा पावेल आणि भारताबरोबरच महाराष्ट्राचें नांव जगभर घेतलें जाईल अशीच नव्या महाराष्ट्राची कुंडली मांडली गेल्याशिवाय राहाणार नाहीं. आजतागायत महाराष्ट्रानें रणांगणावर पराक्रम गाजविला, विजय मिळविले, राज्योपभोग घेतले आणि भारतांतील अग्रपूजा महाराष्ट्राच्या ओंठातोंडाशीं यावी असेहि योग येऊन गेले. पण इतर कोणत्याहि प्रांतापेक्षां किमानपक्षीं बरोबरीचे गुण असूनहि अग्रपूजेचा मान महाराष्ट्रास कधीं लाभला नाहीं, किंबहुना चवथ्या पांचव्या रांगेंतच महाराष्ट्र डांबला जावा अशी खबरदारी जणुं नियतीनें घेतली. शिवाजी महाराज

मोंगल दरबारांत गेले, आणि चवथ्या पांचव्या श्रेणीच्या सरदारांत त्यांना उभ करण्यांत येतांच मस्तकीं तिडीक जाऊन तेथून ते ताडकन उठून गेले. महाराष्ट्राला चवथी पांचवी रांग दाखविणारें दिल्लीचें तख्त पानिपतच्या वेळीं पेशव्यांनीं फोडलें, पण पराभूत म्हणून दिल्लीहून महाराष्ट्र परतला. महाराष्ट्राच्या पाठीशीं भारतीय प्रभावळींतील चवथी पांचवी रांग जशी कांहीं हात धुवून लागली आहे.

मुंबईसारख्या संमिश्र शहरांत तर महाराष्ट्रीय समाज जणुं कांहीं खिजगणतींतहि नसल्याप्रमाणें वागविला जातो. कोठेंहि गेलें तरी अन्यभाषिक माणूस पंख्याखालीं बसून अधिकार गाजवीत आहे आणि त्यानें बांधलेल्या दावणींत मराठीभाषिक तरुणी-तरुण खालच्या मानेनें खर्डेघाशी करीत आहेत; तराजूचा तोल अन्य भाषिक घेत आहे आणि मराठी माणूस हमाली करून बोजे उठवीत आहे; कारखान्यांत मराठी माणूस राबत आहे आणि मलई मात्र तिसऱ्यालाच मिळत आहे; अशींच दृश्यें मुंबईत सर्वत्र दिसतात. प्रतिष्ठित कारकून, धट्टाकट्टा मजूर, घरगडी यापेक्षां निराळा दर्जा मिळाला तर मोठी खैर झाली अशा कुचंबणेच्या अवस्थेंत चवथ्या पांचव्याच नव्हे तर शेवटच्या पायरीवर मुंबईत महाराष्ट्रीय माणूस आज जणुं कांहीं ताटकळत उभा आहे. मुंबईसह मराठी भाषिक महाराष्ट्र राज्य झाल्यामुळें पहिल्या पायरीवरचे प्रतिष्ठित तळपायरीवर आले आहेत आणि तळचा मराठी माणूस राज्यदंड हातीं घेत आहे. कालचक्र उलट फिरलें आहे ! यावेळीं मराठी माणसास दाही दिशांना जणुं कांहीं मुक्तद्वार लाभलें आहे; आणि मनावर घेईल तर मराठी माणूस मुंबईतच नव्हे तर दिल्लींतहि अग्रपूजा संपादन करील असा योग आहे. याची जाणीव असल्यामुळेंच मराठी वस्तींत मुंबईमध्यें मध्यरात्रीं दीपोत्सवाचा सूर्य या राज्योत्सवांत तळपत आहे आणि त्याचवेळीं त्या मानानें मुंबईच्या अन्य भागांत दीपोत्सव मलूल पडल्यासारखा आढळत आहे.

श्री धनंजयराव गाडगीळ यांनीं महाराष्ट्र राज्योत्सवांत शिवजयंतीच्या प्रसंगीं भाषण करतांना म्हटल्याप्रमाणें नव्या युगाला अनुसरून महाराष्ट्रानें आपल्या कर्तबगारीचीं क्षेत्रें पालटलीं पाहिजेत. महाराष्ट्रीय मनुष्याच्या हातांतील तलवारीची कालमानानें लेखणी व नांगर झाला, आतां तराजू व यंत्रतंत्र त्यानें हाताळलें पाहिजे. विद्वत्तेबरोबरच विज्ञानाची जोपासना केली पाहिजे. तुकडा तोडून हातावर देण्याच्या युद्धनीतीबरोबरच गोड भाषेनें पोटांत शिरून काम साधल्यावर बाहेर पडण्याची कला हस्तगत केली पाहिजे. बुद्धिमत्ता म्हणजे एकांडेपणा नव्हे आणि भांडखोरपणा म्हणजे कर्तृत्व नव्हे. याची उमज महाराष्ट्रास पडतांच ज्या क्षेत्रांत मराठी भाषिक आजवर घुसूं व बसूं शकला नाहीं त्या सर्व क्षेत्रांत तो आपल्या कर्तबगारीनें अग्रपूजा संपादन केल्याशिवाय राहाणार नाहीं.

नवें महाराष्ट्र राज्य प्रस्थापित झाल्यानें चालून आलेली सोन्याची संधि साधण्यास महाराष्ट्राची एकजूट असली पाहिजे आणि कर्तबगारीच्या अशा एकात्म्य ची मूस जितकी साधेल तितका महाराष्ट्र पुढें सरसावत अग्रपूजेच्या मानावर हक्क सांगेल. भिन्न मतें, निरनिराळे मार्ग, कर्तबगारीची विविधता व पक्षोपपक्ष सर्वत्र असतात आणि ते तसे नव्या महाराष्ट्रांतहि राहाणारच. वेळप्रसंगीं त्यांच्यांत बाचाबची व स्पर्धाहि होणारच. पण महाराष्ट्राच्या सामूहिक हिताचा प्रश्न ज्या ज्या वेळीं उपस्थित होईल त्यावेळीं मतें, पक्ष व मार्ग यांचा अडथळा न होतां महाराष्ट्राचें कर्तृत्व अखंड राहून एकजुटीनें कार्यान्वित झालें पाहिजे. ही नव्या महाराष्ट्राची पहिली गरज होय. काँग्रेससह इतर पक्ष व कम्युनिस्ट यांचें केरळमध्यें जेवढें हाडवैर आहे तेवढें इतर प्रांतांत क्वचितच असेल; पण कोचीनला गोदी होत नाहीं असा नुसता संशय येतांच कम्युनिस्ट व काँग्रेस असा फरक मावळला व केरळीय या नात्यानें साऱ्या नेत्यांनीं व जनतेनें कोचीनच्या गोदीस अडणारी खीळ प्रभावी लोकमताचा दट्टया लावून उडवून दिली. जें केरळसारख्या अटीतटीच्या राज्यांत होतें तें नव्या महाराष्ट्रांत प्रत्येक महत्त्वाच्या प्रश्नावर व मागणीबाबत दिसलें पाहिजे. शिवाजीच्या मागें यादवी माजून शिवराज्याला परागंदा व्हावें लागलें. राघोबा व सदाशिवरावभाऊ यांच्या विंतुष्टानें पानपतचा पराभव ओढवला. एकजुटीच्या अभावीं प्रथम पुण्याचें आणि नंतर मराठी छत्रपति आणि सरदार यांचें राज्य गिळकृत करण्याची संधि परकीयांना मिळाली. अशा प्रकारचा आजपर्यंतचा अनुभव लक्षांत घेतां, सामुदायिक शहाणपणांतच महाराष्ट्राचें उज्ज्वल भवितव्य असून सवत्यासुभ्यांत नाहीं हें स्पष्ट होतें. जरा व्यापार कारखानदारीचा जम बसला कीं मराठी माणूस दुसऱ्यास कस्पटाप्रमाणें मानण्याइतका मुजोरी व माजोरी होतो; जरा नेतृत्व हाताशीं आलें कीं अन्य पक्षीयांचें शिरकाण करण्याची तिस्मारखानी खुमखुमी बळावते; सधन मनुष्याच्या घरींहि गडीमाणसांकरितां कदान्न शिजतें; शक्तिसंचय थोडासाहि झाला कीं परस्परद्वेष व आपापसांतील फाटाफूट जोर करतें; अशा प्रकारचा करंटा व हीनदशेला नेणारा अनुभव नव्या महाराष्ट्रांत येतां कामा नये. चव्हाण–हिरे जोशी–गोरे–डांगे, कांबळे–भंडारे यांसारख्या जोडया फुटतां कामा नयेतच पण त्या एकमेकांस महाराष्ट्रहिताच्या बाबतींत मतभेद व पक्षभेद आड न येतां पूरक व साहाय्यक बनल्या पाहिजेत. सहवीर्यं करवावहै, मा विद्विषावहै. एकजुटीनें पराक्रम गाजवूं आणि द्वेष–मत्सराचें ग्रहण सायुदायिक सार्वत्रिक हितास लागूं देणार नाहीं, ही नव्या महाराष्ट्राची प्रतिज्ञा असली पाहिजे. असा प्रतिज्ञाबद्ध महाराष्ट्र भारतांत चवथ्या पांचव्या रांगेंत न राहातां अग्रपूजाच पावेल.

नव महाराष्ट्राचा उदय व जयजय

काल मध्यरात्रीं पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांच्या हातून महाराष्ट्र राज्याच्या नकाशावर प्रकाशझोत टाकण्यांत येऊन महाराष्ट्राच्या भाग्यरेषाच या प्रकाशझोतांत उजळल्या; आणि आज दुपारीं सचिवालयांत राज्यपालांच्या हस्तें ध्वजारोपण व महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाच्या हस्तें ध्वजारोपण व महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाचा शपथविधि होऊन मुंबईसह महाराष्ट्र साकार होत आहे आणि मराठी भाषिक हा मराठी राज्याचा नागरिक बनत आहे, याचा आत्यंतिक आनंद आज सर्व मराठी भाषिकांप्रमाणेंच आम्हांला होत आहे आणि मनोरथसिद्धीचें अतीव समाधान आम्हांला होत आहे. मुंबईसह आणि विदर्भासह महाराष्ट्र हा वाद कित्येक वर्षांचा आहे. या वादांत पाट्या पालटल्या, भिडू बदलले, कित्येकदां दान कुजलें तर कित्येकदां उलटें पडलें. या वादांत कोणी वारा वाहील तशी पाठ दिली, कोणी उलट सुलट उडया मारल्या. कोणी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा वेग व तेज असह्य होऊन सर्वोदयवास पत्करला तर कोणी वनवास, अज्ञातवास व तुरुंगवासहि पार पाडला. कोणी गनिमी काव्यानें द्विभाषिकाच्या पोटांत शिरून त्याचा कोथळा बाहेर काढला आणि अखेर मुंबई विदर्भासह महाराष्ट्र आज प्रत्यक्षांत आला आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची कोणत्याहि काळांत व कितीहि अल्पस्वल्प सेवा ज्यांनीं आपापल्या पद्धतीनें केली आणि असिधाराव्रताप्रमाणें या चळवळीशीं जे अखेरपर्यंत एकनिष्ठ राहिले, त्या सर्वांना आजच्या नव्या महाराष्ट्र राज्याचें श्रेय आहे. मराठी माणूस या सर्वांपुढें नतमस्तक आहे आणि या सर्वांचा ऋणी आहे. कोणाच्यामुळें कां होईना, महाराष्ट्र राज्याचा सूर्य उगवला आहे. आजपर्यंत सूर्योदयाला आड येणारेहि आज मुक्त हस्तानें अर्घ्यदान करीत आहेत या सर्वांचाहि नवा महाराष्ट्र ऋणी आहे. ज्या सर्व दुष्टादुष्ट शक्तीचें अनुकूल प्रतिकूल साहाय्य नव्या महाराष्ट्र राज्याच्या उदयास झालें त्या सर्व व्यक्तींना यथान्याय धन्यवाद महाराष्ट्र देत आहे आणि नव्या महाराष्ट्र राज्याचा नागरिक या नात्यानें मराठी माणूस पुढचें पाऊल मोठया उमेदीनें उचलत आहे

नव्या महाराष्ट्र राज्यावर पंतप्रधान नेहरूनीं प्रकाशझोत टाकला आणि नवें मराठी भाषिक राज्य उदय पावलें याचा मराठी माणसास निःसंशय आनंद झाला त्याचबरोबर हा प्रकाशझोत मराठी सीमा प्रदेशावर पडलेला नाहीं आणि डांग व उंबरगांव वगैरे सोळा खेडीं या प्रकाशझोताबाहेर गुजराथच्या ग्रहणांत

सांपडलेलीं आहेत याचें शल्यहि मराठी माणसास सारखें लागून राहाणार आहे. म्हैसूरमधील मराठी भाग महाराष्ट्रांत कां समाविष्ट झाला नाहीं ? डांग व महाराष्ट्र–गुजराथ या भागातील २१६ मराठी गांवें गुजराथमध्यें कां ढकलण्यांत आलीं आहेत ? या गोष्टी कोणत्या तत्त्वाच्या, नीतीच्या व सिद्धान्ताच्या आधारें करण्यांत आल्या आहेत ? मनाला पटण्यासारखें कोणतेंहि कारण या बाबतींत कोणाकडूनहि देण्यांत आलेलें नाहीं देवाजीच्या मना आलें असें उत्तर वेदान्ती देतात. दिल्लीच्या मनांत भरविलें यापेक्षां सीमा भागांतील मराठी मुलुखावरील अन्यायास दुसरें उत्तर किंवा कारण नाहीं नव्या महाराष्ट्राला सीमा भागांतील मराठी विभागांबाबतचा अन्याय सतत तडफडत ठेवीलच पण मुंबईला तर सीमाप्रश्न हा एक प्रकारच्या हृदयशूळासारखा आहे. मुंबई महाराष्ट्राबाहेर ठेवण्यास जुन्या द्विभाषिक राज्यांतील कर्नाटक विभागाची संमति मिळावी म्हणून म्हैसूरला मराठी भागाचा नैवेद्य दाखविण्यांत आला, असा प्रवाद आहे. मुंबई महाराष्ट्रांत गेली त्याची जणुं कांहीं किंमत म्हणून डांग व २१६ गांवांचा बटवडा गुजराथला करणें महाराष्ट्रास भाग पडलें असा डांग व २१६ गांवाबद्दलचा गुजराथ-महाराष्ट्रांतील युक्तिवाद पहातां दिसून येतें. मुंबई महाराष्ट्राला मिळाली पण बेळगांव–कारवार–निपाणीची किंमत म्हैसूरला द्यावी लागली, आणि डांग व२१६ गांवांचा मुखलेप गुजराथला करावा लागला ! हा सारा सरहद्दअनर्थ मुंबईमुळें आणि मुंबईच्या पायीं झाला आहे. जें मुंबईकरितां व मुंबईच्या पायीं गमवावें लागलें त्याची स्वाभाविक खंत मुंबईलाच वाटणार आणि तें परत मिळविण्याची जबाबदारीहि मुंबईवरच येऊन पडते. महाराष्ट्र राज्यनिर्मितीच्या आनंदांत मुंबई आज दंग आहे. पण मुंबई जर महाराष्ट्राबाहेर राहिली असती तर मुंबईला इंगळ्या डसल्या असत्या. महाराष्ट्राबाहेर हांकललें जाण्याचें दुःख मुंबई स्वानुभवानें जाणूं शकते. स्वाभाविकच परदुःख शीतळ ठरून महाराष्ट्र–म्हैसूरच्या व महाराष्ट्र–गुजराथच्या मराठी सीमा भागाविषयीं मुंबई स्वस्थ बसूं शकणार नाहीं, आणि नव्या महाराष्ट्रासहि स्वस्थ व शांत राहूं देणार नाहीं; आणि म्हैसूर–गुजराथलाहि मराठी सीमाप्रदेश पोटसूळासारखा तापदायकच राहील, ही काळ्या दगडावरची रेघ आहे.

नव महाराष्ट्र राज्य जें उदयास येत आहे तें संपूर्ण समाधान व शांति देण्यासारखें नाहीं. तरीहि लहानमोठ्या उणीवांसह व वैगुण्यांसह मराठी माणूस नवें महाराष्ट्र राज्य उत्सवपूर्वक एक प्रकारच्या धन्यतेनें व अपूर्वाईच्या उत्साहानें पत्करीत आहे. कारण नवें महाराष्ट्र राज्य आपलें आहे, आपल्या हक्काचें व सत्तेचें आहे. मराठी भाषिकाला स्वतःची म्हणण्यासारखी पायाखालीं जमीन नव्हती, डोक्यावर छत्र नव्हतें, आवतींभोवतीं आधार नव्हता, दरवेशी असलेल्या मराठी

जनतेला स्वतःच्या हक्काची वास्तु मिळाली आहे. इतिहासांत कधींहि न घडलेली अशी ही घटना अंतःकरण बहरून सोडणारी आहे. महाराष्ट्र मनांत आणील तसा सुंदर इमला वास्तूवर उभारूं शकेल. जें गेलें गमावलें तें परत मिळवूं शकेल आणि अन्याय-अनर्थ महाराष्ट्राच्या बाबतींत अशक्य होण्यासारखी परिस्थिति व दरारा निर्माण करूं शकेल. नव्या महाराष्ट्राचा आज होणारा उदय मराठी जनतेला नितांत आनंदाचा असून, कोटयवधि मराठी भाषिकांवरोबरच आम्हीहि या उगवत्या राज्याला प्रेमादरपूर्वक अर्घ्यप्रदान मालिकेचें पांचवें पुष्प वाहतांना करीत आहों.

१-५-६०

हें चित्र पहा आणि तें चित्र पहा!

पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांनीं लडाख आघाडीवरून परतल्यावर गुरुवार रात्रीं आकाशवाणीवरून राष्ट्राला उद्देशून केलेलें भाषण म्हणजे सरकारी नोकरांच्या संपावर त्यांनीं टाकलेला अणुबाँब गोळाच म्हटला पाहिजे. त्यांचें भाषण जितकें भावनांना आवाहन करणारें तितकेंच नाटचपूर्ण व आवेशपूर्ण होय. लडाखच्या आघाडीवर नाना नैसर्गिक आपत्ति हूं कीं चूं न करतां पत्करून लष्करी जवान परकी आक्रमणाबाबत डोळ्यांत तेल घालून जागरूक आहेत असें एक चित्र त्यांनीं रेखाटलें; आणि याच शूर सैनिकांची रसद व एक प्रकारें पाय तोडणारा, देशावर अरिष्ट ओढवून आणणारा व भारतीय विकास खच्ची करणारा संप पुकारला गेला आहे असें दुसरें चित्र रेखाटलें! हें चित्र पहा आणि तें चित्र पहा असें आवाहन करून त्यांनीं सरकारी नोकरांचा सार्वत्रिक संप राष्ट्रघातकी, देशांतील विकासाचा व संरक्षणाच्या शक्तीची विघटना करणारा व बेजबाबदार ठरविला आहे. संपाच्या पाठीवर व पोटावर अशा रीतीनें चामडी लोळेपर्यंत व आंतडीं उपसून येईपर्यंत आघात केल्यावर पे कमिशनच्या सर्व शिफारसी अंमलांत आणण्यास सरकार तयार आहे अशी घोषणा करून पं. नेहरूंनीं त्यावर मधलोणी लिपलें आहे आणि वाटाघाटींच्या मार्गाचा अवलंब करून संपाचें अरिष्ट टाळावें असें त्यांनीं आवाहन केले आहे.

पंतप्रधान नेहरूंचें आवाहन हृदयस्पर्शी आणि बुद्धिस्पर्शी असलें तरी सरकारी नोकरांच्या पोटाला पटणारें किंवा परवडणारें आहे असें म्हणतां येणार नाहीं. किंबहुना त्यांच्या संपाच्या पवित्र्यावर राष्ट्रद्रोहाचें कुभांड रचून एक प्रकारचा पोटशूळ वाढविणारें आहे. पं. नेहरूंच्या भाषणावर संपनेते श्री. एस्. एम्. जोशी यांची व अन्य संपनेत्यांची प्रतिक्रिया दुखावलेल्या नागासारखी आहे यांत आश्चर्य नाहीं. देश आक्रमणाच्या संकटांत गळ्यापर्यंत रुतलेला असतांना आणि विकासकामाच्या उद्योगांत गढलेला असतांना केंद्रीय सरकारी नोकरांनीं 'अधिक' मागण्यांसाठीं हात पुढें करावा व त्या हातांत संपाची समशेर असावी हें पंतप्रधानांना मजूर नाहीं. त्यांच्या युक्तिवादांत सकृद्दर्शनीं चटकन पटणारा तथ्यांश आहे यांतहि संशय नाहीं. पण पंतप्रधानांनीं आकाशवाणीवर संपाविरुद्ध आवाहन केलें त्याच दिवशीं संपवाल्या सरकारी नोकरांच्या विराट सभेपुढें श्री. एस्. एम्. जोशी यांनीं म्हटल्याप्रमाणें सरकारी नोकर सध्यांच्या आणीबाणीच्या कामीं 'अधिक' कांहीं मागत आहेत काय? महागाई सारखी भडकत आहे आणि सरकारी नोकरांच्या हातीं जें पडतें आहे तें ओंठांपर्यंत व पोटांत जाईपर्यंत त्यांतला बराचसा भाग महागाईचा राक्षस खाऊन टाकीत आहे. दिलेला घांस पोटांत जाण्यापूर्वी जो बराचसा अदृश्य होतो त्याची भरपाई करून द्यावी इतपतच सरकारी नोकरांची मागणी आहे. श्री. एस्. एम्. जोशी म्हणतात त्याप्रमाणें सरकारी नोकरांच्या मागणीमागील ही वस्तुस्थिति अद्याप सरकारी किंवा संपविरोधी नेत्यांनीं खोडून काढलेली नाहीं.

सरकारी नोकरांनीं आपली जातकुळी निराळी समजून उपाध्यायाप्रमाणें किंवा धर्मक्षेत्रांतील बडव्याप्रमाणें केवळ स्वतःची दक्षिणा व आकंठ भोजन एवढ्याचाच विचार करूं नये असा पं. नेहरूचा कटाक्ष खोटा नाहीं. पण येऊन जाऊन काटकसर भटाच्या दक्षणेंत व भोजनांत करावी किंवा यज्ञकृत्याच्या सफलतेसाठीं बोकड कापावा त्याप्रमाणें देशावरील संकटाचा आणि विकासकार्याला खीळ पडण्याचा धाक सरकारी नोकरांना म्हणजेच एक प्रकारें मध्यम वर्गीयांना व गोरगरिबांनाच घालण्यांत येतो व त्याच वेळीं समाजांतील मक्तेदार भांडवलदार वर्ग नफेबाजीच्या शिखरावर चढत असतांना त्याला रस्ता जणूं कांहीं साफसूफ करून देण्यांत येत आहे. देशासाठीं उपासतापास काढलेच पाहिजेत आणि आक्रमणाचें अरिष्ट लक्षांत घेऊन लडाखमधील जवानांप्रमाणें हूं कीं चूं करतां कामा नये हें ठीक आहे. पण त्याला कोणताहि अपवाद असतां कामा नये.

लडाखमधील लष्करी जवान व संपावर जाणारे सरकारी नोकर अशीं दोन चित्रें पंतप्रधान पं. नेहरूंनीं लोकांसमोर उभीं केलीं आहेत आणि भावनाविवशतेनें

'हें चित्र पहा व हें चित्र पहा' असें ते सांगत आहेत. या दोन चित्रांबरोबरच आणखी दोन चित्रें लोकांच्या डोळ्यासमोर येतात. धनिकांचें दोंद दिवसेंदिवस वाढत आहे. आयात निर्बंध, नव्या कारखानदारीवरील नियंत्रणें, वगैरेंच्या रूपानें एक प्रकारची मक्तेदारी निर्माण होऊन धनिकांच्या पोटांवर अधिकांत अधिक नफा बांधण्यांत येत आहे हें एक चित्र आहे आणि हातातोंडाची गांठ पडणें ज्यांना मुष्कील आहे त्यांना उपासातापासाचें व्रतवैकल्य अंगिकारून पुण्याचा मार्ग सांगण्यांत येत आहे असें दुसरें चित्र आहे! हीं दोन चित्रें पाहिल्यावर नफेबाजीला आळा घालून व नफा–असुरांना दडपून मगच गोरगरिबांना त्यागतपाचें व्रत सांगा असेंच सामान्य माणूस म्हणणार. देशाचा लोळागोळा करणारा संपाचा घातुक मार्ग पत्करणें शहाणपणाचें नाहीं व परस्पर विचारविनिमयानेंच साऱ्या गोष्टी निभावल्या व मिळवल्या पाहिजेत असें पं. नेहरू म्हणतात व तें खरें आहे. पण पे कमिशनच्या अवशिष्ट शिफारसी अंमलांत आणण्याचा नमस्कार सार्वत्रिक संपाच्या चमत्काराशिवाय पंतप्रधान नेहरूंच्या सरकारकडूनहि घडत नाहीं, हें त्यांच्या भाषणावरून दिसून आलेलें आहे. अशा स्थितींत संपनेते एस्. एम्. जोशी यांनीं सत्याचा झोत टाकून पंतप्रधान नेहरूंचा वज्राघात विफल करण्याचा हिय्या धरावा यांत आश्चर्य नाहीं. पंतप्रधान नेहरूंनीं लोकांसमोर धरलेलीं दोन चित्रें आणि त्याच वेळीं आजतागायतच्या सरकारी धोरणामुळें अभावितपणें रेखाटलीं गेलेलीं दोन चित्रें संपाच्या अनुषंगानें पुढें आलेलीं आहेत. संपनेते व राज्ययंत्राचे प्रवर्तक या दोघांनींहि चित्रांच्या या दोन जोड्यांचें मननचिंतन केलें पाहिजे. तसें झालें तर विरोधी वाटणाऱ्या शक्तींचा समन्वय होऊन देशावर कोसळूं पहाणारें संपाचेंच नव्हे तर इतरहि अनेक अरिष्टें टळल्याशिवाय राहाणार नाहींत.

९–७–६०

फडके वाङ्मयावर सौ. बेडेकर कुभांड

प्रख्यात विदुषी व लेखिका सौ. मालतीबाई बेडेकर यांनीं 'वाङ्मय प्रांतांतील संक्रमणाचा ऊहापोह करतांना प्रा. फडके यांच्या सौंदर्यवादी ललित वाङ्मयावर कडाडून हल्ला केला आहे, आणि प्रा. फडके यांच्या भोगवादी

कादंबऱ्यांनीं तरुणांचा वैचारिक अधःपात घडवून आणला असा आरोप त्यांनीं केला आहे. प्रा. फडके व श्री खांडेकर हे समकालीन कादंबरीकार असून त्या दोघांमधील स्पर्धेंत प्रा. फडके यांनीं शर्यत जिंकली पण त्यांच्या या विजयाची परिणती तरुणांच्या वैचारिक अधःपतनांत झाली असें सौ. मालती बेडेकर सांगतात. श्री. खांडेकर मागें कां पडले? त्यांनीं ध्येयवादी कादंबऱ्या लिहिल्या पण त्यांच्या कादंबऱ्यांत जिवंतपणा नव्हता असें त्या सांगतात. आपल्या कादंबऱ्यांत श्री खांडेकर यांनीं तत्त्वज्ञान शिजत टाकलें खरें, पण तें शिजून समरस झालें नाहीं आणि काचकिरडचा भाताप्रमाणें काचकिरडें ललित वाङ्मय त्यांनीं रसिकांना सादर केलें तें वाचकांना खाववलें नाहीं व पचवतांहि आलें नाहीं. एका दृष्टीनें पाहिलें तर श्री. खांडेकर यांचा पिंडच ललित लेखकाचा नाहीं. ते चिकित्सक टीकाकार आहेत आणि रसग्रहण त्यांना करतां आलें तरी रसनिर्मिती त्यांना ललित वाङ्मयांत किंवा पटकथांत करतां आली नाहीं. म्हणजेच ललित लेखनांत सौ. बेडेकर म्हणतात त्याप्रमाणें त्यांना जिवंतपणा निर्माण करतां आला नाहीं असें श्री. खांडेकर यांच्याबद्दल म्हणतां येईल. तेंच बऱ्याच हिश्श्यांनीं कै. वामनराव जोशी यांच्या ललित वाङ्मयाबद्दलहि म्हणतां येईल कोर्टांतील दोन वकिलांचा अस्तिनास्तिपक्षी युक्तिवाद आपण ऐकत आहों असा भास त्यांच्या कादंबऱ्या वाचतांना होतो. रहस्यमयतेची जोड देऊन त्यांनीं आपलें ललितवाङ्मय सजविलें, आणि चुरचुरीत समतोलपणानें त्यांनीं त्यांत आकर्षणहि निर्माण केलें. पण त्यांचें या क्षेत्रांतील यश हें मर्यादितच राहिलें. या दृष्टीनें पहातां भिन्न पिंडाचे खांडेकर–फडके हे समकालीन असले तरी त्यांच्यामध्यें शर्यत लागली आणि प्रा. फडके यांनीं ती जिंकली असें म्हणण्यांत नाटच असेल पण सत्य आहे असें मात्र म्हणतां येणार नाहीं.

विचार टाळावयाचा असतो त्यावेळीं लेखक सौंदर्यवादाकडे झुकतो असा सिद्धान्त सौ. मालतीबाई बेडेकर यांनीं मांडला असून वैचारिक अधःपात लेखकानें अशा रीतीनें बुद्ध्या पत्करला कीं, वाचकाचाहि वैचारिक अधःपात होतो असा त्यांचा उपसिद्धान्त दिसतो. त्यांचा हा सिद्धान्त निर्दोष तर नाहींच पण समतोल टीकाकाराची त्यांची पातळी सुटल्यासारखी वाटावयास लावण्याइतका एककल्ली आहे, असें म्हटलें पाहिजे. सौंदर्यवाद हा रसिकतेंतून जन्म घेतो. रसिकता हा विचार व बुद्धि यांच्या टाळाटाळींतून किंवा अभावांतून निर्माण होते, असा उपसिद्धान्त त्यांच्या विवेचनांतून जो निघतो, तो त्यांचा त्यांनाहि मान्य होईल असें वाटत नाहीं. जें चांगलें आहे त्याचें आकर्षण हें मानवाचें वैशिष्ट्य आहे आणि या वैशिष्ट्यामुळेंच तो पशूपेक्षां निराळा ठरतो. जें चांगलें वाटतें त्याची आवड उत्पन्न होते आणि त्यांतूनच भक्ति, कृति व वीरवृत्ति निर्माण होऊन दैनंदिन जीवन साफल्य पावत असतें. भूक, निद्रा, मैथुन, भय या सहजधर्मांना मनुष्य चांगल्याच्या

आकर्षणामुळें ऊर्फ रसिकतेनें म्हणजेच सौंदर्यदृष्टीमुळें जीवनात दुय्यम मानूं शकतो. चांगलें वाटतें आणि ओढ निर्माण होते ती प्रथमतः उत्स्फूर्त असते हें खरें, पण ती टिकून राहून कर्तृत्व व कणखर निष्ठेचें प्रभावी स्वरूप त्यास केव्हां येतें ? जें जें अंतःकरणाच्या उसळीसरशी चांगलें वाटतें तें बुद्धीला पटावें लागते आणि तारतम्याच्या कसोटीला म्हणजेच वैचारिकतेवर टिकावें लागतें. सौंदर्यवाद म्हणजे वैचारिक पोकळी होय असें प्रतिपादन एकांगी अतिरेकाचें आहे असें थोड्याशा विचारांतींहि कळून येण्यासारखें आहे. विवेचन आवेशपूर्ण व धारदार होण्यासाठीं असल्या युक्त्या सामान्यपणें योजल्या जातात व त्यांत फारसें बिघडतहि नाहीं. पण न्यायाचा तराजू हातीं धरून दोषाचें माप खाराखुशीनें पदरीं टाकण्याची जी भूमिका सौ. मालती बेडेकर यांनीं पत्करली आहे त्या भूमिकेशीं मात्र अशी झुकांडी विसंगत वाटते.

प्रा. फडके यांच्या सौंदर्यवादी ललित वाङ्मयानें तरुणांचा वैचारिक अधःपात घडवून आणला असा आक्षेप सौ मालतीबाई बेडेकर घेतात, त्या वेळीं एकाच दगडानें सर्वच पक्षी जणुं कांहीं त्या मारूं पहातात पण एकहि पक्षी जमिनीवर न कोसळतां सारेच पक्षी त्यामुळें जसे कांहीं हंसत उडून जातात. आजच्या तरुणाचा वैचारिक अधःपात झाला आहे काय ? तो उच्छृंखल असेल पण विचारहीन आहे असें म्हणतां येणार नाहीं. बुद्धि, तारतम्य, विचार, विवेक कर्तबगारी, अशा कोणत्याहि बाबतींत तरुण हा मागें आहे असें म्हणतां येणार नाहीं. श्री. फडके यांच्या ललितवाङ्मयानें तरुणाचा वैचारिक अधःपात होतो असें मानलें तर सुमारें तीस वर्षांपूर्वी फडकेयुगाचा ऐन बहर होता त्यावेळीं तरुण असलेल्यांची वाट काय ? तीस वर्षांपूर्वीचे तरुण आज पन्नाशीच्या आसपास आहेत. त्यांच्यापक्षीं वैचारिक अधःपात आहे काय ? जर तो नसेल तर तरुणांच्या विचारशक्तीवर फडके लिखाणाचा वाईट परिणाम होतो हा आरोप टिकूं शकत नाहीं. तरुणांची वैचारिक पातळी फडकेलिखाणामुळें खालावली हा सर्वंग आरोप आहे आणि मानसिक वार्धक्य व खुरटलेली कर्तबगारी यांचा पगडा बसल्यावर सामान्यतः अशी आगपाखड होत असते. फडके यांच्या सौंदर्यवादी ललितवाङ्मयानें वैचारिक अधःपात तरुणांचाच तेवढा होतो असें म्हणून, वयाबरोबर विचाराची खोली आपसुख वाढत जाते व अधःपतनाचा धोका उरत नाहीं असेंच जणुं कांहीं सौ. मालती बेडेकर यांना सुचवावयाचें आहे.

वयाच्या लायकीनें वैचारिकता जर आयती प्राप्त होत असेल तर सौ. मालती बेडेकर यांना त्याची इतकी खंत बाळगण्याचेंहि कारण नाहीं. पण प्रौढ वय म्हणजे वैचारिक अधःपातापासून बचावण्याची हमी ठरूं शकत नाहीं;

आणि फडके यांच्या ललित वाङमयानें विचारशून्यता येत असेल तर तरुणांप्रमाणेंच त्यांच्या कादंबऱ्यांचें वाचन चवीढवीनें करणारे प्रौढ व वृद्धहि त्याच साथीला वळी पडले पाहिजेत. यांपैकीं कोणतीहि गोष्ट मान्य करणें सौ. मालती बेडेकर यांनाहि परवडणार नाहीं. आजचा तरुण वैचारिकतेला पारखा झालेला नाहीं त्याप्रमाणेंच समाजाचाहि वैचारिक अधःपात झालेला नाहीं, हें लक्षांत घेतलें असतां वैचारिक अधःपात प्रा. फडके यांच्या सौंदर्यवादी ललित लेखनानें होतो असें म्हणण्यांत सत्यापेक्षां कुभांडाचाच परिपोष आढळतो. प्रा. फडके यांच्या ललित वाङमयांत श्री. खांडेकरांच्या वाङमयांतील निर्जीवता नाहीं, उलटपक्षीं तें जीवंत असल्यामुळेंच त्याची ओढ लोकांत निर्माण झाली. समाजांत रसिकता किंवा सौंदर्यदृष्टि सनातन आहे आणि मानवसमाजाच्या या गुणास फडकेयुगांत उजाळा मिळाला असें फार तर म्हणतां येईल. नव्या वाङमयांत विशालता आढळत नाहीं याचें कारण आजच्या समाजाचें स्वरूप होय, असें सौ. मालती बेडेकर म्हणतात. प्रा. फडके यांच्या वाङमयांत रसिकता ऊर्फ सौंदर्यवाद प्रभावानें दिसतो, याचें कारणहि त्याच न्यायानें समाजांतील रसिकतेच्या स्थायीभावांत सांपडण्यासारखें आहे.

२०-७-६०

आयागो गोरे आणि डेस्डिमोना समिति

महाराष्ट्र प्र. स. पक्षाच्या मुंबईंतील अधिवेशनाचे अध्यक्ष खासदार गोरे यांचें अध्यक्षीय भाषण अपेक्षेप्रमाणेंच चावे बोचकारे आणि चटके-फटकारे यांनीं परिपूर्ण असून अशा प्रकारच्या भाषणांतील गुण व दोष यांचें संमिश्रण या भाषणांत आढळतें. श्री. गोरे यांना आयागो अशी भयंकर शिवी देण्यांत आली असल्याचें त्यांनीं या भाषणांत सांगितलें आहे. आयागो यशस्वी झाला असेल तर अथेल्लो व डेस्डिमोना यांचीं शवें आयागोसकट दिसावयास पाहिजेत व महाराष्ट्राच्या राजकारणाची शोकांतिका नजरेस पडावयास पाहिजे. संयुक्त महाराष्ट्र प्रस्थापित झाल्यामुळें महाराष्ट्र एक प्रकारें सुखांतिका अनुभवीत आहे आणि समिति, प्र. स.

पक्ष, कम्युनिस्ट पक्ष, इतकेंच नव्हे तर काँग्रेस, एक प्रकारच्या उजळ माथ्यानें महाराष्ट्रांत पुढचे मनसुबे रचत आहे. तेव्हां महाराष्ट्रांत अथेल्लो रंगलें नाहीं आणि खासदार गोरे हे आयागोची भूमिका यशस्वी रीतीनें पार पाडूं शकले नाहींत हें उघड होय प्र. स. पक्षाच्या मनांत समितीविषयीं विष कालविण्याच्या बाबतींत ते यशस्वी ठरले आणि प्र. स. पक्षानें डेस्डिमोनाचा त्याग केला, एवढेंच फार तर म्हणतां येईल. या अथेल्लो नाटकांतील अथेल्लोची भूमिका एक प्रकारें श्री. एस्. एम्. जोशी यांच्याकडे होती. एस्. एम्. जोशी यांच्याशिवाय समिति नाहीं व समितीच्या प्रेमापुढें एस्. एम्. जोशी यांना कशाचीहि पर्वा नाहीं, ही एका काळची स्थिति होती. आतां समितीच्या व्यासपीठावर एस्. एम्. जोशी यांच्यावर इरसाल शिव्याशापांचा वर्षाव होतो आणि एस्. एम्. जोशी जसे कांहीं समितीच्या नांवानें आंघोळ करून पूर्ण मोकळे झाले आहेत. तेवढ्यापुरतें पाहिलें तर समिति व एस् एम्. जोशी यांचा बेबनाव घडवून त्यांना अलग पाडण्यांत व एका परीनें शोकांतिकेची परिपूर्ति करण्यांत आयागो यशस्वी झाला आहे असें म्हणतां येईल. पुष्कळदां शिवी म्हणून द्यावी आणि तिचा पगडा शिवी खाणारावर बसून शिवी देणाराची बत्तिशी खरी ठरण्याचा अनुभव यावा असा प्रकार होतो. श्री. गोरे यांना ज्यांनीं आयागो म्हटलें त्यांना हा अनुभव येत असेल.

संयुक्त महाराष्ट्र झाला आणि त्यानंतर वऱ्हाड्यांचें काम नसल्यामुळें प्र. स. पक्ष समितीमधून बाहेर पडला असें खासदार गोरे यांनीं सांगितलें आहे. वऱ्हाडी हे विवाहसमारंभांतील इतरेजन होत आणि लग्नसोहळा पार पडल्यावरहि मिष्टान्न संपेपर्यंत इतरेजन ऊर्फ वऱ्हाडी यांची गर्दी लग्नघरांत कायम असते. संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर निवडणुकी जिंकण्याच्या दृष्टीचें समितीजवळचें मिष्टान्न संपुष्टांत आलें आणि इतरेजन ऊर्फ वऱ्हाडी मंडळींनीं समितीमधून काढता पाय घेतला, असेंच जणुं कांहीं गोरे यांचे उपमा-दृष्टान्त सांगतात. पण त्याहीपेक्षां एक भयंकर ध्वनि वऱ्हाड्यांच्या उपमेंतून निघतो. सं. महाराष्ट्राच्या समितीच्या लढ्यांत प्र. स. पक्षाची भूमिका वऱ्हाड्यांची ऊर्फ बघ्यांची होती आणि समितीशीं प्र. स. पक्ष कधींच समरस झाला नव्हता, असेंच जणुं कांहीं गोरे यांना म्हणावयाचें आहे. तसें असेल तर सीमा प्रश्नावरच समितीचें कर्तृत्व मर्यादित करण्याचा श्री. एस्. एम्. जोशी यांचा ठराव समितीनें स्वीकारला असता तरी समितींत प्र. स. वाद्यांचा पाय ठरला नसता असें म्हणावें लागतें. गोरेपंथीय प्र. स. वाद्यांच्या बाबतींत समितीबद्दलचा हा उपरेपणा असेलहि; पण प्र. स. पक्षाला समितींतील वऱ्हाडी ठरवून श्री. गोरे यांनी समितीशीं एकजीव झालेले श्री. एस्. एस्. जोशी यांना एक प्रकारचा अन्यायच केला आहे असें म्हटलें पाहिजे.

संयुक्त महाराष्ट्र झाला आणि आतां नवा महाराष्ट्र निर्माण करावयाचा आहे. या बाबतींत प्र. स. पक्षानें शक्य ती विधायक व जरूर तेथें टीकात्मक भूमिका पत्करली पाहिजे असें आवाहन श्री. गोरे यांच्या भाषणांत व परिषदेचे उद्घाटक श्री. अशोक मेहता यांच्या भाषणांत आहे. नव्या महाराष्ट्राच्या जडण-घडणीसाठीं महाबळेश्वरला महाराष्ट्र काँग्रेस कार्यकर्त्यांनीं जो कार्यक्रम आंखला आहे त्याची हुर्रेवडी गोरे–मेहता या दोघांनींहि उडविली आहे आणि तें स्वाभाविक होय. काँग्रेसचा कार्यक्रम शेळीच्या शेपटासारखा अपुरा आहे; आणि कम्यु-निस्टांच्या आहारीं गेलेल्या समितीचा कार्यक्रम जर सफल झाला तर लाल समाजवाद येऊन महाराष्ट्राचें 'केरळ' होईल, असा धाक गोरे–अशोक मेहता यांच्या भाषणांत आहे. काँग्रेसचा खिरापतप्रधान 'यशवंत वाद' नको व समितीचा लाल समाजवादहि नको असा महाराष्ट्र प्र. स. पक्षाचा पवित्रा आहे. पण एवढचा अकरणात्मक भूमिकेनें भागण्यासारखें नाहीं. महाराष्ट्रांत समाजवाद आणण्याचा प्र. स. पक्षाचा कार्यक्रम मुंबईच्या परिषदेंत कोणता आंखला जातो व तो अंमलांत आणण्याच्या दृष्टीनें आंखणी कोणती होते इकडे लोकांचें लक्ष लागून राहील. अध्यक्ष व उद्घाटक यांच्या भाषणांत कम्युनिस्ट हे प्र. स. वाद्यांचे खरे एकमेव शत्रु हीच ओतप्रोत भूमिका आहे. भरीव विधायतकेची पायाभरणी मुंबईच्या अधिवेशनांत व नंतरच्या कर्तबगारींत प्र. स. पक्ष दिग्दर्शित करूं शकला नाहीं तर महाराष्ट्रांत पक्षातीत कर्तृत्वाचें एकात्म्य निर्माण करण्याऐवजीं पक्षीय यादवीची पेरणी केल्याचा दोष महाराष्ट्र प्र. स. वाद्यांच्या पदरीं घातला जाईल.

५–११–१९६०

वीर सावरकरांचा मृत्युंजय दिनोत्सव

स्वातंत्र्यवीर सावरकर यांना १९१० सालीं झालेल्या दोन जन्मठेप शिक्षांना आज रोजीं पन्नास वर्षे पुरीं होत असून, हें अर्धशतक उलटल्या-वरहि वीर सावरकर भारताचें द्वादशवर्षीय स्वातंत्र्य धारीच्या तीक्ष्ण नजरेनें न्याहाळीत आहेत हा एक अपूर्व योगायोग आहे आणि स्वातंत्र्योपासनेनें मृत्यूलाहि

मागें टाकणाऱ्या वीर सावरकरांचा मृत्युंजयदिन आज सर्वत्र मोठ्या उत्साहानें साजरा होत आहे. केवळ त्यांच्या अनुयायांनींच नव्हे तर सर्व स्वातंत्र्योपासकांनीं हा मृत्युंजयदिन साजरा करावा अशीच या मृत्युंजयदिनाची अपूर्वाई आहे. तारुण्याबरोबरच भारताला स्वतंत्र करण्याच्या ईर्ष्येनें त्यांचें जीवन ओतप्रोत झालें आणि मृत्यूला खेळवीतच त्यांनीं आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षण स्वातंत्र्योपासनेसाठीं खर्ची घातला. वीर सावरकरांचें चरित्र म्हणजे अव्याहत सर्वांगीण क्रांतीचें चालतेंबोलतें दर्शन होय. नाशिकला क्रांतिकारी संघटनेची स्थापना करतांना व भारतमातेला स्वतंत्र करण्याची शपथ घेतांना त्यांनीं मृत्यूला जसें कांहीं डिवचून आव्हान दिलें. विलायतेंत शस्त्रास्त्रांची जमावट करतांना त्यांनीं मृत्यूला झुकविलें. खेळत फ्रेंच किनाऱ्यावर समुद्रांत त्यांनीं उडी टाकली ती मृत्यूच्या जबड्यांतीलच उडी होती. त्यांना दोन जन्मठेप शिक्षा होऊन अंदमानांत त्यांना बंद करण्यांत आलें आणि जणुं कांहीं त्यांना आंत घेऊन मृत्यूनें जबडा मिटला. दुखण्यांनीं त्यांचें शरीर झिजविलें आणि मृत्यु जणुं कांहीं त्यांना आपल्या दाढांत घेऊन रवंथ करूं लागला. पण मृत्युदेवतेच्या तोंडांत शिरून नाकावाटे बाहेर पडणाऱ्या व दंड थोपटून पुढचा मार्ग आव्हानपूर्वक आक्रमणाऱ्या हनुमंताप्रमाणें वीर सावरकरांनीं मृत्युमुखांतून बाहेर पडून क्रांतीची वाटचाल अप्रतिहत चालूच ठेवली. मृत्युंजय या पदवीला सार्थ ठरणारें कृतार्थ जीवन वीर सावरकर यांचेंच होय.

मृत्यूशीं झुंज देत व त्याला खेळवींत अंगीकृत क्रांतिकार्य पार पाडतांना 'गृहीत इव केशेषु मृत्युना' अशा निर्वाणीच्या निर्धारानें त्यांनीं आपल्या सर्व शक्ति वेचल्या. त्यांचा पिंडच क्रांतिकारकाचा. जें जें भारतभूमीच्या दृष्टीनें अनिष्ट व दुष्ट असें आढळलें त्याविरुद्ध त्यांनीं चवताळलेल्या वाघाप्रमाणें आक्रमण केलें राजकीय स्वातंत्र्य हें तर त्यांचें अग्रेसर उद्दिष्ट खरेंच; पण त्याचबरोबर सामाजिक, धार्मिक, भाषिक, तत्त्वविषयक अशा सर्वच क्षेत्रांत क्रांतीचा झेंडा त्यांनीं फडकविला. अंदमानांत शृंखलांनीं जखडलेले असतांना त्यांनीं जुन्या व कोत्या धर्मांतरविषयक जळमटांना झटकून टाकलें, रत्नागिरीस स्थानबद्ध असतांना जातपात व देव-दैव वाद यांच्याविरुद्ध चढाई केली आणि भाषाशुद्धीची मोहीम सुरू केली. प्रांतिक स्वायत्ततेनुरूप स्थापन झालेल्या मुंबईच्या पहिल्या मंत्रिमंडळानें त्यांच्यावरील सर्व निर्बंध दूर करताँच हिंदुमहासभेला त्यांनीं हत्तीचें बळ प्राप्त करून दिलें. लेखण्या मोडा आणि शस्त्रें हातीं घ्या, असा मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष या नात्यानें संदेश देऊन स्वातंत्र्याची वाटचाल करण्यास भारत शस्त्रास्त्रांच्या शक्तीनें ओथंबलेला असला पाहिजे या विचारसरणीचा पाया त्यांनींच प्रथम घातला.

ज्या राजकीय स्वातंत्र्यासाठीं वीर सावरकरांनीं तळहातावर शिर धारण केलें त्या स्वातंत्र्याचें मनसोक्त दर्शन वीर सावरकरांना घडलें आहे. ज्या सामाजिक व आचारविचारविषयक क्रांतीचा उद्घोष त्यांनीं केला ती क्रांति आज भारत-पुरुषाला व्यापत चालली आहे. शस्त्रबळाच्या आराधनेशिवाय भारताला तरणोपाय नाहीं, हें चिनी आक्रमणानें स्वतंत्र भारताच्या गळीं उतरविलेलें आहे. त्यांचें भाषाशुद्धीचें तत्त्व आज राज्यव्यवहारांत मान्य झालेलें आहे. जें जें चिंतिलें, प्रतिपादिलें, आचरिलें, तें तें सर्व साक्षात् स्वरूपांत वीर सावरकर पहात आहेत. जीवनाची कृतार्थता याहून निराळी असूं शकत नाहीं. भारत स्वतंत्र झालेला वीर सावरकरांनीं पाहिला. आतां सर्वांगीण क्रांति पचनीं पाडून समर्थ व सबळ झालेला भारत त्यांनीं पाहिला पाहिजे. मृत्युंजय वीर सावरकरांना त्यासाठीं संपूर्ण आयुरारोग्य लाभावें अशी प्रार्थना आजच्या मृत्युंजयदिनीं भारतीय लोक मनोभावानें करीत आहेत.

२४–१२–६०

उषा भार्गव स्मारक जबलपुरांत हवें

जबलपूर येथें कु. उषा भार्गव या कॉलेज कुमारीस दोघां मुस्लिम तरुणांनीं भ्रष्ट केल्यावर तिनें आत्महत्या केली व जबलपुरांत दंगल उसळली. दंगल आतां शमन पावलेली आहे. उषा भार्गव हिच्यावरील अत्याचार पाशवी व धिःकारार्ह आहे, पण त्यानंतर घडलेल्या दंगलीवरून भारताची प्रकृति चांगली नसल्याचें दिसून आलें आहे, असें पंतप्रधान पं. नेहरूंनीं काँग्रेसपक्षाच्या सभेंत सोमवारीं सांगितल्याचें प्रसिद्ध झालें आहे. दुसऱ्या दृष्टीनें पाहिलें तर एका सुशील कुमारिकेला ज्या पशुतुल्य अत्याचारामुळें स्वतःला जाळून घ्यावें लागतें त्याबद्दलचा शोक व संताप अनावर होणें अपरिहार्य होतें, व दंगल माजली हें भारताची प्रकृति ठणठणीत असल्याचेंच चिन्ह होय असें वाटल्यावांचून राहात नाहीं.

दोघां मुसलमान गुंडांनीं उषा भार्गववर केलेल्या बलात्कारी भ्रष्टाचाराबद्दल एका जमातीचा दुसऱ्या जमातीविरुद्ध संताप उसळून दोन जमातींमध्यें दंगल

माजते या प्रकाराच्या मुळाशीं जाऊन त्याची छाननी झाली पाहिजे. मुलानें चोरीसारखें अपकृत्य केलें आणि त्याबाबत त्याचे आईबाप व सगेसोयरे डोळ्यांवर कातडें ओढून व मूग गिळून जर गप्प बसले तर तर सगेसोयरे स्वतः चोर नसतांनाहि ते त्या पापाचे मूक साथीदार आहेत असें समजून लोकांचा रोष सर्वांवर घराण्यावर झाल्याशिवाय राहात नाहीं व अशा रोषाचीं कमीअधिक फळें त्यांना भोगावीं लागतात. पाप करणाराच नव्हे तर पापकृत्य मुकाट्यानें पाहाणाराहि तितकाच दोषी गणला जातो, किंबहुना तो तसा असतोहि. पापकृत्य घडलें आणि उषा भार्गवसारखी कोवळी कुमारिका पापकृत्यास बळी पडली कीं संताप उसळून येणारच ! हा मानवी धर्म आहे; जबलपूरची हिंदु जनता खवळली आणि तसाच संताप तेथील मुसलमान लोकांना आला असता तर उषा भार्गव हिच्यावर झालेल्या अत्याचाराच्या धिःकारासाठीं हिंदु–मुसलमानांच्या मिरवणुकी निघाल्या असत्या, निदर्शनें झालीं असतीं आणि पापाचरणाबद्दल सारें जबलपूर शहर शोकानें व संतापानें वेडें झाल्याचें दिसून आलें असतें. पण हिंदु समाज ज्यावेळीं खवळलेला होता त्यावेळीं मुसलमान समाज या सामूहिक संतापापासून एक प्रकारच्या मरूखपणानें निराळेपणानें वागला असें दिसून येतें. अत्याचाराच्या निषेधार्थ निघालेल्या मिरवणुकी व झालेलीं निदर्शनें यांपासून समाजाचा एक भाग अलग राहातो याचा तितकाच संताप लोकांना आला आणि प्रक्षोभक वातावरणांत जबलपुरांत दंगल पेटलीं. उषा भार्गवला भ्रष्ट स्थितींत स्वतःला जाळून घ्यावें लागलें याबद्दल संताप आला हाच जणु गुन्हा वाटून त्याबद्दल शासन करण्यास मशिदींसारख्या ठिकाणांहून बंदुका व हत्यारें बाहेर पडलीं आणि जबलपुरांत पुन्हा दंगल भडकून आजूबाजूच्या गांवांत दंगलीच्या ज्वाला पोहोंचल्या अशी एकूण हकिकत आहे.

भारतांतच नव्हे तर जगभर कुमारिकांची सुरक्षितता व स्त्रीची अब्रू ही अत्यंत पवित्र मानण्यांत येते. त्यास जरासाहि धक्का बसला तरी समाजपुरुषाचे प्राण कासावीस होऊन संताप अनावर झाल्याशिवाय राहात नाहीं व भीषण गुन्ह्याची झळ त्याबाबत मौन धारण करणारांनाहि लागते. स्त्रीवरील अमानुष अत्याचार असह्य होणें ही समाजपुरुषाची प्रकृति बिघडल्याचें लक्षण म्हणतां येणार नाहीं. अर्थात् दंगल झाली व निरपराध्यांनाहि दंगलीनें होरपळलें याचें समर्थन कोणीच करणार नाहीं. पण महात्मा गांधी म्हणत असत त्याप्रमाणें एका कुमारिकेवरील अत्याचारी बलात्काराची खंत न वाटण्याइतक्या नामर्द बुद्दूपणाचें प्रदर्शन होण्यापेक्षा दंगल होऊन उषा भार्गववरच्या अत्याचाराबद्दलचा संताप जबलपुरांत प्रकट झाला, हें भारतपुरुष ठणठणीत जीवंत असल्याचेंच लक्षण म्हणतां येईल.

जबलपुरासारखी दंगल पुन्हा भारतांत होऊं नये हें केव्हांही श्रेयस्कर होय. दंगलीस कारणीभूत झालेलें वातावरण समूळ नाहींसें होणें हाच त्यावरचा उपाय होय. स्त्रीची विटंबना व तिच्या अब्रूवर घाला येऊन तिनें मृत्यु जवळ करण्याचा प्रसंग घडतांच भारतांतील प्रत्येक माणसाच्या मस्तकाला तिडीक गेली पाहिजे आणि त्या प्रकाराविरुद्ध निरपवाद संताप एकजुटीनें व्यक्त झालाच पाहिजे. असल्या प्रकारची गय किंवा क्षमा स्वजातीकडून व सरुख्या सोयऱ्यांकडूनहि होणार नाहीं असें निकोप वातावरण भारतांत निर्माण झालें पाहिजे. मग कोणत्याहि धर्माची, जातीची, पंथाची किंवा समाजाच्या गरीब श्रीमंत थरांतील कोणतीहि स्त्री ही सुरक्षित राहून तिची विटंबना तर राहोच, पण तिच्याकडे वाकड्या नजरेनें पहाण्याची व तिच्या केंसालाहि धक्का लावण्याची हिंमत पशुतुल्य व्यक्तीलाहि होणार नाहीं. उषा भार्गव अमानुष अत्याचाराला बळी पडली व तिनें मरण पत्करलें. या घटनेची आठवण चार दिवसांपुरती न राहातां समाजानें कायमची ठेवली पाहिजे. त्यासाठीं जबलपुरांत उषा भार्गव स्मारक झालें पाहिजे; इतकेंच नव्हे तर भारतांत ठिकठिकाणीं तिचीं स्मारकें झालीं पाहिजेत, आणि अशीं स्मारकें हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, वगैरे जातीजमातींनीं पुढाकार घेऊन भारतांत उभारलीं गेलीं पाहिजेत. उषा भार्गवच्या जातिनिरपेक्ष स्मारकांनीं भारत निरोगी व निकोप होत चालल्याचें सिद्ध होऊन पं. नेहरूंचीहि काळजी दूर होईल.

१५-२-६१

जातीय राजकारण व राजकीय जाती

स्वतंत्र भारतांत इतके दिवस दबून असलेल्या जातीय राजकारणानें पुन्हा डोकें वर काढलें असून त्याबद्दल सर्वच राजकीय पक्षांत चिंता व काळजी व्यक्त करण्यांत येत आहे. निवडणूक क्षेत्रांतून जातीय पक्षांची हकालपट्टी करावी असा काँग्रेस पक्षाचा पवित्रा कितपत कायदेशीर टिकाव धरील हें अद्याप स्पष्ट नाहीं. पण जातीय पक्षांविरुद्ध कायदेशीर रीत्या कांहीं उपाय योजण्यांत आले नाहींत

तरी बलवत्तर होत असलेल्या जातीय राजकारणाचा उच्छेद करण्याची उठावणी सर्वच पक्षांत असून, त्या कामीं 'भांडवलधार्जिण्या' काँग्रेसशीं 'राष्ट्रद्रोही' कम्युनिस्ट पक्ष एकजूट करण्यास तयार असल्याचीं घोषणा कॉ. डांगे हे वारंवार करीत असतात. जातीय संघटना व पक्ष डोकें वर काढून वळावत आहेत व त्यांचा उपद्रव सर्वच राजकीय पक्षांना होत आहे. तेव्हां समान संकटाविरुद्ध आपापसांतील वैर विसरून राजकीय पक्षांनी एकमेकांस साहाय्यकारी व्हावें हें स्वाभाविक ठरतें. मुस्लिम संघटना निवडणुकीच्या तोंडाशीं आपला जम बसवीत आहेत, हिंदुसभेचा सख्खा भाऊ असलेला जनसंघ भारताच्या खुद्द राजधानींत दिल्ली येथें काँग्रेसचा दोनदां पाडाव करून चुकला आहे. राजकीय पक्षांनाहि आपले उमेदवार निवडतांना त्यांची जात पहाण्याशिवाय गत्यंतर नसतें. सरकारी नोकऱ्या लायकीपेक्षांहि जातीय संख्याबलाच्या प्रमाणांत वाटल्या जाव्यात असा एक प्रकारचा अघोषित व्यवहार आहे. भारताच्या एकूण व्यवहारांत जातीयता संचरलेली आहे हें तर खरेंच. ती संघटित होऊन भारतीय लोकशाहीच्या डोक्यावर मिऱ्यें वाटण्याइतकी माजोरी होते असें पाहून सर्वच राजकीय पक्षांचीं धाबीं दणाणलीं आहेत आणि त्याविरुद्ध धडपड व आक्रोश सुरू आहे.

लोकशाहीमध्यें जातीयता व जात्यंध राजकारणास थारा असतां कामा नये, जातीय भिंतींनीं विभागलें जाऊन कर्तृत्व छिन्न-भिन्न होतां कामा नये, याबद्दल द्विधा मत असण्याचें कारण नाहीं. जातीयता व जात्यंध पक्षांचें उच्चाटन करतांना नव्या राजकीय जाती पडणार नाहींत अशीहि खबरदारी घेतली जावी अशी परिस्थिति आहे. हिंदुमुसलमान भेद लोकशाहींत टिकतां कामा नयेत, पण या धर्मांधतेलाहि मागें टाकणारी तथाकथित सरंजामवादी व साम्यवादी राजकीय धर्मांधता जगभर थैमान घालीत आहे. धर्मयुद्धें संपलीं पण त्यांच्याही-पेक्षां भीषण अशा या राजकीय धर्मांधतेनें जग विभागलें गेलें आहे व जग केव्हां खाक होईल याचा नेम राहिलेला नाहीं. शिया–सुनी, प्रॉटेस्टंट-कॅथॉलिक, स्पृश्यास्पृश्य यांसारखे बखेडे मागें पडत चालले आहेत आणि त्या ऐवजीं नव्या राजकीय जाती व पंथ उदयास येत असून एकमेकांस खाऊं कीं गिळूं असें करीत आहेत

भारतापुरतें पाहिलें तर जुना ब्राह्मण पंथ गेला आणि त्या जागीं सर्वश्रेष्ठता मिरवणारा सर्वोदयी पंथ राजकीय धर्मकृत्यें करण्यास पुढें सरसावत आहे व इतर राजकारणी पक्षांना हलके मानून त्यांचा जसा कांहीं विटाळ पाळीत आहेत. क्षत्रिय वर्ग मावळला, आतां हिंसाअहिंसेचा विधिनिषेध न मानणारा साम्यवादी पक्ष त्या जागीं येऊं पहात आहे. वाणिज्य वृत्तीनें काँग्रेसमध्यें शिरकाव करून नवी वैश्य जात

निर्माण केली आहे. या राजकीय जातींत व पंथांत बसूं न शकणारे आपापल्या शेती श्रमिक राजकीय जाती पुढें काढीत आहेत. या राजकीय जातींत व पंथांत इतकें वैमनस्य व तेढ आढळते कीं, एकमेकांमध्यें रोटीव्यवहार मोठ्या कष्टानें होतो आणि एकमेकांचा विरोध इतका ताणला जातो कीं, इरसाल शिव्याशापांनींच एकमेकांचा उद्धार होतो. इतर राजकीय जातींत भलाई आहे असें नुसतें म्हटलें तरी तो पाखंडी ठरतो व तो बहिष्कृत होतो चांगल्या सेवाभावी उमेदवारास मत द्यावें असें विनोबांनीं म्हटलें तर त्यावर एखादा मुरारजी अन्य पक्षीयांत चांगुलपणा कसा असूं शकतो असा सवाल टाकून सर्व मतें आपल्या कटोऱ्यांतच व आपल्या राजकीय जातीलाच पडलीं पाहिजेत अशी धर्माज्ञा काढतो. जुनें धार्मिक व जातीय राजकारण जात चाललें व त्याचें उच्चाटन झालेंच पाहिजे. पण त्याच वेळीं नवे राजकीय धर्म व जाती यांनीं 'पुढचें येतें, मागल्याला बरें म्हणवितें,' असें वाटण्यासारखी स्थिति आणली आहे.

राजकीय पक्ष आज धार्मिक व जातीय राजकारणाचा फडशा पाडण्यास उत्सुक झाले आहेत, हें एक सुलक्षण आहे. पण जातीय व धार्मिक राजकारणाचा फडशा पडत असतांनाच राजकीय जाती–धर्म बळावून लोकशाहीला निर्माल्यवत् करणार नाहींत असाहि बंदोबस्त जागृत लोकशाहीनें व्हावयास पाहिजे. बकासुराला भस्मासुरानें मारण्यांत लोकांचा व लोकशाहीचा फायदा नाहीं. लायकी, सेवा, न्याय–बुध्दि यांच्या भीमशक्तीनेंच जातधर्माचा राजकीय बकासुर व राजकीय जात–धर्माचा भस्मासुर पराभूत केला पाहिजे. जातीय व धार्मिक राजकारण पराभूत करतांना ही खबरदारी घेतली नाहीं तर भारतीय लोकशाही संकटमुक्त झाली असें म्हणतां येणार नाहीं.

१९–५–६१

नेहरूंनीं शस्त्र धरलें–कृपलानींनीं जिंकलें

मुंबईतील काँग्रेस प्रचाराचा नारळ सोमवार रोजीं शिवाजी पार्कवर काँग्रेसचे सर्वश्रेष्ठ नेते पं. जवाहरलाल नेहरु यांनीं मोठ्या दणक्यांत फोडला आहे आणि तो फोडतांना काँग्रेसविरोधी पक्षांना त्यांनीं सर्व सामर्थ्यानिशीं वक्तृत्वाच्या सोळा

कला आणि चौसष्ट विद्या उपयोगांत आणून असें झोडपून काढलें आहे कीं, नारळ तर फुटलाच पण विरोधकांच्याहि ठिकऱ्या नारळावरोबरच उडाल्या असें वाटल्याशिवाय राहात नाहीं. अंगांत चेव आल्याप्रमाणें पं. नेहरूंनीं या सभेंत विरोधी पक्षांची रेवडी उडविली व तापल्या तव्यावर लाह्या फोडाव्यात त्याप्रमाणें काँग्रेसला असलेल्या विरोधाची विल्हेवाट लावली. बहकलेले प्रजासमाजवादी, राजेमहाराजांच्या आश्रयानें रहाणारा स्वतंत्र पक्ष, दोन हजार वर्षांपूर्वीच्या काळांत वावरणारी हिंदुसभा यांच्यावर तर त्यांनीं हत्यार चालविलेंच, पण आम्हाला नेहरू हवेत पण मेनन नकोत असें म्हणून त्यांना विरोध करणाऱ्या काँग्रेसवाल्यांना त्यांनीं जहान्नममध्यें रवाना केलें आहे. पं. नेहरू यांच्या निवडणूकप्रचाराचें एक वैशिष्ट्य व आकर्षण असें कीं, ते सहसा कोणत्याहि सभेंत व्यक्तिगत उमेदवाराची तळी उचलीत नाहींत. फारच झालें तर उमेदवाराच्या नांवाचा ओझरता उल्लेख त्यांच्या भाषणाच्या शेवटीं कसाबसा असतो. व्यक्ति ही पं. नेहरूंच्या खिजगणतीलाहि नसते. काँग्रसचें ध्येयधोरण मान्य असेल तर काँग्रेसनें उभा केलेला उमेदवार कोण आहे याची चिकित्सा न करतां तो दगड किंवा खांब अगर म्हसोबा असला तरी काँग्रेसचा रंग व टिळा त्याला आहे एवढें पाहून मतदारांनीं त्याला मत दिलें पाहिजे, असा त्यांचा व्यक्तिनिरपेक्ष आग्रह असतो. मतदार जनता व काँग्रेस यांना एकत्र आणणाऱ्या सूत्रापेक्षां पं. नेहरू उमेदवारांना महत्त्व कधीं देत नाहींत. मतदार जनतेशींच त्यांचें हितगूज चालतें आणि लोकांच्या डोळ्यांना डोळा भिडवून जसा कांहीं ते लोकांच्या अंतःकरणांत प्रवेश करतात. त्यांचें वक्तृत्व साध्या भाषेंत पण अंतःकरणाच्या तारा छेडणारें असतें व स्वतःचें अंतकरणहि ते अशा सभेंतून मोकळें करतात. स्वाभाविकच पं. नेहरूंचें भाषण म्हणजे काँग्रेसचा हुकमी एक्का ठरून तो इतर पक्षांच्या प्रचाराच्या पत्रावळी मारून टाकतो. पं. नेहरूंचीं वैशिष्ट्यें मुंबईचा नारळ फोडतांना सर्वतोपरी व्यक्त झालीं, पण त्याचबरोबर व्यक्तिनिरपेक्षता हा त्यांच्या भाषणाचा जो गाभा समजला जातो त्या गाभ्याला मात्र हें भाषण जसें कांहीं आंचविलेलें होतें. इतकेंच नव्हे तर मुंबईचे लोकसभेचे व विधानसभेचे उमेदवार जणुं कांहीं त्यांच्यापुरते अस्तित्वांतच नव्हते. दक्षिण मुंबईतील उमेदवार व पं. नेहरूंचे केंद्र मंत्रीमंडळांतील स थी श्री. एस्. के. पाटील, मध्यमुंबईतील श्री गांधी यांचा उच्चारहि त्यांनीं केला नाहीं. विधानसभेंतील उमेदवार तर त्यांना कोणत्या झाडाचा पाला, असेच जणुं कांहीं होतें.

पं. नेहरूंचें मुंबईचें भाषण जसें कांहीं उत्तर मुबईचे काँग्रेस उमेदवार श्री. कृष्ण मेनन यांच्यासाठीं व त्यांचा पुरस्कार करण्यासाठीं होतें. संरक्षणमंत्री नेमणारा पंतप्रधान या नात्यानें मी आहें, ध्येय धोरण ठरविणारा मी आहें आणि

मी आणि मेनन यांच्यामध्यें भेद नाहीं, मेनन यांना विरोध म्हणजे माझ्या बुद्धिमत्तेचा अपमान, मेनन यांना आव्हान म्हणजे प्रत्यक्ष मलाच आव्हान, अशी अभेदाची भाषा त्यांनीं या सभेंत वापरली. नेहरूंचें नेतृत्व मान्य करून मेनन यांना आडवे जाणारांची रवानगी त्यांनीं जहान्नममध्यें करून दिली आहे. ज्या मेनन-विरोधकांना पं. नेहरूंनीं जहान्नममध्ये रवाना केलें आहे त्यांत मुंबई युवक काँग्रेसचे रामकृष्ण बजाज, पं. नेहरूंविषयी आपुलकी बाळगिणारे आचार्य कृपलानी, त्याचप्रमाणें पं. नेहरूंबद्दल आदरभाव व्यक्त करणारे श्री. अशोक मेहता, वगैरे प्रजासमाजवादी नेते आहेत. जसे हे सर्व नेहरूंचे चहाते आहेत त्याचप्रमाणें या सर्वांबद्दल यथाकाल व यथोचित आदर व अनुकूलता पं. नेहरूंनीं वेळोवेळीं प्रकट केली आहे. पण आज श्री. मेनन यांच्याशीं सायुज्जता सांगणाऱ्या नेहरूंनीं सर्वांचे दांत पाडून त्यांची आंतडीं उपसलीं आहेत, व त्यांचीं हाडें मोकळीं केलीं आहेत. व्यक्तिगत कोणाहि उमेदवाराकरितां हातांत प्रचाराचें शस्त्र धारण न करण्याची जणुं कांहीं प्रतिज्ञा केलेले पं. नेहरु हातांत सुदर्शन घेऊन रथाखालीं उडी टाकून आचार्य कृपलानी व त्यांचे पुरस्कर्ते यांच्यावर मुंबईत काँग्रेसचा नारळ फोडतांना धावून गेले आहेत

'न धरी शस्त्र करीं मी' अशी प्रतिज्ञा करून केवळ काँग्रेसचें नेतृत्व व सारथ्य करण्याची प्रतिज्ञा मोडून श्री. मेनन यांना निवडून आणण्याकरितां मेनन यांचा पुन्हा पुन्हा नामोल्लेख करीत पं. नेहरूंनीं हातीं शस्त्र घेतलें यांत पं. नेहरूंचें मेनन-प्रेम तर दिसून येतेंच; पण त्याचबरोबर मेनन यांच्याशीं सामना करणारे कृपलानी यांचें सामर्थ्यहि दिसून येतें. भीष्मानें कुरुक्षेत्रावर अर्जुनाविरुद्ध धनुष्यबाण उचलून आपलीं शस्त्रास्त्रें पणाला लावलीं व त्यांच्यापुढें अर्जुनाचा निभाव लागण्याचा रंग दिसेना त्या वेळीं परमात्मा श्रीकृष्ण भगवान् यांनीं 'न धरी शस्त्र करीं मी' ही प्रतिज्ञा बाजूला ठेवली, हातांतील चाबूक व लगाम बाजूला टाकले आणि सुदर्शन चक्र हातीं धरून श्रीकृष्ण भीष्माचार्यांवर धावून गेले त्या वेळीं भीष्माचार्यांनी त्यांचें स्वागत केलें. प्रत्यक्ष विष्णूच्या अवताराला हातांत शस्त्र घ्यावें लागलें व त्यांतच आपलें अजिंक्यत्व सिद्ध झालें, परमेश्वराशिवाय आपल्या तोडीचा योद्धा कोणी नाहीं याची कबुलीच परमेश्वरानें दिली, पुरुषार्थाची पावतीच आपणास मिळाली, असें म्हणून भीष्माचार्यांनीं रणांगणावर पतन पावण्याची तयारी केली. काँग्रेसचे परमेश्वर पं. नेहरु यांना मेननना कृपलानींपासून बचावण्याकरितां धांवून यावें लागलें व नित्याचे नियम व रिवाज बाजूला सारून मेननना पाठीशीं घालण्याची जरूरी त्यांना भासली, यांतच कृपलानी यांचा पुरुषार्थ व एक प्रकारचा विजय आहे असें म्हटलें पाहिजे.

पं. नेहरु यांनींच मेननना पाठीशीं घातल्यावर श्री. मेनन हे उत्तर मुंबईंत निवडून येतीलहि आणि आचार्य कृपलानी यांना धारातीर्थी शरशय्येवर आडवें व्हावें लागेलहि. पण अशा नेहरु–प्रचारानंतर निवडून येतील ते नाममात्र मेनन असले तरी ते पं. नेहरूच होत हें उघड आहे. पं. नेहरूंनीं प्रचारसभेंत शस्त्र उचललें त्याच वेळीं मेनन पराभूत झाले आणि आचार्य कृपलानी यांनीं जिंकलें. यापुढचा लढा मेनन विरुद्ध कृपलानी असा जवळजवळ उरलेला नाहीं. नेहरु विरुद्ध कृपलानी असा हा सामना उरतो आणि आचार्य कृपलानी हे नेहरुविरोधी किंवा काँग्रेस-विरोधीहि नसल्यामुळें या लढ्यांत नेहरु यशस्वी होतात कीं कृपलानी पडतात या गोष्टीला महत्त्वच राहात नाहीं. पं. नेहरूंनीं मेनन यांच्याकरितां उचललेल्या सुदर्शन चक्राला आचार्य कृपलानी बळी जातीलहि, पण त्याचबरोबर या सुदर्शनानें मेनन यांचा लाल सुंभहि जळून गेलेला आहे व पं. नेहरूंचें बाहुलें यापलीकडचा त्यांचा पीळहि उरलेला नाहीं शिवाजी पार्कवरील सभा व मुंबई पं. नेहरूंनीं जिंकली, व त्याच वेळीं आचार्य कृपलानी यांनीं एक प्रकारें उत्तर मुंबईची निवडणूक व्यवहारतः नसली तरी तत्त्वतः जिंकली आहे.

१७–१–६२

भारतीय लोकशाही-एकखांबी इमारत

नेताजी जयंतीनिमित्त कलकत्ता येथें भरलेल्या मेळाव्यासमोर भाषण करतांना सर्वोदयी नेते श्री. जयप्रकाश नारायण यांनीं भारतीय लोकशाही ही एकखांबी इमारत कशी बनत चालली आहे याचें विवेचन केलें आहे, आणि लोकशाही म्हणजे विभूतिपूजा नव्हे असें बजावून सांगितलें आहे. त्यांनीं आपल्या भाषणांत सांगितल्याप्रमाणें भारतांत सध्यां रूढ असलेली लोकशाही ही भारतीय देशकालपरिस्थितींतून उद्भवलेली अशी नैसर्गिक नसून हें लोकशाहीचें कलम पाश्चात्य राष्ट्रांतून आणून भारतीय परिस्थितींत लावलेलें आहे. पण पाश्चात्य देशांत तेथें वाढलेल्या लोकशाहीला जें वातावरण व हवापाणी आहे तें भारतांत नाहीं. पाश्चात्य देशांतील लोकशाही ही द्विपक्षारूढ अशी आहे. सरकारी पक्ष व विरोधी पक्ष असे मुख्यतः दोनच पक्ष पाश्चात्य लोकशाहींत

असतात आणि विरोधी पक्ष सत्तारूढ नसला तरी तो पर्यायी सत्तारूढ पक्ष म्हणून त्याचा मान ठेवला जातो. विरोधी पक्षनेत्यांशीं सल्लामसलत व विचार-विनिमय करूनच मूलभूत स्वरूपाचे व राष्ट्राच्या भवितव्यावर दीर्घकालीन परिणाम घडविणारे निर्णय घेतले जातात. सरकारी व विरोधी पक्षांत तात्त्विक व मूलभूत मतभेद असतात. पण एकदां परस्पर विचारविनिमयानंतर स्थूल मतैक्य नें घेतलेले निर्णय प्रतिनिधि सभेनें मान्य केल्यावर ते निर्णय सत्तारूढ पक्षाचे मानले न जातां ते राष्ट्रीय निर्णय म्हणून शिरसावंद्य मानले जातात सत्तेचें हस्तांतर झालें तरी एकूण धोरणाची चौकट बदलत नाहीं, आणि सत्तांतरानंतर सुद्धां एकदम उलथापालथ न होतां नवे निर्णय घेतले जातात. पहिलीं रुजलेलीं मूळें दुखावलीं किंवा उपटलीं जाणार नाहींत अशी काळजी घेऊनच धोरणांत हळूहळू बदल केला जातो.

भारतांत पाश्चात्य स्वरूपाची लोकशाही आहे पण ही लोकशाही द्विपक्षारूढ ऊर्फ द्विपक्ष नसून गोमेसारखी अनेक पक्षांचे पाय असलेली अशी आहे. लोकशाहीच्या गोमेला आणखी एखादा पाय केव्हां फुटेल याचा नेम नसतो, व असलेला एखादा पाय केव्हां तुटून पडेल याचाहि भरंवसा नसतो सर्व विरोधी पक्ष स्वतःस पर्यायी पक्ष म्हणवितात आणि त्यांची ध्येयधोरणें एकमेकांशीं वावडीं व दोन ध्रुवांइतकें अंतर असलेलीं अशीं आढळतात. कोणाहि एकाशीं सल्लामसलत केली तर बाकीचे पक्ष बिथरून अशा पक्षावर सरकारजमा झाल्याचें काहूर उठविलें जातें. आपण सरकारजमा नाहीं हें दाखविण्यासाठीं प्रत्येक विरोधी पक्ष धडपडत असतो आणि एकमेकांचे वाभाडे काढतांनाच सरकारी पक्षावर तुटून पडत असतो. सत्यभामेशीं बोललें तर रुक्मिणी रुसते आणि रुक्मिणीशीं वार्तालाप केला तर जांबुवंतीच्या अंगाचा तिळपापड उडतो आणि आवडत्या राणीला उडवून लावायचीं कुभांडें सुरू होतात. जणुं कांहीं सत्ताधारी पक्षाला विरोधी पक्षांचा राणीवसा संभाळावा लागतो. कोणताच विरोधी पक्ष निवडणुकीच्या दिव्यांतून मात्र विरोधी पक्ष म्हणून तर राहोच पण विरोधी गट म्हणून मान्यता पावण्याइतपत जागाहि मिळवूं शकत नाहीं. विरोधी पक्षांच्या अशा बजबजपुरींत विरोधी पक्ष कोणता मानावयाचा व विचारविनिमय विरोधी नेते म्हणून कोणाशीं करावयाचा हें एक कोडेंच होऊन बसल्याशिवाय राहात नाहीं. अशाहि परिस्थितींत सर्व विरोधी पक्षांच्या किंवा गटांच्या सभासदांना निरनिराळ्या कमिट्यांवर जागा सत्ताधारी पक्षाकडून देण्यांत येतात आणि महत्त्वाच्या प्रश्नांवर त्यांच्याशीं विचारविनिमय करण्यांत येऊन त्यांना माहिती देण्यांत येते. त्यांचे विचार प्रसंगाप्रसंगानें समजावून घेतले जातात. भारतांतील सत्ताधारी पक्ष लोकशाहीची बूज ठेवण्याची पराकाष्ठा करीत असल्याचेंच हें गमक मानलें पाहिजे.

विरोधी पक्षांच्या बाबतींतहि कांहीं मूलभूत धारणा व अपेक्षा असतात. विरोधी पक्षांचा लोकशाहीवर नितांत विश्वास पाहिजे व मतपेटीमार्फतच कोणताहि प्रश्न तडीस लावला पाहिजे. कोणताहि निर्णय एकदां प्रतिनिधि सभेनें घेतला कीं, तो बदलला जाईपर्यंत सर्व पक्षांनीं स्वीकारला पाहिजे आणि तो प्रतिनिधि सभेचें बहुमत मिळविण्याशिवाय अन्य मार्गानें बदलण्याची जिद् कोणी करतां कामा नये. पण भारतांतील पक्षोपपक्षांची नीति पाहतां ती या लोकशाही चाकोरींत बसतेच असें नाहीं. मतपेटी ही एक प्रकारें निर्णायक न मानतां सोईप्रमाणें स्वीकारण्याची किंवा लाथाडण्याची बाब झाली आहे. लोकशाही भारतांतील पक्ष, त्यांचें ध्येयधोरण व निष्ठा यांची तपासणी करितां कितीहि लोकशाहीवादी पक्ष सत्तारूढ असता तरी पाश्चात्य वळणाची परस्पर विचारविनिमयाची व निर्णयाबाबतच्या जबाबदारींत विरोधकांशीं वांटणी करण्याची चाकोरी पाश्चात्य देशांप्रमाणें भारतांत पडणें हें जवळजवळ अशक्य व अवघडच झालें असतें.

भारतांतील सर्व महत्त्वाचे निर्णय शेवटीं एकच व्यक्ति घेते व त्यामुळें लोकशाहीची भारतांतील उभारणी एकखांबी ठरते हा श्री. जयप्रकाश यांचा आरोप खोटा नाहीं पण तो सत्तारूढ पक्षांप्रमाणेंच इतर पक्षांनाहि लागू होतो आणि भारताची पूर्वापार जडणघडण त्यास कारणीभूत आहे. भारतांत तत्त्वाभिमान आहे, पण तो व्यक्तिसापेक्ष आहे. सत्यवचन हें श्रेष्ठ खरें, पण त्याचें स्मरण व चिंतन निराकार अवस्थेंत न करतां श्रीरामाच्या विभूतिपूजेसह करण्यांत येतें. अहिंसेशीं गांधीचरित्राची सांगड भारतानें घातली आहे. इतर पक्षांतहि निराळी परिस्थिति नाहीं. विनोबा हेच सर्वोदयवाद्यांचें दैवत व त्यांच्या मुखांतून व्यक्त होणारें तेंच सर्वोदयी परिणत तत्त्वज्ञान मानलें जात नाहीं काय? अशोक मेहता म्हणजेच आज प्रजासमाजवादी पक्ष होय. परदेशांतहि सध्यां केनेडींच्या नांवाशीं अमेरिकेचें ध्येयधोरण निगडित आहे आणि क्रुशेव म्हणजे रशियाचा व अलीकडेपर्यंत जगाचा कम्युनिस्ट पक्ष मानला जात नव्हता काय? विभूतिपूजा ही भारतांत विशेष ठसठशीत असते, पण ती इतर देशांतहि आहे. त्या दृष्टीनें व्यक्तिपूजा ही लोकशाहींतहि राहाणारच आणि एकखांबी इमारती सर्वत्र कमीअधिक प्रमाणांत आहेतच. त्यांत विषेश बिघडतहि नाहीं. लोकमत जर जागृत व चिकित्सक नसेल तरच या सर्वत्र आढळणाऱ्या गोष्टी कोणत्याहि तत्त्वास व पद्धतीस नडल्याशिवाय राहात नाहींत. भारतांतील जनता जागृत व चिकित्सक जसजशी होत जाईल तसतशी भारतीय लोकशाही ही तोंडवळ्यानें पाश्चात्य लोकशाहीपेक्षां निराळी पण प्रभावी बनून पक्षीय एकांतिकता व एकखांबी नेतृत्व यांतील दोषांचाहि निचरा जागृत व चिकित्सक समाजपुरुष यथान्याय केल्याशिवाय राहाणार नाहीं

२५–१–६२

चव्हाणांच्या अंगीं शिवाजीचे गुण

येत्या सार्वत्रिक निवडणुकींत भारतांतील मतदारांची जबाबदारी स्थिर व योजनाबद्ध सरकार निवडून देण्याची आहे आणि यंदाच्या सार्वत्रिक निवडणुकींत महाराष्ट्रांतील मतदार काय करतात इकडे स्वाभाविकच केवळ महाराष्ट्राचेंच नव्हे तर भारताचेंहि लक्ष वेधलेलें आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. गेल्या सार्वत्रिक निवडणुकींत संयुक्त महाराष्ट्र नाकारणाऱ्या काँग्रेसला महाराष्ट्रानें मतें नाकारलीं. आतां संयुक्त महाराष्ट्र झाला आहे, आणि महाराष्ट्रांतील मतें केवळ सूडबुद्धीनें विरोधी पक्षांना देण्यांत येतात कीं भारतीय राज्यकर्तृत्वाशीं एकजीव असलेल्या महाराष्ट्र सरकार चालविणाऱ्या काँग्रेसला देण्यांत येतात याला स्वाभाविकच महत्त्व आलेलें आहे. संयुक्त महाराष्ट्र झाल्यावर लगोलग बारामतीची पोटनिवडणूक झाली. जर काँग्रेस उमेदवारास मतदारांनीं यश दिलें नाहीं तर दिल्लीस तोंड दाखवावयास नको असें त्यावेळीं रानोमाळ प्रचार करतांना ना. चव्हाण यांनीं सांगितलें होतें. महाराष्ट्र जसा विरोधकांशीं कडवेपणानें झुंजणारा आहे त्याचप्रमाणें गौरवशालीहि आहे हें बारामतीच्या पोटनिवडणुकींत दिसून आलें. संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतरहि मराठी मतें केवळ काँग्रेसला विरोध करण्यासाठीं एका आघाडींत राहाणाऱ्या विरोधी पक्षांना पडणार, कीं नेहरूंच्या प्रेरणेनें व काँग्रेसच्या अनुषंगानें महाराष्ट्र राज्य चालविणाऱ्या चव्हाण नेतृत्वाखालच्या काँग्रेस पक्षास पडणार यास स्वाभाविकच असाधारण महत्त्व आहे. सुबुद्ध विवेकी मराठी मतदार नव्या नेतृत्वाचें व नव्या मराठी राज्याचें चीज व गौरव करण्यास चुकणार नाहींत अशी अपेक्षा करणें गैर नाहीं

ना चव्हाणांच्या नव्या नेतृत्वाला शिवाजीचें नेतृत्व म्हणून गौरविणारा व या नेतृत्वाबद्दल विश्वास व श्रद्धा बाळगणारा चहात्यांचा एक मोठा वर्ग आहे. वस्तुतः व्यवहारांत व वास्तवांत उपमांना महत्त्व नसतें व त्यांत फारसा अर्थहि नसतो. सगळ्यांनाच ना. चव्हाणांचें नेतृत्व शिवाजीच्या मोलाचें वाटणार नाहीं, इतकेंच नव्हे तर दुसरें टोंक गाठून ना. चव्हाणांची हेटाळणी व निर्भर्त्सनाहि करणारे महाराष्ट्रांत आहेत. ही हेटाळणी व निर्भर्त्सना एका टोकाची व प्रतिशिवाजी या नात्याचा त्यांचा गौरव दुसऱ्या टोकाचा, म्हणून या निंदास्तुतीचा भागाकार केला तरी ना. चव्हाणांच्या कर्तृत्वाबद्दल, नेतृत्वाबद्दल व मुत्सद्देगिबद्दल सार्वत्रिक आदर व आपुलकी आहे असें आढळून आल्यावांचून राहात नाहीं. लोकशाहीच्या जमान्यांत प्रतिशिवाजी म्हणून नाहीं तरी शिवाजी महाराजांची

आठवण करून देण्या इतके गुण त्यांच्या नेतृत्वांत, कर्तृत्वांत, यथाकाल धोरणांत व शीलांत आहेत असें मत मराठी लोकांत आढळतें व तें निःपक्षपाती व्यक्तीस नाकबूल होण्यासारखें नाहीं.

ना.चव्हाणांचें आजचें महाराष्ट्रांतील नेतृत्व परप्रकाशी किंवा परावलंबी नसून स्वयंभू आहे व श्री शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाची आठवण करून देणारें आहे. शिवाजीराजांचें नेतृत्व शहाजीराजांच्या छायेंत वाढलें नाहीं किंवा एखाद्या महावृक्षाच्या आधारेंहि चढलें नाहीं. कणखर अशा मावळ्यांच्या साहाय्यानें व त्यांच्या कर्तृत्वास साकार करून तें महाराष्ट्रभर गाजलें. ना. चव्हाणांचें नेतृत्वहि देवप्रसादानें किंवा त्यास कौल लावीत बलवत्तर झालें नाहीं किंवा कोणाची करांगुळी त्यास लाभली नाहीं. किंबहुना प्रतिष्ठित नेतृत्वानें केवळ त्यांचा उपरोध केला असें नव्हे तर संधि साधली असती तर त्यांचा कांटा काढण्यासहि कमी केलें नसतें. पण राजकीय मतप्रणालींतील स्नेहीसोबत्यांवर भिस्त ठेवून व त्यांचा परिवार वाढवीत आणि मिळालेल्या प्रत्येक संधीचा फायदा विनचूक घेत ना. चव्हाण सतत पुढें सरकत राहिले आणि आज ते अशा प्रतिष्ठेला पोहोंचलें आहेत कीं मुख्यमंत्री या नात्याच्या त्यांच्या नेतृत्वास श्री. एस्. एम्. जोशी किंवा कॉ. डांगे हेहि घळमळीत किंवा आडव्या जिभेनें मान्यता देत असतात हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

श्री शिवाजी महाराजांच्या धोरणांत व दैनंदिन नीतिव्यवहारांत शक्य तोंवर गोडीगुलाबी व अविरोध साध्य साधण्याला महत्त्व होतें; आणि अगदींच नाइलाज झाल्यावर ध्येयाच्या आड येणारास कडवेपणानें कापून काढण्यासहि त्यांनीं कमी केलें नाहीं चंद्रराव मोऱ्यांशीं शक्य तोंवर गोडीगुलाबीनें घेण्याची त्यांनी शिकस्त केली आणि जर अफझुलखानानें शस्त्र उगारलें नसतें तर प्रतापगडावर त्याचा कोथळा बाहेर पडला नसता. ध्येयापुढें वैयक्तिक मानापमानाचें त्यांनीं कधीं अवडंबर माजविलें नाहीं आणि औरंगजेबाचा दरबारहि त्यांनीं निधडेपणानें पाहिला. पण तेथें स्वराज्याची धडगत नाहीं व चवथ्या पांचव्या रांगेंत मराठी स्वराज्याला उभें राहावें लागतें असें पाहिल्यावर शेवटपर्यंत मोगलाईशीं मुकाबला करण्यास कमी केलें नाहीं. त्यांच्या पश्चातहि हा मुकाबला पुढें चालून औरंगजेबाला दक्षिणेंत अखेर देह ठेवावा लागला. ना. चव्हाणांच्या नेतृत्वांत शिवचरित्रांतील या प्रकारचे अनेक गुण मुरलेले आढळून आल्याशिवाय राहात नाहींत. महाराष्ट्राला वैभवसंपन्न व समाजवादी करण्याच्या कर्तृत्वांत सर्वांचा समावेश करण्याची शिकस्त त्यांच्या चालचलणुकींत दिसते. त्यांत जुन्या कार्यकर्त्यांना स्थान आहे आणि नव्यांनाहि मान आहे. गांधीवधोत्तर जाळपोळीनें ब्राह्मणवर्ग दुखावला जाऊन महाराष्ट्राच्या उभारणीपासून अलिप्त आहे हें

शल्य ना. चव्हाणांना जाचत राहिलें आणि त्यांनीं सांगलीचीं जळीत कर्जे माफ करून ब्राह्मणांचा अनुनय करण्यासहि कमी केलें नाहीं. ना. हिरे यांच्या गटाला आपलासा करून घेतां आलें नाहीं याचें वैषम्य त्यांना वाटतें आणि महाराष्ट्राचें राज्य हें मराठी राज्य ठरून त्याच्या भरभराटींत सर्वांचा सारखा हातभार असावा म्हणून हरिजनांपासून भूदेवांपर्यंत सर्वांशीं सामोपचाराचें शक्य तितकें त्यांनीं वर्तन केलें आहे. सं. म. समितीच्या कार्यकारिणीच्या सभेंत आपण होऊन जाणारा व तेथें आपलें निवेदन रोखठोक करून विरोधकांचीं आर्जवें करणारा ना. चव्हाणांसारखा नेता महाराष्ट्रांत काय पण भारतांतहि क्वचितच सांपडेल. अशीं आर्जवें करीत असतांनाहि कोणी अडून-तटून फुगून बसलें तर त्यांच्याविना किंवा त्यांना ओलांडा घालून व मोडून काढून पुढें जाण्यासहि त्यांनीं कमी केलें नाहीं. त्यांनीं स्वतःचा असा संच नव्या पिढींतील कर्तबगार व उद्योगी माणसें निवडून बनविला असल्यामुळें सर्वांच्या सहकार्याची आळवणी करीत असतांनाहि असें सहकार्य पुढें न आलें तरी त्यांचें त्याशिवाय नडण्यासारखी परिस्थिति आतां उरलेली नाहीं हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

संयुक्त महाराष्ट्राबाबतच्या ना. चव्हाण धोरणानें सर्वांचीच मति गुंग करून सोडली. गनिमी काव्यानें किंवा सरळसोट कालोचित धीरगंभीरपणानें म्हणा, त्यांनीं दिल्लीहून संयुक्त महाराष्ट्र आणला, हें समितीचें चळवळीचें श्रेय मान्य करणारालाहि नाकारतां येण्यासारखें नाहीं. द्विभाषिकाचा कारभार त्यांनीं कसोशीनें व निष्ठेनें चालविला, पण द्विभाषिकांत एकात्म्य साधणें अशक्य आहे असें आढळून आल्यावर त्यांनीं हें सत्य कसल्याहि परिणामांची डर न बाळगतां सडेतोडपणानें दिल्लीला सुनावलें. चव्हणांच्या शब्दाला तोंपर्यंत इतकें वजन दिल्लींत प्राप्त झालें होतें कीं, एक प्रकारची निर्णायक शक्ति त्यांच्या शब्दामध्यें सचरली आणि त्यांच्या सूचनेप्रमाणें द्विभाषिक चिरलें जाऊन संयुक्त महाराष्ट्र दिल्लीच्या अविरोधानें साकार झाला. द्विभाषिक राववावें व तें अनुभवांतीं पराभूत झाल्याचें आढळून आलें तर पुन्हा विचार करूं असा पेंच टाकणाऱ्या पं. नेहरु-पंतांसारख्या बड्या मुत्सद्यांचे दांतच जणुं कांहीं ना. चव्हाणांनीं त्यांच्या घशांत घातले व त्यांची मान्यता संयुक्त महाराष्ट्रास मिळविली. शुक्राचार्यांच्या आश्रमांतच नव्हे तर त्यांच्या पोटांत शिरून संजीवनी विद्येसह बाहेर पडणाऱ्या कचाची गुरुभक्ति व विद्यार्थी बाणा यांचें जणुं कांहीं प्रात्यक्षिक ना. चव्हाणांनीं संयुक्त महाराष्ट्र सफल करून दाखविलें. दिल्ली दरबारांत शिवाजी महाराजांप्रमाणें ना. चव्हाण गेले पण सहीसलामत परततांना संयुक्त महाराष्ट्र घेऊन परतले व तशी परिस्थिति त्यांनीं स्वतःच्या कर्तृत्वानें, निष्ठेनें व चतुराईनें निर्माण करून ठेवली होती. त्यांची ही चतुराई म्हणजे

पाठींत खंजीर खुपसण्याचा प्रकार त्यांच्या गुजराथी सहकाऱ्यांना वाटला पण मराठी लोकांच्या बाबतींत त्यांची ही चतुराई उपकारक ठरून महाराष्ट्राचें स्वप्न साकार झालें. महाराष्ट्र राज्य अशा रीतीनें साकार केल्यावर त्यास आपल्या नेतृत्वानें समाजवादी वळण देण्याची व महाराष्ट्राला वैभवसंपन्न करण्याची संधी ना. चव्हाण येत्या निवडणुकींत मागत आहेत. गौरवशीलता व दूरदृष्टि या दोनहि दृष्टींनीं त्यांची मागणी मराठी मतदारांनीं मंजूर करणें हें वाजवी व कालोचित ठरेल. याबाबत अधिक विवेचन उद्यांच्या अंकांत याच ठिकाणीं करूं.

११-२-६२

निवडणूक मतदान : महाराष्ट्रास मत-मन

निवडणूक मतदानाचे यमनियम गेल्या कांहीं लेखांत चर्चिल्यानंतर महाराष्ट्र राज्यांत मत कसें पडलें पाहिजे आणि मन कसें व्यक्त झालें पाहिजे याचें विवेचन या लेखांत करून निवडणूक मतदानाची ही लेखमाला आटोपली घेतली जात आहे. महाराष्ट्र हें नवोदित राज्य आहे, आणि हें नवें राज्य शिस्तशीर व आकर्षक राहाण्यावर मराठी मतदारांचा कटाक्ष राहाणें हें अगत्याचें आणि अपरिहार्य आहे. नव्या महाराष्ट्र राज्यांत ना. चव्हाणांचें नेतृत्व उदयाला आलें आहे. गेली निवडणूक व त्यांतील उमेदवारांची निवड ना. चव्हाणांची नव्हती. एक प्रकारें प्रवाहपतित एवढ्यापुरतेंच त्या निवडणुकीचें मुखरत्व ना. चव्हाणांकडे होतें. त्या निवडणुकींत महाराष्ट्रांत काँग्रेसला विदर्भ-मराठवाड्याच्या मतानें सावरलें आणि काँग्रेसचीं सत्तासनें टिकवून धरलीं. समितीची सत्तेची गाडी थोडक्यांत चुकली. पण स्थानिक निवडणुकींत मात्र समितीची ठिकंठिकाणीं सरशी झाली व तेथील कारभाराचीं सूत्रें समितीकडे गेलीं. तथापि समितीला स्थानिक स्वराज्याचीं हातीं आलेलीं सूत्रें धड हातांळतां आलीं नाहींत व जेथें समिती सत्तारूढ झाली तेथें 'कालचा गोंधळ बरा' म्हणण्याची पाळी आली. समितीला कारभाराचें कौशल्य व कर्तबगारी कोठेंच दाखवितां आली नाहीं. समितीच्या हातीं गेलेल्या स्थानिक स्वराज्याचा विचका झाला.

पण तो दोष समितीचा म्हणतां येणार नाहीं किंवा समितीमधील नेत्यांचाहि ठरत नाहीं. दोष समितीच्या घडणींत होता व त्यामुळें एकसांधी, विधायक कर्तृत्व समिती दाखवूं शकली नाहीं. समिती पराक्रम गाजवून काँग्रेसविरुद्ध लढवय्याप्रमाणें झुंजली पण जय समितीला पचवितां आला नाहीं, व शक्ति वाढविण्यास तो कारण झाला नाहीं. समितींतील पांडव आपापसांतच लढत झगडत राहिले. कुरुक्षेत्रावर पांडवांच्या पक्षांत अनेक राजे व सेनापति होते. पण पांडवांचा जय झाल्यावर इंद्रप्रस्थाच्या गादीवर एकटा युधिष्ठिर आरूढ झाला व त्याच्या अंकित इतर पांडवांचा पराक्रम राहिला, समितींत सर्वच सत्तारूढ धर्मराज बनले. त्याच्या परिणामीं श्री. यशवंतराव म्हणतात त्याप्रमाणें आघाडीची बिघाडी झाली व बारभाईची खेती फळाला येत नाहीं हें पुन्हा एकवार सिद्ध झालें. संयुक्त महाराष्ट्राची लढाई चालली होती त्यावेळीं प्रखर पराक्रमाची आवश्यकता होती. आतां संयुक्त महाराष्ट्र साकार झाल्यावर समितीला पराक्रम गाजविण्यास तसे प्रसंग राहिलेले नाहींत; आणि कारभार हांकण्याच्या दृष्टीनें समितीची बारभाई ऊर्फ बिघाडी यशस्वी झालेली नाहीं. समितीमधून प्र. स. पक्ष बाहेर पडला व समितींत एकात्म्य झालें असें समिती व्यासपीठावरून सांगण्यांत येतें. पण तसा पडताळा अद्यापि येत नाहीं. समितींत परस्पर अविश्वास, शंका व जागांसाठीं माऊबंदकी अद्यापि चालूच असल्याचें दिसतें. समाजवादी भारतांत समाजवादी महाराष्ट्र बनविण्याची समितीची भाषा आहे. पण त्यासाठीं भारतव्यापी लढा करावयास पाहिजे. समितीची तशी भारतव्यापी संघटना व ताकद नाहीं, आणि तशी एकजूटहि समितींत नाहीं. समितीमधील जो तो घटक पक्ष आपल्या पायापुरतें व आपला पक्ष बळकट कसा होईल, हेंच सारखा पहात आहे व शक्य तर दुसऱ्या पक्षाच्या पायांत पाय घालीत आहे. त्यामुळें समिती, समाजवादी भारतांत समाजवादी महाराष्ट्र घडवून आणण्याच्या स्थितींत नाहीं आणि कारभाराचें विधायक कर्तृत्व समितीस पुढेंमागें जमण्याचीहि शक्यता नाहीं. अशा स्थितींत ना. चव्हाणांच्या नव्या नेतृत्वाला डावलून समितीला मतदान करतांना मतदाराला विचारच करावा लागेल.

महाराष्ट्र कल्याणाच्या वैचारिक पातळीवरून पाहतां समितीला संपूर्ण मतदान करण्याचा अशा रीतीनें प्रश्न फारसा उरत नाहीं. प्र. स. पक्ष, जनसंघ वगैरे पक्षांच्या बाबतींत फारसा विचारहि करण्याची तसदी मतदार सहसा घेणार नाहींत. कारण विधायक कार्य किंवा लढा व पराक्रमाच्या दृष्टीनें हे पक्ष समिती किंवा काँग्रेसच्या मानानें मतदारांच्या डोळ्यांत भरण्यासारखे नाहींत. ना. चव्हाण हे महाराष्ट्रहिताच्या, भरभराटीच्या व समाजवादी जडणघडणीच्या दृष्टीनें कर्तबगारी गाजविण्याची संधी महाराष्ट्रांत काँग्रेसला मागत आहेत. चव्हाण नेतृत्वाखालील महाराष्ट्र काँग्रेसनें महाराष्ट्राचा कारभार चालविला तो अगदीं

निर्दोष आहे असें ना. चव्हाणहि म्हणत नाहीत. उलटपक्षीं कारभारांतील दोष इतरांपेक्षांहि ना. चव्हाण जास्त जाणतात. दोष दूर करणें हें काम यक्षिणीची कांडी फिरविल्याप्रमाणें चमत्कारासारखें होऊं शकणार नाहीं. समिती राज्यारूढ झाली तरी सर्व दोष तत्काळ दूर होणार नाहींत; कदाचित् चव्हाणांपेक्षांहि अधिक काळ लागेल. चव्हाणांना दोष उमगतात व तशी कबुलीहि ते प्रांजलपणानें देतात. पण समिती स्वतःला चुकीच्या पलीकडची समजते व तसें बोलत वागत आलेली आहे. सोव्हिएट राज्यांत किंवा चाऊ माऊ राजवटींचेहि स्वरूप संपूर्ण निर्दोष जेथें नाहीं तेथें ना. चव्हाणांनीं अल्पावधींत तशी किमया करावी अशी अपेक्षा करणें गैर ठरेल. दोषांची जाणीव ना. चव्हाणांना आहे. ते दूर करण्याची तळमळ त्यांना आहे, ही गोष्ट मतदारांच्या दृष्टीनें महत्त्वाची आहे. चव्हाणांचें नेतृत्व हें काँग्रेसमध्यें व काँग्रेसबाहेर पुरोगामी म्हणून मान्यता पावलेलें आहे. चव्हाण–राजवटीचा तोंडवळा मराठी आहे असें कॉ. डांगेहि सांगतात व या तोंडवळ्याला साजेशी समाजवादी महाराष्ट्राच्या उभारणीची ना. चव्हाणांची घोषणा आहे. ही घोषणा पुरी करण्याची ताकद त्यांच्या ठिकाणीं संचरली पाहिजे आणि महाराष्ट्राची भरभराट सर्वांगीण साधण्याइतकें त्यांचें वजन दिल्लींत प्रस्थापित झालें पाहिजे.

ना. चव्हाणांचा शब्द दिल्लींत बहुधा डावलला जात नाहीं हें संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वेळीं दिसून आलें आहे. ना. चव्हाण हे धुरंधर राज्यकर्ते, पट्टीचे मुत्सद्दी व न्यायनीतिनिपुण नेते म्हणून दिल्लींत व भारतांत ओळखले जातात. पं. नेहरूंनंतर कोण, असा प्रश्न उपस्थित झाला असतां श्री. जयप्रकाशजींनाहि ना. चव्हाणांचा उल्लेख करण्याचा मोह होतो. ना. चव्हाणांचा हा दबदबा व वजन दिल्लींत व भारतांत वाढण्यास केवळ येत्या निवडणुकींत काँग्रेसला बहुमत मिळून भागणार नाहीं. संयुक्त महाराष्ट्र झाला आहे व विरोधी पक्षांची फळी फुटली आहे या दोनहि घटना महाराष्ट्रांत काँग्रेसच्या यशाला अनुकूल आहेत. मतें मिळतील व काँग्रेसचे उमेदवार बहुसंख्येनें निवडून येऊन काँग्रेसचें बहुमतहि महाराष्ट्रांत होईल. पण ना. चव्हाणांचें एवढ्यानें समाधान नाहीं व त्यांची मागणीहि मतांपुरती नाहीं. मराठी मतांबरोबरच त्यांना मराठी मनें पाहिजे आहेत. ना. चव्हाणांच्या समाजवादी महाराष्ट्र रचनेच्या ध्येयाशीं, कणखर पुरोगामी धोरणाशीं, महाराष्ट्रास वैभवशाली करण्याच्या विधायक कर्तृत्वाशीं, मराठी मन समरस झालें नाहीं तर निवडणुकीचें यशहि ना. चव्हाणांना खटकणारें ठरेल. ना. चव्हाणांच्या नेतृत्वामागे महाराष्ट्राचें मन, अंतःकरण व कर्तृत्व उभें राहिलें तरच ना. चव्हाण आंखलेल्या योजनेप्रमाणें व अपेक्षेप्रमाणें वाटचाल करूं शकतील आणि त्यांच्या कर्तृत्वानें महाराष्ट्र भारतीय राज्यांत

आघाडीवर राहून दिल्लीला चवथ्या पांचव्या रांगेंत महाराष्ट्राला उभें रहावें लागणार नाहीं. महाराष्ट्राचा शब्द दिल्लींत व भारतांत कोठेंच खालीं पडणार नाहीं. त्या दृष्टीनें ना. चव्हाणांच्या नेतृत्वाचें सामर्थ्य म्हणजे महाराष्ट्राचें व मराठी माणसांचें सामर्थ्य ठरतें. ना. चव्हाणांबद्दल जें प्रेम, अभिमान, विश्वास व आपुलकी महाराष्ट्रांत किंबहुना विरोधकांना असेल ती या निवडणुकींत मत व त्याचबरोबर मन देऊन महाराष्ट्रांत व्यक्त झाली पाहिजे. मराठी मतदारांची ही खास जबाबदारी आहे.

ना. चव्हाणांच्या नेतृत्वास व कारभारास मराठी मतदारानें मत व त्याचबरोबर मन दिलें पाहिजे. मतदारानें मत व त्याचबरोबर मन दिलें पाहिजे याचा अर्थ विरोधी पक्षाच्या उमेदवारांना मतदारांनीं झिडकारावें असा होत नाहीं. किंबहुना चव्हाण व महाराष्ट्र काँग्रेसचीहि तशी अपेक्षा आहे असें म्हणतां येणार नाहीं. महाराष्ट्र राज्यांत काँग्रेसनें सर्व जागांसाठीं उमेदवार उभे केले आणि सत्तर ऐशीं टक्के जागा जिंकण्याची उमेद ना. चव्हाण व महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. खेडकर व्यक्त करीत असतात. याचाच अर्थ तीस टक्के जागा विरोधकांना महाराष्ट्रांत जातील अशी ना. चव्हाण–खेडकरांची अपेक्षा दिसते. विरोधी पक्षांत मातबर, कर्तबगार, पराक्रमी, त्यागी व महाराष्ट्रनिष्ठ उमेदवार आहेत व त्यांची दखल घेण्यास महाराष्ट्रांतील मतदारांनीं कसूर करतां कामा नये हें उघड आहे. जितेकर वाडींत भाषण करतांना कॉ. डांगे यांनीं सांगितल्याप्रमाणें हत्ती सुस्वभावी, शक्तिमान, कर्तबगार व हुषार असला तरी त्याच्यावर अंकुश हा पाहिजेच. तो अंकुश समिती, प्र. स. पक्ष, जनसंघ वगैरे पक्षांतील निवडक उमेदवारांचा असणें हें केव्हांहि श्रेयस्कर व आवश्यक आहे. अंकुश सिद्ध ठेवण्याच्या दृष्टीनें विरोधी पक्षांचें चीज मतदारांनीं केलें पाहिजेच! पण ठाणावर हत्ती असला पाहिजे! तरच अंकुश उपयुक्त व आवश्यक आहे हें उघड आहे. हत्तीला भरपूर रोट व खुराक द्यावा व त्याचा माज उपद्रवकारी व उपद्व्यापी ठरूं नये म्हणून अंकुशहि धारदार व तिखट असावा ही ना. चव्हाण व कॉ. डांगे यांची मागणी एकत्र केली असतां, मराठी मतदारांची जबाबदारी निश्चित ठरते. ती जबाबदारी मराठी मतदार चोख पार पाडतील असा भरंवसा आहे.

१२–२–६२

ब्राह्मण ही पदवी नसून शिवी झाली

पुण्याच्या काँग्रेस भवनांत काँग्रेस कार्यकर्त्यांसमोर भाषण करतांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. चव्हाण ह्यांनीं पक्षांतर्गत गटबाजीवर उद्‌बोधक विचार व्यक्त करून एकात्म्याची महती वर्णिली. त्यांच्या विवेचनानें सारे श्रोते इतके प्रसन्नचित्त झाले कीं, त्या भरांत एका महाजनानें ना. चव्हाण हे ब्राह्मणासारखे बोलले व ते ब्राह्मण वाटतात असे उत्स्फूर्त उद्‌गार काढले. ना. चव्हाणांची शिकस्तीची प्रशंसा साधण्याकरितां ही शब्दयोजना त्यानें केली होती हें उघड आहे. आपल्याला जें सर्वोच्च व सर्वांत प्रिय वाटत असेल त्या स्वरूपांत आपली इष्ट देवता भक्त पहात असतो व प्रिय वस्तूंचा नैवेद्य दाखवीत असतो. पण कित्येकदां त्याचा विपरीत परिणाम होतो. ज्याची शिसारी यावी, त्याचाच नेमका नैवेद्य दैवताच्या वांट्यास येतो. ना. चव्हाण हे ब्राह्मण आहेत असा ध्वनि स्तुतिस्तवनांत निघतांच ना. चव्हाण यांना तडकाफडकी सांगून टाकावें लागलें कीं, ब्राह्मण ही मला पदवी वाटत नाहीं. पदवी वाटत नाहीं याचाच दुसरा अर्थ ती शिवी वाटते असा होतो. मी ब्राह्मण नाहीं किंवा दुसऱ्या कोणत्याहि जातीचा नसून माझी जात माणसाची आहे, असें त्यांनीं या प्रसंगीं सांगून टाकलें. ब्राह्मण ही आतां पदवी राहिलेली नसून ती एक शिवी ठरली आहे आणि ब्राह्मणांनीं इतक्या वर्षांच्या कर्तबगारीनें, परंपरेनें व कृतीनें ही अवस्था प्राप्त करून घेतली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. राजर्षि विश्वामित्राला ब्रह्मर्षि म्हणून ओळखलें जावेंसें वाटत होतें व त्यासाठीं वसिष्ठाची मनधरणी खडतर तपश्चर्येनें तो करीत होता. तो काळ आतां संपला आहे. आतां चव्हाणांसारख्या राजर्षीला ब्रह्मर्षि कोणी चुकून म्हटलें तर हळुवार जागीं चिमटा काढल्यासारखें होतें व शिवी दिल्यासारखें त्यांना वाटतें. खुद्द ब्राह्मणालाहि आपली जात लपविण्याची जरूरी वाटत असते ब्राह्मण आईबापांच्या पोटीं जन्माला आलों म्हणून मी ब्राह्मण आहें असें मोठ्या काकुळतीस येऊन सार्वजनिक क्षेत्रांतील ब्राह्मण नेत्यांना सांगावें लागतें. कोट व सदरा वर करून माझ्या गळ्यांत जानवें नाहीं तें पहा, टोपी उचलून डोक्यावर शेंडी नाहीं ती पहा, असे पुरावे द्यावे लागतात. ब्राह्मणासारखे बोलतां व तुम्ही ब्राह्मणच वाटतां, असें ना. चव्हाण यांना स्तुतीसाठीं म्हणून सांगण्यांत आलें त्यांतहि एक प्रकारचा अहंभाव व ब्राह्मणी श्रेष्ठत्वाचा दर्प कांहींसा होताच. उच्चतम विचार फक्त ब्राह्मणच बोलून दाखवितो, तशी व उच्च उदार विचारसरणी हें ब्राह्मणाचें वैशिष्ट्य आहे असें म्हणण्यांत इतर जातीजमातींचा एक प्रकारचा अधिक्षेप होताच. ना. चव्हाण हे स्वतःला

कोणत्याहि जातीचे म्हणवत नसतील पण इतर जातींचा कळत न कळत झालेला अधिक्षेप त्यांनीं सहन केला नाहीं आणि ब्राह्मण ही आतां पदवी राहिली नसून एक प्रकारची शिवी झाली आहे हीं वस्तुस्थिति कांहींशी आडपडद्यानें पण सहज लक्षांत येण्यासारख्या स्पष्ट भाषेंत त्यांनीं सुनावली हें एका दृष्टीनें योग्यच झालें.

ना. चव्हाण यांनीं ब्राह्मण पदवी नाकारतांना म्हटल्याप्रमाणें ते माणूस आहेत व माणुसकी ही त्यांची एकच जात आहे. आरंभीं सर्वजण माणसेंच होतीं व माणूस ही एकच जात व धर्म किंवा संप्रदाय होता. पण समाजाचा अभ्युदय साधण्यासाठीं माणसांचे गुणकर्मविभाग पडले, असें उपनिषदांत वर्णन आहे. आचारविचारांचें वैशिष्टय असलेल्यांची निराळी ब्राह्मण जात व्यवसायाप्रमाणें पडली व समाज तिला श्रेष्ठ मानूं लागला. समाजाची तशी मान्यता होती तोंपर्यंत ठीक होतें. पण नंतर ब्राह्मणच आपलें निराळेंपण टिकविण्यासाठीं धडपड करूं लागले. त्यासाठीं सोवळेंओवळें आलें, विद्येची मक्तेदारी आली आणि कर्मकांड मागें लागलें. सकाळीं उठल्यावर किती चुळा भरून मुखप्रक्षालन करावें व रात्रीं कोणत्या कुशीवर निजावें येथपर्यंत निराळें कर्मकांड निर्माण झालें. परिणामीं ब्राह्मण इतर माणसांपासून अलग झाले व जवळजवळ वाळींत पडल्यासारखी समाजांत त्यांची स्थिति झाली.

या कूपमंडूक अवस्थेंतच ब्राह्मणांना जीवनाचें सार्थक वाटूं लागलें व कर्मठपणाचा इतका अतिरेक झाला कीं क्रियाकर्मांतरांत त्यांनीं आपली विद्या गमावली व समाजोपयोगी कर्तृत्वासहि तिलांजलि दिली. अग्रभागीं वेद म्हणजे विद्वत्ता आणि पाठीशीं सशर धनु म्हणजे पराक्रम व कर्तृत्व ही स्थिति नाहींशी झाली, आणि अहंभावी परान्नपुष्ट जात म्हणून ब्राह्मण ओळखले जाऊं लागले. पण तेवढ्यावरच सावध न होतां या जातीनें आपल्या उपजीविकेचें साधन जी पळीपंचपात्री ती टिकवून धरण्यासाठीं आटापिटा केला. यथाकाल धार्मिक कर्मकांडच मागें पडत जाऊन पळीपंचपात्रीचें उपजीविकेचें सामर्थ्य ओसरत चाललें. नंतर ब्राह्मणांच्या पळीपंचपात्रीची लेखणी व दौत झाली. विद्वत्ता संपली, आचार-विचारांची उच्चता सोवळ्याओवळ्याच्या कर्मकांडांत लोपली; आणि ब्राह्मण देवता पाणी भरण्याच्या, स्वयंपाक करण्याच्या व धोतरें बडविण्याच्या कामाला लागली. महाराष्ट्रांत पेशवाईनें ब्राह्मण जात कांहीं काळ सावरून धरली पण महाराष्ट्राबाहेर आजहि देवता म्हणून संबोधला जाणारा ब्राह्मण स्वयंपाकघर, देवघरांतच कष्ट उपसतांना दिसतो. महाराष्ट्रांत व कांहींशी दक्षिण भारतांत ब्राह्मणाची मक्तेदारी अंशरूपानें टिकली व त्यांतूनच ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाचा स्फोट झाला. इंग्रजी सत्तेनें सुरुवातीच्या काळांत पारशी मारवाड्यांना व्यापारधंद्यांत

भागीदारी दिली आणि ब्राह्मणांना कारकुनी बहाल केली. दर्भ व पळी यांची जागा लेखणीनें घेतली. पण समाज जसजसा विकसित होऊं लागला तसतशी हीहि मक्तेदारी टिकली नाहीं. आतां नोकरी चाकरी देतांना जात विचारतात आणि ब्राह्मण म्हटलें कीं, तो बाजूला फेकला जातो. दर्भ व पळीपंचपात्री गेली, विद्वत्ता उरली नाहीं, आचारविचारांची श्रेष्ठताहि रहिली नाहीं, मग त्यांचा मान तरी कोठून राहाणार? आणि आतां पांढऱ्यावर काळें करण्याची कारकुनीहि संपली आहे. इतके दिवस समाजापासून अलिप्त व एकाकी राहिलेला ब्राह्मण इतर समाजाशीं एकनिष्ठ राहून सामाजिक कर्तबगारीशीं समरस होत नाहीं, स्वतःचें असें व्यावसायिक वैशिष्ट्यहि राहिलेलें नाहीं. कान गेले व भोकें शिल्लक राहिलीं. अशा स्थितींत कानाची भोकें चाचपडत व पूर्वार्जित पुण्याईचीं कौतुकें स्वतःच गात असलेला ब्राह्मण, समाजांत इतका बाजूला पडल्यासारखा झाला आहे कीं, ब्राह्मण ही आतां पदवी राहिलेली नसून शिवी झाली आहे. ब्राह्मण असणें सामाजिक भूषण नाहीं तर दूषणच ठरूं पहात आहे.

पण एवढ्यानेंच ब्राह्मणांची कमकहाणी संपत नाहीं. जुन्या आठवणी बुजत नाहींत, आणि गतवैभव व प्रतिष्ठा गेल्याचें शल्य ब्राह्मणांना सतत बेचैन करीत असतें. अशा बेचैनींतून व असंतोषांतून पुष्कळदां महत्त्वाकांक्षा पेटते व पराक्रमांना प्रेरणा मिळते. उलटपक्षीं शल्य सतत बेचैन करीत राहिलें व पराक्रमकर्तृत्व संपलेलें असलें तर एक प्रकारची नतद्रष्ट प्रवृत्ति बळावून कांहींच चांगलें दिसेनासें होतें व चांगल्या उपक्रमांत व कार्यांत समरसहि होववत नाहीं. ज्याला करंटेपणा म्हणतात तो यापेक्षां निराळा नसतो. स्वतःच्या हातून कांहीं होत नाहीं व दुसऱ्याच्या हातून कांहीं झालेलें पहावत नाहीं अशी 'मूल होईना व सवत साहीना' अशी नतद्रष्ट करंटी प्रवृत्ति हा स्थायीभाव झाला कीं, व्यक्तीचें, समाजाचें किंवा समूहाचें डोकें पुन्हा वर निघणें कठीण होऊन बसतें. ब्राह्मणांच्या ठिकाणीं आज असा करंटेपणा व नतद्रष्टपणा संचारला आहे. महात्माजींच्या स्वातंत्र्याच्या चळवळीपासून ब्राह्मणवर्ग आपलें नेतृत्व संपल्याच्या रोषामुळें अलिप्त राहिला. इतकेंच नव्हे तर जितके कांटे पेरतां येतील तितके पेरण्यांत या नतद्रष्ट वृत्तीनें धन्यता मानली. स्वातंत्र्य आलें त्याचेंहि उत्स्फूर्त स्वागत न करतां 'हें कसलें स्वातंत्र्य' म्हणत करंट्या वृत्तीनें ब्राह्मणी नाकें मुरडलीं विकासयोजना सुरू आहेत, नव्याजुन्या विचारांची रस्सीखेच व चुरस सुरू आहे. पण त्यांतहि ब्राह्मणवर्गाला रस असा नाहीं, किंवा त्यांत भागीदार होऊन एकात्म्य पावण्याची भक्तिभावना नाहीं.

लेखणीची सेवा करतांना 'नतद्रष्ट' व्हावें लागतें व स्वहिताची दूरदृष्टीहि नाहींशी होऊन नाकाखालचेंच तेवढें माणूस पाहूं लागतो. लेखणी हातांतून गेली

तरी नतद्रष्टपणा व करंटेपणा सुटत नाहीं, असाच अनुभव जगु ब्राह्मणी आचारविचारांचा येत आहे. अशा स्थितींत ब्राह्मण म्हणविले जाण्यांत स्वतःची ती स्तुति न वाटतां तो ना. चव्हाणांना शिवी दिली गेल्यासारखें वाटावें व सापविंचू अंगावर पडल्यावर जसा अंग झाडून तो झटकावा त्याप्रमाणें ना. चव्हाणांनीं ब्राह्मण ही पदवी व प्रशस्ती झटकून टाकावी यांत नवल नाहीं. ना. चव्हाणांच्या या सहज उद्गारांत फार मोठा बोध आहे व त्याचें मनन चिंतन ब्राह्मणांनीं जेवढें करावें तेवढें त्यांना तें उद्धारकच ठरेल.

१२-८-६२

राजकीय पक्षांत ताटपाटाचें प्रस्थ

महाराष्ट्राचे मुख्य मंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनीं यंदाचा स्वातंत्र्य दिन औरंगाबाद येथें साजरा केला, आणि त्या प्रसंगीं निरनिराळ्या समारंभांत भाषणें करतांना त्यांनीं मराठवाड्याचें महाराष्ट्र राज्यांतील मानाचें स्थान व तेथें चाललेलें जोराचें विकासकार्य विशद केलें. काँग्रेस कार्यकर्त्यांच्या सभेंत भाषण करतांना त्यांनीं पक्षीय व राष्ट्रीय एकोपा टिकविण्याची नितांत आवश्यकता प्रतिपादन केली. मराठवाडा व विदर्भ दुसऱ्या राज्यांतून महाराष्ट्रांत दाखल झालेले आहेत, आणि नव्यानें घरीं आलेली लक्ष्मी ज्याप्रमाणें रुळण्यास व नव्या घराशीं एकरूप होण्यास वेळ लगतो तशी कांहींशी स्थिति विदर्भ-मराठवाड्यांत अद्याप कमीअधिक प्रमाणांत असावी हें एका दृष्टीनें स्वाभाविक आहे. आत्मीयता ही कोणालाहि लादतां येत नाहीं आणि ती निर्माण व्हावी म्हणून होतहि नसते. विदर्भ-मराठवाड्यांत एक प्रकरचा दुरावा अद्याप आहे. तो यथाकाल दैनंदिन अनुभवानेंच दूर होईल. विदर्भानें महाराष्ट्र राज्यांत राहण्याविरुद्ध चळवळ केली, मराठवाड्यांत तशी उठावणी झाली नसली तरी आपण महाराष्ट्र राज्यांत मागसं व उपेक्षित अहोंत ही भावना तेथें प्रखर आहे. मध्यप्रदेशांत विदर्भ किंवा हैद्राबाद राज्यांत मराठवाडा यांचें विशेष कौतुक होत होतें अशांतला भाग नाहीं. पण त्या राज्यांत उपेक्षा व अनादर व्हावा ही एक अपरिहार्य घटना म्हणून मानली जात

होती व स्वीकारली जात होती. पण आतां आपल्या हक्काच्या महाराष्ट्र राज्यांतहि अपेक्षित विकास होत नाहीं व मान राहात नाहीं हो भावना प्रक्षोभक ठरावी यांत नवल नाहीं.

अशी भावना म्हणजे एक प्रकारचा प्राथमिक आडपडदा असतो. जबाबदार कर्त्या माणसांनीं प्रत्यक्ष कृतीनें तो पडदा झटकून टाकावयाचा असतो आणि हक्क व जबाबदारीचा वांटा न मागतांना देऊन त्यांच्यामध्यें समरसता निर्माण करावयाची असते. ना. चव्हाण यांनीं मराठवाड्यांतील मुक्कामांत हीच कामगिरी पार पाडण्यावर कटाक्ष ठेवला होता असें दिसतें. मराठवाडा म्हणजे कोंड्यावर घेतलेला प्रदेश नव्हे. त्याचा विकास व्हावा म्हणून काय केलें जात आहे याकडेहि मराठवाड्यानें लक्ष दिलें पाहिजे अर्थात् महाराष्ट्रांत आल्यामुळें मराठवाड्याची सुवर्णभूमि व्हावी अशी किमया महाराष्ट्राजवळ नाहीं. पण मराठवाड्याच्या विकासाकरितां जें कांहीं चाललें आहे तिकडे लक्ष देऊन कौटुंबिक समरसता मराठवाड्यानें स्वतःच्या ठिकाणीं बाणविली पाहीजे व त्याचबरोबर कमी पडत असेल व अत्यावश्यक असेल तें हक्कानें उपलब्ध करून घेतलें पाहिजे. ना. चव्हाण यांनीं औरंगाबाद येथें सांगितल्याप्रमाणें जें काम मराठवाड्यांत होत आहे तिकडे काणाडोळा नसावा आणि मागसपणाच्या तथाकथित न्यूनगंडानें पछाडून जाऊन महाराष्ट्र राज्याच्या एकात्म्यावर विरजणहि घातलें जाऊ नय. जें आहे त्याचें महत्त्व वाटूं नये आणि जें नाहीं त्यासाठीं झुरत व कुढत बसावें ही एक स्वाभाविक प्रवृत्ति आहे. स्नेह-सहकार वाढीस लावणें व आपुलकीची ओढ निर्माण करून वाढीला लावणें हाच एकमेव उपाय आहे. ना. चव्हाण यांच्या औरंगाबाद भेटीनें हा कार्यभाग कमीअधिक प्रमाणांत साधला आहे यांत संशय नाहीं.

ना. चव्हाण यांनीं औरंगाबाद भेटींत ज्याप्रमाणें महाराष्ट्र राज्यांत मराठवाडा उपेक्षित नाहीं व अवमानित नाहीं हें कटाक्षानें सांगून दुजाभावाचें निर्मूलन करण्याची संधि साधली त्याचप्रमाणें भारतीय एकात्म्याची ही महति वर्णिली आणि ती साधण्याचा तोडगाहि सांगितला. महाराष्ट्रांत काँग्रेस पक्ष सत्ताधारी आहे आणि लोकांच्या पाठिंब्यामुळें तो बलिष्ठ आहे. असें असतांहि महाराष्ट्र राज्यांत एकच पक्ष सर्वत्र सत्ताधारी, सर्वश्रेष्ठ व सर्वप्रबल असतांना किमान पक्षीं काँग्रेस पक्षांत विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र अशी त्रिधा स्थिति कां असावी? माझें ताट, माझा पाट व मध्या वाटींत सर्व सांडलें पाहिजे अशी आप्पलपोटी वृत्ति काँग्रेस पक्षांत संचरली आहे. त्यामुळें जो तो आपल्या ताट पाट वाटीपुरतें पाहतो व आप्पलपोटेपणाचा धुडगूस सुरू झाला कीं, परस्पर विश्वास व खेळीमेळीचें आपुलकीचें वातावरण निर्माण होणें किंवा टिकून राहाणें जवळजवळ अशक्य होतें.

अशा वृत्तीमुळच फुटीरपणा माजतो, सत्ताधारी पक्षांत एकोपा टिकत नाहीं आणि शिस्तीचा दंडुका वापरून मेंढरांच्या कळपाप्रमाणें पक्षबळ संभाळावें लागतें.

भारतांत अशाच आप्पलपोटचा धरणामुळें काँग्रेस पक्षाला पछाडलें आहे व कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी शोचनीय अवस्था आहे. महाराष्ट्रांत व म्हैसूरमध्यें काँग्रेस पक्षच सत्तारूढ आहे. पण या दोन राज्यांतील मराठी सीमा प्रदेशाचा तंटा न्यायनीतीला धरून सोडविण्याची म्हैसूरची तयारी नाहीं. कृष्णा नदीच्या पाण्याचा वाद इतका माजला कीं, याबाबत साहजिक स्वार्थानें पक्षातीत पातळी गांठली आहे. काँग्रेसच नव्हे तर सर्वत्र पक्षांत पाट, ताट वाटीचें प्रस्थ माजलें आहे. कम्युनिस्ट, प्र. स., हे भारतीय राजकारणांत काँग्रेसचे विरोधी असतील, पण सीमा प्रश्नाबाबत काँग्रेस, प्र. स व कम्युनिस्ट म्हैसुरांत एक होतात आणि पक्षाभिनिवेश विसरून पक्षातीत पातळीवरून भांडणें झुंजण्यांत येतात. सत्ताधारी पक्ष या नात्यानें देशाच्या एकोप्याची व एकात्म्य संभाळण्याची काँग्रेसची जबाबदारी अग्रेसर आहे पण इतर पक्षांवरहि विरोधक या नात्यानें कांहीं जबाबदारी आहे कीं नाहीं? पक्षीय तत्त्वज्ञान व तात्विक भूमिका स्थानिक हिताचे म्हणजेच ताट पाटाचे प्रश्न उपस्थित होतांच कोठें जाते व भांडणें भडकविण्यांत कां येतात? या सर्वांचें कारण एकच आणि तें म्हणजे वैयक्तिक किंवा स्थानिक हिताचे प्रश्न निघाले कीं, सर्व तत्त्वज्ञान व विचारसरणी नष्ट होऊन हितसंबंधी लोक एक होतात. अशा वातवरणांतच तत्त्वशून्य आप्पलपोटी यादवी माजते. ताटपाटाचा हव्यास व ओढ असावी व तो सहजधर्महि म्हणण्यास हरकत नाहीं. पण केवळ तेवढचासाठींच सार्वजनिक जीवन व अभिनिवेश असें स्वरूप आलें कीं, वैयक्तिक स्पर्धा व चुरस सुरू होते आणि स्थानिक हित हें इतकें जबरदस्त ठरतें कीं, त्यापुढें राष्ट्र किंवा पक्ष यांचोहि तमा राहात नाहीं. अर्थात् स्थानिक हितहि जिव्हाळ्याचेंच असतें अशांतला भाग नाहीं. निवडणुकींत यश मिळविण्याच्या स्वार्थानें स्थानिक हिताला प्राधान्य देण्यांत येतें, म्हणजे स्थानिक हित संभाळण्यांत व त्याविषयीं आत्मीयता दाखविण्यांतहि अखेर व्यक्तिगत स्वार्थ व ताटापाटाचा आग्रहच मुख्य असतो.

ताटपाटाचा असा अहंभाव व आग्रह असतो, तेथें राज्यांत किंवा राष्ट्रांत एकात्म्यास थारा राहूं नये हें अपरिहार्य आहे. न्यायनीतीवर आधारलेलें राष्ट्रहित जेथें प्रबल असतें तेथेंच एकोपा संभवतो व असा एकोपा हेंच राष्ट्राचें किंवा राज्याचें शील होऊन बसतें. ज्यानें त्यानें आपल्या पाटताटांना संभाळायचें व त्यासाठींच भांडततंडत व कुंथत बसावयाचें, असें वारें संचरलें कीं कुटुंबाची फाळणी होऊन एका चुलीच्या अनेक चुली होतात व कौटुंबिक एकात्म्याच्या अभावीं व्यक्ति व

कुटुंबें यांचें नुकसान होऊन घराणीं डोकें वर काढूं शकत नाहींत. स्वतःचें ताट, पाट व मानपान सोडून निर्लोभ वृत्तीनें वागणें हा कौटुंबिक बेदिलीवर एकमेव उपाय असतो. त्याचप्रमाणें राज्याच्या किंवा राष्ट्रीय पातळीवरहि वैयक्तिक मानपान व हित यांचा त्याग करण्याची वृत्ति असल्याशिवाय राज्यांत एकोपा वाढूं शकत नाहीं व एकात्म्य हें राष्ट्राचें शील होऊं शकत नाहीं. राष्ट्राला, राज्याला किंवा वैयक्तिक कर्तृत्वाला एकोप्याचें वळण व शिस्त लागावयाची असेल तर त्यासाठीं वैयक्तिक स्वार्थ व अहंमन्यता व त्यांतूनच उद्भवणारी प्रादेशिक संकुचित भावना ही दूर झाली पाहिजे. अशा प्रकारची विचारसरणी औरंगाबादच्या भाषणांत विशद करून ना. चव्हाण यांनीं स्वातंत्र्यदिनीं एक मोठीच कामगिरी बजावलेली आहे यांत संशय नाहीं.

१८-८-६२

प्रत्येक भारतीय खिंडींतील सैनिक

महाराष्ट्र राज्य सरकारी नोकर परिषदेसमोर भाषण करतांना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनीं प्रत्येक भारतीयास व विशेषतः महाराष्ट्राच्या नागरिकास खिंड संभाळणाऱ्या सैनिकाप्रमाणें आपापलें कर्तव्य तत्परतेनें व प्राणपणानें पार पाडण्याचा आदेश दिला आहे. मुख्य मंत्री ना. चव्हाण यांच्या आदेशांत बोलघेवडी वीरश्री व उसनें प्रवाहपतित अवसान नसून त्यांची जीवननिष्ठा या उद्गारांनीं व्यक्त झाली आहे यांत संशय नाहीं. महाराष्ट्राची निर्मिति पं. नेहरूंच्या शुभहस्तें झाली त्यावेळीं पंतप्रधानांना नव्या महाराष्ट्राच्या वतीनें मुख्य मंत्री ना.चव्हाण यांनीं भारताच्या सुखदुःखांशीं महाराष्ट्र समरस आहे व हिमालयावर संकट आलें तर महाराष्ट्राचा सह्याद्रि हिमालयाच्या संरक्षणासाठीं आपल्या छातीचा कोट करील असें अभिवचन दिलें होतें. त्या वेळीं हिमालयास संकटाचे वेध लागलेले असले तरी हिमालयापलीकडून भारताची कसोटी घेणारें अरिष्ट इतक्या अकाळविकाळ स्वरूपांत कोसळेल अशी कल्पना फारशी कोणाला तव्हती. पण तो प्रसंग चीनच्या भारतावरच्या स्वारीनें आतां आ पसरून

भारतापुढें उभा असून, दिलेलें वचन शब्दशः व तत्त्वशः पार पाडणारें राज्य म्हणून महाराष्ट्राकडे साऱ्या भारताचे डोळे लागावेत व महाराष्ट्र राज्याचे प्रमुख म्हणून ना. चव्हाण जें करीत आहेत तिकडे भारतानें आपुलकीनें पहावें हें स्वाभाविकच आहे. महाराष्ट्रापुढें अनेक प्रश्न व समस्या आहेत. इतर राज्यांच्या मानानें महाराष्ट्र नवीन आहे व मानभंग तसेंच मनोभंग महाराष्ट्रानें सोसलेला आहे. पण या सर्व जखमा व व्यथा भारतीय स्वास्थ्याचा व संरक्षणाचा प्रश्न उपस्थित होतांच एका हातानें दाबून धरून महाराष्ट्र केवळ भारताचा व भारतहिताचाच विचार करतो यांत नवल नाहीं. महाराष्ट्राची ती परंपरा व पद्धति आहे. स्वतःपुरता विचार महाराष्ट्रानें पूर्वी कधीं केला नाहीं व महाराष्ट्र आजहि करीत नाहीं ना. चव्हाण यांनीं सांगितल्याप्रमाणें वेतणश्रेणी, रहाणी, प्रादेशिक अभ्युदय, भाषिक एकात्म्य यांसारखे प्रश्न बाजूला सारून महाराष्ट्र आज भारताच्या दृष्टीनें विचार करून भारतासाठीं सर्वस्व पणास लावण्यास सज्ज झाला आहे आणि महाराष्ट्राच्या या बाण्याची, तडफेची पोंच दिल्लीत महाराष्ट्राला मिळाली व मिळत आहे हें स्वाभाविक आहे.

राष्ट्रीय संरक्षण मंडळाची नांवें जाहीर झाली असून या नांवांत महाराष्ट्राचे मुख्य मंत्री ना. चव्हाण हे आहेत याचें मोठे समाधान मराठी माणसाला वाटलें तर त्यांत नवल नाहीं. संकटानें ग्रासलेल्या मुलुखापासून महाराष्ट्र तसें पाहिलें तर दूर आहे. जात्यांत भरडले जाणाऱ्याबाबत सुपांतल्या दाण्यांनीं उदासीनता दाखविली तर तें अनैसर्गिक नव्हे. पण महाराष्ट्राचा तो स्वभावधर्म नव्हे. उलट भारतावरील संकट हें स्वतःवरचें संकट मानून त्यास तोंड देण्याची व सर्वस्व पणाला लावण्याची महाराष्ट्राची परंपरा आहे. छत्रसालावर संकट येतांच व संकटविमोचनाची हांक येतांच पहिला बाजीराव त्याच्या मदतीला धावला. खैबर खिंडीचा कायमचा बंदोबस्त करून वायव्येकडचें संकट कायमचें परतविण्यासाठीं पानिपतचें युद्ध महाराष्ट्रानें दिलें व त्यांत अपरिमित हानि पत्करूनहि खैबर खिंडीचा पुरेपूर बंदोबस्त केला. आज वायव्य सरहद्द भारताला सुरक्षित आहे पण ईशान्य सरहद्दीवरून पिवळें अरिष्ट भारतावर आलें आहे.

वायव्य सरहद्दीचा बंदोबस्त ज्याप्रमाणें इतिहासकाळीं महाराष्ट्रानें सर्वस्वाचा त्याग करून केला त्याचप्रमाणें ईशान्य सरहद्द सीलबंद करण्याची ऐतिहासिक कामगिरी स्वःतकडे आहे अशा भावनेनें चिनी आक्रमणाकडे महाराष्ट्र आज पहात आहे व चव्हाणांच्या रूपानें महाराष्ट्र या कामीं सज्ज झाला आहे. स्वाभाविकच संरक्षणमंत्र्यांची केंद्र मंत्रीमंडळांतील जागा भरून

काढण्याच्या दृष्टीनें ना. चव्हाणांकडे भारत नेत्यांची नजर जावी व त्यांना तशी पृच्छा झाल्याच्या वातम्या पसराव्यात हा महाराष्ट्राच्या क्षात्रधर्माचा व कर्तव्यपरायण त्यागी कर्तृत्वाचाच एक प्रकारें बहुमान आहे. ना. चव्हाण हे राष्ट्रीय संरक्षण मंडळांत घेतले गेले किंवा संरक्षणमंत्र्यांच्या हुद्यासाठीं त्यांना विचारलें गेल्याच्या बातम्या आहेत, यामुळें महाराष्ट्रानें फुशारून जावें अशांतला भाग नाहीं. वक्षीस हें त्याच्याकडे डोळे लावून मिळत नसतें. कर्तृत्व, कर्तव्य व पराक्रम यांचें तें फळ असतें. तें फळ लाभो किंवा न लाभो, आपलें कर्तव्य नेकीनें, निष्ठेनें व शर्थीनें करणें हा महाराष्ट्राचा पिंडधर्म आहे व महाराष्ट्राचे प्रतिनिधि या नात्यानें जी कामगिरी सोंपविली जाईल व जबाबदारी टाकली जाईल ती ना. चव्हाणांकडून अन्य विचार न होतां पार पाडण्यांत कुचराई होणार नाहीं. ना. चव्हाण यांची भारताचे संरक्षणपुरुष म्हणून नियुक्ति होवो किंवा त्यास कमीअधिक वेळ लागो, ज्या जागेवर ते आहेत तेथून ते भारतासाठीं संकट सोसण्यास महाराष्ट्रास एका पायावर खडा करतील यांत संशय नाहीं.

चिनी आक्रमणाचें अरिष्ट भारतावर कोसळलें आहे आणि जसजसा काळ जात आहे तसतसें या अरिष्टाचें अक्राळविक्राळ स्वरूप स्पष्ट होत आहे. जणुं कांहीं भारतास तें खावयास उठत आहे. संकट दिसल्यावर त्याच्या कलाविकला ज्या वेळीं स्पष्ट होतात व लोकांच्या किंवा राष्ट्राच्या जीवनास खग्रास ग्रहण लावतात त्यावेळीं मन भांबावतें, बुद्धि सुन्न होते व कर्तृत्वशक्ति गोठल्यासारखी होते. सुरुवातीचा उत्साह व लढाऊ वृत्ति शिथिल पडूं लागते व अरिष्ट तर मानगुटी पकडल्यासारखें लगट करीत असतें. अरिष्टाच्या निदर्शनानंतर त्या दिव्यांतून पार पडणें हें मुष्किल असतें व त्याच वेळीं एक प्रकारची कसोटी, व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या कर्तबगारीची व चिकाटीची लागत असते. चिनी आक्रमणाचें अरिष्ट भारतावर कोसळून भारताची अंगोपांगें व्यापत आहे व भारतीय जीवनाची उलथापालथ सुरू असून भारताच्या चिकाटीची व धीम्या कर्तृत्वाची सर्वांगीण कसोटी चिनी आक्रमणाचें अरिष्ट घेणार हें उघड दिसत आहे. परदेशी शस्त्रास्त्रांचा ओघ सतत भारताकडे वहात आहे व ही मदत नसून साहाय्य असल्यामुळें शस्त्रास्त्रांच्या सौद्याचा हिशेब आज ना उद्यां भारतास चुकता करावा लागणार आहे.

शस्त्रें आलीं तरी बाकीची सर्व सिद्धता भारतानेंच करावयाची आहे व त्यासाठीं पाण्यासारखा पैसा ओतावा लागणार आहे. म्हणजेच लोकांच्या कर देण्याच्या शक्तीवर अफाट ताण यापुढें पडणार असून, अर्थमंत्री ना. मोरारजी देसाई यांनीं तसा इशारा देऊन ठेवला आहे. व्यापारी कारखानदारांच्या संघटनांनीं

भारतावरच्या संकटकाळाचा नफेबाजीसाठीं उपयोग करण्यांत येणार नाहीं असें अभिवचन दिलें आहे. पण कोणत्या घरांतील कोणता समाजकंटक सध्यांच्या परिस्थितीचा लाभ व्यक्तिगत स्वार्थासाठीं घेण्यास उद्युक्त होईल व दैनंदिन समाजजीवनांत कोणता उत्पात घडवून आणील याचा भरंवसा नाहीं. बाजारांची तर सध्यांच वादळांत सांपडलेल्या नौकेसारखी स्थिति झाली असून, समुद्रांत कोण केव्हां फेकला जाईल याचा भरंवसा राहिलेला नाहीं. वैयक्तिक, सामाजिक व भारतीय जीवन उकळत्या कढईंत जणुं कांहीं वितळत आहे आणि या क्षणीं कसलाहि कचखाऊपणा, अवसानघात, स्वार्थपरायणता कोठेंहि प्रादुर्भूत होऊं देणें म्हणजे अरिष्टास मुक्तद्वार देण्यासारखेंच ठरेल. ना. चव्हाण म्हणतात त्याप्रमाणें प्रत्येकजण कोणत्याहि जागीं, स्थळीं किंवा हुद्यावर असला तरी तो आघाडीवर असल्यासारखाच आहे आणि जणुं कांहीं एखाद्या खिंडीचें रक्षण करण्याची व ती प्राणपणानें लढविण्याची कामगिरी या अरिष्टानें त्याच्यावर टाकली आहे. मग तो सरकारी नोकर असो, लष्करांतील सैनिक असो, कचेरींतील कारकून असो, किंवा कारखाना–दुकान अगर पेढीचा चालक असो. कोणत्याहि अपप्रवृत्तीचा किंवा अवसानघातकी दगलबाजीचा पाडाव त्याला आपल्या स्थानावरून करावयाचा आहे. ही कामगिरी प्रत्येकानें पार पाडली तर आघाडीवरच्या सैनिकाचा पराक्रम व कर्तबगारी त्यानें वजावली असें ठरल्यावांचून राहाणार नाहीं. प्रत्येकाची जागरूकता व निर्लोभ कर्तव्यपरायणता ही कोणत्याहि अरिष्टाशीं झुंजण्याचीं प्रखर व रामबाण साधनें आहेत. या साधनांच्या उपासनेंत कोणत्याहि व्यक्तीनें, समाजानें व राज्यानें कमी पडतां कामा नये व त्यायोगेंच अरिष्टामधून भारत निभावून जाईल. चिनी आक्रमणाच्या अग्निदिव्यांतून तावूनसुलाखून निघालेला भारत जगाला आदर्श व मार्गदर्शक ठरल्यावांचूनहि राहाणार नाहीं. राष्ट्रपुरुषाच्या पदवीला व प्रतिष्ठेला चढूं पहात असलेले ना. चव्हाण यांनीं ताज्या भाषणांत खिंडींतील सैनिकाप्रमाणें लढत राहाण्याचा जो आदेश दिला आहे त्याचें पालन करून, भारतांत परचक्रनिवारणाच्या कामीं महाराष्ट्र अग्रभागीं तळपेल अशी खात्री आहे.

८–११–६२

चिनी झोटिंगाच्या पापाचा घडा भरला

लोकसभेच्या अधिवेशनाच्या प्रथम दिवशीं चीनच्या भारतावरील स्वारीच्या धिःकाराचा व आक्रमकविरोधी भारतीय एकात्म्याचा ठराव मांडतांना पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनीं केलेलें नव्वद मिनिटांचें भाषण केवळ भारताच्याच नव्हे तर जगाच्या लक्षांत दीर्घकाळपर्यंत राहाणारें आहे. लष्करी शक्तीच्या व साम्राज्यवादाच्या कैफांत आंतरराष्ट्रीय न्यायनीतीला पायाखालीं तुडवून उन्मत्त धटिंगणपणाचा कळस गांठणाऱ्या लाल चीनच्या पापांचा या भाषणांत पं नेहरूनीं जसा कांहीं झाडा घेतला आहे. लाल चीनच्या पापांचा घडा भरला आहे. चीनच्या पारिपत्याचा निर्धार भारतानें केला असून चिनी रावणापासून भारताचें, आशियाचें किंबहुना जगाचें रक्षण करण्याचें विश्वकार्य भारत पार पाडीत आहे असा त्यांच्या भाषणाचा मतलब आहे. चीन हा भारताचा शेजारी व शतकानुशतकांचा मित्र आहे. ही मैत्री अखंड व अबाधित राखण्यासाठीं भारतानें संयमाची व शांततेची शिकस्त केली. पण कुत्र्याचें शेपूट नळींत कितीहि घातलें तरी सरळ होऊं नये त्याप्रमाणें भारताच्या मैत्रीच्या सोपस्कारांनीं लाल चीनचा साम्यवाद व लष्करशाही मऊ न पडतां या साम्राज्यवादानें व लष्करी अरेरावीनें भारताच्या उत्तर सरहद्दीवर एखाद्या लांडग्याप्रमाणें झडप घातली आह. चीनची लष्करी शक्ति प्रचंड आहे व आकारमानानें जगांत चीन एवढें दुसरें धूड नाहीं. चीनचा हा राक्षस अंतर्गत यादवीनें व फाटाफुटीनें एक प्रकारें निद्रिस्त होता व मागासपणाच्या गर्तेंत अस्ताव्यस्त लोळत होता हा राक्षस जागा होऊन पायावर उभा राहिला कीं तो जगाला त्रस्त करील अशीं भाकितें यापूर्वीच जगाच्या मुत्सद्यांनीं केलेलीं होतीं. चँग कै शेकनें चीनचें अभुक्त अधिराज्य प्रस्थापित केलें व साम्यवादी विचारसरणीचे माओ त्से तुंग यांनीं चीनला साम्यवादी दीक्षा दिली. या दोनहि कारणांनीं एक प्रकारचा उत्तम अभिनिवेश व उन्मत्त झोटिंगपणा चीनमध्यें संचरला. सर्व देवांना पालथे घालून त्यांच्या पाठीच्या पायऱ्या करून रावण जगज्जेत्याच्या सिंहासनावर चढला. त्याचप्रमाणें आंतरराष्ट्रीय कायदा, नीतिनियम व धर्म यांना पालथे घालून आपल्या शक्तीपुढें त्रैलोक्य चळचळां कापत राहून आपण म्हणूं तें धोरण व बांधूं तें तोरण आज आशियांत व उद्यां जगांत ठरले पाहिजे अशा दिमाखांत चीनचीं पावलें पडूं लागलीं. लांडग्यानें कोंकराचें कातडें पांघरावें त्याप्रमाणें चीननें साम्यवादाचें कातडें पांघरून साम्राज्यवादी व लष्करशाही धोरणानें धुमाकूळ मांडला आहे. आग्नेय आशियांतील चीनच्या लगतचें एक एक राष्ट्र चीननें झोडपून काढून तेथें आपलें सोंवळेंभांडें टाकलें व लष्करी अधिसत्ता प्रस्थापित करण्याचीं

भारतावरच्या संकटकाळाचा नफेबाजीसाठीं उपयोग करण्यांत येणार नाहीं असें अभिवचन दिलें आहे. पण कोणत्या घरांतील कोणता समाजकंटक सध्यांच्या परिस्थितीचा लाभ व्यक्तिगत स्वार्थासाठीं घेण्यास उद्युक्त होईल व दैनंदिन समाजजीवनांत कोणता उत्पात घडवून आणील याचा भरंवसा नाहीं. बाजारांची तर सध्यांच वादळांत सांपडलेल्या नौकेसारखी स्थिति झाली असून, समुद्रांत कोण केव्हां फेकला जाईल याचा भरंवसा राहिलेला नाहीं. वैयक्तिक, सामाजिक व भारतीय जीवन उकळत्या कढईंत जणुं कांहीं वितळत आहे आणि या क्षणीं कसलाहि कचखाऊपणा, अवसानघात, स्वार्थपरायणता कोठेंहि प्रादुर्भूत होऊं देणें म्हणजे अरिष्टास मुक्तद्वार देण्यासारखेंच ठरेल. ना. चव्हाण म्हणतात त्याप्रमाणें प्रत्येकजण कोणत्याहि जागीं, स्थळीं किंवा हुद्यावर असला तरी तो आघाडीवर असल्यासारखाच आहे आणि जणुं कांहीं एखाद्या खिंडीचें रक्षण करण्याची व ती प्राणपणानें लढविण्याची कामगिरी या अरिष्टानें त्याच्यावर टाकली आहे. मग तो सरकारी नोकर असो, लष्करांतील सैनिक असो, कचेरींतील कारकून असो, किंवा कारखाना–दुकान अगर पेढीचा चालक असो. कोणत्याहि अपप्रवृत्तीचा किंवा अवसानघातकी दगलबाजीचा पाडाव त्याला आपल्या स्थानावरून करावयाचा आहे. ही कामगिरी प्रत्येकानें पार पाडली तर आघाडीवरच्या सैनिकाचा पराक्रम व कर्तबगारी त्यानें बजावली असें ठरल्यावांचून राहाणार नाहीं. प्रत्येकाची जागरूकता व निर्लोभ कर्तव्यपरायणता ही कोणत्याहि अरिष्टाशीं झुंजण्याचीं प्रखर व रामबाण साधनें आहेत. या साधनांच्या उपासनेंत कोणत्याहि व्यक्तीनें, समाजानें व राज्यानें कमी पडतां कामा नये व त्यायोगेंच अरिष्टामधून भारत निभावून जाईल. चिनी आक्रमणाच्या अग्निदिव्यांतून तावूनसुलाखून निघालेला भारत जगाला आदर्श व मार्गदर्शक ठरल्यावांचूनहि राहाणार नाहीं. राष्ट्रपुरुषाच्या पदवीला व प्रतिष्ठेला चढूं पहात असलेले ना. चव्हाण यांनीं ताज्या भाषणांत खिंडींतील सैनिकाप्रमाणें लढत राहाण्याचा जो आदेश दिला आहे त्याचें पालन करून, भारतांत परचक्रनिवारणाच्या कामीं महाराष्ट्र अग्रभागीं तळपेल अशी खात्री आहे.

८–११–६२

चिनी झोटिंगाच्या पापाचा घडा भरला

लोकसभेच्या अधिवेशनाच्या प्रथम दिवशीं चीनच्या भारतावरील स्वारीच्या धिःकाराचा व आक्रमकविरोधी भारतीय एकात्म्याचा ठराव मांडतांना पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनीं केलेलें नव्वद मिनिटांचें भाषण केवळ भारताच्याच नव्हे तर जगाच्या लक्षांत दीर्घकाळपर्यंत राहाणारें आहे. लष्करी शक्तीच्या व साम्राज्यवादाच्या कैफांत आंतरराष्ट्रीय न्यायनीतीला पायाखालीं तुडवून उन्मत्त घटिंगणपणाचा कळस गांठणाऱ्या लाल चीनच्या पापांचा या भाषणांत पं नेहरूनीं जसा कांहीं झाडा घेतला आहे. लाल चीनच्या पापांचा घडा भरला आहे. चीनच्या पारिपत्याचा निर्धार भारतानें केला असून चिनी रावणापासून भारताचें, आशियाचें किंबहुना जगाचें रक्षण करण्याचें विश्वकार्य भारत पार पाडीत आहे असा त्यांच्या भाषणाचा मतलब आहे. चीन हा भारताचा शेजारी व शतकानुशतकांचा मित्र आहे. ही मैत्री अखंड व अबाधित राखण्यासाठीं भारतानें संयमाची व शांततेची शिकस्त केली. पण कुत्र्याचें शेपूट नळींत कितीहि घातलें तरी सरळ होऊं नये त्याप्रमाणें भारताच्या मैत्रीच्या सोपस्कारांनीं लाल चीनचा साम्यवाद व लष्करशाही मऊ न पडतां या साम्राज्यवादानें व लष्करी अरेरावीनें भारताच्या उत्तर सरहद्दीवर एखाद्या लांडग्याप्रमाणें झडप घातली आहे. चीनची लष्करी शक्ति प्रचंड आहे व आकारमानानें जगांत चीन एवढें दुसरें धूड नाहीं. चीनचा हा राक्षस अंतर्गत यादवीनें व फाटाफुटीनें एक प्रकारें निद्रिस्त होता व मागासपणाच्या गर्तेंत अस्ताव्यस्त लोळत होता हा राक्षस जागा होऊन पायावर उभा राहिला कीं तो जगाला त्रस्त करील अशीं भाकितें यापूर्वीच जगाच्या मुत्सद्यांनीं केलेलीं होतीं. चँग कै शेकनें चीनचें अभुक्त अधिराज्य प्रस्थापित केलें व साम्यवादी विचारसरणीचे माओ त्से तुंग यांनीं चीनला साम्यवादी दीक्षा दिली. या दोनहि कारणांनीं एक प्रकारचा उत्तम अभिनिवेश व उन्मत्त झोटिंगपणा चीनमध्यें संचरला. सर्व देवांना पालथे घालून त्यांच्या पाठीच्या पायऱ्या करून रावण जगज्जेत्याच्या सिंहासनावर चढला. त्याचप्रमाणें आंतरराष्ट्रीय कायदा, नीतिनियम व धर्म यांना पालथे घालून आपल्या शक्तीपुढें त्रैलोक्य चळचळां कापत राहून आपण म्हणूं तें धोरण व बांधूं तें तोरण आज आशियांत व उद्यां जगांत ठरले पाहिजे अशा दिमाखांत चीनचीं पावलें पडूं लागलीं. लांडग्यानें कोंकराचें कातडें पांघरावें त्याप्रमाणें चीननें साम्यवादाचें कातडें पांघरून साम्राज्यवादी व लष्करशाही धोरणानें धुमाकूळ मांडला आहे. आग्नेय आशियांतील चीनच्या लगतचें एक एक राष्ट्र चीननें झोडपून काढून तेथें आपलें सोंवळेभांडें टाकलें व लष्करी अधिसत्ता प्रस्थापित करण्याचीं

शिकस्त केली. हीं आग्नेय आशियाई राष्ट्रें पाश्चात्य लोकशाही राष्ट्रांच्या आश्रयाखालील त्यांच्या गटांत सामील असलेलीं व पाश्चात्य राष्ट्रांच्या संकेतानुसार चालणारीं असल्यामुळें पुढें मागें या राष्ट्रांच्या करवीं चीनवर गंडांतर येईल असें आत्मसमर्थन चीनला करतां येण्यासारखें होतें. पण भारत कोणत्याहि लष्करी गटांत सामील नाहीं. कोणत्याहि राष्ट्राच्या संकेतानुरूप व इशाऱ्यानुरूप वागणारा नाहीं आणि तटस्थेचें व्रत कसोशीनें पाळीत असतांना नवोदित साम्राज्यवादी चीनचा पाठपुरावाच भारतानें केला.

चीन–भारताच्या सरहद्दी ह्या इतिहास व परंपरेनें सिद्ध, वहिवाट व राज्यकारभारानें प्रस्थापित व चीनला कोणत्याहि प्रकारचा धोका न देणाऱ्या अशा आहेत. असें असतांनाहि चीननें भारताकडे वक्रदृष्टि वळविली व सरहद्दीचें भांडण उकरून काढलें दोन शेजारी राष्ट्रांमधून विस्तव जात नसतो व सहसा त्यांना परस्परांबद्दल विश्वास न वाटतां एक प्रकारचा सकारण अकारण वैरभाव त्यांच्यामध्यें असतो, या सनातन सिद्धांताला धरून चीननें सरहद्दीचें भांडण उकरून काढलें हें समजण्यासारखें आहे. पण भांडण उकरून काढल्यावर बळी तो कान पिळी हा न्याय पत्करून एकतर्फी दान आपल्या बाजूचें पाडून घेण्यासाठीं चीननें आपली लष्करी बलाची गदा भारतावर उगारून तिचा प्रहार भारतावर केलेला आहे. चीनच्या त्या एकतर्फी, अरेरावी व लष्करी आक्रमणाचा प्रहार भारतावर होतांच पं. नेहरु म्हणतात त्याप्रमाणें भारत आपल्या सुखस्वप्नांतून खडबडून जागा झाला आहे व तनमनधनाचें तसेंच शारीरिक, मानसिक व बौद्धिक बळ एकवटून एकजिनसी कणखरपणानें चीनच्या लष्करशाहीचें व साम्राज्यशाहीचें राक्षसी आव्हान पत्करून चीनसमोर दंड थोपटून उभा ठाकला आहे. आतांपर्यंत आशियांतील कोणत्याहि देशानें जी जोखीम पत्करली नाहीं, किंबहुना चीनच्या धुडाशीं दोन हात करण्याचा प्रसंग येतांच अमेरिकेनेंहि कच खाल्ली ती जोखीम अंगावर घेऊन चीनच्या आव्हानाला प्रतिआव्हान देण्यास भारत खडें झालें आहे. भारताचा सीमा-संकटामुळें कायापालट होऊन भारतानें रुद्र स्वरूप धारण केलें आहे, त्यामुळें भारत जगाच्या कौतुकाचा, सहानुभूतीचा व सक्रिय साहाय्याचा विषय बनला यांत आश्चर्य नाहीं.

पंतप्रधान नेहरु यांनीं लोकसभेंतील चीनबद्दच्या भाषणांत चीनचा बुरखा फाडून काढून चीनची हिडीस व अलीकडच्या इतिहासांत दुसरी तोड नसलेली साम्राज्यवादी ईर्षा व लष्करी धटिंगणशाही यांचें किळसवाणें स्वरूप जगाच्या नजरेस आणलें आहे. साम्राज्यवादी चीनचा धिःकार करणारें लिखाण व भाषणें पाश्चात्य जगांत थोडीं होत नसतात. पण चीनच्या आक्रमणशील अत्याचारी

साम्राज्यवादाचा घाव झेलून भारताच्या पंतप्रधानांनीं चीनच्या पापांचा झाडा घेतलेला असल्यामुळें त्यांच्या चीनवरील आरोपपत्रिकेला विशेष महत्त्व स्वाभाविक प्राप्त झालें आहे. अन्यायाची व अरिष्टाची जाणीव नुसती होऊन भागत नाहीं. अन्याय दिसतो, पटतो व अंगचटीला येऊन सालटें सोलूनहि काढतो पण सर्वनाशाच्या भीतीनें अन्यायाशीं तडजोड करून अन्यायाचे कंगोरे स्वतःला कमींत-कमी कसे कापून काढतील एवढेंच स्वतःपुरतें जो तो पहात असतो. जें माणूस स्वतःपुरतें करीत असतो तेंच समाज किंवा राष्ट्र करीत असतें; व अन्याय खपवून घेऊन अन्यायाच्या आहारीं जात असतें. हें कातडीबचाव धोरण पत्करणें सोपें जावें म्हणून अन्यायी मनुष्य किंवा राष्ट्र तडजोडीचें व वाटाघाटीचें आमंत्रण नेहमींच करीत असतें. भारतासमोरहि वाटाघाटीचें आमंत्रण टाकून चीननें असल्या फसवेगिरीचा डाव टाकला. पण भारताची आतांपर्यंतची भूमिका, वृत्ति, परंपरा व संस्कार असे आहेत कीं भारत कोणत्याहि लोभानें किंवा चामडी बचावण्याच्या मोहानें अन्याय सहन करू शकत नाहीं. अन्यायाच्या निवारणार्थ भारतानें ब्रिटिश सत्तेशीं झुंज घेतली, इतिहासकाळामध्ये खान व शहा यांचेहि अन्याय भारतानें निमूटपणें पत्करले नाहींत. याच परंपरेला जागून भारतानें चीनचें आव्हान पत्करलें आहे व अन्यायी साम्राज्यशाही व लष्करशाहीच्या साम्यवादी अवतारास तोंड देण्यासाठीं एकजुटीनें व कणखरपणानें भारत दंड थोपटून उभा आहे. चीनची लष्करी शक्ति अमर्याद आहे, साम्यवादी जगाचा पाठिंबा चीनला आहे व साम्राज्यशील आक्रमण वृत्तीनें चीनचे दांत शिवशिवत आहेत. चीनशीं झुंज म्हणजे उघड्या डोळ्यांनीं महान् संकट व कदाचित् आत्मलोप पत्करण्यासारखें आहे हें पं. नेहरु व भारत जाणत नाहींत असांतला भाग नाहीं. पण अन्यायाशीं झुंज देण्याची भारताची जन्मजात वीरवृत्ति उसळून आली आहे. कोणत्याहि दुष्परिणामाची व प्रसंगीं आत्मलोपाचीहि क्षिति न बाळगतां भारतपुरुष चीनच्या साम्राज्यशाही व लष्करशाही धटिंगणपणासमोर प्राणपणानें उभा झाला आहे.

प. नेहरूंनीं चीनशीं जीवनप्रपंचाच्या निर्धारानें अखेरपर्यंत लढा देण्याचा भारतपुरुषाचा कृतान्तनिश्चय लोकसभेपुढील भाषणांत जगजाहीर केला आहे. या विश्वासाला सरहद्दीच्या आघाडीवर झुंज घेणारें भारतीय जवानांचें शौर्य, पाश्चिमात्य राष्ट्रांकडून सतत येणारीं अद्यावत् शस्त्रास्त्रें व भारताच्या कोनाकोपऱ्यांतून चीन-प्रतिकाराचा अनेकविध प्रकारांनीं प्रकट होत असलेला निर्धार यामुळें अपरंपार बळ आलेलें आहे. स्वाभाविकच पं. नेहरूंनीं सर्व जवानांचें, भारतांतून व्यक्त होणाऱ्या उत्कटतेचें व शस्त्रास्त्रांच्या रूपानें भारतास मिळत असलेल्या जागतिक सक्रिय सहानुभूतीचें व साहाय्याचें मनःपूर्वक व उत्साहानें

शिकस्त केली. हीं आग्नेय आशियाई राष्ट्रें पाश्चात्य लोकशाही राष्ट्रांच्या आश्रयाखालील त्यांच्या गटांत सामील असलेलीं व पाश्चात्य राष्ट्रांच्या संकेतानुसार चालणारीं असल्यामुळें पुढें मागें या राष्ट्रांच्या करवीं चीनवर गंडांतर येईल असें आत्मसमर्थन चीनला करतां येण्यासारखें होतें. पण भारत कोणत्याहि लष्करी गटांत सामील नाहीं. कोणत्याहि राष्ट्राच्या संकेतानुरूप व इशाऱ्यानुरूप वागणारा नाहीं आणि तटस्थेचें व्रत कसोशीनें पाळीत असतांना नवोदित साम्राज्यवादी चीनचा पाठपुरावाच भारतानें केला.

चीन–भारताच्या सरहद्दी ह्या इतिहास व परंपरेनें सिद्ध, वहिवाट व राज्यकारभारानें प्रस्थापित व चीनला कोणत्याहि प्रकारचा धोका न देणाऱ्या अशा आहेत. असें असतांनाहि चीननें भारताकडे वक्रदृष्टि वळविली व सरहद्दीचें भांडण उकरून काढलें दोन शेजारी राष्ट्रांमधून विस्तव जात नसतो व सहसा त्यांना परस्परांवद्दल विश्वास न वाटतां एक प्रकारचा सकारण अकारण वैरभाव त्यांच्यामध्यें असतो, या सनातन सिद्धांताला धरून चीननें सरहद्दीचें भांडण उकरून काढलें हें समजण्यासारखें आहे. पण भांडण उकरून काढल्यावर बळी तो कान पिळी हा न्याय पत्करून एकतर्फी दान आपल्या बाजूचें पाडून घेण्यासाठीं चीननें आपली लष्करी बलाची गदा भारतावर उगारून तिचा प्रहार भारतावर केलेला आहे. चीनच्या त्या एकतर्फी, अरेरावी व लष्करी आक्रमणाचा प्रहार भारतावर होतांच पं. नेहरु म्हणतात त्याप्रमाणें भारत आपल्या सुखस्वप्नांतून खडबडून जागा झाला आहे व तनमनधनाचें तसेंच शारीरिक, मानसिक व बौद्धिक बळ एकवटून एकजिनसी कणखरपणानें चीनच्या लष्करशाहीचें व साम्राज्यशाहीचें राक्षसी आव्हान पत्करून चीनसमोर दंड थोपटून उभा ठाकला आहे. आतांपर्यंत आशियांतील कोणत्याहि देशानें जी जोखीम पत्करली नाहीं, किंबहुना चीनच्या धुडाशीं दोन हात करण्याचा प्रसंग येतांच अमेरिकेनेंहि कच खाल्ली ती जोखीम अंगावर घेऊन चीनच्या आव्हानाला प्रतिआव्हान देण्यास भारत खडें झालें आहे. भारताचा सीमा-संकटामुळें कायापालट होऊन भारतानें रुद्र स्वरूप धारण केलें आहे, त्यामुळें भारत जगाच्या कौतुकाचा, सहानुभूतीचा व सक्रिय साहाय्याचा विषय बनला यांत आश्चर्य नाहीं.

पंतप्रधान नेहरु यांनीं लोकसभेंतील चीनवद्दच्या भाषणांत चीनचा बुरखा फाडून काढून चीनची हिडीस व अलीकडच्या इतिहासांत दुसरी तोड नसलेली साम्राज्यवादी ईर्षा व लष्करी धटिंगणशाही यांचें किळसवाणें स्वरूप जगाच्या नजरेस आणलें आहे. साम्राज्यवादी चीनचा धिःकार करणारें लिखाण व भाषणें पाश्चात्य जगांत थोडीं होत नसतात. पण चीनच्या आक्रमणशील अत्याचारी

साम्राज्यवादाचा घाव झेलून भारताच्या पंतप्रधानांनीं चीनच्या पापांचा झाडा घेतलेला असल्यामुळें त्यांच्या चीनवरील आरोपपत्रिकेला विशेष महत्त्व स्वाभाविक प्राप्त झालें आहे. अन्यायाची व अरिष्टाची जाणीव नुसती होऊन भागत नाहीं. अन्याय दिसतो, पटतो व अंगचटीला येऊन सालटें सोलूनहि काढतो पण सर्वनाशाच्या भीतीनें अन्यायाशीं तडजोड करून अन्यायाचे कंगोरे स्वतःला कमींत-कमी कसे कापून काढतील एवढेंच स्वतःपुरतें जो तो पहात असतो. जें माणूस स्वतःपुरतें करीत असतो तेंच समाज किंवा राष्ट्र करीत असतें; व अन्याय खपवून घेऊन अन्यायाच्या आहारीं जात असतें. हें कातडीबचाऊ धोरण पत्करणें सोपें जावें म्हणून अन्यायी मनुष्य किंवा राष्ट्र तडजोडीचें व वाटाघाटीचें आमंत्रण नेहमींच करीत असतें. भारतासमोरहि वाटाघाटीचें आमंत्रण टाकून चीननें असल्या फसवेगिरीचा डाव टाकला. पण भारताची आतांपर्यंतची भूमिका, वृत्ति, परंपरा व संस्कार असे आहेत कीं भारत कोणत्याहि लोभानें किंवा चामडी बचावण्याच्या मोहानें अन्याय सहन करू शकत नाहीं. अन्यायाच्या निवारणार्थ भारतानें ब्रिटिश सत्तेशीं झुंज घेतली, इतिहासकाळामध्ये खान व शहा यांचेहि अन्याय भारतानें निमूटपणें पत्करले नाहींत. याच परंपरेला जागून भारतानें चीनचें आव्हान पत्करलें आहे व अन्यायी साम्राज्यशाही व लष्करशाहीच्या साम्यवादी अवतारास तोंड देण्यासाठीं एकजुटीनें व कणखरपणानें भारत दंड थोपटून उभा आहे. चीनची लष्करी शक्ति अमर्याद आहे, साम्यवादी जगाचा पाठिंबा चीनला आहे व साम्राज्यशील आक्रमण वृत्तीनें चीनचे दांत शिवशिवत आहेत. चीनशीं झुंज म्हणजे उघड्या डोळ्यांनीं महान् संकट व कदाचित् आत्मलोप पत्करण्यासारखें आहे हें पं. नेहरु व भारत जाणत नाहींत अशांतला भाग नाहीं. पण अन्यायाशीं झुंज देण्याची भारताची जन्मजात वीरवृत्ति उसळून आली आहे. कोणत्याहि दुष्परिणामाची व प्रसंगीं आत्मलोपाचीहि क्षिति न बाळगतां भारतपुरुष चीनच्या साम्राज्यशाही व लष्करशाही धटिंगणपणासमोर प्राणपणानें उभा झाला आहे.

प. नेहरूंनीं चीनशीं जीवनमरणाच्या निर्धारानें अखेरपर्यंत लढा देण्याचा भारतपुरुषाचा कृतान्तनिश्चय लोकसभेपुढील भाषणांत जगजाहीर केला आहे. या विश्वासाला सरहद्दीच्या आघाडीवर झुंज घेणारें भारतीय जवानांचें शौर्य, पाश्चिमात्य राष्ट्रांकडून सतत येणारीं अद्यावत् शस्त्रास्त्रें व भारताच्या कोना-कोपऱ्यांतून चीन-प्रतिकाराचा अनेकविध प्रकारांनीं प्रकट होत असलेला निर्धार यामुळें अपरंपार बळ आलेलें आहे. स्वाभाविकच पं. नेहरूंनीं सर्व जवानांचें, भारतांतून व्यक्त होणाऱ्या उत्कटतेचें व शस्त्रास्त्रांच्या रूपानें भारतास मिळत असलेल्या जागतिक सक्रिय सहानुभूतीचें व साहाय्याचें मनःपूर्वक व उत्साहानें

स्वागत केलें आहे. भारताच्या शक्तीचीं हीं अखूट कोठारें व केंद्रस्थानें आहेत. त्याच बळावर चीनशीं झुंजतांना येणारी प्रत्येक उणीव व न्यून भरून निघून, चीनबरोबरच्या प्राणपणाच्या लढाईत भारत अखेर यशस्वी होईल व जगावरचें लाल संकट टाळल्याचें श्रेय भारतास लाभेल.

१०–११–६२

अविश्वास ठरावाचा भोपळा फुटला

आचार्य कृपलानी यांनीं लोकसभेंत मांडलेला कम्युनिस्टेतर विरोधी पक्षांतर्फेचा ठराव चार दिवसांच्या खडाजंगी चर्चेनंतर मतदानास पडून प्रचंड बहुमतानें नापास झाला यांत अनपेक्षित कांहीं नव्हतें. चर्चा खुसखुशीत व रंगदार झाली व उभय पक्षांच्या रथीमहारथींनीं एकमेकांना घायाळ करण्यांत कसलीहि कुचराई केली नाहीं. आ. कृपलानी, स्वतंत्र पक्षाचे मसानी, समाजवादी डॉ. लोहिया यांचीं भाषणें सभागृहांत दणाणलीं. डॉ. लोहिया यांचें लोकसभेंतील या ठरावावरचें पहिलें भाषण इतकें वक्तृत्वपूर्ण व धारदार झालें कीं, त्याबद्दल विरोधी नेत्यांनीं त्यांचें अष्टांग अभिनंदन केलें. तीन निरनिराळ्या पक्षांच्या शिलेदारांची टीका व डॉ. लोहियांच्या वैयक्तिक नेहरु – टीकेनें या चर्चेंत जर कांहीं उणीव राहिली असली तर ती पूर्णपणें भरून काढली. हा ठराव ७२ सदस्यांच्या वतीनें नसून भारतीय जनतेचेंच तो प्रतिनिधित्व करतो, असें पहिल्या भाषणांत आ. कृपलानी यांनीं सांगितलें होतें.

अविश्वास ठरावावरील चर्चेची सर्वसामान्य जनतेची प्रतिक्रिया काय आहे हें रेखीव स्वरूपांत कळण्यास तसा मार्ग नाहीं. पंतप्रधान नेहरु हे हलकट व भेदरट आहेत, असें पं. नेहरूंच्या भाषणांत व्यत्यय आणतांना डॉ. लोहिया यांनीं सांगितलें. ठरावाला पाठिंबा म्हणजे असल्या मुक्ताफळांना व शिवीगाळीला पाठिंबा जर गणला जाणार असेल तर खुद्द ठरावाचे अध्वर्यु आ. कृपलानी यांचा हात ठरावाच्या बाजूनें कितपत उचलला गेला असता कोणास ठाऊक! नेहरु सरकारचे दोष व उणीवा लोकांना असह्य झाल्या आहेत असें मानलें तरी पं. नेहरूंबद्दलची वैयक्तिक

शिवीगाळहि लोकांना परवडत नाहीं, असा अनुभव डॉ. लोहिया यांच्या शिवराळ सभांमध्यें अधून मधून आलेला आहे. लोकांची सर्वसामान्य प्रतिक्रिया बाजूला ठेवली तरी खुद्द लोकसभेचीहि प्रतिक्रिया ठरावास पाठिंबा पाहतां फार अनुकूल दिसली नाहीं. अविश्वास ठरावास दुजोरा ७२ सदस्यांनीं दिला. पण ठरावावर मतें नोंदतांना ठरावास ७२ मतांचेंहि दान पडलें नाहीं. ठरावास अनुकूल मतें ६१ पडलीं. म्हणजे ठरावानें हातोहात ११ मतें गमावलीं. ठरावाला अधिक मतें पडलीं नाहींतच पण असलेल्या मतांपैकीं ११ मतें गळलीं. अर्थात् याचें श्रेय डॉ. लोहिया यांच्या शिवराळपणाला आहे कीं नेहरु यांच्या भव्योदात्त उपसंहाराला किंवा ना. पाटील, श्री. मोरारजीभाई देसाई, श्री. कृष्ण मेनन यांच्या भेदक, मूलगामी व कडव्या सरकारी समर्थनाला आहे हें कळण्यास मार्ग नाहीं. शिवराळ भाषणें तेवढ्यापुरतीं रंगलीं व खुसखुशीत ठरलीं तरी त्यांचा परिणाम कडवट परिणामांच्या रूपानेंच प्रत्ययास येतो. जणुं कांहीं अविश्वास ठरावावर पडलेलीं अकरा उणीं मतें म्हणजे सभागृहानें दिलेली कडवट ढेकरच होय. अनुकूल मतांत भर तर पडली नाहींच, पण अकरा मतें कमी पडलीं. निवडणुकीच्या भाषेंत जवळजवळ डिपॉझिट जप्त होण्यांतलाच हा प्रकार म्हटला पाहिजे. पोटनिवडणुकी तीन विरोधी शिलेदारांनीं जिंकल्या पण तेवढ्या यशावर फुशारून जाऊन त्यांनीं नेहरु सरकारवर तलवार उपसली. पण ती तलवार मोडकी व गंजलेली आढळली व एक प्रकारें अविश्वास ठरावानें डिपॉझिटहि गमावलें.

अविश्वास ठराव नुसता नापास झाला नाहीं तर ठरावाचा भोपळा फुटला व त्याचें कारण पं. नेहरु यांच्या उत्तरादाखलच्या भाषणात आढळण्यासारखें आहे. अविश्वास ठरावाच्या रूपानें सरकारवर जो हल्ला चढविण्यांत आला त्यांत गांभीर्य नव्हतें, उच्च पातळी नव्हती व भरीवपणाहि नव्हता असें पंतप्रधान पं. नेहरूंनीं सांगितलें. आ. कृपलानी यांनीं सरकारच्या धोरणावर व दैनंदिन जीवनावर कडाडून हल्ला चढविला व प्रत्येक क्षेत्रांतील सरकारी अपेश वेशीवर टांगलें. डॉ. लोहिया यानीं कोटयावधि भारतीयांचें उत्पन्न माणशीं रोजचें तीन आणे आहे व धनिक दररोज लक्षावधि रुपये नफा मारीत आहेत असें सांगून आर्थिक दृष्टया भारतीय अवस्था कशी अनुकंपनीय आहे हें दाखवून दिलें. वाजपेयी प्रभृतींनीं देशाचें संरक्षणसामर्थ्य टांचगें पडलें आहे याचें खापर सरकारवर फोडलें. भारतांत आर्थिक अनवस्था आहे, संरक्षणदृष्टया भारत दुबळा असल्याचें चिनी आक्रमणानें दाखवून दिलें आहे, भारताच्या पंचवार्षिक योजना अपेक्षेइतक्या फलदायी झालेल्या नाहींत, लांचलुचपत सरकारी यंत्रणेला व सामान्य नैतिक पातळीला खाऊन राहीली आहे, हे दोष पं नेहरूनींहि अंशतः मान्य केले आहेत.

ब्रिटिश राज्य सध्यांच्या स्वतंत्र राजवटीपेक्षां बरें होतें असे उद्गार लोकांच्या तोंडून निघतात त्या वेळीं आ. कृपलानी यांचें आंतडें पिळवटून निघतें. पक्षातीत भगीरथ प्रयत्न करूनहि सर्वांगीण अवनत स्थिति सुधारली पाहिजे असें आवाहान आचार्य कृपलानी यांनीं आपल्या समारोपाच्या भाषणांत केलें. जणु कांहीं अविश्वास ठरावावर जें रामायण झालें तें राष्ट्रीय भावनेला वाहून 'ब्रह्मार्पणमस्तु' असें म्हणून आ. कृपलानी अशा रीतीनें मोकळे झाले.

सरकारचीं बिगें, व्यंगे व सडलेलीं अगें लोकांसमोर धरणें एवढाच अविश्वास ठरावाचा कार्यभाग असेल तर अविश्वास ठराव सार्थकीं लागला असें म्हणतां येईल. पण अविश्वास ठरावाचें दुसरें जें महत्त्वाचें अग तें या चर्चेंत कोठेंच प्रत्ययास आलें नाहीं. स्वाभाविकच पं. नेहरु म्हणतात त्याप्रमाणे एकूण चर्चा 'सूपभर कोंडा व पसाभर पोहे' अशा प्रकारची ठरल्याशिवाय राहिली नाहीं. सरकार-वरील टीका हा अविश्वास ठरावाचा महत्त्वाचा भाग होय, पण अशी टीका म्हणजे एक प्रकारें पूर्वरंग होय. हा पूर्वरंग झाल्यावर विरोधी पक्षांनीं पर्यायी योजनेचा उत्तररंग सादर करावयाचा असतो. लोकशाही राष्ट्रांत अविश्वास ठरावाच्या चर्चेच्या वेळीं अशा प्रकारचा पर्यायी आराखडा सादर करण्यांत येतो आणि सरकारी ध्येयधोरण व कारभार यांच्यावरोबरच विरोधकांच्या पर्यायी ध्येयधोरणांची व कारभाराची योजना यांचीहि सर्वांगीण चर्चा तुलनात्मक रीतीनें होते. अविश्वास ठराव पास किंवा नापास झाला तरी लोकमत सुबुद्ध राजकीय दृष्टचा जागरूक होतें. सरकारी पक्षाचें सत्तारूढ मंत्रीमंडळ जसें असतें तसेंच विरोधी पक्षाचेंहि पर्यायी मंत्रिमंडळ असतें व सरकार पक्षांइतक्याच जबाबदारीनें, जाणीवेनें व तत्परतेनें हें पर्यायी मंत्रीमंडळ आपलें पर्यायी ध्येयधोरण आंखत असतें. सरकारला विरोध करतांना किंवा अविश्वास ठरावावरील चर्चेच्या प्रसंगीं विरोधी पर्यायी धोरण मांडलें जातें. विरोधासाठीं विरोध हा खऱ्या लोकशाही राष्ट्रांत असूं शकत नाहीं व विरोधाच्या विळ्याभोपळ्याची मोट बांधणें हें लोकशाहीमध्यें शतकृत्यहि मानलें जात नाहीं. सरकारी धोरणाला व योजनांना पर्यायी असें धोरण व योजना लोकसभेमधील अविश्वास ठरावावरील चर्चेंत मांडल्या गेल्या नाहींत. साहजिकच अविश्वास ठरावाचा शिराळशेट उभा झाला व त्याभोंवती विरोधक हदगा खेळले, पण त्यास पोरखेळाचें स्वरूप येऊन गांभीर्य, उच्च पातळी व भरीवपणाला हा ठराव मुकला यांत संशय नाहीं.

देशांत अठराविश्वें दारिद्र्य व विषमता आहे पण पंडित नेहरूंना शिव्याशाप देऊन तें दूर होणार नाहीं. देश स्वसंरक्षणाच्या बाबतींत दुबळा आहे, पण हें

दौर्बल्य नेहरु सरकारच्या चुकांचा पाढा वाचून दाखवून नाहींसें होण्यासारखें नाहीं. पंचवार्षिक योजना अपेक्षेइतक्या फलद्रूप ठरल्या नाहींत; भारताचें सार्वभौमत्व, अविच्छिन्नत्व व संरक्षणक्षमता यांच्या कसोटीला पंचशील व भारताचें तटस्थतेचें धोरण उतरलें नाहीं; या टीकेला सरकारतर्फे पं. नेहरु, श्री. मोरारजी देसाई, श्री. पाटील, श्री. कृष्ण मेनन यांनीं बचावात्मक उत्तरें दिलीं व त्याच वेळीं विरोधकांचे कोयळेहि उपसले. चर्चा त्या दृष्टीनें रंगदार झाली पण नेहरु व त्यांचें ध्येयधोरण नको तर पर्यायी नेतृत्व, ध्येयधोरण व परिस्थितींत क्रांति घडवून आणणारी योजना कोणती हे विरोधकांना रेखीव स्वरूपांत सांगतां आलें नाहीं. पर्यायी आराखडा समोर नसतांना नुसतें दोषदर्शन, टीका व शिव्यागाळी यांनीं फड जिंकतां येत नाहीं. उलटपक्षीं त्याबद्दल एक प्रकारचा वीट व कळस आल्याशिवाय राहात नाहीं. अविश्वासाच्या ठरावाची अशीच गत लोकसभेंत झाली व वावडी जेवढी उंच उडविण्यांत आली तेवढीच गोते खात आपटून चेंदामेंदा झाला, असेंच ७२ ऐवजीं ६१ मतें ठरावावर शेवटीं पडलीं त्यावरून म्हणावें लागतें. अविश्वासाच्या ठरावाचा भोपळा अशा रीतीनें फुटला याबद्दल खेदखंत वाटणें स्वभाविक असलें तरी विरोधी एकजुटीचें हंगामी व शिराळशेट स्वरूप पहातां तें अपरिहार्यच होतें.

२५-८-६३

विरोधी पक्षांना मोहित्यांचा मार

महाराष्ट्र विधानसभेंत सरकारवर विरोधी पक्षाच्या हातून मांडल्या गेलेल्या अविश्वास ठरावावरील तिसऱ्या दिवसाची चर्चा मंत्री उपमंत्र्यांच्या भाषणांनीं गाजली व गृहखात्याचे उपमंत्री ना. यशवंतराव मोहिते यांनीं विरोधी पक्षांना असे धक्के देऊन गुद्दे चढविले कीं, त्याची आठवण विरोधी पक्षास जन्मभर नाहीं तरी दीर्घकालपर्यंत राहिल्यास त्यांत नवल नाहीं. महाराष्ट्र सरकार-विरुद्ध विधानसभेंत अविश्वासाचा ठराव आला तो महाराष्ट्र सरकारकडून कांहीं विशेष व मुलुखावेगळें पाप घडलें म्हणून नव्हे. प्र. स. पक्षानें आपला पक्ष सावरला जावा म्हणून आपल्या नेतृत्व-कर्तृत्वांत व धोरणांत बदल करून नवी दिशा आंखली व त्यांत केंद्रीय व राज्यसरकारांचे राजिनामे मागणे हा तर दृष्टि

दिपवणारा कार्यक्रम आहे. असे राजीनामे मागण्याचें प्र. स. पक्षाचें खूळ नवें आहे अशांतला भाग नाहीं. किंबहुना हें राजीनामा–चेंडू पुष्कळदां खुद्द प्र. स. पक्षाच्या अंगाशीं येऊन प्र. स. पक्षाचीं सालडीं त्यांत लोंबलेलीं आहेत. फक्त संयुक्त महाराष्ट्र समितींत असतांना प्र. स. पक्षानें सीमा प्रश्न धसाला लावण्यासाठीं म्हणून त्या वेळचे मुंबई राज्याचे मुख्य मंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनीं राजीनामा द्यावा अशी चळवळ केली होती. त्या मागणीच्या परिणामीं सीमा प्रश्नाला धार चढली नाहीं किंवा ना. यशवंतराव चव्हाण यांचा केसहि वांकडा झाला नाहीं. उलटपक्षीं ना. चव्हाण यांच्या भोंवतीं लोकमताचा नवाच कोटकिल्ला उत्पन्न झाला.

चव्हाण राजीनाम्याच्या मागणीचा हा पवित्रा त्या वेळीं प्र. स. पक्ष अंतर्भूत असलेल्या समितीच्या इतका अंगाशीं आला कीं, चव्हाणांचा राजीनामा मागण्यांत चूक झाली अशी समितीचे अध्यक्ष कॉ. डांगे याना त्यावेळीं कबुली द्यावी लागली. सीमा प्रश्नावर विरोधी आमदार खासदारांनीं राजीनामे द्यावेत अशी हालचाल प्र.स. पक्षातर्फे करण्यांत आली त्यावेळीं असाच बोजवारा उडाला होता. राजीनामा मागणीचें ब्रह्मास्त्र, तशीच कुवत व धमक नसेल तर तें सोडणाऱ्यावरच उलटतें व काळवेळ न पाहतां ब्रह्मास्त्र सोडणाऱांचा अश्वत्थामा होतो ! प्र. स. पक्षाजवळ राजीनामा मागण्याइतकें स्वतःचें संख्याबळ नाहीं. त्याचप्रमाणें लोकांत तसें अनुकूल वातावरणहि प्र.स. पक्षीयांनीं उत्पन्न केलेलें नाहीं. स्वाभाविकच राजीनामा ठराव मांडण्यांत प्र. स. पक्ष सर्वत्र आघाडीवर असला तरी अशा ठरावानें शिकें तुटून बोक्याचें मात्र साधतें. लोकसभेंत अशाच प्रकारचा अनुभव आला व त्याचीच पुनरावृत्ति महाराष्ट्र विधानसभेंत झाली. अविश्वास ठरावाचा पुढाकार घेऊन प्र. स. पक्ष कोणाबरोबर सहगमन करीत आहे असा प्रश्न ना. मोहिते यांनीं विधानसभेंत टाकला व या सवालानें त्यांनीं प्र. स. व शे का. पक्षाच्याहि काळजाला हात घातला. ना. मोहिते यांनीं असा मर्मभेदी सवाल टाकावा असा त्यांचा कांहींसा पूर्वार्जित अधिकारहि आहे. कॉंग्रेसप्रवेश करीपर्यंत ज्या कामगार किसानांच्या पक्षाचें नेतृत्व ना. मोहिते करीत होते त्या पक्षाचा जन्म शे. का. पक्षाच्या कुशींत झाला होता व सं. म. समितींत या पक्षाला प्र. स. पक्ष सर्वांत जवळचा होता. एका वेळचे ना. मोहिते यांचे राजकीय दृष्टया आप्त असलेले प्र. स. व शे.का. पक्ष अविश्वास ठरावावर कम्युनिस्टांचे साथी बनले आहेत असें पाहून ना. मोहिते यांचें आंतडें पिळवटल्यासारखें झालें व वाल्मीकीप्रमाणें ते शापवाणी उच्चारण्यास प्रवृत्त झाले, हा त्यांचा एक प्रकारें हक्क व अधिकारच म्हटला पाहिजे. ना. मोहिते हे प्र.स. पक्षाला व शे. का. पक्षाला उद्देशून वाक्प्रहार करीत

होते पण लेकी बोले सुने लागे या न्यायानें मर्मभेद कम्युनिस्टांचा व त्यांच्या सहप्रवाशांचा होत होता व सर्वांत व्यथित व व्याकुळ कम्युनिस्ट व त्यांचे सहप्रवासी झाले होते. ना. मोहिते यांचें भाषण आटोपतांच पाठ चोळीत खालच्या मानेनें कम्युनिस्ट व त्यांचे सहप्रवासी दोन सदस्य सभागृहाबाहेर पडले व काँग्रेसला देण्यांत आलेला 'चालते व्हा' हा आदेश त्यांनीं स्वतःपुरता स्वतःच प्रत्यक्ष कृतींत आणला यावरून ना. मोहिते यांचें प्रत्युत्तर त्यांना कसें झोंबलें हें दिसून येतें.

ना. मोहिते यांनीं अविश्वास ठरावाचें जें पेव फुटलें त्याची जातकुळी व पार्श्वभूमि जी विशद केली ती लक्षांत घेण्यासारखी आहे. प्र. स. पक्षाचा ढासळता डोलारा सावरण्यासाठीं अविश्वास ठरावाचा अद्भुत पराक्रम गाजविण्यास हा पक्ष पुढें आला पण बुडत्याचा पाय खोलांत या न्यायानें हा पक्ष नेमका कम्युनिस्टांच्या राष्ट्रविरोधी जाळ्यांत सांपडला. कम्युनिस्टांतील सभ्यांचे दोनहि गट एका काळीं चीनच्या भारतावरील आक्रमणावर पांघरूण घालण्याची शर्यत जणुं कांहीं खेळत होते. कॉ. डांगे यांच्या राष्ट्रवादी गटाच्या परधार्जिण्या नीतीला फेटाळून प्र स. पक्ष समितीबाहेर पडला पण अविश्वास ठरावाच्या पुरस्कारानें आज हा पक्ष कम्युनिस्टांचा साथीदार बनला आहे, एवढेंच नव्हे तर पाहुण्याच्या हातून साप मारावा त्याप्रमाणें अविश्वास ठरावाची उठावणी करून प्र. स. पक्ष आज कम्युनिस्टांचाच डाव स्वतः खेळत आहे. या ठरावाच्या मागें कामगार प्रश्न किंवा मध्यमवर्गीयांचा उमाळा असा नाहीं. त्याचप्रमाणें जिव्हाळा व कळवळा जर असता तर दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत कामगारांची हड्डी संप मोडून नरम करण्यात कम्युनिस्टांनीं पुढाकार घेतला नसता व ब्रिटिश सत्ताधाऱ्यांशीं सहकार्य केलें नसतें. दुसरें महायुद्ध कम्युनिस्टांच्या लेखी लोकयुद्ध होतें आणि 'चले जाव' चळवळींत अहमदाबादचा गिरण्यांचा संप त्या वेळचे कम्युनिस्ट नेते श्री. निंबकर यांनीं नेस्तनाबूत केला हें विसरतां येण्यासारखें नाहीं. आज त्याच कम्युनिस्टांना, चिनी आक्रमणविरोधी संरक्षक सामर्थ्य वाढविणारी चळवळ ही लोकांची चळवळ वाटत नाहीं. स्वतः पुढाकार घेण्याची धमक नसली तरी इतर पक्षीयांशीं गळेपडूपणा करून कम्युनिस्ट पक्ष संपाची हवा व बेदिलीचें वातावरण निर्माण करूं पहात आहे. ना. मोहिते म्हणतात त्याप्रमाणें कम्युनिस्ट व त्यांचे साथीदार यांना जनतेनें देशद्रोही ठरविलें व प्र. स. व समाजवादी हे तर कम्युनिस्टांचा विटाळ पाळीत होते. पण सरकारकडून आपली मनधरणी व लाड होत नाहींत असें पहातांच लोकजीवनाची घडी उध्वस्त करण्याचें शतकृत्य हे पक्ष साधीत आहेत व त्याकामीं कम्युनिस्टांच्या मगरमिठींत हे विरोधी पक्ष पराकोटीचा आनंद मानीत आहेत. जनतेंत दुःखें आहेत, यातना आहेत, असफल आकांक्षा आहेत

याबद्दल वाद नाहीं. या बाबी हटविण्यांत काँग्रेसला यश आलेलें नाहीं याबद्दलहि दुमत नाहीं. पण कम्युनिस्टांसह विरोधी पक्षांशीं हातमिळवणी केल्यानें जनतेचीं हीं दुःखें व या यातना कमी होतील कीं घडी आणखी बिस्कटून नित्यजीवनहि अधिक कष्टमय होईल; आणि उत्तुंग उत्तर सीमा इंच इंच लढविण्याची हिंमत व धमक राष्ट्रांत निर्माण होईल कीं राष्ट्राचें संरक्षणसामर्थ्य खच्ची होईल हा ना. मोहिते यांचा सवाल जितका मर्मभेदी तितकाच विरोधकांच्या कृष्णकृत्यांचा फडशा पाडणारा आहे.

काँग्रेसचें जड बूड हालवितां येत नाहीं व काँग्रेसला विरोध करतांना कपाळ सडकलें जातें या अनुभवानें प्र. स. व शे. का. पक्ष एक प्रकारें क्रोधाविष्ट आहेत. क्रोध अनावर झाला कीं, गतगोष्टींची विस्मृति होते व स्वतःच कम्युनिस्टांना वाळींत टाकण्याचे किंवा त्यांचा विटाळ मानून दूर सरण्याचे स्वतःचेच ठराव व निर्धार आठवेनासे होतात. प्र. स., शे. का किंवा समाजवादी पक्ष हे क्रोधाविष्ट असल्यामुळे त्यांना स्मृतिविभ्रम झाला आहे व त्यांचा बुद्धिनाश झाला आहे स्वाभाविकच कम्युनिस्टांची साथ पत्करून ते विनाशाच्या मार्गानें चालले आहेत. एखाददुसरा पक्ष किंवा त्याचे नेते यांचें भवितव्य राष्ट्राच्या दृष्टीनें महत्त्वाचें नसेलहि. पण स्वतः पडतांना किंवा विनाशपथावर मार्गक्रमण करतांना दुसऱ्याच्या गळ्यांत मिठी मारून त्यालाहि गुदमरून टाकून खच्ची करण्याचा घातुक प्रकार सुरू होतो त्यावेळीं गतकालच्या अनात्याच्या अधिकारानें व आपुलकीनें सडेतोड प्रांजलपणानें विनाशमार्गानें जाणारांना चार गोष्टी सुनावणें आवश्यक असतें. ही कामगिरी ना. यशवंतराव मोहिते यांनीं बजावली असून वैफल्यवादान ग्रासलेल्या या पक्षांचा पवित्रा कसा घातुक आहे याचीहि छाननी त्यांनीं तळमळीनें केली आहे. त्या दृष्टीनें ना. मोहिते यांचें भाषण जसें विरोधी पक्षांचीं सालडीं लोंबविणारें असल्यामुळें त्यांच्या लक्षांत राहील, त्याचप्रमाणें त्यांतील इशारा लोकहि डोळ्यांआड करणार नाहींत.

१३–९–६३

गांधीवादी पीठाची काँग्रेसमध्यें स्थापना

ओरिसाचे माजी मुख्य मंत्री, मुंबई राज्याचे माजी राज्यपाल व पार्लमेंटमधील काँग्रेस पक्षाचे माजी उपपक्षनेते डॉ. हरेकृष्ण मेहताब यांनीं काँग्रेसमध्यें गांधीवादी पीठ स्थापन झाल्याचें जाहीर केलें आहे आणि काँग्रेसला गांधीवादी बैठक प्राप्त व्हावी अशी त्यामागली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांच्या निवेदनाप्रमाणें पार्लमेंटमधील व विविध राज्यांतील त्यांचे गांधीवादी मित्र यांनीं हा नवा गांधीवादी नवा पंथ स्थापन केलेला आहे. काँग्रेसच्या जीवनांतील आणीबाणीचा काळ सांप्रत सुरू आहे आणि कामराज योजना ही या आणीबाणीच्या काळास तोंड देण्याच्या दृष्टीनें स्वागतार्ह आहे. पण कामराज योजनेला गांधीवादी तत्त्वज्ञानाची बैठक असली म्हणजे ती यशोदायी होईल असा डॉ. मेहताब यांना भरंवसा आहे. कामराज योजना प्रभावी व परिणामकारक होण्यास तिला गांधीवादी तत्त्वज्ञानाची बैठक असली पाहिजे, किंबहुना तशी बैठक जर नसेल तर कामराज योजना निष्फळ ठरेल, इतकेंच नव्हे तर प्रतिकूल प्रतिक्रिया घडवून आणील अशी भीति या नव्या गांधीपीठ स्थापनेच्या मागें असावी असें दिसतें. डॉ. मेहताब यांच्या मतें काँग्रेसला सध्या कोणतेंच निश्चित तत्त्वज्ञान किंवा ठाम धोरण नाहीं. त्यामुळें सुकाणू नसलेल्या गलबताप्रमाणें काँग्रेस कोठें कशी वहावत जाईल याचा भरंवसा नाहीं अशा निश्चिततेच्या अभावीं काँग्रेसमध्यें डाव्याउजव्यांची रस्सीखेच जशी काहीं सुरू आहे. काँग्रेसची ही ओढाताण अशीच चालली तर अंतर्गत यादवीच्या परिणामीं काँग्रेस ही खच्ची झाल्यासारखी होईल किंवा उजव्या डाव्यांचा संघर्ष वाढत जाऊन प्रखर झाला तर काँग्रेसचीं दोन शकले पडल्याशिवाय राहणार नाहींत. काँग्रेसला तात्त्विक भूमिका व धोरण नसण्यापेक्षां साम्यवादाकडे काँग्रेसची झुकांडी गेली तर त्यांत काहीं बिघडत नाहीं. पण काँग्रेसची जडणघडण अशा साम्यवादी झुकांडीला मानवण्यासारखी नसल्यामुळें गांधीवादी तत्त्वज्ञान हेंच काँग्रेसच्या परंपरेस व कर्तृत्वास पोषक आहे. ही तात्त्विक बैठक उपलब्ध करून देण्यासाठीं व काँग्रेसमध्यें वाढत असलेल्या साम्यवादी वळणास एक प्रकारें आळा घालण्यासाठी डॉ. हरेकृष्ण मेहताब यांचा गांधीवादी पंथ पुढें सरसावत आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

गांधीवादी तत्त्वज्ञानाची बैठक सत्तारूढ काँग्रेसच्या राज्यकर्तृत्वास व समाजकल्याणकारी पराक्रमाला कितपत मानवणारी आहे हा अर्थात् महत्त्वाचा

प्रश्न आहे. किंबहुना राज्यारूढ पक्ष या नात्यानें गांधीवादी तत्त्वज्ञानाची बैठक जर काँग्रेसला पत्करावयाची असेल तर काँग्रेसला राज्यसिंहासन तरी सोडावें लागेल किंवा गांधीवादी तत्त्वज्ञानाचाच कायापालट घडवून आणावा लागेल. महात्मा गांधी हयात असतांना अशा प्रकारचा व्यावहारिक फेरफार ते करूं शकत असत. काश्मीरवर पाक सैन्यानें चढाई केली त्यावेळी काश्मीरचा सशस्त्र बचाव करण्यास महात्माजींनीं संमति दिली. एवढेंच नव्हे तर काश्मीरचा बचाव हा प्राप्त परिस्थितींत भारताचा धर्म आहे असें सांगून अनत्याचारी अहिंसेची अडचण राज्यकर्त्यांना येऊं दिली नाहीं. तत्त्व हें शेवटीं व्यवहाराला संभाळणारेंच असावें लागतें व तत्त्वाच्या ओढाताणींत व्यवहाराचा खुर्दा होतां कामा नये, इतकें तारतम्य म. गांधींच्या जवळ होतें व तसें ठरविण्याचा त्यांचा अधिकारहि होता. पण तितका पांचपोंच स्वतःला गांधीवादी म्हणविणाऱ्यांना असतोच असें नाहीं. यामुळें दिल्ली पेकिंग पदयात्रा करणारे असे पढत पंडित गांधीवादी तत्त्वाच्या दृष्टीनें कांहीं साध्य तर करीत नाहींतच, पण स्वतःचें नाक कापून चालताबोलता अपशकून वनण्यास कमी करीत नाहींत.

महात्मा गांधींचे स्वयंसिद्ध वारस असणारे आचार्य विनोबा भावे यांनाहि चिनी आक्रमणाविरुद्ध सशस्त्र प्रतिकार संघटित करण्यास अनमान वाटत नाहीं आणि त्याच वेळीं भूदानाची त्यागपूर्ण बैठक ग्रामीण भारतात उपलब्ध करून देण्यास त्यांस अडचण येत नाहीं. काँग्रेसनें सत्ताग्रहण करण्यास महात्मा गांधींचा विरोध नव्हता, किंबहुना त्यांच्या आशीर्वादानेंच पं. नेहरु पंतप्रधान झाले व राज्यांचे मुख्य मंत्री सत्तारूढ झाले. याचाच अर्थ महात्माजींना दररोजचा राज्यव्यवहार संभाळण्यास जरूर तेवढा तात्त्विक बैठकींत फेरफार मान्य होता. गांधीवादी तत्त्वज्ञान हें शेवटीं जनहितासाठीं व समाजकल्याणासाठीं आहे म्हणजे बहुजनहिताय हेंच खरें मूलभूत तत्त्वज्ञान आहे व तथाकथित गांधीवाद हें त्यासाठी योजावयाचें तंत्र होय असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. व्यवहाराच्या नांवाखाली अनाचार फैलावूं नये व हिंसा अपरिहार्य असली तरी निरपराध्यांच्या रक्ताच्या नद्या वाहविण्याइतकी ती अनावर होऊं नये म्हणून तात्त्विक मर्यादा या आवश्यक असतात. म्हणून राज्यकर्तृत्वाला गांधीवादाच्या व्यापक कां होईना, पण मर्यादा असाव्यात हें यथोचित ठरतें. त्या दृष्टीनें डॉ. हरेकृष्ण मेहताब यांचा गांधीवादी पंथ राजकीय क्षेत्रांत पदार्पण करीत आहे यांत वस्तुतः कांही गैर नाहीं. पण गांधीवादी पंथ किंवा पीठ राजांगणांत जणुं अशा झोकांत शिरत आहे कीं, त्याला डावीकडे काँग्रेसला ओढण्याऱ्या साम्यवादाचें मुंडकें तोडावयाचें आहे. स्वाभाविकच नवा गांधीवादी गट हा डाव्याउजव्यांच्या काँग्रेसमधील यादवींत नवी भर टाकणारा व संघर्ष वाढविणारा, तसेंच या संघर्षास तात्त्विक पोषाख चढविणारा मानला गेल्यास व अनुभवांतीं तो तसा ठरल्यास त्यांत नवल नाहीं.

डॉ. हरेकृष्ण महताब यांचा हा नवा गांधीवादी पंथ काँग्रेसला कितपत तात्त्विक बैठक देईल हें सांगतां येणार नाहीं पण या तत्त्वज्ञानाचा आश्रय करून हा पंथ स्वतःसाठीं बैठक निर्माण करीत आहे असें वाटण्याचा संभव डोळ्याआड करतां येण्यासारखा नाहीं. डॉ. हरेकृष्ण मेहताब हे एका काळचे मान्यवर पण सध्यांचे हतप्रभ नेते आहेत. ओरिसामध्येंच त्यांचें वूड धड नाहीं. ज्या मित्रांवरून डॉ. मेहताब व पटनाईक यांचे वाग्युद्ध जुंपलें होतें ते मित्र ओरिसाचे मुख्य मंत्री झाले आहेत. श्री. कृष्ण मेनन यांचें उच्चाटन व्हावें म्हणून काँग्रेस पक्षाचे उपनेते असलेले डॉ. मेहताब यांनीं पुढाकार घेतला. पण त्याचें प्रायश्चित्त पक्षीय निवडणुकींत डॉ. मेहताब यांना मिळून त्यांचा उपनेता निवडणुकींत पराभव झाला डाव्यांच्या वाटचालींत डॉ. मेहताब जसे कांहीं घायाळ होऊन आडवे झाले आहेत. डाव्यांचीं दोन मोहरीं गारद झालीं पण त्यायोगें डाव्यांनीं जशी कांहीं केशरिया धारण करून चढाई आरंभिली आहे. आणि मोरारजी, पाटील यांनाहि दिल्ली सोडावी लागली आहे. डॉ. मेहताब म्हणतात त्याप्रमाणें काँग्रेस आणीबाणीच्या काळांत वावरत आहे. जेथून दोन रस्ते फुटतात अशा नाक्यावर ती उभी आहे. तिला डाव्या मार्गानें नेणारा साम्यवादी गट सकृद्दर्शनीं अस्तिवांत नसला तरी त्याची छुपी संघटना आहे. समाजवादी व्यासपीठ तर काँग्रेसमध्यें उघडपणें वावरत आहे. या उघडछुप्या पंथांत जे नाहींत त्यांची दैना उडण्याचा रंग आहे. अशी पुरी दैना उडण्यापूर्वी संघटित होऊन शेवटची धडपड करण्यासाठीं जसा कांहीं गांधींच्या नांवानें हा मेहताब गट अस्तित्वांत येत आहे. काँग्रेसला त्यायोगें गांधीवादी बैठक मिळो न मिळो, विस्कळित पूर्वप्रतिष्ठित नेत्यांना या नव्या गांधीवादी व्यासपीठानें एक व्यासपीठ व एकत्र येण्याची जागा मिळेल. जबरदस्त होऊं पाहणाऱ्या डाव्या संघटित गटाशीं झोंबाझोंबी गांधीवादी गटाच्या नावांनें सुरू झाल्यास नव्या गटाची ही परिणति स्वाभाविक ठरेल.

३०-९-६३

काँग्रेस समाजवाद : जयपूरच्या गर्जना

आँ. इं. काँ. कमिटीच्या जयपूर अधिवेशनांत दुसऱ्या दिवशीं वर्किंग कमिटीच्या समाजवादी खडर्यावर सहातास खडाजंगी चर्चा झाली आणि पं. नेहरु, कृष्ण मेनन, केशवदेव मालवीय वगैरे तोफखान्यांनीं भडिमार केला. स्वतंत्र भारतांत स्वातंत्र्यामागोमाग समाजवाद येणें हें अटळ आहे व तितकेंच निकडीचें आहे, भांडवलवादी समाजरचनेचा वारसा भारतांत चालू असून जर भांडवलदारी समाजरचनेचा कायापालट समाजवादी समाजरचनेंत झाला नाहीं तर लोकांचा धीर सुटून अशांततेच्या ऊर्फ हिंस्र मार्गाने समाजवाद आणण्यास लोक प्रवृत्त होतील, असा एक प्रकारचा धाकदपटशा समाजवादी तोफखान्यांच्या गडगडाटांत होता. समाजवादी परिवर्तन अटळ व तांतडीचें असून त्या अभावीं समाजाची उलथापालथ करणारी हिंस्र क्रांति उंबरठ्यावर उभी आहे असें सांगून समाजवादी प्रबंधाचा खर्डा जयपूर बैठकींत मंजूर करून घेण्यांत आला. आतां या खडर्यावर सूचना, उपसूचना मागविण्यांत येऊन काँग्रेसच्या येत्या अधिवेशनांत समाजवादी समाजरचनेची आंखणी व उभारणीचें तंत्र मुकर होणार आहे. म्हणजे जयपूर येथें समाजवादी समाजरचनेचें नमन जसें कांही झालें व त्याप्रीत्यर्थ सहा तासांच्या वादळी चर्चेचें तेल जाळण्यांत आलें.

वास्तविक पाहतां या चर्चेचा टेंभा मिरविण्याची जरूरीहि नव्हती. समाजवादी समाजरचना हा काँग्रेसमधील परवलीचा शब्द असून तो उच्चारल्याशिवाय काँग्रेसमध्यें प्रवेशहि नाहीं व उच्च सत्तासनेंहि नाहींत. जसा देश तसा वेश व जशी घटना तशी गर्जना, या न्यायानें काँग्रेसमधील चिटपांखरूंहि समाजवादाविरुद्ध नाही. महाकाली तोफ असो किंवा यःकश्चित् चिलट असो, त्याचा दणदणाट किंवा गुणगुण समाजवादाच जप करणारीच असते. जयपूरच्या अधिवेशनांत दुसऱ्या दिवशीं समाजवादी समाजरचनेविरूद्ध ब्रहि उच्चारला गेला नाहीं. किंवा व्यावहारिक किंवा तात्त्विक हरकतींचा मुद्दाहि कोणी उपस्थित केला नाहीं. सर्वजण समाजवादाला नंदीप्रमाणें माना डोलावीत होते व हत्तीप्रमाणें झुलत होते. तरीहि प्रत्येक वक्त्यानें समाजवादी गर्जना बेंबीच्या देठापासून केल्या व एक प्रकारें हवेंत हात करून समाजवादाची लढाई जिंकली. समाजवाद हें काँग्रेसचें ध्येयधोरण असल्यामुळें समाजवादाला विरोध कोणाचाच नाहीं. पण त्याचबरोबर पं नेहरु, नंदा व अन्य छोटे बडे वक्ते यांनीं सांगितल्याप्रमाणें

समाजवादी खडर्यांत तांतडीची व तीव्रतेची भावना नाहीं. चाळीस वर्षे झालीं तरी रशियासारख्या समाजवादी देशांत समाजवादाचा अवतार झालेला नाहीं असें सांगून समाजवादी खडर्याचे अध्वर्यु ना. नंदा यांनीं समाजवादी घिसाडघाईविरुद्ध जसा कांहीं अप्रत्यक्ष इशाराच दिला. समाजवादाची घिसाडघाई नको हें खरेंच, पण स्वातंत्र्यानंतरच्या पंधरा वर्षांत संपत्तीचें केंद्रीकरण अपरंपार झालें असून, भांडवलदारी पर्यायी प्रतिसरकार जसें कांहीं चालू आहे असें मेनन, पटनाईक व केशवदेव मालवीय यांनीं कळवळून सांगितलें. तोंडानें समाजवादाचें नांव घेत कळत न कळत जसा कांहीं समाजवादाचें मुंडकें उडविणारा कत्तलखाना काँग्रेस राजवटींत चालू आहे व समाजवादाचे तरफदार नेते सरकारांत लब्धप्रतिष्ठित असतांना ही कत्तल चालू होती. स्वाभाविकच समाजवादी खडर्यावरील चर्चेंत उखाळ्यापाखाळ्या व मर्मभेदी आघातच गाजले व आत्मसमर्थन करतांना सत्तारूढ समाजवादी नेत्यांना पुरेवाट जशी कांहीं झाली. समाजवाद अटळ आहे अशा गर्जना दुमदुमत असतांनाच समाजवाद मागें कां पडला व त्याचा पाडाव गेल्या पंधरा वर्षांत कसा झाला याचें रडगाणेंहि जयपूरला गाण्यांत आलें. समाजवादी तत्त्व व वास्तवता यांचा मेळ घालण्याचें काम काँग्रेसच्या येत्या अधिवेशनापर्यंत चालेल.

पंतप्रधान नेहरु, कृष्ण मेनन, केशवदेव मालवीय वगैरे समाजवादी नेत्यांनीं समाजवाद तांतडीनें आणण्याच्या पोटतिडिकीनें एक प्रकारें आंतडें पिळवटून गर्जना केल्या व त्यांच्या भाषणांतच समाजवाद भारतांत निष्प्रभ कां आहे याची मीमांसा असून ती सूचक व उद्बोधक आहे. राष्ट्राचा विकास शिस्तीनें व्हावयाचा तर नियंत्रण पाहिजे, नियोजनाबरोबरच नियंत्रणें व मक्तेदारी येते व समाजवादाचा अग्रदूत म्हणून अटळ ठरणाऱ्या नियंत्रणांनीं आणलेल्या मक्तेदारीनें समाजवाद जसा कांही मुळासकट खाऊन टाकण्यास सुरुवात केलेली आहे. मक्तेदारीच्या परिणामीं संपत्तीचें केंद्रीकरण मूठभर धनिकांच्या हातीं होऊन त्यांचें उखळ पांढरें झालें व दरिद्र्यांचें दारिद्र्य वाढलें. म्हणजेच परमिट–लायसन्सचें राज्य जें निर्माण झालें, त्यायोगें समाजवादाऐवजीं भांडवलदारी फोफावली व आर्थिक विषमता पोसली गेली. स्वतंत्र नेते श्री. राजगोपाळाचारी यांच्या विवेचनाचा काँग्रेसी भाषेंत एक प्रकारचा पुनरुच्चार जणुं जयपूरला करण्यांत आला. भारत हा शेतीव्यवसायप्रधान देश आहे व शेतमालकीवर मर्यादा घातल्या पाहिजेत असा काँग्रेसचा हिरिरीचा उपक्रम आहे. जर शेतमालकीवर मर्यादा पाहिजेत तर उद्योगपति, व्यापारी वगैरेंच्या उत्पन्नावर मर्यादा कां नकोत, असा वाद भारतांत कित्येक वर्षे गाजत आहे. जर वैयक्तिक उत्पन्नावर अशा रीतीनें मर्यादा घातली तर शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, कर्तबगार व कुशल लोक, जेथें वैयक्तिक उत्पन्नावर मर्यादा नाहीं तेथें निघून जातात असें पं. नेहरूंनीं सांगितलें आहे. तोच न्याय शेतीलाहि लागू होत

नाहीं काय? उत्पादनसाधनें मनमुराद हातीं ठेवून जास्तींत जास्त नफा करण्याची व वैयक्तिक मिळकत जास्तींत जास्त कमावण्याची संधि नसेल तर औद्योगिक उत्पादन व तज्ज्ञांची कर्तबगारी यांना मुकण्याचा प्रसंग येतो. जर शेतमालकीवर मर्यादा घातली तर तशीच उदासीनता व निरुत्साह शेतमालकांत उत्पन्न होतो व शेती उत्पादन वाढविण्याचें व शेतीवरचें शेतमालकाचें लक्ष उडतें. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत औद्योगिक उत्पादन वाढलें पण शेती उत्पादन घटलें असें प्रसिद्ध झालें आहे. बिगरशेती व्यवसायाच्या नफ्यावर व व्यापावर मर्यादा नाहींत व शेती अशा निर्बंधांनीं जखडलेली आहे. त्याचाच हा परिणाम आहे असा निष्कर्ष त्यांतून निघाल्याशिवाय राहात नाहीं. म्हणजेच वैयक्तिक मिळकत हा देशाचें उत्पादन वाढविण्याच्या बाबतींतील महत्त्वाचा उत्तेजक घटक होय. या अमेरिकन सिद्धान्ताकडे पं. नेहरूंच्या निवेदनाप्रमाणें गेलें पाहिजे किंवा समाजवादाचे प्रयोग करतांना आज शेतीचें व उद्यां व्यवसाय-उद्योगांचें उत्पादन घटलें तरी तें पत्करून देशांतील वाढतें दारिद्र्य समानतेनें सर्वांनीं वाटून घेतलें पाहिजे, असें म्हणावें लागतें.

मूठभर लोकांच्या हातांत संपत्तीचें केंद्रीकरण होत आहे व त्यांचें उखळ पांढरें होऊन गोरगरीब नाडले जात आहेत, हें मेनन, मालवीय हे केंद्रीय मंत्री असतांना दिसत होतेंच. त्यावेळीं हे मंत्री काय करीत होते व पंतप्रधान नेहरु स्वतःच्या नाकाखालीं घडणाऱ्या अशा प्रकारांबाबत डोळ्यावर कातडें कां ओढीत आहेत, असा प्रश्न येतो. समाजवादाची तूर्तची परिणति पाहतां समाजवादी समाजरचनेच्या प्रयोगांत नियोजनप्रधान मक्तेदारीचे मोठे मासे निर्माण होऊन सामान्य छोट्या माशांना ते खाऊन टाकतील व सध्यांचाच नूर कायम राहिला तर समाजवादी समाजरचनेनंतर अठरा विश्वे दारिद्र्यच शिल्लक राहील अशी भीति समाजाला वाटल्यास त्यांत नवल नाहीं. चाळीस वर्षांच्या समाजवादी प्रयोगानंतर रशियाला भांडवलदार अमेरिकेचा गहूं विकत घेण्याची पाळी येते व साम्यवादी चीनमध्ये एक तपाच्या काळानंतर अन्नान्नदशा ओढवते या दोनहि गोष्टी एक प्रकारें उद्बोधक म्हटल्या पाहिजेत.

उत्पादनाच्या बाबतींत उत्पादनाचीं साधनें व भांडवल हे जसे महत्त्वाचे घटक आहेत, त्याचप्रमाणें मनुष्यबळ हाहि तितकाच किंबहुना सर्वांत महत्त्वाचा घटक आहे हें विसरून चालणार नाहीं. भारतांत नेमकें त्याच गोष्टीकडे दुर्लक्ष होत आहे. किंबहुना समाजवादी समाजरचनेच्या ऊहापोहांत हा मानव कितपत कर्तबगार, कष्टाळू, शिस्तबद्ध व वाकबगार आहे याचीं शहानिशा शद्धानेंहि होत नाहीं याचा अचंबा वाटल्याशिवाय राहात नाहीं. इतरत्र उद्योगधंद्यांचे व

शेतीसारख्या व्यवसायाचे स्वयंचलित यांत्रिकीकरण झपाट्यानें चालू आहे. अशा यांत्रिकीकरणानें जे बेकार होतील त्यांना शास्त्रीय व तांत्रिक उच्च शिक्षण देऊन देशांतील बुद्धिमता व कर्तबगारी वायां जाणार नाहीं अशी खबरदारी आतां-पासून घेण्यांत येत आहे. पण भारतांतील विविध क्षेत्रांतील कामगार वाकबगार, तंत्रशास्त्रज्ञ, प्रवीण, वक्तशीर, शिस्तबद्ध कसा होईल याकडे लक्ष देण्याची जरुरीच समाजवादी पुरस्कर्त्यांना व कामगार नेत्यांना वाटत नाहीं, असें दिसतें. समाजवादी समाजरचना हा एक प्रचंड उद्योग आहे व कोणत्याहि तपशिलाकडे किंवा अंगोपांगांकडे जरा दुर्लक्ष झालें तर नवा प्रयोग तर फसेलच, पण सर्वभक्षकहि ठरेल. त्या दृष्टीनें समाजवादी खर्डा जयपूरला मंजूर झाला व त्यांत तत्त्वव्यवहारांत प्राण ओतण्याचें काम येत्या दोन महिन्यांत होणार आहे ही सूचक गोष्ट आहे. या दोनतीन महिन्यांत समाजवादी प्रयोगाची सर्वांगीण छाननी काँग्रेसनें एक प्रकारच्या पक्षातीत पातळीवरून व सामुदायिक प्रज्ञेनें केली पाहिजे. तसें झालें तरच जयपूरचें समाजवादी नमन व घोषणा कारणी लागून तत्त्व व व्यवहाराच्या पातळीवर भारताचें कर्तृत्व स्थिरावेल.

६–११–६३

स्वच्छ राज्यकर्तृत्व समाजवादी रचना

जयपूरचें अॉ. इं. काँ. कमिटीचें अधिवेशन उरकून दिल्लीला परत फिरतांच भारताचे गृहमंत्री ना. नंदा यांनीं लांचलुचपतीचें उच्चाटन करण्याबाबतच्या संथानम् कमिटीच्या शिफारशींची चर्चा केली आणि संथानम् कमिटीनें सुचविल्या-प्रमाणें सर्वोच्च कमिशन लाचलुचपतीचें राज्यकारभारांतून उच्चाटन करण्यासाठीं नेमण्याचा निर्णय घेण्यांत आला. जयपूरच्या अॉ. इं. काँ. कमिटीच्या समाजवादी समाजरचनेच्या ठरावानंतर त्याबाबत जी वाच्यता व विचारविनिमय सुरू आहे त्यापेक्षां ना. नंदा यांची ही कृति जास्त बोलकी व प्रभावी आहे असें म्हटलें पाहिजे. लांचलुचपत व भ्रष्टाचार यांचें राज्ययंत्रांतून उच्चाटन झाल्याशिवाय

स्वराज्य नाहीं व स्वराज्याच्या कृतकृत्यतेस कारणीभूत होणारी समाजवादी समाजरचना त्याशिवाय शक्य नाहीं, असें जयपूर अधिवेशनाच्या वेळीं पं. नेहरु यांनीं निक्षून सांगितलें होतें. सरकार ध्येयधोरणात्मक निर्णय घेतें पण त्या निर्णयाची अंमलबजावणी राज्ययंत्रणेनें करावयाची असते. या अंमलबजावणीवर सरकारी निर्णयाचा भलेबुरेपणा लोकदृष्ट्या ठरत असतो. उत्तमांत उत्तम व लोकहितकारी धोरण व निर्णयहि जर अंमलबजावणी करणारे हात भ्रष्ट असतील तर किळसवाणे व लोकांना जाचक ठरूं शकतात. म्हणजे राज्यकर्तृत्वाची सर्व मदार दररोजचें कर्तव्यकर्म पार पाडणाऱ्या हातांपायावर अवलंबून असते. बींबियाणें चांगलें असलें, खतपाणी व साधनें सर्व यथातथ्य असलीं पण झाडाच्या मुळांतच कीड लागली तर फळांऐवजीं झाडाचें पोखरलेलें लाकूड तेवढें हातीं लागतें. त्याप्रमाणें राज्यकर्तृत्व जर भ्रष्टाचारानें किडलेलें व लांचलुचपतीनें पछाडलेलें असेल तर स्वराज्याचीं फळें सामान्य माणसांना चाखावयास मिळत नाहींतच पण स्वराज्याचें सुराज्य होण्याऐवजीं असुरराज्य बनतें व लोक त्रस्त होऊन राजवटीला व नेतृत्वालाहि कंटाळतात. त्या दृष्टीनें राज्यकारभारांतील लांचलुचपत व भ्रष्टाचार ही राष्ट्राला लागलेली कीड ठरल्याशिवाय राहात नाहीं. ही गोष्ट लक्षांत घेऊन ना. नंदा यांनीं वर्ष दोन वर्षांच्या काळांत लांचलुचपत बव्हंशीं कमी करण्याचा विडा जसा कांहीं उचलला आहे. त्या कामीं त्यांना यश आल्यास स्वराज्याचें सुराज्यांत रूपांतर करण्याची व सुराज्यानें समाजवादाचा पाया घालण्याची धन्यता व कृतकृत्यता त्यांनीं साधल्यासारखें झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

सत्ता व अधिकार हातीं आले की लोकहित व न्याय यांच्यासाठीं त्यांचा वापर व्हावा जशी साधारणतः अपेक्षा असते. पण सत्तेचा व अधिकाराचा वापर विशिष्ट रीतीनें करून एखाद्याचें काम त्वरित व आग्रहानें करून द्यावयाचें, मोबदला मिळाल्यास तो घ्यावयाचा, हा मोह एक तऱ्हेनें सामान्य म्हणतां येईल. पण एकदां सत्ता व अधिकाराचा वापर करून पैसा मिळविण्याची चटक लागली कीं, पैशाशिवाय कोणताहि कागद पुढें सरकत नाहीं व काम होत नाहीं अशी परिस्थिति निर्माण होते. ज्याच्याकडे जितपत सत्ता असेल तितपत तिचा उपयोग अडवणूक करून पैसे मिळविण्याकडे होऊं लागतो. दारावरचा शिपाई परिचयपत्र आंत अधिकाऱ्याकडे नेऊन देण्यास ठींहि चिरीमिरी अपेक्षितो व लहानमोठा अधिकारी एखादें काम न्यायनीति न पाहतां करून स्वतःचा खिसा भरण्यास कमी करीत नाहीं. परवाना देणारे अधिकारी लाखांची लांच घेत असतील, नोंदणी करणारा कारकून एखाद्या नोटेवर प्रसन्न होत असेल तर शिपाई चहापाण्यापुरतीच चिरीमिरी मागत असेल. अधिकारपरत्वें लांचेचें मान कमीजास्त असलें तरी

लांचलुचपतीचा गुन्हा सारखाच गंभीर होय यांत संशय नाहीं. लांच घेऊनच काम करावयाचें अशी एकदां संवय लागली कीं लांचेची तरतूद नसेल तर कोणताहि कारभार अडून पडल्याशिवाय व भल्याबुऱ्या सर्वच समाजजीवनाची अडवणूक झाल्याशिवाय राहात नाहीं. कामराज योजनेनें राज्ययंत्रणा गळाठल्यासारखी झाली असें श्री. पाटील यांनीं सांगितलें आहे. पण लांचेच्या प्रेरक शक्तीशिवाय चलनवलन न होण्यासारखी राज्ययंत्राची स्थिति कामराज योजनेपूर्वीपासूनची आहे असें म्हटलें पाहिजे. लांचलुचपतीनें न्याय व समाजहित तर खिळखिळें होतेंच, पण राज्यव्यवस्थाहि जवळजवळ कोलमडल्यासारखी होते व भ्रष्टाचारानें शक्ति गमावलेल्या माणसासारखी ती कर्तृत्वशून्य, निष्प्रभ व चारित्र्यशून्य बनते. राज्यकारभार अशा रीतीनें सडलेला, किडलेला व अर्धांग झाल्यासारखा असल्यावर लोकांना सुराज्य कोठून अनुभवावयास मिळणार व स्वराज्याचा समाजवादी समाजनचनेंत कायापालट तरी कसा होणार ?

पैसे येनकेनमार्गेण कमावण्याचा लोभ व लांचलुचपतीचा रोग वाईट तर खराच, पण राज्ययंत्राला इतरहि लोभ पछाडून राज्ययंत्र खिळखिळें व कर्तृत्वशून्य करावयास चुकत नाहींत. पैशांचा हा मोह जसा आहे तसाच आळस व कामें करण्याचा कंटाळा हाहि एक मोहच आहे. हा मोह एकदां प्रभावी झाला कीं, टेबलावर कामें कुजूं लागतात व निकालांत न निघालेल्या फायलींचे ढिगारे साठूं लागतात. काम मागें पडलें तर नव्या मनुष्याला त्याची खंत प्रथम वाटते पण तोहि निष्क्रियतेच्या वातावरणांत रुळतो व टेबलावर फायलींचा पर्वत सतत वाढता राहाणें हेंच नोकरशाहीचें भूषण होऊन बसतें. अति ऊ झाली कीं खाज सुटत नाहीं, त्याचप्रमाणें फायली अति झाल्या कीं त्याचीहि खंत किंवा लाज वाटेनाशी होते. टेबलावर कामाचे ढीग पाडून ठेवणें व काम उरकत नाहीं म्हणून कांगावा करून आणखी माणसांची सतत मागणी करणें हीच इतिकर्तव्यता होऊन बसते. लाचलुचपतीनें जशी राज्ययंत्रणा सडलेली आहे त्याचप्रमाणें आराम व स्वास्थ्य यांच्या आहारीं गेल्यानें राज्यव्यवस्थेचा जसा कांहीं लोळागोळा झाला आहे लांचलुचपत तर नाहींशी झाली पाहिजेच, त्याचप्रमाणें राज्यकारभाराचा लोळागोळा करणाऱ्या या कर्तृत्वशून्यतेच्या अर्धांग रोगाचेंहि शक्य त्या तडफेनें निराकरण झालें पाहिजे. राज्यकारभार शुद्ध व स्वच्छ तर पाहिजेच व लांचलुचपतीची कीड नाहींशी झाली पाहिजेच. पण त्याचबरोबर राज्ययंत्रणा कर्तृत्वशून्य व जवळजवळ मृतप्राय बनविणाऱ्या या निष्क्रियतेचा, आळसटपणाचा व काम पाडून ठेवण्याचाहि बीमोड शक्य त्या त्वरेनें झाला पाहिजे.

भारतांतील सरकारी नोकरांचें पगारमान कमी आहे म्हणून लांचलुचपत पसरते किंवा कामाचा उरक होत नाहीं अशा प्रकारचा भ्रम होण्याचें कारण

नाहीं. पगारमान कमी असेल तर तें जरूर सुधारून घ्यावें. पण शिपायांपासून बड्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांपर्यंत ज्यावेळीं लांच घेतली जाते व प्रत्येकाच्या टेबलावर निकालांत न निघालेल्या कामांचा ढीग असतो त्या वेळीं पगारमानाची सबब खोटी किंवहुना वाह्यात्पणाची ठरल्याशिवाय राहात नाहीं. भारतांत कामाच्या मानानें सरकारी नोकर खूप आहेत असा गवगवा आहे. अधूनमधून जी चौकशी व पहाणी होते, त्यांतहि हें दिसून येतें. असें असूनहि कामें कां तुंबून राहातात याचा विचार जरूर झाला पाहिजे. कामें तुंबल्याचें किंवा लांचलुचपत बळावल्याचें कारण सरकारी यंत्रणेला कसलाच धाक नाहीं व कोणाचा वचक नाहीं. भ्रष्टाचाराबद्दल किंवा कामें न केल्याबद्दल वृत्तिच्छेद होण्याची धास्ती नाहीं हें कारण म्हणावें लागतें. सवलती द्याव्यात, मेहनतानाहि भरपूर द्यावा, पण त्याचबरोबर भ्रष्टाचाराची वाढ होणार नाहीं व टेबलावर निकालांत न निघतां एखादी फाईल राहिली तर कठोर प्रायश्चित्त भोगावें लागेल असा वचकहि असला पाहिजे. तसा धाक, वचक व भीति जर असेल तर भ्रष्टाचार, लांचलुचपत, उजळमाथ्यानें चालणार नाहीं, टेबलावर फाइलींचे ढीग दिसणार नाहींत व राज्ययंत्र कर्तबगार, स्वच्छ, कर्तव्यदक्ष झाल्याशिवाय राहाणार नाहीं. राज्ययंत्र अशा रीतीनें चोख, कर्तृत्वसंपन्न, निःपक्षपाती व न्यायी बनलें तर स्वराज्याचें सुराज्य तर होईलच पण समाजवादी समाजरचनेलाहि तें उपकारक व साहाय्यक ठरेल.

११–११–६३

पं. नेहरु–निधनानें भारताचें छत्र गेलें

पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचें काल दुपारीं दोन वाजतां नवी दिल्ली येथें निधन झालें. या घटनेनें भारताचें हृदय सुन्न झाल्यासारखें होणें अपरिहार्य आहे. पंतप्रधान नेहरु भुवनेश्वर काँग्रेसच्या वेळीं पक्षघाताच्या विकारानें आजारी पडले. पण त्यानंतर त्यांची प्रकृति सतत सुधारत होती. लोक-

सभेच्या गेल्या अधिवेशनांत ते जरूर तेव्हां महत्त्वाच्या विषयावरील चर्चेत भाग घेत असत. पंधरवड्यापूर्वीच मुंबईत भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेसच्या सभेत ते उपस्थित होते व त्यांचीं दोन महत्त्वाचीं भाषणें या बैठकींत झालीं. मुंबईहून परत जावयास निघाले असतांना लवकरच मुंबईला परत या असा त्यांना निरोप देण्यांत आला. तेव्हां त्यांनीं 'ईश्वरी इच्छेप्रमाणें होईल' असें कांहींसें विषण्ण उत्तर दिलें होतें. नुकत्याच झालेल्या पत्रकार परिषदेंत मात्र 'माझें आयुष्य इतक्या लवकर संपणार नाहीं' असें त्यांनीं हसत सांगितलें होतें व पत्रकारांनों हसत टाळया वाजविल्या होत्या. डेहराडून येथें दोन दिवसांची विश्रांति घेऊन ते परवांच दिल्लीला परत आले होते व तरतरीत आणि टवटवीत वाटत होते. पुन्हा आणखी विश्रांति घेण्यास ते जावयाचे होते. पण काल सकाळीं त्यांचें दुखणें उलटलें व प्रकृति काळजी करण्यासारखी झाली. सकाळपासून ते बेशुद्धच होते व दुपारीं दोन वाजतां त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. मुंबईत त्यांनीं म्हटल्याप्रमाणें 'ईश्वरेच्छा बलीयसी' ठरली आहे. भारतांत त्यांना अशक्य झालेल्या चिरविश्रांतीसाठीं ते परलोकवासी झाले आहेत. मी इतक्यांत मरणार नाहीं असे त्यांचे शब्द व त्यावरचा टाळयांचा कडकडाट हवेंत विरतो न विरतो तोंच ते पंचत्वांत विलीन झाले आहेत. पुन्हा मुंबईला ते दिसणार नाहींत, भारतांत त्यांचा आवाज ऐकूं येणार नाहीं व विश्वशांतीला वाहून घेणारा हा महान् जगन्मान्य नेता पुन्हा यापुढें मननचिंतनाचें संचलन करणार नाहीं.

पंतप्रधान नेहरूंचें निधन म्हणजे भारतावर केवढें अरिष्ट आहे याची जाणीव जसजसा काळ जाईल तसतशी भारतास जणुं कांही खावयास उठल्याशिवाय राहणार नाहीं. पं. नेहरु हे तोंडांत सोन्याचांदीचा चमचा घेऊन जन्मास आले पण साठीपर्यंतचें त्यांचें जीवन जणुं तुरुंगांत व चळवळींत खर्ची पडलें. तोंडांत चांदीचा चमचा तर राहिला नाहींच, पण हातापायांत बेडया मात्र पडल्या. त्यांच्या अहर्निश तपश्चर्येनें भारत स्वतंत्र झाला आणि जणुं कांहीं चळवळीचें एक जोखड दूर झाल्यावर राज्यकारभाराचें दुसरें जोखड त्यांच्यावर चढलें गेलें. सुमारें दीड तप राज्यकारभाराचा गाडा ओढतांना ते दिवसरात्र खपत आणि राबत होते. दिवसभर आकाशांत मार्गक्रमण करणारा सूर्य रात्रीचा विसावा घेतो. नांगरास जुंपलेल्या बैलालाहि शेतकरी तोंडांत तंबाकूची चिमूट टाकतो तेवढा वेळ तरी उभा राहून आराम मिळतो. पण नेहरूंना आराम हा शब्दच पारखा झाला होता. सकाळीं उठल्यापासून मध्यरात्र उलटून जाईपर्यंत त्यांचें कार्य चालूच असे. सरकारी कामकाजांतून जरा डोकें वर काढलें तर काँग्रेसचें काम असे व तें नसेल तेव्हां मननचिंतन व मार्गदर्शन करण्यासाठीं त्यांची बुद्धि कार्यान्वित असे. राज्यकारभाराचा गाडा ओढतांना पं. नेहरु एक वर्षांत दहा वर्षांनीं म्हातारे होत

चालले असें सरदार पटेल म्हणत असत. देशासाठीं झिजत ७४ वर्षांचें आयुष्य पुरें केल्यावरहि त्यांची उमेद व ईर्षा व मार्गदर्शनाची तत्परता कायम होती. पण अखेर शरीर थकलें, दुखण्यानें गाठलें व भारतांत सार्वजनिक नेत्याला दुष्प्राप्य असलेल्या विश्रांतीसाठीं जणुं कांहीं पं. नेहरूंनीं देह ठेवला आहे.

पं. नेहरूंच्या राज्यकर्तृत्वाच्या सतराअठरा वर्षांतील व त्यापूर्वीच्या काँग्रेस-नेते या नात्याच्या मार्गदर्शनानें भारताचें ध्येय व धोरण विशिष्ट प्रकारें साकार होत गेलें आहे. लो. टिळक यांनीं भारतास स्वातंत्र्य आत्मा दिला, महात्मा गांधींनीं भारतास स्वातंत्र्य दिलें आणि पं. नेहरूंनीं भारताला विशिष्ट तात्त्विक आकारमान दिलें. भारताची समाजवादी ध्येयधारणा, आंतरराष्ट्रीय जगांत गाजलेलें पंचशील, नवजात राष्ट्रांचा उद्धार घडवून आणणारें लोकशाहीप्रधान नियोजन तंत्र, तटस्थ धोरण आणि सुवर्णमध्यात्मक समतोल हीं पंडितजींनीं केवळ भारतासच नव्हे तर नवजात जगाला दिलेली शिधोरी होय. पंडित नेहरु गेले आणि भारताच्या मस्तकावरचें जणुं कांहीं छत्र नाहींसें झालें आहे. पं. नेहरु गेले आणि भारत अनाथ आणि पोरका झाला आहे. पंडित नेहरु गेले आणि भारताचें अवसान आणि बळ खचल्यासारखें झालें आहे.

ऐन धारेंत नाव असतांना कर्णधाराच्या हातून सुकाणूं सुटावें तशी भारताची स्थिति पंडित नेहरूंच्या निधनानें झालेली अ:हे. चिनी आक्रमण अकाळविकाळ स्वरूपांत भारतासमोर उभें आहे पण शेवटच्या चिन्याला भारतभूमीवरून हाकलून देऊं असें सांगणारा नेता भारताने गमावला आहे. तटस्थता, नियोजन, समाजवाद या सर्वांचा जणुं कांही कसोटीचा सध्यांचा काळ आहे आणि त्याच वेळीं भारत पंडित नेहरूंना मुकला आहे. पंडित नेहरूंच्या निधनाने भारतानें व्याकूळ व्हावें व त्याच्या काळजाचें पाणी व्हावें हें या परिस्थितींत अटळ आहे. लो. टिळक गेले आणि त्या सुमारास महात्माजी उदयाला आले. महात्माजींच्या निधनानंतर पंडित नेहरूंनीं राष्ट्राची जोखीम स्वत:वर घेतली. पं. नेहरूंच्या पश्चात् भारताचे नेतृत्व कोणाकडे व भारतानें कोणाचें मार्गदर्शन घ्यावयाचें हें अनिश्चित आहे. अशा अनिश्चित काळांत मृत्यूचा आघात जेव्हां होतो त्या वेळीं केवळ दु:खच होतें असें नाहीं तर आकाश फाटल्यासारखें होतें पंडित नेहरूंच्या निधनानें भारताचें छत्र हिरावलें गेलें असून आकाश फाटलें आहे व भारताला आत्यंतिक अशा अग्निदिव्यांतूनच पसार व्हावयाचें आहे. पं. नेहरूंचें आजतायतचें मार्गदर्शन, मनन-चिंतन, कर्तबगारी यांचें स्मरण करून भारताला नेहरूंच्या पश्चात् मार्ग काढावयाचा आहे. पं. नेहरूंची पुण्याई या कामीं भारताला कोणत्याहि प्रकारें खच्ची होऊं देणार नाहीं असा आम्हांला विश्वास वाटतो.

२८-५-६४

समाजवादी भारत हेंच नेहरु-स्मारक

पंतप्रधान पं. नेहरु यांच्या मृत्यूनें व्याकुळ होऊन राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् यांनीं नेहरु परंपरा, मूल्यें व आचारविचारांचें धन यांच्या शिदोरीसह भविष्यकाळीं मार्गक्रमण करण्याचें आवाहन केलें आहे. म. गांधींच्या पश्चात् भारतांत नेहरुयुग सुरू झालें आणि सुमारें दीड तप नेहरुयुगाच्या प्रभावाखालीं भारत होतें. नेहरुयुगाचीं लक्षणें अनेक सांगतां येतील. पण लोकशाही समाजवाद हें नेहरु-युगाचें सर्वप्रथम व अग्रगण्य वैशिष्ट्य होय हें कोणासहि नाकारतां येणार नाहीं. किंबहुना स्वातंत्र्यलढ्याची लोकशाही समाजवाद ही अपरिहार्य परिपूर्ति होय असेंच म्हटलें पाहिजे. भारतानें स्वातंत्र्य साठीं लढा देऊन ब्रिटिश सत्ता उधळून लावली. स्वातंत्र्य हें साध्य नसून भारतीय अभ्युदयाचें साधन होय असें महात्मा गांधी म्हणत असत. स्वतंत्र भारताची भरभराट साधून भारताच्या जनतेला सुखी व कर्तृत्वसंपन्न करावयाचें तर केवळ गोऱ्या राज्यकर्त्यांच्या जागीं भारतीय राज्यकर्ते येऊन भागणार नाहीं. स्वतंत्र भारताची राजवट ही समदर्शी, सर्वांना समानसंधि व कर्तृत्वपराक्रमास वाव देणारी अशी असावयास पाहिजे असेल व भारताच्या स्वातंत्र्याचें अशा रीतीनें सार्थक व्हावयाचें तर समाजवादाची दीक्षा व व्रत भारतानें घेऊन त्यांत सफलता साधली पाहिजे हें त्रिकालदर्शी पं. नेहरूंनीं ओळखलें आणि त्यांच्या नेतृत्वाखालीं भारतानें समाजवादाची प्रतिज्ञा आवडीनें काँग्रेसमध्यें घेतली. पण तेवढ्यानें भागण्यासारखें नव्हतें. सर्व शक्ति व कर्तृत्व समाजवाद साकार करण्यासाठीं खर्ची पडलें पाहिजे अशा निर्धारानें आवडीचा समाजवाद प्रत्यक्षांत आणण्याचें कार्य पं. नेहरूंनीं अंगिकारिलें आणि भारतीय समाजवाद साकार व सशरीरी करण्याची तपश्चर्या आचरीत असतांनाच भुवनेश्वर येथे मृत्यूची चिठी घेणाऱ्या आजारानें त्यांना गांठलें. जानेवारीपासून मे महिन्यापर्यंत समाजवादाचा अवतार भारतांत कसा होत आहे हें ते पहात होते. मुंबईच्या काँग्रेस बैठकींत त्याबाबत भवति न भवति होऊन समाजवादास निश्चित स्वरूप प्राप्त झाल्यावर पंधरवड्यांत त्यांनीं एक प्रकारच्या कृतकृत्यतेनें देह ठेवला. जगु कांहीं प नेहरूंची भारताला शेवटची देणगी म्हणजे साकार व शरीरी बनलेला भारतीय समाजवाद होय.

नेहरुप्रणीत व नेहरुप्रतिष्ठित समाजवाद हा हुकूमशाही समाजवाद असूं शकत नव्हता तर जनतेपासून स्फुरण पावलेला व जनतेनें पत्करलेला असा तो

समाजवाद होता. नेहरूंच्या समाजवादाचें जनता हें अधिष्ठान होय, जनमत हें बळ होय, लोक ही कर्मभूमि व लोककल्याण हें साफल्य होय. लोकमतानुवर्तित्व हें भारताचें वैशिष्ट्य व नेहरूंची निष्ठा असल्यामुळें या वैशिष्ट्यास व निष्ठेस धरून नेहरुयुगांतील भारतीय समाजवाद हा लोकशाही यमनियमांसह अवतीर्ण झाला व भारताचा आगळा समाजवाद लोकशाही समाजवाद म्हणून मान्यता व ख्याति पावला. कम्युनिस्ट देशांतील हुकूमशाही समाजवाद हा तत्काळ फळ देणारा असा सकृद्दर्शनीं वाटतो पण याची दीर्घकालीन परिणति अखेर कर्तृत्वाचा वेग मंदावण्यांत व जबरदस्तीच्या योगानें लोकशक्ति खच्ची होऊन वैफल्याची खाई उभी राहाण्यांत होतो असा कम्युनिस्ट देशांतील समाजवादी कर्तृत्वाचा अनुभव आहे चीननें हुकूमशाही दडपशाहीनें 'लीप फॉर्वर्ड' असा हुकूम फर्माविला पण चीनच्या या साहसी उड्डाणाचें पर्यवसान सर्वच क्षेत्रांत तोंडघशी पडण्यांत झालें. पन्नास वर्षांच्या प्रयोगानंतरहि सर्वश्रेष्ठ कम्युनिस्ट रशिया अंधारांत व दुर्भिक्षांतच चांचपडत असलेला दिसतो व अखेर भांडवलशाही अमेरिकेशीं संधान बांधून गव्हाची उसनवारी करण्याचा प्रसग रशियालाहि टाळतां आलेला नाहीं. हुकूमशाही समाजवाद म्हणजे लोकांच्या उत्स्फूर्त कर्तृत्वाचें खच्चीकरण आणि अनिर्बंध भांडवलशाही व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे 'जीवो जीवस्य जीवनम्' या जंगल कायद्याला मुक्तदार! हीं दोनहि टोंकें लोककल्याणकारी भारतास परवडणारीं नसल्यामुळें दोनहि टोंकांचा धोका टाळणारा व लोकसंमतीवर आधारलेला समाजवाद ऊर्फ लोकशाही समाजवाद हा सुवर्णमध्य पं. नेहरूंच्या परिणत प्रज्ञेनें भारतासमोर ठेवला आणि या सुवर्णमध्याच्या द्वारें भारताचा आचारविचारात्मक कायापालट पं. नेहरूनीं साधला. भारताचें ध्येय 'लोकशाही आणि समाजवाज' हें कीं 'लोकशाहीचे तंत्रमत्र संभाळून मार्गक्रमण करणारा समाजवाद' असा घोळ मध्यंतरीं विचारवंतांनीं घातला होता. त्याच सुमारास पं. नेहरूंना आजारानें गांठलें आणि 'मौनं गुरोस्तु व्याख्यानम्' अशा प्रकारचें अबोल पण प्रभावी मार्गदर्शन त्यांच्याकडून भुवनेश्वरला झालें. वस्तुतः गेल्या अठरा वर्षांतील व स्वातंत्र्यपूर्व काळांतील पं. नेहरूंचे विचारधन जितका प्रखर व प्रभावी प्रकाश याबाबत टाकतें त्यापेक्षां अधिक विवेचन व चिकित्सा आणखी कांहीं भाषणांनीं पं. नेहरु तरी काय करूं शकत होते? लोकशाही निष्ठा व समाजहित साधण्याची तत्परता यांचा मिलाफ घडवून आणणारें तंत्र व तत्त्व यांच्या मुशींत ओतलेला लोकशाही समाजवाद पं. नेहरूंनीं भारतास दिला. लोकशाही समाजवाद हें पं. नेहरूंचें समाधिधन व भारतास अर्पिलेलें वैचारिक शेंडेफळ होय.

पंडित जवाहरलाल नेहरु गेले पण त्यांनीं भारतासाठीं किंबहुना जगासाठीं लोकशाही समाजवादाचा वारसा मागें ठेवला आहे. माणूस मृत्यु पावला म्हणजे

त्याच्या जागीं पेटविलेला दिवा ठेवण्याची आपल्याकडे पद्धत आहे. हा दिवा मृत्युजन्य अंधार दूर करून मार्ग दाखवितो व तेजोरूपानें गत व्यक्तीचें स्मरण देतो. पं. नेहरु गेले पण लोकशाही समाजवादाच्या साक्षात् स्वरूपांत ते भारतांत यापुढेंहि वावरत राहाणार आहेत. लोकशाही समाजवाद हा नेहरुयुगाचा मुकुट, नेहरु विचारधारणेचें पुरःफल व नेहरु कर्तृत्वाची विजयध्वजा होय. नेहरुयुगाची परंपरा, विचारधारा व कर्तबगारी यांना मार्ग पुसत व नेहरूंचें अहर्निश स्मरण करीत लोकशाही समाजवाद यशस्वी करणें हीच भारताची पं. नेहरूंना श्रद्धांजलि होय. लोकशाही समाजवाद म्हणजेच अशरीरी पंडित नेहरु होत. हा समाजवाद पोरका होऊं न देतां त्याचें पालनपोषण व पुष्टिवर्धन हाच नेहरुयुगानें संस्कारित असलेल्या भारताचा सर्वप्रथम धर्म व दिवंगत नेत्याचें पुण्यस्मरण होय.

२९-५-६४

जगताचे नागरिक नेहरूंचा अंत्यविधि

भारतनेते व विश्वपुरुष पं. जवाहरलाल नेहरूंचा अंत्यविधि गुरुवारीं दिल्लीस झाला आणि त्यांच्या पार्थिव देहास अग्निसंस्कार होऊन त्यांचे शारीरिक अवशेष अग्निस्वरूप झाले. पं. नेहरूंच्या दुःखानें दिल्ली व्याकुळ होऊन धाय धाय रडली व भारतपुरुषाचें दुःख अनावर होतें यांत नवल नाहीं. पण त्यांच्या निधनानें विश्वपुरुष सुन्न झाल्यासारखा झाला व त्यांना अखेरची श्रद्धांजलि अर्पण करण्यासाठीं साता समुद्रापलीकडून भिन्नविभिन्न राष्ट्रांचे प्रतिनिधी दिल्लीला येऊन दाखल झाले. ब्रिटनचे पंतप्रधान दिल्लींत सकाळींच आले तर अमेरिकेच्या अध्यक्षांच्या खास सूचनेवरून अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट डीन रस्क हे अंत्यसंस्काराच्या वेळेपर्यंत स्मशानभूमीपर्यंत आकाशमार्गे कसेबसे येऊन पोहोंचले. दोन जागतिक गट या प्रसंगापुरते आपलें भांडण विसरले आणि पाश्चात्य राष्ट्रांच्या प्रतिनिधींप्रमाणेच कम्युनिस्ट देशांचे राष्ट्रपुरुषहि भारताच्या राजधानींत येऊन सर्वांनीं मिळून एकाच विकल व दुःखी भावनेनें पं. नेहरूंना अखेरची श्रद्धांजलि

अर्पण केली. पं. नेहरु गेले व भारत पोरका होऊन एक भीषण पोकळी निर्माण झाली. भारताचें सांत्वन करून त्याचें दुःख कोण हलकें करणार ? पण भारतावर ओढवलेल्या या प्रसंगांत भारत एकटा आणि पोरका असणार नाहीं किंवा भविष्यकाळांत भारतावर आपत्ति ओढवली तर त्या प्रसंगीं भारतास एकाकी अवस्थेंत रहावें लागणार नाहीं असें सांगण्यासाठींच जणुं कांहीं विश्वांतील सर्व शक्ती भारताबद्दलच्या आत्यंतिक सहानुभूतीनें आणि आपलेपणानें पं. नेहरूंच्या अंत्यविधीस उपस्थित होत्या. नेहरुनिधनानें भारत एकटा पडण्याऐवजीं सहानुभूतीचे व आपुलकीचे सहस्रहस्त त्याच्या सांत्वनास व साहाय्यास पुढें होऊन सहस्रार्जुनाचें बळ भारतास प्राप्त व्हावें अशीच पं. नेहरूंची जीवनभराची फार मोठी पुण्याई व कर्तबगारी होती.

मृत्यूनंतर शरीराची तीन चिमटचा राख होते पण आराधिलेलीं तत्त्वें व केलेले संकल्प मात्र अग्निसंस्कारानें जसे कांहीं उजळून निघतात, किंबहुना अधिक उज्ज्वल व प्रभावी बनतात. अंत्यविधीच्या एका मंत्रांत 'भस्मान्तं शरीरम्' असलें तरी पुण्यकर्म व पुण्यसंकल्प शाश्वत असून मृताच्या पुण्यकर्मांचें व पुण्य-संकल्पांचें स्मरण करावें 'क्रतो स्मर कृतं स्मर' असें म्हटलेलें आहे व्यक्तीचें असो, समाजाचें असो किंवा राष्ट्राचें असो, जीवन म्हणजे एक दिक्कालांतील लढा आहे. पापाशीं लढा द्यावा लागतो व ज्ञानपूर्वक म्हणजे जाणीवेसह असत्-प्रवृत्तीशीं झगडावें लागतें. अवतारी महापुरुष या कामीं मार्गदर्शन व नेतृत्व करतात वाईटांतून बाहेर कसे पडावें त्याचा रस्ता ते पाडतात व चांगल्याचें जतन करण्याच्या शक्तीची जोपासना ते करतात. म्हणून ते चांगला मार्ग पाडणारे म्हणजे 'पथिकृत' व लोकशक्तीची जोपासना करणारे म्हणून लोककृत' म्हणून ख्याति पावतात. त्यांची ही कर्तबगारी विशिष्ट देशापुरती आणि विशिष्ट कालखंडापुरती असली तरी जगाचें भवितव्य त्यांच्या या पुण्याईनें घडविलें जातें. देहाची तीन चिमटचा राख होते पण अवतारी पुरुषांची विश्वसेवा अग्नि जाळूं शकत नाहीं किंवा मृत्यु मारूं शकत नाहीं. मृत्यूनें जेव्हां अशा विश्वकार्यांत खंड पडण्याचा प्रसंग येतो, त्या वेळीं स्वाभाविकच जग गलबल्यासारखें होतें पण पुण्यकृत्यांची व पुण्यसंकल्पांची परंपरा कायम रहावी म्हणून आदरआपुलकीसह विश्वशक्ती धांवत येतात. पं. नेहरूंच्या अंत्यविधीस दोनहि जागतिक गटांचे कर्ते व नेते पुरुष भारताच्या राजधानींत आले व विश्वपुरुषानें भारताबरोबर हुंदका दिला याचें कारण पं. नेहरूंचें विश्वकार्य होय. त्यांनीं आचरिलेल्या विश्वधर्माचें कधीं भस्म होणार नाहीं किंवा त्यांत खंड पडणार नाहीं. किंबहुना या सत्कार्याच्या शारीरिक मर्यादा मृत्यूनें दूर केल्या व नेहरूंचा विश्वधर्म हा

विश्वव्यापी व विश्वस्वरूपी झाला असेंच त्यांच्या अंत्यविधीनें दाखवून दिलें. 'नेहरु अमर होवो' ही त्यांच्या अंत्यविधीच्या वेळची घोषणा. त्यांचा नश्वर देह भस्मीभूत होत असतांनाच अशा रीतीनें सार्थ ठरली आहे.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळांत काय किंवा स्वातंत्र्यकाळांतील भारताच्या सर्वांगीण उद्धाराच्या काळांत काय, पं. नेहरु हे विश्वात्मक मनानें ऊर्फ 'यूनिव्हर्सल माइंड' नें कर्तबगारी गाजवीत होते. त्यांनीं भारताला दिक्कालातीत असा विश्वात्मक आत्मा व मन दिलें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. भारतांत व भारतावर कोठें अन्याय झाल्याचें दिसलें कीं पं. नेहरु खवळून जात व अन्यायाच्या प्रतिकारार्थ सर्व शक्तीनिशीं झुंज देत. पण स्वातंत्र्यपूर्व काळांत जगांत कोठेंहि अन्याय व अत्याचार होत आहे असें दिसलें तरी पं. नेहरु प्रक्षुब्ध होत व भारताचें नैतिकबळ अशा अन्यायाशीं झगडणाऱ्या शक्तीमागें असल्याचें दाखवून देत. त्याशिवाय त्यांचें विश्वात्मक मन शांत होत नसे. स्पेनमध्यें यादवी माजली व फ्रँकोनें पुरोगामी शक्तीचा धुव्वा उडविण्यास सुरुवात केली तेव्हां नेहरु फ्रँकोशीं लढणाऱ्या पुरोगामी शक्तींना वैद्यकीय पथकांद्वारें साहाय्य करण्यास पुढें सरसावले. चीनची आक्रमक जपानशीं झुंज चालू असतांना पं. नेहरूंच्या प्रेरणेनें असेंच वैद्यकीय पथक चीनला गेलें होतें. भारतीय सहानुभूतीचें प्रतीक अशा प्रकारच्या या वैद्यकीय शिष्टमंडळानें भारताचा कल व विश्वात्मक मनच जसें कांहीं प्रकट केलें. भारत स्वतःच स्वातंत्र्यलढ्यांत गुंतलेलें असतांना इतर देशांतील लढ्यांची हीं विकत श्राद्धें घेऊन भारतानें सव्यापसव्य कशाला करावयाचें, असा आक्षेप त्या वेळींहि घेण्यांत येत होता, पण जगाच्या सुखदुःखांशीं समरस होऊन जो सत्पक्ष वाटेल त्याचा पाठपुरावा करण्याच्या पं. नेहरूंच्या उसळीला कोणी आळा घालूं शकला नाहीं. उलट सत्पक्षाचा कैवार घेण्याची परंपराच भारतांत निर्माण होऊन भारताच्या मनःपिंडाला तसें आंतरराष्ट्रीय वळण लागलें व भारत विश्वव्यापी घडामोडींचा एक घटक स्वभावतःच होऊन चुकला.

भारत स्वतंत्र झाल्यावरहि जगाच्या उठाठेवी भारतानें कशासाठीं कराव्यात व रागलोभ ओढवून घ्यावेत असा एक मतप्रवाह प्रबल होता. पण नेहरूंचा भारत जागतिक घडामोडींपासून अलिप्त व निराळा राहूं शकत नव्हता. ज्या ज्या वेळीं आणीबाणीचे आंतरराष्ट्रीय प्रश्न उभ्दवत त्या त्या वेळीं पं. नेहरूंचें विश्वात्मक मन व नेतृत्व उसळून येई व कालोचित कर्तव्य बजावण्यास पुढें झेप घेई. मग हे अटीतटीचे प्रसंग कोरियांतील असोत कांगोंतील असोत किंवा इंडोचायनांतील असोत. जागतिक शांततेचा भंग होऊं नये व आक्रमक शक्तींना थारा मिळूं नये, अशा धोरणानें पं. नेहरु भारताच्या शक्ती पुढें काढीत व जागतिक कर्तव्य पार

पाडण्यास चुकत नसत. भारताच्या उद्धाराचा आटापिटा व भगीरथ प्रयत्न चालू असतांनाच पं. नेहरूंचें जागतिक मन जागृत व कर्तव्यदक्ष राहिलें. भिन्नविभिन्न राष्ट्रांची कमीअधिक इतराजी त्या त्या वेळीं त्यांना व भारताला पत्करावी लागे. पण सत्पक्षाचा व विश्वशांतीचा कैवारी ही आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा भारतास त्या योगें लाभली. किंबहुना ज्या बाजूला भारत त्या बाजूला न्याय अशी महती भारताला प्राप्त झाली. अंतिमतः विश्वाच्या दरबारांतील तत्त्वनिष्ठ व न्यायाची चाड राखणारें राष्ट्र या नात्यानें जगांतील आपुलकी व आदरभावना भारताच्या पाठीशीं उभी झाली. चीननें भारतावर आक्रमण करतांच दोनहि जागतिक गटांचें लष्करी साहाय्य भारतास लाभलें व भारतविकासाचें कार्य हें विश्वकार्य आहे अशा जाणीवेनें जगांतील द्रव्यशक्तीचा ओघ भारताकडे धांवूं लागला. पं. नेहरूंच्या नेतृत्वाखालीं भारत अशा रीतीनें विश्वकार्याचा एक घटक बनला आणि परिणामीं भारतकार्य हें विश्वकार्य मानलें जाऊं लागून विश्वाची आपुलकी व सहानभूति भारतास सबळ व सुदृढ करीत राहिली. पं. नेहरूंचें विश्वात्मक मन व कर्तृत्व अशा रीतीनें भारतास विश्वघटक बनविण्यांत यशस्वी झाल्यानें पं. नेहरूंच्या निधनाची आपत्ति भारतावर कोसळतांच जग दुःखानें व्याकुळ झालें व दोनहि जागतिक गटांचे प्रतिनिधी भारताच्या सांत्वनार्थ व आपुलकीपायीं भारतांत धावून आले. पं. नेहरूंनीं पार पाडलेल्या या विश्वकार्याचें सतत स्मरण भारतानें करावें व विश्वशांतीचा शुभसंकल्प मनांत बाळगावा, हें भारताचें नेहरूनिधनानंतरचें कर्तव्य होय व त्या कामीं भारताकडून कसूर होणार नाहीं असा भरंवसा आहे

३०-५-६४

नेहरूंचें निशाण व नेत्याची निवड

लोकसभेची व राज्यसभेची सभा शुक्रवारीं भरून नेहरुनिधनाबद्दल दुखवटयाचा ठराव उभय सभागृहांनीं मंजूर केला आहे. त्याप्रमाणें सर्वपक्षीय खासदारांची व दिल्लीच्या नागरिकांची सभा भरून तींतहि नेहरूंना श्रध्दांजलि

वाहण्यांत आली व दुखवटचाचे ठराव पास झाले. दुखवटचाच्या ठरावावर अंतःकरण भरून येऊन भाषण करतांना हंगामी पंतप्रधान ना. नंदा यांनीं सांगितल्याप्रमाणें नेहरूंनंतर त्यांच्या जागीं कुणीहि आलें तरी नेहरूंचें ध्येयधोरण चालू ठेवून त्यांची ध्वजपताका पुढें नेण्याचें कामच त्याला करावें लागेल यांत संशय नाहीं. पं. नेहरु हे मंगळवारीं संध्याकाळीं डेहराडूनहून परतले ते पार्लमेंटच्या घटना दुरुस्तीसाठीं भरलेल्या अधिवेशनास हजर राहण्याच्या उद्देशानें. माझे सर्व कागदपत्र मी संपविले आहेत असें त्यांनीं मंगळवारीं रात्रीं सांगितलें होतें. जणुं कांहीं मृत्यूपूर्वीची सर्व निरवानिरव अजाणतेपणानें त्यांनीं पार पाडली होती व नवा अध्याय लिहिण्यास ते सिद्ध झाले होते. पण नवा अध्याय त्यांच्या हातून लिहिला जावयाचा नव्हता. बुधवारीं सकाळीं उठतांच यमराजानें त्यांना साद घातली व नंतर बेशुद्धावस्थेंत असतांनाच त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. त्यांच्या जागीं तूर्त नंदा आले आहेत. पण नेहरूंशिवाय भारत, नेहरूंशिवाय पार्लमेंट पहाणें यासारखा दुसरा दुःखद प्रसंग नाहीं. सर्व विश्वाचें ओझें आपल्या पायावर पडून पावलें जागच्या जागीं खिळून राहिलीं आहेत, अशा स्थितींतच ना. नंदा यांनीं पंतप्रधान नेहरूंच्या आसनापर्यंत जाऊन तें कसेंबसें ग्रहण केलें.

कुणाचीहि नेता म्हणून निवड झाली व पंतप्रधानपद कुणीहि स्वीकारलें तरी नंदांसारखीच त्यांची अवस्था झाल्यावांचून राहाणार नाहीं. पण नेहरूंच्या जागीं कुणीहि आला तरी ना. नंदांनीं सांगितल्याप्रमाणें नेहरूचें ध्येयधोरणच त्याला पुढें चालवावें लागणार व पं. नेहरूंच्या हातून सुटलेली ध्वजपताका झेलून त्यांचें काम पुढें चालवावें लागणार याबद्दल वाद नाहीं. राज्यसभेंत शिक्षणमंत्री ना. छगला यांनीं हृदय पिळवटून सांगितल्याप्रमाणें पं. नेहरूंच्या हिमालयासमान व्यक्तिमत्वापुढें सारेच खुजे ठरत आहेत. नेहरूंना आदरांजली वाहण्यासाठीं उंचावलेले हात त्यांच्यापर्यंत पोहोंचण्याइतपत उंच तरी झाले पाहिजेत. ती उंची कोणाचीच नसल्यामुळें त्यांच्या पायाशीं श्रद्धांजलि वाहण्याशिवाय भारतीय नेता मंडळीस गत्यंतर नाहीं. पण आकाशांत सर्व तेजानिशीं तळपणाऱ्या सूर्याला मानव पृथ्वीवर पाय ठेऊन अर्घ्यें अर्पण करतो, तेव्हां 'सो असौ असौ पुरुषः सोऽहमस्मि' असें म्हणून अर्घ्यदानाचा अधिकार सांगतो. आकाशांत तळपणाऱ्या त्या सूर्यनारायणाच्या तेजाचा अंश माझ्या ठिकाणीं आहे असें म्हणून मानवानें समान तेजाचें नातें सांगत सूर्यास अर्घ्यप्रदान करावें त्याप्रमाणें, 'नेहरूचें ध्येयधोरण तेंच आमचें ध्येयधोरण' असा समानधर्म सांगून भारत पं. नेहरूंना आदरांजलि अर्पण करीत आहे.

पं. नेहरुनिर्याणानंतर महात्मा गांधीनिर्याणाचा प्रसंग आठवणें अटळ आहे. महात्माजी संध्याकाळीं सव्वासहा वाजतां दिवंगत झाले व रात्रीं नेहरु–पटेलांचीं

भाषणें रेडिओवर झालीं. गांधींच्या हयातींतील शेवटच्या संध्याकाळपर्यंत नेहरु-पटेलांमधील वाद महात्माजींपर्यंत जात होते व नेहरु–पटेल हे एकत्र राहूं शकणार नाहींत असें वातावरण होतें. पण गांधीनिधनानंतर दोनतीन तासांत केलेल्या भाषणांत सरदार पटेल यांनीं 'यापुढें पं. नेहरु हे माझे नेते व मी त्यांचा एकनिष्ठ अनुदायी' असें जाहीर करतांच सारे वाद क्षणांत मिटले व दोन अचाट दिग्गजांनीं भारताचा जगन्नाथ रथ पुढें नेण्याची कामगिरी एकजुटीनें व एकदिलानें बजावली. नेहरूंच्या निधनानंतरचें वातावरण वेगळें आहे. नेहरूंच्या जागेसाठीं चुरस लागल्यासारखी दिसत आहे. नव्या नेत्याची निवड एकमतानें व्हावी म्हणून काँग्रेसचे अध्यक्ष श्री. कामराज नादर यांचे चाललेले प्रयत्न कितपत सफल होतात व काँग्रेस नेत्यांत कितपत निरपवाद एकजूट व दिलजमाई होईल तें सांगणें कठीण आहे. पं. नेहरूंनंतरचा भारतीय नेता एकमतानें निवडला जावो किंवा चुरशीचें मतदान होऊन बहुमतानें येवो, नव्या भारतनेत्यास नेहरूंची परंपरा, कर्तबगारी व ध्येयधोरण यांच्या चाकोरींतून मार्गक्रमण करावें लागेल हें निर्विवाद आहे

नवा नेता कोण निवडला जातो व काँग्रेस पार्लमेंटरी पक्षाच्या एकमतानें कीं बहुमतानें निवडला जातो इकडे स्वाभाविकच लोकांचें लक्ष लागून राहील. पण नेहरूंच्या जागीं हंगामी पंतप्रधान ना. नंदा येवोत, ना. शास्त्री येवोत, किंवा श्री. मोरारजीभाई देसाई येवोत, नव्या नेत्याचें स्थान म्हणजे एक कांटेरी आसन ठरणार हें निर्विवाद आहे. पं. नेहरूंचें ध्येयधोरण कोणालाहि पुढें चालवावें लागणारच, पण ध्येयधोरण स्थूलमानानें तेंच राहिलें तरी कालमान परिस्थिती-प्रमाणें तपशीलांत फरक पडणें अपरिहार्य होय. धोरणाची चौकट कायम ठेवून तपशीलाची नक्षी बदलणें ही एक फार मोठी जोखीम आहे. पं. नेहरूंचें व्यक्तिमत्व एवढें प्रचंड आणि प्रभावी होतें कीं सकृद्दर्शनीं देशाला अप्रिय वाटण्यासारखे निर्णयहि ते घेऊं शकत असत. तशी ताकद, हिंमत व धडाडी नव्या नेत्याच्या ठिकाणीं आढळेल किंवा यथाकाल प्रादुर्भूत होईल असें आज म्हणणें कठीण आहे. पं. नेहरूंच्या मागें एकटी कोणीच व्यक्ति देशाचें नेतृत्व करूं शकणार नाहीं, सामूहिक प्रज्ञेलाच असें नेतृत्व करावें लागेल असें श्रीमती इंदिरा गांधी अमेरिकेंतील मुलाखतींत म्हणाल्या होत्या. पण सामूहिक नेतृत्व ऊर्फ बारभाईंचा कारभार यशस्वी होतोच अशांतला भाग नाहीं. सुरुवातीचा एकोपा पुढें टिकत नाहीं आणि बारभाईंतच वैमनस्य सुरू होतें. स्टॅलीननंतर रशियाचें नेतृत्व करावयास मोलोटोव्ह-मॅलेनकोव्ह–बेरिया ही त्रिमूर्ति पुढें आली. पण हें त्रिगुणात्मक नेतृत्व टिकूं शकलें नाहीं. भारत हा तर विभूतिपूजक देश आहे. नवा नेता जो निवडला जाईल त्याला लोकमताच्या तारेवर कसरत करावी लागेल, ध्येयधोरणाचे तपशीलात्मक

फरक यथाकाळ करतांना झुकांडी जाणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी लागेल व स्वतःच्या पाठीशीं देशांतील व पक्षांतील हुकमी बहुमत ठेवून भारताची मान व शान ताठ राहील अशी कर्तबगारी गाजवावी लागेल. नेहरूंनीं मृत्युपूर्वी आपलें कागदोपत्री काम पुरें केलें. पण अनेक प्रश्न भारतांत अधांतरीं आणि अनिश्चित स्वरूपांत आहेत. या सर्वांचा यथोचित परामर्श घेऊन प्रत्येक प्रश्न रांकेला लावणारा व नेहरूंच्या ध्येयधोरणांत अंतर पडूं न देणारा नेता पं. नेहरूंच्या पुण्याईनें भारतास लाभेल व ध्येयधोरणाची तसेंच कर्तबगारीची अबाधित परंपरा कायम राहील असा आम्हांस भरंवसा वाटतो.

३१–५–६४

तटस्थतेचें धोरण–नेहरूंचें वेदवाक्य

पं. नेहरूंच्या महाप्रयाणास पांच दिवस उलटले असून जसजसे दिवस जातील तसतशी त्यांची उणीव व पोकळी जाणवणारी आहे. भावी मार्गक्रमण करतांना त्यांच्या कर्तबगारीचें व ध्येयधोरणाचें मननचिंतन करून भारतास पोकळी भरून काढावी लागणार आहे. पं. नेहरूंच्या आंतरराष्ट्रीय धोरणाचा भारताची तटस्थता हा अटळ पाया होता. अनुकूल-प्रतिकूल टीकांच्या भडिमारांतहि त्यांचा तटस्थतेच्या धोरणावरचा विश्वास कधीं डगमगला नाहीं. भारताचें तटस्थतेचें धोरण भारतास तारणारें आहे असा त्यांचा ठाम विश्वास होता. मुंबईतील ऑल इंडिया काँ. कमिटीच्या बैठकींत त्यांनीं दोन भाषणें केलीं. त्यांचें मुंबईचें दुसरें भाषण म्हणजे त्यांचें शेवटचेंच जाहीर भाषण होय. भारताच्या दृष्टीनें तें भाषण म्हणजे नेहरूंचें अंतिम वेदवाक्य होय. या भाषणांत पंडित नेहरूंनीं भारताच्या तटस्थतेच्या धोरणावर कटाक्षपूर्वक भर दिला. भारताचें तटस्थतेचें धोरण कालत्रयीं बदलणार नाहीं व भारताच्या क्षेमस्थैर्याच्या दृष्टीनें तें बदलतां कामा नये, असा तो एक निर्वाणीचा इशाराच होता. आंतरराष्ट्रीय धोरणाची व जागतिक गटांची जडणघडण कशी बदलत आहे आणि त्यायोगें भारताचें तटस्थतेचें धोरण कसें समर्थनीय

ठरलेलें आहे याचें विवेचन त्यांच्या या भाषणांत आढळतें. तटस्थता हा भारताचा स्थायीभाव, भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा व भारताच्या विश्वशांतीच्या ध्येयाचा एक अंगभूत घटक होय, अशी त्यांची श्रद्धा होती. भारतास नेहरूधोरणाच्या अंकित व नियंत्रित राहावयाचें असेल तर त्यांचें तटस्थतेचें धोरण भारतास बदलतां येणार नाहीं किंवा त्यापासून दूर होतां येणार नाहीं. नेहरूंचा तो अंतिम आदेश आहे असेंच म्हटलें पाहिजे.

नेहरूंचा तटस्थतावाद हा जसा तात्त्विक तसा व्यावहारिकहि होय. हा तटस्थतावाद निष्क्रिय व अकरणात्मक नाहीं तर जागतिक शांततेचा जसा कांहीं पाठीराखा आहे. कोणत्याहि जागतिक गटांत सामील न होणें म्हणजे तटस्थतावाद असें नेहरु मानीत नसत. तर दोनहि गटांपासून अलिप्त राहाणारी आणि दोनहि गटांना निर्वाणीच्या प्रसंगीं नैतिक आवर घालणारी शक्ति म्हणजे तटस्थता असें ते मानीत असत. एका जागतिक गटांत सामील होणें म्हणजे त्यांच्या मतें चूड दाखवून वाघ बोलावून घेण्यासारखेंच होय. रेड्या–पाड्याच्या झुंजेंत झाडाझुडपांचें मरण ओढवतें या न्यायानें दोन मोठ्या जागतिक गटांच्या झुंजेचा प्रसंग आला तर त्या गटांच्या आश्रित राष्ट्रांचा चुराडा प्रथम उडणार व 'न देवाय न धर्माय' असा आत्मनाश पत्करावा लागणार, हें ओळखून राष्ट्रसंरक्षणाच्या दृष्टीनेंहि पं. नेहरु तटस्थतावादाचा पुरस्कार करीत. जर दोनहि जागतिक गट हातघाईवर येऊन त्यांची झुंज लागली तर तटस्थ राष्ट्रांच्या वाटेस आपण होऊन कोणताच गट जाणार नाहीं व युद्धाच्या ज्वालांपासून तटस्थ राष्ट्रें सुरक्षित राहातील, असा नेहरूंचा व्यावहारिक दृष्टिकोन होता. नवजात, अविकसित राष्ट्रांचे आत्मोद्धाराचे प्रयत्न जर अखंड चालू राहावयास पाहिजे असतील तर कोणत्याहि जागतिक गटाचा संपर्क व संघर्ष नवजात राष्ट्रांनीं टाळला पाहिजे. अशा संपर्क-संघर्षाच्या परिणामीं लष्करी सुसज्जतेचा खर्चिक बोजा येऊन पडतो तो टाळून आत्मोद्धारासाठीं आपल्या सर्व शक्ती सतत वापरतां याव्यात या देशहितात्मक व्यवहारी दृष्टीनें पं. नेहरु तटस्थतेचा पुरस्कार करीत असत. म्हणजे नेहरुप्रणीत तटस्थता ही केवळ कोणत्याहि गटांत सामील न होण्याइतकी मर्यादित व अकरणात्मक नव्हती तर आत्मोद्धार व राष्ट्रीय अभ्युदय साधणारी एक युक्ति व शक्ति होय. त्याचप्रमाणें विश्वयुद्धविरोधी शांततावादी राष्ट्रांचें धोरण हें विश्वशांतीचें अधिष्ठान आहे अशी त्यांची श्रद्धा होती. तटस्थ राष्ट्रांची संघटना होऊन तिसरा जागतिक गट उभा होण्यांत त्यांना स्वारस्य वाटत नव्हतें. किंबहुना अशा तिसऱ्या जागतिक गटाच्या उभारणीस ते प्रतिकूल होते. पण स्वतंत्र नवजात राष्ट्रांनीं स्वयंप्रेरणेनें तटस्थतेचें व्रत पत्करून एक नैतिक शक्ति

निर्माण होतांच बलाढ्य जागतिक गटांचा न्याय करण्याचें नैतिक बळ तटस्थ राष्ट्रांच्या निर्णायक मतांत प्रकट होतें. विश्वाची सहानुभूति व अनुकूलता आपल्या बाजूला असावी अशी गरज दोनहि युध्यमान राष्ट्रांना वाटत असल्यामुळें तटस्थ राष्ट्रांचा कौल धुडकावण्यास कोणताच जागतिक गट तयार होणार नाहीं. अशा रीतीनें विश्वयुद्धाला आवर घालण्याचें काम तटस्थ राष्ट्रांच्या निर्णायक मतानें साधलें जाईल व विश्वशांतीची जपणूक करणारी ही एक शक्ति ठरेल असा पं. नेहरूंचा विश्वास होता. जागतिक शांततेला धोका येऊन नवराष्ट्रांच्या विकासास खो बसूं नये अशा व्यावहारिक दृष्टीनें व विश्वशांति चिरस्थायी करण्याच्या ध्येयात्मक दृष्टीनें पं. नेहरूंचा तटस्थतावाद भारतास व नवजात राष्ट्रांना उपकारक असाच ठरतो.

चीननें भारतावर आक्रमण केलें आणि भारताच्या तटस्थतेच्या धोरणावर चौफेर हल्ले कडाडून सुरू झाले. भारताच्या तटस्थतेनें कम्युनिस्ट राष्ट्राच्या आक्रमणापासून भारताचा बचाव झाला नाहीं आणि पाश्चात्य राष्ट्रांचीहि भरपेट मदत भारतास लाभूं शकली नाहीं. भारताचें तटस्थतेचें धोरण वांझोटें ठरल्यामुळें त्याचा त्याग करून भारतानें अमेरिकेच्या गोटाचा रस्ता धरावा असें सांगण्यांत येऊं लागलें. पण पं. नेहरूंनीं वारंवार स्पष्ट केल्याप्रमाणें चिनी आक्रमणामुळें उभ्दवलेल्या घातुक परिस्थितींत भारतीय तटस्थतेच्या धोरणानें भारत आक्रमण-काळांतून सहीसलामत पार पडलें. भारत जर तटस्थ राष्ट्र नसतें तर रशियानें चीनवर आक्रमणविरोधी नैतिक दडपण आणून चीनला आक्रमण परत घेण्याला भाग पाडलें नसतें. तसेंच भारतास रशियाचा मिग विमानांचा कारखानाहि मिळूं शकला नसता व भारत-विकासार्थ रशियाचें आर्थिक साहाय्यहि होत राहिलें नसतें. भारत जर कम्युनिस्ट गोटांत असता तर पाश्चात्य राष्ट्रांची शस्त्रास्त्रांची तत्काळ मदत भारतास लाभली नसती. उलटपक्षीं चीनच्या आक्रमणाच्या निमित्तानें भारताची रणभूमि बनवून जागतिक युद्ध भारतांत लढलें गेलें असतें व भारताची धूळधाण उडण्याचा प्रसंग ओढवला असता. पण भारत तटस्थ राष्ट्र असल्यामुळें उभय जागतिक गट अशा थराला न जातां त्यांची सहानूभूति भारताकडे राहिली. चिनी आक्रमणांतून उभ्दवूं शकणाऱ्या एका महान अरिष्टांतून भारताचा तटस्थ धोरणामुळें बचाव झाला, इतकेंच नव्हे तर चिनी आक्रमणाचा परामर्श नैतिक पातळीवर घेतला जाऊन रशियासकट सर्व राष्ट्रांच्या धिःकारास चीन पात्र ठरलें व भारताकडे जगांतील सहानुभूतीचा ओघ वाहात राहिला. भारतीय तटस्थतेचें धोरण आणीबाणीच्या परिस्थितींतहि उपकारकच ठरलें आहे व जागतिक गट मात्र ढेपाळूं व भेंगाळूं लागलेले दिसत आहेत. नेहरुप्रणीत तटस्थता ही भारतास नेहरूंची एक अमूल्य व काळाच्या कसोटीला उतरलेली महान देणगी होय. या

तटस्थतेचा ध्यास शेवटच्या घटकेपर्यंत पं. नेहरूंना स्वाभाविकच लागला होता. तत्त्व व व्यवहार या दोनहि कसोट्यांना उतरणारें नेहरुप्रणीत तटस्थतेचें धोरण भारतानें नेहरूंची पवित्र स्मृति म्हणून निष्ठापूर्वक जीवाभावानें संभाळावें व त्याचें पालन करावें हें चिरंतन नेहरुस्मरणाच्या दृष्टीनें अपरिहार्य होय.

१-६-६४

अण्वस्त्राची तयारी हा ईश्वरी प्रसाद

भारताचे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांनीं लोकसभेंत प्रश्नोत्तरांच्या वेळीं अणुबाँब तयार करण्याची भारताची तयारी कशी जय्यत आहे याची माहिती दिली आहे. अणुबाँब तयार करण्याचे मूलभूत तात्त्विक सिद्धान्त भारतास माहीत आहेत पण अणुबाँब करण्याचें भारताचें धोरणच नसल्यामुळें भारतानें अणुबाँब-सिद्धीचा प्रत्यक्ष तपशील संपादिलेला नाहीं. तो मिळविण्यास भारतास एक वर्ष लागेल. अणुबाँब तयार करण्यास लागणारें प्लुटोनियम भारतांत निर्माण होतें. इतकी सर्व सिद्धता असतांनाहि अणुबाँब तयार करण्याचें भारताचें धोरण नसल्यामुळें अणुबाँब तयार कसा करावा याचें ज्ञान संपादन करण्याच्या भानगडींत भारत पडतच नाहीं असें पंतप्रधान ना. शास्त्री यांनीं सांगितलें आहे. भारताचे राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् यांनींहि रशियांत एका प्रसंगीं भाषण करतांना भारत मनांत आणील तर चीनपूर्वी अणुबाँब तयार करील व चीनचा अणुबाँब त्यानंतर कांहीं वर्षांनीं तयार होईल असें तज्ञांचें मत असल्याचें सांगितलें आहे. अणुबाँब तयार करण्याच्या कामीं भारत जसा कांहीं सिद्धहस्त आहे व चीन पुष्कळच मागें आहे. पण ससा व कासव यांच्या शर्यतींत भारतानें अणुबाँबबाबत झोंप काढून चीनला पुढें जाऊं देण्याचें व चीननें अणुबाँबची शर्यत जिंकल्यावर चीनपुढें नतमस्तक होण्याचें ठरविलें आहे असा पंतप्रधान व राष्ट्रपति यांच्या ताज्या निवेदनाचा अर्थ होतो. भारत विधायक कार्यासाठीं अणुशक्ति निर्माण करण्याच्या तंत्रांत एवढा पुढें गेला आहे आणि या तंत्राचा वापर करून अण्वस्त्र वर्षभराच्या काळांत तयार करणें भारतास शक्य असलें तरी तसें करणें हा विश्वद्रोह आहे.

भारत असें विश्वासघातकी धोरण पत्करणार नाहीं त्याचप्रमाणें अणुबाँब तयार करण्याच्या ईर्षेनें अचाट खर्च करणें भारतास शक्य नाहीं. तांत्रिक माहिती व वास्तवता या दृष्टीनें भारतानें अणुबाँबचा नादच सोडला आहे. भारताचें हें अणुविषयक धोरण केव्हांहि स्पृहणीय ठरणारें असलें तरी चीनच्या आक्रमक व अणुबाँब तयार करून आशियांत धाकदपटशाचें धोरण तयार करण्याच्या ईर्षेकडे पहाता भारताची अणुबाँबबाबतची उदासीनता ही आत्मघातकी व आशियाद्रोही ठरते. शांततेच्या मिथ्यावादाच्या आहारीं जाऊन भारत असें पापाचरण मोठ्या प्रौढीनें करीत आहे हें एक दुर्दैवच म्हटलें पाहिजे.

दुसरें महायुद्ध संपतां संपतां अण्वस्त्रसिद्ध होण्याची चुरस बड्या युध्यमान राष्ट्रांमध्यें लागली होती. या चुरशींत अमेरिकेनें आघाडी मारली व अण्वस्त्रांचा उपयोग करून जपानी आक्रमण मोडून काढलें. त्यावेळीं उदार व अनाक्रमक धोरणाच्या अमेरिकेच्या हातीं अण्वस्त्र आलें हा एक परमेश्वरी कृपाप्रसादच मानला गेला. हेंच अण्वस्त्र जर प्रथम जर्मनीच्या हातीं लागलें असतें तर दोस्त राष्ट्रांची धूळधाण करण्यास हिटलरच्या जर्मनीनें सोडलें नसतें. रशियानें दुसऱ्या महायुद्धांत संपादन केलेल्या लढाऊ शक्तीच्या जोरावर पूर्व युरोप ग्रासलें आणि जर रशियाच्या हातीं अण्वस्त्र सर्वांत अगोदर लागलें असतें तर केवळ युरोपच काय, पण साऱ्या जगाला आपल्या पायाशीं लोळण घ्यावयास लावून लाल रंग फासण्यास रशियानें कमी केलें नसतें. अमेरिकेच्या मागून रशियानें अण्वस्त्रसिद्धि प्राप्त करून घेतली व अमेरिकेजवळ कितीतरी अधिक अण्वस्त्रसंचय आहे हें माहीत असतांनाहि पश्चिम युरोपची राखरांगोळी करण्याचा धाक रशिया प्रसंगोपात घालीत असतो. अणुबाँबच्या हल्ल्याच्या धाकदपटशाखालीं सतत राहाणें, संरक्षणासाठीं अमेरिकेकडे डोळे लावून बसणें हें फ्रान्सच्या स्वाभिमानास पटण्यासारखें नसल्यामुळें फ्रान्सहि अण्वस्त्रधारी झाल्यासारखा आहे. अणुबाँबची टक्कर होऊन अमेरिकन स्वास्थ्यास रशियन अण्वस्त्रांकडून धोका पत्करण्याऐवजीं अमेरिका रशियाशीं साटेंलोटें करण्यास व युरोपचा घास रशियाला चारण्यास कशावरून तयार होणार नाहीं, अशा शंकेनें फ्रान्सनें संरक्षण-स्वावलंबन संपादन करण्यासाठीं सर्व संपत्ति अणुबाँबच्या निर्मितीसाठीं वेचण्याचें ठरविलें आहे. म्हणजे अमेरिकेच्या हातचा अणुबाँब हा विश्वसंरक्षक आहे अशी खातरजमा फ्रान्सला वाटत नाहीं. तथापि अमेरिकेच्या हातीं दुसरें महायुद्ध समाप्त व्हावयाच्या सुमारास प्रथम अण्वस्त्र लागलें व अण्वस्त्र उत्पादनांत अचाट प्रगति अमेरिकेनें केल्यावर रशियाला अण्वस्त्रविद्या साध्य झाली, हा विश्वाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें ईश्वरी संकेतच समजला जातो.

तटस्थतेचा ध्यास शेवटच्या घटकेपर्यंत पं. नेहरूंना स्वाभाविकच लागला होता. तत्त्व व व्यवहार या दोनहि कसोट्यांना उतरणारें नेहरुप्रणीत तटस्थतेचें धोरण भारतानें नेहरूंची पवित्र स्मृति म्हणून निष्ठापूर्वक जीवाभावानें संभाळावें व त्याचें पालन करावें हें चिरंतन नेहरुस्मरणाच्या दृष्टीनें अपरिहार्य होय.

१-६-६४

अण्वस्त्राची तयारी हा ईश्वरी प्रसाद

भारताचे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांनीं लोकसभेंत प्रश्नोत्तरांच्या वेळीं अणुबाँब तयार करण्याची भारताची तयारी कशी जय्यत आहे याची माहिती दिली आहे. अणुबाँब तयार करण्याचे मूलभूत तात्त्विक सिद्धान्त भारतास माहीत आहेत पण अणुबाँब करण्याचें भारताचें धोरणच नसल्यामुळें भारतानें अणुबाँब-सिद्धीचा प्रत्यक्ष तपशील संपादिलेला नाहीं. तो मिळविण्यास भारतास एक वर्ष लागेल. अणुबाँब तयार करण्यास लागणारें प्लुटोनियम भारतांत निर्माण होतें. इतकी सर्व सिद्धता असतांनाहि अणुबाँब तयार करण्याचें भारताचें धोरण नसल्यामुळें अणुबाँब तयार कसा करावा याचें ज्ञान संपादन करण्याच्या भानगडींत भारत पडतच नाहीं असें पंतप्रधान ना. शास्त्री यांनीं सांगितलें आहे. भारताचे राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् यांनींहि रशियांत एका प्रसंगीं भाषण करतांना भारत मनांत आणील तर चीनपूर्वी अणुबाँब तयार करील व चीनचा अणुबाँब त्यानंतर कांहीं वर्षांनीं तयार होईल असें तज्ज्ञांचें मत असल्याचें सांगितलें आहे. अणुबाँब तयार करण्याच्या कामीं भारत जसा कांहीं सिद्धहस्त आहे व चीन पुष्कळच मागें आहे. पण ससा व कासव यांच्या शर्यतींत भारतानें अणुबाँबबाबत झोंप काढून चीनला पुढें जाऊं देण्याचें व चीननें अणुबाँबची शर्यत जिंकल्यावर चीनपुढें नतमस्तक होण्याचें ठरविलें आहे असा पंतप्रधान व राष्ट्रपति यांच्या ताज्या निवेदनाचा अर्थ होतो. भारत विधायक कार्यासाठीं अणुशक्ति निर्माण करण्याच्या तंत्रांत एवढा पुढें गेला आहे आणि या तंत्राचा वापर करून अण्वस्त्र वर्षभराच्या काळांत तयार करणें भारतास शक्य असलें तरी तसें करणें हा विश्वद्रोह आहे.

भारत असें विश्वासघातकी धोरण पत्करणार नाहीं त्याचप्रमाणें अणुबाँब तयार करण्याच्या ईर्षेनें अचाट खर्च करणें भारतास शक्य नाहीं. तांत्रिक माहिती व वास्तवता या दृष्टीनें भारतानें अणुबाँबचा नादच सोडला आहे. भारताचें हें अणुविषयक धोरण केव्हांहि स्पृहणीय ठरणारें असलें तरी चीनच्या आक्रमक व अणुबाँब तयार करून आशियांत धाकदपटशाचें धोरण तयार करण्याच्या ईर्षेकडे पहाता भारताची अणुबाँबबाबतची उदासीनता ही आत्मघातकी व आशियाद्रोही ठरते. शांततेच्या मिथ्यावादाच्या आहारीं जाऊन भारत असें पापाचरण मोठ्या प्रौढीनें करीत आहे हें एक दुर्दैवच म्हटलें पाहिजे.

दुसरें महायुद्ध संपतां संपतां अण्वस्त्रसिद्ध होण्याची चुरस बडया युध्यमान राष्ट्रांमध्यें लागली होती. या चुरशींत अमेरिकेनें आघाडी मारली व अण्वस्त्रांचा उपयोग करून जपानी आक्रमण मोडून काढलें. त्यावेळीं उदार व अनाक्रमक धोरणाच्या अमेरिकेच्या हातीं अण्वस्त्र आलें हा एक परमेश्वरी कृपाप्रसादच मानला गेला. हेंच अण्वस्त्र जर प्रथम जर्मनीच्या हातीं लागलें असतें तर दोस्त राष्ट्रांची धूळधाण करण्यास हिटलरच्या जर्मनीनें सोडलें नसतें. रशियानें दुसऱ्या महायुद्धांत संपादन केलेल्या लढाऊ शक्तीच्या जोरावर पूर्व युरोप ग्रासलें आणि जर रशियाच्या हातीं अण्वस्त्र सर्वांत अगोदर लागलें असतें तर केवळ युरोपच काय, पण साऱ्या जगाला आपल्या पायाशीं लोळण घ्यावयास लावून लाल रंग फासण्यास रशियानें कमी केलें नसतें. अमेरिकेच्या मागून रशियानें अण्वस्त्रसिद्धि प्राप्त करून घेतली व अमेरिकेजवळ कितीतरी अधिक अण्वस्त्रसंचय आहे हें माहीत असतांनाहि पश्चिम युरोपची राखरांगोळी करण्याचा धाक रशिया प्रसंगोपात घालीत असतो. अणुबाँबच्या हल्ल्याच्या धाकदपटशाखालीं सतत राहाणें, संरक्षणासाठीं अमेरिकेकडे डोळे लावून बसणें हें फ्रान्सच्या स्वाभिमानास पटण्यासारखें नसल्यामुळें फ्रान्सहि अण्वस्त्रधारी झाल्यासारखा आहे. अणुबाँबची टक्कर होऊन अमेरिकन स्वास्थ्यास रशियन अण्वस्त्रांकडून धोका पत्करण्याऐवजीं अमेरिका रशियाशीं साटेंलोटें करण्यास व युरोपचा घास रशियाला चारण्यास कशावरून तयार होणार नाहीं, अशा शंकेनें फ्रान्सनें संरक्षण-स्वावलंबन संपादन करण्यासाठीं सर्व संपत्ति अणुबाँबच्या निर्मितीसाठीं वेचण्याचें ठरविलें आहे. म्हणजे अमेरिकेच्या हातचा अणुबाँब हा विश्वसंरक्षक आहे अशी खातरजमा फ्रान्सला वाटत नाहीं. तथापि अमेरिकेच्या हातीं दुसरें महायुद्ध समाप्त व्हावयाच्या सुमारास प्रथम अण्वस्त्र लागलें व अण्वस्त्र उत्पादनांत अचाट प्रगति अमेरिकेनें केल्यावर रशियाला अण्वस्त्रविद्या साध्य झाली, हा विश्वाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें ईश्वरी संकेतच समजला जातो.

आज आशियांतील परिस्थिति पाहतां आक्रमक चीनच्या हातीं अण्वस्त्र प्रथम द्यावयाचें कीं अनाक्रमण व लोकशाही शांततेचें व्रत घेतलेल्या भारतानें अण्वस्त्र चीनच्या अगोदर हातीं घ्यावयाचें असाच एक प्रकारें प्रश्न उपस्थित झाला आहे. चीनच्या हातीं जर आशियांत प्रथम अण्वस्त्र आलें तर भस्मासुराला वरदान मिळाल्यासारखेंच होईल व आशियांतील राष्ट्रें चीनपुढें चळचळां कांपूं लागतील. अर्थात् आशियांत चीन म्हणेल तें धोरण व तोरण ठरेल. अशा परिस्थितींत हातांत अण्वस्त्र घेऊन चीन भारतावर किंवा आग्नेय आशियावर धांवून आला तर अमेरिकेचीं अण्वस्त्रें चीनवर धांवून जातील अशी आशा वाजवी ठरेल. पण फ्रान्सला ज्या कारणासाठीं आज अमेरिकेचीं अण्वस्त्रें बेभरंवशाचीं वाटतात त्याच कारणामुळें भारतास किंवा आशियाई राष्ट्रांस चीनविरुद्ध अमेरिकन अणुबाँबचा भरंवसा धरतां येणार नाहीं. रशियाशीं अमेरिकेचें साटेंलोटें होऊन युरोपचा बळी पडेल असें ज्याप्रमाणें फ्रान्सला वाटतें, त्याच न्यायानें अमेरिकेनें आशियाचा नाद सोडावा व दक्षिण अमेरिकेच्या वाटेस चीननें जाऊ नये अशी व्यवस्था चीन-अमेरिकेच्या दरम्यान होणार नाहीं कशावरून ?

शस्त्रधाऱ्यांचे संबंध हे पाण्यापेक्षांच नव्हे तर रक्तापेक्षांहि जड असतात. आज भारतास स्वसंरक्षणासाठीं अमेरिकेकडून सुपरसॉनिक विमानेंहि मिळूं शकत नाहींत व दारोदार माधुकरी मागावी लागते हें लक्षांत घेतां अण्वस्त्रधारी चीनचें आक्रमण झालें तर अमेरिका भारतास बचावील अशी अपेक्षा समर्थनीय ठरत नाहीं. अण्वस्त्र प्रथम अमेरिकेच्या हातीं आलें हा जसा एक परमेश्वरी प्रसाद होय, त्याचप्रमाणें आज आशियांत शांततावादी व अनाक्रमक भारताच्या हातीं अण्वस्त्र येणें हाहि एक परमेश्वरी प्रसादच आशियाई सुरक्षितता व जागतिक शांततेच्या दृष्टीनें ठरल्याशिवाय राहात नाहीं. परमेश्वरी कृपा भारतावर असल्यामुळें जणुं कांहीं हें वरदान भारतास करण्यास परमेश्वर उत्सुक झाला आहे. चीनच्याहि अगोदर अण्वस्त्र सिद्ध करण्याइतकी भारताची तयारी आहे. अणुबाँबच्या रूपांत भारतावर अनुग्रह करण्यास परमेश्वर जसा कांहीं ताटकळून राहिला आहे आणि शांततावादाच्या भ्रामक कैफांत भारत परमेश्वरी वरदहस्त चुकवीत आहे असें शास्त्री व राधाकृष्णन् यांचें निवेदन सांगत आहे. आशियाई व जागतिक शांततेची जोखीमदारी ज्याच्यावर येऊन पडते व संरक्षण स्वावलंबी होण्यावांचून ज्यास गत्यंतर नाहीं तो भारत पायाशीं लोळण घेत येणारा अणुबाँब हातांत घेण्यास तयार नाहीं हें भारताचें व जागतिक शांततेचेंहि दुर्दैवच म्हटलें पाहिजे. भारताचें धोरण कांहींहि असलें तरी काळाचा संकेतच

असा दिसतो कीं अणुबाँब हातीं घेण्याशिवाय यथाकाळ भारतास गत्यंतर नाहीं. पुढेंमागें अण्वस्त्र हातीं घेण्याचा मार्ग पत्करणें भारतास भाग आहे व काळ तसें करण्यास भारतास भाग पाडल्याशिवाय राहाणार नाहीं.

१६-९-६४

ताश्कंदची समाप्ति कशीवशी साधली

ताश्कंदचीं भारतपाक बोलणीं अखेर सोमवारीं संपलीं आहेत. रविवारच्या दिवसांत रशियन पंतप्रधान कोसिजिन यांनीं पंतप्रधान ना. शास्त्री व अध्यक्ष अयूब यांच्या ज्या तीनतीनदां भेटी घेतल्या त्या घोंगडीवर काढलेल्या ताश्कंद परिषदेचा अंत्यविधि रीतसर पार पडावा यासाठींच होत्या. ताश्कंद परिषद यशस्वी व्हावी म्हणून कोसिजिन यांनीं जंग जंग पछाडले. आपले आठ बहुमोल दिवस या परिषदेची शुश्रूषा करण्यात घालविले व गंडांतर टळून परिषद शिरसलामत बाहेर पडावी म्हणून शिकस्त केली. ताश्कंद वाटाघाटींतून पाक भारत नायुद्ध करार होत नाहीं तर किमान संयुक्त पत्रक तरी निघावें व परिषदेच्या मुखीं तितपत गंगाजळ घालण्यांत यावें असा शिष्टाचार कोसिजिन यांना अपेक्षित होता. पण पाकचे प्रवक्ते श्री. गौहर यांनीं संयुक्त घोषणेचा मसुदा म्हणजे कागदाचा कपटा असा उल्लेख केला व गंगाजळाऐवजीं जणुं कांहीं ताश्कंद परिषदेच्या मुडद्यावर पचकन थुंकण्याचें शतकृत्य त्यांनीं केलें. परिषद यशस्वी झाली नाहीं तरी रीतसर समाप्तीची बैठक घेऊन मामुली उपचार पार पाडावेत व परिषदेस मंत्राग्नि देण्यांत यावा इतपत अपेक्षा परिषदेचे धर्मपिते असलेल्या रशियन नेत्यांची असणारच. पण मरणान्तानि वैराणि हा धर्म पाळण्यासहि पाकची तयारी नव्हती. औपचारिक परस्पर धन्यवाद, सामोपचार व तांत्रिक शांतिमंत्रहि न म्हणतां जणुं कांहीं बेवारशी मुडद्याला लांबून बगल देऊन पाक नेते ताश्कंदहून परतत होते. ताश्कंदच्या बाबतींत कसलाच शिष्टाचार पाळला न जातां ताश्कंद परिषद शेवटची उचकी देत आहे व जळक्या नौकेवरून भराभर सर्वांनीं पळ काढतांच बोट ओस पडावी त्याप्रमाणें ताश्कंद ओस

पडत होतें. समारोपाची तोंडदेखली बैठक नाहीं, शांततेचा करार नाहीं, संयुक्त घोषणा नाहीं किंवा निवेदन नाहीं. चार औपचारिक नक्राश्रूहि न ढाळतां, खेद-खिन्नता व्यक्त न करतां व अंतिम तिलांजलीहि न देतां ताश्कंद परिषद संपुष्टांत येत होती. पण शेवटच्या दिवशीं जेमतेम शिष्टाचार पाळण्याइतपत संयुक्त घोषणा व निरवानिरवीची बैठक ताश्कंदला झाली व ताश्कंदची बोळवण झाली.

ताश्कंदची ही एक प्रकारें दारुण शोकांतिकाच आहे. पाक भारत संबंधाची पार्श्वभूमि पाहतां ताश्कंद परिषदेचा असा मुडदा पडणें हें अटळहि होतें. भारत-पाक शांततांकरार होण्यासारखा आहे किंवा नाहीं याचा बरोबर अंदाज कोसिजिन यांनीं न घेतां ताश्कंदचा मांड मांडला व त्यांच्या पदरीं अपेश पडलें. अशा प्रकारें ताश्कंदचे वासे मोजून कोसिजिन यांच्या शिष्टाईची टर करण्याचा कृतघ्नपणाहि ताश्कंदवरच्या अंतिम भाष्यांत डोकावत आहे. सद्यस्थितींत भारतपाक शांतताकरार होण्यासारखा नव्हता व तो घडवून आणण्याची खास योजनाहि कोसिजिन यांच्या खिशांत नव्हती. मग यांना ताश्कंदचे उपद्व्याप सांगितले होते कोणी, असें उटावरचें शहाणपण मिरविण्यास फारशी बुद्धिमत्ता किंवा अक्कल लागतेच अशांतला भाग नाहीं. विश्वकार्य साधण्याच्या प्रत्येक शिष्टाईचें असें हंसें अतिशहाण्यांकडून होत असतें. पण कोसिजिन यांनीं ताश्कंद परिषद यशस्वी व्हावी म्हणून शिकस्त केली व सामोपचारी शिष्टाईंत कसूर केली नाहीं. घरचें खाऊन भारतपाकच्या भाकऱ्या भाजण्याचा हा परोपकार सार्थकीं लागला नसला तरी त्यामागले हेतू व कसोशीचे प्रयत्न वादातीत असून त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. ताश्कंद परिषद अपेशी ठरली व त्यांत फारसें अनपेक्षित असें कांहीं नाहींहि. पण या अपेशानें शिष्टाईचें पर्व संपुष्टांत आलें असून निर्वेध असें उद्योगपर्व सुरू होत आहे. ताश्कंद परिषदेची ही फलश्रुतीहि स्वागतार्ह नाहीं असें म्हणतां येणार नाहीं.

काश्मीर प्रश्न पाकच्या मताप्रमाणें न्याय्य व समाधानकारक रीतीनें सुटल्याशिवाय भारताशीं करार वगैरे कांहीं नाहीं व युद्धमार्गहि पाक वर्ज्य करणार नाहीं ही पाकची भूमिका पूर्वापार परंपरेप्रमाणें ताश्कंद येथेंहि कायम राहिली व काश्मीरच्या बाबतींत कसलीहि तडजोड किंवा देवाणघेवाण नाहीं असा भारताचा अढळ पवित्रा होता. उत्तर दक्षिण ध्रुवांसारख्या अशा दोन टोकांच्या भूमिका भारत पाकच्या असल्यामुळें दोन ध्रुव एकत्र आणणें कोसिजिन यांना शक्य झालें असतें तरच तें जगांतील एक आश्चर्य ठरलें असतें. काश्मीरचा मंत्र जपतच पाक नेते ताश्कंदला पोहोंचले व ताश्कंद सोडीपर्यंत काश्मीरशिवाय दुसरा कसला उच्चार त्यांनीं केला नाहीं. कांहींहि करून ताश्कंद फलद्रूप व्हावें म्हणून शिकस्तीचे प्रयत्न ताश्कंदला झाले व पर्यायहि चर्चिले गेले. भारतपाक वाद प्रश्न शस्त्रबळाचा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत.

आश्रय न करतां सोडविण्यास व ना युद्ध करारास पाकनें मान्यता द्यावी म्हणून जितका हात पुढें करणें शक्य होतें तेवढा करण्यास भारतानें अनमान केला नाहीं. हाजीपीर व टिथवल भागांत व लाहोर भागांत असलेलें भारतीय सैन्य काढून घेण्यास व पाकला तो नजराणा देण्यासहि एक प्रकारचा धोका पत्करून, ना. शास्त्री यांनीं तयारी दाखविली होती.

ना युद्ध करार झाल्याशिवाय हाजीपीर व टिथवल भागांतून भारतीय सैन्य परत घेणें म्हणजे पाक आक्रमणासाठीं दिंडी दरवाजा मोकळा करून देण्यासारखें असल्यामुळें ना युद्ध कराराचा स्वाभाविकच ना. शास्त्री यांनीं आग्रह धरला होता. ना युद्ध कराराचा विचार करण्यास अध्यक्ष आयूब तयार झाल्यासारखे दिसत होते. पण त्यापूर्वी काश्मीर प्रश्न प्रत्यक्ष सुटला नाहीं तरी काश्मीर वाटाघाटी करण्याबाबतची यंत्रणा भारत पाक करारांत नोंदवून ती भारतानें मान्य करावी, म्हणजे शब्दांत तरी काश्मीर हा वादप्रश्न व देवाणघेवाणीचा मुद्दा असल्याचें भारतानें मान्य करावें अशी त्यांची अट होती. काश्मीर हा वादप्रश्न आहे, असें ना युद्ध करार साध्य करावयास काय हरकत आहे असें दडपण भारतावर स्वाभाविकच शिकस्तीचें येत होतें व उभयपक्षांकडून तशी कांहीं तोड निघाली असती तर कोसिजिन यांनाहि कृतार्थता वाटण्यासारखी होती. पण ना. शास्त्री यांनीं कसल्याहि दडपणास बळी न पडतां व शाब्दिक चक्रव्यूहांत न सापडतां काश्मीरबद्दलची खंबीर भूमिका शेवटपर्यंत कायम ठेवली, त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच होत. सैन्यें परत घेणें, शस्त्रबंदी यांसारख्या सूचना ताश्कंदला खेळविण्यांत आल्या पण पाक भारत आपापल्या भूमिकेवर अडग असल्यामुळें अखेर ताश्कदला भडाग्नि मिळत आहे.

ताश्कंद अपेशी ठरलें पण भारताचा पुढचा मार्ग स्पष्ट झाला आहे. ताश्कंद वाटाघाटी सुरू असतांना लाल चीननें एक कडक खलिता भारतास पाठविला. तत्काळ गालांतल्या गालांत जीभ घोळवून बोलणारे पाक नेते कणसाच्या बुरखंड्यांसारखे ताठ होऊन ताश्कंदबाबत समारोपाचे शिष्टाचारहि उधळून लावण्याइतके बेताल जसे कांहीं झाले. अमेरिका ब्रिटनच्या आग्रहास्तव नेहरूंच्या अमदानींत भारत पाक बोलणीं हप्त्याहप्त्यानें सुरू होतीं व काश्मीरबाबतचा प्रत्येक पर्याय चर्चिला जाऊनहि त्या वाटाघाटी अपेशी झाल्या. नेमक्या त्याच ठिकाणीं काश्मीरची ठेंच लागून ताश्कंद परिषद कोलमडली व गतप्राण झाली आहे. चीनपासून पाकला अलग पाडण्याचा ताश्कंदचा प्रयोग फसला आहे व या पुढच्या पाक हालचाली चीनच्या संगनमतानें होणार असें स्पष्ट दिसत आहे. म्हणजे पाक व चीनच्या शस्त्रांना व उपद्व्यापांना पुरून उरेल इतकें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत.
क्रमांक ६५८२५ दि. [illegible]

शस्त्रबळ उभें करण्याशिवाय भारतास सत ना गत असा ताश्कंदचा अंतिम बोधपाठ आहे. भारताच्या दृष्टीनें अत्यंत मोलाचा व कालोचित असा हा ताश्कंदचा बोधपाठ असून, अणुबाँब तयार करण्यापर्यंत मजल गांठून भारतानें पाकचीन यूतीवर मात करण्यासारखें शस्त्रबळ उभें केलें पाहिजे. त्या कामीं सर्व सहजीवनवादी व लोकशाहीवादी राष्ट्रांनीं भारतास उपकारक ठरलें पाहिजे, असेंच ताश्कंद भारतास व जगास बजावत आहे.

११–१–६६

शांतिदूत शास्त्रींचा मृत्यु व अमर कार्य

भारताचे पंतप्रधान ना. लालबहादुर शास्त्री यांचें ताश्कंद येथें सोमवारीं मध्यरात्रीनंतर हृदयविकाराचा झटका येऊन अकस्मात् निधन झालें व भारतावर अत्यंत दारुण आघात यमदंडानें केला आहे. ना. शास्त्री यांचा सोमवारचा दिवस अत्यंत घाईगर्दीचा व गडबडीचा गेला. ताश्कंदचीं भारत पाक बोलणीं जवळजवळ फिसकटल्यासारखीं होतीं. ताश्कंद तपश्चर्या व्यर्थ जाऊं नये म्हणून कोसिजिन यांचे अंतिम प्रयत्न सुरू होऊन रविवारीं मध्यरात्रीं कोंडी फुटल्यासारखी झाली होती. ही कोंडी फोडण्याचे कामीं कोसिजिन यांना जीवापाड साहाय्य ना. शास्त्री यांचें झालें होतें. सोमवारीं शास्त्री आयूब भेटींत ताश्कंद घोषणेचा अंतिम तर्जुमा उभयपक्षीं मान्य असा तयार झाला व दुपारीं चार वाजतां त्यावर कोसिजिन यांच्या हजेरींत सह्या होऊन ताश्कंद वाटाघाटींना अपूर्व यश लाभलें. नऊ कलमी ताश्कंद घोषणेवर शास्त्री आयूब ह्यांच्या सह्या झाल्यावर कोसिजिन यांनीं दिलेल्या मेजवानीस ना. शास्त्री हजर होते. त्यांची तब्येत ताश्कंद मुक्कामांत उत्तम होती व ताश्कंदला यश मिळवून एक प्रकारच्या कृतकृत्य मनःस्थितींत ते होते. ताश्कंद शिखर परिषदेंत यशाचें शिखर त्यांनीं गांठलें होतें व भारताकडे प्रयाण करण्यास ते मंगळवारीं ताश्कंदहून निघणार होते. त्यांच्या प्रचंड स्वागताची तयारी दिल्लींत सुरू होती व कॉ. वर्किंग कमिटींत

ते ता. १४ रोजीं ताश्कंदबद्दल निवेदन करणार होते. पुढचे बातबेत व कार्यक्रम आंखण्यांत येत होते व काळपुरुष निराळाच व्यूह रचून बसला होता. ताश्कंद करारावर सोमवारीं दुपारीं केलेल्या सह्यांची शाई वाळण्यापूर्वीच ना. शास्त्री यांना काळपुरुषानें उचललें व शास्त्रीस्वागताऐवजीं भारतभर शास्त्री दुखवटा कोंदटून राहिला आहे. ताश्कंदच्या यशस्वी शिखरावरून ना. शास्त्री हे सर्वोच्च परमेश्वरी शक्तीशीं विलीन पावले आहेत. ना. शास्त्री यांच्या स्वागतार्थ त्यांच्या पत्नी ललितादेवी या निरांजनें पेटवून प्रसन्न मुद्रेनें तबक सिद्ध करीत होत्या, पण यमदेवता त्याच वेळीं त्यांच्या ललाटीचा ठसठशीत कुंकुमतिलक पुसून टाकीत होता. सोमवारीं रात्रीं आपल्या निवासस्थानीं परतल्यावर ना. शास्त्री यांनीं निवांतपणें भोजन केलें व त्यांचा थकलाभागलेला देह बिछान्यावर आडवा होतो न होतो तोंच त्यांना जबरदस्त खोकल्याची उबळ येऊन त्यांचा जीव घाबरा झाला. शेजारच्या खोलींतील डॉक्टरपर्यंत ते जातात तोंच ते खालीं कोसळले व थोडयाच वेळांत त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. भारतानें ताश्कंदचा नऊ कलमी करार साध्य केला पण शास्त्रींचे पंचप्राण गमावले आहेत. भारतपाक सलोखा झाला पण शास्त्री गेले, याची हळहळ भारतालाच नव्हे तर जगाला वाटत असून त्यांच्या मृत्यूनें जग स्तिमित व विव्हळ आहे.

ना. शास्त्री यांचा मृत्यु जसा अकस्मात् व अद्भुत म्हणतां येईल तशीच त्यांच्या जीवनाची एकूण जडणघडणहि अद्भुत अशीच म्हणण्यास हरकत नाहीं. १९०४ सालीं त्यांचा जन्म झाला व दीड वर्षांतच त्यांचें पितृछत्र नाहींसें झालें. त्यानंतर दारिद्र्य-कष्टांत त्यांनीं विद्याभ्यास पुरा केला पण त्यांतहि १९२० सालच्या असहकार चळवळींत त्यांनीं कॉलेज सोडल्यामुळें व्यत्यय आल्याशिवाय राहिला नाहीं. सोळाव्या वर्षापासून काँग्रेसच्या चळवळीनें त्यांना झपाटलें व अखेरच्या क्षणापर्यंत काँग्रेसकार्याच्या रामरगाड्याला ते जुंपलेले होते. संघटनकौशल्यामुळें ते काँग्रेसमध्यें पुढेंच सरकत राहिले. १९३७ सालीं कायदेमंडळाच्या क्षेत्रांत त्यांचा प्रवेश होऊन संयुक्त प्रदेश सरकारांत व केंद्र सरकारांत त्यांची सतत बढती होत राहिली व पं. नेहरूंच्या मृत्यूनंतर १९६४ सालीं तर भारतीय पंतप्रधानपद त्यांना लाभलें. जेमतेम पाच फूट उंची असलेले, कर्तृत्व–नेतृत्वांत ज्यांचा अद्वितीय घसघशीतपणा भारताच्या डोळ्यांत कधीं भरलेला नव्हता असे वामनमूर्ति ना. शास्त्री भारताच्या पंतप्रधानपदावर आरूढ झाले व नेहरूचे वारस झालेल्या शास्त्रींकडे जग पहातच राहिलें. शास्त्रींच्या इवल्याशा मूर्तीमागें हिमालयाची उंची व श्रेष्ठ व्यक्तिमत्व आहे, त्यांच्या सौम्य व विनम्र प्रकृतींत पोलादी निर्धार व असामान्य पराक्रमाची धडक आहे, त्यांच्या प्रसिद्धीविन्मुख व्यक्तिनिरपेक्षतेमागें जगाची नजर खेचून

घेण्याचें सामर्थ्य आहे याचें आकलन जसजसा काल जात चालला तसतसें भारतास व अन्य राष्ट्रांना होऊं लागलें. त्यांना मृत्यूनें गांठलें त्यावेळीं तर या वामनमूर्तीनें जगाचें लक्ष जसें कांहीं तळपत्या सूर्याप्रमाणें स्वतःकडे वेधून घेतलें होतें. मध्यान्हीचा तळपता सूर्य अकस्मात् निखळून पडल्याप्रमाणें त्यांच्या मृत्यूनें भारताला व साऱ्या जगाला आज वाटत आहे

पंतप्रधानाच्या स्थानीं ते १९६४ च्या मे अखेरीस आले व दोन वर्षे पुरीं होण्यापूर्वीच त्यांना मृत्युंजयानें त्या स्थानावरून उचलून नेलें आहे. जेमतेम अडीच वर्षे ते पंतप्रधानाच्या जागेवर होते पण या अल्पशा काळात त्यांनीं बटू वामनाप्रमाणें अशीं पावलें टाकलीं कीं, भारताचा कायापालटच त्यांनीं घडवून आणला. कोणाचीहि भीडमुर्वत न ठेवतां किंवा भीति न बाळगतां घडाडीनें पाऊल टाकून त्यांनीं पंजाबचे मुख्य मंत्री श्री. प्रतापसिंग कैरों यांना राजीनामा द्यावयास लावून तो स्वीकारला आणि यांच धोरणाची अलीकडची प्रचीति अर्थमंत्री टी. टी. कृष्णमाचारी यांचा राजीनामा पत्करण्याच्या रूपानें आली असें म्हणतां येईल. भारताच्या अंतर्गत कारभारांत ते जितके मृदु तितकेंच कणखर व कडवे होते. बोलण्यांत मऊ पण कृतीनें कणखर अशा त्यांच्या कर्तबगारीनें त्यांनीं स्वपक्षीयांप्रमाणें विरोधकांनाहि आपलेसे करून घेतले व भारताचा एकजिनसीपणा त्यांनीं भक्कम केला. पाकनें भारतावर आक्रमण करतांच ना. शास्त्रींची अस्मिता व स्वाभिमान प्रज्वलित झाला व त्यांच्या नेतृत्वाखालीं वीरभारत वाटचाल करूं लागला. त्यानें हाजीपीर, टिथवाल, कारगील भागांत पाकच्या मस्तकावर पाऊल ठेवलेंच पण त्याचबरोबर लाहोर भागांत व राजस्थान सीमेनजीकच्या सिंध हैद्राबादकडेहि पाऊल टाकलें व पाक लष्कराशीं व शस्त्रास्त्रांशीं झुंज घेऊन चारीमुड्या चीत करण्यापर्यंत मजल गांठली. चीननें आक्रमण करून धक्का देतांच पं. नेहरूंनीं सबळ व समर्थ राष्ट्रधर्माचीं दीक्षा भारतास दिली व भारताची शस्त्रोपासना व बलोपासना सुरू झाली. भारतानें केलेला प्रतिकार व पराक्रम पहाण्याचें व आक्रमक सैन्याचा पाडाव झालेला पाहण्याचें भाग्य पं. नेहरूंना लाभलें नाहीं. त्यांचें अर्धेमुर्धे राहिलेलें कार्य व इच्छाच जणुं कांहीं ना. शास्त्री यांनीं आपल्या कारकीर्दीत दुसऱ्या वर्षातील दुसऱ्या पदन्यासानें पूर्ण केली व भारताचा कायापालट करून वीरोचित नवजीवन भारतास दिलें. ना. शास्त्री यांच्या या कर्तबगारीची व अद्भुत किमयेची नोंद भारताच्या इतिहासांत कायमचीं सुवर्णाक्षरांत राहील व भारत किंवा जग शास्त्रींची ह' कामगिरी व आक्रमकांचा पाडाव करण्याचा पराक्रम कधीं विसरूं शकणार नाहींत.

ना. शास्त्री यांनीं भारताचा अशा रीतीनें कायापालट करून भारताचा वीरभारतांत कायापालट केलाच, तसेच कणखर पण राष्ट्र हें तितकेंच शांतिवादी व

ग्रं. क्र. १९५९०

क्षमाशील असतें हेंहि त्यांनीं आपल्या आयुष्यांतील अखेरचें पाऊल ताश्कंद येथें टाकून दाखवून दिलें. काश्मीर, सिंध व पंजाबचा भूभाग त्यांनीं पराक्रमपूर्वक जिंकला व पाकचा युद्धमद हाणून काढला. जिंकण्याची धमक ज्याला आहे तोच दानशूरहि असूं शकतो. भारत पाक शांतता व स्नेहाकरितां त्यांनीं जिंकलेला पाकचा मुलूख पाकला परत देण्याचें औदार्य दाखविलें व मूठभर भिक्षा भिकाऱ्याच्या कटोऱ्यांत टाकावी त्याप्रमाणें जिंकलेला मुलूख पाकला परत देण्यास मान्यता देण्याचें औदार्य त्यांनीं दाखविलें. हाजीपीर, टिथवाल, कारगील भाग किंवा पंजाब सिंधचा भाग भारतानें सोडला असला तरी तो पराक्रमपूर्वक भारत केव्हांहि घेऊं शकेल व हीं ठाणीं परत मिळाल्यामुळें पाकची उपद्रवशीलता वाढणार नाहीं अशी खबरदारी भारत घेऊं शकेल हें उघड आहे. रणांगणावर प्राणपणानें लढावयाचें असतें त्याचप्रमाणें वाटाघाटींच्या आघाडीवरहि कृपणपणा न दाखवितां वाटाघाटी यशस्वी करून शांति व सलोखा साधावयाचा असतो व युद्धोत्तर शांतिपर्व सुरू करावयाचें असतें. ना. शास्त्री यांनीं ताश्कंद येथें अशाच वीरोचित औदार्यानें भारत पाक सलोखा व शांतता स्थापण्यांत यश मिळवून शांति प्रस्थापित करण्याचें तिसरें पाऊल टाकलें व जीवनकार्याची परिपूर्ति जणुं कांहीं साधली. नवें पर्व ताश्कंद घोषणेनें सुरू होत आहे असे ना. शास्त्री यांचे ताश्कंदचे शेवटचे उद्गार होते. नव्या शांतिचक्राचें प्रवर्तन यांनीं ताश्कंद घोषणेवर सही करून जणुं कांहीं केलें व शांतिधर्माचें चक्र फिरूं लागतांच त्यांनीं मागें वळूनहि न पाहतां देह सोडला आहे.

बटु वामनाप्रमाणें तीन पावलांत ना. शास्त्री यांनीं भारताचा कायापालट करण्याचें महान कार्य साधलें. भारताचा अंतर्गत कारभार सुधारून सामाजिक न्याय व कर्तृत्वपरायणता साधण्यास जरूर तें कणखर पाऊल त्यांनीं टाकलें. प्रतिकारक्षम आत्मसंरक्षक बलोपासना सफळ करून त्यांनीं भारताचा वीरोचित कायापालट केला व ताश्कंदला शांतता सलोख्याचें चक्र त्यांनीं फिरतें केलें आहे. हीं तीनहि कामें पूर्णावस्थेला अद्याप पोहोंचावयाचीं आहेत. भारतांत सामाजिक न्याय व स्वावलंबन साधणारी कार्यतत्परता कठोरपणें देहधारी व्हावयाची आहे. चीनच्या व जरूर तर पाकच्या उपद्रवशीलतेचा बंदोबस्त करण्याइतका बलोपासक कायापालट शेवटास जावयाचा आहे व शांतिसलोख्याचा युगधर्म भारताच्या अवतीं-भोंवतीच नव्हे तर आशियांत प्रस्थापित व्हावयाचा आहे. ना. शास्त्रींनीं हा वारसा भारतासाठीं ठेवलेला आहे. नवे पंतप्रधान कोणीहि होवोत. त्यांना ना. शास्त्रींचें हें कार्य पुरें करावें लागेल व भारत तें कार्य पुरें करून घेतल्याशिवाय राहणार नाहीं.

१३-१-६६

मराठा ग्रंथ संग्रहालय, नागपूर. स्वाधीन


REFBK-0016590

ग्रंथालये, लेखक व प्रकाशक यांची सहकारी संघटना

साहित्य सहकार संघ लि.

●

महाराष्ट्रातील लेखक अथवा छोटे प्रकाशक यांच्या प्रकाशनांना सर्व सहकार्य करून त्यांची गुंतविलेली रक्कम कमीत कमी काळात वसूल करून घेण्याची हमी देण्यात येते. योजनेच्या तपशीलासाठी भेटा अगर लिहा.

●

पुस्तक खरेदी अथवा विक्री या विषयीच्या आपल्या
कोणत्याही गरजेसाठी प्रथम भेटा

●

ग्रंथालयांना लागणारी सूचिपत्रे, लेबल्स्, सामान नोंद वही, दाखल नोंद वही,
ग्रंथनाम पत्रिका वगैरे सरकारी अधिकृत नियमाप्रमाणे लागणारी
सर्व स्टेशनरी स्वस्त व सुबकपणे पुरविण्यात येते.

महाराष्ट्र राज्यात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी शाखा निघत आहेत !

आपल्या विभागात खालील ठिकाणी चौकशी करा ;

साहित्य सहकार संघ लिमिटेड

मराठवाडा विभाग : औरंगपुरा – औरंगाबाद
मुंबई विभाग : नायगाव क्रॉस रोड, दादर, मुंबई–१४
पुणे विभाग : विद्यार्थी भांडार. नू. म. वि. प्रशाला, बुधवार, पुणे–२
विदर्भ विभाग : लिमये वाडा, मोदी लाईन नं. ३, सीताबर्डी, नागपूर